चरित्र
१३८१

# श्री शिवछत्रपतींचें सप्तप्रकरणात्मक चरित्र.

संपा. प्रा. भीमराव कुलकर्णी.

REFBK-0016036



मल्हार रामराव चिटणीस विरचित

# श्रीशिवछत्रपतींचें सप्तप्रकरणात्मक चरित्र



संपादक

प्रा. भीमराव कुलकर्णी



मल्हार रामराव चिटणीस विरचित

# श्रीशिवछत्रपतींचें सप्तप्रकरणात्मक चरित्र

संपादक
प्रा. भीमराव कुलकर्णी

सु वि … मंडळ

REFBK-0016036
संग्रहालय ठाणे
अनुक्रम ४१८२८
वि: चरित्र

श्री शिवछत्रपतींचें
सप्तप्रकरणात्मक चरित्र

□

© सौ. कुंदा कुलकर्णी.

पहिली आवृत्ती जून १९६७.
मूल्य ९·५० रुपये.

□

प्रकाशक
श्यामकान्त बनहट्टी
सुविचार प्रकाशन मंडळ
४६१।४ सदाशिव, पुणे २
धनतोली, नागपूर १

□

मुद्रक :
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव, पुणे २

# पु र स्का र

मल्हार रामराव चिटणिसांच्या सप्तप्रकरणात्मक शिवचरित्राची प्रा. भीमराव कुलकर्णी यांनी संपादिलेली ही चिकित्सक आवृत्ती अनेक दृष्टीने महत्त्वाची आहे. बखरीची मूळ संहिता शास्त्रीय दृष्टिकोनातून त्यांनी सिद्ध केली आहे. टीपांमध्ये उपलब्ध ऐतिहासिक साधनांधारे त्यांनी बखरीतील साऱ्या घटनांची ऐतिहासिक दृष्टीने चिकित्सा करून ह्या बखरीचे इतक्या मार्मिकतेने विश्लेषण केले आहे की, त्यामुळे बखरसंपादनाचा एक नवा आदर्श त्यांनी घालून दिलेला आहे. प्रत्यंतर पुराव्यांधारे इतक्या व्यापक दृष्टिकोनातून संपादिलेली ही पहिलीच बखर आहे असे मी आतापर्यंत प्रसिद्ध झालेल्या बखरींच्या अवलोकनावरून निःसंदिग्धपणे म्हणू शकतो.

आपल्या बखरींच्या संपादनाची योग्य दिशा सापडण्यासाठी ऐतिहासिक साधनग्रंथांतून शिरण्याचे अत्यंत जिकिरीचे व कष्टाचे काम करण्याची आपली तयारी हवी, त्याखेरीज बखरींतील घटनांचा अन्वयार्थ लावणे शक्य होत नाही. प्रा. कुलकर्णी यांनी त्यामध्ये चांगलीच गती प्राप्त करून घेतली आहे, हे त्यांनी संपादिलेल्या भाऊसाहेबांच्या बखरीच्या वेळीच लक्षात आले होते. शिवचरित्रासंबंधीच्या उपलब्ध ऐतिहासिक साधनांचा व्याप फार मोठा आहे. त्यांचा अभ्यास करण्याचे त्यांनी ठरविले व त्यामध्ये कसल्याही प्रकारची कसूर केली नाही, यातच त्यांच्या अखंड उद्योगप्रियतेची साक्ष पटते.

या आवृत्तीतील टीपा पाहिल्यानंतर ऐतिहासिक साधनांच्या आधाराने सिद्ध होणारे शिवचरित्र कोणत्या प्रकारचे असू शकेल याचीही कल्पना येते. म्हणूनच ह्या टीपा अभ्यासकांच्या दृष्टीने स्वतंत्र रीतीनेही अतिशय उपयुक्त आहेत असे वाटते. कारण साधनांबद्दलचे तारतम्य या टीपांतून फार चांगल्या रीतीने पाळले गेले आहे.

मराठीतील उपलब्ध बखरींचा कशा रीतीने अभ्यास होणे जरूरीचे आहे, याची बरीचशी कल्पना या संपादित आवृत्तीवरून येते आणि आपल्या बखरींचा असा अभ्यास मोठ्या प्रमाणात अद्याप झाला नाही, याची जाणीवही होते. प्रा. कुलकर्ण्यांनी पुढे केव्हा तरी हे काम हाती घेऊन पुरे करावे, अशी त्यांना मी सूचना करतो.

रा. शं वाळिंबे

# नांदी

चिटणीस-बखरीच्या यापूर्वीच्या रा. ब. कीर्तने व साने यांच्या दोनच आवृत्त्या उपलब्ध आहेत. या दोन्ही आवृत्त्यांचा मी या आवृत्तीसाठी उपयोग करून घेतला आहे. कीर्तने यांना प्राप्त झालेले हस्तलिखित सर्वांत जुने होते व इ. स. १८६७ पासूनच ते त्यांच्या संग्रही होते. ते प्रसिद्ध करताना अर्थसुलभतेसाठी त्यांनी त्यातील बऱ्याच शब्दरूपांना आधुनिक स्वरूप दिले. साने यांनी त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या काळात ही बखर संपादित करावयास घेतली, त्यावेळी त्यांना ३०–४० वर्षांपूर्वी उपलब्ध असलेली हस्तलिखिते हाती नसल्याने त्यांची बरीच कुचंबणा झाली. त्यांना मिळालेल्या हस्तलिखितांच्या नकला अलीकडच्या काळातील होत्या. बखरीतील तद्भव शब्दरूपांबद्दल तत्समरूपे अंतर्भूत करण्याचा साने यांचा सोस प्रसिद्धच आहे. या संपादनाच्या वेळीही त्यांनी बखरीतील कित्येक शब्दरूपांचे तत्समीकरण केले आहे. अर्थसुलभतेच्या दृष्टीने आधुनिक वळण असलेले पाठ स्वीकारण्याचेही सान्यांचे धोरण होते.

म्हणूनच संहिता सिद्ध करताना कीर्तने यांच्या प्रतीचा मी जसा विशेष उपयोग केला आहे, त्याप्रमाणे सान्यांच्या आवृत्तीतील व उपलब्ध हस्तलिखितांतील पाठभेदांच्या आधारे ही नवी संहिता मी परिष्कृत केली आहे. अभ्यासकांना या नव्या आवृत्तीमुळे उत्तरकालीन पेशवाईतील मराठी भाषेचे स्वरूप चांगल्या रीतीने समजण्यास मदत होईल, असा विश्वास वाटतो.

बखरी या मोडी लिपीत लिहिलेल्या आहेत. जलद गतीने लिहिण्यास उपयुक्त असलेल्या या लिपीमध्ये कित्येक अक्षरांमध्ये सारखेपणा आहे. कारकुनी कामासाठी ही लिपी रूढ झाल्याने मोडी लिपीमुळे मराठी भाषेला एक निराळेच वळण लागले आहे. ऱ्हस्वदीर्घांचा विधिनिषेध न पाळता सारीच रूपे दीर्घ लिहावयाची व विरामचिन्हांचा वापर करावयाचा नाही, या पद्धतीमुळे ह्या बखरी संपादिताना अनेक अडचणी येतात. अर्थसुलभतेसाठी विरामचिन्हांचा वापर करावा लागतो, परंतु त्यामुळे काही ठिकाणी थोडेबहुत घोटाळेही होतात. विरामचिन्हे

वापरताना मी काही ठिकाणी स्वतंत्रदृष्ट्या विरामचिन्हांची योजना केली आहे. त्यामुळे अधिक चांगल्या रीतीने अर्थनिष्पत्ती होते, असे मला वाटते. अर्थातच ती योजिण्यामध्ये माझ्या कुवतीच्या दृष्टीने काही न्यून, काही चुका असण्याचाही संभव आहे, याची मला जाणीव आहे. परिच्छेदांना शीर्षके दिल्याने मात्र बखरीची वाचनीयता वाढली आहे, असे दिसून येईल.

अर्थस्पष्टीकरणासाठी कित्येक अध्याहृत शब्द कंसात मुद्दाम दिले आहेत. साने यांच्या, धर्तीवर संकेतार्थक ‘ तर ’ बद्दल येणारे ‘ तरी ’ हे रूप ‘ तरि ’ असे व विरोधात्मक ‘ तरी ’ हे अव्यय तसेच ठेविले आहे.

ऐतिहासिकदृष्ट्या ही बखर सामान्य असूनही तिच्या संपादनासाठी उपलब्ध साधनांचा अभ्यास करण्याची संधी मिळाली, हे मी माझे भाग्य समजतो. साने, खरे, पारसनीस, राजवाडे यांनी ऐतिहासिक साधने उभी करून आपल्यावर फार मोठे उपकार करून ठेविले आहेत. त्यांच्याकडून मिळालेल्या प्रेरणेमुळे नंतरही अनेक प्रकारची कमीअधिक महत्त्वाची साधने कित्येक संशोधकांनी उपलब्ध करून दिलेली आहेत. त्या साधनांतूनच कित्येक शिवचरित्रे अवतरली आहेत. त्यांच्यामध्ये रममाण होण्यात अपूर्व आनंदाचा लाभ मला मिळाला व त्या सर्वांच्या बद्दलच्या कृतज्ञतेच्या भावनेने मन भारावून गेले.

म. म. दत्तो वामन पोतदार, ग. ह. खरे, दि. वि. काळे इत्यादिकांचे प्रेमळ मार्गदर्शन मला सतत लाभत आले आहे. स. प. महाविद्यालय, फर्ग्युसन महाविद्यालय, रॉयल एशियाटिक सोसायटी, भारत इतिहास संशोधन मंडळ व महाराष्ट्र-साहित्य-परिषद इत्यादी संस्थांच्या ग्रंथसंग्रहालयांनी मला अवश्य ते ग्रंथसाहाय्य दिले व माझे प्रकाशक मित्र श्री. राजेंद्र बनहट्टी व मुद्रक श्री. दादासाहेब जोशी यांनी तगादा लावून हे काम पुरे करून घेतले. गुरुवर्य डॉ. रा. शं. वाळिंबे यांनी वेळात वेळ काढून पुरस्कार लिहून माझ्या अल्पकृतीचे कौतुक केले...

या सर्वांचा मी अतिशय ऋणी आहे.

संपादक

## महत्त्वाचे संदर्भग्रंथ

( कंसात संक्षेपचिन्हे )

चिटणीस बखर–कीर्तने
,, संपा. खाने ( शशिछम )
सभासद-बखर–संपा. शं. ना. जोशी
९१ कलमी बखर–संपा. वाकसकर
शेडगांवकर बखर
शिवदिग्विजय ( शिदि )
मराठी साम्राज्याची छोटी बखर
बुंदेल्याची बखर–भाषां. पटवर्धन
समर्थांची बखर
मालोजी व शहाजी–खरेशास्त्री ( माश )
चिटणीस घराण्याची संक्षिप्त माहिती व सनदापत्रे–१–२ ( ऐजुले )
वैद्यांचे ऐतिहासिक निबंध ( वैनि )
ग्रँट डफकृत मराठ्यांच्या बखरीवर टीका–कीर्तने
युगप्रवर्तक शिवाजीमहाराज–भावे(भाशि)
छत्रपती संभाजी महाराज–बेंद्रे ( बेंसं )
अर्वाचीन महाराष्ट्रेतिहासकालातील राज्यकारभाराचा अभ्यास–शं. ना. जोशी ( मराअ )
श्रीशिवभारत–संपा. दिवेकर ( शिभा )
पर्णालपर्वतग्रहणाख्यानम्–संपा. दिवेकर
राधामाधवविलासचंपू–राजवाडे ( रामाविचं )
गागाभट्टकृत श्रीशिवराजाभिषेक–संपा. बेंद्रे ( बेंशि )
भारत इतिहास संशोधक मंडळ इतिवृत्त ( भाइसं ), त्रैमासिक ( भाइसंत्रै )
बुसातीनुस्सलातीन ( बस )
शक. शिवाजी–सरदेसाई ( शशि )
मराठ्यांच्या इतिहासाची साधने–राजवाडे खंड ८, १५–१८ ( राखं )
ऐतिहासिक प्रस्तावना–राजवाडे ( ऐप्र )
शिवकालीन पत्रसारसंग्रह १, २, ३ ( शिपसासं )
शिवचरित्र साहित्य खंड १–११ ( शिचसा )
शिवचरित्र वृत्तसंग्रह खं १–३ ( शिवृसं )
शिवचरित्रप्रदीप, जेधे शकावली ( शका. शिचप्र )
शिवाजी निबंधावली खं. २ ( शिनि )
रायगडची जीवनकथा–आवळसकर(राजी)
काव्येतिहाससंग्रहात प्रसिद्ध झालेले ऐतिहासिक पत्रे, यादी वगैरे ( सापया )
श्रीशिवछत्रपती–शेजवलकर ( शेशि )
Military System of the Marathas–Sen ( M S M )
A History of The Mahrattas Vol.I-Grant Duff, 1921 ed. (ग्रँड)
Foreign Biographies of Shivaji-Sen ( F B S )
Shivaji and his Times–Jadunath Sarkar 5th ed. ( सशि )
The Life of Shivaji Maharaj–ताकखाऊ ( ताशि )
Shivaji the Great. Vol. I-IV डॉ. बाळकृष्ण ( बाशि )
Rajasthan Records, Shivaji's Visit to Aurangzeb at Agra–सरकार–रघुवीरसिंग ( रारे )
Shivaji Souvenir ( शिसू )
English Records on Shivaji ( E R S )

( यांखेरीज इतर संदर्भ स्पष्टपणे निरनिराळ्या ठिकाणी नोंदले आहेत. )

# अनुक्रम


| | |
|---|---|
| पुरस्कार | तीन |
| नांदी | चार |
| प्रस्तावना | नऊ |
| प्रकरण प्रथम, पुर्वजवर्णन आणि जन्मकथन | १ |
| प्रकरण द्वितीय, राज्य आक्रमण आणि सज्जनसेवन | २४ |
| प्रकरण तृतीय, अफजल वध नानाप्रकारें यवनाशीं युद्ध | ५३ |
| प्रकरण चतुर्थ, राज्य मर्यादा स्थापन व पितृदर्शन | ७७ |
| प्रकरण पंचम, दिल्लीपति पराभव | ९८ |
| प्रकरण षष्ठ, दक्षण–दिग्विजय | १३२ |
| प्रकरण सप्तम, राज्याभिषेक | १५० |


## टीपा


| | |
|---|---|
| प्रकरण प्रथम | १८९ |
| प्रकरण द्वितीय | २०६ |
| प्रकरण तृतीय | २२२ |
| प्रकरण चतुर्थ | २३१ |
| प्रकरण पंचम | २३९ |
| प्रकरण षष्ठ | २५४ |
| प्रकरण सप्तम | २६६ |
| परिशिष्ट | २७९ |
| शब्दकोश | २८१ |

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
| --- | --- | --- | --- |
| ९४ | १ | सतदुर्गव्यसनें | सतदुर्व्यसने |
| १०८ | ३ | शर्मिदा | शर्मिंदा |
| १२८ | १२ | फोज | फौज |
| १४२ | ९ | राज | राज- |
| १५९ | २७ | प्रांत बंदी | प्रांत चंदी |
| १५९ | २८ | कृष्णगिरी | कृष्णगिरी |
| १७१ | १६ | घ | व |
| १९१ | २२ | राजमयुख | राजमयूख |
| २११ | २९ | १५५८ | १६५८ |
| २२० | २८ | पसासं | शिपसासं |
| २३५ | १२ | rpeort | report |
| २४३ | २८ | सभासदाने असे | असे सभासदाने |

□ □ □

८७९२८
९२८७

# प्रस्तावना

## मराठ्यांच्या इतिहासाची साधने : चिटणीसबखरीस अग्रमान

शिवचरित्रविषयक बखरींत मल्हार रामराव चिटणिसांचे शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र अनेक दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण आहे. इंग्रजांनी लिहिलेल्या इतिहासातील चुका व त्यांनी केलेला विपर्यास लोकांच्या नजरेसमोर आणण्यासाठी उपलब्ध बखरी व ऐतिहासिक कागदपत्रांचा शोध घेण्याची प्रेरणा देणारी आद्य व्यक्ती म्हणजे रा. ब. नीलकंठ जनार्दन कीर्तने ( १८४४–१८९६ ) ही होय. डेक्कन कॉलेजमध्ये विद्यार्थिदशेतच त्यांनी 'पूना यंग मेन्स असोशिएशन' या सभेपुढे इ. स. १८६७ मध्ये 'ग्रांट डफकृत मराठ्यांचे बखरीवर टीका अथवा मराठ्यांचे इतिहासाविषयीं थोडेसें निरूपण' या नावाचा निबंध वाचला. मराठ्यांच्या इतिहासाची साधने जमविण्याची आवश्यकता प्रतिपादताना या निबंधात त्यांनी 'शिवाजीचे चरित्र हिंदूशिवाय इतरांस यथायोग्य कळेल असे नाही' हा मौलिक सिद्धांत मांडला. ग्रँट डफने* मोठ्या परिश्रमाने इंग्रजीत 'मराठ्यांचा इतिहास' नावाचा जो ग्रंथ लिहिला, त्यासंबंधाने कीर्तन्यांनी या निबंधात असे उद्गार काढले की,

"आमच्या मते या प्रकरणात ग्रांट डफ साहेबांचे हातून एकच चुकी झाली आहे. ती ही की, त्यांनी शिवाजीचे चरित्र लिहिताना मराठ्यांचे लेखांवर जितका भरोसा ठेवणे योग्य आहे तितका ठेविला नाही. त्या लेखांवर जितके लक्ष पुरविणे योग्य आहे, तितके त्यांनी पुरविले नाही. कारण शिवाजीविषयी जितका प्रतिकूल भाग त्यांचे लेखात आला आहे तितका बहुतेक मुसलमान व त्यांचे अनुयाई यांचे लिहिण्यावरूनच घेतलेला आहे. मराठी बखरकारांचे म्हणणे जमेस धरलेच नाही...

'....लोकांच्या विवाहित स्त्रिया हिरावून घेण्याकरितां मोहिमा करणाऱ्यांच्या इतिहासकारांनी शिवाजीस अनीतिमान, दगलबाज व चोर इत्यादी पाहिजे तसे दोष दिल्यास ते त्यांना शोभणारच आहेत; परंतु इतरांनी अशांची सड घेऊ नये.

* जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ. जन्म ८ जुलै १७८९. १८०६ ला हिंदुस्थानात आगमन. १८१८ ते २२ साताऱ्याचा रेसिडेंट. या काळात जमविलेल्या कागदपत्राधारे 'History of the Maharattas' हे पुस्तक १८२२ ते २५ मध्ये स्कॉटलंडमध्ये राहून लिहिले व १८२६ मध्ये प्रसिद्ध केले. या पुस्तकापायी आपणास १७०० पौंडांवर खोट बसल्याचे त्याने लिहिले आहे. ( ग्रँड प्रस्ता. p. xxix–xlii )

शिवाजीने अफझुलखानाचा वध केला त्यासंबंधे त्यास दगेखोर म्हणण्याचा पाठ आहे. परंतु या संबंधे खरी गोष्ट काय आहे, मराठी इतिहासकारांचे काय म्हणणे आहे, याचा विचार केला पाहिजे... '

—आणि कीर्तन्यांनी त्यासाठी विविधज्ञानविस्तार या मासिकातून 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' या नावाने १८७७ साली चिटणिसांची सतप्रकरणात्मक बखर प्रसिद्ध करावयास सुरुवात केली.* अशा रीतीने मराठ्यांच्या इतिहासाची साधने म्हणून प्रसिद्ध होण्याचा अग्रमान या सप्तप्रकरणात्मक बखरीस मिळाला.

## मलारी रामराव चिटणीस

टीपांमध्ये ( पृ. १८९–९० ) बखरकार मल्हार रामराव चिटणीस यांची थोडक्यात माहिती दिली आहे. त्यांच्या बद्दलची उपलब्ध अशी इतर माहितीही उद्बोधक ठरेल म्हणून तिचा थोडक्यात उल्लेख करणे अवश्य आहे.

छत्रपती शाहू महाराजांच्या निधनानंतर रामराजा, धाकटे शाहू इ. छत्रपतींची सत्ता ही नामधारी राहून पेशवे हे दौलतीचे मालक होऊन बसले. सवाई माधवरावांच्या कारकीर्दीत नाना फडणिसाने धाकट्या शाहूराजांचा चांगलाच कोंडमारा केला. छत्रपतींच्या खर्चासाठी चार लाखांची तैनातीची जरूरी नाही, लाखभर पुरेत म्हणून त्यांच्या पागा, हत्ती वगैरे पुण्यास आणले. 'अमर्यादा करून चौकी पहारें ठेऊन राजमंडळाचे लोक कोणी जाऊं नये ऐसें केलें. चाकरीच्या बायका दोनचार व लेकावळे दोनचार खेरीज करून सर्वांच्या अडेश्री बंद केल्या, राजपत्रें कागदपत्र होणें यांचें कांहींएक कारण नाहीं, या प्रमाणें बंदोबस्त केला.‡ '

पेशव्यांनी अशा रीतीने छत्रपतींची अमर्यादा केलेली पाहून शाहू राजांनी थोडीशी हालचाल केली, परंतु ते दुबळे असल्यामुळे त्यांचे काही चालले नाही. याच काळात चिटणिसांच्या घरातील भाऊबंदकीमुळे चिटणीशी वतनाबद्दल तंटा सुरू झाला. गोविंदराव चिटणिसांच्या मृत्यूनंतर मल्हार रामरावांचे चुलतबंधू रघुनाथ लक्ष्मण यांनी पेशव्यांकडे रदबदली करून चिटणिसी वतनाच्या सनदा स्वतःकडे

---

* विविधज्ञानविस्ताराच्या इ. स. १८७७ ते १८८१ पर्यंत पुस्तक क्र. ९ अंक १ ते ६; पु. क्र. १० अंक १–३. ५–७, ८–९, ११–१२, पु. क्र. ११ अंक १–३; पु. क्र. १३ अंक ८–९, १०–१२ इतक्या कालावधीत ही बखर क्रमशः प्रसिद्ध झाली. १८८२ साली पुस्तकरूपाने पहिली व १८९४ साली दुसरी आवृत्ती निघाली.

‡ मराठी रियासत उत्तरविभाग ३. ५१४.

करून घेतल्या. परंतु मल्हार रामरावांनी खटपट करून त्या सनदा स्वतःच्या नावाने फिरवून घेतल्या व छत्रपतींचे वकील म्हणून ते पुणे दरबारी रूजू झाले. पुण्याच्या मुक्कामातच शके १७११ मध्ये कायस्थप्रभूंवर हरिपंत फडके व आप्पा बळवंत मेहेंदळे यांनी ग्रामण्य केले. त्यामध्ये मल्हार रामरावही सापडले होते.*

पुढे इ. स. १८०२ मध्ये यशवंतराव होळकराने पुणे लुटले व मल्हाररावांवर एक लक्ष रुपयाची पट्टी बसविली. त्यावेळी दुसऱ्या बाजीरावाचा भाऊ अमृतराव यास पेशवाईची वस्त्रे आणण्याची कामगिरी होळकरांनी मल्हाररावांकडे सोपविली. मल्हारराव त्यानिमित्ताने साताऱ्यास आले व बोरगावास पळून गेले. इकडे दुसऱ्या बाजीरावाने त्यांची मिळकत जप्त केली व चिटणिसांच्या घराण्यातील कोणी सापडल्यास त्यास ठार मारण्याचा आदेश दिला.§ इकडे चिटणीस पदागंदा झाले व पेशवे व इंग्रज यांच्या जाचाला कंटाळून शाहूराजांचे बंधू चतुरसिंग यांनी सैन्य जमवून बंडाळीस आरंभ केला होता त्यात सामील होऊन रानोमाळ हिंडू लागले. इंग्रजांनी बाजीरावाचा मोड करून त्याच्यावर नियंत्रण बसविले, तेव्हा मल्हारराव साताऱ्यास परत आले. इ. स. १८०८ मध्ये शाहू राजे निवर्तले व त्यांचे पुत्र प्रतापसिंह हे साताऱ्च्या गादीवर बसले. त्यांचे चिटणीस म्हणून मल्हार-रावांची नेमणूक झाली व त्यांच्या आज्ञेवरून मल्हाररावांनी १८१० पासून छत्रपतींचे चरित्र लिहिण्याचे काम हाती घेतले.

## उल्लेख विसंगत नाही

आपणास चरित्रलेखनाची आज्ञा प्रतापी शाहू नृपछत्रपतींनी केली असे इ. स. १८१० मध्ये बखरकार सांगतो आणि शाहू छत्रपतींचे निधन तर इ. स. १८०८ मध्येच झाले होते. तेव्हा यामध्ये काही विसंगती असावी असे वाटत होते. परंतु आता छत्रपती प्रतापसिंह राजे व मल्हारराव रामराव या दोघांच्याही सुवर्णमुद्रा उपलब्ध झाल्या आहेत‡ त्यांवरून व 'मराठी साम्राज्याची छोटी बखर' यातील पृ. १०९ वरच्या उल्लेखावरून प्रतापसिंहास 'शाहू राजे' असेच म्हणत असत असे दिसते. गादीवर आल्यावेळी अल्पवयीन असल्यामुळे स्वतःची मुद्रा तयार करण्यापूर्वी त्याने शाहू छत्रपतींच्या नावाने मल्हार रामरावांस आज्ञा केली असावी. बखरकाराचा उल्लेख त्यामुळे विसंगत ठरत नाही, असे म्हणावे लागते.

---

* ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास–ठाकरे पृ. ५२

§ कायस्थ प्रभूंच्या इतिहासाची साधने–गुप्ते पृ. १०-११

‡ मराअ पृ. २२३-२४,२६.

## मल्हाररावांचा सप्तसोस

मल्हाररावांनी शिवाजी महाराजांपासून प्रतापसिंहापर्यंत सहा छत्रपतींची चरित्रे व मराठ्यांच्या राजनीतीचे विवेचन करणारा 'राजनीति' हा ग्रंथ असे एकून सात ग्रंथ लिहिले आहेत. शिवछत्रपतींचे चरित्र व राजनीति ही सप्तप्रकरणात्मक आहेत. मराठ्यांच्या उदयापासून तो मराठेशाहीच्या अखेरीपर्यंतचा हा सर्व इतिहास मल्हार रामराव १८ वर्षे लिहीत होते. आपले सारे लेखन सप्तखंडांत विभागून लिहावयाचे अशी मल्हाररावांची मुळापासून योजना दिसते. या सप्तखंडांपैकी शिवचरित्र हा मल्हाररावांच्या लेखनाचा मानदंड. राजनीति हा ग्रंथही तसाच महत्त्वाचा, त्यामुळे या दोन्ही ग्रंथांची परत सप्तप्रकरणांत विभागणी केली. एखादा विशिष्ट आकडा शुभदायक आहे, अशी कित्येकांची समजूत असते. मल्हाररावांचा सप्तसोस या भावनेतून निर्माण झाला असावा.

## साधनांचा, चिकित्सक दृष्टीचा अभाव

मल्हाररावांनी चरित्रलेखनास प्रारंभ केला, तेव्हा त्यांच्या घरी साधनांचे भारे पडले होते, इतर जुन्या घराण्यांतूनही पुष्कळ संभार होते, असा बहुतेकांचा गैरसमज आहे. शिवचरित्रलेखनासाठी मल्हाररावांना फार थोडी साधनसामुग्री उपलब्ध होती, याचा मुद्दाम येथे उल्लेख केला पाहिजे. टीपांमध्ये अनेक ठिकाणी चिटणिसांच्या वर्णनांची चर्चा करताना त्यांच्यासमोर कोणते आधार होते आणि त्या आधारांचा ते कशा रीतीने उपयोग करतात, त्याची चिकित्सा केली आहे. त्यावरून आपणाला असे दिसेल की, चिटणिसांनी सभासदबखरीचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला आहे. चिटणिसांच्या पूर्वी रघुनाथ यादव चित्रे यांनी सभासदबखर पुढे ठेवून त्या बखरीतील आशयच काव्यमयतेने व आकर्षक भाषाशैलीने वाढवून आपले शिवचरित्र सजविले होते. मल्हाररावांनी मात्र स्वतंत्ररीत्या शिवचरित्र लिहावयाचे ठरविले, त्यावेळी सभासदबखरीस इतर साधनांची त्यांनी जोड दिली. मल्हाररावांनी सभासदाबरोबरच अनेक ठिकाणी ९१ कलमी बखरीचा वापर केला आहे. अफजलखानाच्या मोहिमेचे मल्हाररावांचे वर्णन परमानंद कवीच्या शिवभारताशी जुळते, त्यावरून चिटणिसांनी शिवभारत पाहिले असावे, असे मी टीपेत म्हटले आहे. शिवभारताच्या पहिल्या १६ अध्यायांचे मोडीत लिहिलेले गद्यरूपांतर तंजावरकडे उपलब्ध आहे. शिवाजी महाराजांनी व्यंकोजीस लिहिलेली जी तीन पत्रे मल्हाररावांना उपलब्ध होती ( पृ. २५६-५७ पाहा ), त्या पत्रांबरोबर मल्हाररावांना शिवभारताचे गद्यरूपांतर उपलब्ध असले पाहिजे. त्याखेरीज समर्थांच्या चाफळच्या संस्थानाची उस्तवारी करण्याचे काम चिटणीस घराण्याकडेच होते व हनुमंतस्वामींजवळ समर्थांच्या चरित्राचे जे हस्तलिखित होते, त्याच्या साहाय्याने समर्थांचे विस्तृत चरित्र लिहिण्याची कामगिरीही मल्हाररावांकडेच होती. त्या निमित्ताने मल्हाररावांना समर्थविषयक

सारे सांप्रदायिक कागदपत्र उपलब्ध होते. त्यांखेरीज खाफीखान, दिलकाश, बुसातीनुस्सलानित वगैरे काही फारसी बखरी त्यांना उपलब्ध असाव्यात, परंतु त्यांचा त्यांनी विशेष उपयोग केलेला दिसत नाही. अस्सल कागदपत्रे मात्र मल्हाररावांना विशेष उपलब्ध नव्हती. ग्रँट डफने अशा रीतींचे कागदपत्र मिळविण्यासाठी वारंवार चिटणिसांना छेडले, त्याबद्दलचा पेशवे दप्तरातील पुढील उल्लेख§ अतिशय महत्त्वाचा आहे :

" ग्रांटनें सिवाजी महाराजाचा तहनामे वगैरे साधनी कागद कांहीं जुने आहेत पुसिले. त्यावर उत्तर केलें कीं, रायगडास औरंगजेबाचा वेढा पडिला. किला घेऊन शाहू महाराज कबिले सर्व धरून नेले. संभाजी महाराजांस धरून नेले आणि मारिलें. नंतर यास नेले तेव्हा मालमालियेत दौलत कागदपत्र बादशाहाचे हस्तगत जाले. राजाराम मात्र सडे पलून निघाले. त्याजमुळें जुना कागद तहनामे राहिले नाहीं. "

धाकट्या शाहूराजांच्या कारकीर्दीतच कर्नल क्लोज व एल्फिन्स्टन या उद्योगी इंग्रजांच्या सल्ल्यानुसार शाहूराजांनी जुने ऐतिहासिक कागदपत्र जमविण्यास सुरुवात केली होती, हे पारसनीस संग्रहातील फर्मानावरून‡ लक्षात येते. मल्हाररावांचे वडील रामराव यांनी गोविंदरावांच्या मृत्यूनंतर चिटणीसी आपणांस मिळावी म्हणून मध्यस्थांकरवी जे प्रयत्न केले त्यास शाहूराजांनी नकार दिला व मध्यस्थांना सांगितलें* की, " त्यांस ( रामरावांस ) तूर्त इतकेंच सांगावें जे, ' तुम्हांस हाली चार कामें काजें सांगितलीं आहेत तीं करून यावीं. कांहीं सरकार चाकरी केलेसी करावी. नंतर ( चिटणीस ) करणें न करणें याचा जाबसाल सांगावयास येईल. "

रामरावांकडे जे सरकारी काम सोपविण्यात आले होते, ते निरनिराळ्या ठिकाणांहून कागदपत्रे जमविण्याचेच असावे. रामरावांनी त्यानुसार जिंजीच्या हणमंते घराण्याकडून बाळाजी आवजीच्या हस्ताक्षरातील महाराजांची तीन पत्रे

---

§ पेशवेदप्तर खंड ४२. पृ. २२.

‡ ' जाहीरनामा महाराज मंडल हुजरून समस्त लोकांस समजावें याकरितां आज्ञा केली जे, बखर व कैफियत व तांब्रपत्रें व जुने सनदा व वतनपत्रें व इनामपत्रें वगैरे व मुलकाचे हकीकतीसुद्धां मराठे अक्षराची व फारसी व बालबद्ध व संस्कृत व हिंदुस्थानांतील व जुने हिंदी राज्यांतील व बेदार, पादशाही व निजामशाही व इदलशाही राज्यांतील व सिवाजी महाराजांचे कारकीर्दीतील व संभाजी महाराज व राजा........ '

* चिटणीस घराण्याची संक्षिप्त माहिती व सनदापत्रे—पुस्तक २. पृ. २२.

हस्तगत केली. आबा पारसनिसांच्या संग्रही औरंगजेबाची शिवाजीराजांना पाठविलेली काही फर्माने उपलब्ध होती. यांखेरीज मल्हाररावांकडे अस्सल साधने उपलब्ध नव्हती. मल्हाररावांनी जिंजीची तीन्ही पत्रे आपल्या चरित्रात कशीही उतरविली आहेत. आग्र्याहून सुटकेनंतरच्या औरंगजेबाच्या फर्मानांना योग्य उपयोग केला नाही. चिकित्सक दृष्टीच्या अभावामुळे प्रत्यंतरपुराव्यांच्या साहाय्याने आपले चरित्र लिहावे ही मल्हाररावांची मुळी भूमिकाच नाही. ते त्यांच्या रक्तातच नाही. ग्रँट डफ व राजवाडे यांनी त्याच्या चरित्राचे दोषाविष्करण योग्य रीतीने केले आहे.*

### ग्रह-पूर्वग्रह, जातिनिष्ठा, वतननिष्ठा

मल्हाररावांची दृष्टी ही चोखंदळ इतिहासकाराची असणे शक्य नव्हते. कारण शास्त्रशुद्ध भूमिकेतून इतिहासलेखन करावे ही भूमिका आपल्याकडे रुजली नव्हती. आणि पुन्हा साधार, सत्य, वस्तुनिष्ठ व रेखीव असा इतिहास लिहावा, यासाठी जी एक विशेष प्रकारची मनःप्रवृत्ती लागते, तिचा मल्हाररावांजवळ संपूर्ण अभाव होता. तत्कालीन लोकमानसावर पुराणादिकांचा, दैववादाचा, चमत्कारादी भारुडांचा व अद्‌भुततेचा अंश असलेला दंतकथांचा जो मोठा परिणाम होता, त्यांच्या पकडीतून मल्हाररावांसारखा कारकुनी बाण्याचा इसम सुटू शकेल ही कल्पनाच मुळी असमंजसपणाची आहे. पूर्वजांनी मिळविलेली वतने जप्त होण्याची, भाऊबंदकीच्या भांडणात ती नाहीशी होण्याची वेळ आलेली; पेशव्यांच्या अवकृपेमुळे परागंदा होऊन भयंकर दारिद्र्याचे चटके भोगण्यात आयुष्यातील उमेद खर्च झालेली; ज्यांची निष्ठेने चाकरी करण्याची मनीषा धरावी त्या छत्रपतींचे सारे वैभव नष्ट झालेले; त्यातही ग्रामण्य–प्रकरणामुळे, ब्राह्मणांच्या उपद्व्यापांमुळे मन दुखावलेले, क्षुब्ध झालेले; अशा अवस्थेत मल्हाररावांनी चरित्रलेखनाला हात घातला. आपले चरित्र क्रमवार, सुसंगत, तारीखवार लिहावे ही त्यांची भूमिका नसल्यामुळे त्यांनी आपल्या सोईसाठी चरित्राचे सात कप्पे केले आणि घटनांचा क्रम लक्षात न

---

* (1) "Mulhar Ram Rao's Life of Sivajee is very voluminous, but I do not think he has made good use of the valuable letters and records in his possession" (ग्रँड पृ. ९५).

(२) "सामुग्रीच्या महत्त्वाच्या मानाने मल्हाररावांनी शिवछत्रपतींचे चरित्र मोठे नामांकित लिहिले आहे असे नाही. ह्याचे कारण महाराष्ट्रातील विद्येचे मान होय. प्रमाण काय, अप्रमाण काय, मिळालेल्या साधनांचा यथास्थित चोख व साद्यंत उपयोग कसा करून घ्यावा व का करून घ्यावा वगैरे गोष्टींच्या अज्ञानामुळे मल्हार रामरावांचे चरित्र जसे वठावे तसे वठले नाही". ऐप्र पृ. २१९.

घेता निरनिराळ्या प्रकारच्या घटनांची वर्गवारी करून त्यानुसार आपल्या चरित्राची मांडणी केली. अशा रीतीने कप्पे पाडून चरित्र लिहिण्याची बखरकाराची दृष्टी नीट लक्षात घेतली तर त्याच्या लेखनपद्धतीचे मर्म लक्षांत येते.

शिवाजीमहाराजांच्या मृत्यूनंतर १३० वर्षांनी त्यांचे चरित्र लिहिण्याची प्रेरणा मल्हाररावांस झाली व उपलब्ध असलेल्या बखरींपेक्षा मोठ्या आकाराचे चरित्र त्यांनी मोठ्या आत्मविश्वासाने लिहिले. चरित्र-नायक आणि चरित्रकार यांमध्ये कालखंडाच्या दृष्टीने फार मोठी तफावत पडलेली, संभाजी, राजाराम, शाहू इत्यादिकांच्या वेळेची अत्यंत अस्थिर अशी राजकीय परिस्थिती आणि त्यामुळे आधारभूत ठरतील अशा अस्सल साधनांची झालेली वाताहात इ. कारणांमुळे सभासदानंतरच्या बखरकारांस परंपरागत चालत आलेल्या अनेक प्रकारच्या वेड्यावाकड्या दंतकथा व आख्यायिका यांच्यावर अवलंबून आपल्या बखरी सजवाव्या लागल्या. ह्या उत्तरकालीन बखरींतून म्हणूनच मोठ्या प्रमाणात ऐतिहासिक घटनांचे व वस्तुस्थितीचे तारतम्य संपूर्णतया सुटल्याचे लक्षात येते. इतिहासकार किंवा चरित्रकार म्हणून जी एक पात्रता त्यांच्या अंगी असणे आवश्यक असते, तिचा त्यांच्या ठिकाणी अभाव होता. केवळ आपल्या चिटणिसी अथवा कारकुनी लेखणीच्या बळावर ते स्वतःला ‘ लेखनाधिकारी ’ समजतात आणि वंशपरंपरेने चालत आलेल्या नोकरीमुळे ‘ पुरातन सेवक ’ म्हणून चरित्रे किंवा बखरी लिहावयास बसतात. आणि मग मनुष्यस्वभावानुसार आपल्या पूर्वजांचे अतिरिक्त गोडवे गाण्यात किंवा आपल्या जातीजमातींच्या व्यक्तींचा पुरस्कार करण्यात अथवा आपल्याला अप्रिय वाटतील अशा व्यक्तींचा उपहास करण्यात त्यांना कसलीच दिक्कत वाटत नाही. त्यांमधून त्यांच्या वतनलोभ, जातिविद्वेष इ. प्रवृत्तींचे चांगल्या रीतीने दर्शन घडते. मल्हाररावांच्या सप्तप्रकरणात्मक चरित्रात वरील सारे दोष चांगल्या रीतीने एकवटले आहेत. त्यामुळे आकाराने मल्हाररावांचे चरित्र खूप मोठे असले तरी विश्वसनीयतेच्या दृष्टीने ते अगदी सामान्य प्रतीचे आहे. सभासदानंतर निर्माण झालेल्या दुसऱ्या कोणत्याही बखरीस शिवचरित्रात कसली भर घालता आली नाही. उलट नंतरच्या बखरींतून असत्य, अर्धसत्य अशा भाकडकथांची भरती मोठ्या प्रमाणात होऊन या शिवचरित्रांना पुराणांची कळा आली.

परंपरेने चालत आलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या हकीकतींचा बखरकार वापर करीत असल्यामुळे बखरकारांवर अप्रामाणिकपणाचा आरोप करता येणार नाही, किंवा बखरकार झालेल्या प्रसंगाची हकीकत सांगताना जाणूनबुजून सत्यापलाप कुठे करीत नाहीत,* ही समजूतही सर्वस्वी बरोबर नाही. पक्षपाती भूमिका स्वीकारून ते

* राजवाडे ऐ. प्रस्तावना खं. ६ पृ. ३५१

कित्येक ठिकाणी बेधडकपणाने सत्यापलाप करण्यास मागेपुढे पाहात नाहीत, हे चिटणीसबखर व शिवदिग्विजय यांमधील बाळाजी आवजीविषयक व रघुनाथपंत हणमंते यांच्याबद्दलच्या वर्णनांवरून लक्षात आल्याखेरीज राहात नाही. याशिवाय कर्णोपकर्णी ऐकलेल्या हकीकती आपल्या चरित्रात कुठेना कुठे तरी अंतर्भूत केल्याखेरीज त्यांना चैन पडत नाही. कुठे तरी कुणाबाबतीत तरी घडलेली एखादी आख्यायिका त्यांच्या ऐकण्यात किंवा वाचण्यात असते, ती आपल्या चरित्रात ते हटकून आणतात. 'वडाची साल पिंपळाला' ह्या म्हणीचे प्रत्यंतर ह्या उत्तरकालीन बखरींतून चांगल्या रीतीने येते.

### इतिहास म्हणून योग्यता

प्रत्यंतर–पुराव्यांनीशी बखरकाराची वर्णने कितपत विश्वसनीय ठरतात, याची विपुल चर्चा टीपांमध्ये केली आहे. त्यावरून स्थलकालप्रसंग व व्यक्ती इत्यादिकांबाबतीत बखरकाराने केलेल्या विपर्यासांची कल्पना येईल. उदाहरणांदाखल काहींचा मी उल्लेख करतो :

सुरुवातीच्या पूर्वजवर्णनामध्ये पृथ्वीराज चव्हाणाचा पराभव, रजपुतांनी आपल्या कन्या मोगलांस देणे इ. ठिकाणी कालविपर्यास भरपूर आहे. पृथ्वीराज चव्हाणाचा पराभव शहाबुद्दीन घोरीने केला, हे बखरकारास ठाऊक नाही. शहाजी महाराजांच्या हकीकतीत शहाजीची वजीरी व मलिकंबर, मुरारजगदेव यांच्याबद्दलच्या वर्णनात कालाचे भान बखरकारास नसल्यामुळे बखरकाराने स्वतःच्या मनाला येईल त्याप्रमाणे त्या घटनांची जोडणी केली आहे. दुसऱ्या प्रकरणामध्ये रायगडप्राप्ती, कल्याणची लूट, नेताजीची सरनोबती, अण्णाजी दत्तो यांनी पन्हाळा घेतल्याची हकीकत, शृंगारपुरच्या सुर्व्यांचा पाडाव, प्रतापरावाची सरनोबती, राजापूरची लूट व रावजी सोमनाथ यांची कोकणची सुभेदारी, जंजिऱ्याची मोहीम, बाळाजी आवजी, मोरोपंत–व अण्णाजी दत्तो यांना दिलेली अधिकारपदे, इ. १६५८ ते ६२ या सुमारास घडलेल्या घटना शहाजीमहाराजांच्या अटकेपूर्वी स्वराज्यप्रस्थापनेच्या सुरुवातीस १६४७–४८ मध्येच जणू काही घडल्या असा बखरकाराने आव आणला आहे! शहाजी महाराजांच्या सुटकेनंतर मुरारपंतांचा वध करण्यात आला, ही हकीकत म्हणजे या साऱ्यांवर कळस होय!

तिसऱ्या प्रकरणातही अफजलखानाच्या वधानंतर शिवाजीराजांच्या ज्या हालचाली वर्णिलेल्या आहेत, त्याही अशाच विपर्यस्त आहेत! खानवधानंतर आपल्या वडिलांचा सूड घेण्यासाठी फाजलखान हा रुस्तुमजमा या सरदाराबरोबर आला व ४ फेब्रु. १६६० मध्ये रामबागेजवळ प्रचंड युद्ध होऊन पराभव झाल्यामुळे फाजलखान व रुस्तुमजमा पळून गेले ही घटना बखरकाराला ठाऊक नाही. शिवभारत १६ अध्यायांपर्यंतच चिटणिसास उपलब्ध होते, हे या प्रकरणातील

बखरकाराच्या अफजलवधानंतरच्या हकीकतीवरून लक्षात येते. अफजलवधानंतर द्रुतगतीने ज्या घटना घडल्या त्यांची विशेष कल्पना नसल्यामुळे सभासदाने फाजलखान रुस्तुमजमा व सिद्दी जोहार यांच्या मोहिमांचा व बाजीप्रभूच्या पराक्रमाचा ओझरता उल्लेखही केला नाही. चिटणिसांनी ९१ कलमी बखरीतील ३७-३९ या कलमांधारे पन्हाळ्याच्या वेढ्याची हकीकत सिद्ध केली आहे. परंपरेने चालत आलेल्या कित्येक आख्यायिकांच्या आधारे बखरकाराने या हकीकतीत अतिरंजित वर्णनांची रेलचेल उडविली आहे. बाजीप्रभूच्या पराक्रमाचे वर्णन हे त्यांपैकीच होय! शाइस्तेखानासाठी स्वतंत्र प्रकरणाची योजना करावयाची असे बखरकाराने ठरविल्यामुळे सिद्दी जोहारचा पन्हाळ्याचा वेढा व शिवाजीराजांच्या कोकणातील हालचाली यांवर शाइस्तेखानाच्या मोहिमेमुळे झालेला परिणाम त्याने दुरान्वयाने सुद्धा लक्षात घेतला नाही! जी गोष्ट सभासदाला ठाऊक नाही, ९१ कलमी बखरीत जिचा उल्लेख नाही, ती इतर काही साधनांच्या आधारे चिटणीस सिद्ध करतील अशी अपेक्षा करण्यात काही अर्थ नाही!

दुसऱ्या प्रकरणामध्ये अफजलवधोत्तर कालातील कित्येक घटनांची आवळ्या-भोपळ्यांची मोट बांधून बखरकार ज्याप्रमाणे मोकळा झाला, त्याप्रमाणेच या तिसऱ्या प्रकरणातही शिवाजीराजाच्या उत्तर आयुष्यातील अनेक घटनांची कशीतरी गाठोडी बांधून तो मोकळा झाला आहे. पन्हाळ्याचे वर्णन १६६० चे, तर बाजी घोरपड्याचे परिपत्य १६६४ मधले; फोंड्याचा किल्ला काबीज केला तो १६७५ मध्ये तर सिंधुदुर्ग १६६४–६७ या कालात बांधला; बसरुरची स्वारी १६६५ मधली तर राजारामाचा जन्म १६६९ मधला; नेताजी पालकरची सरनोबती दूर करून प्रतापरावास ती दिली तो काळ १६६६ चा तर बखरकाराने वर्णिलेली सुरतेची लूट १६७० मधली! किती निरनिराळ्या कालखंडातील आणि शिवचरित्राच्या दृष्टीने किती महत्त्वाच्या आणि प्रभावी अशा या घटना!! बखरकाराने लेखणीच्या एका फटकाऱ्याने त्यांना एकत्रित आणले आहे हे पाहून मोठा चमत्कार वाटतो. परंपरागत हकीकतींवर विसंबून बखरकार किती विपर्यस्त लिहून जातो, याचे उत्तम उदाहरण म्हणजे बखरीतील उंबरखिंडीच्या युद्धाचे वर्णन होय. कुठे उंबरखिंडीची लढाई आणि कुठे सुरतेची लूट! पन्हाळ्याच्या किल्लेदाराची परीक्षा (पृ. १११-१२) हे पाचव्या प्रकरणातील वर्णनही स्थलकाल आणि प्रसंग यांच्या विपर्यासाचे दुसरे मोठे उदाहरण होय.

चौथ्या प्रकरणातील शहा-शिवाजीच्या भेटीचे संपूर्ण वर्णन अनैतिहासिक अतएव काल्पनिकच होय. पाचव्या प्रकरणामध्ये जयसिंग–दिलेरखान यांची मोहीम वर्णिताना बखरकाराने अनेक ठिकाणी विपर्यास केला आहे. तिसऱ्या प्रकरणामध्ये खानाचा वकील कृष्णजीपंत यांस शिवाजीराजांनी फितविले ते त्यांच्या हिंदुत्वाला आवाहन

करून. तेच सूत्र पाचव्या प्रकरणातही चालवून बखरकाराने या अत्यंत आणीबाणीच्या प्रसंगी शिवरायांची जी कुचंबणा झाली व मानहानी पत्करावी लागली, तिच्यावर पांघरूण घालण्याचा प्रयत्न केला आहे. ह्या प्रकरणाच्या शेवटी पुन्हा दुसऱ्या व तिसऱ्या प्रकरणाप्रमाणेच घटनांचा क्रम वर्णिताना बरीच गल्लत केली आहे. आग्र्याहून परत आल्यानंतर ‘सत्तावीस किल्ले ठाणी व बागलाण घेतले’, असे तो एका झपाट्यात सांगून जातो. आग्र्याहून परत आल्यानंतर १६६७ पासून १६७४ पर्यंतच्या साऱ्या हालचालींचे वर्णन केवळ या पाच पृष्ठांत (१२६–३०) आटोपले आहे! या काळात शाहाजादा मुअज्झम व शिवाजीराजे यांच्यात झालेल्या तहासंबंधीची फर्माने चिटणिसांस उपलब्ध होती, परंतु त्यांचा नीट उपयोग न करता बाळाजी आवजीस औरंगाबादेस भावसिंगबरोबर तहाची बोलणी करण्यास पाठवून सारा प्रसंग अगदी हास्यास्पद करून सोडला आहे! शाहाजादा मुअज्झम व दिलेरखान यांच्या अंतस्थ वैमनस्याची कल्पना नसल्यामुळे बखरकाराने दिलेरखानाची उपस्थिती या कालखंडातील मराठ्यांविरुद्ध साऱ्या लढायांत गृहीत धरली आहे. वणी दिंडोरी, कोणारगड व सालेरी इ. महत्त्वाच्या युद्धसंग्रामांच्या बखरीतील हकीकती जशा अगदीच सामान्य तशाच विपर्यस्तही आहेत!

शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक कोणत्या परिस्थितीत झाला, याची काहीच कल्पना नसल्यामुळे महाराजांच्या क्षत्रियत्वाबद्दलच्या भ्रामक हकीकती बखरकाराने रंगविलेल्या आहेत. प्रतापरावांना ज्या लढाईत मृत्यू आला ते निवळ्याचे युद्ध राज्याभिषेकापूर्वी फक्त तीन महिने अगोदर घडले होते. त्यानंतर मार्च महिन्याच्या १६ तारखेस महाराजांची स्त्री सईबाई निवर्तली. तेरावे होईपर्यंत मार्च महिना संपत आला. पुढे एप्रिलमध्ये चिपळूणला जाऊन प्रतापरावाच्या सैन्याची व्यवस्था लावावी लागली. हंबीररावास सरनोबतीची वस्त्रे देऊन तो महाराजांनी एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात स्वतः जातीने वाईजवळील केळंजाकोट घेतला इ. घटना राज्याभिषेकापूर्वी काही महिने अगोदर इतक्या द्रुतगतीने घडल्या की त्यामुळे शिवाजीस राज्याभिषेक कोणत्या परिस्थितीत घडला, हे लक्षात येते.

तशातच मोगलांच्या व विजापूरकरांच्या मुलुखात चौफेर हल्ले करून किल्लेकोट, व मुलुख हस्तगत केल्याने मोगल व विजापूरकर प्रक्षुब्ध झाले होते, अशा घरच्या व बाहेरच्या प्रतिकूल परिस्थितीमुळे राहिलेला शेवटचा मुहूर्त गाठून व राजकीयदृष्ट्या बरीच गुप्तता राखून, रायगडसारख्या दुर्गम ठिकाणी अगदी पावसाळ्याच्या तोंडावर महाराजांनी स्वतःस राज्याभिषेक करून घेतला. बखरकाराचे वर्णन खऱ्या ऐतिहासिक घटनांच्या संदर्भात न्याहाळले तर ते किती विपर्यस्त आहे, हे सांगण्यासाठी आता अधिक भाष्य करण्याची आवश्यकता आहे, असे वाटत नाही.

महाराजांनी राज्याभिषेकापूर्वी दक्षिणदिग्विजय केला, ही उत्तरकालीन* बखरकारांची समजूत पाहून तर शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर निर्माण झालेल्या अस्थिर परिस्थितीमुळे खऱ्या इतिहासाचा लोप होऊन असत्य कल्पनांनी उत्तरकालीन इतिहासकारांची मते कशी भारून टाकली होती, याची जाणीव होते !

बखरीतील कालदर्शित प्रसंग फारच अल्प आहेत. यांपैकी पूर्वजवर्णनातील शालिवाहनांचा उदय, पिठोर राजाचा पराभव, विजयानगरची स्थापना, अल्लाउद्दीनची चितोडवर स्वारी, शहाजीचे विजापूरकरांकडे गमन व द्वितीय विवाह इ. ठिकाणच्या मित्या निखालस चुकीच्या आहेत. विठोजी, मालोजी, शहाजी व जिजाबाई यांच्या जन्माबद्दलच्या मित्या व मालोजीराजांस झालेल्या देवीच्या दृष्टांताबद्दलची मिती विवाद्य आहे. शिवजन्मतिथीची तीच अवस्था आहे. फक्त मुरारपंतांच्या-तुळादानाची मिती बरोबर आहे. शिवाजीचे मातेसह पुण्यास आगमन, त्याचे लग्न, कार्यप्रारंभ, रायगडप्राप्ती, मोरेवध, बाळाजी आवजीस चिटणीशी, शास्ताखानवरील स्वारीचा काल, राजारामजन्म, शहाजीमृत्यू, श्रीशैल येथील भवानीचा अंगी आविर्भाव ह्या सर्वांच्या बखरकाराने दिलेल्या मित्या चुकीच्या आहेत. अफजलवध, दोन्ही राज्याभिषेक, जिजामाता मृत्यू, शिवाजीमृत्यू, राजारामविवाह, यांच्या मित्याच काय त्या बरोबर आहेत.

बहुसंख्य घटनांचे कालनिर्देश न करता याउपरि, यानंतर, याजवर, नंतर, त्याजवरि, तदनंतर, याप्रमाणे, नंतर काही दिवशी, इतकें होतें तों, अशासारख्या मोघम शब्दांनी बखरकार एका पाठोपाठ एक अशा निरनिराळ्या कालखंडातील घटनांच्या उतरंडी रचत जातो !

असे असूनही या चिटणीस बखरीचा महाराष्ट्रीय मनावर गेल्या शंभर पाऊणशे वर्षांत मोठाच प्रभाव होता, यात काही शंका नाही. शिवचरित्रासंबंधीची जी काही स्थूल कल्पना आपल्याकडच्या सामान्य वाचकांची आहे, तिची अभिरुची अद्यापही चिटणीस-बखरीपलीकडे गेली नाही, असे म्हटले तर ते फारसे चुकीचे ठरेल असे वाटत नाही.

## बखरकाराच्या मर्यादा

भारतीय मनाची जडणघडण लक्षात घेतली तर या ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत सामान्य असलेल्या बखरीने शिवचरित्रविषयक सर्वसाधारण वाचकांच्या जिज्ञासेला चांगलेच खाद्य पुरविले आहे, असे दिसून येईल. शिवाजी महाराजांची अवतारी

* या कल्पनेचे मूळ ९१ कलमी बखरीत आहे. ही बखर उत्तरकालीन आहे, हे सिद्ध करण्यास एवढी एकच बाब पुरेशी आहे असे वाटते.

पुरुषांत गणना करून त्यांनी आपल्या भाविक मनोवृत्तीचे पुरेपूर समाधान केले आहे! बाकी ऐतिहासिक दृष्ट्या प्रत्यंतर–पुराव्याने त्यांनी वर्णिलेल्या घटना सिद्ध होतात की नाही, याची सामान्य वाचकाला कसलीच मातब्बरी वाटत नाही. चिटणिसांनी शिवचरित्रातील मुख्य आणि महत्त्वाच्या घटना वर्णिताना त्या अशा रीतीने वर्णिल्या आहेत की, त्यामुळे वास्तवाभास निर्माण होतो. तसे पाहिले तर अफजलखानवध, शाइस्तेखानावरील धाडसी हल्ला, औरंगजेबाच्या दरबारातील शिवाजीराजांचे वागणे, कैद व सुटका यांसारख्या महत्त्वाच्या प्रसंगांची बखरीतील वर्णने ऐतिहासिक सत्याच्या कसोटीला बरीचशी उतरतील अशीच आहेत. इतर गौण घटना केव्हा घडल्या याची चिकित्सा करण्याच्या भानगडीत सामान्य वाचक पडत नाहीत. एकंदरीत सामग्र्याने या चरित्रामुळे शिवचरित्रातील बहुतेक महत्त्वांचे प्रसंग लक्षात येतात आणि त्याचे समाधान होते. सत्यनिष्ठ, तर्कशुद्ध इतिहासप्रामाण्याच्या कसोट्या लावून चरित्र-लेखन करावे असे मल्हार रामरावांच्या स्वप्नातही येणे शक्य नव्हते. त्यांचे चरित्र हे त्या विशिष्ट कालखंडातील मनोवृत्तीतून साकार झाले आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

आणि म्हणूनच आपल्या बखरकारांची वैगुण्ये तपासीत बसणे म्हणजे जणू काही, ते शास्त्रशुद्ध इतिहासलेखनाशी परिचित होते, अशी चुकीची कल्पना मनाशी बाळगणे होय. राजवाड्यांनी म्हटल्याप्रमाणे* आपल्या बखरकारांच्या ज्ञानाची अत्यंत मर्यादित व संकुचित व्याप्ती, ऐतिहासिक घटनांचे व्यासंगपूर्ण विश्लेषण करण्या-ऐवजी पारंपरिक माहितीवर विसंबून राहण्याची त्यांची वृत्ती, अवलोकन, पृथक्करण, टीका व पद्धती यांचा संपूर्ण अभाव, यांमुळे आपल्या बखरी या एकांगी व एकदेशीय वाटतात. अपवाद म्हणून समकालीनत्व व राजकीय घडामोडींचे प्रत्यक्षावलोकन यांमुळे काहींच्या लेखनाला विश्वसनीयता लाभते व मुत्सद्देगिरीची जोड असलेला एखादा बखरकार तत्कालीन राजकीय घडामोडींचे काही प्रमाणात विश्लेषणही करू शकतो, ही गोष्ट नाकारता येणार नाही. शिवाजीमहाराजांच्या दरबारात बसून सल्लामसलतीचे राजकारण करणाऱ्या सभासदाने लिहिलेले शिवचरित्र जरी निव्वळ स्मृतीवर हवाला ठेवून लिहिले असले तरी त्याच्या समकालीनत्वामुळे बरेच विश्वसनीय उतरले आहे. शिवाजीमहाराजांच्या राज्यव्यवस्थेचे प्रत्यक्ष ज्ञान असल्यामुळे त्याने त्यासंबंधी दिलेली माहिती त्रोटक असली तरी अतिशय महत्त्वाची आहे. रामचंद्रपंत अमात्यांसारख्या तत्कालीन राजकारणात मुरलेल्या, पहिल्या दर्जाच्या मुत्सद्याने शिवकालीन राजनीतीचे मर्म 'आज्ञापत्रा'त अत्यंत प्रभावीरीत्या उतरविले आहे. पानिपतकालीन ऐतिहासिक घटनांचे यथार्थ ज्ञान असणाऱ्या एका

* ऐप्र पृ. ३४९-५०

जाणकार, मुत्सद्दी व प्रतिभावंत लेखकाने, भाऊसाहेबांच्या बखरीच्या रूपाने जे चित्र रेखाटले आहे, ते अनेक दृष्टींनी मराठी बखर-वाङ्मयात अपूर्व ठरावे, इतके प्रभावी आहे.

मल्हार रामराव हे उत्तरकालीन असल्याने शिवचरित्राबाबतीत ते परावलंबी होते, परंतु समकालीन घटनांचे चित्रण करण्यात त्यांनी काही विशेष प्रतिभासंपन्नता दाखविली आहे, असे नाही. अव्वल-दर्जाची प्रतिभाशक्ती व मुत्सद्देगिरी यांचा त्यांच्याजवळ अभाव होता. मुत्सद्देगिरीबद्दल त्यांचे घराणे कधीच प्रसिद्ध नव्हते. चिटणीसी कामात बाळाजी आवजी जरी वाकबगार होते तरी राजकारणी मुत्सद्दी म्हणून मोरोपंडित, अण्णाजी दत्तो यांच्यापुढे बाळाजीची कर्तबगारी अगदीच सामान्य होती. पुढे पेशव्यांच्या कारकीर्दी तर छत्रपतीबरोबरच चिटणीसही अगदीच निष्प्रभ होत गेले. स्वामिनिष्ठा आणि चिटणीसीकर्मे यांखेरीज महाराष्ट्रातील राजकारणात त्यांना कसलेच महत्त्व राहिले नाही. त्यामुळे मल्हार रामरावांचे शिवचरित्र अगदीच कारकुनी बाण्याचे उतरल्यास नवल ते काय ?

या मुत्सद्देगिरीच्या व स्वानुभवाच्या अभावामुळे मराठ्यांच्या युद्धांची मल्हाररावांनी केलेली वर्णने अगदी जुजबी आहेत. शिवकालातील अनेक मोठमोठ्या युद्धांची चार-दोन वाक्यांतच वासलात लावून बखरकार मोकळा होतो. पूर्वजवर्णनामध्ये अल्लाउद्दीनच्या चितोडस्वारीला (पृ. १०) जेवढी जागा मिळाली त्याच्या निम्म्यानेही तानाजीने कोंडाणा सर केला, त्या हकीकतीस (पृ. ४०) मिळाली नाही. शहाजी महाराजांनीं मलिकाचा मोड केल्याचे काल्पनिक वर्णन (पृ.२२-२३) किरकोळ असले तरी शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीतील पुढे वर्णिलेल्या कोणत्याही लढाईपेक्षा बरेचसे सरस आहे, हे पाहून तर मोठे आश्चर्यच वाटेल ! शिवाजी-महाराजांनी स्वराज्याचे तोरण बांधले व मोठमोठ्या लढाया करून किल्लेकोट व मुलूख जिंकला, परंतु त्यासंबंधीच्या वर्णनात चिटणिसांनी एकाही ठिकाणच्या युद्धाचे —खुद्द महाराजांच्या व मोठमोठ्या सरदारांच्या—पराक्रमांचे परिणामकारक वर्णन केले नाही. सहज गंमत म्हणून पाहा :

"तोरणा किल्ला...वरील नामजाद लोक यास वश करून भेद करून घेतला (२९); दुरजा डोंगरावर राजगड बांधून काढला (३०); किल्ले घेण्यास आपणच खासे जावे, धारकरी याबरोबर, आपणच माळेस अगोदर चढावे. तसेच भेदांनीं व माहीतगार मावळे लोक यांचे युक्तीनें घ्यावें,...असें अनेकप्रकारें कांगोरी, तुंग, तिकोना, लोहगड, राजमाची, कुवारी, भोरप, घनगड, केळजा आदिकरून किल्ले घेतले. मावळें सारीं सोडविलीं ... रोहिडा किल्ला (३२); खास स्वारी कोकणांत जाऊन दोनी किल्ले तळघोसाळा व पेबचा किल्ला घेतले (३३) रायगड किल्ला भेद करून घेतला...कल्याणावरि स्वारी करावी, प्रांत घ्यावा म्हणून सोनदेव पाठविले. त्यांनीं

फौजेसुद्धां जाऊन शहर लुटलें, मुलूख घेतला व किल्ले घेतले, पायलोक, पागासरदार गाहा करून घाट चढून चंदन, वंदन, केळजा, पांडवगड, नांदगिरी हे किल्ले घेऊन सातारियास आले, महाराजांचे पुण्यप्रभावें करून सातारा, परळी आदि किल्ले स्वल्पप्रयासें आले. अण्णाजी दत्तो पनाळा प्रांतीं पाठविले, त्यांनी पनाळा वगैरे घेतले ( ३४ ); फौज पाठवून संस्थान घेतलें, सुरवे बुडविले. याप्रमाणें दामोळापासून राजापूर देश किल्ले बांधारीसुद्धां महाराजांनीं घेतले. फौजेची निवड करून. चेउलावर स्वारी करून शहर लुटलें. रामेश्वर तेथें त्याचें दर्शन करून खजोजी ठाणेदार कैद केला ( ३५ ); बाजी सामराज म्हणून सरदार दाहा हजार फौजेनिशीं महाडापर्यंत गेले; तो महाराज स्वारी करून, चेऊल लुटून ठाणीं घालून राजगडास पावले ( ३६ ); मालुसरे यांनीं भेद करून माळ लावून वरते चढतात, हे बातमी उदयभान यास समजताच हुशार होऊन चालून आला. युद्ध जालें. महाराजांचे दैवेंकरून उदयभान रणीं पडला. फते जाली. किल्ला घेतला ( ४० ); मोरो त्रिमळ पिंगळे पेशवे नासिक प्रांतीं फौज, सरदार देऊन रवाना केले. त्यांणीं जाऊन सत्तावीस किल्ले बांधारीचे घेतले ( ४२ ); जावली दोन प्रहरपर्यंत भांडली. नंतर ठाणें घेतलें ( ४२ ); वासोटा किल्ला घेतला, मोरे दस्त करून त्यांची ठाणीं प्रांत होता तो घेतला, बेदर शहर मारून मालमत्ता घेऊन ठाणीं घेतलीं, जुनर मारून अंमल बसविला, चाकणचा किल्ला घेतला ( ४३ )..." अशा रीतीची किती म्हणून वर्णने द्यावी ? मोठ्या कडोविकडीच्या युद्धांची "युद्ध जालें, शर्त केली, फौज मोडली, पळाली, फत्ते जाली" अशी अगदी ठरीव, सरधोपट वर्णने चिटणिसांनी केली आहेत. बाजीप्रभू, मुरारबाजी, इत्यादिकांच्या वर्णनात त्या वेळच्या युद्धाप्रसंगापेक्षा इतर अवांतर गोष्टीच अधिक आहेत. तुम्ही विचाराल, या निरनिराळ्या ठिकाणच्या युद्धांची वर्णने करण्यासाठी चिटणिसांजवळ काही साधनेच नव्हती, तर ते कोणत्या आधारावर या युद्धांची वर्णने करतील ? त्याचे उत्तर असे कीं, मूळ सभासदामध्ये यांतल्या काही युद्धप्रसंगाची वर्णने थोडक्यात परंतु परिणामकरीत्या वर्णिलेली आहेत. सभासदाने सालेरीच्या व कोणारगडच्या युद्धांचे केलेले वर्णन चिटणिसांनी संपूर्ण नजरेआड केले आहे. युद्धातील डावपेच, शस्त्रास्त्रे, त्यांच्या पद्धती, निरनिराळ्या युद्धप्रसंगाचे वेगळेपण जाणून घेण्याची जी कुवत लागते, ती कारकुनी बाण्यामुळे मल्हाररावांजवळ नव्हती असाच शेवटी निष्कर्ष काढावा लागतो. 'भाऊसाहेबांची बखर' लिहिणारा लेखक हा जसा लेखनपटू होता तसाच तत्कालीन मोठमोठ्या युद्धप्रसंगात भाग घेणारा तो मोठा तरवारबहादूरही असावा, हे त्याने बखरीत केलेल्या निरनिराळ्या युद्धप्रसंगचित्रणांवरून खात्रीने वाटते. शुक्रनीतिसारासारख्या व राज्याभिषेकपद्धतीच्या एखाद्या ग्रंथाचा आधार घेऊन चिटणिसांनी सभासदाने वर्णिलेल्या शिवकालीन राजनीतीसंबंधाच्या व राज्याभिषेकाच्या वर्णनात ऐसपैस भर घातलीच की नाही ? सभासदामध्ये नामनिर्देशही नसलेल्या शिवसमर्थसंबंधाची व संतसज्जनांची

वर्णने त्याने भीमस्वामींच्या भक्तलिलामृतावरून, चाफळच्या मठात उपलब्ध असलेल्या समर्थचरित्रावरून व महिपतीच्या भक्तिविजयावरून केली आहेतच की नाही?

म्हणूनच मल्हाररावांना शिवचरित्रलेखन करीत असताना शिवकालामध्ये खऱ्या अर्थाने शिरण्याची कुठे आवश्यकताच भासली नाही असे म्हणावे लागते. जरुरीपुरत्या सभासद व ९१ कलमी बखरींतील घटना आधारादाखल घेऊन, त्यामध्ये कुठे विस्तार, कुठे नाट्यपूर्ण विवेचन, कुठे आख्यायिकांचा भरणा, तर कुठे भाविक दृष्टिकोनातून मांडणी, याप्रमाणे त्यांनी हे मोठ्या आकाराचे परंतु ऐतिहासिक दृष्ट्या अगदी सामान्य दर्जाचे असे चरित्र सजविले आहे. शिवाजी महाराजांचे मोठेपण त्यांनी अद्‌भुताच्या, अवताराच्या बैठकीवर घेतलेले आहे. सबंध चरित्रात इंग्रजांचा डचांचा, फ्रेंचाचा 'टोपीकर' असा मोघम आणि तोही एकदाच उल्लेख बखरकाराने केला आहे. त्यावरून शिवकालीन राजकीय परिस्थिती टिपण्याकडे त्याचे किती दुर्लक्ष होते, हे लक्षात येईल.

शाइस्तेखानाचें महत्त्व, कारतलबखानास कोकणात पाठविण्यामागे त्याने दाखविलेली मुत्सद्देगिरी व शिवाजी महाराजांनी त्याला अचानक दुर्गम अशा खिंडीत गाठून शाइस्तेखानाच्या मसलतीस लावलेला सुरुंग, राजा जयसिंगाने मोठ्या दक्षतेने लढविलेले डावपेच व मराठ्यांची सर्व बाजूंनी केलेली नाकेबंदी, दक्षिण-दिग्विजयातील शिवाजी महाराजांचे धोरण व त्यांनी या मोहिमेत अल्पावधीत मिळविलेले 'तो आला, त्याने पाहिले बघता बघता जिंकले देखील' या पद्धतीचे असाधारण यश, इत्यादिकांचें ऐतिहासिक व राजकीयदृष्ट्या असलेले महत्त्व बखरकाराने चांगल्या रीतीने मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला नाही. सभासदाने केलेली शाइस्तेखानाच्या, जयसिंगाच्या अफाट सैन्याची परिणामकारक वर्णनेही त्याने दुर्लक्षित केली आहेत.

याउलट पहिल्या प्रकरणात विष्णुपुराणातल्या वंशावळी, दुसऱ्या प्रकरणात सज्जनसेवनाचे भारूड, सहाव्या प्रकरणात रघुनाथपंत हणमंत्यांचें आख्यान, व सातव्या प्रकरणात इलाचीबेग, औरंगजेब यांच्या दंतकथा इत्यादी अनावश्यक माहितीचे स्तोम मोठ्या प्रमाणात वाढवून बखरकाराने सबंध चरित्राचा समतोल ( balance ) घालविला आहे.

मूळ सभासदामध्ये पन्हाळ्याचे युद्ध, शहाजीचा मृत्यू, कोपळची लढाई, इत्यादी महत्त्वाच्या प्रसंगांचे व इतरही काही किरकोळ प्रसंगाचे क्रम चुकले आहेत. सभासदामध्ये दंतकथांचा सुळसुळाट नाही, ९१ कलमी बखरीत मात्र शिवचरित्रातील कित्येक घटना अगदी उलट्यासुलट्या व वेड्यावाकड्या झाल्या आहेत व कित्येक दंतकथांना स्थान मिळाले आहे. चिटणिसांनी सभासदाबरोबर ९१ कलमी बखर मोठ्या प्रमाणात आधारास घेतली व ह्या दोन्ही बखरींतील घटनांची व्यवस्था लावण्याचा प्रयत्न केला. ९१ कलमी बखरीपेक्षा चिटणीस-बखर वरून व्यवस्थित

दिसली तरी चिटणिसांनी ठायी ठायी दोन्ही बखरीतील क्रम दूर सारून स्वतंत्र लिहिण्याचा डौल धरल्यामुळे व परंपरागत दंतकथांचा वापर मोठ्या प्रमाणात केल्यामुळे कालविपर्यासाची परिसीमा गाठली आहे, असे म्हणावे लागते.

### राजकीय जागृतीचे, स्वातंत्र्य संग्रामाचे स्फूर्तिस्थान

उपलब्ध साधनांच्या आधारे चिटणीस-बखरीचे परीक्षण केले तर ती ऐतिहासिक दृष्ट्या अतिशय सामान्य ठरते, हे आपण वर पाहिले, परंतु दुसऱ्या एका दृष्टिकोणातून चिटणीस-बखरीस असलेले महत्त्व लक्षात घेतले नाही, तर बखरकर्त्यावर अन्याय केल्यासारखे होईल.

चिटणीस-बखरीमध्ये आम्हा मराठ्यांच्या मनोवृत्तीचे प्रतिबिंब फार चांगल्या रीतीने पडले आहे असे मला वाटते. मुसलमानांच्या एकांगी व एकतर्फी तवारिखा व बखरी पाहून 'मराठे हे कोणी चोर, लुटारू व दरोडेखोर होते,' असाच ग्रह प्रचलित होतो, आणि ग्रँट डफ व स्कॉट यांसारख्या इंग्रज इतिहासकारांनी कितीही चिकित्सकपणाचा आव आणला तरी मराठ्यांबद्दलचा त्यांच्या मनातला आकस त्यांच्या बखरींतून उमटल्याखेरीज राहिला नाही. चौथाई, सरदेशमुखी म्हणजे काय, मराठ्यांची राज्यव्यवस्था कोणत्या प्रकारची होती, हे समजाऊन घेण्यासाठी आबा पारसनीस, मल्हारराव चिटणीस व त्यांचे पुत्र बळवंतराव चिटणीस यांच्याशी वारंवार चर्चा करूनही व चिटणीस-बखर व चिटणिसांजवळ असलेल्या व सातार दरबारी उपलब्ध असलेल्या सर्व कागदपत्रांचा उपयोग करूनही डफने शिवाजीस शेवटी 'अशिक्षित, लुटारू, कपटी, दगेखोर' म्हणूनच संबोधिले आहे. आणि अव्वल इंग्रजी-अमलात, १८४० पासून १८८० पर्यंत, शाळा-कॉलेजांतून डफचा इतिहाच काय तो प्रमाणभूत मानून त्याची पारायणे करण्याचे प्रसंग आल्यामुळे आपले पराभूत असे समाजमन न्यूनगंडाने, अपराधीपणाच्या भावनेने पछाडले होते. चिटणीस-बखरीने ह्या मनोवृत्तीतून आपल्याला प्रथम बाहेर काढले. या बखरीच्या प्रकाशनाबरोबर स्वाभिमानाची, स्वत्वाची जाणीव होण्यास मदत झाली. इंग्रजांनी पसरविलेल्या गैरसमजाचे पटल दूर होऊ लागले आणि थंड गोळ्यासारख्या निपचित पडलेल्या समाजामध्ये शिवरायांच्या चरित्रातील पराक्रमाच्या, स्वराज्यप्रस्थापनेच्या वर्णनांनी नवचैतन्य संचरू लागले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांना 'आपण मराठी मराठी भाषेचे शिवाजी आहोत' अशी यथार्थ जाणीव झाली आणि टिळकांनी तर शिवजयंतीसारख्या कार्यक्रमांनी, शिवावताराचे माहात्म्य लोकांच्या मनावर ठसविण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करून महाराष्ट्रातील तमोयुगाचा नायनाट केला. चिटणीस-बखर डफपूर्वी लिहिली जाऊनही डफने निर्माण केलेले गैरसमज दूर करण्यास तिचीच मदत झाली, हे लक्षात येऊन जशी गंमत वाटते तसेच राज्यकर्ते इंग्रज असल्यामुळे डफच्या इतिहासाने अर्धशतकभर आपला प्रभाव गाजविला हे पाहून मनात अनेक प्रकारचे विषादपूर्ण विचार येऊन जातात. स्वातंत्र्यासाठी उत्सुक

झालेली मने आपल्या समाजात चैतन्य निर्माण करण्यासाठी शेवटी आपल्या पूर्वजांच्य पराक्रमाकडे वळतात. या कामी चिटणीसबखर अतिशय उपयुक्त ठरली, यात कसलीच शंका नाही.

चिटणीसबखरीतील घटनांचा क्रम कसाही असो, ह्या बखरीतील बहुसंख्य घटनांचे स्थान शिवचरित्रात कुठे ना कुठे तरी आहेच. अस्सल साधनांच्या आधारे कित्येक घटनांचे वास्तव, प्रमाणभूत चित्र रेखाटण्यासारखी आज परिस्थिती निर्माण झाली असली तरी चिटणीस–बखरीने जो काही वास्तवाभास निर्माण केला आहे तो संपूर्ण विसंगत, सर्वस्वी चुकीचा ठरतो असे होत नाही. शिवाजीमहाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचे जे चित्र स्थूलरूपाने चिटणिसांनी उभे केले आहे, त्यामध्ये आज अधिक सूक्ष्म अशा छटांचे रंग भरण्याची उमेद संशोधकांच्या अखड परिश्रमामुळे आमच्यामध्ये निर्माण झाली आहे, परंतु चिटणिसांनी रेखाटलेले त्यांचे व्यक्तिचित्रण आपणाला अजूनही मोठे लोभसवाणे वाटते! चिटणीस-बखर इतिहासकाराच्या काटेकोर दृष्टिकोणातून आपण अवलोकू नये. इंग्रजांनी विज्ञानाच्या जोरावर आपणाला हतप्रभ करून आपले स्वत्व हरण केले असता १९ व्या शतकाच्या अंधःकारमय युगात मराठी माणसाच्या मनात शिवाजी-महाराजांच्या कर्तृत्वाचे कोणते चित्र साकारलेले होते, याची कल्पना चिटणीस बखरीवरून येते. आपल्या इतिहासातील एका अलौकिक व्यक्तिमत्त्वाच्या कर्तृत्वाचे वर्णन करण्यामध्ये चिटणिसांची लेखणी इतकी तन्मय पावलेली आहे की, तिचे परीक्षण करताना "सुबोध, चटकदार, आवेशयुक्त व रसभरित भाषाशैली योजून शिवाजीमहाराजांच्या कार्याविषयी कौतुक व आदरभाव जागृत करण्याचे काम चिटणिसांच्या बखरीप्रमाणे करण्यास आजच्या सारावलेल्या लेखकाची लेखणी देखील समर्थ होणार नाही" असे उद्गार द. वा. आपटे यांच्यासारख्या चिकित्सक इतिहास–संशोधकानेही काढले आहेत.*

## शिवरायांच्या व्यक्तिमत्वाचे लोभसवाणे दर्शन

चरित्रनायक श्रीशिवाजीमहाराज यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अनेकविध पैलूंचे साकल्याने दर्शन घडविण्यात मल्हाररावांनी असाधारण यश मिळविले आहे. अत्यंत प्रतिकूल अशा परिस्थितीत केवळ एकट्याच्या मुत्सद्देगिरीच्या बळावर महाराजांनी स्वराज्य प्रस्थापन केले. ते त्यांचे कृत्य अद्भुताच्या कोटीतच गणण्यासारखे होते, म्हणून समकालीन व उत्तरकालीन बखरकारांनी, कवींनी, शिवरायांचे चरित्र 'अवतारी पुरुष'‡

* शिवभारत, प्रस्तावना पृ. १२

‡ शिवरायांनी स्वतःच आपणाला भवानी देवीचा अनुग्रह झाला आहे, असे वातावरण बुद्धयाच निर्माण केले होते, हे त्यांच्या टीपांत दिलेल्या पत्रांवरून लक्षात येईल

म्हणूनच वर्णिले आहे, आणि तसे वर्णिण्यात अस्वाभाविक असे काहीच नाही. शिवरायांच्या स्वराज्यस्थापनेचे तात्त्विक अधिष्ठान स्वधर्मनिष्ठा हेच होते. धार्मिक, श्रद्धावान, संतसज्जनांच्या सहवासाची अभिलाषा बाळगणारा, ईश्वरकृपेचे महत्त्व मानणारा आणि दैवाने जे प्राप्त झाले, त्यास पराक्रमाची जोड देऊन स्वजनोद्धार करू इच्छिणारा, पारतंत्र्याची अपार चीड असणारा अशा प्रकारचा वृत्तीने धार्मिक परंतु अष्टावधानी, त्यामुळे राजकारणात कोणताही विक्षेप येऊ न देणारा असा धैर्यशाली, कल्पक, बुद्धिमान, क्षात्रतेजाने तळपणारा असा एक असाधारण युगपुरुष होता, असे आज त्याच्यासंबंधी जेवढ्या प्रकारचे म्हणून ऐतिहासिक पुरावे मिळताहेत; त्यावरून सिद्ध होत आहे. मल्हाररावांच्या या चरित्रात हाच आशय वाचकांच्या मनावर चांगल्या रीतीने बिंबविला जातो.

—त्याच्या जन्मसमयीच अवतारी पुरुष जन्माला आल्याचा शहाजीस स्वप्नगत दृष्टांत होतो, वयाच्या सात वर्षांपर्यंत सर्व प्रकारची तत्कालीन शस्त्रविद्या त्यास हस्तगत होते व शास्त्र-अभ्यासास प्रारंभ होतो, इतक्या लहान वयातच, ‘ दौलतीचे ठायीं हत्ती घोडे, सर्वकाळ कारखाने पाहाणें, कारभारी थोर माणसें यांस माहितगारी विचारणें, त्यांचा सन्मान करणें व चौकशी करणें, लघुमनुष्य दुर्गुणी यांचा त्रास करून त्यांची संगती न करणें, दुर्व्यसन कांहीं एक नाहीं, विशाल नेत्र, आजानुबाहू , वयें अल्प असोन प्रौढीनें चालतात ’ अशी त्यांच्याबद्दलची हकीकत शहाजीराजांस कळते आणि ते आपल्या पुत्राच्या भेटीसाठी उत्सुक होतात. ...

बालवयातच यवनाबद्दलचा तिरस्कार शिवाजीच्या मनात निर्माण होतो, आणि ‘ त्यांची बुद्धि व दैव विचित्र दिसते. ईश्वरनिर्मित काय आहे न कळे म्हणून त्यास मातोश्रीसह लांब पुण्यास ठेवण्याचा निर्णय होतो. पराक्रमाने, स्वातंत्र्याकांक्षेने प्रेरित झालेला शिवाजी आज्ञाधारक, नम्र, वाडवडिलांचा योग्य तो मान दाखविणारा होता हे दादोजी कोंडदेव व शिवाजी यांच्या संबंधात फार चांगल्या रीतीने दाखविले आहे. दादोजीने सांगितलेले ‘ मसलती करण्याचे गुण सांगितले तितके मात्र घेऊन दोष ठसले नाहींत ’ असे मोठे मार्मिक वाक्य मल्हाररावांनी लिहिले आहे. धर्म वृद्धिंगत करावा यासाठी प्राण, दौलत गेली तरी जावो; या ध्येयवादित्वाने शिवाजीमहाराजांनी कार्यास सुरुवात केली आणि मग त्यांनी अगोदर ‘ दौलतीतील माणसे, सरदार, मर्द शिपाई, नावाचा माणूस, कारकून चांगला कर्ता लिहिणार ’ वगैरे माणसांचा संग्रह करावयास सुरुवात केली. कुणबी, मावळे यांमधून त्यांनी क्षात्रतेज प्रस्फुरित केले, हळूहळू भेद करून किल्लेकोट बळकाविण्यास सुरुवात केली, मिळविलेले द्रव्य वडिलांकडे न पाठविता दादोजीच्या मृत्यूनंतर स्वतःच सारा राज्यकारभार हाती घेऊन दिवसेंदिवस राज्यसाधन अधिकच करण्यास सुरुवात केली. नवा मुलूख, नवी माणसे, नवी व्यवस्था याप्रमाणे त्यांनी चौफेर उद्योग सुरू केले. राज्य-

साधन करावयाचे म्हणजे 'मुलूख हस्तगत झाला पाहिजे, परंतु किल्लेकोटां-खेरीज मुलूख जेरदस्तीत येत नाही, आलेला मुलूख जतन होण्यास द्रव्य पाहिजे, नूतन प्रस्थापित राज्य सुरक्षित राहाण्यासाठी सह्याद्रीच्या बिकट बांधाऱ्याचा आश्रय घ्यावा, तो साध्य करण्यासाठी त्या मुलुखातील कजाखीचे, माहीतगार असे कोकणे व मावळे' यांचे महत्त्व ओळखून त्यांचा उपयोग शिवाजीने आधी करून घेतला. त्यांच्यातीलच येसाजी, तानाजी, बाजी यांस, व बारा मावळांतील देशपांडे, देशमुख वगैरे प्रभु लोक व आजूबाजूच्या मुलुखातून पसरलेले मर्द, विश्वासू असे मराठे सरदार मिळवून योग्यतेनुरूप त्यांना वाढविले. आपल्या फौजेत यवनांचा समावेश करण्यास ते कचरले नाहीत, यावरून त्यांच्या आत्मविश्वासाची, दूरदृष्टीची कल्पना येते.

शिवाजी महाराजांनी युक्तिप्रयुक्तीने, पराक्रमाने आपल्या पदरच्या लोकांस प्रेम व निष्ठा देऊन त्यांच्या साहाय्याने आदिलशाही मुलुखात पाय पसरायला सुरुवात केली, तेव्हा आदिलशहाने शहाजीस अटक करून त्यांस मोठ्या अडचणीत टाकले. काळाचे आव्हान स्वीकारून शिवाजी महाराजांनी यापुढचा येईल तो प्रसंग कसा निभावून नेला, या संबंधीची बखरीतील वर्णने वाचून त्यांच्या अलौकिक धैर्याची, उज्ज्वल निष्ठेची व समयज्ञतेची कल्पना येते. शहाजी महाराजांना अटक ही त्यांच्या आयुष्यातील संकटपरंपरेची नुसतीच सुरुवात होती. त्यानंतर येणारा प्रत्येक प्रसंग चढत्यावाढत्या क्रमाने त्यांची परीक्षा पाहाणाराच होता. प्रत्येक खेपेस त्यांनी शत्रूची बाजू त्याच्यावरच मोठ्या कौशल्याने उलटविलेली दिसते. त्यांच्या या कौशल्यामागे, अचाट साहसामागे निर्मिलेले नूतन राज्य काहीही करून सांभाळिले पाहिजे, ही जिद्द होती. स्वराज्यासाठी, स्वधर्मासाठी आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण वेचणारा, अनेक वेळेला जीव धोक्यात घालून हरहुनरेकरून बाजी संवारून नेणारा वीरपुरुष म्हणून भारताच्या इतिहासामध्ये शिवाजीचे नाव चिरंजीव राहील. शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वांत मोठा गुण म्हणजे त्यांचा अतीव आत्मविश्वास. या आत्मविश्वासाला राजकारणपटुत्वाची मोठी जोड होती, म्हणूनच न डगमगता त्यांनी शहाजीच्या अटकेस तोंड दिले, अफजलखानाच्या वेळी त्याला जावळीसारख्या दुर्गमभागात आणून त्याच्या वकीलाच्या मनात शिरून मोठ्या पद्धतशीर रीतीने शिवराजांनी त्याचा नायनाट केला. अगदी निवडक लोकांनिशी शाइस्तेखानाच्या डेऱ्यात शिरून त्याला जरब बसविण्यात त्यांनी जे अलौकिक धैर्य दाखविले, त्या तोडीचे अचाट धाडस इतिहासाच्या पानांतून फारच थोड्या प्रसंगी पाहावयास मिळते.

राज्यकर्त्यास साम, दाम, दंड, भेद इत्यादी प्रकारांचा नेहमीच अवलंब करावा लागतो. जावळीचे मोरे यांचा निःपात, पुरंदर किल्ल्याची प्राप्ती, खंडोजी खोपड्याचा शिरच्छेद इ. प्रसंगी त्यांनी कपटनीतीचा, निष्ठुरतेचा अवलंब केला होता असे दिसते.

अफजलखानामुळे आपला मोठा भाऊ संभाजी मारला गेला आणि बाजी घोरपड्याने आपल्या वडिलांस अटक केली, हे लक्षात घेऊन महाराजांनी त्या दोघांना ठार मारून त्यांच्या कृत्याचा बदला घेतला, यामध्ये त्यांच्या स्वाभिमानी वृत्तीची कल्पना येते.

औरंगजेबाने मिर्झा राजे जयसिंगसारख्या नाणावलेल्या मुत्सद्द्यास पाठवून शिवाजीची मुस्कटदाबी केली. काही काळ शिवाजी त्याच्यापुढे निःष्प्रभ झाल्यासारखा वाटला. त्याच्याशी मानहानी पत्करूनही तह करणे शिवाजीने पसंत केले, यात आपले बलाबल पाहून प्रसंगी पडते घेण्याची त्याची वृत्ती दिसून येते. आग्र्यास औरंगजेबाच्या दरबारी शिवाजी ज्या तऱ्हेने वागला, ते त्याचे वागणे काहीसे आततायीपणाचे होते, परंतु औरंगजेबाच्या मगरमिठीतून बाहेर पडण्यासाठी त्याने असाधारण कल्पकता दाखवून औरंगजेबाला त्याने बघता बघता चकविले आणि परत आल्यानंतर त्याने मोगलांशी तह करण्याचा बाहाणा करून आपला सारा मुलूख परत मिळविण्यात यश मिळविले; व औरंगजेबासारख्या धूर्त व पाताळयंत्री राज्यकर्त्याची झोप उडवून त्याच्या साऱ्या आशाआकांक्षा धुळीस मिळविल्या. राजकारणात कधी क्रूरता, तर कधी कापट्य, कधी भेदनीती, तर प्रसंगी धाडस, कधी अचाट साहसकर्म तर कधी झंझावती घोडदौड करणाऱ्या या महापुरुषाच्या वैयक्तिक जीवनातील प्रसंग पाहिले तर तो अतिशय मृदू अंतःकरणाचा व नम्र भावनेने प्रेरित झालेला दिसतो. अंतःकरणाचे परमौदार्य, शुद्ध, निष्कलंक चरित्र्याची चाड, गोरगरीबांबद्दल कळवळा, रयतेबद्दल सहानुभूती, आईवडिलांबद्दलचा आदरभाव, नातेवाईकांबद्दल जिव्हाळा, त्याचा साधेपणा, त्याचा व्यसनाधीनतेबलद्दचा तिरस्कार, त्याने आखून दिलेली नमुनेदार राज्यव्यवस्था व तिच्या कार्यवाहीबद्दल तो घेत असलेली दक्षता, आपल्या पदरच्या लोकांबद्दलची त्याची निष्ठा, मित्रराष्ट्राच्या मुलुखातून फौज चालली असता तेथील रयतेस तिळप्रायही उपसर्ग पोचू नये यासाठी तो घेत असलेली दक्षता, देव, ब्राह्मण, तीर्थक्षेत्रे यांच्या संरक्षणाची त्याला असलेली तीव्र जाणीव, राज्याभिषेकसमयी त्याने रायगडावर ठेवलेला बंदोबस्त, अष्टप्रधानमंडळ बनविताना त्याने प्राचीन धर्मग्रंथांचा घेतलेला आधार व त्यामध्ये देशकालपरिस्थितीनुसार त्याने केलेले बदल, 'यवनवचनैप्लुतसरणि' अशा मराठी भाषेच्या व लेखनपद्धतीच्या शुद्धिसाठी त्याने करविलेले 'राज्यव्यहारकोश' व 'लेखनप्रशस्ती' हे ग्रंथ, त्याची कर्तव्यनिष्ठा, मधूनच उफाळून येणारे त्याच्या मनाचे वैराग्य, स्वतःच्या वडिलांच्या जहागिरीत अर्धा वाटा मिळावा, ही त्याची भूमिका आणि तरीही व्यंकोजीस त्याची जहागिरी शेवटी परत देण्यात त्याने दाखविलेला भावाबद्दलचा जिव्हाळा, इ. असंख्य वैशिष्ट्ये निरनिराळ्या प्रकारच्या प्रसंगवर्णनांतून साकार करून बखरकाराने शिवाजीमहाराजांचे उन्नत, उदात्त, हिमालयासारखे सर्वगुणसंपन्न असे व्यक्तिमत्त्व आपल्यासमोर उभे केले आहे.

आपल्या पराक्रमाने केवळ नूतन सृष्टीच निर्माण करणाऱ्या या महापुरुषाच्या आयुष्याच्या शेवटी मात्र गृहकलहामुळे त्याच्या मनाचे समाधान लोप पावलेले दिसते. आपल्या मोठ्या मुलाच्या दुर्वर्तनाने अस्वस्थचित्त झालेल्या या पुरुषोत्तमास आयुष्यभर केलेल्या दगदगीमुळे अकालमृत्यू आला आणि इतक्या जिद्दीने, दक्षतेने उभ्या केलेल्या स्वराज्यात निर्नायकी अवस्था झाली, हा एक मोठा दैवदुर्विलासच होय !

व्यक्तिचित्रण म्हणून बखरकाराने आपले सारे लक्ष शिवाजीवरच केंद्रित केले आहे. त्यामुळे आपल्या सहस्र-किरणांनीं प्रकाशणाऱ्या सूर्यनारायणाभोवती इतर ग्रहांनी फिरत राहावे, अशी बाकीच्या व्यक्तिमत्त्वांची अवस्था झाली आहे. बखरीतील बाकीच्या व्यक्ती या मध्यवर्ती व्यक्तीच्या कर्तृत्वाने तळपत राहतात. त्यांच्या व्यक्तित्वाच्या सूक्ष्म छटा बखरकाराने रंगविलेल्या नाहीत. शिवाजीच्या कौटुंबिक जीवनाचे अतिशय तुरळक वर्णने काही ठिकाणी भेटतात, परंतु एकंदरीत चरित्रनायकाच्या कौटुंबिक जीवनाची कल्पना या बखरीवरून येत नाही हेच खरे.

### बखरकाराचा संयम

मल्हाररावांची प्रकृती मुळानूनच सौम्य असल्यामुळे, सभासद व ९१ कलमी बखरीतील कित्येक प्रसंगांचा त्यांनी विस्तार केला तरी मूळ वर्णनातील कित्येक आर्ष, अनुचित, महाराजांच्या कर्तृत्वास बाध येणारे प्रसंग मोठ्या संयमाने व खुबीने वर्णिलेले आहेत, हा या बखरीचा एक महत्त्वाचा विशेष होय. त्यांतून मल्हाररावांच्या ऋजुतेचे, उच्च अभिरुचीचे दर्शन घडते. सभासद अफजलप्रसंगाचे वर्णन करताना खानाच्या अहंकाराचे, पोकळपणाचे व मूर्खपणाचे अतिशयोक्त वर्णन तो करतो, चंद्रराव मोऱ्यांच्या वधाचे, व शिवाजीच्या आग्राभेटीचे सभासदाचे वर्णन जसे उग्र वाटते, तसेच नाटकीही वाटते. ९१ कलमी बखरीतील बहुतेक कलमे भाषा व आशय या दोन्ही दृष्टींनी आर्ष वाटावी अशी आहेत. – मालोजी डुकरे मारून मशिदीत टाकतो व त्याच्या गळ्यास चिठी डकवून बादशाहाकरवी लखुजी जाधवरावावर दडपण आणून शहाजी जिजाई विवाहसंबंध घडवून आणतो, शहाजी गरोदर जिजाईस अर्ध्या रस्त्यात असाहाय्य अवस्थेत टाकून पळून जातो, जाधवरावांवर संतापून जिजाईस सवत आणतो, शहाजहान बादशाहा स्वतःच्या मुलीवर बलात्कार करतो त्यामुळे औरंगजेबाची बहीण त्याला गुप्त पत्र पाठवून वडिलांस कैद करविते, पुरंदर किल्ला शिवाजी विश्वासघाताने काबीज करतो, शिवाजी खानभेटीच्या वेळीस खानास शरण जाऊन त्याच्या पोटात डोई घालतो, शाइस्तेखान शिवाजीस संस्कृतपत्र पाठवितो, त्याच्या वाडात शिरून त्याचा पुत्र आपल्या ज्वानस्त्रीसह निद्रित असता पट्टयाचा वार करून शिवाजी त्यास ठार मारतो, दिलेलखानाच्या छावणीतून संभाजी पळून गेला म्हणून औरंगजेब खानास विष देऊन ठार मारतो, शहाजीस अटक केल्यानंतर विजापूरच्या बादशहाने

बाजी घोरपड्यास ‘ शहाजीस गार खणून पुरणे व वरती मोठा दगड बसविण्याची ’ आज्ञा करतो, शिवाजी सूड म्हणून घोरपड्याचा निर्वंश करतो, बायकांच्या पोटातील गर्भ देखील कापतो — इत्यादी ९१ कलमीतील वर्णने मल्हाररावांनी दूर सारून ह्या सर्व घटनांचे शिवाजीच्या, व्यक्तिमत्त्वास बाध न येईल अशा संयमाने वर्णने केली आहेत. आपल्या समोर असलेल्या आधारग्रंथांतून तारतम्याने निवड करण्याची मल्हाररावांची रसिकता अभिजाततेची निदर्शक आहे, असे निःशंक रीतीने म्हणता येते.

स्थूलवर्णने व प्रसंगवर्णने काटेकोररीत्या करावी, ते ते प्रसंग थोडक्यात परंतु आकर्षकरीत्या उभे करण्याचा प्रयत्न करावा ही मल्हाररावांची प्रवृत्ती नाही, त्यामुळे त्यांची युद्धादी प्रसंगांची वर्णने अगदी सामान्य आहेत, हे मागेच सांगितले आहे. शिवाजीमहाराज, अफजलखान, गागाभट्ट, येल्लूरचा किल्ला, बाजीप्रभू व मुरारबाजी यांच्या पराक्रमाच्या वेळची व्यक्तिवर्णने ही सभासदामध्ये अतिशय आकर्षकरीत्या वर्णिलेली आहेत, मल्हाररावांच्या बखरीत अशी स्थळे फार थोडी आहेत. मल्हाररावांना पारंपरिक दंतकथांचे, आख्यायिकांचे आकर्षण मात्र फार मोठे आहे. अशा आख्यायिका रंगविण्यामध्ये त्यांची लेखणी विशेष रमते. या आख्यायिकांमधून वास्तवाभास निर्माण करून आपल्या चरित्राची परिणामकारकता कशी वाढवावी, हे मल्हाररावांना चांगले ठाऊक आहे. जाधवरावांचा रंग-समारंभ, मालोजीस देवीचा दृष्टांत, चतुर साबाजी, मलिक अंबर यांच्या चित्तरकथा, दादोजी कोंडदेवाची स्वामिनिष्ठा, औरंगजेबाची क्रूरता, शहाजीची कैद, कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेची हकीकत, तुकारामबोवांचे कीर्तन, शिवसमर्थ भेट, भूषणकवीचे आख्यान, दिल्लीच्या वाटेवर हेतुपूर्वक अपशकुन करणारा ब्राह्मण, बाळाजी आवजींची समयज्ञता, रघुनाथपंत हणमंत्याच्या स्वाभिमानाची, बुद्धिमत्तेची व स्वामिनिष्ठेची हकीकत, भागानगरकरांच्या दरबारी शिवाजीमहाराजांचे व्यक्त झालेले चातुर्य, इलाचीबेगच्या क्रूर कर्माची हकीकत, इत्यादि आख्यायिकांनी बखरीच्या नाट्यमयतेत मोठी भर पडली आहे.

अफजल — शाइस्तेखान — जयसिंग प्रकरणे, आग्रा भेट व राज्याभिषेक यांची बखरीतील विस्तृत वर्णने सुसूत्र, चटकदार वर्णनांचे वस्तुपाठच होत यात शंका नाही.

### मनुष्य स्वभावाच्या मार्मिक छटा

मनुष्यस्वभावाच्या कित्येक मार्मिक छटा बखरकाराने ठायी ठायी रंगविल्या आहेत. रंगाच्या दरबारात सहज बोलून गेल्यानंतर, जाधवराव यांच्या स्त्रीने त्यांना बोल लावताक्षणी त्यांनी ताबडतोब मुद्याला बगल देण्याचा केलेला प्रयत्न, बाल-शिवाजीचा यवनवेष पाहून त्यास दूर ठेवण्याचा शहाजीने घेतलेला निर्णय,

शिवाजीच्या हालचालींनी साशंक झालेली दादोजी व शहाजीची मने, शिवाजी भेटीस तयार आहे, या कल्पनेनेच हर्षित झालेला अफजलखान, देवीने जरी दृष्टांत देऊन आश्वासिले तरी शिवाजीने भेटीस जाण्यापूर्वी केलेली निरवानिरव, अफजलवधानंतर विजापूर–दरबारची झालेली केविलवाणी अवस्था, जयसिंग व महाराज एका अंबारीत पाहून दिलेरखानाच्या मनाची झालेली काहिली, स्वाभिमानी व्यंकोजीची तडफड व असहायता, शिवाजीमहाराजांच्या राज्याभिषेकाची वार्ता ऐकून औरंगजेबाने व्यक्त केलेला उद्वेग, संभाजीच्या अविचाराने महाराजांच्या मनास आलेली खिन्नता, इ. ठिकाणची वर्णने अतिशय परिणामकारक आहेत.

## भाषाशैली

मल्हाररावांची भाषाशैली साधीच परंतु वर्ण्यविषयाचे चित्र परिणामकारकरीत्या रेखाटण्यास समर्थ अशीच आहे. त्यांच्या वर्णनामध्ये एक प्रकारची गतिमानता आहे. भाषेचा डामडौल दाखविण्याची मल्हाररावांची प्रवृत्ती नाही, परंतु प्रौढ, सुश्लिष्ट, प्रगल्भ आणि समर्थ लेखनशैलीचा प्रत्यय या बखरीच्या पानापानावर येतो. शुद्ध, रेखीव अशा वाक्यरचनेची या बखरीमध्ये असंख्य उदाहरणे आढळतील. संभाषणे, संवाद, युद्धादिकांच्या हालचाली, निरनिराळ्या पात्रांतील मनातल्या विचारांचे आविष्करण इ. प्रसंगी बखरकार छोटी छोटी वाक्ये वापरून लयबद्ध वातावरण निर्माण करतो, तर राज्यकारभाराची, स्थिर अशा वस्तुमात्रांची वर्णने करताना पल्लेदार, मिश्र अशी वाक्ये वापरून आपल्या वर्णनाला प्रौढतेची, गांभीर्याची छटा देतो. वर्णनाच्या खुलावटीसाठी पौराणिक उपमा – दृष्टांत देण्याची त्याची हातोटी जागजागी प्रत्ययास येते, उदा :– पूर्वीपासून देवादिक दैत्यांचें प्राबल्य असतां, रावणाचे घरीं कालाची प्रतिक्षा करून जसें म्हटलें तसें चाललें ( २६ ); परस्त्री-अभिलाषइच्छेकरून रावणादिक क्षयास गेले ( ४१ ); ते समयीं जसा शिशुपाल सभेमध्यें सहज लिलेंकरून श्रीकृष्णजीनें मारिला त्याप्रकारें या सभेंत शोभा येती जाली ( ६२ ); जसा कालिया साप पत्र्यांचे करुणेंकरून श्रीकृष्णजीनें जित सोडला ( १०२ ); श्रीमारुतीनें लंकेत जाऊन जशी ख्याति केली, सीताशुद्धि घेऊन गेले ( १२० ); पूर्वीं पांडव कौरव बहुत कष्टी झाले ( १४३ ); ” इ...

बखरकाराने सुभाषितादिकांचा फारच मर्यादित उपयोग केला आहे, स्त्रीबुद्धिः प्रलंयगता, स्त्रीनायकी बाळनायकी, इ. काही थोडी सुभाषिते फक्त लक्षात राहतात.

कारकुनी बाण्यामुळे जमाखर्ची पद्धतीने बीतपतशील म्हणून याद्या देणे, प्रदीर्घ व पल्लेदार वाक्यांमध्ये कार्यकारणभावांची गल्लत होणे, इत्यादी काही दोषही प्रामुख्याने नजरेत भरतात.

## शिवाजी महाराजांच्या राजनीतीचे, राज्यव्यवस्थेचे वर्णन

शिवरायांच्या राजनीतीचे, राज्यव्यवस्थेचे विस्तृत वर्णन हा या बखरीचा मोठा विशेष होय. शिवाजीमहाराजांनी मोठ्या प्रमाणात किल्लेकोट काबीज करण्यामध्ये जी शक्तियुक्ती वेचिली आणि सह्याद्रीच्या कडेकपारींचा आश्रय घेऊन स्वराज्याची मुहूर्तमेढ रोविली, त्याचे यथायोग्य चित्रण मल्हाररावांनी केले आहे (पृ. ३१-३२), निरनिराळ्या आधिकारपदी कोणत्या धोरणाने त्यांनी माणसांची योजना केली, हे बखरकाराने ठायीठायी[1] सांगितले आहे. जवळ जवळ सारे चौथे प्रकरण शिवाजीच्या राज्यमर्यादास्थापनेची कल्पना देण्यासाठी लिहिलेले आहे. शिवाजीच्या राज्यव्यवस्थेचे इतके तपशीलवार वर्णन शिवचरित्राच्या दुसऱ्या कोणत्या बखरीत आढळत नाही. शिवाजीच्या न्यायव्यवस्थेचे चित्र दक्षणदिग्विजय प्रकरणात[2] सुरुवातीसच वर्णिले आहे. राज्याभिषेकानंतर राज्यव्यवस्थेची जी पुनर्रचना केली, त्याचेही बखरकारने प्रदीर्घ वर्णन[3] केले आहे. विस्तारभयास्तव हे सारे वर्णन मुळातूनच पाहावे, अशी सूचना द्यावीशी वाटते. अमात्यांच्या राजनीतीच्या तुलनेने, मल्हाररावांनी ‘आरमार, वतनदार वृत्ति आणि इनामे’ यासंबंधी अतिशय जुजबी वर्णन केले आहे. ‘साहुकार व परदेशी व्यापारी’ या विषयाकडे त्यांनी दुर्लक्ष केल्याचे दिसते.

## तत्कालीन लोकस्थितीचे निर्देश

तत्कालीन समाजस्थितीचे निर्देश या बखरीत अल्प प्रमाणात आढळतात ‘ज्याची खावी भाकरी, त्याची करावी चाकरी’ हे तत्त्व तत्कालीन समाजाच्या हाडीमांसी खिळले होते असे दिसते. लखुजी जाधवराव, शहाजी, चतुर साबाजी, मुरार जगदेव, मोरे, जयसिंग, जसवंतसिंग इ. मातबर हिंदू लोक मुसलमानांची चाकरी करण्यात कृतकृत्यता मानतात, उलट, शिवाजीच्या पदरी मुसलमानही तितक्याच निष्ठेने वावरताना आढळतात. पुंड, पाळेगार स्वतंत्रपणाने आपापल्या मुलुखावर अधिराज्य गाजवीत असताना दिसतात. इमान, विश्वास, निष्ठा, शब्द पाळणे, आणाशपथा यांच्या बाबतीत समाजात चाड असल्याचे दिसते, फंद–फितुरी, अविश्वास इत्यादिकांची उदाहरणेही नाहीत असे नाही. परिस्थितिवश रजपुतांनी स्वीकारलेली शरणागती व त्यांचा क्षत्रियबाणा, समाजाची दानधर्मप्रवृत्ती, साडे करणे, मुलीचे नाव ठेवणे इ. विवाहसंस्कार, लिंबलोण उतरून दृष्ट काढण्याचे प्रकार, दैववादी, शकुनापशकुनांवर

---

१. पृ. ३३-३५, ५९–६०, ७७, ७९–८०, ११३–१४, १२२–२४, १३१

२. पृ. १३३–३४

३. पृ. १७०–७४

विश्वास ठेवणारा, चमत्कारादी अद्भुततेचा सोस असणारा परमेश्वरी कृपा व संतांचे आशीर्वाद यांची मातबरी बाळगणारा समाज, अनैतिक आचरणापेक्षा नाटकशाळा ठेवण्यात काही गैर न मानणारा, लेकावळ्यांचीही कदर ठेवणारा असा समाज या बखरीतून भेटतो. जातिभेदाची तीव्रताही तितकी विशेष जाणवत नाही, कारण शिवाजीच्या पदरी सर्व जातीचे लोक गुण्यागोविंदाने वावरताना दिसतात. मात्र अष्टप्रधान व सरकारकुनांची रचना पाहिली तर तत्कालीन समाजातील ब्राह्मणांच्या वर्चस्वाची जाणीव होते.

ब्राह्मणभोजन, महापूजा, नवस, व्रतवैकल्ये, तीर्थयात्रा यासंबंधी बखरीत अनेक उल्लेख आलेले आहे ' बहुतां दिवशीं दर्शन घ्यावयाचे झाल्यास ते देवालयीं घेण्याची रीत ( पृ. ९५ ) व आग्र्याहून परत येताना काळवेळ न पाहाता गयावर्जनादि तीर्थयात्रा शिवाजी करीत बसतो, इ. बखरीतील वर्णने पाहून तत्कालीन समाजरचनेतील धार्मिकतेची कल्पना येते.

## भाषिकदृष्टचा विवेचन

शिवाजी महाराजांनी राज्यव्यवहारकोशाच्या रूपाने भाषाशुद्धीची खटपट केली तरी त्यांच्या निधनानंतरच्या महाराष्ट्रातील अस्थिर राजकीय परिस्थितीमुळे पेशवाईतील मराठी भाषेवर अरबी–फारसी भाषांचे वर्चस्व राजकीय व्यवहारापुरते कायम राहिलेले दिसते. शस्त्रास्त्रे, वस्त्रप्रावरणे, राज्यकारभाराची निरनिराळी खाती व त्यांवरच्या निरनिराळ्या अधिकाऱ्यांचे हुद्दे, त्यांची आडनावे, फारशी भाषेतून घेतलेली दिसतात. संयुक्त क्रियापदांचे, शब्दयोगी अव्ययांचे, निपातांचे प्रयोग फारसीच्या धर्तीवर केले जातात. दौलत, मालिक, कवायत, मर्जी, तह, कारखाना, कारभारी, इ. शब्द मराठी भाषेशी इतके एकरूप होऊन गेले आहेत की, ते परकीय आहेत हे सांगितल्याशिवाय सामान्य माणसाला कळणार देखील नाही. मात्र असे असंख्य शब्द मराठीत येताना मूळ अरबी-फारसी रूपे टाकून मराठी रूपांशी एकरूप झालेले दिसतात. उदा :

अरबी :—तरतूद ( तर्दुद् ), नामोहरम ( ना+मह्रुम् ), द्यानत ( दियानत् ), किल्ला ( कल्अा ), मनसबा ( मन्सूबा ), मसलत ( मस्लहत् ), किताब ( खिताब ), खातरजमा ( खातिरजमा ), हक्करसूम ( हक् + रस्म ), कैफी ( कइफ् ), माफ ( मुआफ् ), जिम्मा, ( झिम्मा ), वजीर ( वझीर ), किलाफ ( खिलाफ् ), खलबत ( खल्बत् ), इभ्रत ( इबरत् ), जाया ( झायिअ ), इ.

फारसी :—जमीन ( झमीन् ), जागा (जायगाह् ), सरपोष ( सरपोश् ), आराष ( आराइश् ), बुणगे ( बुन्गाह् ), जिलीब ( जिलब् ), फर्जंद ( फरझंद् ), आबदागिरे ( आफ्ताब् + गीर ), दरोगा ( दारूघा ), मोहरा ( मुहरा ), इ.

फारसी-अरबी शब्दांबरोबर संस्कृत तत्सम शब्दांचाही ठिकठिकाणी उपयोग होतो. उदा : मंगलालंभन, संधि, विग्रह, यान, आसन, ऐंद्रीशांति, पौरंदरीशांति, द्वैधीभाव, संश्रय, इतिभय, अमात्य, प्रधान, सचिव, छंदोगामात्य, इ.

बखरीतील वाक्प्रचारांकडे लक्ष टाकले तर अरबी, फारसी, संस्कृत व मराठी या चतुर्विध भाषांतील वाक्प्रचारांचा मुक्तहस्ताने वापर होत असलेला आढळतो. उदा : पुरा करणे, डोला पाठविणे, केसरी करणे, मोरचे मारणे, मुजाका धरणे, कजाखी करणे, पाडाव करणे, पाडाव येणे, दृष्टांत होणे, उपार्जन करणे, खाना करणे, यागी होणे, बुडविणे, बळावणे, खातरेत न आणणे, रूजू होणे, जेर करणे, दस्त करणे कारागर होणे, गलबत करणे, दुमदारी मारणे, हल्ला करणे, कौल देणे, फते पावणे, झोंबाडणे, जेब करणे, किल्ला बोलू लागणे, इ.

फारसी-अरबी, फारसी-मराठी, फारसी-संस्कृत इत्यादी सामासिक शब्दांचा वापर विपुल प्रमाणात आढळतो. उदा :—

फारसी-अरबी मिश्र सामासिक शब्द :--निकमहराम, बरकंदाज, मनसबादार ( अ. मन्सूबा + फा. दार ), कमकुवत ( फा. कम + अ. कुवत ), बेकैदी ( फा. बे + अ. कैद ), बेमर्जी, बदनजर ( अ. बद + फा. नझर् ), गरीबनवाज ( अ. गरीब + फा. नवाझ् ), खासबारदार ( अ. खास + फा. बारदार ), बरहक्क ( फा. बर + अ. हक् ) हक्करुसूम ( अ. हक् + फा. रुसूम ), सैतानखाना ( अ. शैतान् + फा. खाना ), जवांमर्दी ( फा. जवान + अ. मर्द )

मराठी-संस्कृत मिश्र सामासिक शब्द : होणारानुरूप ( होणार—मराठी, अनुरूप संस्कृत )

फारशी किंवा अरबी-संस्कृत समास—किल्लेकोट, दादमहाल इ.

बालपरवेशी ( सं. बाल + फा. पर्वरश् = मुलांच्या संगोपनार्थ नेमणुका ), पारपत्यगार ( सं. पारपत्य = संरक्षण + गार फारसी प्रत्यय ) भालदार ( सं. भल्ल + फा. दार ), इ.

वरील प्रकारचे जोड शब्दही आढळतात. उदा :—

भुजंगसर्प, कुलबखंबीर, बागमळा, अनुकूलसाह्य, किल्लेकोट, पुंडपाळेगारी, ह्यानतदारीनेइतबारेकरून, रोखापत्र, कानुजाबता, कोशखजिना इ.

एकाच शब्दाची निरनिराळी रूपे आढळतात, उदा :– जयसिंग–जयशिंग–जैसिंग; उपबेन–उदबेन; व्यव्हार–व्यवहार, वेवहार–वेव्हार इ.; संस्कृत शब्दांचा वापर करताना त्यांची निरनिराळी अपभ्रष्ट रूपे सिद्ध होऊन शिष्टमान्य झालेली दिसतात. क्वचित चुकीची रूपेही वापरली जातात उदा : युद्ध, युध्ध; सिद्धान्त, सिध्धांत; न्युंन्य ( न्यून ); वृधाप्य, वृध्धाप्य, वृद्धाप्य; उपबेन, उदबेन ( उपबर्हण ); उत्संगळ ( उच्छृंखल ); ऋत्विजवर्णन ( ऋत्विजवरण); संस्थान ( संश्रय ); आयुर्भाव

( अविर्भाव ); एकाग्र ( एकाग्र ); आग्रह ( आग्रह ); शरीरसमंध ( शरीरसंबंध ); शयाद्रि, षयाद्रि, सह्याद्रि; वौंश ( वंश ), मधेस्त, मध्येस्थ; ऐसे, ऐसे, यैसे; इ.

शब्दामध्ये ' ए ' ह्या स्वराचा आगम होतो. उदा : जेन्मकाळ, येत्न, प्रेत्न, प्रेयत्न, चंदेरराव, येवन, चेंदन इ.; संधी न करण्याची प्रवृत्तीही आढळते. उदा :– अगम्यअगमन, राज्यउपभोग, धर्मउच्छेद इ.

यांखेरीज फारसी धर्तीची वाक्यरचना, ' व ' या उभयान्वयी अव्ययाचा सढळ वापर; कर्मणी प्रयोगाने वाक्यारंभ करून शेवट मात्र कर्तरी करणे ( महाराजांनी सूड घेईन म्हणून बोलले ), स्त्रियांचा नपुसकलिंगी निर्देश ( वडील स्त्री सईबाईसाहेब गुरूदर होतीं, तीं प्रसूत जालीं ); तृतीयेच्या ' नीं, णीं ' या अनेकवचनीं प्रत्ययांचा एकवचनी प्रयोग ( स्त्रीनीं, पादशाहाणीं, खानानीं ); पंचमी विभक्तीऐवजी तृतीयेचा वापर ( विजापूरनें निघोन, राजगडनें निघोन ); सामान्यरूपांमध्ये ' यश्रुती ' होणे ( राजियास, किलियास ); करूं, धरूं यां ऐवजी ' करून, धरून ' अशी रूपे योजिणे; वाक्यामध्ये कर्ता, कर्म, क्रियाविशेषणअन्वय इ. शब्द अध्याहृत असणे व विशेषणे फारसीच्या धर्तीवर विशेष्यानंतर वापरणे, इत्यादी वैशिष्ट्ये व्याकरणदृष्ट्या तात्काल लक्षात येण्यासारखी आहेत.

—भीमराव कुलकर्णी

क्र. १८०३६

॥ श्रीमन्महागणपतये नमः ॥

## मल्हार रामराव चिटणीसकृत

# श्रीशिवछत्रपतींचें सप्तप्रकरणात्मक चरित्र

## प्रकरण प्रथम

## पूर्वजवर्णन आणि जन्मकथन

### बखरलेखनाज्ञा

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १३७ प्रमोदीनाम संवत्सर ज्येष्ठ बहुल षष्ठी भृगुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजाधिराज श्रीमहाराजप्रतापी[1] शाहू नृप छत्रपति सिंहासनाधीश्वर स्वामी यांणीं राजमान्य राजश्री मल्हारी[2] रामराव चिटणवीस यांसि आज्ञा केली ऐशी जे– "तुम्ही पुरातन सेवक, लेखनाधिकारी; याजकरितां पूर्वीपासून महाराजांचे कुलाचे ठायीं परम प्रतापी पूर्वज होत आले, त्यांणीं पराक्रम केले, सार्वभौम राज्यें केलीं; तदनंतर कालेंकरून म्लेंछ राज्य होऊन संपूर्ण पृथ्वींतील धर्म-उच्छेद केला, श्रीदेव, ब्राह्मण, तीर्थें व क्षेत्रें, गाई व प्रजा, यांसि पीडा नाना प्रकारें करून बहुत केली असतां, पुन्हां श्रीशिवछत्रपति अवतार होऊन [ त्यांनीं ] धर्मस्थापना केली, व राज्यआक्रमण व पराक्रम[3] केले. त्यांजपासून आजपर्यंत राज्यउपभोग वंशपरंपरा दक्षणचे ठायीं कसे केले, पराक्रम काय केले, हें चरित्र पूर्वील दाखले वगैरे लेहून ठेविलें असेल त्याअन्वयें लेहून आणावें, जें श्रवण, पठण, मनन केलें असतां सकल विद्या व गुणसंपन्नता व शौर्य, औदार्य, गांभीर्य, दया, धर्म व नीति हें सहज उत्पन्न होत असावें," म्हणोन आज्ञा जाली.

### कुलपरंपरा–युधिष्ठिरापासून सुरुवात

त्याजवरून शास्त्राधार विष्णुपुराणादि पुराणांतील भाव, दंडनीति, राजधर्म, राजमयूख व रमलशास्त्र व कारकीर्दी वडिलार्जित होत्या, दिनचर्या, पराक्रमकथा त्यांचे आश्रयेंकरून लेहून निवेदन केलें कीं :–

१. 'प्रताप' २. 'मलारी', 'मल्हार' ३. 'अमानुष पराक्रम'

पूर्वीं तीन युगें होऊन गेलीं. सांप्रत कलियुग[१] प्राप्त जालें. त्याची संख्या वर्षें सुमारी ४,३२००० त्यांत गत कली ४९११ प्रमोदी संवत्सर चालला आहे, यापर्यंत जालीं. कलियुगास प्रारंभ जाल्यापासून युधिष्ठिरशक प्रथम जाला. वर्षें ३०४४ चालला. त्यांत प्रथमपासोन राजे आधीं युधिष्ठिर म्हणजे धर्मराज; त्याचे नातू परिक्षितीपासून पुढें वौंशाचे तीस पुरुष जाले त्यांचा तपशील :—

| | वर्षे | महिना | दिवस | | व. | म. | दि. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ परीक्षिति, | ६० | १ | ० | १५ सुखीबल | ६१ | ५ | ४ |
| (अर्जुनाचा नातू) | | | | १६ परिप्लव | ७२ | ११ | ३ |
| २ जनमेजय | ८४ | ५ | २७ | १७ सुनय | ५८ | ० | ८ |
| ३ शतानीक | ८२ | ८ | २४ | १८ मेधावी | ५० | ३ | २० |
| ४ अश्वमेध | ८८ | २ | ८ | १९ नृपंजय | ५२ | ४ | ७ |
| ५ कृष्ण | ८१ | ११ | २४ | २० मृदु | ४८ | १० | २९ |
| ६ नेमीचक्र | ७५ | ८ | ८ | २१ तिग्म | ४७ | १० | २९ |
| ७ प्युषण | ७५ | १० | ८ | २२ बृहद्रथ | ४७ | ११ | ० |
| ८ चित्ररथ | ७७ | ७ | २४ | २३ वसुदास | ४४ | ८ | १७ |
| ९ शुचिरथ | ७९ | ८ | ६ | २४ शतानीक दु. | ५६ | ० | ० |
| १० वृष्णिमान् | ६१ | ५ | २ | २५ उदयन | ५४ | १० | २ |
| ११ सुषेण | ६५ | १० | २९ | २६ अहीनर | ५१ | ११ | ८ |
| १२ सुनीथ | ६४ | ७ | ३ | २७ दंडपाणि | ४८ | ७ | ४ |
| १३ रुचि | ६५ | ८ | १९ | २८ निरमित्र | ५८ | ५ | २५ |
| १४ नृचक्षु | ६२ | ० | ३ | २९ क्षेमक | ३८ | ११ | २२ |

असे युधिष्ठिरापुढें परीक्षितिपासून क्षेमकापर्यंत २९ व युधिष्ठिरसुद्धां ३० जाले. तेव्हां कलियुगाचा प्रादुर्भाव, बहुत अधमप्रवृति जाली. याजमुळें [ क्षेमक राजा ] उत्तरेस कलापग्रामीं जाऊन कलीचे योगें योगारूढ होऊन राहिला. जाते-समयीं राज्य सुनीकप्रधान यास दिल्हें. तोही आपले पुत्रास [ राज्य ] देऊन राजाबरोबर तपास गेला. त्याचे वौंशीं महानंदापर्यंत १५ पुरुष जाले ते :—

| | व. | म. | दि. | | व. | म. | दि. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ प्रद्योत | १७ | ७ | ५ | ५ नंदिवर्धन | ३५ | ९ | १७ |
| २ पालक | ३२ | ८ | ११ | ६ शिशुनाग | ४३ | २ | ४ |
| ३ विशाख | ३७ | ८ | २२ | ७ काकवर्ण | ४२ | ९ | २४ |
| ४ जनक | ३२ | १० | १० | ८ क्षेत्रधर्मा | ३८ | २ | २५ |

१. ' कलयुग '

| | व. | म. | दि. | | व. | म. | दि. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ क्षत्रौज | ३५ | ४ | २४ | १३ द्योच्योदन | २६ | २ | १३ |
| १० विंबिसार | ३० | ८ | ११ | १४ नंदिवर्धन, | ३५ | ४ | १ |
| ११ अजातशत्रु | १५ | १० | ८ | दुसरा | | | |
| १२ दर्भक | २७ | ७ | १५ | १५ महानंद | ३५ | ८ | ७ |

## रजपूतकुलोत्पत्ति

हा महानंद राजा सोमवंशीं जाला. तो कलीचे योगेंकरून परम उग्रस्थिति, अधर्मवासना, विषयलंपट, परस्त्रियांगमनकर्ता जाला. त्याचे शूद्रवर्ण व वैश्य वर्णाच्या स्त्रिया करण्यास क्षत्रियास अधिकार आहे असा धर्म स्थापून शूद्र वर्णाच्या स्त्रिया विवाहित केल्या. त्यांजपासून पुत्र जाला. त्याचें नांव महापद्मानंद असें ठेवून, त्यासच राज्याधिकार देऊन, राज्य दिल्हें. शूद्रवर्णांत व्यवहारसंपर्क अन्नादि होऊं लागला. सूर्यवंश, सोमवंश या कुलींचे संपूर्ण राजे यांतही व्यवहार जाला. त्या दिवसापासोन राजपुत्र जाले ते रजपूत म्हणवून क्षत्रधर्मेंकरून उत्तरदेशीं राज्य करते जाले ते :—

| | व. | म. | दि. | | व. | म. | दि. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ महापद्मानंद | २८ | ८ | १० | ७ संगत | १८ | ७ | २९ |
| २ कौटिल्य चंद्रगुप्त | २८ | ११ | १० | ८ शालिसुक | ३५ | २ | २० |
| ३ बिंदुसार | २९ | ७ | २१ | ९ सोमशर्मा | २३ | ८ | १५ |
| ४ अशोकवर्धन | ३२ | ५ | १० | १० धृतधन्वा | ११ | २ | २ |
| ५ सुयश | २२ | ० | ११ | ११ ब्रह्मरथ | १० | २ | १० |
| ६ दाशरथी | २३ | ६ | २७ | | | | |

## निर्वंशाची मालिका

महापद्मानंद याचा वौंश ब्रह्मरथापर्यंत ११ पुरुष होऊन राज्य केलें. पुढें निर्वौंश जाला. त्याचा सेनापति पुष्पमित्र यानें राज्य आक्रमण करून तें करूं लागला. त्याचा वौंश :—

| | व. | म. | दि. | | व. | म. | दि. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ पुष्पमित्र | २४ | २ | ० | ६ पुलिंद | १८ | २ | २२ |
| २ अग्निमित्र | १६ | ९ | २४ | ७ घोषवसु | ३७ | १ | १२ |
| ३ ज्येष्ठ | २४ | ४ | १८ | ८ वज्रमित्र | २८ | ७ | २७ |
| ४ वसुमित्र | १९ | १ | २१ | ९ भागवत | १६ | १० | १३ |
| ५ दशाद्रक | १८ | ४ | ४ | १० देवहुति | १६ | ७ | १९ |

देवहुति[1] पर्यंत १० पुरुष जाले. त्यांचा निर्वौंश झाला. त्याचा प्रधान वसुदेव याणें राज्य आक्रमिलें, आणि ( तें ) करूं लागला. त्याचा वौंश :—

| | व. | म. | दि. | | व. | म. | दि. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ वसुदेव | १२ | ५ | २७ | ३ सुशर्मा | १३ | ४ | ८ |
| २ भूमित्र | १४ | ९ | २२ | ४ नारायण | १७ | ७ | १९ |

नारायणापर्यंत ४ पुरुष झाले. त्यांणीं राज्य केलें. त्यांचा निर्वौंश जाला. तेव्हां कोणी शूद्र ज्ञातीय क्षिप्रक याणें राज्य घेऊन सार्वभौमपद करूं लागला. त्याचा वौंश :—

| | व. | म. | दि. | | व | म. | दि. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ क्षिप्रक | २४ | १ | १० | ६ लंबोदर | १३ | १० | ७ |
| २ कृष्ण | ३१ | ० | १२ | ७ दिवीलक | १५ | २ | २५ |
| ३ शातकर्ण | २ | २ | ८ | ८ मेघस्वामी | १९ | ११ | १३ |
| ४ पूर्णेच्छ | १२ | ७ | १९ | ९ शठमान् | १० | ५ | ४ |
| ५ शातकर्ण दु. | ४ | ५ | ९ | १० अरिष्टकर्मा | २६ | ३ | २१ |

अरिष्टकर्मापर्यंत दाहा पुरुषांनीं राज्य केलें. तोंपर्यंत युधिष्ठिरशक ३०४४ वर्षे जाला. नंतर उज्जनींत राजा विक्रम होऊन त्याचा शक रक्ताक्षीनाम संवत्सरीं जाला. त्यांत हस्तिनापुरीं राजे जाले ती संख्या; क्षिप्रक याचे वौंशींचा अरिष्टकर्मा याचा पुत्र हल, त्याचे वौंशीं राजे जाले जे :—

| | व. | म. | दि. | | व. | म. | दि. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ हल | १४ | ९ | १४ | ६ पुलुमान | १८ | २ | १७ |
| २ प्रविलसेन | १६ | २ | १ | ७ शिवश्री | ७ | ७ | १९ |
| ३ सुंदर | २१ | ७ | १२ | ८ विजय | १५ | ७ | ८ |
| ४ चकोर | १ | ० | १५ | ९ चंद्रश्री | १८ | ४ | ८ |
| ५ गोमती | ७ | ५ | १५ | १० पुलोमा | १४ | १ | ११ |

### विक्रमशक व शालिवाहन शक

पुलोमापर्यंत १० पुरुष जाले. तेव्हां विक्रमशक एकटा पृथ्वीवर १३५ वर्षें चालला. नंतर प्रतिष्ठान म्हणजे पैठण गंगातीर येथें शालिवाहन राजा शककर्ता निर्माण जाला. आणि उभयतां एकावर एक चालून गेले. ते समयीं उभयतांनीं प्रतिज्ञा केली कीं, एकानें मृत्तिकेचे घोडे करावे, एकानें काष्ठाचे करावे; ज्याचे घोडे पैलतीरास जातील, त्याणें आपला शक चालवावा. म्हणून शालिवाहनानें मृत्तिकेचे

---

१. ' देवमूर्ति '

केले, विक्रम याणीं काष्ठाचे केले, आणि नर्मदेंत चालविले. तेव्हां ईश्वरसत्तेनें दोघांचेही घोडे वाहवले [ व ] बुडाले. याजवरून उभयतांनीं तह केला कीं, नर्मदापैलतीरीं विक्रमशक चालावा, नर्मदादक्षणतीरीं शालिवाहन चालावा. याप्रमाणें [ शक ] चालते जाले. त्यांत ५१२ वर्षे शालिवाहन शकांत हिंदु राजे हस्तनापुरीं जाले. [ ते ] प्रथम आंध्रदेश म्हणजे तैलंगण आंध्रजातीय कोणी राजा मल्लकसेन याचा पुत्र सुरसेन येऊन, पुलोमा यास मारून आपण राज्य घेऊन करूं लागला. त्याचे वौंशीं :—

| | व. | म. | दि. | | व. | म. | दि. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ सुरसेन | १५ | ७ | १२ | ६ हरिसेन | १२ | ० | २५ |
| २ माधवसेन | १२ | १ | ३ | ७ ब्रह्मसेन | ८ | ११ | ३ |
| ३ देवसेन | १० | १ | ५ | ८ नारायणसेन | ६ | ० | १५ |
| ४ भूसेन | ५ | १० | ५ | ९ लक्ष्मीसेन | १६ | ७ | १५ |
| ५ कल्याणसेन | ४ | ८ | २६ | १० दामोदरसेन | ११ | ५ | १६ |

## आभीरवंश

दामोदरसेनपर्यंत १० पुरुष जाले. तेव्हां अभीर म्हणजे गौळी या जातीचा माधवसिंग याणें उत्तरेकडून येऊन [ त्यानें ] दामोदरसेन यास मारून राज्य घेतलें, त्याचा वौंश—

| | व. | म. | दि. | | व. | म. | दि. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ माधवशिंग | १७ | ६ | ६ | ४ शेरशिंग | १० | ८ | ११ |
| २ दीपशिंग | १४ | ५ | २८ | ५ हरिशिंग | २५ | २ | १५ |
| ३ राजशिंग | १२ | ३ | २४ | ६ नृपशिंग | ८ | ४ | ४ |

## रजपूतवंश

नृपसिंगापर्यंत ६ पुरुषांनीं राज्य केलें. तदनंतर धीरधर ‡ रजपूत राजा याणें त्यास मारून, राज्य करूं लागला. त्याचा वौंश—

| | व. | म. | दि. | | व. | म. | दि. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ धीरधर | २२ | ७ | ० | ६ जीवन | २२ | ५ | २५ |
| २ सेन | ३५ | १० | ० | ७ उदाईशिंग | २७ | ४ | २९ |
| ३ कौनी | ३५ | २ | ८ | ८ कुळानंद | २१ | ३ | २८ |
| ४ महानु | २१ | ३ | ९ | ९ विक्रमचंद | १३ | २ | २६ |
| ५ बीरनाथ | २६ | ५ | २५ | | | | |

‡ ‘ हजरधर ’

विक्रमचंदापर्यंत [ नऊ पुरुषांनीं ] राज्य केलें. ते समयीं पृथ्वीपाळ पाठार ( पिठोर १ ) प्रभू म्हणून राजा रजपूत याणें पूर्वेकडून येऊन विक्रमचंद याजला मारून राज्य घेतलें; आणि इंद्रप्रस्थ येथें राजधानी करून राज्य करूं लागला. त्याचा वौंश —

| | व. | म. | दि. | | व. | म. | दि. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ पृथ्वीपाळ | १४ | ७ | १७ | ४ चेनपाळ | १९ | २ | १५ |
| २ उजेनपाळ | ११ | ६ | १३ | ५ पिठोर | ३५ | ४ | २५ |
| ३ उदेपाळ | १३ | ७ | १४ | | | | |

### यावनी राज्य व्हावें हा योग

ऐसे पांच पुरुष राज्य करते जाले. तों शालिवाहन शके ५१२ वर्षें जालीं. तोंपर्यंत धर्मेंकरून हिंदुराज्य चालत असतां कलिप्रभावें[1] करून ईश्वरसत्तेनें यावनी[2] राज्य[3] दक्षणप्रांतीं व हिंदुस्थानीं व्हावें हा योग प्राप्त जाला.

ते समयीं पूर्वी पृथ्वीचे ठायीं सात पैगंबर अवलिया फकीर प्राप्त जाले होते. तेव्हां सुलतान रुकद्दीनपाशीं[4] तिमिरलिंग म्हणोन कोण्ही यवन पुण्यवान होता. त्याची ( व ) पैगंबर याची गांठ पडून त्याणें त्याची सेवा बहुत निष्ठेनें केली. त्यास पैगंबर याणें बारा लंगर पाठीवर मारले. ते सोसिले आणि ' बस ' असें बोलिले. तेव्हां त्यांणीं वर दिल्हा कीं, " बाराशें वर्षें राज्य तुजला वंशपरंपरेनें इंद्रप्रस्थ-हस्तनापुरचें दिलें तूं करशील. " ते समयीं धर्मराज्य. तेथें आपली देवताप्रवेश कसा करावा, राज्य कसें घ्यावें म्हणून पैगंबर व सुलतान रुकद्दीन यांणीं विचार करून, कांहीं यवनास हिंदूंचे वेश देऊन नगरांतील देवता भ्रष्ट केल्या. हिंदुधर्म भ्रष्ट केला. आपली देवताप्रवेश करविली आणि वरप्रयोगेंकरून फौज-जमाव करून पिठोर राजाशीं युद्ध केलें. त्याणेंही बहुत प्रकारें करून युद्ध केलें, परंतु जय न घडे. आसमंताद्भागीं सर्व राज्य त्यांणें सोडविलें. तेव्हां निश्चय केला कीं, ईश्वरानें वर देऊन राज्य त्यांस दिलें, त्याअर्थीं राज्य जातें, म्हणून कबिले पुरे करून, आपण केशरी पोषाख करून, लढाईत बहुत शर्त करून गर्दीस मिळाला. राज्य गेलें. शक ५१२ साधारणनाम संवत्सर. नंतर इंद्रप्रस्थ याचें नांव दिल्ली असें ठेऊन, पातशाहा होऊन तख्त करून राज्य करूं लागला. त्याचा वौंशविस्तार आजपर्यंत राज्य करीत आहेत. त्याच्या वौंशांत मोठे मोठे पराक्रमी पादशाहा जाले. समुद्रवलयांकित पृथ्वीचे राजे जिंकून करभार घेऊं लागले. जयपूर वगैरे राजे रजपूत यांस पराभव करून आपले म्हणवावें, शिक्कयांत नांव आपलें घालावें, पादशाहाचीं[5] चिन्हें, निशाणें वागवावीं;

१. ' कलप्रभावें ' २. ' यावनीस ' ३. ' राज्यपद ' ४. ' रुकनदीन ' ५. ' आपली '

सेवक म्हणवून[1] कन्या पादशाहास द्यावी; डोला पाठवावा, ऐसें करून राज्यें ठेविलीं. सर्व पृथ्वी यवनमय करून, आपल्या देवतांही स्थापून, आपले धर्म चालवून मोठेमोठे प्रताप केले. बाराशें वर्षांत पंचावन्न-छपन्न पुरुष यांणीं पादशाही करून अपला शक करिते जाले. तो शक 'सन' म्हणून मृगावर चालू जाला. त्यास 'इहिदे' म्हणून आजपर्यंत इहिदेपासून चालतो. त्या वंशीं अकबरशाहा व शाहाजाहां असे बहुत जाले, त्यांचे पराक्रमांचे शाहानामे जाले.[2]

## कलिधर्में धर्मउच्छेद जाला !

दक्षणदेशीं शालिवाहन शके १२०० या शकांत किस्किंदानगर, वाली सुग्रीव यांची राजधानी, त्यास हल्लीं विद्यानगर अनीगोंदी[3] म्हणजे त्या राजाचें हत्ती बांधण्याचें स्थान, यास त्या भाषेनें म्हणावें, ऐशी आख्या आहे, तेथें त्या स्थानीं किरीटी रामराजा म्हणोन क्षत्रिय होता जाला. त्यानें साहा सुभे दक्षणचे यांत हिंदुधर्म स्थापिला. पुनः देव-ब्राह्मणभक्त [ असल्यामुळें ] सुवर्णाची वृष्टि राज्यांत जाली, व श्रीपंढरीहून पांडुरंग भक्तियोगें नेले, अशी जग-विख्यात कीर्ति आहे. त्या समयांत ज्ञानेश्वर व भानुदास ब्रह्मनिष्ठ सिद्ध होते. असा राजा परम धार्मिक धर्माभिमानी जाला. त्याणें एकादशीचे दिवशीं म्लेंछ-स्पर्श करूं नये म्हणून बसावयासि निराळें घातलें. तेव्हां मातवर यवन सरदार यांस विकल्प येऊन त्याचा प्रधान वैश्य होता, त्यास वश करून घेतलें. कलिधर्में धर्मउच्छेद होणे, त्यायोगें यवनास अनुकूल होऊन राज्याचा[4] उच्छेद केला. ते[5] दक्षिणेस निघोन गेले.[6] नंतर कानडा रामराजा वैश्य यवनांशीं सह राज्य करीत असतां त्यासही साहाजण म्लेंछ त्या राज्यांतील सरदार वगैरे होते, त्यांणीं [ रामराजास ] धरून कैद केलें. राज्यहरण केलें. तोही दक्षणेस गेला. तेव्हां साहा जणांनीं यवनांनीं साहा सुभे राज्य वांटून घेऊन, पादशाहा असें म्हणवून ते राज्य करूं लागले. त्यांचे वौंशांत पादशाहाती करूं लागले. ते सुभे :—

१ हैदराबाद भागानगर, सरकार दारुल खिलाफत.

१ दौलताबाद खुदस्ते बुनियाद, हल्ली अवरंगाबाद.

१ महमदाबाद—वेदर बिजापुराखालीं.

—

३

१ बिजापूर, दारुल जफर.

१ सुफे आलजपुर,[7] वराड.

१ सुभे गोंडवण, नागपुर चांदे.

१ सुभे खानदेश.

—

३

१. 'सेवा करावी', 'सेवक म्हणवूं' २. 'पराक्रमें शाहा नांव जालें' ३. 'अनागोंदी' ४. 'राजाचा' ५. 'राजा' ६. 'गेला.' ७. 'आलनपुर'

हे दक्षण साडेसाहा सुभे. यांचे पोटीं महाल, प्रांत, तालुके, किल्ले, देश दुर्ग आहेत. त्याप्रमाणें साहा जण वांटून वेदर विजापुराखालींच घेतलें. साहा पादशाह मोठे प्रतापी होऊन २७५ वर्षेंपर्यंत, कोणी २५० ऐसें पादशाही करते जाले.

**सिसोदे वंशानें १६८० वर्षे राज्य केलें.**

कलियुग प्राप्त जाले असतां सूर्य व सोमवंश या कुळांचे ठायीं राजपुत्र रजपूत असें म्हणवून मोरे, पवार, यादव, जाधव, कछवे, तुवर, जाट, ऐसे म्हणवून क्षत्रियधर्म करून राज्य करीत आले. तुवर, मोरे, पवार, चव्हाण यांणीं इंद्रप्रस्थीं-हस्तनापुरीं राज्यें केलीं. कछवे जयपुरीं राज्य करितात. जोदपुरीं वळींचा वौंश म्हणून राज्य करितो. बुंधेलखंड गोहद प्रांतीं यादव सोमवंशी राज्य करितात. सूर्यवंश कुळीच्या ठायीं सिसोदे[१] राजपुत्र हे कोशलदेश अयोध्या प्रांतीं राज्य करीत असतां त्यांतून कोण्ही पुरुष दक्षणप्रांतीं येऊन अश्वत्थामाचें स्थान अशेर[२] म्हणतात तेथें कलियुग गतकली पंधराशें[३] वर्षें गेलीं, या समयांत येऊन राज्य आक्रमण करून नर्मदा दक्षणतीर विंध्याश्री[४] व सर्व दक्षणप्रांतींचें राज्य करीत आले. तो सुमारें सोळाशें ऐंशी वर्षें त्या वौंशानीं राज्य तेथें केलें. तों एकतीसशें ऐंशी वर्षें कलियुगाची जालीं. ते समयीं शालिवाहन राजा शककर्ता जाला. त्यानें प्रमादीनाम संवत्सरीं प्रतिष्ठानीं युद्ध करून राज्य हरण केलें.

**चित्रकूट-चितोड**

ते समयीं एक राजपत्नि व एक राजपुत्र पांचसात वर्षांचा राहिला, तो घेऊन नर्मदा-उत्तरतीरीं, मेवाड प्रांतीं, विंध्याश्री[४] पर्वताचे ठायीं गेलीं आणि आपण राजस्त्री व हा राजपुत्र बोलाखला[५] करून एका ब्राह्मणाचे घरीं पुत्रास गाई राखण्यास ठेऊन त्याचे आश्रयानें राहिली. त्यानंतर गोरक्षण करून त्या पर्वतांत असतां त्या मुलास एक लिंग श्रीसदाशिवाचें अकस्मात्, अपूर्व दिव्य, असें दृष्टीस पडलें. त्याणें ती जागा नीट करून, त्या लिंगास नित्य दुग्धाभिषेक करून, स्नान घालून, अरण्यांतील अरण्यपुष्पें व बिल्वदळें करून पूजा करावी, चंदनवृक्ष तोडून गंध करावें, फळें मिळवून नैवेद्य करावा, प्रातःकाळपासून सायंकाळपर्यंत लिंगाचें आराधन, पूजन, सेवा करावी, गाई अरण्यांत सोडाव्या, त्या गाईंनीं सायंकाळीं आपण होऊन पुन्हां त्याजपाशीं यावें, ते घेऊन ब्राह्मणाचें घरीं यावें, याप्रकारें सदाशिवांनीं, त्याची सेवा बहुत निष्ठेनें जाली हें पाहून श्रीसांब प्रसन्न होऊन साद्दश्य जाले. त्यांनीं वर दिल्हा

---

१ 'शिसोदे पिठोर प्रभु' २. 'अशीरी' ३. '१५०० प्रमादीनाम संवत्सर युधिष्ठिरशक पंधराशें वर्षे गेला या समयांत' ४. 'विंध्याद्री', 'विंद्याद्री.' ५. 'हा खेद करून', 'ओळखीचा ?'

कीं, "पर्वतांतील मेवाड प्रांत याचें राज्य तुजला नवें[1] दिलें. तूं म्हावौंसीचा[2] रजपूत राजा आहेस. ज्या ब्राह्मणाचे घरीं राहातोस तोच ब्राह्मण अनुकूल होईल व द्रव्यही अमुक स्थानीं[3] आहे हें घेऊन राज्य साध्य कर. धर्मे करून प्रजापालन कर." ऐसें वरप्रदान जालें, व त्या ब्राह्मणासही स्वप्नगत द्रुष्टांत जाला कीं, तुझ्या गाई राखितो हा राजपुत्र आहे. यास मी त्याचे भक्ति करून[4] प्रसन्न होऊन मेवाड-राज्य दिल्हें. त्यास तूं अनुकूल होऊन त्यास सांगितलें ते स्थानीचें द्रव्य घेऊन, राज्य साध्य करावें." याप्रमाणें द्रुष्टांत होतांच त्या ब्राह्मणांनीं त्या राजपुत्रापासून गोरक्षण मना करून, द्रव्य सांगितलें तें काढून, आपण त्याचें पुरोहितत्त्व घेऊन, त्या पर्वतामध्यें उत्तमस्थान श्रीभवानीचें होतें तेथें किल्ला बांधिली. त्याचें नांव चित्रकूट असें ठेविलें. त्यासच चितोड असें म्हणतात. ती भवानी देवी व एकलिंग[5] यांचीं परमभक्तीनें कुलदैवत स्थापून सर्व राज्य प्रांत आक्रमण केला. भिल्ल राजे होते ते प्रतिकूल, त्यांस मारिलें; अनुकूल ते रक्षून आपले असे करून स्थापिले. श्रीएकलिंग-सांब यांचें देवालय तीर्थ बांधिलें. श्रीचितोड भवानीचें देवालय बांधिले. त्यांची पूजा-अर्चा यथास्थित चालावी असें स्थान[6] करून देऊन, एकलिंगजीचें राज्य आणि आपण सेवक दिवाण, ऐसें करून राहिले. पुढें त्याचा वौंश पांचशें वर्षे त्या अन्वयें राज्य तेथेंच करिता जाला. तो शालिवाहन शक ५१२ वर्षे जालीं.

### पद्मिणीस्त्रीमुळें राज्य गेलें

ते समयीं पिठोर राजा याजपासून इंद्रप्रस्थाचें राज्य सुलतान रुकद्दीन याणें घेऊन, दिल्ली असें नांव ठेवून पादशाहात करूं लागला. त्याचे वंशानीं याशीं बहू वेळ युद्धें केलीं. परंतु बहुत पराक्रमें आपलें राज्य रक्षून राहिले. त्या वौंशांत धर्मिष्ठ व पराक्रमी राजे थोर थोर जाले. वरकड जयपूर, जोतपूर वगैरे यांजवर पादशाहांनीं स्वाऱ्या करून जेर केले. तेव्हां त्यांणीं कन्या पादशाहास देऊन डोले पाठवूं असें कबूल केलें; आणि पादशाहाचें नांव शिक्क्यांत घालून, सेवक म्हणवून, त्याचें निशाण माही-मरातब नालकी घेऊन, त्याचे म्हणवून, राज्य रक्षून राहिले. एक याणें मात्र आपलें राज्य व हिंदुधर्म पृथक् रक्षून गोवध बांग मुलाणा यांणीं राज्यांत न द्यावी असें रक्षून, चाकर न म्हणवणें; निशाण शिक्का आपला; असे अटीनें राहिले. त्यांणीं स्वारी करून उपद्रव केले असतां पर्वतांत जावें, पुन्हां राज्य सोडवावें, ऐसें करीत आले. श्री एकलिंगजी सांब व चितोड भवानी देवी यांची भक्ति करून, राज्य रक्षण करीत असतां, त्या वौंशांत एक हजार बारा शालिवाहन शक प्रमोद संवत्सर यांत श्री गडमंडळ[7] मेवाड येथें लक्ष्मणसिंग[8] महाराणा म्हणोन

---

१. 'जय' २. 'महावंशीचा.' ३. 'स्थळीं', ४. 'भक्तीनें करून' ५. 'एकलिंगजी.' ६. 'स्वास्थ्य.' ७. 'गडमंडळीं.' ८. 'लक्ष्मणसिंहजी.'

जाले. त्यांणीं सिंहलद्वीपींहून पद्मिणी स्त्री आणिली. हें वर्तमान दिल्लीचे पादशाहास कळलियावरि [ त्यांणीं स्वारी करून ] चालोन चितोडावर आले. दाहा बारा वर्षें मोहीम करून बसले. युद्धें नानाप्रकारें जालीं. कालवशें करून[1] जेरदस्तींत आणिलें. तेव्हां क्ट[2] करून चौदाशें सिसोदे रणांत केशरी पोशाख करून चालून जाऊन पडले. स्त्रिया मारिल्या. त्यांत एक राजस्त्री [ आपले ] दोन पुत्र एक आरससिंहजी महाराणा व एक सजणसिंहजी महाराणा ऐसे भिल्लांकडे घेऊन गेली. किल्ला चितोड पादशाहानें घेतला. राज्यही घेतलें. सर्व राजचिन्हें, दौलत नौबत लुटून घेऊन पादशाहा गेले.

## प्रतिज्ञा : ताटांत भोजन, पलंगावर निद्रा, श्मश्रू नाहीं !

नंतर पुन्हा आरससिंह[3] व सजणसिंह यांणीं वयस्क होऊन राज्य सोडवून, चितोड घेऊन, आपण राजनगर म्हणवून दुसरा किल्ला करून राज्य आक्रमिलें. चितोडचा दरवाजा पंचरसी होता तो पादशाहानें काढून नेऊन आगरे[4] अकबराबाद येथें लाविला व नौबत नेली ती खाजासाहेब पीर संस्थान अजमेर, येथें पिरास ठेविली.[5] आणखीही दौलत, राजचिन्हें गेलीं, याजमुळें [ महाराणे यांनीं ] प्रतिज्ञा केली कीं, " जे समयीं दिल्लीचे यवनाचें पारिपत्य करून आपली नौबत व दरवाजा व चिन्हें सोडवावीं ते समयीं चितोडची पायरी चढावी; तोंपर्यंत निशाणें मागें चालवावीं, ताटांत भोजन करूं नये, पलंगावर निद्रा करूं नये, श्मश्रू करूं नये, जिलिबींत सिंदीचे फड[6] चालवावे. " ऐसे नेम करून ठेविले. याप्रकारें आरससिंहजी यांचे वौंश दोनशें वर्षेपर्यंत जागां जागां किल्ले महालाईत करून वस्ती केली. नंतर उदेपूर शहर किल्ला करून, तेथें त्यांचा वौंश याप्रमाणें नेम चालवून, यवनाशीं द्वेश करून, त्याचे न म्हणवितां राज्य रक्षून मोठे प्रतापें श्रीएकलिंगजी सांब व श्रीचितोडभवानी [ यांची ] भक्ति करून राज्य हा कालपर्यंत करीत आहेत. त्यांचा वौंशीं हल्लीं भीमसिंहजी महाराणा राज्य करीत आहेत.

## यवनाचा उपद्रव म्हणून दक्षणप्रांतीं आले.

श्री महाराणा सजणसिंहजी हें राज्य सोडून अलीकडे सोंधवाडा[7] म्हणून प्रांत आहे, तेथें संस्थान राजधानी करून त्याचे वौंश तेथें राज्य करीत आले. सजणसिंह यांचे पुत्र दिलीपसिंह महाराणा, त्यांचे पुत्र सिंहजी महाराणा, त्यांचे पुत्र भोसाजी महाराणा, ऐसे चार पुरुष राज्य तेथें करीत, तों यवनांचा उपद्रव जाला, याजमुळें त्या वौंशांतील एक घर तेथें राहून शालिवाहन शके बाराशें बहुधान्यनाम संवत्सर यांत दक्षणप्रान्तीं आले. एक पुरुष आरससिंहजी यांचे

१. ' त्यांणीं. ' २. ' कट ' ३. ' आरसी ' ४. ' आगरे वारुणावत नगर ' ५. ' दिली ' ६. ' फडे '. ७. ' शिसोधेवाडा '

घराण्यांतील कछभूज प्रांतीं जाऊन मोठे पराक्रमें तें राज्य सोडवून करिते जाले. हल्लीं राज्य सिसोदे करतात.

सजणसिंह यांचे घराण्यांतील एक पुरुष हिमालयांत नेपाळ येथें जाऊन मोठे पराक्रमें राज्य सोडवून, पर्वतांतील चौसष्ट राज्यें घेऊन, किन्नरखंड यासि वाट काढून, पलीकडे एकदोन राजे यांजवर स्वारी केली. ते समयीं लहंबा[1] गुरु म्हणून सहस्रावधी वर्षांचे पुरुष मधें आहेत, त्यांणीं यांसि सांगून पलीकडील खंडाची मर्यादा रक्षावी म्हणून तह करून दिल्हा. ऐसे महान प्रतापी राजे जाले. हल्लीं त्याचे वौंश वीर विक्रमसिंह समशेर जंग बहादूर या नांवें राज्य करितो.

## भोसले कुलोत्पत्ति : तुळजापूर भवानी

भोंसाजी महाराणा यांचे पुत्र देवराजजी महाराज दक्षणप्रांतीं आले. ते भोसावंत 'भोसले' ऐसें म्हणवून गंगा व भीमातीरीं पाळेगारी करून, जे समयीं जसा प्रसंग पडला तसे राहात. दिवसेंदिवस यवनाचें प्राबल्य बहुत, याजमुळें देशमुख्या व पाटिलक्या करून श्रीसिंगणापूर महादेव हाच एकलिंग कुलस्वामी व श्री तुळजापूर भवानी हीच चितोडदेवी कुलदैवत असें जाणून परमभक्ति करून सिंगणापुरची पाटिलकी साध्य केली. खानवटें, हिंगणी, वेरडी, देउळगांव वेरूळ, वावी, मुंगी, ऐसी वृत्ती साध्य करून त्यांचा वौंश परम धर्मशील, शूरप्रतापी असा होत गेला. त्यांच्या मुख्य वौंशीं वौंशधर जाले ते :—श्रीलक्ष्मणसिंहजी महाराणा यांस दोन पुत्र—एक आरससिंह महाराणा, एक सजणसिंह महाराणा. १ श्री सजणसिंहजी महाराणा मूळ पुरुष १. त्यांचा पुढें वौंश—

२. दिलीपसिंहजी महाराणा
३. सिंहजी महाराणा
४. भोसाजी महाराणा, याजपासून भोंसले उपनांव.
५. देवराजजी महाराणा
६. इन्द्रसेनजी महाराणा
७. शुभकृष्णजी महाराणा
८. रूपसिंहजी महाराणा
९. भूमींद्रजी[2] महाराणा
१०. धापजी महाराज
११. बरहाटजी[3] महाराज
१२. खलोजी महाराज, यांस खलकर्ण म्हणत होते.
१३. कर्णसिंहजी महाराज, यांस जयकर्ण म्हणत.
१४. संभाजीमहाराज
१५. बाबाजी महाराज ऊर्फ शिवाजी महाराज

याप्रमाणें राणाजीचे वौंशांतून[4] देवराजजी महाराज दक्षणेंत आले. दक्षणेंतील

१. 'लहेबा', 'लहंब' २. 'रूपसिंहजी' ३. 'हटजी', 'बरबटजी'
२. 'राणाजीची घरांतील वंशांतून'

धर्म-उच्छेद जाला. ब्राह्मणांस पीडा बहुत, गोवध अपरिमित; देवस्थानें, क्षेत्रें, वेद, यज्ञयागादि [ यांचा ] उच्छेद जाला. दिल्लीपति याणें हिंदु राजे यांचे तहामुळें बहुत देव-धर्म-उच्छेद[1] केला नाहीं. परंतु साहा यवन यांणीं फार अमर्यादा केली. ते ईश्वरास न साहे, व दाहा सहस्र वर्षें कलियुगांत वेदधर्म राहावा, दक्षणेंत कावेरीतीरीं[2] कृष्णातीरीं तुंगातीरीं विशेष राहावा, हें पुराणप्रसिद्ध; त्यायोगें सिसोदे, भोंसले राणाजी इकडे आले; त्यांचे कुळीं पुन्हां अवतार होऊन धर्मस्थापना घडावी ऐसा उदयकाळ प्राप्त होऊन संभाजी महाराज यांचे उदरीं चवदाशें पंचावन्न विजयनाम संवत्सर या शकांत बाबाजी राजे परमभले धर्मशील, देवब्राम्हणभक्त दानधर्मशील व संभावित होते जाले. सिंगणापूर शंभू[3] व तुळजापूर येथील श्रीभवानी कुलदैवत यांची भक्ति बहुत करते जाले. त्या योगें त्यांचे उदरीं मालोजी राजे वडील पुत्र, कनिष्ठ विठोजी राजे, शके, १४७५ चौदाशें पंचाहत्तर प्रमादीनाम संवत्सरीं या शकीं उत्पन्न होते जाले. त्यापूर्वी मालोजीचा जन्म शके १४७२ साधारण संवत्सरीं जाला. त्यांत कनिष्ठ विठोजी राजे यांस आठ पुत्र उत्पन्न समयें-करून जाले. त्यांचा विस्तार निराळा लिहिला आहे.

### नगरचा पीर पावला : शहाजी–शरीफजी जन्म

मालोजी राजे बहुत चतुर, पुण्यशील, देवाचे ठायीं भक्तिवान, सर्व विद्यासंपन्न जाले. आणि आपण स्वतां पराक्रम करावा म्हणून चौदाशें नव्याण्णव ईश्वर संवत्सर या शकांत लुकजी जाधवराव याचे विद्यमानें दौलताबादचे पादशाहापाशीं घरचीं घोडीं लोक बारगीर ठेवून सरदारी करिते जाले. त्यांस निंबाळकर यांची कन्या दिली. तिचे नांव दीपाबाई ऐसें ठेविलें. चाकरीमुळें वेरूळ–पाटीलकीचें गांव–येथें राहिले. कुटुंबासहवर्तमान असतां विठोजी राजे यांस पुत्रसंतान[4] जालें. आपणांस संतती नाहीं त्याकरितां[5] दीपाबाईनें बहुत नवस देवधर्म अनुष्ठानें केलीं. त्यांत नगरचे पीर शाहाशरीफ बहुत चमत्कारिक आहेत. त्यांस नवस केला, ' पुत्र जाले म्हणजे तुमचें नांव ठेऊं.'

ईश्वर[6] प्रसन्न होउन प्रथम पुत्र शके १५१६ जयनाम संवत्सरीं जाला. त्यांचें नांव शाहाजी राजे ठेविलें. तदनंतर दुसरे पुत्र जाले. त्यांचें नांव शरीफजी ठेविलें. त्यांत शाहाजी राजे रूपेंकरून परम सुंदर, वय पांच वर्षांचे असोन बोलणार चतुर, घोड्यावर बसणें, शस्त्रविद्यादि सर्व करण्याचा हव्यास, याप्रमाणें गुणसंपन्न होते जाले. पूर्व-ब्रह्मसूत्रयोगें जाधवराव यांस शके १५१८ यांत कन्या उत्पन्न जाली.

१. ' धर्म-उच्छेद ' २. ' गोदावरी तीरीं ' ३. ' शिकर शंभू ', ' शिखर शंभू ' ४. ' पुत्र झाले ' ५. ' म्हणोन संतानवृद्धी व्हावी यास्तव ' ६. ' ईश्वरसत्तेनें '

शाहाजी राजे गुणसंपन्न पाहून मालोजी राजे त्यांस बराबर घेऊन हिंडूं लागले. मालोजी राजे यांणीं पादशाहींत कामेंकाजें केलीं. दिवसेंदिवस योग्यता वाढत चालली.

## ' उभयतां जोडा योग्य दिसतो ! '

तों कोण्हे एके दिवशीं लुकजी जाधवराव देशमुख, सरकार दौलताबाद, सिंदखेडकर, निजामशाई मनसबदार याणें शिमगा प्राप्त जाला त्यास पंचमीचा रंग खेळावयाचा समारंभ करून, सर्व मातबर [ लोक ] बोलावून आणून नाचरंगाचा समारंभ आरंभिला. त्यांत सर्व आप्तविषयी वगैरेंत मालोजी राजे यांस बोलावून नेलें. त्यांणीं शहाजी राजे बरोबर नेलें. शके पंधराशें एकवीस विकारीनाम संवत्सरे या शकांत. तेव्हां शाहाजी राजे परम सुंदर, गुणवान पाहून आपलेजवळ जाधवराव यांणीं बसविले. जाधवराव यांस कन्या एकच तीन वर्षांचीं, ती सभेंत आली. तिजलाही जवळ बसविलें. उभयतांही सुंदर, समान वय पाहून जाधवराव बोलिले जे– ' मुली, तुजला हा भ्रतार पाहिजे कीं काय ? उभयतां जोडा योग्य दिसतो. ' याप्रमाणें हर्षेंकरून त्यांचा त्यांचा जन्मांतरयोग, ईश्वरीसूत्र होणार तदनुरूप जाधवराव यांचे चित्तांत येतें जालें. उभयतां मूलस्वभावें करून एकमेकांवर रंग गुलाल टाकिते जाले. त्या समयीं सभेंत आप्तवर्ग बसले [ होते ] तेही हास्य करून ' जोडा योग्य, युक्त आहे ' असें बोलिले. तेव्हां मालोजी राजे सर्वांस बोलिले जे, " जाधवराव आमचे व्याही जाले. त्यांचें बोलणें सर्वांनीं तुम्हीं ऐकिलेंच आहे. " म्हणतांच सर्वांनीं ' प्रमाण आहे ' ऐसें बोलिले. जाधवराव उत्तर न करितां स्तब्ध राहिले.

## ' याउपरि भोजन लग्नसमयींच ! '

याप्रकारें समारंभ जालियावर दुसरे दिवशीं जाधवराव यांणीं सर्वांस भोजनाचें आमंत्रण केलें. राजे यांसिही केलें. तेव्हां यांणीं उत्तर केलें. ' आम्ही तुम्ही व्याही जालों. याउपरि भोजन लग्नसमयींच होईल. ' ऐसें जालें असतां हें वर्तमान जाधवराव यांचे स्त्रीस कळलें. तेव्हां त्यांणीं जाधवराव यांस " सोयरीक या मुलीस करणें ते मातबर मनसबदार पाहून. हे कन्या[1] बहुत समारंभें, ज्याचे घरीं फार दौलत, वस्त्रें, अलंकार तेथें द्यावयाची. आपण सभेंत बोललां हें अनुचित. यांस देणें आमचे चित्तास येत नाहीं. " म्हणून आग्रह धरिला. ते समयीं जाधवराव ' आम्ही स्वाभाविकपणें बोलिलों. वचन कांहीं गुंतलें नाहीं ' ऐसें स्त्रीचें समाधान करून राजे यांस निरोप पाठविला कीं, " शरीरसंबंधाची गोष्ट आपण बोलूं नये. आमचे घरांत कोणाचे विचारास येत नाहीं.[2] ब्रह्मसूत्र असेल तेथें घडेल. " त्याचें उत्तर राजे यांणीं सांगून पाठविलें जे– " इतकी सभा समक्ष असतां[3] आपण बोललां

---

१. ' कन्यादान ' २. ' विचारेस घडत नाहीं. ' ३. ' इतके समक्ष सभा असंभाव्य असतां '

तें अप्रमाण कैसे होईल? आम्हांस हें जरूर कर्तव्य आहे." ऐशी परस्परें आग्रहाचीं बोलणीं वाढत चालिलीं. मध्येस्त रीतीनें निश्चयात गोष्ट न ये. दुराग्रह दोहींकडे वाढला. ऐसा प्रसंग प्राप्त जाला.

### परित्राणाय साधुनाम्

[ असा ] आग्रह करून राजे बहुत प्रयत्नास लागले. श्रीदेवीची प्रार्थना करिते जाले. शके १५२५ शोभकृतनाम संवत्सरे माघ शुक्ल १५ पौर्णिमा, ते दिवशीं दैवयोगेंकरून आपला वेरूळचा बागमळा होता तेथें एकटेच जावें असें मनांत येऊन जाते जाले. अस्तमानसमय जाला. ते समयीं एकाग्रचित्तें, "जाधवराव यांचा आपला कलह श्री कसा सिद्धीस नेहील? आम्हांस भाग्य नाहीं म्हणून वचनें केलीं. सोयरीक दुसरियास देणार तेव्हां पुरुषार्थच काय उरला? याहून मरण श्रेष्ठ." असे चिंताग्रस्त असतां अकस्मात श्री देवी भगवती स्त्रीरूपें परम लावण्य, शुभ्रवस्त्रपरिधान, नानाप्रकारचे सुवर्णरत्नालंकारभूषणें करून युक्त, भाळीं कुंकूमळवट,[१] नासिकीं मुक्ताफळ देदीप्यमान, ऐसें दर्शन देती जाली. ती अवलोकन करून नेत्र झांकले, भयशंकित होऊन भ्रांतिगत दिशा जाली असतां, भगवतीनेंच आश्वासन दिलें, "मी देवी आहें. तूं भय पावूं नको. सावध हो. तुझा भाव शुद्ध जाणून तुजवरि कृपा करावी म्हणोन प्रसन्न होऊन दृश्य जालें. तुझे कुळीं श्रीसांब अंशें करून अवतार घेऊन धर्मस्थापना करणार. देवब्राह्मणांस पीडा जाली आहे, ती दूर करणार[२]. याजकरिता तुजवर प्रसन्न जालें.[३]" म्हणतांच यांणीं साष्टांग नमस्कार घातला. अंजुली जोडून खाली पाहात उभे हर्षें गदगद रोमांच [ युक्त ] होऊन राहिले. ते समयीं श्री भगवतीनें वरप्रदान दिल्हें कीं, 'तुझे वौशीं अवतारपुरुष शककर्ता निर्माण होईल, तो दुष्टांचा संहार करून धर्मरक्षण करील. तुझे वौशीं सत्तावीस पुरुष राज्य करतील' असा वर देऊन जवळ वारूळ होतें 'त्यांत द्रव्य विपुल आहे तें घेणें. तुझें मनच्छित प्राप्त होईल[४]' असें सांगून अदृश्य जाली.

### श्रीगोंद्यांत 'श्री' नेऊन ठेविलें !

त्यानंतर राजांची भ्रांती जाऊन देवीचा साक्षात्कार जाला असतां आपण विस्मृति पावलों, भाषण केलें नाहीं, म्हणून बहुत व्याकुलता, व श्रीची प्रसन्नता जाली, दर्शन जालें, या हर्षें कृतकृत्यता मानून उठणें घरास जाणेंचें विसरले. प्रहर रात्र जाली असतां विठोजी राजे यांणीं मालोजी राजे अद्याप कांहीं आले नाहींत म्हणोन समाचारास सेवक पाठविले. तों राजे अरण्यांत, बागेंत आहेत,

१. 'भाळीं कुंकम' २. 'ती दूर जाली पाहिजे' ३. 'प्रसन्न होऊन दृश्य झालें' ४. 'मनोरथ सिद्धीस जातील'

येण्याचा मनोदय नाहीं, म्हणोन सेवक गेले होते त्यांणीं येऊन कळविलें. त्याजवरून आपणच निघोन बागेंत गेलें. ते समयीं त्यांजवळ श्रीचा प्रसाद साक्षात्कार जाला हें वृत्त संपूर्ण सांगितलें. तेही बहुत हर्षायमान होऊन रात्र फार जाली, घरास चलावें म्हणोन बोलिले, आणि घेऊन आले. त्याजवरि दुसरे दिवशीं श्रीनीं वारूळ दाखवून द्रव्य सांगितलें तेथें जाऊन आहे–नाहीं पाहावें; परंतु द्रव्य साध्य जालियास कसें आणावें, कोठें ठेवावें; राज्य यवनांचें; द्रव्य जाऊन प्राण व प्रतिष्ठा दोनीही जाणार, ऐसें चिंतन केलें. तों ते दिवशींचे रात्रीं द्रुष्टांत जाला कीं, "तूं भय कां पावलास? मी प्रसन्न होऊन द्रव्य दिल्हें, त्यास विघ्न कदापि होणार नाहीं. द्रव्येंकरून दानधर्म कर. संपन्नता विशेषाकारें वाढेल. भयच वाटत असल्यास द्रव्य काढून श्रीगोंदें येथें शेषावा नाईक पुंडे[1] त्रिवर्ग बंधु[1] परम भले द्रव्यवान आहेत, त्यांचे घरीं ठेवावें; तो तुझें द्रव्य ठेवून तुजला पाहिजे तसें देईल." याजप्रमाणें द्रुष्टांत जालियावरि मालोजी राजे यांणीं बंधूस हें वर्तमान सांगून, तिसरे दिवशीं रात्रीस उभयतां बंधू[2] व विश्वासू माणसें दोन चार घेऊन वारुळासंनिध जाऊन खणावयासि लागले. तों आंत मोठा भुजंगसर्प पाहिला. ते समयीं सर्वेही भयाभीत होऊन पळाले. आणि मालोजी राजे त्या सर्पापुढें दूर उभे राहून हात जोडून प्रार्थना केली कीं, "श्री देवींनीं येथें द्रव्य मजला दिल्हें,[3] तें प्रमाण आहे. तरि तुम्हीं कृपा करून द्यावें, स्थळ सोडून जावें," म्हणतांच सर्प निघोन गेला. नंतर यांणीं खाणून सर्व द्रव्य घेऊन आले. ते दिवशीं घरीं येऊन[4] ठेऊन विचार केला जे– 'श्रीगोंद्यांत श्रीनीं सांगितलें तेथें नेऊन ठेवावें.' म्हणोन शेषावा नाईक यांचे घरीं गेले. त्यांणीं यांस पाहातांच बहुत सन्मानयुक्त नेऊन बसविलें, 'कां आलेत' असें विचारलें. एकांतास घेऊन गेले. त्यांसही द्रिष्टांत जाला होता कीं,- "याचें द्रव्य ठेऊन घेऊन पाहिजे तसें देत जावें." हें वर्तमान राजे यांस त्यांणीं सांगितलें. नंतर राजे यांणीं द्रव्य ठेवावयाचें तें त्यानें मान्य केलें. घरीं ठेऊन आदरें करून, जेवण जालियावरि "तुम्हांस श्रीनीं द्रव्य दिल्हें, तेव्हां भाग्योदयच तुमचा दिसतो. उत्तम आहे. तुम्हांस दौलतराज्य प्राप्त जालियावर तुमची पोतेदारी वतनी आम्हांस परंपरागत करून द्यावी." ऐसें बोलिलेयावर मान्य करून परस्परें आण-शपथ करून घरास आले आणि द्रव्य नेहून त्यांचे घरीं ठेविलें.

### दानधर्म व सत्कीर्ति

श्रीचे वरेंकरून आपलें घरीं द्रव्य जालें. त्याप्रभावेंकरून दिवसानदिवस अधिकच योग्यता वाढली. सर्वांसही मान्यता, जेथें जावें तेथें हे थोर आहेत, असें उदितभाग्य वाढूं लागलें. निजामशाही चाकरी करीत होतेच. घरीं घोडे आणखी

१.१. 'पुंडे' २. 'बांधव' ३. 'सांगितलें.' ४. 'घरींच.'

खरेदी करून पागा वाढविली. हजारपांचशें केली. श्रीशिखर महादेव येथें चैत्रीं यात्रा बहुत येणें, उदक नाहीं, यात्रेस फार श्रम होतात [ असें ] जाणून मोठें विस्तीर्ण[1] तळें बांधिलें. त्यांत उदक अपर्मित राहूं लागलें. याजमुळें यात्रेस फार सुखावह जालें. श्रीवेरूळ येथील घृष्णेश्वराचें देवालयाचा जीर्णोद्धार केला व शिवालय तीर्थ बांधलें. ऐसे जागां जागां देवालयें व क्षेत्रीं धर्मही[2] देवीचे आज्ञे-प्रमाणें करिते जाले. आणि जाधवराव याचें शरीरसमंधाचा प्रयत्न कसा करावा हें बहुत चिंतन लागलें.

## पंचहजारी मनसब : विवाह

त्यानंतर निंबाळकर अनुकूलसाह्य करून वर्तमान पादशाहास श्रुत केलें कीं, " जाधवराव यांचें आमचें सर्व सम्मत या रीतीनें बोलणें जालें असतां, ते आग्रहास पडून, शरीरसमंध करीत नाहीं म्हणतात. " तेव्हां पादशाहांनीं जाधवराव यास आज्ञा सांगून पाठवली कीं, ' भोसले यांचा तुमचा करार शरीरसमंधाचा जाला असतां आग्रह करितां तो करूं नये. मूल द्यावी. ' त्याजवरून जाधवराव यांणीं अनमान करून उत्तर पाठविलें. तेव्हां ' अनमान काय निमित्तें करतात, ' हें विचारावयास पाठविलें. त्या समयीं " यांचें भाग्य, वैभव आमचे बराबरीचें नाहीं, वरकड शरीरसंबंधीच आहेत. आमचें घरांत सर्वांचे विचारें[3] समान स्थल पाहून कन्या द्यावी, ऐसें आहे. " तेव्हा[4] पातशहाचे मनांत आलें कीं, " आम्हीं सांगितलें असतां आग्रह करितात. त्या अर्थें मालोजी भोसले यांस त्याजहून सवाई मनसब देऊन ही गोष्ट करावी. भोसले मनसब द्यावयास योग्य व शूर. कामेंकाजेंही केलीं आहेत. " म्हणोन पंचहजारी मनसब, ' राजे ' ऐसा किताब लिहून, शिवनेरी जुन्नर वगैरे तालुके सरंजाम व साहेब-नौबत दिल्ही. जाधवरावांहून भाग्यवान केलें. आणि याउपरि यांचे पुत्रास कन्या द्यावी अशी[5] आज्ञा केली. तेव्हां जाधवराव यास व सर्वांसही हर्ष होऊन पादशहाचे मनोगत व मूलही सुंदर, गुणवान, कुलीन [ म्हणोन ] मान्य करिते जाले. दौलताबादेसच लग्नसमारंभ करिते जाले. शके १५२६ यांत [ लग्न ] केलें. लग्नांत खासा पादशाहा येऊन योग्यता दिली. फारच लग्नसमारंभें-करून, बहुत तरतुदीनें पादशाहास व वरकड वजीर व सरदार यांस [ मेजवान्या ] केल्या. बहुत द्रव्य खर्चिलें. साडे करून त्या मुलीचें नांव जिजाबाईसाहेब ठेविलें.

## दौलतीचे वजीर : महाराज

पुढें कांहीं दिवस गेलियावर पादशाहा वारले. [ त्यांस ] मूल आठ वर्षांचा एक व साहा वर्षांचा एक [ असे ] लाहान होते. मुलांची आई बेगम इणें

१. ' महाविस्तीर्ण ' २. ' देवालय व क्षेत्रीय धर्म हा '. ३. ' विचारास '
४. ' ते समयीं ' ५. ' म्हणून '

कारभारी कोण करावा अशी सारे मनसबदार जमा करून मसलत केली. त्यांत शाबाजी अनंत, 'चतुर' ज्यांस म्हणतात ते होते. त्यांणीं "शाहाजी राजे गुणेंकरून, बुद्धिवान, मर्द, शूर, द्रव्याढ्य, इत्यादि सर्वलक्षण[1]–संपन्न ऐसे पाहून वजिरी यांसच द्यावी तर ही पातशाहात जतन होईल." याप्रमाणें निश्चय करून वेगमेस अर्ज केला. त्यांणींही, 'फारच उत्तम केलें आहे, हेंच कर्तव्य, असा निश्चय[2] करून, शाहाजी राजे यांस वजिरीचीं वस्त्रें दिल्हीं. बहुमान देऊन वजिरी शके १५४१ यांत सांगितली. आणि पादशाहाजादे यांस शाहाजीराजे यांचे मांडीवर बसविलें. 'राजे' ऐसा किताब होता तो 'महाराज' ऐसें पत्रीं लेहूं लागले. याजवरि राजे सर्व पादशाहातीचा आटोप करून शाबाजी चतुर यांचें अनुमतें दौलत चालवूं लागले. याप्रमाणें कांहीं दिवस चाललें.

## द्वेषाग्नि : सासराही सामील

नंतर सारे मनसबदार एकत्र होऊन विचार करिते झाले,–मलिक अंबर, विजापूरचे सरदार, चांगसखान यांचे कारभारी. [चांगसखान] खावंद वारले. त्यायोगें[3] निघोन दौलताबादेस फकिरीवेशें राहिले.[3] "अवलिया दिसतात, परंतु बहुत शाहाणे, कोण्ही मातबर आहे; परीक्षा करून दौलतींत शाहाणे माणूस राहावयाजोगे कोण्ही मातबर आहे." म्हणून फकिरी सोडवून, त्यांस आणून सरंजाम त्यांणीं सर्व यवन यांशीं भेद केला "नांव पादशाहा, परंतु सर्व आक्रम हिंदूंनीं केला, हें चांगलें नाहीं. व शाहाजी राजे वजीर होऊन, धणी त्यांस अनुकूल, बहुत योग्यता वाढली." हें सर्व यवनांस दुःसह्य, व जाधवराव यांस आपणांहून अधीक जाले; वजीर, तेव्हां त्यांचे घरीं जाणें येणें असह्य, म्हणून यवनांचे संमतांत मिळोन समस्त[4] यांशीं द्वेष करूं लागले.

## संभाजी राजांचा जन्म

महाराजापाशीं नारो त्रिमल्ल हणमंते, मजमदार इख्त्यार कारभारी होते. शिवनेरी किल्ला व जुन्नर तालुके वगैरे राजे यांजकडेच होते. त्यालगतीं चाकणचे ठाणें मातबर, त्याखालीं प्रांतही चांगला, जाणून महाराजांनीं आपणांकडे तालुका ठाणेंसुद्धां करून घेतला. घोडप २७ किल्लेसुद्धां चाकणचें ठाणें पूर्वीं बराबर[5] हबशी होता, त्याणें शके बाराशें सोळा जयनाम संवत्सरे, बांधिलें व बावनकसी देवजी मजगा मलकंबरी[6] ऐसें बांधून पाळागारी[7] करून होता. तो मेलियावर तालुका

---

१. 'गुण'. २. 'सिद्धांत'. ३. ३. 'त्याजवरून यागी (योगी?) होऊन विजापूरसें निघोन दौलताबादेला फकिरीवेश धरून राहिले होते.' ४. 'सर्व'. ५. 'बरार' ६. 'बावनकीस मलकरी' ७. 'पाळेगारी'

निजामशाही जाला. त्यासमयीं[1] राजे यांणीं आपणाकडे घेतला. त्याचे बंदोबस्तास दादाजी कोंडदेव कुलकर्णी मौजे मलठण तर्फ पाटस, प्रांत पुणें यांस पाठविलें. जिजाबाईसाहेब यांस प्रथम पुत्र जाला त्याचें नांव संभाजी राजे ठेविलें.

## हिंदुराजाचा कारभार नको !

शाहाजी राजे यांचा द्वेष सर्व कारभारी मनसबदार मातबर करूं लागले. तथापि यांची जड भारी. मनसुब्यांनीं हरएकप्रकारें राजास हारीस आणावें, हें न घडे. ते समयीं हे पादशाहात बुडाली तरी बुडो, परंतु हिंदु राजे यांचा कारभार चालूं न द्यावा, ऐसा सर्व यवन यांणीं कट केला ! त्यांस जाधवराव अनुकूल; आणि दिल्लीस राजकारण करून अलमगीर पादशहा याची फौज मदतीस आणविली. तें राजकारण सिद्ध होऊन [ दिल्लीहून ] मीरजुमला सरदार [ व ] पंचवीसतीस हजार फौज चालून आली. ते समयीं शाबाजी अनंत यांचा व राजे यांचा घरोबा बहुत, त्यांणीं सल्ला दिली, 'पादशाही नोकर निमकहराम होऊन दौलत बुडवितात. तुम्हीं याजउपरि विचार पाहून चालावें.' याजप्रमाणें सांगितल्यावरि राजे यांचें म्हणणें पडलें, 'काय चिंता ? दिल्लीची फौज आली तर मनसबा करून व युद्ध करून पराभव करितां येईल. धणी मात्र कायम पाहिजे' ऐसें हिमतीनें सांगितलें असतां, शाबाजीपंत यांचे सलेस न ये. 'घरफूट चांगली गोष्ट दिसत नाहीं. धणी बायको व मुलें पडलीं. आपलें राजकारणही दुलंग असावें.' त्याजवरून राजे यांणीं नारोपंत मजमदार याचा भाऊ बालकृष्णपंत हणमंते, विजापूरचें राजकारण असावें म्हणून सुलतान शिकंदर पातशाही करीत होते, त्यांचे मुख्य यख्तियारी कारभारी मुरार जगदेव यांसीं भेटविलें. राजकारण सिध्ध केलें. त्यांचाही आदर बहुत पडला जे, "मातबर उमदे सरदार व काबील यांचें राजकारण अनायासें आलें.[2] त्यांस आणून ते पादशाहात क्षीण जाली आहेच, त्यांतील प्रांत[3] आपण साध्य करावा." हें चित्तीं आणून जाहागीर मनसब देण्याचा करारनामा ठरावून दिला आणि वकिलास बहुमान वस्त्रें जवाहीर देऊन राजे यांजकडे पाठविलें.

## विजापूरकरांचा आश्रय

त्यावरि दिल्लीची फौज मीरजुमला घेऊन आला. तेही समीप येऊन पोहोंचली. त्यांस सारे सरदार जाधवराव मलीक वगैरे जमाव करून सामोरे जाऊन ते व हे एक होऊन चालून आले. ते समयीं राजांनीं विचार केला जे :— 'दौलताबाद मैदान मुलुख, यांत लढाई घेणें चांगलें नाहीं.' हा विचार करून कोंकणांत माहुली किल्ला येथें पादशाहा [ व ] बेगमसाहेब यांस घेऊन गेले. नंतर सारी फौज

१. 'उपरीं' २. 'जालें' ३. 'भाग.'

माहुलीस चालून गेली. तेथें साहा महिने सामुग्री तयार करून युद्ध नानाप्रकारें केलें. त्यांत त्या फौजेवरि छापे घालणें व मोर्चे मारणें[1] व लढाई इत्यादीकें फौज बहुत हैराण केली. ऐसें असतां बेगमसाहेब इजकडे राजकारण करून भेद केला. त्याजवरून कची होऊन हिंमत निघोन गेली. जाधवराव यांणीं बुद्धिभ्रंश केला. तेव्हां आपले सारे सरदार यांजकडे राजकारण लाविलें. हें वर्तमान शाहाजी राजे यांस समजतांच खावंद दुलंग जाला याउपरि आपण आग्रह करणेंचें प्रयोजन नाहीं. आपण यांचे म्हणविलें. निमक खाऊन पादशाहात आपलेसाठीं खराब केली, बुडविली, हें [ अपेश ] कशास घ्यावें ? खावंदच त्यांस अनुकूल जाला, त्याचे दैवेंकरून घडणें ते घडो. म्हणून विजापूरचें राजकारण सिध्ध जालेंच होतें, तिकडे जावें, ही पातशाहात सोडावी, ऐसा विचार करून आपली जमियेत, सलतनत, फौज, कुटुंब घेऊन शके १५४८ यांत निघोन चालिले. ते समयीं शरीफजी राजे यांस सरदारी, लोक व सरंजाम निराळा होता, त्यांस तुम्ही तिकडे मिळोन असावें, असें, सांगून ते पादशाहीत राहाविले.[2]

[ इकडे ] जाधवराव फौज कांहीं घेऊन पाठलाग करीत आले. त्यांची मुजाका न धरितां शिवनेरी तालुकियांत येऊन, जिजाबाईसाहेब गुरूदर होतीं,[3] त्याचा बंदोबस्त यथास्थित करून, त्यांस नेणें ठीक नाहीं म्हणून ठेविलीं. बराबर पुत्र संभाजी राजे घेतले. बाईसाहेब यांजपाशीं कारभारी बाळकृष्णपंत हणमंते व संक्रोजी नीळकंठ व सोनोजीपंत व रघुनाथ बल्लाळ कोरडे ऐसे कांहीं सरदार ठेविले. आपण दरमजल चालले. जाधवराव व फौज मागें आली असतां फलटणपर्यंत[4] आले. फौजही पोहोंचली. फलटणीं जगपाळ नाईक निंबाळकर पुंडपणा करून दाहा हजार फौजेचे सरदार, महाराजांचे आप्त, ते हे एक जाले याजमुळें याउपरि आपला परिणाम नाहीं, समजोन जाधवराव व फौज माघारे निघोन गेली. आणि पादशाहा व बेगम यांस दौलताबादेस घेऊन गेले. दिल्लीची फौज कुमकेस आणिली होती, त्याशीं करारमदार होता त्याप्रमाणें देऊन परत लावून दिल्हा. ती निघोन गेली. राजे विजापुरीं निघोन आले. ते समयीं दौलताबादेकडील शिवनेरी वगैरे[5] तालुका होता त्याचा बंदोबस्त करून कायम राखिला आणि विजापुरीं पावले. तेव्हां मुरारपंत सामोरे येऊन आदरें घेऊन गेले. पादशहाची भेट झाली[6]. कराराप्रमाणें कर्नाटक प्रांत बेंगरूळ, होसकोट, बाळापूर व सिरकटे वगैरे तालुका हवाली केला. त्याजवर बंदोबस्तास कारभारी नारोपंत हणमंते पाठविले.[7] दौलताबाद पादशाहींतील मातबर, कर्ते, नामांकित वजीर, सरदार आले. त्यास[8] ते पादशाहाच[9] आक्रम करावयासि

---

१. 'लावणें' २. 'राहिले.' ३. 'जिजाबाई ठेविली होती' ४. 'फळटणकर येथें' ५. 'शिवनेरी व घोडप' ६. 'घेतली.' ७. 'ठेविले.' ८. 'याजउपरि' ९. 'पादशहातच'

येईल जाणोन पादशाहा व मुरारपंत हर्ष मानिते जाले.

### शिवजन्म : अवतारी पुरुष

त्या समयास इकडे जिजाबाईसाहेब गुरूदर म्हणोन शिवनेरी येथें ठेविलीं होती. त्यांस शिवनेरी येथें शिवाईदेवी बहुत जागृत आहे, तिजला बाईसाहेबांनीं नवस केला, 'पुत्र जाला म्हणजे तुझे नांव ठेवीन.' त्या अन्वयें[1] दिवस पूर्ण होऊन प्रसूत सुसमयीं शके १५४९ प्रभवनाम संवत्सरे, वैशाख शु॥ २, गुरुवारीं पुत्र जाला. शुभ चिन्हें जालीं. विजापुरीं महाराज यांस शुभ शकुन जाले. सा ग्रह उच्च[2] पडले. सर्वलक्षणसंपन्न. नांव शिवाजी राजे ऐसें ठेविलें. शाहाजी राजे यांस स्वप्नगत द्रुष्टांत जाला कीं, 'तुझे वौशीं अवतारी पुरुष होणार, तो पुत्र निर्माण जाला.' हें वर्तमान [कळविण्यास] हुजरे, कारकून विजापुरास गेले त्यांस सोन्याचीं कडीं, वस्त्रें बहुमान दिल्हे. आणि बहुत गोप्रदानादि दानधर्म केला. साखऱ्या, मिठाई वाटली. बहुत संतोष होऊन नाच वगैरे समारंभ केला. पादशाहास कळोन त्याणेंही बहुमान वस्त्रें पाठविलीं.[3] याप्रमाणें आनंद जाला.

### द्वितीयविवाह व तंजावरप्राप्ति

नंतर शके १५५०[4] यांत मोहिते यांची कन्या निश्चय करून दुसरें लग्न शाहाजी राजे यांणीं केलें. त्यांचें नांव तुकाबाईसाहेब ठेविलें. त्यांचे उदरीं पुत्र जाला. नांव वेंकोजीराजे ऐसें ठेविलें. आणि जाहागीर बाळापूर-होसकोटें होतें. तिकडे गेले असतां विजयराघव म्हणून चंजावरकर[5] संस्थानीं होते. त्यांस पांचशत स्त्रिया होत्या, त्यांचें व त्रिचनापल्लीचे संस्थानिक याचे कलह वाढले. त्रिचनापल्लीकरानें राजे यांशीं राजकारण केलें जे, "विजयराघव यांजवरि मसलत करावी. त्यांत ठाणें हस्तगत करून आम्हांस द्यावें. फौजेचा खर्च व पांच लक्ष रुपये व लूट आपण घेणें[6]" त्याजवरून त्यांचे कुमकेस जाऊन चंजावरकरावर चालून गेले. विजयराघव [यानें] बाहेर येऊन युद्ध बहुत केलें[7]. ते समयीं महाराजांनीं फौज[8] निवडे घोडे सुद्धां बहुत कजाकीन विजयराघव यांस रणांत मारिले[8]. फौज लुटून ठाणें घेतलें. [तें] संस्थान बहुत चांगलें पाहून आपण बंदोबस्त केला. त्रिचनापल्लीकराचा तह, 'ठाणें आम्हांस द्यावें, द्रव्य घ्यावें,' ऐसा होता. तें, 'द्रव्य आम्हांस नको, संस्थानच ठेवावें,' ऐसें बोलोन आपणाकडे राखिलें.[9] आणि राजधानीस योग्य म्हणोन तेथें कांहीं दिवस राहिले[10].

---

१. 'त्यानंतर' २. 'उच्चक' ३. 'त्यानेंही मुलास दागिने वस्त्रें पाठविलीं.' ४. '१५५२' ५. 'चंदाऊरकर' 'चंजावनूरकर'. ६. 'आपणांस देऊं.' ७. 'जाले.' ८.८. 'फौज निवड करून, घोडे चालवून, बहुत कजाखी करून विजयराघव यांस रणांत मारिलें.' ९. 'ठेविलें.' १०. 'राहते जाले.'

## मलिकपराक्रम

[ इकडे ] दौलताबाद येथें बूसाहेब[1] व साबाजी अनंत व जाधवराव वगैरे मनसबदार यांणीं विचार करून मलिकास वजिरी देऊन ते कारभार चालवीत असतां, दिल्लीची फौज मीरजुमला दौलताबादेस कुमकेस आला होता तो माघारे गेला. त्यास पादशाहा यांणीं बहुत निषेधिला[2] कीं, " दौलताबादची पादशाहात कमकुवत जाली. शाहा पादशाहा म्हणवितात, ते सारें बंड मोडून सुभे सोडवावयाचे ऐसें [ तुम्हांस ] माहित[3] असोन, त्या दौलतींत प्रवेश जाला असतां, सोडून आलां हें नाकारेपण केलें." म्हणून आणखी फौज कुमकेस देऊन माघारे रवाना केले. फौज परतोन आली हें वर्तमान मलिक वगैरेयांस कळलियावरि [ आपली ] फौज जमाव करून चालून गेले. बऱ्हानपुरीं गांठ पडून युद्ध बहुत जालें. मलिकास जखमा लागल्या. फार शर्त केली. दिल्लीची फौज मोडली. पळूं लागली. तिचा पाठलाग करून नर्मदेपर्यंत घालविली. हत्ती, घोडे, मालमवेश लूट घेऊन, यश घेऊन परत आले. फते पावले.

## ते धारे 'मलिकांबरी' अद्यापि म्हणतात.

मलिकाचा शिक्का " बंदे मलिकांबर चांगसखानी[4] " याप्रमाणें होता. प्रांत वगैरे धारे बांधून लावणी केली. ते धारे 'मलिकांबरी' अद्यापि म्हणतात. न्याय मनसुबी हरएक करावी. ऐसें प्रकारें पादशाहात मुलें दाबून आपणच करिते जाले. यामुळें मुरारपंतीं विचार केला जे, " दौलताबादेचे पादशाहाचीं मुलें दाबून मलिक आपण पादशाही करितो, हें ठीक नाहीं; " म्हणोन त्याजवर सरजाखान वगैरे सरदार कांहीं फौज देऊन दौलतबादेस रवाना केले. ते भातोडीचे तलावावर[5] चालून मुकामास गेले. हे मलिकास समजलियावरि तेही चालून आले. युद्ध बहुत जालें. तळें फोडून पाणी बंद केलें. फौज घाबरी जाली. सरजाखान वगैरे सरदार पाडाव करून नेले. फौज लुटली. फते पावले. सरदार नेले त्यांस वस्त्रें देऊन लावून दिल्हे. नामोहरम होऊन विजापुरीं आले.

## अफजलखानाचा दुष्टावा

शहाजी महाराज चंजाउरीं असतां कनकगिरीकर संस्थानिक याणें महाराजाकडील तालुका बाळापूर वगैरे यांत उपद्रव केला. हें वर्तमान समजलियावरि संभाजी राजे, वडीलपुत्र, फौज, कारभारी व सरदार बरोबर देऊन पाठविले. त्या प्रांतीं सरसुभा अफजलखान म्हणून व विजापूरपादशाहाकडून होता, त्याणें कनकगिरीकर

१. 'बेगमसाहेब' २. 'निषेध केला.' ३. 'तुमचे माहितगारींत'
४. 'बंदे दरगाह यबानी मलिकंबर चागसखानी' ५. 'तलावर'

याजपासून कांहीं द्रव्य घेऊन आंतले हातें त्यांस मदत दिली. या युद्धांत संभाजी राजे होणारानुरूप गोळा लागून ठार जाले. याजवरून शाहाजी महाराज चालून जाऊन पाळेगार कनकगिरीकर याचें पारिपत्य केलें. कनकगिरी घेतली. अफजलखान आपले पादशाहींतील असोन ही गोष्ट केली याजवरून वाईट मानोन[1] यांसि नतिजा[2] लावावा[2] तरि पादशाहास मनांत वाकडें भासेल, म्हणोन सबूरी केली. अफजलखान याणें आपली निखालसता दाखविली. तेव्हां प्रसंगें करून पादशाहापाशीं गेल्यावरि पाहून घेऊं. म्हणून टाळा दिला आणि चंजाउरास गेले.

## मलिक याचा मोड करून उखळून काढिला.

या समयांत पादशाहा मुरारपंत यांणीं आपली फौज मलिकावरि गेली ती नामोहरम जाली म्हणून, विचार करून, मातबर सरदार व फौज जमाव करिते जाले. आणि हे मसलत शाहाजी महाराज यांजवांचून सिद्ध होणार नाहीं[3] म्हणून [त्यांसि] येण्याविशीं पत्रें पाठविलीं. तेव्हां महाराज यांणीं तुकाबाईसाहेब [व] वेंकोजी राजे पुत्र तेथें ठेवून आपण विजापुरीं निघोन येते जाले. यानंतर पादशाहा व मुरारपंत यांणीं वर्तमान सांगोन मलिकाचें पारिपत्य करावें हें जरूर, [असें] बोलिले असतां यांसही अवश्यकच जाणून पादशाहा व पंत व माहाराज व बाजे उमराव सर्व बसोन [त्यांनीं] मसलत ठरविली जे, आपली फौज बुडविली याचा सूड यथास्थित घ्यावा; या प्रकारें[4] मनसुबा केला. शाहाजी राजे यांचें मानस, 'मलिक अमर्यादा करून, पादशाहास दाबून पादशाही करितो हें अयुक्त. आम्ही त्यांचें निमक पूर्वीं खादलें आहे त्या अर्थीं यास गर्दीस नेऊन मुलाची स्थापना करावी, हें युक्त आहे.' याजवरून सर्व जमियत एक करून मुरार जगदेवराव व राजे व सर्व सरदार निघून जाऊन मलिकावरि मोहीम केली. मलीकही बमैफौज चालून आले. मार्गी येतां पुणें लुटलें, जाळिलें. कोट पाडून गाढवाचा नांगर फिरविला. त्याची यांची गांठ म्हसवडानजीक पडली. पंत व महाराज अफजलखान व रणदुल्लाखान व सर्जाखान व बाजे सरदार पोख्त सामानानिशीं होते. त्यांणीं तोफा चालवून युद्धास प्रारंभ केला. दोनप्रहरपर्यंत युद्ध केलें. दोहींकडेही मोंगल पठाण आडून[5] उभे राहून अरेतुरेचें जुंझ जालें. शाहाजी महाराज यांणीं हजार दोन हजार धारकरी निवड करून "तुम्हीं शूर, हा समय परीक्षेचा, मलिक बुडविला पाहिजे, आमचे सोबती व्हावें, म्हणजे जसें काम लागेल तसें बक्षीस पावाल," म्हणून घोडे चालवून तरवारा आपणही धारकरी घेऊन केल्या. लोक रणास फार आले. तेव्हां राजे यांस जखमा अंगावरि जाल्या असतां रणदुल्लाखान व अफजलखान यांसि सांगून पाठविलें

१. 'म्हणोन' २. २. 'कांहीं करावें' ३. 'सिद्धीस जाणार नाहीं.'
४. 'म्हणून' ५. 'अडून'

जे, 'ये समयीं सर्वांनीं चालून घ्यावें.' आणि आपण पुढें घोडे घातले. लढाईची शर्त करून तरवार, तोफा व तिरंदाजी चालती जाली. आणि मलीक याचा मोड करून उखळून[1] काढिला. फौज उधळून दिल्ही. पळूं लागले. तेव्हां विजापूरची फौज पाठलाग करीत चालले. मलीक भीमातीरीं[2] नजीक कोरेगांव, पिटला. तों नदीस पाणी चढलें. उतार न सांपडे. ऐसें पाहून मलिकानें नदीस शरण येऊन प्रार्थना केली कीं, 'शत्रूस जिवंत हातीं सांपडणें याजहून हलाल होणें[3] बरें.' म्हणोन आपण उतार जागा पाहून 'या नशीब या ताला'[4] म्हणून, ईश्वराचें स्मरण करून, घोडा पुढें चालविला. तों उतार लागून पार जाले. श्रीनें व भीमा नदीनें मार्ग दिला. मागें सारी फौज उतरोन पैलतीरीं गेली. तों इतक्यांत विजापुरची फौज मागून येऊन पावली. पाहातात तों 'नदीस पूर असंभव्य[5]! मलिक पैलतीरीं पावला!' हें पाहून, "श्रीनें त्यास मार्ग दिला, पार नेलें. याउपरि आपण प्रेत्न करून पाठलाग करणें युक्त नव्हे. बाजदबरसा[6] पाहून घेतां येईल," म्हणोन तेथेंच मुकाम करून राहाते जाले.

### नागरगांव 'तुळापूर' झालें !

[ तेथें ] शके १५५५ श्रीमुखनाम संवत्सरे, भाद्रपद वद्य ३० अमावास्या, सर्यग्रहण, सोमवती ऐसा उत्कृष्ट पर्वकाळ प्राप्त जाला. ते समयीं मुरार जगदेव याणें भीमा–इन्द्राइणी संगमीं नागरगांव येथें जाऊन, त्या स्थळीं पर्वाचे ठायीं तुळा सुवर्णादिकेंकरून बहुत केल्या. धर्म फार केला. ब्राह्मण आले त्यांस व क्षेत्रोक्षेत्रीं तुळेचें द्रव्य पाठविलें. आणि 'नागरगांव' ऐसें नांव होतें तें 'तुळापूर' ऐसें ठेविलें. आणि त्या पर्वकाळांतच तो गांव ब्राह्मणांस अग्रहार करून दिल्हा. राजे यांणीं आपली तुळा सुवर्णद्रव्यें[7] करून केली आणि धर्म केला. त्याप्रमाणें गांव ब्राह्मणांकडे व नांव तुळापूर ऐसें चालत आहे. 'हत्तीची तुळा कशी करावी' म्हणून [ मुरारपंतीं ] मातबर सरदार वगैरे जमा जाले होते त्यांस प्रश्न केला असतां कोणाची कल्पना न चाले[8]. उत्तर दिलें नाहीं. तेव्हां [ शाहाजी ] महाराजांनी उत्तर केलें कीं, 'हत्ती नावेंत घालून, ती नाव पाण्यांत घालून हत्तीचे भारें नाव पाण्यांत जितकी जाईल[9] ती मर्यादा खूण करून नंतर हत्ती काढून द्रव्य त्या सीमेपर्यंत [ नाव ] बुडे ऐसें घालावें, म्हणजे तुळा जाली.' ते समयीं पंत राजे यांवरि बहुत प्रसन्न होऊन संतोषी होऊन तारीफ केली. आणि विजापुरास पुन्हा माघारे जाण्याचा निश्चय केला. याप्रमाणें शिवछत्रपतिजन्मकथन[10] व पूर्वजवर्णन[10] प्रथम प्रकरण समाप्त.

---

१. 'उखटून' २. 'भीमातीरापर्यंत' ३. 'हक होणें' ४. 'या नशीब [ या ] तालें.' ५. 'असा भव्य ?' ६. 'बाद बरसाद' ७. 'सुवर्ण सैन्यादी.' ८. 'कोणी उत्तर न केलें.' ९. 'बुडेल' १०.१०. 'जन्मकथानक'

## प्र क र ण–द्वि ती य

# राज्य-आक्रमण आणि सज्जन-सेवन

### पुत्रास अवलोकन करावें ही इच्छा

श्रीशाहाजी महाराज व मुरार जगदेवराव यांनीं विजापुरास परतोन जाण्याचा निश्चय केला असतां, शाहाजी महाराज यांस, पूर्वीं माहुली किल्याहून दौलताबादेचे पादशाहींतून जाते समयीं जिजाबाईसाहेब गुरूदर निभावणार नाहींत, म्हणून शिवनेरींत ठेविली [ होती ] तेथें [ त्यांस ] शिवाजी राजे पुत्र जाले. महाराज चंजाऊर प्रांतीं जाहागिरींत गेले, ते तिकडेच राहिले. तेव्हां जिजाबाईसाहेब व पुत्र यांचे भेटीस फार दिवस जाले. पुत्राचे सात वर्षांचें वय जालें. त्यांस अवलोकन करावें अशी इच्छा शहाजी महाराजांस जाली. सात वर्षांत सर्व विद्याभ्यास केला. बहुत स्वरूपें-करून सुंदर, गुणवान,[1] लिहिणें, घोड्यावर बसणें, हत्तीवर बसणें, तालिम करणें,[2] शस्त्रविद्या, तिरंदाजी करणें, बंदूक मारणें, व शास्त्र-अभ्यास यांसही प्रारंभ केला. बोलणें व कल्पना-चातुर्य ऐसे बडे गुण श्रवण करून [ महाराज ] बहुत उत्कंठित झाले.[3] त्यांत वडील पुत्र संभाजी राजे युद्धीं पडले [ म्हणून ] राज्यास अधिकारी [ हे. ] संपत्ती मेळविली त्यास हे [ अधिकारी ] व श्रीचा द्रुष्टांतही यांचे जन्मकाळीं जाला, तो पुत्र हा. वरही श्रीचा पूर्वीं जाला आहे. म्हणून बोलावणें पाठवून घेऊन[4] येऊन भेटीअंतीं बहुत दानधर्म व साकरा वाटणें [ असा ] उत्सव केला आणि समागमें घेतलें. नंतर किल्ले व जाहागीर यांचे बंदोबस्तास कारभारी होते तेच ठेविले.

### कौलकरार देऊन लावणी केली, आबादानी केली.

नंतर विजापूरीं आलियावरि मुरार जगदेवराव यानें राजे यांचा पराक्रम पादशाहास निवेदन करून फार तारीफ केली. सन्मान हत्ती, घोडे जवाहीर देऊन पुणें देश, सुपें,[5] बारामती, इंदापुर, बारा मावळें सरंजाम दिल्हा. त्याचा कारभार शिवनेरीं दादाजी कोंडदेव होते त्यांसच सांगितला. त्यांणीं मावळें येथें लांडगे बहुत व शामलाचे उपद्रवें करून उजाडी जालीं होतीं व प्रांतही जागां जागां मोंगली अंमल इजारेयाचा त्याजमुळें पडला होता. त्याचा तह करून, कौलकरार देऊन[6] लावणी

---

१. ‘ गुणवान होत्साते, ’ २. ‘ तालिमखाना, ’ ३. ‘ होते. ’ ४. ‘ घेऊन गेले. भेट झाली. दानधर्मही बहुत केला ’ ५. ‘ बारा मावळे, ’ ६. ‘ करून ’

केली, आणि मावळचे जमेदार मेळवून, मावळे लोक[१] बरकंदाज ठेवून, जो लांडगा मारून आणील त्यास बक्षीस द्यावें, ऐसें करून वस्तीलावणी केली. निमताने वगैरे धारे बांधून कौल दिल्हा. शामलाकडील उपद्रवाचा बंदोबस्त जागां जागां चौक्या लोक ठेवून केला आणि आबादानी केली.

## यावनांचा शिरच्छेद केला असतां पण...

इकडे महाराज शहाजीराजे यांणीं शिवाजीराजे विजापुरीं नेलियावर जैसे गुण ऐकण्यांत आले त्याहून अधिक गुणवान, मसलतींत अकस्मात बहुत चमत्कारिक बोलावें, विद्याभ्यास जो केला तो शीघ्रच प्रयास न करितां साध्य व्हावा, स्वरूपें-करून सुंदर, शरीर–पाटव्य फार चांगलें,[२] सुदृढ, लक्षणवान, दौलतीचे ठायीं हत्ती घोडे, सर्वकाळ कारखाने पाहाणें, कारभारी थोर माणसें शाहणीं यांस माहितगारी विचारणें, त्यांचे सन्मान करणें व चौकशी करणें, लघुमनुष्य दुर्गुणी यांचा त्रास करून त्यांची संगती न करणें, दुर्व्यसन कांहीं एक नाहीं, विशालनेत्र, आजानुबाहू, वयें अल्प असोन प्रौढीनें चालतात असें पाहून फारच हर्षायमान होऊन, " हा पुत्र भाग्यवान होईल, वडिलांस दृष्टांत जाला, वरप्रदान जालें, तो पुरुष हाच होय; व ज्येष्ठ [ होत्साते ] दौलतीचे अधिकारीही हेच, " हा कृतनिश्चय जाले. आणि यांस मुरारपंत[३] व वजीर यांच्या भेटी करणें, बराबर नेणें करिते जाले. महाराजांचें वय विशेष नसतां मर्यादा[४] व आज्ञापालन करून, मर्जी तेच समजोन, वडील म्हणजे ईश्वर, त्यांची आज्ञा तोच धर्म हें लक्ष धरून, वडिलांची आज्ञा शिरसा [ वंद्य ] जाणोन अवज्ञा न करितां[४] वर्तते जाले. याजवरून शिवाजी महाराज यांस पादशाहाचे दर्शनास न्यावें ऐसा निश्चय केला. पंतांनींही पादशाहापाशीं राजे यांचे पुत्र आले ते बहुत योग्य, गुणसंपन्न, वजिरी करावी ऐसे, पुढें दौलत चालवावयाजोगे, सांभाळावया-जोगे आहेत म्हणोन तारीफ केली. यांणींही दर्शनास आणावे सांगितलें. तें पंतांनीं कळविल्यावर सुमुहूर्त पाहिला तेव्हां शिवाजी राजे यांणीं महाराजांस सांगून पाठविलें जे–" आपण हिंदु व हे यवन, परम नीच, यापरते नीच दुसरे नाहीं. अंत्यजादिकांचा संपर्क करितात. त्यांची सेवा करणें, त्यांचें अन्न भक्षणें, आर्जव करणें, त्यांस नमस्कार करणें, हा माझे प्रकृतीस फार त्रास उत्पन्न होतो. [ यवन ] गोवधादि करितात. ब्राह्मणवध व निंदा धर्माची हें पाहाणें परम अनुचित दिसतें. आपण रस्त्यानीं जातां गोवध होतो. तें पाहातांच त्याचा शिरच्छेद करावा ऐसें वाटतें व श्रम वाटतात. गाईस पीडा करणाऱ्यांचा शिरच्छेद करावा असे मनांत येते. परंतु वडील

---

१. ' मावळचे ' २. ' शरीरपाठ व्यापार चांगले. ' ३. ' मुरारराव '
४. ४. ' मर्यादा आज्ञापालन ' करून, वडील ईश्वर त्यांची आज्ञा तोच धर्म, हें लक्ष धरून वडिलांची आज्ञा अवज्ञा न करितां '

काय म्हणतील हें चित्तांत वागतें यास्तव उपाय नाहीं. नाहींपेक्षां केलाच असतां. अमीर–वजीर यांचे घरीं जाणें हें माझे चित्तास योग्य वाटत नाहीं." एखादे समयीं स्पर्श झाल्यास स्नान करावें, दुसरीं वस्त्रें घ्यावीं, ऐसें करूं लागले. आणि याअन्वयें सांगून पाठविलें.

### यास्तव यांस लांब ठेवावे...

याजवरून राजे यांणीं बहुत निषेध केला. वडिलोपार्जित यांची सेवा करून वैभव आपण पादशाहापासून संपादिलें. तुम्ही वडील पुत्र सर्वजाण असतां हें बोलणें तुम्हांस नीट नव्हे ऐसें करूं नये," म्हणून कारभारी यांजपासून बोध करविला. तथापि यांचे विचारास कांहीं एक गोष्ट न ये. [ हें ] जाणून महाराजांचे समानवयस्क मैत्र यांजपासून सांगविलें व जिजाबाईसाहेब यांजपासूनही बोध करविला आणि आपणही समक्ष आणून कित्येक प्रकारें समाधान केलें कीं, "पृथ्वीचे अधिपति ते, तेव्हां आपला धर्म आपण रक्षून त्यांची सेवा करून असावे. त्याअर्थी त्यांचे धर्मास विरुद्ध दाखवूं नये. पूर्वीपासून देवादिक, दैत्यांचें प्राबल्य असतां, रावणाचे घरीं देवांनीं कालाची प्रतिक्षा करून जसें म्हटलें तसें चालले. तुम्हीही थोरले वौंशांतील. ईश्वरास असें न करणें असतें तरि तुमचे वौंशांतील सार्वभौमपद कां जातें ? असो. या काळीं असाच समय ! या अर्थीं तसेंच चालून आपलें वैभव आम्ही इतके श्रम करून तुम्हांसाठीं मेळविलें व लौकिक मेळविला तो जतन करून पुढें दिवसेंदिवस पादशाहाची कृपा अधिक संपादन करावी " या रीतीनें बहुत प्रकारें सांगितलें असतांही खंवीर वृत्ति ढळेना. "गाईदेवब्राह्मणांस पीडा करितात त्याकरितां प्राण गेले तरी जावो. वडिलांची आज्ञा शिरसावंद्य परंतु हें पाहणें नाहीं. " ऐसें उदासपणें[1] उत्तर केलें. ते समयीं राजे यांणीं आपले कारभारी यांसह विचार केला जे– "हे 'म्लेंछ' म्हणतांच अधिक तिरस्कार करितात. आम्ही पादशाही चाकर. त्यांचा धर्म, पादशाहात त्यांची, त्यांस [ मुलाचे विचार ] कळलिया वाईट पडेल. यांची बुद्धि व दैव विचित्र दिसतें. ईश्वरनिर्मित काय आहे न कळे. यास्तव यांस लांब ठेवावे हें युक्त. "

### दादोजीबरोबर पुणियास रवाना

एके दिवशी आग्रह करून पादशाहाचे भेटीसही नेले असतां त्यांणीं त्यांस मुजरा करणें, अथवा आदब [ बजावणें ] तें न करितां जाऊन बसले. चित्तांत फार व्यग्र जाले. पादशाहानें पंतांस विचारलें, "राजाचे पुत्र हेच कीं काय ?" तेव्हां पंतांनीं सांगिलें, "बहुत गुणवाण विद्वान आहेत. निशस्त[२] व बरखास्त[२]

१ 'उद्दामपणें' २.२. 'निशस्त तो बरखास्त'

दरबार अद्यापि पाहिला नाहीं; परंतु आपले सेवेसि योग्य आहेत, " म्हणोन विडे देऊन निरोप देवविला. पादशाहांनीं पोषाख जवाहीर राजे यांचे पुत्र, प्रथम भेटीस आले, म्हणोन सन्मान दिल्हा. हे घरीं आल्यावरि स्नान करून, तीं वस्त्रें त्यागिलीं[1]. हें वर्तमान पंत यांस राजे यांनीं कळवून " याचें चरित्र बोलणें असें पडतें, आम्हीं प्रयत्न [ होईल ] तितका केला, याजकरितां प्रौढ होत तों लांब ठेवितों, " सांगितलें. यांनींही सलाह दिल्ही आणि तारीफ केली. त्या समयीं शिवाजी महाराज यांचें लग्न शिर्के यांची कन्या करून बहुत समारंभें केलें. नांव सईबाई ठेविलें. आणि विचार करून दादाजी कोंडदेव सुभेदार पुणें वगैरे येथील मोहसबा देण्यास आले होते, त्यांबरोबर पुणियास जिजाबाईसाहेब व राजे बराबर देऊन रवानां केलें. शके १५५९. बराबर कारभारी पूर्वी शिवनेरींत होते ते दिल्हे.

## औरंगजेब व औरंगाबाद

[ इकडे ] दिल्लीमध्यें अलमगीर पादशाही करीत होते. त्यांस पुत्र औरंगजेब उत्पन्न शके १५४० यांत जाले. शिवाय[2] तीन पुत्र होते. त्यांत औरंगजेब बालत्व[3] असतां परम क्रूर व पराक्रमी. शरीरही मोठें, दराज; मनसबादार,[4] बहुत उद्दाम, दैत्यांश, उग्र, असा शूर प्रौढ होता जाला. हें पादशाहांनीं पाहून [ त्यास ] अमदाबादेचे सुभ्यावर फोज देऊन रवाना केलें. तो सुभा घेऊन, कांहीं दिवस तेथील दौलतीचा उपभोग करून होता. तों मलिकानीं पादशाही फौज नामोहरम करून घालविली. त्याजवरून पादशाहानें [ ओरंजेबास ] अमदाबादेहून आणविलें आणि दौलताबादेवर फौज [ व ] मातबर सरदार बराबर देऊन रवाना केलें. त्या संधींत मलिकांबर व साबाजीपंत [ दोवेही ] निवर्तले. पादशाहात कमकुवत पडली. मलिकाचे लेक फतेखान कारभार करू लागले. हें वर्तमान कळलियावरि औरंगजेब दरमजल चालून येऊन बराणपूर, आशेरी घेतली. खानदेश हस्तगत करून येऊन दौलताबादेस मोर्चे देऊन खडकी म्हणून गांव नजीक होता, तेथें मलिकानीं पेठ बसविली होती, ते जागा चांगली म्हणोन आपण खडकीवर राहिले. तेथें शहर वसवून नहर आणिले. रस्ते वगैरे तरतुदीनें करून त्याचें नांव औरंगाबाद ऐसें ठेविलें. शके १५६० यांत; व नगरचा किल्ला बांधिला. नंतर कांहीं दिवशीं दौलताबाद घेऊन सर्व पादशाहात दौलताबादची आक्रमून खानदेश, वराड सुभे खुदस्ते बुनियाद औरंगाबाद येथील सुभेदारी करून औरंगजेब राहाते जाले.

## दादोजी कोंडदेव : अस्तनी लांडी केली.

शिवाजीमहाराज पुणियास आल्यावर रंगमहाल म्हणून वाडा दादाजीपंतीं

१. ' तीं वस्त्रें त्याग केला. ' २. ' व आणखी ' ३. ' बालवय ' ४. ' मनसबदार ', ' जो मनसबदार ', ' मुनसबदार '

बांधिला होता तेथें राहाते जाले. दादाजीपंतीं प्रांत पूर्वीं लाविलाच[1] होता. जागां जागां प्रांतास उपसर्ग देणार यांस नतीजा देऊन प्रांतींची आबादानी करून, महाराजांची मर्जी रक्षून, यांचे आज्ञेप्रमाणें कारभार करून व यांस माहितगारी व दौलतीची कवाईत सांगून चालविते जाले. राजेसाहेब वडील पुत्र, सर्व दौलतीचे खावंद हे होत, आणि यांचे गुण व शाहाणपण, दैव विचित्र दिसतें, जाणून आज्ञा तसेच राखून चालावें, म्हणून चालले. महाराजांनींही वडिलीं ठेविले सेवक आणि कर्ते, बहुत पोख्त, इतबारी जाणून त्यांची मर्यादा वडिलांप्रमाणें धरून, भिडेनेंच त्यांशीं वागावें ऐसे मनांत आणून वागते जाले.

एके दिवशीं दादाजीपंतांनीं हातांनीं सरकार बागेंतील पाडाचा आंबा महाराजांचे स्वारीबरोबर असतां तोडिला, आणि आपणच आम्हीं स्वामींचे आज्ञेखेरीज हा विचार केला म्हणोन आम्हांस शासन असावें, हात तोडावा, बोलिले. आणि तोडावयास चाकर यांसि सांगितलें असतां, सर्व बराबर होते [ त्यांनीं ] व महाराजांनीं सांगितलें " हें करणें श्रेयस्कर नव्हे, तुम्ही मालिकच आहां, " असें म्हटलें. त्याजवरून पंतांनीं एक अस्तनी आंगरखियाची कापून लांडी केली, आणि सर्वांस सुचविलें जे, " याप्रमाणें महाराजांचे आज्ञेखेरीज चालूं नये. " असे निष्ठेनें व इमानतदारीनें इतबारेंकरून स्वामींचें कार्य तें प्राणापरतें जाणोन, सेवा पंत करीत होते.

### गुण घेतले. दोष डसले नाहींत.

ते समयीं महाराजानीं विचार केला जे, " आपण वडिलांनीं मेळविलें तें खाऊन राहाणें योग्य नाहीं. आपण हिंदु. दक्षणदेश सर्व म्लेंछांनीं ग्रासिला. देव, ब्राह्मण, क्षेत्रें, गाई यांस बहुत पीडा जाली. धर्म अगदीं बुडाला. हा रक्षणार्थ प्राणही वेंचून. धर्म रक्षून[2]. आणि आपले पराक्रमें नवीन दौलत संपादून[3]. तें अन्न भक्षून. फौज व लोक जमा करून, आणि वडिलीं मेळविलें तेंही रक्षून. नवें साधन करून[4]. हेंच या कुळांत जन्म झालियाचें सार्थक, व श्रेयस्कर. देवावर व दैवावर भार घालून पुरुषप्रयत्न बलवत्तर[5] अधिक होय. दैव पंगू आहे. यास्तव प्रयत्नें अवलंब करावे[5] त्यास दैव जसें जसें साह्य होईल तसें तसें अधिक करीत जावें. मग देव परिणामास नेणार समर्थ आहे. " याप्रकारें मनांत कल्पना पूर्व-जन्मांतर-योगें आणून निश्चयही तसाच करिते जाले. वय असेंच वेंचणें व्यर्थ, म्हणून दादाजी कोंडदेव यांस सल्हा विचारली. त्यांणींही " आपण मनांत आणिलें परंतु या कर्माचा शेवट लागणें परम दुर्घट आहे. सर्व पृथ्वी यवनांनी बहुत काल पादाक्रांत केली. स्थळें, किल्ले, जागे, फौज त्यांची भरली[6]. या करण्यास आपणांस मातबर स्थळें असावीं;

---

१. ' पुरविलाच ' २. ' रक्षावा, ' ३. ' संपादावी. ' ४. ' करावें. ' ५. ' अवलंबन करावे. ', ' प्रयत्नें अलबल करावें. ' ६. ' पृथ्वींत भरून निघाली. '

व हिंदुराजे व हिंदुफौजा जागां जागां आपलें साह्यकरत्या असाव्या; आपणही परम दुष्कर[1] कर्मं, श्रम, साहस जिवाहून अधिक करावें; त्यास ईश्वराची अनकूलता व सिद्धपुरुषाचा आशीर्वाद असतां अशा गोष्टी घडतील. तेव्हां साहेब मनांत आणितात हें कठीण. वडीलें यवनांची सेवा करून, योग्यता मेळवून, त्यांजपासून दौलत मेळवून, त्यांचें जें [अन्न] खात आहेत याचा विचार म्हणावा, तरि हे युग विपरीत, तेव्हां दिवसेंदिवस धर्म अधिक क्षयास जाणार. तेव्हा हें घडणें दुरासद. काल·देश-वर्तमान तिहीं करून मनसब्यास येत नाहीं. वडिलीं दौलत, मनसब, सरंजाम, लौकिक मेळविले, ते गमाविले हें वांट्यास न यावें." असें प्रकारें मसलत सांगितली असतां महाराजांचे चित्तास त्यांणीं मसलत करण्याचे गुण सांगितले तितके मात्र घेऊन, दोष ठसले नाहींत. उपेक्षा करणें ठीक नाहीं. आपण चित्तात आणिलें तसें करावें. धर्म वृद्धिंगत करावा यासाठीं प्राण, दौलत गेली तरी जावो; परंतु प्रयत्न करावाच करावा हेंच मनःपूर्वक [ चित्तास ] आणून पहिलीं दौलतींतील माणसें संक्राजी नीळकंठ व बाळकृष्णपंत मजमदार व सोनोपंत व रघुनाथ बल्लाळ कोरडे शिवाय सरदार वगैरे ममतेंत मसलतींत येतील ते ते तसे प्रकारे घेऊन, आणखी चांगले मर्द शिपाई, नांवाचा माणूस पाहून, त्यास जवळ ठेवावे, कारकून चांगला कर्ता, लिहिणार पाहून ठेवावा, असें करूं लागले. तशींच राजकारणें करावीं, मातबर चहूं जागांचे मराठे यांसि आप्तपणा करावा, पत्रें लिहावीं, त्यांस आणोन भेट घ्यावी, आपण त्यांजकडे जाऊन आम्हांस अनकूल असावें ऐसें बोलावें, ऐसें करण्यांत ज्यांनीं महाराजाचें बोलणें परम आदराचें, पराक्रमाचें ऐकावें त्यांस वेध लागून वाटावें कीं, "हें महाराज परम थोर होत, यांचेच संमतें[2] चालावें, हे सांगतील तसें करावें, प्राणही गेले तरी जावोत, परंतु यांची सेवा करून यांचे आज्ञेंत चालावें." अशी सर्वांचीं चित्तें वेधून घेतलीं. याप्रमाणें [3]शके १५६३ यांत [ या मसलतीचा ] आरंभ करिते जाले. तों वय चवदा पंधरा वर्षांचें जालें.[3]

## स्वराज्याचें तोरण

तेव्हां तोरणा किल्ला विजापुरी पादशाहींतीलच, येथे राजकारण करून मावळे लोक पासलकर, कंक, माळुसरे वगैरे सरदार ठेऊन ममतेंत ठेविले [ होते ], त्यांचे हातें वरील नामजाद लोक यांस वश करून, भेद करून, किल्ला आमचे निसबतीस द्यावा, आम्हीं पादशाहापासूनही आपलेकडे करून घेऊं, म्हणून वश करून घेतला. आणि किल्ला पाहावयास जाऊन पाहून, प्रचंडगड असें नांव ठेविलें. दुरजा देवीचा

---

१. 'दुष्कर्म' २. 'लक्षें' ३.३. शके १५६२ यांत या मसलतीचा आरंभ करिते झाले तों वय १३ वर्षांचें झालें', 'शके १५६३ यांत आरंभ करीते जाले तों वय पंधरा सोळा वर्षांचे जालें.'

डोंगर त्यांचे संनिध फार चांगला पाहून, तेथें वस्ती करून किल्ला करावा असें चित्तांत आणून सांप्रदायानरूप लोक हवलदार, कारकून नेमून किल्ला केला. त्या पर्वतास तीन माच्या चांगल्या होत्या. त्यांसही काम लावून बांधिल्या व किल्ल्यास इमारत करविली. आणि किल्ल्यांचें नांव राजगड ठेवून माच्यांचीं नांवें एक सुवेळा व एक संजीवनी व एक पद्मावती अशीं ठेवून चार किल्लेच असे केले. राजधानीस राहण्यास योग्य अशी कल्पना करून बांधिते जाले.

### वडिलांचें निषेधपत्र

हें वर्तमान पादशाहास कळलियावरि शाहाजी महाराज यांस विचारिलें. यांनीं सांगितलें जे, "त्या किलियावरि दुसरेकडील कांहीं गलबल[1] आढळली याजवरून बंदोबस्त तोरण्याचा केला. त्यालगती जागा चांगली दिसली, तेथेंही मेटें[2] बांधून जागा करविली. आमचे जाहागिरीलगत चांगली जागा, आम्हांकडेच असावी," असें बोलोन सरपोष राखिला. आणि शिवाजी राजे यांस व दादाजी कोंडदेव यांस निषेध करून लिहिलें, "हें करणें चांगलें नाहीं." दादाजीपंत यांस लिहिलें जे, "तुम्हीं जवळ असोन हें कसें करवितां?" तेव्हां त्यांणीं आंतील पर्याय होते ते लेहून पाठविले. "शिवाजी राजे यांस विनंती केली, परंतु त्यांचे चित्तांत ते गोष्ट कांहीं एक नये." याजमुळें बहुत यागी जाले.

### दादोजींनीं देह ठेविला

तों पादशाही खजाना[3] विजापुरीं जात होता त्याची बातमी राखून, त्याजवर लोक पाठवून, आणिला. व प्रचंडगडावरिही द्रव्य सांपडलें. तेव्हां दादाजीपंतांनीं सांगितलें, "आपण आक्रम घालणें [ त्याचा ] पाया घातला, हें युक्त नव्हे. दैवावर भार[4] ठेवून हें कर्म आरंभिलें. [ परंतु ] आपले स्वामित्व तें किती? पादशाहाती चार चहूंकडे. दिल्लीचा सुभा साहेबजादाच येऊन औरंगाबादेंत [ राहिला ] आहे. महाराज वारंवार लिहितात. केलें कर्म सिद्धीस न गेल्यास फार गैर[5]. तथापि साहेब दैवाचे दिसतात. कर्तृत्व-बुद्धीही विचित्र. फार सावधपणें जें करणें तें करावें," बोलले. आणि याउपरि "यांजपाशीं कारभार करणें युक्त दिसत नाहीं, महाराजांस तेथें पंच यांचे करण्यांनीं पडून आपण न केलें असतांही अपयश आपणांवरि येईल." म्हणून चिंताग्रस्त होऊन राहिले. तों शरिरीं व्यथा होऊन क्षीण जाले. देह-अवसानसमयीं महाराजांस जवळ नेलें. "आम्ही बहुतां दिवसांचे पदरचे सेवक, आमचा शेवट जालाच; परंतु वडिलीं वाढविलीं माणसें व मुलूख, द्रव्य [ आम्हीं ] जतन केलें. [ पुढें ] साहेब खावंद [ आहेत ] सर्व पाहून जतन करावें," म्हणून आपले पुत्र स्वाधीन केले आणि [ ते ] वारले.

१. 'गडबड' २. 'किल्ले' ३. 'खजीना' ४. 'भरंवसा' ५. 'वांकडें.'

## शहाजी महाराज चंजाउरीं जाते झाले.

या संधींत शाहाजी महाराज यांनीं दादाजीपंतांस " द्रव्य जमा जालें असेल तें पाठवावें, " लिहिलें. तों हे वारले. नंतर महाराजांनीं उत्तर पाठविलें जे, " येथें खर्च वाढला आहे, याउपरि खर्चास खजीना आणवणें तो कर्नाटक प्रांतींचा आणावा. येथील पाठवीत नाहीं, " असें लिहिलें तेव्हां सर्व आटोप पुत्रांनीं केला, अचाट कर्म करूं लागले, द्रव्य व मुलूख त्यांचाच आहे हा संतोष मानिते जाले. आपण येथेंच विजापुरीं जवळ राहाणें ठीक नाहीं, म्हणून चंजाउरीं जाण्याची मसलत काढून तिकडे जाते जाले.

## नवा मलूख नवी माणसें नवी व्यवस्था

यानंतर चाकणचें ठाणें येथें फिरंगोजी नरसाळा हवलदार होता. तो महाराजांस येऊन भेटला. त्याजवरि संतोषी होऊन ठाणें त्याचे स्वाधीन केलें. वरकडही तालुकियांत जे जेथें होते व आज्ञेंत चालिले, त्यांचीं कामें त्यांचे स्वाधीन करून, दादाजीपंतीं [ जे ] धारे कौल दिले, त्या धाऱ्यांनींच प्रांत-वहिवाट यथास्थित चालावी असें करविलें. सिद्दी बिलोल पाग्या जुना होता. त्याचें चालणें महाराजांचे विचारांत न पडे. ते समयीं [ तो ] पागा ठेऊन शाहाजी महाराजांकडे उठोन गेला. बाजी मोहिते, तुकाबाई साहेबांचे भाऊ, याचे स्वाधीन सुपें येथील ठाणें व तालुका होता. त्यांस भेटीस बोलाविलें असतां न आले, जाणून त्यांजवर स्वारी केली. त्यांस धरून आणून, पागा वगैरे घेऊन, महाराजांकडे चंजाउरास पाठवून दिल्हे.

## राज्यसाधन दिवसेंदिवस अधिकच चाललें.

त्यानंतर सामराजपंत रांझेकर यांस ' पेशवे ' असें पद दिलें. आणि महाराजांनीं विचार केला जे, तीन हजार पागा व मावळे लोक दाहा हजार जमा केले, मोगलांचे किल्ले प्रांत घेतले, हे जतन जाले पाहिजेत. त्यास द्रव्य पाहिजे. द्रव्यें करून लोक राजी राहातात. किल्ले काठ्यानें[1] मुलूख जेरदस्तींत येतो. मुलूख हस्तगत झाला म्हणजे राज्य साध्य होतें. मोगलाई राज्यांत बिकट जागा षयाद्रीचा[2] बांधारा हा त्यांची फौज आली असतां आपणांस आश्रा होय. त्यांस असाध्य, यास्तव हा आधीं साध्य करावा. साधण्यास त्या मुलखांतील कजाखीचे लोक व माहितगार पावसांत डोंगरांत जाणें, चढणें, पळणें, झाडींत शिरणें हें[3] मावळे व कोकणें लोक यांजवांचून घडणार नाहीं. म्हणोन तेच लोक अधिक ठेवून त्यांस सरदार येसाजी कंक व तानाजी मालुसरे व पासलकर व देशपांडे मुसे खोरें, पौड खोरें व हिरडस मावळ वगैरे प्रभु लोक यांस किताब सरदाऱ्या देऊन, नांवाजसी[4] [ चे ] लोक व शिपाई ऐसे ठेविते

१. ' कोटावरून ' २. ' सह्याद्रीचा ' ३ ' साध्य ' ४. ' नांवनशी '

जाले. आणि विचार केला कीं, किल्ले कोट घ्यावे, प्रांतांत अंमल बसवावा, नीतीनें रयतेस वागवावे,[१] त्यांनीं अशी प्रार्थना करावी, "ईश्वरा, यांचें राज्य चिरकाल असो[२]" अशी लावणी कौल देऊन करावी. यवनांचा उत्कर्ष यास्तव त्यांचीं मोठी मोठी शहरें व जागा, तेथें द्रव्य बहुत आहे, यांची पाळत राखून (तीं) मारावीं, म्हणजे दुष्ट यवन सहजच आयास येतील. आणि आपण झाडी षयाद्री§ धरून होतील तसे यत्न करावे, तसेच त्यांचे तालुक्यांतील द्रव्यवान असतील ते जेरदस्तींत आणोन त्यांजपासोन निघेल तसे खंड अथवा कर्ज म्हणोन द्रव्य घ्यावें. म्हणजे सहजच तो द्रव्यहीन होतो. आपणांस [त्या द्रव्याचा] जमावाचे खर्चास उपयोग पडतो. जाणून या रीतीनें द्रव्य साध्य करिते जाले. लोकांस द्रव्य पाऊं लागलें म्हणजे लोक राजी राहातात. नामांकित कर्ते माणूस शिपाई असेल तेथून आणावा. या विचारें तमाम किल्ले यांचीं राजकारणें करविते जाले. किल्ले घेण्यास आपणच खासे जावें. धारकरी यांबरोबर आपणच माळेस अगोदर चढावें. तसेंच भेदानीं व माहितगार मावळे लोक यांचे युक्तीनें घ्यावे. कोट-घेरियाचे गावचा सेकार अगोठीस[३] किल्ल्यावरि जाणार, त्या दिवसांत धारकरी निवड करून किल्ल्याचे घेरांतील गांव तेथे लोक आपले मजूर करून डोईवर भारे घ्यावे, त्यांत तरवारा घालून आपणही त्यांत जावें. जाऊन किल्ला घ्यावा. असे अनेक प्रकारें सीमेपरती मेहनत करून महाराज किल्ले घेत चालले. ते बांधारीचे कांगोरी, तुंग, तिकोना, लोहगड, राजमाची, कुवारी,[४] भोरप, घनगड, केळजा आदिकरून किल्ले घेतले. मावळें सारीं सोडविलीं. जवळ जवळ पुंड दशक[५] पाळेगार होते ते कोण्हास ममतेंत घेऊन आपले केले. आम्हांस राज्य साधून म्लेंछांचें पारिपत्य करून, महाराष्ट्रधर्म वृद्धीतें [६]पावऊन रक्षणें, तेव्हां जसे ज्या हुनरेंकरून आपले होतील [तसे] त्यांस आपले करावे. यांत त्यांजपासुन विपरीत दिसों लागल्या, त्यांचें पारिपत्य करावें. ते समयीं मोरोपंत पिंगळे व कारभारी संक्राजीपंत वगैरे साहस कर्मांत जवळ होते, तेही बहुत धाडसेंकरून उपयोगीं पडूं लागले. ऐसें राज्यसाधन दिवसेंदिवस अधिक करीत चालले.

बांदल देशमुख तर्फ हिरडस मावळ हे येऊन न भेटत, तेव्हा त्यांजवर स्वारी करून धरून आणले, मारले. रोहिडा किल्ला घेतला. त्याजवरून दहशतही लोकांस पडली. किल्ले कोट घेतले त्यांजवर विश्वासू आणि मर्द ऐसे हवालदार सरनोबत घाटगे, निंबाळकर, गुजर, पालकर, जगताप, शिर्के, मोहिते, यवले, महाडिक ऐसे सरदार व मातबर पाहून लोक स्वार ठेवून, दिले. योग्यतेनुरूप वाढविले. फौजेचा जमाव केला.

---

१. 'सुख वाटे कीं,' २. 'होवो' § 'शयाद्रि', 'सह्याद्रि' ३. 'आगोटीस' ४. 'तुवारी' ५. 'पुढें देशमुख', ६. 'वृत्तीतें'.

### परराज्यांतील नामी माणसें राखलीं.

[ इतक्यांत ] विजापूरचे पादशाहींतून सातशें[1] पठाण बदलून चाकरीस राहावयास आले. त्यांस ठेवावे न ठेवावे, ऐसा विचार पडला. 'विजापूरकरांचा आपला द्वेष. हे मुसलमान. यांचा भरंवसा मानावा कसा ? म्हणून[2] विचार करितां गोमाजी नाईक पानसंबळ हवलदार, जिजाबाईसाहेबांचें लग्न जालें ते समयीं जाधवराव यांणीं त्यांचे सेवेसि दिल्हे [ होते ]. शाहाणे, वडिलांचे चाकरीचे विश्वासू जाणून त्यांजवरि इतबार ठेवून, त्यांची अब्रू वाढवून सेवा घेऊं लागले [ होते. ] त्यांनीं उत्तर केलें कीं, "महाराज राज्य-आक्रमण करणार. आले लोक न‡ ठेवितील तरि पर-राज्यांतील चांगले नामी माणूस कसें येईल ?" ते सलाह फार चांगली जाणून ठेविले. त्यांची सरदारी राघो बल्लाळ अत्रे यांसि सांगितली.

### भवानी तलवारप्राप्ति

नंतर सोंढवळकर व कोंढवळकर,[3] हपसियाचे चाकर, मर्द जमातदार होते. त्यांचें राजकारण महाराजांकडे आलें. "आपली स्वारी कोंकणांत यावी, म्हणजे तळाघोसाळा घेऊन देतों." व जंजिरियाचेंही[4] राजकारण आलें. याजवरून खासा स्वारी कोंकणांत जाऊन दोनी किल्ले तळाघोसाळा व पेबचा[5] किल्ला घेतले. प्रांतांत अंमल बसविला. बिरवाडी सैदाची,[6] मेट चांगलें पाहून, किल्ला केला. याप्रमाणें करून नंतर हरिहरेश्वराचें दर्शन करून, तिकडून येतां मार्गीं गोवलेकर सावंत येऊन भेटले. त्यांस नांवाजून चाकर ठेविलें. त्यांजपाशीं तीनशें होनांची तरवार नामांकित होती ती महाराजांस कळलियावरि तीनशें होन व पोषाख देऊन घेतली. तिचें नांव 'भवानी' असें ठेविलें. प्राप्त जालियावरि बहुत यशस्वी जाले म्हणून तिची पूजा नित्यनेमें आदरेंकरून करिते जाले. हरिहरेश्वरास जाण्यांत जंजिरेचें व राजापूरचें राजकारण पक्कें न दिसलें, त्याजवरून माघारे आले.

### रायगड आला, कल्याण लुटलें.

राजापुरीं बाळाजी प्रभु, पूर्वीं हबसी[7] याचे दिवाण मजमदार आवजी प्रभु, यांजवरि इतराजी होऊन मारिलेमुळें राजापुरीं मामाचें घरीं, त्यांणीं द्रव्य देऊन मुलेमाणसें सोडविलीं, तेथें होते. राजकारणाचें पत्र आलें तें अक्षर फार चांगलें व मजकूरही बहुत तारफेचा पाहून त्यांस येण्याविषयीं पत्र पाठविलें असतां, कर्ज फिटल्यावांचून जाणें ठीक नाहीं म्हणून आले नाहींत. स्वारी वरघाटी येतां

१. 'पांचशें सातशें' २ 'हें म्हणतात तों' ‡. 'न व' ३. 'सोडवेलकर व कोडवेलकर' ४. 'व वजीर याचेंही' ५. 'व दे पे ह चा', 'बैबाचा किला' ६. 'बीरवाडीस खाची' ७. 'आम्हांसी', 'आम्हांपाशीं'

दळवी पाळेगारी करीत होते ते मोडून त्यांचे हातीं प्रांत, जागे होते ते घेतले. राजगडास येऊन तेथें शिवापट्टण असें नांव ठेऊन किल्ल्यानजीक घरें, रस्ते नीट करविलें. पेठ करविली. आंबराई तेथें व पुणियांत लावविली. रायगडचें राजकारण आलें. तेथें जाऊन, रायगड भेद करून घेतला. तो किल्ला हबसी याजकडे होता. शके १५६८. किल्ला बहुतच नामी, उंच, बिकट पाहून फार संतोषी जाले. त्याजपाशीं चांगला डोंगर होता तो पाहून किल्ला केला. नांव लिंगाणा ठेविलें आणि राजगडास आले.

कल्याणावरि म्वारी करावी, प्रांत घ्यावा, म्हणून आबाजी सोनदेव पाठविले. त्यांनीं फौजेसुद्धां जाऊन शहर लुटलें, मुलूख घेतला व किल्ले घेतले. ते त्यासच सुभा सांगून त्यांजकडेच ठेविले. शहरांत मुलाणा हयाती सुभेदार होता [ तो ] दस्त केला. त्याची सून परम सुंदर होती, ती आबाजीपंतीं ठेऊन घेऊन त्यास वस्त्रें देऊन निरोप दिला. तो बोभाटा विजापुरीं कळला.

## नव्या नेमणुका, किल्ले, मुलूख

सामराजपंतांस[1] जंजिरे येथील राजकारण त्यांस सांगितलेप्रमाणें[2] न जालें. नाकर्ते असा शब्द ठेऊन मोरो त्रिमल पिंगळे यांस राजगडीं[3] पेशवाई देऊन ठेविले. निळो सोनदेव कामावर पडले जाणून बाळकृष्णपंताची मजमू काढून दिल्ही. अंणाजी दत्तो यांस सुरनिसी दिल्ही. गंगो मंगाजी यांस वाकेनिसी सांगितली. माणकोजी दाहातोंडे यांस सरनोबती होती. ते वारले. पागा शिलेदार वाढत चालले. त्याजवरून नेताजी पालकर यास सरनोबती दिल्ही. रावो बल्लाळ यास फौजेची सबनिसी दिल्ही. पायलोकांची सरनोबती एसजी[4] कंक यास सांगितली. याप्रमाणें पायलोक व पागासरदार [ यांचा ] गाहाकरून, घाट चढून चंदन, वंदन, केळजा[5] पांडवगड, नांदगिरी हे किल्ले घेऊन सातारियास आले. महाराजांचे पुण्यप्रभावेंकरून सातारा, परळी आदि किल्ले, स्वल्पप्रयासें आले, ते घेऊन इकडील बंदोबस्त किल्लेदार यथास्थित करून अंणाजी दत्तो सुरनीस व माल सावंत यांस पनाळाप्रांतीं महाराजांनी पाठविलें. त्यांणीं पनाळा वगैरे घेतले. हें वर्तमान महाराजांस कळतांच पनाळप्रांतीं जातां वसंतगड घेतला. तेथून शिरोळ वगैरे ठाणीं घालीत पनाळ्यास जाऊन पावनगड, विशाळगड, बावडा, रांगणा असे किल्ले घेतले. रांगण्याचें नांव खेळणा ठेविलें. आणि कोंकणांत उतरून राजापूर शहर लुटलें. तेथें बहुत द्रव्य सांपडलें. महाराजांचे प्रभावें जेथें जावें तेथें कार्य फते व्हावीं असें होऊं लागलें. त्या प्रांतींचे किल्ले, कोट, ठाणीं, जंजिरे यांत ठाणीं घालून, सुभा रावजी सोमनाथ

---

१. 'त्यास', २. 'सांगितलें तें घेताप्रमाणें', ३. 'राजगडीं ठेविले होते त्यांस', ४. 'येसाजीस', ५. 'केळणा'

यांस सांगून ठेविले. बाळाजी आवजी लिहिणार येथें आहेत, त्यांस आणवा म्हणून सांगून आणिले. अक्षर लिहिणार व बोलणार शाहाणे असे पाहून, कर्ज होतें त्यांस बारावयास पैका देऊन, चिटनिसीचीं वस्त्रें साडेतीन सनगें व कलमदान रुपेचें देऊन चिटनिसी सांगितली. शके १५७०. त्यांचे बंधु दोघे होते, त्यांत चिमणाजी आवजी जमाखर्चीं लिहिणार पाहून मजमूची फडनिसी दफ्तरदारी दिल्ही. धाकटे शामजी आवजी यास रायगडची कारखानिसी सांगितली आणि पाठविले.

स्वारी माघारी येतां शृंगारपुर येथें सुर्वे पाळेगारी राज्य करून होते. दाहा हजार[1] निवडक लोक ठेऊन होते[1]. आपलेसें व्हावें मानस. सुर्वे याजपाशीं कारभारी शिरके, पिलाजी व तानाजी शिरके होते. पिलाजी शिरके वकिलीस महाराजांकडे आले.[2] सुर्वे यांचे राजकारण बनून येईना.[3] तेव्हां वकील तेथेंच दस्त करून[4] ठेविले आणि फौज पाठवून संस्थान घेतलें. सुर्वे बुडविले. वरकड शिरके हबसाणांत परागंदा होऊन गेले, त्यांचें राजकारण महाराजांकडे आलें. ते व हे अनुकूल जाले. सर्वांस आणून सरदारी व सेवा सांगून आपणांपाशीं ठेविले. ते बहुत निष्ठेनें चालूं लागले याजवरून वाढविले. जेथें जावें तेथें चांगलें मनुष्य शिपाई व कर्ते, गुणी कारकून लिहिणार पाहून ठेवावे. महाराज गुणग्राहक, पद्महस्ती. याप्रमाणें माणसांनीं उमेदीनें कार्यें अधिकच करावीं, ऐसें होऊं लागलें.

याप्रमाणें दाभोळापासून राजापूर [ पावेतों ] देश, किल्ले, बांधारीसुद्धां महाराजांनीं घेतलें. सर्व हतवीर्य होऊन, 'महाराज परम भले, धर्मबुद्धि, यांचें राज्य वृद्धीस पावावें,' हे सर्वांस इच्छा निर्माण होऊन महाराजांचे आश्रय करिते जाले. राजापूरची स्वारी [ होऊन ] देश, दुर्ग फते करून राजगडास आले. प्रभाकर उपाध्ये यांचे पुत्र बाळंभट व गोविंदभट जवळ ठेऊन उपाधीक[5] परंपरागत त्यांचे स्वाधीन केलें.

महाराजांनीं कल्याणापासून राजापूरपर्यंत घेतल्या[6] मुलखाचा[6] बंदोबस्त करून[7] राजगडनें रायगडास[8] आले. तेथून सर्व जमियत एक करून, सरनोबत व सरदार फौजेची निवड करून, चेउलावर स्वारी करून शहर लुटलें. सोनें, रुपें, मोतीं, माणीक, हिरे इत्यादि द्रव्य बहुत सांपडलें. तीन दिवस मुकाम केला. कोट घेतला. रामेश्वर तेथें [ देवस्थान ], त्याचें दर्शन करून खजोजी[9] ठाणेदार कैद केला.

---

१. १. 'दाहा पांच हजार लोक पाहिजे तसे बाळगून असतां तें संस्थान'
२. 'होते.' ३. 'न जमे' ४. 'पस्त करून' ५. 'उपाध्येपणा'
६.६. 'कोंकण घेतले. किल्लेकोट घेऊन', ७. 'केला.' ८. राजगडाहून पायगडीं.' ९. 'खोजोजी.'

### बाजी खराबा होऊन माघारे गेले.

हें [ सर्व ] वर्तमान वरचेवर विजापुरीं जाते जाले. मुलाणा हयाती कल्याणाहून गेला. त्यानें पादशहास, 'शिवाजीराजे यांनी बहुत फंद केला, किल्लेकोट फार घेतले, खजिने मारले, शहरें लुटलीं वगैरे बोभाट फारच सांगितला. 'याचें पारिपत्य लौकर करावें. दिवसेंदिवस बळावत चालले, हें चांगलें नाहीं.' [ असेंही सांगितलें. ] त्याजवरून सारे अमीर जमा करून विचार केला आणि बाजी सामराज म्हणून सरदार दाहा हजार फौजेनिशीं, [ शिवाजीस ] धरून आणावें [ असें ] सांगून रवाना केले. ते माहाडापर्यंत गेले, तों महाराज स्वारी करून, चेऊल लुटून, ठाणीं घालून राजगडास पावले. हें कळलियावरि बाजी खराबा[1] होऊन, असाध्य जाणून, माघारे फौजसुद्धां विजापुरीं गेले.

### पादशहानें पित्याला जाब विचारला.

तेव्हां पादशाहानें शहाजीराजे यांस लेहून पाठविलें कीं, "तुमचा बेटा आफरी होऊन बेकैदी करतो. किल्ले कोट, ठाणीं घेतलीं. शहरें लुटलीं. तुम्हीं पादशाहींतील उमराव विश्वासू असतां, हें करणें ठीक नाहीं. त्यास हुजूर आणवावें." त्याजवरून उत्तर पाठविलें कीं, "लेंक आपले स्वाधीन[2] नाहीं. हजरतीनें त्याचें पारिपत्य पाहिजे तसें करावें." असें लिहून पाठविलें.[3] तेव्हां राजे याचा राग येऊन इतबार न पडे. राजे यांनीं शिवाजीराजे यांस पत्र लिहिलें जे, "आम्हांवर तुमचे बेकैदी वर्तणुकेवरून इतराजी पादशाहाची जाली. तुम्ही करितां व केलें हें चांगलें न केलें. याउपरि पादशहास जाऊन भेटावें. आणि किल्ले, कोट व मुलूख त्याचे आज्ञेप्रमाणें सोडून देणें." असें बहुत प्रकारें लिहिलें.

### कुटुंबाचा सल्ला : संतोष

ते समयीं महाराजांनी विचार केला जे, "वडील देवाप्रमाणें, त्यांची आज्ञा ते शिरसा प्रमाण.[4] परंतु आम्हांस धर्म–उच्छेद जाला, म्लेंछमय सर्व जालें, हिंदु-धर्म बुडाला, तो जिवाभ्य[5] श्रम करून स्थापावा हें प्राप्त. हेंच मनांत. तेव्हां वडिलीं लिहिलें तसें चालणें कसें घडतें? त्याहून हें श्रेयस्कर होय. तथापि [ हा ] मार्ग अवलंबिला, [ त्यावरून ] वडील लिहितात, तेव्हां, पादशाहाची बेमर्जी आम्हांमुळें वडिलांवरि, यास्तव वडिलांस श्रम वाटत असतील, याचा विचार कसा करावा?" म्हणोन विचारग्रस्त होते. जवळ स्त्री सईबाई-साहेब होतीं, त्यांस "प्राप्त जाला विचार असा, वडिलांची पत्रें आलीं, कसें करावें?" [ असें ] ते समयीं

---

१. 'खराब.' २. 'मानीत.' ३. 'पाठवीत गेले असतां.' ४. 'वंद्य.'
५. 'जीवादारभ्य'

विचारलें. त्यांनीं उत्तर केलें जे, " आम्ही स्त्रिया. ' स्त्रीबुद्धिः प्रलयंगता ' असें शास्त्र. साहेबांजवळ मोठेमोठे सरदार व विचारकर्ते कारकून[1] आहेत, त्यांची येविषयींची सलाह घ्यावी. तथापि विचारीलें त्याअर्थी आमचें मत,[2] " साहेबीं राज्य साधावें, देव-ब्राह्मणांची स्थापना करावी, धर्म रक्षावा, हे इच्छा धरिली, ते योग्य. देवावर भार घालून [ चालवावी. ] यश देणार तो समर्थ आहे.[3] राज्य साधणें यास मोह काय उपयोगी ? महाराज दूरंदेशी, संस्थानही मजबूद, तिकडेच बळावून असावें. इकडील स्वस्थता जालियावरि आणावे. असें लिहून पाठवावें. त्यांसही या गोष्टीचा संतोषच आहे. " ऐसें याप्रमाणें बोललियावरि महाराजांचें मनोगत, अंतःकरणांत विचार तेच बोलली, यावरून फारच संतोष पावले. आणि सर्वत्र कारकून व सरदार यांस जमा करून विचारितां याच अन्वयें त्यांतही सर्वांच्या सलाह पडल्या. तेव्हां हाच विचार ठरला. " आम्ही गेल्यावर पादशाहा गौरव करितील म्हणावें, तरि आम्हीं किल्ले कोट घेतले ते सोडीत नाहीं. अधिकच घेणार. याचें त्यांस सुखावह कसें वाटेल ? " असें ठरावून उत्तरें निविष्ट दाखवावयाजोगीं पाठविलीं; व आंतून महाराजांस, " आपण तो प्रांत बळावून फौज जमियत करून व आणखी साध्य करून, हिंदु राजे यांचीं सख्य-साध्यता[4] राजकारणें करून असावें. तों आम्ही लवकरच इकडील बंदोबस्त करितों. नंतर इकडे येण्याचें करावें. तोंपर्यंत सावधतेनें असावें " असें लिहिलें.

### शहाजीस दगा करून धरिले.

तेव्हां [ शाहाजी महाराजांनीं ] दाखवावयाजोगी पत्रें आलीं तींच पाठवून, आपले स्वाधीन लेंक नाहीं अशी खातरजमा करविली. तीं पत्रें पाहिलीं. परंतु राजे याचा विश्वास पडून संशय पादशाहाचा न जाई. तेव्हां बाजी घोरपडे त्या प्रांतीं होते, त्यांस सांगोन[5] हरतऱ्हेनें शाहाजी राजे कैद करून आणावे, असें करविलें. राजे ते समयीं त्रिवादी[6] नजीक चंदावर[7] येथें असतां घोरपडे याणीं भोजनास म्हणून बोलावून निखालसपण दाखविलियावरून जेवणास गेले. तेथें दगा करून धरिले आणि पादशाहापाशीं नेलें.[7]

### क्रूरकर्मा औरंगजेब : बहिणीचें साह्य.

त्या संधीस दिल्लीहून औरंगजेब यांस त्यांची बहीण तेथें होती त्यांनीं, औरंगाबादेस सुभा करून होते, त्यांस लिहिलें जे, " बादशाहाची बदनदर जाली, बेहोष जाले आहेत, तरि तुम्हीं सत्वर येऊन पादशाहीचा बंदोबस्त करावा. " हें

---

१. ' सरकारकून ' २. ' विचारें दिसतें कीं, ' ३. ' देईल. वाईट होणार नाहीं. ' ४. ' सख्ये साह्यता ' ५. ' सांगितले कीं, ' ६. ' त्रिवापी ' ७. ' चंजाउरीं ' ७. ' घेऊन आले. '

कळताच महकूबसिंग यास सुभेदारीवर ठेवून आपण फौजेसुद्धां दिल्लीस जाण्याचा मनसबा केला. शिवाजीराजे बहुत प्रतापी, पुंडपणें बळावले, योग्यता आली, सामान, लोक चांगले जथविले, आपले किल्लेकोटही घेतात, गेलियावरि अधिकच घेतील. त्याअर्थी आपण असतां हिसाब धरीत नाहींत, मागें सुभे ठेवणें त्याशींही सुरळीत चालणार नाहींत, हें एक. दुसरें, मर्द शिपाई, आपणांस मसलत पडली त्याअर्थी आपले सेवक करून बरोबर घ्यावे, सुभाही सांगावा. म्हणून राजकारण पाठविलें. "तुम्ही बराबर यावें" असें सांगून पाठविलें असतां महाराजांनीं अनादर करून वकिलास सांगितलें "आम्हांस तूर्त विजापूरची मसलत पडली [ आहे. ] शाहाजी महाराजांवर इतराजी होऊन पेंचांत आहेत, हें एक जालेवांचून येणें घडत नाहीं." [ असें ] सांगून निरोप वकिलांस दिला. गेले नाहींत.

औरंगजेब दरमजल निघोन दिल्लीस गेले. अलमगीर पादशाह बाप कैद करून डोळ्यांत सळया घालून आपण तख्तावरि बसोन पादशाहात करूं लागले. या गलबलींत चार अमीर औरंगजेब यांचे भाऊ होते, त्यांनीं लढाई केली. त्यांत उदाराम[१] माहूरकर देशमुख होते ते युद्धीं पडले. त्याची स्त्री इणें हिंमत धरून, आपली सरदारी कायम करून युद्ध केलें. फते पावलियावरि वर्तमान कळलें. त्याजवरून तिजवर संतोषी होऊन 'रायबागीण' म्हणून किताब औरंगजेबानें दिल्हा. माहूरचे देशमुखीचें फरमान तिचे नांवें करून देऊन, कांहीं दिवशीं औरंगाबादचे सुभ्याचे निसबतीस चाकरी करावी म्हणोन पाठविली. मुरादबक्ष व सुजातशाह [ व ] दाराशुक्र असे तिघे भाऊ होते ते औरंगजेबांनीं मारून आपणच पादशाही बळकाविली. याजप्रमाणें जाऊंन दिल्लीचें आधिपत्य बहिणींनीं लिहिल्यावरून प्राप्त होऊन करिते जाले.

## महाराजास चिनले : श्रीचा दृष्टांत : सुटका

इकडे शाहाजी महाराज विजापुरीं आणिलियावरि पादशाहानें फार सांगून पाहिलें व मुरारपंत यांजपासून सांगविलें असतां "पुत्र स्वाधीन नाहीं" हींच बोलणीं पडत गेलियावरि भिंतीस कोनाडा करून, त्यांत एक चिरा बसवावयाची जागा राखून, चिनले. असे केलें आणि याउपरि त्याहावे जे, "आमची हे अवस्था जाली, तुम्ही बादशाही मुलूख, किल्ले न द्याल तरि आम्हांस चिरा बसवून शेवट करितात" [ असें राजांस बादशाहानें म्हटलें ] त्याजवरून पत्रें लिहिलीं. नित्य राजे यांस एकदोन वेळे त्यांतून काढावें व फिरून ठेवावें असें करूं लागले. उत्तर आलियावरि चिरा बसवावा असा निश्चय केला. हें महाराजांस कळलियावर बहुतच पश्चात्ताप जाला. तेव्हां "आपण जाऊन परिणाम नाहीं;[२] धर्मस्थापनेसाठीं

१. 'उमराव' २. 'न जाऊन परिणाम नाहीं'

हें कर्म केलें. श्रीनीं आपलेमुळें वडिलांस हा समय प्राप्त केला.[1] तेव्हां जाऊन अथवा मसलत करून कांहीं होत नाहीं. अधिकच वांकडे पडणार. त्याअर्थीं महाराजांस तसाच प्रसंग प्राप्त जाल्यास आपणही देहत्याग करावा. यापरती तोड दिसत नाहीं. चालून जाऊन युद्ध केलें तरि अधिक पीडा करितील." असें बहुत चिंताग्रस्त असतां रात्रीं श्रीचा दृष्टांत जाला कीं, "राजे यांस भय कांहीं लागूं देत नाहीं. हें संकट परिहार करितों.[2] चिंता करूं नको." याजवरून संतोषी होऊन आंतून बातमी याप्रमाणें पोहोंचविली, आणि पत्रें आलीं त्यांचीं उत्तरें पाठविलीं कीं, "आपले दैवें करून होणार तसें होईल; आमचे दैवीं असेल तसें आम्ही करणार" तीं पत्रें दाखविलीं आणि पुसतां सांगितलें, "पुत्र स्वाधीन नाहीं, पाहिजे तसें करावें." तेव्हां पादशहानें विचार केला जे, "प्राणापर्यंत आली असतां [ यांचे हातें ] गोष्ट घडत नाहीं. स्वाधीन असते, तरि हरतऱ्हें करून आणविते. याउपरि यांचा अपराध नाहीं." अशी खातरजमा जाल्यावरून रणदुलाखान व मुरारपंत व सरजाखान यांणीं अर्ज केला जे, "यांचे स्वाधीन बेटा नाहीं, हें प्रमाण. शाहाजीराजासारिखे अमीर, मर्द असे प्रकारें मारूं नये. मोठ्या कामावर घालून मारावे." अशी फारच रदबदली करून वांचविलें. आणि रणदुलाखान जामीन होऊन स्वाधीन करून घेतले. जागीर करार राखून उपकार केला. त्यास वाई, कराड, रहिमतपूर[3] जागीर होती.

## स्त्रीनाइकी बाळनाइकी झाली !

नंतर कांहीं दिवशीं सुलतान सिकंदर पादशाह शरिरीं पीडा होऊन वारले. त्यानंतर त्यांचे लेंक अली इदलशाहा लाहान होते. व बेगम बडीसाहेबीण,[4] त्यांची मातुश्री, इणें पादशाहा लाहान त्यास घेऊन आक्रम केला. स्त्रीबुद्धि ! मुरारपंतावर कांहीं अंतर आणून दस्त करावे, मारावे, हें चार त्यांचे द्वेषी होते त्यांनीं सांगितल्यावरून, विचार न करितां, बोलावून आणून, कैद करून मारावे [ असें ठरविलें. ] हें त्यांस कळतांच जवळ हौद होता त्यांत स्नान करून शिखात्याग[5] करून संन्यासग्रहण केलें असतां तसेंच मारिलें. याप्रमाणें स्त्रीनाइकी[6] बाळनाइकी जाली[6] ! [ हें ] पाहून शाहाजीराजे निघोन कर्नाटकांत गेले.

## कोंढाणा 'सिंहगड' झाला : नगर मारिलें.

इकडे शिवाजी महाराज यांनीं किल्ले कोंढाणा येथील भेद तानाजी मालुसरे यांनीं आणल्यावरून त्यांसच किल्ला घ्यावयास पाठविलें. किल्लेदार उदयभान रजपूत

---

१. 'जाला', 'जाहाला' २. 'करितें' ३. 'हिम्मत पूर' ४. 'बूसाहेबीण' ५. 'शिकात्याग' ६. ६. 'राज्यस्त्रीबल'

[ होता. ] मालुसरे यांनीं भेद करून, माळ लावून वरते चढतात, हे बातमी उदयभान यास समजतांच हुशार होऊन चालून आला. युद्ध जालें. उभयताकडील[1] लोक कामास आले. महाराजांचे दैवें करून उदयभान रणीं पडला. फते जाली. किल्ला घेतला. हें वर्तमान कळलियावरि महाराज किल्ला पहावयास गेले. किल्ला फारच चांगला पाहून किल्ल्याचें नांव ' सिंहगड ' असें ठेविलें. तानाजी मालुसरे याचे भाऊ सूर्याजी मालुसरे यास तेथील सुभा देऊन ठेविलें.

नंतर नगर शहरावरि चालून गेले. पुरा मारिला. तेथें सोनें, रुपें, कापड बहुत मत्ता सांपडली. हत्ती व पांचसातशें घोडे पाडाव करून आणिले. द्रव्य पदरीं जालें. लोकांस बक्षिसें बहुमान देऊं लागले. याजवरून माणूस बहुत कामकाज करूं लागले.

### पुरंदरचा गुंता : किल्ला घेतला.

नीळकंठ हैबतराव सरनाईक, मर्द, शहाणे, परम क्रूर होते. यांजकडे किल्ला पुरंदर दौलतमंगळ पादशाही, मुरारपंतीं, बांधिला होता. [ सरनाईक यांस ] इनामगांव व गांवगन्ना हक्करुसूम चालत होते. निजामशाही[२] लोक पादशाहाशीं बदलून चालूं लागले.[२] त्याजवरून औरंगाबादेचे सुभ्याची फौज चालून किलियावरि आली. खावंदाशीं निमक हरामी न करावी असें लोकांनीं सांगितलें. तें न ऐकिलें.[३] म्हणून स्त्रीनीं सांगितलें असतां तिजला तोफेचे तोंडी बांधून उडविली. पादशाही फौजेंत हें वर्तमान समजल्यावर फौज उठोन गेली. असे तपीळ, क्रूर, पुंडावे करून किल्ला बळकावून होते. ते वारले. त्यांस पुत्र निळो नीळकंठ व पिलाजी नीळकंठ व संक्राजी नीळकंठ असे तिघे भाऊ चांबळीकर सरनाईक[४] ब्राह्मण तिघेही भांडूं लागले. निळोपंत याचा व दादाजी कोंडदेव याचा पूर्वी घरोबा चालत होता, त्याजवरून महाराजांशींही स्नेहानींच होते. महाराज राजगडानें[५] निघोन सुपे-देशीं जावें म्हणून पुरंदरावरून चालले. नारायणाचे देवालयाजवळ मुकाम केला. ते समयीं किल्ल्यावरील लोक यांणीं विचार केला जे, " घर-कलह सरनाईक करितात, तेव्हां किल्ला हरकोण्ही घेईल, गमावितील. याकरितां शिवाजीमहाराज थोर व भोंवता मुल्ख त्यांचा, त्यांचे पदरीं पडावें," असा बेत करून त्रिवर्गास बोलले जे, " राजेसाहेबांचा व तुमचे वडिलांचा स्नेह.[६] अनायासें स्वारी जवळ आली, तुम्हीं जाऊन भेट घ्यावी, त्यांचा आदर करावा, त्रिवर्ग भांडतां हें त्यांसि बोलावें, ते सांगतील तसें चालावें, " म्हणून सांगितलें. यावरि त्यांचेही विचारास येऊन, भेटले. महाराजांस राहविलें. त्या दिवसांत

१. ' इकडील तिकडील ' २. २. ' निजाम शाही केला. पादशाही शिबंदी ठेवून चालूं लागले. ' ३. ' तें न ऐके. ' ४. ' चावलीकर नाईक ' ५. ' राजगडचे ' ६. ' घरोबा. '

दिपवाळीचा सण आला. तेव्हां स्नानास किलियावरि बोलाविलें. ते समयीं "चार मातबर सरदार यांस टाकून यावें हें ठीक नाहीं," [ महाराज ] बोलले. तेव्हां 'मानकरी असतील तितके घेऊन यावें,' म्हणून आग्रह केला.[1] त्यावरून किलियावरि गेले. तीन दिवस वरतेच राहिले. ते सणाचे दिवसांत त्रिवर्गाचें प्रकर्ण ऐकिलें.[2] वडील भाऊ दोघांस [ दाद ] लागूं देत नाहीं. त्यारून त्या दोघांचे विचारें महाराज थोर, यांचे पदरीं पडावें, असें राजकारण महाराजांशीं केलें. लोकांचें [ राजकारण ] होतेंच, महाराजांस तेंच कर्तव्य अगत्य जाणून त्यांस हातीं घेतलें व तिघे फर्जंद व लोक सर्व अनुकूल जाले. तिसरे दिवशीं निरोप घेऊन यावें, तों निळोपंत निजावयास गेले हे बातमी उभयतांनीं कळविले.[3] वरील लोक संधानावरि होते. ते व आपले लोक पाठवून निळोपंतास दस्त केलें. आणि त्रिवर्गांसही किल्याखालीं बराबर आणिलें. किल्ला घेतला. किल्याचा बंदोबस्त केला. 'इनामगांव चांबळी व हक्क त्रिवर्गांनीं यथाविभाग घ्यावें[4] आणि सुखरूप राहावें,' [ असें ] सांगून बराबर घेतले. सेवा सांगितली. हिरोजी फर्जंद व हरबाजी व तुळोजी असे तिघे शिपाई जाणोन वाढविले. याप्रमाणें पुरंदर किल्ला फते करून, सुप्यास जाऊन, श्री जेजोरी [ येथें ] देवदर्शन करून राजगडास माघारे आले. जेजोरींत राजवाडा बांधविला.

### राजांनीं परस्त्रीअभिलाष करूं नये.

कल्याण प्रांत पाहावयास स्वारीस गेले. तेथें गेलियावरि मालमावेशा[5] सांपडली ते पाहून, मोजदाद करून राजगडास पाठविली. बहुत द्रव्य पाहून संतोषी जाले. हें पाहून आबाजीपंतीं अर्ज केला जे, "एक स्त्री बहुत सुंदर, लावण्यवति, महाराजांचे सेवेशीं योग्य जाणोन ठेविली आहे." असें बोललियावरि मातबर दरबार करून, आबाजीपंतास 'तुम्ही स्त्री चांगली आहे बोललां ती पाहाण्यास घेऊन येणें,' म्हणून सांगितल्यावरून तिला वस्त्रें भूषणें देऊन आणिली. महाराजांनीं तिला पाहून परम संतोषी जाले आणि बोलले जे, "इचें लावण्य असेंच आमचें मातुश्रींचें असतें, तर आमचेंही स्वरूप असेंच जालें असतें!" याप्रमाणें दरबारांत बोललियावरि सर्वांस आश्चर्य वाटतें जालें. आबाजीपंतांस सांगितलें. "राजांनीं, ज्यांस यश पाहिजे त्यांनीं, परस्त्रीअभिलाष करूं नये; राजानें उच्छिष्ट स्त्री अंगीकारूं नये. परस्त्री-अभिलाष-इच्छेकरून रावणादिक क्षयास गेले. त्यांत राजास प्रजा सर्व अपत्याचे जागां [ होत. ] स्त्रिया करणें तरि शतावधि शक्ति पाहून कराव्या असा राजधर्म आहे." तेव्हां महाराज थोर होत, असें सर्व मानिते जाले. त्या स्त्रीस वस्त्रें अलंकार देऊन तिचा सासरा विजापुरास गेला [ होता ] त्याजकडे पाठविली. जागा चांगली पाहून

---

१. 'सांगितलें' २. 'मनास आणूं लागले' ३. 'कळविल्यावरि, किल्या–'
४. 'खावें' ५. 'माल', 'माल मवेसी'

तेथें इमारत करावी म्हणोन त्याचें काम आबाजीपंतांसच सांगितलें. आणि रायगडास आले.

मोरो त्रिमळ पिंगळे पेशवे नासिक प्रांतीं फौज, सरदार देऊन रवाना केले. त्यांणीं जाऊन सत्तावीस किल्ले बांधारीचे घेतले. त्यांजकडेस तेथील बंदोबस्त सांगितला.

महाराजांनीं आपलीं लग्नें करावीं असें चित्तांत आणून, तीन[1] लग्नें अवकाशें करून दोनतीन वर्षांत केलीं.[1] शरीरसंबंध जाधवराव, मोहिते व गायकवाड [ यांशीं करून ] केलीं.

### मोरे मारिले, जावली फते केली.

चंदेरराव मोरे जावलींत, दाहा हजार लोक पदरीं, तसेच किल्ले व खोरे बळावून होते. महाराजांनीं त्यांशीं सलूक लावून 'तुम्हीं आमचे म्हणावें, आज्ञेंत वागावें, चालावें.' असें राजकारण करविलें असतां, मुदाईनें[2] महाराजांस खातरेंत न आणितां चालूं लागले. याजवरून महाराजांनीं विचार केला जे, "मावळे लोक यांचा सरदार जवळ, पुंड, राजकारणें करून हातीं न लागे; तेव्हां कावेबाजीचे हुनरें हातीं घ्यावा." म्हणून विचार करून त्याजकडे बोलण्यास राघो बल्लाळ सबनीस[3] यांस पाठविलें. शें-दोनशें लोक बरोबर दिल्हे. त्यांणीं जावळीस जाऊन शरीरसमंधाचें बोलणें लाविलें. आणि तेथेंच राहिले. तेथील विचार पाहातां चंदेरराव कैफी पाहिला. लोकांचीही फूट. राजकारण सिध्ध करून महाराजांस सांगून पाठविले जे, "साहेबांचे पुण्यप्रभावें चंदेरराव याचें काम करितों. साहेबीं स्वारी हरएक निमित्यें या रोखें येणें सिध्ध करावें. येथील संकेताप्रमाणें कार्य करून सूचना करितां, तसे घाटाखालीं उतरून यावें." त्याजवरून महाराजांनीं सबनिसाचे लिहिलेंअन्वयें राजगडाहून पुरंदरीं आले. तेथून श्रीमहाबळेश्वराचें दर्शनास गेले असतां, त्या अवसरांत रघुनाथपंतांनीं चंदेरराव (व) त्याचे भाऊ सूर्याजीराव या दोघांस खलबतास म्हणून नेलें. तेथेंच मारिलें. आणि [ पंत ] दरवाज्यास आले. तों लोक कांहीं सावध जाले. थोडे होते. त्यांस मारामार करून, संभाळून आपले लोकांत आले. तेथून निघतां संभाजी कावजी यांनीं मोरे याचे कारभारी हणमंतराव म्हणून नामी सरदार होते, त्यांस मारिलें. महाराज महाबळेश्वरीं होते, तेथें देवाचें दर्शन घेऊन, सूचना येतांच निसणीचे घाटें जावलीस गेले. जावली दोन प्रहरपर्यंत भांडली. नंतर ठाणें घेतलें. चंदेरराव याचें लेंक बाजीराव व कृष्णराव धरिले व कबिलेही धरिले. ते पुरंदरी नेऊन कैदेंत ठेविले. आणि उभयतां पुत्र मोरे पुण्यास नेऊन

---

१.१. 'तीन लग्नें तीस वर्षांत केलीं.' २. 'दुंदाईनें' ३. 'अत्रे कोडीतकर'

दक्षिणेकडे निमजगा आहे तेथें मारिले. कबिले कैदेंत होते ते कांहीं दिवशीं सोडिले. जावली फते केली. शके १५७७. मत्ता बहुत हातीं लागली.

### व्याघ्रगड, प्रतापगड, बेदर, जुनर व चाकण इ.

वासोटा किल्ला घेतला. त्याचें नांव व्याघ्रगड ठेविलें. शिवतरें खोरें तेथें दादाजीपंत म्हणून मोरे यांजकडील राहात होते, ते दस्त केले. तेही खोरें घेतलें. याप्रमाणें मोरे यांचीं ठाणीं, प्रांत होता तो घेतला. नंतर प्रतापगडीं मेट मेढा [ घालून ] बांधिलें होतें ते जागा फार चांगली पाहून किल्ला बसविला. इमारत करविली. त्याचें नांव प्रतापगड ठेविलें. कांहीं दिवस तेथें राहून, तेथील बंदोबस्त करून राजगडीं आले. पुढें बेदरावर स्वारी करावी असा विचार करून, जमाव करून स्वारीस गेले. ते बेदर शहर मारून मालमत्ता घेऊन ठाणीं घेतलीं, व माघारे येते जाले. मधीं प्रांतांत महाल, ठाणीं लुटीत येऊन पोंचले. जुनर व चाकण येथें औरंगजेबाकडील सुभ्यांनीं ठाणीं घातलीं होतीं, तिकडे जाऊन जुनर मारून अंमल बसविला. चाकणचा किल्ला घेतला.

वडिल स्त्री सईबाई-साहेब गुरूदर होतीं, ती प्रसत जालीं. पुत्र जाला. शके १५७९, हेमलंबीनाम संवत्सरे, जेष्ठ शु॥ द्वादशीस. त्याचा समारंभ साकरा वगैरे वांटून, दान धर्म करून, नांव संभाजीराजे असें ठेविलें.

### यदा यदाही धर्मस्य......

पृथ्वीचे ठायीं धर्माची ग्लानी जाली, व देव-ब्राह्मण-यज्ञयागउच्छेद जाला. पृथ्वीस पीडा जाली असतां, पूर्व-युगांतरीं देवांनीं मनुष्यवेषें अवतार धारण करून व महान ऋषि ब्राह्मण भूदेव निर्माण होऊन धर्मस्थापना घडावी; तसेंच कलयुगाचे ठायीं धर्म-उच्छेद जाला असतां ईश्वरीअंशरूप[1] राजे निर्माण व्हावे व ऋषि यांनींही अवतार धारण करून कर्म-ज्ञान-उपासना-कांडत्रयात्मक वेदमार्ग दाहा हजार वर्षेपर्यंत स्थापावा, अशीं विष्णुपुराणादिकांचे ठायीं वचनें आहेत. त्या अन्वयें म्लेंछमय पृथ्वि जाली, सर्व धर्म-उच्छेद जाला, गाईब्राह्मणांस बहुत पीडा जाली. त्यायोगें शिवाजीमहाराज पूर्वी श्रीचें वरप्रदान होऊन निर्माण जाले. त्यांस बुद्धि म्लेंछांचा उच्छेद करावा आणि धर्म स्थापावा जाली असतां, त्यांस साह्य-भूत ऋषीचे अवतार सत्पुरूष सिद्ध असे त्या[2] काळाचे ठायीं बहुत निर्माण जाले. कलियुगाचे ठायीं मुख्य धर्म उपासना, नामस्मरण, कीर्तन, हे सुलभ उपाय. याची[3] स्थापना करून धर्मही रक्षिते जाले.[3]

---

१. ‘ईश्वरी अंशेकरून’ २. ‘पूर्वकालाचे ठायींप्रमाणें’ ३. ३. ‘यांची स्थापनाही ते स्थापिते झाले’

### सज्जनसेवन

चिंचवडाचे ठायीं मोरया देव[1] श्रीगणपति-उपासक, साक्षात्कारीच, गणपतीनें प्रत्यक्ष दर्शन द्यावें, भोजनादि [ कर्मँ ] एके ठायीं घडावीं, असे परम सिद्ध व तपस्वी [ होते जाले. ] त्यांनीं कीर्तन-धर्म व उपासना स्थापिली. निगडी येथें रंगनाथस्वामी व विठ्ठलराव त्यांचे बंधु हे विजापुरीं§ पादशाहाची सेवा करीत असतां, श्रीदत्तात्रेय संप्रदाय, श्री साक्षात्कार असे, रंगनाथस्वामी ब्रह्मचारी व विठ्ठलराव गृहस्थधर्में करून [ होते. त्यांनीं ] उपासना, कीर्तन, भक्ति स्थापिली. औरंगाबादेस[2] वामन जाले. पहिठर्णां निंबाजीबावा हे थोर सिद्ध जाले. तसेच बोधलेबावा जाले. जयरामस्वामी ब्रह्मचर्य-व्रतें व तीर्थें व तपें करून भगवद्भक्तियोग परम सिद्ध कृष्णउपासक दत्तात्रेय शांत सांप्रदायी[3] महायोग्य असे बडगावीं जाले. केशवस्वामी भागानगरीं परम सिद्ध, कीर्तन–भक्ति-ज्ञान-स्थापन जाले. परमानंद बाबा पोलाद-पुरी बहुत योग्य, तपस्वी, सिद्ध जाले. तसेच त्रिंबक नारायणाश्रम बावा जाले. पाटस येथें मौनीबाबा[4] जाले. 'अचलपुरी गोसांवी' परम सिद्ध संगमेश्वरीं जाले. श्रीतुकारामबाबा लोहगांव देहू येथें जन्मान्तर-योगें शूद्रवर्णांत मोरे म्हणून कुळीं उत्पन्न जाले. श्रीपांडुरंगाचे परम भक्त, धुरीण होऊन, पांडुरंगाचा साक्षात्कार प्रत्यक्ष व पूर्ण कृपा त्या योगें अभंगें करूनच सकल धर्म व शास्त्रें पुराणें यांचे प्रमेयरचना करून जगदोद्धार करिते जाले.

### पांडुरंगच शिवाजीमहाराज जाले.

त्यांचें कीर्तन ऐकावें म्हणून शिवाजी महाराज सिंहागडाहून रात्रीस घोड्यावर बसून, दोन हुजरे बराबर घेऊन, पुण्यास येऊन, कीर्तनास ओळख न देतां बसून, कीर्तन ऐकून जावे. असे होत्सातां एके दिवशी नित्याप्रमाणें पुण्यांत वाण्याचें घरीं तुकोबांचें कीर्तन चाललें, शिवाजी महाराज जाऊन कीर्तन ऐकत बसले, तों अविंधाचें प्राबल्य [ असल्यामुळें ] महाराज कीर्तनास येत असतात अशी बातमी अविंधास कळलियावरून, चाकणचे ठाणियांतून दोन हजार पठाण पाठवून ते तो वाडा वेढून उभे राहिले. हें लोकांस कळून कथेंत गलबल जाली. शिवाजीराजे यास धरून न्यावें तरि वोळख पुरून सांपडत नाहींत. याजकरिता सर्वांसच धरून न्यावें, मारावें [ असें ] पठाण बोलूं लागले. तें तुकोबांस कळतांच " सर्व ( जणांनीं ) स्वस्थ बसावें, कीर्तन ऐकावें " म्हणून सांगून श्रीपांडुरंगाचा धांवा केला. शिवाजीराजे भय न पावतां कीर्तन ऐकत बसले. तों इतक्यांत श्रीपांडुरंगांनीं शिवाजीमहाराज यांचें स्वरूप धरून, घोड्यावर बसून, वाड्यांतून पठाणाचे आंगावरून बाहेर निघाले. तें पाहून

१. 'देव धरणीधर' § 'वेदरी' २. 'वारणातीरीं शिंगाटाचे जोश–'
३. 'शाक्त संप्रदाय' ४. 'पाटगांव मानीबोआ'

राजे जातात [ म्हणून ] त्यांचे मागें सारे पठाण लागून गेले. त्यांस अरण्यांत घेऊन जाऊन नाशातें पावविले आणि आणि गुप्त जाले. इकडे महाराज कीर्तन ऐकून आरती जाल्यावरि सिंहगडास निघोन गेले.

## श्रीमारुतीचा अवतार रामदासस्वामी

तसेच सर्व जगाचा उद्धार घडावा म्हणून श्रीमारुतीचा अवतार श्रीरामउपासक[१] अैसेच तदंश श्रीरामदासस्वामी निर्माण जाले.[१] गंगातीरीं जांब म्हणून गांव आहे तेथील वृत्तिवंत कुळकर्णी, परंपरा-श्रीरामभक्त, त्यांत सूर्याजीपंत परम धर्मशील, तपस्वी, श्रीसूर्यउपासक‡ श्रीरामचंद्राची व मारुतीची परम भक्ति करिते जाले. त्यायोगें ब्राह्मणरूपें सूर्य प्रत्यक्ष होऊन दर्शन जालें. रामनवमींत[२] मध्यरात्रीं, श्रीचे देवालयीं साक्षात्कार होईल सांगून प्रसाद देऊन अदृश्य जाले. यांणीं त्याअन्वयें मध्यरात्रीं श्रीमारुतीचे देवालयीं असतां श्री–रामचंद्र–साक्षात्कार होऊन पंचायतन पुजेस दिल्हे व " दोन पुत्र उदरीं होतील ते जग-विख्यात कीर्ति करून जगाचा उद्धार करतील, भगवद्भक्त सिद्ध होतील " [ अशी ] आज्ञा जाली. त्या-अन्वयें दोन पुत्र जाले. ज्येष्ठ ते प्रपंच व परमार्थ दोन्ही करून गृहस्थाश्रमधर्में त्या प्रांतींच परम कीर्ति करून भगवद्भक्त जाले. दुसरे रामदासस्वामी बालविरक्त[३] व्रतबंध जाला असतांच सावधान म्हटलें तेव्हां प्रपंच कशास[४] करावा म्हणून तपश्चर्या अरण्यवास करिते जाले. गायत्री पुरश्चरणें व उपासना, अष्टांग-योगसाधन व ज्ञान संपन्न असे होत्सातें गंगातीराचे ठायीं अरण्यांत फलाहार पर्णाहार, शीतोष्ण-पर्जन्य-सहनादि[५] उग्र तप करिते जाले. तदनंतर पंचवटीस बारा वर्षें राहून उपासना केली. तेसमयीं श्रीरामचद्र दर्शन व मारुतीचा साक्षात्कार होऊन उपदेश जाला. तेव्हांपासून श्रीमारुतीचें नित्य दर्शन, भोजनादि एक ठायीं घडावें असें जालें. तेथें आज्ञा जाली कीं, " तुम्हांस जगदोद्धारास्तव अवताररूपीं निर्माण केलें. तरि जगांत संचार करून जनांस उपासनेस[६] लावावे. शिवाजी राजा धर्मस्थापनेस अवश्य-भूत भीमावतार जाला त्यास साह्य होऊन सहवास करावा. त्यायोगें श्रीकृष्णातीरीं येऊन, चाफळ येथें पर्वतांत घळी आहे तेथें राहून, श्रीकृष्णास्नान व मनाचे श्लोक करून पांच-सात घरीं भिक्षा करावी, एक श्लोक होय तों उभें राहावें, पीठ येईल

---

१.१. श्रीरामदास उपासक कलियुगीं. जसें पूर्वी अगस्तिमुनी श्रीरामउपासना स्थापक झाले, असेंच तदंश श्रीरामदासस्वामी निर्माण झाले. ' ‡ ' श्रीसूर्य उपासना करिते जाले ' २. ' सन १५२६. रामनवमींत ' ३. ' बलत्विच विरक्त ', ' बालविच ', ' बालत्विच ' ४. ' कशाचा ' ५. ' सीतोष्ण पर्जन्यसहना ' ६. ' उपासनामार्ग '

तें खडकावर मिळून पानगे करून भक्षावें. केव्हां निरशनव्रतें पर्वतांतच असावें असे असते जाले.

## ध्रुवाख्यानाचा परिणाम

कोणे एके समयीं महाराज-महाडचे मुकामीं कांहीं कार्याचे उद्देशें असतां तेथें [ एका ] सत्पुरुषाचें कीर्तन जालें. त्यांत ध्रुवाख्यान-कथा जाली. तेव्हां श्री-नारदांनीं ध्रुवास कृपा करून उपदेश केला. त्यायोगें भगवत्साक्षाकार होऊन, या लोकींचें राज्य भोगून, ध्रुवपद प्राप्त होऊन भक्तशिरोमणि मुक्तीस अधिकारी जाले. श्रवण करून आपणांस असे प्रकारें नारदाचे सारखा[1] सत्पुरुष याची कृपा होऊन, आपण म्लेंछ वधून धर्म स्थापावा हा संकल्प केला, हा सिद्धीस जाऊन भगवत्कृपा होय असें घडावें, हा निजध्यास प्राप्त जाला. सर्व सत्पुरुषांचीं दर्शनें घेतलीं, व त्यांचे त्यांचे निर्वाह, उत्साह, महोत्सव अन्नदानें यांची स्वस्थता गांव भूमि आदि करून [ देऊन ] करून दिल्या. सर्वांचे आशीर्वाद घेतले. आणि आपले अंतःकर्णीं तसें आचरण व प्रताप [ व्हावा असें आणिलें.]

## समयानुरूप दर्शन घडेल

पुढें रामदासस्वामी यांची कीर्ति श्रवण केली. त्यांचें दर्शन, प्रसाद व्हावा [ हा ] बहुतच वेध लागला. आणि भेटीविषयीं एक दोन वेळ प्रयत्न केला दर्शन न घडे. कारण पर्वताचे ठायीं असोन निश्चय पाहाणें यास्तव अन्य ठिकाणीं जावें असें जालें. रात्रंदिवस दर्शनाविषयीं चिंतन. तेव्हां एके दिवसाचे [ ठायीं ] स्वप्नगत स्वामींचें दर्शन होऊन प्रसाद श्रीफळ दिल्हें. " तुमचा हेतू सर्व पूर्ण होईल. मनोरथ सिद्धीस जातील. ज्या किल्ल्याचा उद्योग करितां तोही उदयीक[2] हस्तगत होईल. " [ असें ] सांगून अदृश्य आले. हे जागृत होऊन पाहातात तों नारळ हातीं, स्वामी नाहींत ! हें पाहून चित्तवृत्ति बहुत उद्विग्न दर्शनाविषयीं जाली. प्रातःकालीं किल्लाही हस्तगत जाला. तेव्हां आणखी प्रयत्न कोणी पाठवून करविला जे, " आपणास दर्शन द्यावें. नाहीं तरि राज्यत्याग करून येणें प्राप्त " म्हणून हें कसें घडतें, हें चिंतन करिता यांणीं " आम्ही निस्पृह, अरण्यचर, तुम्ही धर्मस्थापक म्हणून तुमचेंच कल्याण चिंतून तुमचे राज्यांत येऊन, वास करून आहों. समयानुरूप दर्शनही घडेल, " [ असें ] सांगितलें.

## 'आम्ही व समर्थ यांत भेद नाहीं.'

नंतर तुकारामबावांस आपण येथें यावें, दर्शन द्यावें.[3] म्हणून पत्र पाठविलें. व श्रीदेव चिंचवडकर यांचेंही दर्शन घेऊन त्यांस वृत्तांत सांगितला. तुकारामबोवा यांनीं

१. ' तपासारिखा ' २. ' उदेक ' ३. ' ध्यावें '

पत्र लिहिलें. अभंग पंचरावीस कडवीं करून "तुम्हीं रामदास यांचे ठायीं निश्चय केला तो दृढ करावा; आम्ही तेच ते, भेद नाहीं; त्यांजपासूनच सर्व कार्यसिद्धि व मनोरथ शेवटास जावे, असेंच निर्मित आहे. तुम्हीं तेथेंच विश्वास ठेऊन आपलें मनोगत पूर्ण करावें." म्हणोन निरोप सांगून कारकून गेले होते त्यांजपाशीं पत्राचें उत्तर अभंग करून पाठविलें तें:-

॥ श्री ॥

विरंचीनें केलें ब्रह्मांड सकळ । तयामाजी खेळ नानायुक्ती ॥ १ ॥
युक्तीचे बाळक[1] तपोनिष्ठ ज्ञानी । गुरु-भक्ति मानीं विश्वासेंसी‡ ॥ २ ॥
ऐसा[2] तुझा प्रेमा कळे[3] कांहीं एक । पाहोनियां लेख पत्रिकेचे ॥ ३ ॥
शिवनाम तुझें ठेविलें पवित्र । छत्रपति सूत्र विश्वाचें कीं ॥ ४ ॥
व्रत तप नेम योग ध्यान कळा । करोनि मोकळा जाहालासि तूं ॥ ५ ॥
हेत लागला हा आमुचेया भेटी । पत्रामाजी गोष्टी हेचि[4] थोरी ॥ ६ ॥
याचें हें उत्तर ऐकें गा भूपती । लिहितों विनंती हेताचि हे ॥ ७ ॥
अरण्यवासी आम्ही फिरूं उदासीन । दर्शन हें हीन अमंगळ ॥ ८ ॥
वस्त्रावीण काया झालीसे मळीण । अन्नरहित जिणें फळाहारीं ॥ ९ ॥
रोड हात पाय दिसे अवकळा । काय तो सोहळा दर्शनाचा ॥ १० ॥
तुका म्हणे माझी विनंति सलगीची । वार्ता हे भेटीची करूं नको ॥ ११ ॥

ऐसी माझी वाणी दीनरूप पाहें । करुणा त्या आहे हृदयस्थासीं ॥ १ ॥
नव्हों केविलवाणे नाहीं आम्ही दीन । सर्वदा शरण पांडुरंगा ॥ २ ॥
पांडुरंग आम्हां पाळिता पोशीता । आणिकाची वार्ता काय तेथें ॥ ३ ॥
तुझी भेटी घेणें काय हो मागणें । आशेचेंही शून्य केलें तेणें ॥ ४ ॥
निराशेचा गांव दिधला आम्हांसी । प्रवृत्ति भावासी सांडियेली ॥ ५ ॥
पतिव्रतेचें मन पतीसच भेटों । तैसे आम्हीं विठोमाजी नांदों ॥ ६ ॥
विश्व हें विठ्ठल नाहीं कांहीं दुजें । देखणें हें तुझें तुजमाजी ॥ ७ ॥
तुजही विठ्ठल व्हावा ऐसा वाटे । परी एक मोठें आडवेंची ॥ ८ ॥
सद्गुरू श्रीरामदासाचें भूषण । तेथें वालीं मन चळूं नको ॥ ९ ॥
बहुस्थानीं वृत्ति चाळविल्या जेव्हां । रामदास्य तेव्हां घडे कैंवी ॥ १० ॥
तुका म्हणे बापा चातुर्य-सागरा । भक्ति एक थारा भाविकांसी ॥ ११ ॥

याप्रकारें करून तुकारामबावांचें उत्तर आलें. चिंचवडचे श्रीदेव यांचें दर्शन घेऊन त्यांसही प्रश्न केला कीं, "आमचा मनोरथ श्रीनारदांनीं ध्रुवास कृपा केली,

---

१. 'चाळक', 'तपाचे' ‡'विश्वासेंची' २. 'तैसा' ३. 'कल्प' ४ 'हाचि'

तैशी सद्गुरुकृपा घडावी. आम्हीं चित्तीं धरिला धर्म सिद्धीस जाऊन श्रीहरिप्राप्ति व्हावी." तेव्हां त्यांनीं सांगितलें, "रामदासस्वामींचे ठायीं निश्चय धरावा, तुम्हीं चित्तीं धरिले तसे अधिकार सर्व गुण तपेंकरून ज्ञानभक्तियोगें उपासनेंकरून पूर्णत्वास येऊन सिद्ध-दशाप्राप्त जाली. आम्हां सर्वांस मान्य, वंद्य आहेत. तुमचे मनोरथ त्यांजपासून सिद्धीस जाणार." याजवरून बहुत उद्युक्त जाले असतां, यांचा वेध पाहून, स्वामींनीं पत्र पाठविलें तें :—

"निश्चयाचा महामेरू। बहुत जनांसि आधारू ॥
अखंड स्थितीचा निर्धारू। श्रीमंत योगी ॥ १ ॥
परोपकाराचिया राशी। उदंड घडती जयासी ॥
तयाचे गुणा[1]-महत्त्वासी। तुळणा कैंची ॥ २ ॥
नरपति हयपति गजपति। गडपति भूपति जळपति ॥
पुरंदर आणि शक्ती। पृष्ठभागीं ॥ ३ ॥
यशवंत कीर्तिवंत। सामर्थ्यवंत वरदवंत ॥
पुण्यवंत नीतिवंत[2]। जाणता राजा ॥ ४ ॥
आचारशीळ विचारशीळ। दानशीळ धर्मशीळ ॥
सर्वज्ञपणें सुशीळ। सर्वांठायीं ॥ ५ ॥
धीर उदार सुंदर। शूर सत्क्रियेसी § तत्पर ॥
सावधपणें नृपवर। तुच्छ केला[3] ॥ ६ ॥
तीर्थ-क्षेत्रें तीं मोडिलीं। ब्राह्मण-स्थानें भ्रष्ट जाली ॥
सकळ पृथ्वी आंदोळली। धर्म गेला ॥ ७ ॥
देव-धर्म-गो ब्राह्मण। करावयासी रक्षण ॥
हृदयस्थ जाला नारायण। प्रेरणा केली ॥ ८ ॥
उदंड पंडित पुराणिक। कवि[4] वैदिक याज्ञिक ॥
धूर्त तार्किक सभानायक। तुमचे ठायीं ॥ ९ ॥
या भूमंडळाचे ठायी। धर्म रक्षा[5] ऐसा नाहीं ॥
महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं। तुम्हांकरितां ॥ १० ॥
कांहीं धर्म-कृत्यें चालती। आश्रित होऊन कितेक असती।
धन्य धन्य तुमची कीर्ती। विश्वीं विस्तारली ॥ ११ ॥
कितेक दुष्ट संहारिला। कितेकासी *धाक सुटला*।
कितेकासी आश्रयो जाला। शिव कल्याण राजा ॥ १२ ॥

---

१. 'गुणे' २. 'जयवंत' § 'क्रियेची' ३. 'केले' ४. 'कवेश्वर'
५. 'धर्मरक्षिक', 'धर्म रक्षी'

तुमचे देशीं वास्तव्य केलें । परंतु वर्त्तमान नाहीं घेतलें ।
रुणानुबंधें विस्मरण जालें । काय नेणो ।। १३ ।।
सर्वज्ञ-मंडळीं धर्ममूर्ति । सांगणें काय तुम्हांप्रति ।
धर्मस्थापनेची कीर्ती । सांभाळिली पाहिजे ।। १४ ।।
उदंड राजकारण तटलें । तेथें चित्त विभागलें ।।
प्रसंग नसतां लिहिलें । क्षमा केली पाहिजे ।। १५ ।। ”

### समर्थदर्शन व अनुग्रह

याप्रमाणें पत्र आलें. याजवरून महाराज यांस निश्चय जाला कीं, “ या उपरि स्वामींचें दर्शन घडतें, कृपा करितात. ” म्हणून चाफळीं जाऊन पर्वतांत गेले असतां स्वामींची भेटी अकस्मात् जाली. ते समयीं साष्टांग नमस्कार केला. स्वामींनीं मस्तकीं हात ठेऊन उठविलें, आणि आशीर्वाद दिल्हा जे, “ सर्व मनोरथसिद्धि होईल. ” ते समयीं राजे यांणीं प्रार्थना कीं, “ अनुग्रह-प्रसाद घडावा. ” तेव्हां स्वामींनीं उत्तर केलें कीं, “ आम्ही निस्पृह, अरण्यचर, तुम्हीं या छंदीं पडो नये. ” तेव्हां स्वामींनीं उत्तर केलें कीं, “ याबद्दल राज्यत्याग करीन. स्वामीपरता लाभ मानीत नाहीं. ” असा दृढनिश्चय व भाव पाहून महाराज बहुत संतोषी होऊन तृषाक्रांत जाले जाणून ते तेथेंच कुबडीनें खाणून उदक केलें. तें घ्यावें, सांगितलें. यांणीं चूळ भरून नेत्रांस लाविलें. आणि खालीं सिंगणवाडी येथें आंबराईंत आले. महाराजांस स्नान करवून श्रीमारुतीस अकरा नमस्कार करविले. आणि उपदेश केला. नंतर चार घटका उभयतांचा एकांत जाला. तें वृत्त ते व तेच जाणत. महाराजांनीं लक्ष रुपयांचे होन, मोहोरा, पुतळ्या अशी खिचडी करून, त्यांत कांहीं मोतीं रत्नें घालून स्वामींस अभिषेक-पूजा केली ती सर्व सुवर्णाचीच केली. तें द्रव्य स्वामींनीं त्या काळीं अरण्यांत उधळून दिल्हें आणि सर्व गुराखी पोरें बोलावून जमा करून लुटण्यास[1] सांगितलें. त्या स्थानीं अद्यापि कोण्हास कांहीं [ मोहोर, पुतळी ] असें एखादे समयीं सांपडतें. त्यानंतर वानरें भोंवतीं होतीं, त्यांत एकास प्रसाद आणण्यास आज्ञा केली.[2] त्याणीं झाडावर जाऊन दोन आंबे आणिले, ते दिले [ तेव्हां महाराज म्हणाले. ] “ सेवा व नित्य सहवास घडावा,[3] राज्य संपादिलें त्यांतील उपभोग [ स्वामीकडून ] माझे हातीं घडावा, येविषयीं आज्ञा व्हावी. ” तेव्हां “ उपाधीचें [ आम्हांस ] कारण नाहीं. अरण्यवास, पर्वतवास करणें हा सोडावयाचा नाहीं. ” [ असें स्वामींनीं ] म्हटल्यावरून “ कांहीं तरी सेवा घ्यावी, ” [ असा ] आग्रह केला, ते समयीं “ अकरा मारुती यांस पूजा, नैवेद्य यांसाठीं अकरा बिघे जमीन याप्रमाणें त्या गांवचे गांवीं देऊन पूजा करवावी. जेथें श्रीराम-

१. ‘ नेण्यास ’ २. ‘ आण सांगितलें. ’ ३. ‘ होत असावा, ’

स्थापना, भक्ति, तेथें उत्साह, पूजा, नैवेद्य साहित्य करीत असावें " [ अशी ] आज्ञा केली. आणि " सर्वही सेवा तुमचे हातें यथावकाशें घडेल. पूर्वी श्रीकुल-देवता वर जाला तोच भीमावतार तुम्ही. संकट समयीं श्रीदेवीचें स्मरण करावें. हृदयस्थ होऊन आज्ञा करील तसें करीत असावें. नित्यनेम चालवावे. परमार्थग्रंथ दासबोधाचें अवलोकन अथवा श्रवण करीत[1] असावें[1] मानसपूजा, सगुण-मूर्ति-पूजा, जप, व तीर्थ-सेवन असे पांच नेम चालवावे. शास्त्रें वेद यांणीं धर्म स्थापिले तसे दृढ चालावे. समागमही इच्छाल तेव्हां घडेल. " याप्रमाणें आज्ञा करून घोड्याची लीद पडली होती ती वोंजळ[2] भरून पदरीं घातली, आणि लेंड्या मोजविल्या. आठ होत्या. त्या पाहून ऐशीं हजार [ घोडीं यांची ] पागा होईल, आणि यवन, दीपावर पतंग तसे, क्षयास जातील. " अशी आज्ञा करून निरोप दिल्हा. ते समयीं कल्याण शिष्य[3] समीप होते, त्यांस आज्ञा केली कीं, " तुम्हीं बराबर[4] जाऊन श्रीरामचंद्रजीचें दर्शन राजे यास[5] करवावें व श्रीस आमची प्रार्थना सांगावी जे, " राजे यांस तुरा प्रसाद द्यावा. " त्याजप्रमाणें येऊन पूजा करून प्रार्थना केली, तों श्रीचा तुरा मस्तकींहून घरळून[6] खालीं आला. महाराजांनीं घेऊन कृतकृत्य जाले. नमस्कार घातला. या रीतीनें महाराजांस अनुग्रह जाला. शके १५७१, विरोधीनाम संवत्सरे वैशाख शु ॥ ९ मु० चाफळ येथें. पुढें स्वामींच्या आज्ञेप्रमाणें भक्तिनेमनिष्ठाज्ञानपरमार्थराज्यवैभव [ यांचा ] दिवसेंदिवस उदय प्राप्त होत जाला. ज्या काळीं स्मरण करावें तेव्हां तत्काल एकांतीं व स्वप्नगत श्रीस्वामींचें साद्दश्य दर्शन घडावें. कल्याणस्वामी वगैरे शिष्य त्यांतच यांचीही गणना होती जाली. यांस राजनीति व क्षत्रधर्म[7] म्हणून ग्रंथही अवलोकनास पाठविले. आणि " मुख्य प्रजापालन, धर्म-स्थापन त्या अंगें राज्य-उपभोग सेवन करावे, हाच तुम्हांस मुख्य योग व तपश्चर्याही तुमची येणेंकरूनच सफळ होय. सर्व जनांचें पोषण करून धर्मेंकरून राज्य [ कर्ते ] होत्साता श्रीची भक्ति करीत असावें. " अशी आज्ञा जाली. ती मान्य करून महाराज प्रतापगडीं येते जाले.

## तुकारामबुवांचें उत्तर व निरोप

नंतर [ प्रतापगडाहून ] श्रीतुकारामबावांकडे पत्र व कारकून पाठविले जे, " आपण एक वेळ कृपा करून येऊन दर्शन द्यावें. श्रीरामदासस्वामींनीं कृपा करून मनोरथ सिद्धीस नेले, सनाथ केले. हें सर्व वृत्त आपणांस निवेदन करण्याचा हेतू बहुत लागला आहे म्हणोन. " त्या वरून " शीघ्र कालें, करणें करून, भेटी होणें ते सहज रीतीनें होईल " म्हणून सांगून पाठवून, उत्तर अभंग करून पाठविले ते :—

१.१. ' कांहींतरी करावे ' २. ' वोझळ ' ३. ' गोसावी ' ४. ' राजासमागमें ' ५. ' टेकावरि ' ६. ' घरट्न ' ७. ' क्षात्रधर्म व राजधर्म '

तुम्हांपाशीं आम्हीं येवोंनिया काय । वृथा शीण होय चालण्याचा ॥ १ ॥
मागावें हें अन्न तरि भिक्षा थोर । वस्त्राचिये थार चिंध्या बीदी[1] ॥ २ ॥
निद्रेसि आसन उत्तम पाषाण । वरी तें प्रावर्ण आकाशाचें ॥ ३ ॥
तेथें काय करणें कवणाची आस । वायां होय नाश आयुष्याचा ॥ ४ ॥
राजगृहा यावें मानाचिया आशे । तेथें काय वसे समाधान ॥ ५ ॥
रायाचिया वरीं भाग्यवंतां मान । इतरां सन्मान नाहीं तेथें ॥ ६ ॥
देखोनीया वस्त्राभूषणाचे जन । तात्काळ मरण येतें आम्हां ॥ ७ ॥
ऐकोनीयां मनीं उदास व्हाल जरी । तरी आम्हां हरि उपेक्षीना ॥ ८ ॥
आतां हेंचि तुम्हां सांगेन कौतुक । भिक्षे ऐसें सूख नाहीं नाहीं ॥ ९ ॥
तप-व्रत-याग महा भले जन । आशाबद्ध हीन वर्तताती ॥ १० ॥
तुका म्हणे तुम्ही श्रीमंत नांवाचे । पूर्वील दैवाचे हरिभक्त ॥ ११ ॥

आतां एक योग साधावा हा नीट । भल्याचा हा वीट मानूं नये ॥ १ ॥
जेणें योगें तुम्हां लागूं पाहे दोष । ऐसा हा सायास करूं नको ॥ २ ॥
निंदक दुर्जन सांगातें असती । त्यांची युक्त चित्तीं आणूं नको ॥ ३ ॥
परिक्षावे कोण राज्याचे रक्षक । विवेकाविवेक पाहोनियां ॥ ४ ॥
सांगणें नलगे सर्वज्ञ तूं राजा । अनाथाच्या काजा साह्य होसी ॥ ५ ॥
हेंचि ऐकोनियां पाऊं समाधान । आतां या दर्शना काज नाहीं ॥ ६ ॥
घेवोनिया भेटी कोण हो संतोष । आयुष्याचे दिवस गेले गेले ॥ ७ ॥
एकदोनी कर्में जाणोनीयां वर्में । आपुलीया श्रमें राहें आतां ॥ ८ ॥
कल्याणकारक अर्थ याचा एक । सर्वांभूतीं देख एक आत्मा ॥ ९ ॥
आतां रामीं मन ठेऊनीयां राहें । रामदास पाहें आपणची ॥ १० ॥
तुका म्हणे राया धन्य धन्य स्थिति । त्रैलोक्यीं हे ख्याति कीर्ति तूझी ॥ ११ ॥

आतां हे विनंति प्रधान-अष्टका । प्रभूसी विवेका ऐशा सांगा ॥ १ ॥
प्रतिनिधि मनरंजक[2] चतुर । सात्विकाचें घर तुम्हांपाशीं ॥ २ ॥
मजुमूचे धणी लेखन-कारक । पत्रींचा विवेक समजावा या ॥ ३ ॥
पेशवे सुरनीस चिटणीस डबीर । राजाज्ञा सादर सेनापति ॥ ४ ॥
भूषणपंडित विद्या अध्ययन । वैदिका नमन माझें असो ॥ ५ ॥
पत्राचा हा अर्थ अंतरीं जाणोनी । श्रवणीं विवंचोनि घाला राया ॥ ६ ॥
सात्विक प्रेमळ दृष्टांतांचें मत । बोलावें बहुत कळावया ॥ ७ ॥
यथास्थित नेम सांगणें ते राया । अर्थ पाहावया नेदां भीड ॥ ८ ॥
भीडे ऐसा बोल गाळुनीया अर्थ । अनर्थकारी तुम्हां होईल तें ॥ ९ ॥

१. ‘ बिंदीं ’ २. ‘ मनरक्षक ’

सत्यवंशीं[1] जन असाल भूषण । अर्थ हा सांगणें वाचोनियां ।। १० ।।
तुका म्हणे तुम्हां नमन अधिकाऱ्यां । सांगावें तें राया पत्र माझें ।। ११ ।।

राया छत्रपति ऐकावें वचन । रामदासीं ध्यान लावा वेगीं ।। १ ।।
रामदासस्वामी सोयरा सज्जन । त्यासि तनुमन अर्पी बापा ।। २ ।।
मारुतीअवतार स्वामी प्रकटला । उपदेश केला तुजलागीं ।। ३ ।।
रामनाममंत्र तारक केवळ । जालासे शीतळ उमाकांत ।। ४ ।।
उफराठीं नामें जपतां वाल्मीक । जाला पुण्यश्लोक तात्काळिक ।। ५ ।।
तेंच वीज त्यासि वसिष्ठ उपदेश । त्याहून विशेष काय आहे ।। ६ ।।
आतां धरूं नको भलत्याचा संग । राम पांडुरंग कृपा करी ।। ७ ।।
धरूं नको आस आमुची भूपाळा । रामदासीं डोळा लावीं वेगीं ।। ८ ।।
तुझी चाड नाहीं आम्हां छत्रपती । आम्ही पत्रपति त्रैलोक्याचे ।। ९ ।।
चारी दिशें आम्हां भिक्षेचा अधिकार । नेमिली[2] भाकर भक्षावया ।। १० ।।
पाडुरंगीं आमुची झाली पूर्ण भेटी । हातांत नरोटी दिधली देवें ।। ११ ।।
आतां पडूं नको आमुचिया काजा । पवित्र तूं राजा रामभक्त ।। १२ ।।
विठ्ठलाचे दास केवळ भिकारी । आम्हां लागीं हरि उपेक्षीना ।। १३ ।।
शरण असावें रामदासा लागीं । नमन साष्टांगीं घाली त्यासी ।। १४ ।।
तुका म्हणे राया तुज असो कल्याण । सद्गुरू शरण असे बापा ।। १५ ।।

याप्रकारें उत्तर व निरोप आलियावरि बहुत समाधान पाउन कृतार्थ जाले. स्वामींनीं आज्ञा केली, त्याअन्वयें परामार्थ व प्रपंच, राज्य, प्रजापालन, धर्मस्थापन, करिते जाले. पृथ्वीचे ठायीं दिगंत कीर्ति संपादन करून श्रीरामदासस्वामींचे अनुग्रहें हे संत मंडळींत[3] परम पवित्र यांत गणना, योग्यता, ऐसे जाले.[3]

याप्रमाणें राज्य–आक्रमण उपदेशकथन–प्रकरण समाप्त.

---

१. ‘सत्य तुम्हीं’ २. ‘नमिळे’

३.३ ‘संत मंडळींत’ यापुढें ‘परम पवित्र अशी योग्यता संपादिली. याप्रमाणें राज्य संपादून सत्कीर्ति व्यय धर्म करून करिते झाले. आणि म्लेंछ यांचा पराभव करून गोब्राह्मणांस पीडा होती ती दूर करून धर्म स्थापिला आणि राज्य संपादिलें. तें राज्य कर्माप्रमाणें चालविण्यासारखीं मनुष्यें योजून त्यांजवर आपण पाहात; आणि कांहीं परत्र साधन करावें याकरितां साधूंचा सहवास, वरचेवर जाणे येणें, तेंही करीत; आणि श्रीरामदास स्वामींनीं उपदेश केला व त्यांनीं नित्य नेम सांगितल्याप्रमाणें गुरु–आज्ञा मान्य करून करीत. या योग्य सर्वांसच गणणें. स्वस्थ अंतःकरणें करून स्वामींचे चरणीं दृढनिश्चय झालेवरून योग्य झाले.’

## प्रकरण तृतीय

# अफजलवध–नानाप्रकारें यवनाशीं युद्ध

श्रीशिवाजीमहाराज यांणीं महाराष्ट्र–राज्य आक्रमण करून राज्य चालविण्याची मर्यादा राजनीतिप्रमाणें केल्या.[१] श्रीरामदासस्वामींची कृपा होऊन उपदेश व्हावा इच्छिलें. तेही मनोरथ सिद्धीस गेले. यानंतर प्रतापगडीं इमारत बहुत चांगली केली. यांतच महाबळेश्वर येथील देवळाचा जीर्णोद्धार व श्रीकृष्णा–उगमाचें देवालय व पोवळीं केली.[२]

### अफजलखानाची प्रतिज्ञा : फौजेसह निघाला.

[ इकडे ] बेगम बडेसाहेबीण व अली इदलशाहा पादशाहा यांणीं, " शिवाजी राजे बहुत आफरी जाले; प्रांत, किल्ले, कोट घेतले; बेदरपर्यंत स्वारी करूं लागले; त्यांजवळ फौज, लोक व खजिनाही फार जाला; याचा विचार, पोख्त मनसबा मसलत करून कोण्ही उमराव[३]सरदार पाठवून त्याचें पारिपत्य केल्यावांचून ठीक नाहीं. बापाचेंही ऐकत नाहीं, कसें करावें ? " ते समयीं अफजलखान यांणीं प्रतिज्ञा केली कीं, " शिवाजीचा मजकूर इतका कशास पाहिजे ? आपणास आज्ञा करावी म्हणजे जाऊन धरून आणितों. किंवा मारून टाकितों. " याप्रमाणें बोलल्यावरि पादशाहांनीं नवाजीस करून, वस्त्रें बहुमान देऊन व फौज वगैरे सामान[४] पोख्त देऊन त्याची[४] रवानगी केली.

तेव्हा[५] पायदळ मावळे लोक त्या प्रातांतील माहीतगार नवे[६] तीन हजार ठेवून एकंदर तीस हजार जमावानिशी अफजलखान मोठे अहंकारें करून, निघोन दरमजल येतां तुळजापुरीं श्रीदेवीस उपद्रव करणार, तों देवी भोपे यांणीं पळविली. पुढें पंढरपुरीं आले त्याही स्थळीं उपद्रव केला. परंतु देव बडवे यांणीं लपवून ठेविला.[७] तेथून महादेवाचे रोखें देवब्राह्मणांस उपद्रव करीत जवळ आला.

### महाराज प्रतापगडीं आले : वकील आला

[ त्यावेळीं ] महाराज राजगडीं होतें. मोंगली फौज, झुंज बाहेर घेणें चांगलें नाहीं, म्हणून सर्व कारभारी वगैरे मेळवून विचार ठरविला. आणि राजगडचे निघोन

---

१. ' बहुत चांगली करून ' २. ' ऐसी इमारत करविली. ' ३. ' उमदा ' ४. ४. ' तोफखाना, लवाजमा ऐसें देऊन खानाची, ' ५. ' ते १५–२० हजार फौज व ' ६. ' असावे म्हणून ' ७. ' राखला. '

प्रतापगडास आले. तमाम किल्लेकोटांचा बंदोबस्त करून पागा वगैरे जमा केल्या. प्रतापगडास गेले,

हें वर्त्तमान खानास कळतांच पुण्याकडील रोख सोडून[1] इकडेच जाण्यास[2] ते मजल दरमजल येऊन वाईस राहिले आणि विचार केला जे, "शिवाजी राजे झाडींत शिरले. त्यांस हुनरेंकरून [ बाहेर ] काढावें अथवा इतबार पडेल तसा पाहून समक्षता जाली म्हणजे जसें कळेल तसे रीतीनें पादशाही चाकरी करून दाखवावी." ऐसा कापट्यविचार करून वकिलीस कृष्णजी भास्कर यांसि सविस्तर मनांतील बेत मनसबा कळवून सांगून पाठविलें.

### महाराजाचे आंगीं देवीचा आयुर्भाव [ आविर्भाव ]

इकडे महाराजांनीं अफजल वाईस येऊन भिडले म्हणून सर्व मुतसदी व सरदार जमा करून "याशीं कोणते प्रकारें लढाई द्यावी, विचार कसा करावा, कावेसींत कसें आणावें; मोंगली फौज, प्रथमच समरांगणीं गांठ घालून लढाई दिली तरि माणूस फार खराब होईल. यास्तव आपले लोक कायम राहून त्याचा नाश होय ऐसा हुनर जाला पाहिजे. आम्हीं राज्य सोडविलें, शहरें मारलीं, स्वारीशिकारी करितों तें निराळें. हे पठाण जात हट्टी, उभे राहून, आडून माणूस खराब करितील. यास्तव हुनरेंकरून[3] जेर करावा," हा विचार चांगला, जाणोन[4] श्रीदेवीची प्रार्थना केली. ते समयीं देवी महाराजांचे आंगीं आयुर्भाव होऊन सांगितलें जे, "अरे मुला, तू चिंता कां करितोस ? तुजला वर माझा आहे. हें अरिष्ट दूर करीन. तुजला हे शिकारच साधून देतों. चिंता न करणें." [ असें ] आश्वासन दिल्हें. याप्रमाणें महाराजांचे आंगीं श्री [ नें ] आयु [वि] र्भाव करण्यास आरंभ करील[5] तेव्हां[5] बाळाजी आवजी चिटणीस व वाकेनीस यांनीं[6] असोन लेहून ठेवून नंतर दाखवीत जावें. असें सांगितलें होतें[7] त्याप्रमाणें संचार होऊन सांगितलें. तें दाखविलें तें पाहून[8] फारच हर्ष पाऊन बोलते जाले जे, 'अफजलाचें काम आपण करितों. चिंता नाहीं. श्रीनींही आश्वासन दिल्हें; तेव्हां फते होती. आमचे मनाचा उल्हास व शुभचिन्हें यश येण्याविषयीं दिसतात, कारभारी व शूर यांचा उत्साह दिसतो." असें प्रकारें बोलल्यावरि सर्वांची सला [ हेच ] पडली जे, "महाराजांचे मनांत करणें येतें तें आम्हांसही अवघड वाटत नाहीं. अफजलाचा मजकूर काय आहे ? जर[9] समरांगणीं

---

१. 'टाकून.' २. 'जावें म्हणून.' ३. 'हुनरच करून'. ४. 'म्हणून'. ५.५. 'केला म्हणजे'. ६. 'यांस सांगितलें [ होतें ] जे 'जे समयीं अंगांत संचार होऊन [ देवी ] सांगेल तें' ७. 'तिसरें यांस कळों नये; याप्रमाणें नेम करून दिल्हा [ होता. ]' ८. 'महाराज सावध होऊन, देवाचें सांगणें ऐकून घेऊन.' ९. 'महाराज'

युद्ध करण्यास[1] आज्ञा होईल[1] तरी करून. कावेशींत आणून. घेरून. तोडणी लावून. धरून जेर करा म्हटलें तरी करून. महाराजांनीं स्वस्थ किल्ल्यावरी असावें" या प्रकारें उमेदीनें व एकविचारें बोलते जाले.

### वकिली डावपेंच

तों खानाकडील वकील येऊन पोहोंचलें. कळलियावरि परवानगी देऊन किलियावरि भेटीस नेले. भेट जालियावरि आगतस्वागत विचारून राहण्यास स्थल पार येथें खालीं दिल्हें. [ आणि ] सावकाशपणें सविस्तर बोलणें होईल[2] म्हणून राहाण्याचे जाग्यास पाठविलें. आणि त्यांची मुदारत फार चांगली आदरपूर्वक करविली. चौकी, माणसें ठेवून बंदोबस्त केला. दुसरें दिवशीं महाराजांनीं सर्व मातबर सरदार व सरकारकून बोलावून[3] दरबार करून वकिलास बोलावणें करून आणविलें. आणि बोलण्यासि प्रारंभ केला कीं, "खान कां आले? काय मनसबा चित्तांत आहे? मार्गीं येतां देवब्राह्मणांस व प्रांतास उपद्रव फार केला!"

तेव्हां याणीं उत्तर केलें कीं, "खानांचें सांगणें आहें कीं, 'तुमचे वडील आणि आम्ही एक पादशाहींतील[4] असोन[4] उभयतांचा[5] स्नेह, भाईचारा; दुसरा विचार नाहीं. तुम्ही त्या पादशाहींतील उमराव असोन किल्लेकोट घेऊन शहरें मारितां, पादशहास रुजू होत नाहीं, हे पुंड-पाळेगारी करितां. वरकड, पादशाहाचे मनांत शाहाजी राजे यांचा बेटा बहुत मर्द, कावील जाला आहे. आम्हांस संतोष जाला आहे. यास्तव आमचेकडे[6] प्रांत घेतला तो त्यानें सोडावा, दुसऱ्याचा घेतला तो त्याकडेच राखावा.[6] आमचे पदरीं पूर्वीपासून शाहाजी राजे असोन आम्हीं वाढविलें व [ त्यांचें ] चालविलें. त्यांचे बेटे हे. यांस मोठी योग्यता देऊन मोठीं कामें त्यांचे हातून[7] घ्यावी.[7] त्यांनीं येऊन भेटावें. आज्ञेंत चालावें. बापाचा कह्या मानीत नाहींत, पादशाहींतही हुकुमांत नाहींत, ऐसें नसावें. त्यांजवर कृपा करून याहून विशेष, सर्व वजिरी त्यांचेच स्वाधीन करून चालावें, ऐसें आहे. हें जाणोन खानास तुम्हांकडे पाठविलें. तुम्ही बेकैदी करितां, हें वांकडें पादशहास वाटून खानांस तुम्हांस सर्व गोष्टी सांगून घेऊन यावें म्हणोन पाठविले आहेत. खानांचें म्हणणें कीं, "जाली गोष्ट बरी; याजउपरि तुम्ही पादशाहाचें आज्ञेंत सरळ चालले असतां आम्ही सर्व गुन्हे माफ करऊन हे मनसब सरंजाम व आणखी

१. १. 'करा म्हणतील'. २. 'भोजनोत्तर बोलणें होईल'. ३. 'जमा करून' ४. ४. 'पादशाहीचे चाकर'. ५. 'तुमचे वडिलांचा आमचा'. ६.६. 'याणीं असें न करितां [चालावें.] प्रांत सोडविला आपले पादशाहीं-तील. तो त्यांचाच आहे, दुसरे पादशाहींतील [ प्रांत ] सोडविले ही मोठी गोष्ट केली.' ७. ७. 'हातीं द्यावी.'

विशेष करून देण्याचा जिमा आमचा आहे. येविषयीं पाहिजे तशी खातरजमा करून घ्यावी आणि भेटीस यावें. तुमचे वडील पादशाही मनसबदार. तुम्ही गुन्हेही केले असतां त्यांजवर कृपा करून जागीर चालवितात. त्याहून अधिक तुमचें चालवूं."

याअन्वयें बोलणें पडल्यावरि [ महाराजांनीं ] सर्व ऐकून घेऊन, "बहुत चांगलें आहे; खान म्हणतात हे आमचे बऱ्याचीच गोष्ट म्हणतात; आम्हांसही हेंच कर्तव्य. आम्हीं केलें तें – कित्येक पुंड पाळेगार मोडिले व सरकारी मुलूक याची आबादानी, बंदोबस्त केला. दुसरे पादशाहींतील मुलूक घेतला व किल्ले वगैरे बांधिले. लोक फौज नामी म्हणून माणूस जमा केले. हे सर्व पादशाहाचीच दौलत वाढविली आहे." म्हणून निरोप दिला. वकील बिराडास गेले.

दुसरें दिवशीं [ वकिलास ] आणखी एकांतीं नेऊन, "तुम्हीं ब्राह्मण आणि भले आहां. आम्हीं राज्य महाराष्ट्र करून, धर्म बुडाला,[1] देवब्राह्मणांस पीडा, सर्व म्लेंछमय[2] जालें, गाईस अपरिमित पीडा होतात, हें [ सर्व ] दूर करणेयास तुम्हीं अनुकूल असल्यास खानाचें अंतःकरण व मनसबा काय आहे तो अकृत्रिमपणें सांगावा. तुम्हांशीं आमचा दुसरा विचार नाहीं." ऐसें [ राजे ] बहुत गौरव करून युक्तीनें बोलले. यानंतर वकील ब्राह्मण, "राजा धर्मरक्षक होणार, याचें दैव व पराक्रम व माणसें विचित्र दिसतात व पुण्य व तेजही विचित्र दिसतें. यास्तव हें वृद्धीसच पावावें," म्हणून मनांत येऊन, "खानाचा विचार भेटी जशी घडेल तशी निखालसता करून देऊन घ्यावी, आणि त्यांतच दगाबाजी करावी, हेच चित्तांतील खंबिरी दिसोन येते," म्हणून सांगितलें.

## 'हरतऱ्हां करून खानास भेटीस आणणें'

याजवरि महाराजही अवतारी पुरुष, सर्व जाणतें. तें बोलणें ऐकून "हा त्यांचा मनसबा, तरि 'धर्मोवर्धति[3]' प्रमाण आहे, तरि यांतच आमचा मनसबा देव सिद्धीस नेईल. आम्हीही भेटींतच त्यांचा विचार करूं. श्रीचे कृपें कार्य करूं. याउपरि आम्हांकडील बोलणें पूर्वी सांगितलें त्या अन्वयें [ करून ] आम्हांसही पादशाहाची सफाई करणें जरूर. येविशीं किलाफ वाढले[4] ते दूर होण्याची खंबिरी खानांनीं आमची खातरजमा करून द्यावी.[5] [ ती ] खान यांणीं भेटून समक्ष बोलणें जाल्यावांचून होणार नाहीं. हे निरोप सांगून, हरतऱ्हां करून, किल्ल्यानजीक भेटी व्हावी असें करून घेऊन यावें." याप्रमाणें महाराज बोलले. त्याजवरून कृष्णाजीपंत [ यांनीं ] महाराजांचा प्रभाव पाहिला जे, "असें दुर्घट कर्म करून कार्यसिद्धि करितील, स्वतां बुद्धिकरून व शौर्यकरून [ मोठे ]. माणसेंही यांचे

---

१. 'बुडविला' २. 'लमेछमये' ३. धर्मवृद्धि होणें' ४. 'विकल्प वाटले' ५. 'घ्यावी'.

पदरीं मोठीं मोठीं मनसबाबाज व शूर एकदील दिसतात. " ऐसें मनांत आणून बोलले,[1] " फार चांगलें. आम्ही खानास हरतऱ्हां करून भेटीस घेऊन येतों. आपण याचा विचार पोख्त करणें तसा करावा. " याजप्रमाणें परस्परें बोलणें होऊन, वकिलास बहुमान वस्त्रें देऊन, त्याजबरोबर आपणांकडील पंताजीपंत[2] वोकील हिवरेकर यांस देऊन लवाजिमासुद्धां [ महाराजांनीं ] रवाना केलें.

### खानाचा मृत्यू त्यायागें त्यानें तें मान्य केलें.

[ नंतर ] उभयतां खानापाशीं येऊन महाराजांचें बोलणें सांगितल्यावरि खानाचा मृत्यू त्यायोगें त्यानें तें सर्व मान्य केलें. " भेटी शिवाजीराजे घेतात हें सिद्ध करून आलां हे मोठी गोष्ट केली. काम जालें. " वकिलाची फार तारीफ करून खूष जाले. आणि विचारते जाले जे, " राजे पाहाडाखालीं येतात न येतात ? पाहाडात फौज व लोक जाणें हे अवघड, त्या अर्थीं खालीं यावें. " तेसमयीं इकडील वकील व कृष्णाजीपंतीं सांगितलें, " मार्ग मोठा व लाख[3] फौज राहावी ऐसी जागा व पाणी पाहिजे तसें, पाहाडांत आहे. नदीच चालली आहे. तेथें[4] राजे आहेत. आपण एक वेळ भेटून निखालसता जाली म्हणजे पाहिजे तेथें येतील " याजवरून जावलीस जावें असें करारांत आलें. फौजसुद्धां जावलीस भेटीस येतात हीं पत्रें वकिलांनीं लिहिलीं. आपण भेटीची तरतूद[5] करावी असें सांगून पाठविलें.

### सर्वांचें एकच लक्ष्य

याजवरि महाराजांनीं सर्व कारभारी व सरदार आदिकरून जमा करून विचार केला जे " मोगल खालीं येतो तेव्हां भेटी घेणें वगैरे कसें करावें ? " म्हणून गौरऊन सर्वांसीं विचार पुसिला, व मातुश्री जिजाबाई–साहेब यांस विनंति केली. त्यांणीं उत्तर केलें जे, " तूं जें मनीं धरितोस तें देव[6] सिद्धीस नेईल[6] कुलदीपक आमचे पोटीं तूं निर्माण जाला आहेस. करिसील, मनीं धरिसील, तें देव शेवटास नेईल. यास्तव तुमचा हर्ष तेंच बहुत विचारें करून सावधतेनें चार माणसें तुम्हांजवळ कर्ते शाहाणीं आहेत. त्यांचे विचारें करणें तें करावें. देवाचे व आमचे आशीर्वादें विजयी होशील " अशीं बोललीं. वरकड सर्व यांणीं ही बोलले[7] जे, " महाराज आज्ञा करितील तें[8] प्राणापरती कस्त करूं आणि शेवटास लाऊं " असें सर्वांचें लक्ष्य व[8] सर्वांचा विचार घेऊन, मातबर कारभारी व आपण बसोन

---

१ ' बोलोन ' २ ' दत्ताजीपंत ' ३ ' लाखों ' ४ ' याप्रमाणें. ' ५. ' तर खुद्द ' ६.६. ' नेईल ', ' ते दिवसी सिद्धीस नेतो. ' ' तें दिव ( देव ? ) सिद्धीस नेतो. ' ७. ' सांगितलें ' ८. ८. " शिरसा वंदून प्राणांपरती मेहनत करून शेवटास लावू हेंच सर्वांचे लक्ष्य. " याप्रमाणें '

विचार केला कीं, " खान येणार त्यास झाडी तोडून फौज राहण्यास मैदान करावें. घाटाची वाट उतरणें चढणें यास हात्ती व घोडे येणें यास रस्ता चांगला एकच करावा. त्यांत वरकड वाटा लहानसान झाडून मोडाव्या, झाडें तोडून व खाणून बंद कराव्या. जागां जागां गुप्त प्रकट चौक्या धारकरी नामी लोक सावध [ यांच्या, ] त्यांत कारकून योजोन झाडींतील वगैरे नाक्यास ठेवावे. किल्ल्याखालीं बुरजानजीक जागा मैदान होती तेथें भेटीस सदर म्हणून मांडव घालून सखलाद[१] मखमल किनखापी मढून, फार आराष करून एकापुढें एक थोरलाहान बैठका खलबतास वगैरे जागे करावे. सामानही बहुत मेजवानीचें व वाटेचें व मुकामाचें करावें " असें सांगून तमाम तरतूद करविली.

हें वर्तमान खानास कळलियावरि शिवाजी राजे बहुत साफदील आणि आपले भेटीचा फार आदर करितात असें मानून कापट्यबुद्धीनें " बरें आहे, भेट मात्र व्हावी, मनांत आहे असे[२] करून. पादशाही चाकरी करून. " असें[३] मनात योजिलें.[३] महाराजांचे मनांत " यास फार स्वच्छता[४] दाखवून खालीं आणावें आणि भेटींतच कार्यसाधन करावें. " याप्रमाणें परस्परें अंतकरणांत धरून बाह्यतः बहुतच सफाई दाखविते जाले.

### उभयतांनीं सडेच भेटीस यावें ऐसा सिद्धांत

तदनंतर वकिलांस पत्रें पाठविलीं. " येण्याचा वेत करावा. वाटा वगैरे तयार जाले आहेत " त्याजवरून थोरला तोफखाना व बुनगे वाईनजीक घाटाखालींच ठेवून, सडी फौज निवड करून, घाट चढून रडतोंडीचा रस्ता नीट केला होता त्या मार्गें उतरोन पारानजीक कोइनेचे कांठीं खानानीं मुकाम केला. महाराजांनीं मुकामाची जागा नेमिली होती तेथें मंडप, सामान-साहित्य सर्व फौजेचें वेजमीचें ठेविलें होतें. खान येऊन उतरल्यावर बहुत समाधान पावले. परस्परें आदर बहुत, परंतु मनातील वेत आणीक प्रकारचे ! खान खालीं येऊन मुकाम जालियावरि महाराजांनीं " वडील भाऊ संभाजीराजे यांचा घात याणींच केला, तो सूड याचा घेईन " असा वेत यांचा.[५] खानवकिलांनीं मुकामाचे जागांच भेटीस राजे यांणीं यावे म्हणून बोललियावरि त्यांनीं सांगितलें जे,[५] " भेटीची जागा व बैठक बहुत तरतुदीची केली आहे. तेथें आपणही येऊन. त्यांणीं तिकडून यावें, हें राजे यांचें मानस. साहेबांची भेटी मात्र व्हावी, नंतर येणीं जाणीं सर्व घडेल. त्यांचें मानस तशीच भेटी घ्यावी. " बोलल्यावरि ' उत्तम आहे ', बोलले. सारी फौज ठेऊन सडे भेटीस

१. ' सखला ' २. ' वेत तसे ' ३.३. ' हें याचें मानस ' ४. ' स्वस्तता ' ५. ५. ' म्हणून बोलले खान मुकामाचे जागांच राजे यांणीं यावे बोलावे. त्यावरि वकिलांनीं सांगितलें जे, '

जावें. तेही सडेच येणार. ऐसा सिद्धांत केला आणि वकिलांनीं महाराजांस कळविलें.

**निरवानिरव : शतावधानी बंदोबस्त**

ते समयीं वडील पुत्र संभाजीराजे यांस व मातुश्री जिजाबाईसाहेब यांसि किल्ल्यावरि ठेविलीं. जागां जागां नाकेबंदी व वाटा [ यांत ] जेथें जसा जमाव पाहिजे तसा टोळ्या करून भोंवतें दुरून कोसाचे अंतरानें ठेविले. त्यांस इशारत करणें ते सरदारांस सांगितलें कीं, " आम्ही किल्ल्यावरून उतरतां करणा वाजला म्हणजे आपालाले जमावांनीं पुढें चालत यावें आणि बाणाचे टप्प्यांत उभें राहावें. त्याप्रमाणें त्यांणीं सावध असावें. " ऐशी ताकीद केली. आपण खासा किल्ल्यावरील सर्व बंदोबस्त केला. दरवाज्यांत लोक जमाव मोठे मोठे सरदार असावे, त्यांणीं आम्ही कचेरीस पावल्यावरि पुढें चालून यावें. बराबर निवण्यास हजार दोन हजार धारकरी असावे. त्यांणीं जागचे जागां उभे राहावे. पुढें नेमिले तितक्यांनीं यावें. " याप्रमाणें सांगून, किल्ल्याचे गिर्दनवाईस लोक, तोफा, सामान दारूगोळा वगैरे ठेऊन, आपण खासा जाऊन, सर्व फिरोन पाहून सांगितला तसा बंदोबस्त करविता[1] जाला.[1] रघुनाथ बल्लाळ सबनीस यांस जागे, नाके यांचे चौकशीस ठेविलें. नेताजी पालकर सरनोबत यांसि फौज सारी संकेताप्रमाणें सिद्ध करून खान खालीं बुडवितांच फौजेनें तोफखाना बुनगे दस्त[2] करावे. घाटावरून उपराळा येऊं न द्यावा. मार्ग नीट केला तो एकच, त्यांत झाडें मोठीं तोडून टाकून बंद करावा. चढून जाऊं लागतील ते जाऊं देऊं नये याप्रमाणें करविलें.

[ नंतर ] मोरोपंत पेशवे, अण्णाजी दत्तो सुरनीस, बाळाजी आवजी चिटणीस[3], रावजी सोमनाथ, गंगोजी मंगाजी वाकनीस, रघुनाथ बल्लाळ कोरडे, शिव उपाध्ये,[4] कृष्णाजी नाईक, सुभानजी नाईक व गोमाजी नाईक, पानसंबळ हवालदार व त्रिंबक भास्कर वगैरे कारभारी व मावळे सरदार व मराठे सरदार एक करून विचार केला. ते समयीं सर्वांचे मनोदय " महाराजांचे चित्तांत येईल तें करितील व होईल. " असे पडले. जे आज्ञा ते प्राणापरती आंगेजणी करावी, " हेच सर्वांची सला व एकनिष्ठता. " महाराज धर्म-स्थापना करणार व बुद्धि व जयही[5] दिवसेंदिवस अधिकच होवो हे सर्वांची इच्छा. अफजलखान तो विषय किती आहे ? " ऐसा सर्वांस हर्ष वाटून महाराजांचे करण्यासच सर्वांचें अनुमोदन, व त्या अन्वयें तरतूद, मजबुदी करिते जाले. आणि ते समयीं किल्ल्यावरि कारभारी जिजाबाईसाहेब व संभाजीराजे यांजपाशीं पेशवे सुरनीस, चिटणीस यांणीं असावें म्हणोन ठेविलें, आणि मातुश्रीस व राजे यांस त्यांचे हवाली केले.

१.१. ' करविला याप्रो वेत सांगितला तसा बंदोबस्त जाला न जाला '
२. ' फस्त ' ३. ' चिटनिवीस ' ४. ' शिवू पाध्ये ' ५. ' वय '

" आम्हीं ही होड आरंभिली. श्री सिद्धीस नेईलच. कदाचित वाकडेंही पडल्यास तुम्हीं घाबरे न होतां वेत केला याप्रमाणें गर्दी करून शत्रूस बुडवावें, राज्य रक्षावें," असें सांगितलें. सर्वांचेंही चित्तीं 'अफजलखान खालीं आला यास कधीं बुडवूं!' हेंच उत्कंठा पाहून महाराजांस अधिकच हर्ष उत्पन्न होऊन लोकांस नवाजून,[1] दिलासा देऊन, " तुम्ही सर्व शूर, पराक्रमीच आहां. आमची मदार तुम्हांवरच आहे. या यवनाचा पाड तो काय ? मोठा मस्त हत्तीच्या मस्तकींचा मणि प्रयत्नेंकरून आणणें हें मनुष्याचे अनुकूलतेनें घडतें. मग तुम्ही सर्व अनुकूल असतां याचा हिसाब तो काय ? " ऐसें सर्वांस स्फुरण व्हावयाजोगें गौरऊन महाराज बोलले, " ये समयीं सर्वांनीं आपली शर्त व सावधता सांगितली तशी करावी. राज्यवृद्धीस पावेल तसतसें आहे तें सर्व तुमचें आहे, " असें नवांजून जेथील तेथें एक एक सरदार नेमून देऊन, आपण आंगांत जिरे घालून त्याजवरि झगा घातला. तसेंच डोईस जिरे-टोप घालून वरतें पागोटें घातलें. चोळणा काच्या घालून उजवे हातीं भवानी तरवार घेऊन व बिचवा डावे हातीं, वाघनखें, पाठीशी ढाल, याजप्रमाणें राजे सिद्ध जाले. ते समयींचें ध्यान बहुतच उग्र व अपूर्व, [ असें ] सर्व अवलोकन करिते जाले. फौज भोंवतीं जागां जागां ठेविली, रानझाडी, सावजांचें भय इत्यादि निमित्यें चौक्या ठेविल्या होत्या.

[ यानंतर ] खालीं खानास सूचना भेटीची करावी म्हणोन वकिलास[2] चिठी लिहिली. त्याजवरून खानांनीं भेटीची[3] जागा कशी आहे वगैरे चौकसी [ करितां ] आपले इतबारी पाठविले.[3] त्यांनीं पाहून बहुतच तरतूद, बैठका, कारंजी वगैरे आराष, किनखापी मंडप[4] [ अशा ] जागा केली आहे, निखालस जवळ कांहीं एक गलबल फौज लोक [ यांची ] नाहीं ऐसें सांगितलें. यावरि फौज सारी ठेऊन, मातबर सरदार व उमदे शिपाई निवडून बराबर घेतले. ते समयीं वकिलांनीं अर्ज केला जें, " राजें यांस, लोक बहुत जाणें यांत इतबार राहाणार नाहीं. तेही सामान आणितील ऐसें नसावें. इकडील[5] व तिकडील नेमणूकेनेंच ( नेमक्यांनींच किंवा मोजक्यांनींच ! ) भेटीचे जाग्यास जावें.[5] " त्याजवरून खालीं सर्व ठेवून, खानाची उमेद " नजरेस मात्र पडावे, त्यांचा हिसाब काय आहे ? " ऐसें[6] म्हणून डोंगरी चढूं लागले.[6] मधीं मधीं बराबरचे लोक जिलीब आदिकरून ठेवीत ठेवीत पुढें आले. खासा एक पालखी व पांच पन्नास लोक याप्रमाणें भेटीचे जाग्यानजीक आले.

१. 'नांवाजून' २. 'वकिलाची' ३. ३. 'भेटीची जागा कशी आहे हें पाहण्यास आपलेकडील विश्वासू येऊन खानांनी चौकशी केली.' ४. 'पडदे' ५. ५. 'याकरितां नेमानें आपापल्या मनुष्यांनीशी जावें,' ६.६ 'असें वाटून खान चढूं लागले'

## मातोश्रींचा आशीर्वाद : संभाजीचें उसनें

तें महाराजांनीं पाहून किलियास व सर्वांस हुशार करून मातुश्रींस व देवास नमस्कार केला. मातुश्रींनीं 'विजयी भव' आशीर्वाद दिल्हा. तेव्हां महाराजही बोलले, "वडील भाऊ संभाजीराजे यांसि दग्यानीं मारविलें त्याचें उसनें घेतों. साहेबांचे उदरीं जन्म घेतला, साहेबांचें मनोदय तेच. देव सिद्धीस नेईल." याप्रमाणें बोलोन दरवाजियास आले. आणि करणा इशारतीचा वाजविला. तेथें धारकरी व लोक निवड करून उभे करीत करीत आपणही तेथें आले. त्या अन्वयें पालखींत बसोन दरवाज्याखालीं येऊन उभे राहिले. जवळ खिजमतगार [ म्हणून ] तानाजी मालुसरे व येसजी कंक, हिरोजी व नागोजी फरजंद ऐसे पांच पन्नास लोक घेऊन व कृष्णाजीपंत व गोविंदपंत दिवाणजी त्यांजकडील व आपलेकडील वकील पंताजीपंत बोकील एकदोन शिपाई कारकून ऐसे निघोन सदरेनजीक आले. खानही पालखींतून उतरले. हेही उतरून सदरेस उभयतां गेले.

## शिशुपाल लीलेंकरून श्रीकृष्णजीनें मारिला त्याप्रकारें...

चार नजरा होतांच खानांनीं वकिलास पुसिलें 'राजे हेच कीं काय?' कृष्णाजीपंतांनीं 'हेच' ऐसे बोललियावरि महाराजांनींही पंताजीपंतास विचारिलें 'खान हेच कीं काय?' त्यांनीं 'हेच' म्हणून उभयतांनीं उभयतां एकमेकांस खरें[1] करून भेटीस पुढें होतांच, खान शरिरें[2] करून मोठे उंच दराज होते. महाराजांस[3] द्वितीयेचे चंद्रासारखे भेटण्यांतच हातीं धरून पुढें वोढून घेऊन डावे हाताखालीं दाबून धरिले, आणि हातीं कटार[3अ] होती ते चालविली. ते समयीं महाराजांचे आंगांत जिरें होतें, आंग चपळाईनें काढून[4] घेतांच वार कायम न जाला. खानानींच अगोदर दगा पुरुषार्थ केला, फार चांगलें जालें, म्हणून हातांत वाघनखें होतीं त्या हातानें बहुत जलदी करून पाठीमागून हात पोटावरि चालविला. झगा बारीक होता. पोटालाही[5] मोठा वार कारगर होऊन लागलीच आंतडी बाहेर आलीं. तेव्हां बगलेंत दाबून धरिलें होतें तें सोडून ढकलून दिल्हें. 'शिवजी[6] दगा केला, शिपाईगिरीची शर्त केलीस,' ऐसें बोलोन डावे हातें पोटला[7] सावरून फिरंगेचा वार 'आब हमारी तलवार देख' म्हणून महाराजावरि वार खानानें चालविला. डोईंत जिरे होती ती किंचित तुटोन जखम गव्हाइतकी लागली. महाराजांनीं सफाई करून 'तुम तो बडे और पठाण, आब हमारी भवानी शिवजीकी देखो,' म्हणून तरवारीचा

१. 'खैर', 'उभयतां एकमेकांस आदरें करून' २. 'शरिरीं' ३. 'महाराज' केवळ द्वितीयेचे चंद्रासारखे, खानानीं.' ३अ. 'तरवार-कटार' ४. 'चोरून' ५. 'पोटलाही'. ६. 'शिवाजीनीं' ७. 'पोटाला

वार खांद्यावर केला. त्यानीं पोटापर्यंत वार जाला. खान पुरे होऊन मुर्दा पडला. हें पाहून महाराज निघते जाले. तों सैद बंडेखान पठाण याणें जलदी करून आंगावर आला. हें पाहून येसजी कंक याणें त्याजवर वार चालविला. तो तेथेंच पुरा जाला. याजवरि गोंविंदपंत दिवाण सरकोन आले. त्यांस 'तूं ब्राह्मण. पुढें येऊं नको' बोलले असतां चालून आला. ते समयीं जवळ तानाजी मालुसरे होते त्याणीं व जिवबा महाला[1] याणीं त्याजवर पटा चालविला. जखम लागली. महाराज 'ब्राह्मण आहे, शिपाईगिरी व खावंदाची चाकरी केली. पुरा करूं नका' ऐसें बोलले. याप्रमाणें इकडील व तिकडील यांची हातघाई होण्यांत भोई व खिजमतगार यांणीं जलदी करून खानाचा मुर्दा पालखींत घालून चालविला. हें पाहून येसजी कंक व तानाजी मालुसरे यांणीं जलदी करून, महाराजांस बाहेर काढून देऊन भोयांच्या कुऱ्या केल्या, आणि खानाचें डोचकें कापून रुमालांत घेऊन आले. शके १५८१ विकारी नाम संवत्सरे मार्गशीर्ष शु॥ सप्तमी भृगुवासर.[2] याप्रकारें करून अफजलखान मारून महाराज विजयी जाले. ते समयीं जसा शिशुपाल सभेमध्यें सहज लीलें-करून श्रीकृष्णजीनें मारिला त्याप्रकारें या सभेंत शोभा येती जाली.

## खंडोजी खोपड्याचा शिरच्छेद

इतकें होतें तों दिवस दोन चार घटका राहिला. सायंकाळ होत आला. त्या अवसरीं महाराज किलियाचे दरवाज्यास पावले. इशारतीप्रमाणें तोफा करविल्या. तों खानाचे गोटांत भेटीच्या तोफा जाल्या मानिते जाले. महाराजांची इशारत होतांच मावळे लोक व फौज व सरनोबत चालून गोटावरि आले. तोफखाना वगैरे बुनगे दस्त केले. गोविंदपंत दिवाण वगैरे जलदीनें गोटांत जाऊन खानाचें वर्तमान कळतांच सर्व हतवीर्य होऊन अवसानें सोडून पळूं लागले. खानांनीं माहितगार म्हणून मावळे लोक खंडोजी खोपडा तीन हजार मावळेनिशीं ठेविला होता. त्याणें अफजलखान याचा लेंक व कबिला दोनतीनशें लोकांनिशीं स्वारांनिशीं[3] आपले लोक माहितगार कांहीं देऊन काढून कोइनेचे कांठानें कराडी पावतां करविला.[4] वरकड हत्ती, घोडे, चीजवस्त, जराबाजरा सर्व दौलत एके दिवशीं महाराजांस प्राप्त जाली. ज्यांणीं हत्यार धरिलें त्यांस मारिलें. हत्यार न धरी त्यास हत्यार व घोडें घेऊन सोडलें. गोरगरीब यांचा बच्याव करून त्यांस लाऊन दिल्हें. तोफखाना व बुनगे तिकडे लोक ठेविले [होते] त्यांस इशारत करऊन दस्त केले. चौदा हजार घोडे, व पाऊणशें हत्ती, दोन तीन हजार उंट शिवाय बैल तोफखानासुद्धां पाडाव केले.

१. 'महाडिक' २. १५८० विलंबीनाम संवत्सरे आश्वीन शु॥ ७. '१५८१ विकारीनाम संवत्सरे मार्गशीर्ष शु॥ ५.' ३. 'लोकांनिशीं' ४. 'पावतसे केले.'

खंडोजी खोपडाही पाडाव जाला त्याचा शिरच्छेद तेच समयीं करविला. वरकड सरदार मातबर सांपडले वस्त्रें देऊन लाऊन दिले. गोविंदपंत, कृष्णाजीपंत, पाडाव आले, त्यांस वस्त्रें दिल्हीं व कृष्णाजीपंत यास बहुमान वस्त्रें देऊन लाऊन दिल्हें.

### दिवस सोनियाचा

याप्रमाणें महाराजांनीं यश घेऊन मातुश्रीचे दर्शनास गेले. मातुश्रींनीं पोटाशीं धरून "संभाजीचा सूड घेतलास, माझे डोळ्याचें पारणें फेडिलें व शिपाइगिरीची शर्त केली, आणि देवानीं खैर केली, भेटी जाली, आजचा दिवस सोनियाचा उगवला !" ऐसें बोलिली. आणि महाराजांवरून लिंबलोण करून सतका करविला. दानधर्म बहुत करून, समागमें होते, कामें केलीं, त्यांस बक्षिसें, वस्त्रें भूषणें, देऊन वाढविले. पालख्या, अबदागिरें, सोन्याचीं कडीं व द्रव्य देऊन "तुम्ही सर्व होतां म्हणोन राजे खैर होऊन आले," ऐशी तारीफ गौरव करून मातोश्री मोठा आनंद करिती जाली.

### याचें राज्य व्हावें, यांस यश यावें....

झाडी तोडून तमाम वाटा बंद केल्या याजमुळें मावळे लोकांनीं जागचे जागां खानाचीं फौज, घोडीं धरलीं. याप्रमाणें खानास बुडवण्याचें मोठें धाडस करून व साहस-पराक्रमें करून यश महाराजांनीं संपादिलें. म्लेंछ पादाक्रांत करण्यास अवतारी पुरुष निर्माण होऊन श्रीचें वरप्रदानें महाराजांनीं अफजल बुडविला. आणखी लोक यांणीं त्या समयीं श्रम व पराक्रम केले, त्यांच्या सर्वांच्या भेटी घेऊन, नवाजसी करून, जसे ज्यांचे श्रम तसेच प्रकारें त्यांचे आदर करून वस्त्रें भूषणें, खर्चास देऊन, तैनाता वाढवून करणें तसें केलें. पायचे [ होते ] यांस घोडीं बसावयास दिल्हीं. सरदार होते त्यांस पालख्या, आफतागिरें देऊन संतोषी केलें, जखमी यांच्या जखमा, आपले व त्यांचे यांच्या बांधवून खर्चावियास दिल्हें, युद्धीं पडले त्यांचे लेंक आणवून चाकर ठेविले. ज्यांचें मूलबाळ नाहीं त्यांचे बायकोचे पोटास व लाहान मुलें त्यांस बालपरवेशी करून दिल्या. रणीं[१] पडले त्यांस माती देवविली. कोणी गरीब सांपडल्यास चीजवस्तुसुद्धां देऊन सुटका करविली. अशी भूतदया. या योगानें सर्वांस असें वाटत आलें की, यांचें राज्य व्हावें आणि यांस यश यावें.[१]

---

१.१. याप्रमाणें लोकांचे आदर करून बहुमान नवाजीस केली. अफजलाकडील सांपडले सरदार [ त्यांस ] वस्त्रें देऊन लाऊन दिल्हें. रणीं पडिले त्यांस माती देवविली. दातीं तृण धरिलें त्यांस चीजवस्तुसुद्धां सुटका करविली. ज्यास खर्चा नाहीं त्यास देविलीं. ऐसे गरीबनवाज ! ज्यास भूतदया, असा असा हा राजा परम भला, यास यश यावें, याचें कारणीं जीवित तृणप्राय—>

## सुभान आला कैसें शेवटास नेईल हीं चिंता

महाराजांनीं अफजलखान जोरावर असतां पराक्रमें करून मारला. अघटित कर्में केलीं. महाराजांनीं किल्ल्याचे खालीं अफजल बुडविला त्या बुरजाचें नांव 'अफजल बुरूज' ठेविलें. अफजल याचें डोचकें त्या बुरजाखालीं पुरविलें. 'अफजल फौजसुद्धां गारद केला, खानास राजांनीं आपले आंगें मारिलें,' हें वर्तमान विजापुरीं गेलियावरि अली इदलशाहा पादशाहा याची आई बेगम बडीसाहेबीण व पादशाहा बहुत विचारांत पडोन 'मोठा सरदार नामांकित बमै–फौज' बुडविली. पुढें विचार कसा करावा?' म्हणून तमाम अमीर बोलावून विचारांत पडले जे, "पादशाईस वाईट दिसतें. शिवाजीराजाशीं द्वेष वृद्धिंगत केला. मर्दुमी आंगेजणी करून करणें अचाट करितो. लोकही तसेच मर्द खजिना त्यानें जवळ बहुत केला. किल्ले–कोट–प्रांतांनींही बळकट जाले. खान बुडविल्यावरून सर्वांसही दहशत ऐसें जालें. यास उपाय काय करावा? याउपरि कांहीं ठीक दिसत नाहीं. सुभान आला कैसें शेवटास नेईल? तह करून आपलेसे करावें तरि याउपरि हातीं लागणार नाहीं." ऐसे फारच गिरफदारींत पडिले. शहरभर पादशाहात शिवाजीराजा बुडवितो हेंच जन चर्चा करूं लागले. यानंतरि खान बुडविलियावरि विजापुरीं किल्ले कोट राहिले ते दहशतीनेंच राजे याचे हातीं येऊं लागले. महाराजही त्या प्रांतीं फौज पाठऊं लागले.

## प्रतागडीं देवी आली.

महाराजांची श्रीतुळजापूरचे देवीचे ठाईं अत्यंत भक्ति. दर्शन घडावें हे इच्छा जाहाली. यावरि श्रींनीं द्रुष्टांत दिल्हा कीं, "आपणांस येथेंच मूर्ति करून स्थापना कर, म्हणजे जे तुझे नवस मानसिक येथेंच पुरवीन." याजवरून महाराजांनीं गंडकीची शिळा आणवून कारेगार[२] तुळजापुरीं पाठवून तेथील ध्यानाप्रमाणें मूर्ति अत्यंत सुंदर करविली. आणि प्रतापगडावरि श्रीदेवीची स्थापना करावी, जागा फार चांगली, बालेकिल्ल्याखालीं कोटांत देवालय करून सुमुहूर्तें अर्चा बहुत द्रव्ये खर्चून, ब्राह्मणभोजन करून स्थापिली. देवीस पूजा, नैवेद्य, पारपत्यगार, हुद्देदार, व कारभारी, पुराणिक ऐसे नेमून देऊन त्यांस तनखा गांव लाऊन दिल्हें. उत्साह नवरात्राचा [ त्यास ] नेमणूक, वस्त्रें, जवाहीर वगैरे देऊन नेहमीं चालावें ऐसें करून

~~~~~~~~~~

←[ मानून ] प्राणही वेंचावे, आणि याचें कार्य करावें; जेणें करून राजा संतोषी तेंच करावें, ऐसें लहानापासून थोर यत्किंचित् लोकांचें लक्ष महाराजांचे ठायीं [ लागतें जालें. ] याप्रमाणें वेध सर्वांस लाविला. किल्लेकोट घेणें, शहरें मारणें, मोठेही फौजेचा हिसाब न धरणें, ऐसे लोक आंगेजणी धरून करूं लागले.

१. 'फौजेसुद्धां' २. 'कारीगर'
~~~~~~~~~~

दिल्हें. त्याजप्रमाणें चालतें जालें. व श्रीदेवि तुळजापुरीं जाऊन नवस द्यावे [ ते ] येथेंच कृपा करून पावती जाली.

## फाजिलखान व सरदार बाजीप्रभु

अफजलखान मारल्यावरि त्याचे लेंक फाजिलखान[1] विजापुरीं गेला होता. त्याणें "राजे यांजवरि आपणास रवाना करावें, बापाचें उसनें घ्यावें" म्हणून बहुतच आग्रह करून, हुकूम घेऊन, फौज, तोफखाना तयारी करून मोहीम करावी ऐसें केलें. ते समयीं पादशाहानें सरज्याखान व सिदी जोहर सरदार फौजेनिशीं बराबर दिल्हें, आणि वस्त्रें देऊन रवानगी केली. ते समयीं महाराजांची स्वारी पन्हाळप्रांतीं आली होती. तेव्हां मोंगल चालून पन्हाळ्यास आला, त्यास येतो तसा येऊं द्यावा, [2]असें केल्यानें त्यानें येऊन[2] किलियास वेढा घालून बसला. महाराजांनीं आपली फौज मागें घालून मोर्चे मारणें, रसद बंद करणें, कही मारणें हें करविलें. चार साहा महिने वेढा बसला. पावनगडाचे डोंगरास धमधमे रचून तोफेची मारगिरी करीत असतां, हिसाब न धरितां लढले. तेव्हां विचार केला जे, "आजपर्यंत द्रव्यांनीं व माणसांनीं खानास खराब केला. याउपरि आपण बाहेर जाऊन बोढा[3] लावावा" हे मसलत करून किलियाच्या लोकांची व सामानाची वगैरे भरती करून, आपण खासा निघोन रांगणा किल्ला येथें महाराज चालले. हे बातमी फाजिलखान[1] यास समजलियावरि तो मोरचे उठऊन महाराजांचे मागें लागावें म्हणून चालला. दोन चार कोशांवरि रांगण्यानजीक महाराज पावले. तों मागें मोंगल जवळ आला ही बातमी आली यावरून त्याचे तोंडावर मावळे लोक ठेविले. त्यांत सरदार बाजी प्रभु, देशपांडे हिरडस मावळ, यांस पांच चार हजार हषमांनिशीं ठेविलें. त्यांनीं सांगितलें "साहेबीं निघोन जावें, गनीम थोपोन राखितों. खिंडी चढून देत नाहीं." महाराजांस[4] बरें वाटून त्यांनीं[4] "उत्तम [ आहे. ] आम्ही किलियावरि पावलों म्हणजे तोफेची इशारत करूं, नंतर तुम्ही निघोन येणें." ऐसें सांगून ठेविलें. तों फौजही येऊन पावली.

## बाजीप्रभु यांणीं मर्दुमीची शर्त केली

बाजी देशपांडे यांणीं मोंगली फौज खिंडीनजीक [ आली ] पाहून जागां जागां मोर्चे बांधून झाडींत लोक उभे करून गोळ्या व जेजालांचे दुरटे चालविले. फौज दाबून[5] राखिली. चढूं दिली नाहीं. तों महाराज किलियावरि पावले. तोफा

---

१. 'फाजलखान' २. २. 'विचार केला यावरून येऊन' ३. 'वेढा' ४. ४. 'याप्रमाणें बोलिल्यावरि' ५. 'तुंबऊन'

जाल्यानंतर देशपांडे यांणीं, " महाराज पावले या उपरि डोंगर धरून निघावें, पळावें हें काय ? येथेंच लढाई घेऊन मोंगली फौज नामोहरम होय तें करावें, चाकरी करून दाखवावी, " म्हणोन जमाव धरून उभे राहिले. त्या अवसरीं कर्नाटकी प्यादे पुढें करून तोफाची मार देत फाजिलखान याणें पुढें चालून घेतलें, आणि लगट केला असतां दोनप्रहरपर्यंत देशपांडे यांणीं लढाई मारली. दोन हजार लोक निवड करून बाजीप्रभु यांणीं फौजेवर चालून घेतलें. तिसरा प्रहर जाहाला. पठाण लोक बहुत मारिले. मर्दुमीची शर्त केली. पांच हजार माणूस खानाचे रणीं पाडिलें.[1] तो बाजी देशपांडे यांस गोळा लागून उडाले; ठार जाले. मावळे लोक यांस सरदार पडिला, धीर न पुरे[2] जाणून संभाळून डोंगर धरून[3] निघोन किलियावरि[3] पोहोंचले. मोंगल खिंड चढून किलियानजीक पावला. ' मावळची हवा, अरण्य, डोंगरांत अडचणीची जागा. छावणी करावी, किल्ल्यास मोर्चे लावावे, तरि शिवाजी हरहुनरें पूर्वीप्रमाणें फौज या अडचणींत गवखून[4] बुडवितील ' हें जाणून धीर न होतां, पावसाळा दिवस जवळ आले म्हणून, नामोहरम होऊन, तसेच कूच करून पन्हाळ्यास फाजिल आला. तेथेंही बसण्याचा दम न पुरे. ' शिवाजी दगा करील, मैदानांत निघत नाहीं, तेव्हां हुनरेबाजी दिसती, भरंवसा न पुरे, ' म्हणून विचार करून ' बाजतबरसात यावें ' हा विचार करून विजापुरास निघोन गेले.

बाजी देशपांडे स्वामिकार्याविरि खर्च जाले. शिपाईगिरीची शर्त करून रणीं पडले. त्याचे लेंक बाबाजी[5] बाजी यांस आणून, नवाजून त्यांची सरदारी त्यांचे हवालीं केली. त्यांचे भाऊ सात होते त्यांस आणून सातजणांस पालख्या व तैनाता करून ठेविलें. मावळे लोक यांची सबनिशी सांगितली. बक्षीस दिल्हें.

महाराज या मसलतीस गुंतले जाणून खैरतखान व याकूदखान[6] यांणीं जमावानिशीं जंजिरे यांतून तळा-गडास वेढा घातला होता. विजापुरी फौज नामोहरम होऊन गेली, महाराज खेळण्यास आले, तिकडून रायगड प्रांतीं स्वारी येणार " [ हें ] कळोन [ ते ] वेढा उठऊन जंजिरे प्रांतीं निघोन गेले. मोंगली फौजेनें पन्हाळा प्रांत खराब केला. त्यास राघो बल्लाळ अत्रे यांस सुभा देऊन तेथें ठेविलें. त्यांणीं मुलुकाची संचणी करून, कौल देऊन प्रांत लाविला. महाराज रायगडास जाते जाले.

### विजापूरकर सरदारांचा चहूबाजूंनीं पराक्रम

नंतर काहीं दिवशीं रांगण्यास रुस्तुमखान यानें जमाव करून विजापुराहून पाच सात हजार फौज घेऊन येऊन वेढा घातला. किल्लेदार यांनीं लढणें तसें लढून,

१. ' रणास आणिले ' २. ' निघे ' ३. ३. ' निघाले ते किल्ल्यास ' ४. ' गवसून ' ५. ' बाळाजी ' ६. ' याकुबखान '

फौजेंत गलबल करणें, छापे घालणें, [ मोर्चे ] मारणें केलें. महाराजांनींही कुमक पोंचविली. तेव्हां वेढा घालून बसणें दम न पुरे, जाणून [ शत्रु ] निघोन गेला. रुस्तुम नामोहरम होऊन गेल्यावर अबदुल करीमखान व बहलोलखान दाहा हजार फौजेनिशीं पन्हाळे-प्रांतीं चालून आले. रांगण्यास वेढा देऊन बसल्यावर महाराजांनीं कुमकेस फौज पाठविली. किल्लेकरी यांणीं व बाहेरून फौज आली त्यांणीं रसद बंद केली व गनिमी काव्यानीं छापे घालूं लागले. याजमुळें दम न निघे. बरसात आली जाणून नामोहरम होऊन जातेसमयीं दुमदारी मारून कांहीं हत्ती, घोडे पाडाव आणिले. याप्रमाणें रांगणा येथें विजापूरकरांनीं हा किल्ला बेलाग, चांगला, आधीं घ्यावा म्हणजे तो प्रांतच साधला म्हणून उपद्रव केला असतां, पराभवातें पावले. विजापुरी सरदार नामोहरम होऊन गेले.

## जंजिरेकर याजवरि दशहत

गड जंजिरेकर हबशी याणें तळें येथें मोर्चे दिल्हे होते; जागां जागां चोरून उपद्रव करितात, त्यांचें पारिपत्य करावें म्हणोन बाजीराव पासलकर देशमुख मुसेखोरेकर[१] यांस हषम लोक जमाव देऊन महाराजांनीं पाठविलें. त्यांनीं जाऊन राजपुरीं[२] शह[२] दिल्हेवरून जंजिरेकरांकडील काय सावंत चालून आला. लढाई जाली. दोन्हीकडील खासे सरदार बाजीराव देशमुख व काय सावंत हे रणीं पडले. त्याजवर महाराजांनीं आणखी जमाव देऊन रघुनाथ बल्लाळ सबनीस पाठविले. त्यांणीं जंजिरे-करांचा प्रांत तमाम लुटला. गरदीस मेळविला. जंजिरेकर याचे लोक चालून आले ते लढाई देऊन मोडिले. त्याजवरून जंजिरेकर हबशी यांणें तह केला जे, “ याउपरि महाराजांनीं घेतला प्रांत, किल्ले यांस उपद्रव लावणार नाहीं.[३] तुम्हीं आमचा प्रांत राहिला यास उपद्रव लाऊं नये. ” याप्रमाणें तहनामा ठरऊन रघुनाथपंतीं कांहीं द्रव्य घेऊन परतोन आले.

त्याजवरि कांहीं दिवस तहाप्रमाणें चालत आले. आणखी उपद्रव करूं लागले. यावरून वेंकाजीपंत यांस फौज व लोक देऊन महाराजांनीं पाठविलें. त्यांणीं सिदीचे लोक आले त्यांशीं लढाई मारून प्रांतास उपद्रव करून नतीजा दिल्हा. हलखुद[४] ठेविले. त्या प्रांतीं जागां जागां डोंगर पाहून किल्ले बांधिले. दंडाराजपुरी हा डोंगर बांधिला. याप्रमाणें किल्ले करून सिदीचा उपद्रव, लबाडी आपले तालुक्यांत न चालावी असें केलें. पांचसात हजार लोक त्या प्रांतीं जागां जागां नेहमीं ठेऊन जंजिरे याचें कांहीं न चालें असें केलें. ‘ जंजिरा पाणियांत किल्ला, जेर न होय, असाध्य, तो आपणांस यावा, समुद्रांत सत्ता करावी, म्हणून बहुत चित्तांत हेतु धरून आरमार करावें, ’ असा बेत करून जाहाजें नवीं तयार महाराजांनीं करविलीं.

१. ‘ मोसेखोरेकर ’ २. ‘ शह ’ ३. ‘ करूं नये ’ ४. ‘ हलकुद ’

त्यांचीं नांवें गुराबा, तरांडीं, गलबतें, मुबारें,[1] सिबाडे,[2] पगार, मचवे व थोर[3] तिरकटी[4] पाल असे जातींचीं चारपांचशें तयार करविलीं. यास दाहापांच लक्ष रुपये खर्च केला. त्याजवरि सरदार दर्यासागर, मायनाक भांडारी वगैरे यांसि सुभेदारी देऊन तोफा वगैरे सामान, दर्यावर्दी लोक[5] लढाऊ व कोळी व खलाशी त्यांणीं दर्यांत स्वारी-शिकारी करून जंजिरेकर याजवरि दहशत पाडिली. दर्यांत सर्व टोपीकर यांजवर इभ्रत पाडोन, सावकारी मालजाहाजें लुटोन, माल हरजिनसी दर्यांतील पैदास्ती करून महाराजांस आणोन देऊं लागले. व खर्चही आरमाराचा मोठा तोही चालविते जाले. समुद्रांत सत्ता बसविली. दर्याकिनारां जागां जागां शहरें मारूं लागले व बेटें चांगलीं पाहून किल्ले समुद्रांत सत्ता बसविली. त्याजवर द्रव्यही अपरिमित सांपडों लागलें.

## घोरपडे यांचें पारिपत्य

राजापूरप्रांत [याचा] महाराजांकडे अंमल. त्यास[6] सावंताचा लगता जवळ.[6] त्यास नतीजा देऊन संस्थान घ्यावेंसें मनांत आणिल्यावरून खेमसावंत व लखमसावंत, देसाई प्रांत कुडाळ, हे विजापुरी पादशाहींतील मनसब करून होते. त्यांणीं पादशाहास अर्ज केला जे, " शिवाजीराजे यांचें पारपत्य करणें येविशीं हरोळी आम्हांस देऊन आणि कुमकेस फौज द्यावी, म्हणजे आपण पारपत्य करून कोंकण सोडवितों. " याजप्रमाणें करार केल्यावरून खवासखान दाहा हजार फौजेनिशीं रवाना केला. त्याजबरावर बाजी घोरपडे मुधोळकर हेही दिल्हे. बाजी घोरपडे यांणीं शाहाजी महाराजांस दगा करून धरून आणिलें, हें महाराजांचे अंतःकरणांत सलत होतें व शाहाजी महाराज यांणींही " घोरपडे यांणीं उपकार[7] केलें हें तुम्हांस माहीत[8] असावेंच[8]. तुम्ही आमचें पुत्र विजयी जालां आहां, तरी संधि[9] पाहून[9] उसनें घ्यावें." असें सांगून पाठविलें होतें. तें महाराजांचे अंतरीं[10] पक्कें होतें. सावंत यांणीं बेदिली[11] केली, बाजी घोरपडे बराबर नेमले, खवासखान घाट उतरून येतो [हें] कळोन [महाराज] फौज, पागा, तोफखाना वगैरे तयार करऊन, पन्हाळ्यास येऊन फौजसुद्धां चालून गेले. तो बाजी घोरपडे पुढें आपली फौज कांहीं जमावसुद्धां घरास आले होते. तेव्हां महाराज बातमी येऊन[12] मुधोळ नजीक गेले. [बाजी] घोरपडे यांचें पारिपत्य आधीं करावें म्हणोन वेढा घालून भोंवता प्रांत लुटला. ते समयीं घोरपडे चालून आले, तेव्हां त्यांशीं लढाई दिली[13]. ते मराठे बहुतच जवांमर्दीनें लढले. बाजी

१. 'दुबार' २. 'सिबारे', 'शिहाडे' ३. 'वभोर' ४. 'तिरकती' ५. 'केलें' ६.६ 'त्यांस सावंतांचीं गलबतें उपद्रव करीत.' ७. 'उपद्रव' ८. ८. 'कळलें आहेच' ९. ९. 'कधींतरी', १०. 'अंतःकरणीं' ११. 'हरोळी', १२. 'ठेऊन', १३. 'देऊन'

घोरपडे रणीं पडले. [ महाराजांनीं ] सांपडले तितके मारिले. ठाणें घेऊन गांव लुटला. याप्रमाणें पुढें फौज व घोरपडे गेले, त्यांचें पारिपत्य केलें. हे खवासखान यास बातमी गेली असतां, महाराज तसेच खवासखान याजवरि चालून गेले. तों बाजी घोरपडे मारिले, फौज बुडविली, मुधोळ प्रांत लुटला, सामान [ महाराज ] बराबर भारी आहे, हें कळतांच घाट उतरून [ कोंकणांत ] यावें तें अवसान न पुरे. तसाच माघारे निघोन महाराजांची गांठ न पडूं देतां [ परत ] विजापुरास खवासखान गेला.

## फोंडयाचा किल्लेदार उडोन गेला !

[ इकडे ] महाराजही फिरोन सावंताचे मुलुकावरि चालून गेले. कुडाळ प्रांतीं जाऊन बहुतच खराबी आरंभिली. तो शह सावंतास सोसणें [ यास ] अवसान न पुरे, जाणून कुडाळ सोडून फिरंगणांत गेले. महाराजांनीं प्रांत हस्तगत करून ठाणीं तेथें घातलीं. फोंडें[1] याचा कोट झुंझूं लागला.[1] ठाणें मजबूत आणि लोकही हिमतीनें लढूं लागले. महाराज मोर्चे देऊन बसले. किल्ला जेरीस न ये, ते समयीं सुरुंग तयार केले. उडवावे तो [ घाटावरून ] बहलोलखान मदतीस फौज घेऊन आला. हें कळल्यावरून मोर्चे उठवावे, आधीं मोगल आला याचें पारपत्य करून, मग येऊन किल्ला घ्यावा, ऐसा[2] विचार केला. आणि लष्कर निघण्याची तयारी केली. किलियांतील लोक, फौज[3] शह पडल्यामुळें उठोन जाती जाणून[3] बेफामपणें बुरुजावरि, तटावरि उभे राहिले. या संधींत सुरुंग तयार होते त्यांस बत्ती देवविली. त्याणीं किलियांतील लोक फार जायां जाले. किल्लेदार उडोन गेला. लोक घाबरे जाले. तेव्हां स्वारी जाण्यास तयार जाली होती,[4] ती तहकूब करून[4] किल्ला घेतला. कोट फत्ते केला. हें वर्तमान घाटावरि बहलोलखान येत होता त्यास कळलें. मदतीस जावें तों तें ठाणें गेलें हें जाणून तो परत गेला. महाराज फते पावले. किल्ला फोंडें येथें महाराजांनीं इभ्रामखान यांणीं हल्लेचे समयीं काम करून निशाणावर आधीं गेला त्याची नवाजीस करून त्यासच सुभा देऊन ठेविलें. त्या प्रांतीं महाराजांनीं भिवगड[5], पारगड डोंगर चांगले पाहून किल्ले वसविले.

## सावंताचें पारिपत्य करून फिरंगी याजवरि जरब

[ इकडे ] सावंत फिरंगणांत गेले, तेथें फिरंगियांचे हातून[6] महाराजांचे प्रतापतेजेंकरून[7] भयास्तव त्यांस आश्रय देऊन ठेवणें [ यास ] अवसान न पडे, जाणून सावं-

---

१ १. ' फोडे याचे कोट झुंझ लागला. ' २. ' असा ' ३. ३. ' शह उठल्यामुळें ' ४. ४. ' तशीच हल्ला करून ' ५. ' भीडगड ' ६. ' वस्तू ' ७. ' प्रात होते ते जेर करून '

तांनीं महाराजांकडे वकिलीस पितांबर शेणवी शहाणे माणूस पाठविले. "आम्ही सावंत, भोंसले कुळी आमची, तेव्हां आपले आहों. स्वामींशीं निष्ठेनें चालावें ऐसा निश्चय जाला आहे. तरि कृपा करावी." म्हणून कितेक प्रकारें सांगून पाठविलें. याजवरून अभय देऊन भेटीस आणविले. वाडी प्रांत त्यांचें वतन, देशमुखी खाऊन, चाकरीस करून, खंडणी देऊन सुरळीत चालावें ऐसें करून त्यांची स्थापना महाराजांनीं केली. त्यांचे सरदार तान सावंत व राम दळवी मातबर मर्द होते. त्यांस नवाजून चाकरीं ठेविलें. याजप्रमाणें सावंताचें पारपत्य करून महाराज फते झाले. [ हें पाहून ] फिरंगी यांणींही वकील पाठविला. आणि "दरसाल तोफा नव्या तयार करून पांच द्याव्या; जवाहीर, दर्यांतील जिन्नस फिरंगी याणीं पाठवीत जावें; आणि कौल आपले जाहाजांस द्यावा" असें बोलणें लागलें. वकील पोशाख व जवाहीर व नाना प्रकारचे जिन्नस, आरसे, फानसे, वगैरे घेऊन येऊन नजर केली.

त्याजवरून कौल देऊन तह ठरविला. याप्रमाणें फिरंगी यांजवरि जरब बसविली.

### सिंधुदुर्ग समुद्र प्रसन्न होऊन दिल्हा.

ते समयीं जंजिरेयासारखी जागा आपणास असावी असें बहुत चिंता करून श्रीस प्रार्थना केली असतां द्रुष्टांत जाला कीं, "जंजिरा या कालीं साध्य नाहीं, सातशें वर्षांचा मुहूर्त त्यास दिला आहे. तूं समुद्रापाशीं स्थळ मागावें." याजवरून तीन उपोषणें केलीं असतां समुद्रानीं द्रुष्टांत दिल्हा कीं, "मालवण म्हणोन कोळियाचें बेट गलबतें उभीं करण्याचें लाहान आहे. तें तुला[1] दिल्हें. तेथें जागा करावी." त्याजवरून दुसरे दिवशीं पाहाविलें,[2] तों समुद्राचें पाणी लांब जाऊन ते बेटावेरी जागा विस्तीर्ण जाली. याप्रमाणें समुद्र प्रसन्न होऊन स्थळ मिळालें.[3] त्याजवरून बहुत संतोषी होऊन पांचसाहा कोशांवरि समुद्राचे पाण्यांत जागा वेलाग पाहून किल्ला बांधिला. त्याचें नांव सिंधुदुर्ग ऐसें ठेविलें.

### आरमारी सिद्धता : बसनूर घेतलें.

बसनूर[4] प्रांतीं व बिदनूर प्रांतीं शहरें मातबर आहेत, दर्याकिनारां आहे.[5] तेथें बहुत द्रव्याधिपति आहेत म्हणून समजलियावर बातमी आणून स्वारी करावी, शहरें मारावीं, प्रांत घेऊन ठाणीं घालावीं, असें महाराजांनीं चित्तांत आणून, ते समयीं सारें आरमार सिद्ध करून, आपणही थोरलें पाल याजवरि बसोन, दर्यांतून जावें असा सिद्धांत करून खुषकीनें फौजा रवाना केल्या. आणि मालवणावरून दर्या-

---

१. 'तूस', 'तुम्हांस' २. 'पाहिलें,' ३. 'दिल्हें.' ४. 'हसनूर' ५. 'आहेत.'

मार्गेंच जाऊन बसनूर पेठ असावध होती तेथें जाऊन पेठ लुटली. प्रांतही लुटला. तीनचार दिवस स्वारी तेथेंच राहून सर्व मत्ता जाहाजावरि चढविली. सुरतेचें[1] स्वारीसारखें शहर लुटलें.[1] तीन करोडीचा विषय सांपडला. तो घेऊन त्या प्रांतीं कडवाल, सिद्धेश्वर, मिरज, अंकोले[2] कोद्रें, हु मा ऊ द हीं ठाणीं घेतलीं. अंमल बसविला. गोकर्ण महाबळेश्वर ही जागा घेतली. श्रीदेवाचें दर्शन घेऊन तेथें दानधर्म बहुत केला.

याप्रमाणें प्रांत घेतला. हें पाहून शिवाप्पा नाईक बिदनूरकर संस्थानी होते त्यांस बहुत भय प्राप्त होऊन [ त्यांनीं ] वकील पाठवून[3] महाराजांस नजराणा पोशाख, जवाहीर, लाख रुपये नख्त नजर ऐसें पाठविलें. आणि तह ठरावून आपण[4] दर्शनास आले. दरसाल खंडणी तीन लक्ष देत जाऊं[5] ऐसा ठराव केला. त्यजवरून महाराज त्याजवर संतोषी होऊन खंडणी ठराविली. याप्रमाणें घेऊन, आपले म्हणवून असावें ऐसें करून तेथें वकिलीस उमाजीपंत आपणांकडून ठेविले. याप्रमाणें स्वारी करून महाराज रायगडीं आले.

### चैत्र शुद्ध नवमीस राजारामजन्म

ते समयीं रायगडीं सोयराबाईसाहेब गुरूदर होती तीं प्रसूत जाली. पुत्र जाले. शके १५८३-प्लवनाम[6] संवत्सरे चैत्र शु॥ नवमी. जन्मतां गर्भ पालथा जालियाचें वर्तमान महाराजांस कळलियावरि बहुत संतोषी[7] होऊन,[7] " हा राजा परम भाग्यवान् , पराक्रम बहुत करील. सर्व प्रजा वृद्धिंगत करून पालन करील; दिल्लीची पादशाहात पालथी घालील. " असें बोलले. ज्योतिषी यांणींही जन्मकाल[8] वर्तवून भविष्य [ केलें ] व ग्रह सबल उंच पडले[8] सांगितलें, चैत्र शुद्ध नवमीस जन्म जाला त्याजवरून राजाराम ऐसें नांव ठेवण्यास सांगून ठेविलें. दानधर्म केला. साखरा वाटल्या.

### जागजागां किल्ले नवेच बांधिले.

समारंभ करून रायगडीहून देशांत जावें म्हणून सातारा प्रांतीं महाराज आले. पहिले सारे किल्ले घेतलेच होते. कांहीं ठाणीं राहिलीं होतीं, तीं वाई, कराड, कोल्हापूर आदिकरून घातलीं. निंबाळकर, घाडगे वगैरे पुंडपण करून होते, त्यांचे दबावासाठीं जागां जागां किल्ले नवेच बांधिले. वारूगड, भूषणगड, महिमानगड, वर्धनगड, सदाशिवगड, मच्छिंद्रगड, [ हे नवेच बांधिले. ] व जुनेही हस्तगत केले. जागां जागां

---

१. १. ' सुरतेचे सारखें शहर होतें. ' २. ' अकोलें ' ३. ' पाठविले, आणि ' ४. ' महाराजांचे. ' ५. ' जावी. ' ६. ' प्लवंग. ' ७. ७. हर्ष पाऊन बोलले जे. ' ८. ८. ' जन्म-भविष्य व ग्रह सबल उंच पडले. '

कोंकणांत व मावळांत, देशांत डोंगर चांगला आढळेल तेथें व समुद्रकिनारां किल्ले बांधावे, ऐसें करिते जाले. यासि कारण येक, देशास प्रांतास जाग्याचा आधार होतो, जागा असेल तेथें सुभा जमयतीनें ठेवणें घडतें. त्या दहशतीनें दुसरा शत्रु आपले देशांत उपद्रव लावीत नाहीं, व देशक[१] आदिकरून पुंडपणें वळावत नाहींत. सर्वांवर सलाबत असती. हें मनांत आणून किल्ले बांधिले. लाहान सामान्य[२] किल्ला, पाणीही वरतें नाहीं, तेव्हां शत्रूस उपायास जागा होती ऐसें नाहीं. शत्रु चालून आला तो लागलाच डोंगरावरि चढून तटास लागत नाहीं. शत्रु चालून येतो हें पाहून आपले लोक सावध होतील, दगडच लोटतील, तरि त्यांचे दबावानें गनीम दवेल. इतकियांत आपलाही उपराळा [ होईल. ] दुसरीं ठाणीं, किल्ले, कोट, सुभे जवळ असतील ते मदत करतील. त्याणें किलियास अपाय होणार नाहीं. ऐसी कल्पना करून किल्ले केले. समुद्रकिनारां किल्ले मालवण, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, रत्नागिरी, खांदेरी, कुलाबा ऐसीं वेटें बांधिली[३]. तेथें आरमार आश्रयानें राहावें, लागावें, ऐसें केलें. उंदेरीचें बेट आरमार उभें करून बांधिलें, त्याचें नांव पद्म-दुर्ग[४] ठेविलें. आरमार समुद्रांत, यांणीं द्रव्य वहुत आणावें. तें किलियाचे बंदिस्ती [ स ] व खर्चास आरमारसुद्धां [ खर्च ] करावें. आरमारकरी यांणीं त्या ठिकाणीं जागां जागां किलियाचे लगतीनें तारवें खुंटवून असावें, ऐसें करविलें. जंजिरेनजीक महाराज वेट वांधूं लागले, त्यावरून हबशी यांणींही किलियानजीक किल्ले जंजिरे याजजवळ वांधिले. उंदेरी बांधली.

कल्याण अहद तहद फोंडें बिदनूरपर्यंत कोंकण, किल्ले सुद्धां, राज्य महाराजांचें जालें. देशीही राज्य सातारा[५] पनाळा आदिकरून किल्ले प्रांत राज्य सोडविलें. विजापूरची पादशाहात फार करून घेतली. राहिली तीही पादाक्रांत करूं.[६] हे पादशाहात[७] दस्तांत आलीच.[७] त्यांतील अमीर आले तितके नामोहरम जाले.

### दौलताबादेचे पादशाहातीस वेध लाविले.

याउपरि महाराजांनीं दौलताबादेचे पादशाहातीस वेध लावावा हें मनांत आणिलें. कांहीं कांहीं स्थळें त्यांचीही आलीं होतीं. परंतु दोन वेध करूं नयेत. एक पुरतें करून मग दुसरें करावें या आदेशामुळें[८] टाकिलें होतें. यानंतर मोरोपंत पेशवे यांस कल्याणप्रांत भिवंडी वगैरे ठाणीं प्रांत व सत्तावीस रामनगर वगैरे किल्ले ध्यावे, खानदेश, बागलाण प्रांत वेऊन अम्मल बसवावा म्हणून पाठवून देऊन[९] तो तालुका एकंदर त्यांचेच

---

१. 'देशाला' २. 'सामान', 'लाहानसान'. ३. 'बांधिलीं बेटे', 'ठाणीं बांधिलीं.' ४. 'बवलादुर्ग', 'पटकदुर्ग', 'पवळादुर्ग', 'पद्मदुर्ग' ५. 'सारा' ६. 'करून.' ७. ७. 'अशी उमेद त्यांस झाली.' ८. 'अंदेशामुळें', ९. 'घेऊन'.

स्वाधीन केला. सुभेदार, कारकून, हवालदार, दरखदार, हे सरकारांतून हुजरून देऊन देखरेख त्यांचे स्वाधीन करविली. त्यांचे निसबतीस याप्रमाणें ठेविलें: आण्णाजी दत्तो सुरनीस यांस चेउलापासून तहद फोंडेपर्यंत कुडाळ, दाभोळ, राजापूर निसबतीस सुभेदार, कारकून, दरखदार वगैरे देऊन त्यांचे स्वाधीन देखरेख केली. दत्ताजीपंत वाकेनीस यांचे स्वाधीन वरघाट वाईपासून तहद कोल्हापूर तुंगभद्रातीरपर्यंत तालुका दिला व देखरेख करावी म्हणोन सुभेदार, कारकून, दरखदार देऊन करविलें. हवालदार, दरखदार, कारकून वगैरे हुजरून तहगिरी वाहली करणें तें करून ठेवावें, तालुकियाची खबरदारी व किलियावरि इमारती करणें व सामान दारूगोळा वगैरे दास्तान करणें याची चौकशी करून नेमणुकप्रमाणें[1] करावें, आणि सरकारची आज्ञा येईल तसें वर्तावें. याप्रमाणें महाराज सर्वांस सांगते झाले.

## सरनोबती नेताजी ऐवजी प्रतापरावांकडे

नेतोजी[2] पालकरास सरनोबती होती त्यास ते स्वारीस प्रांतास[3] गेले होते. इकडे जरुरीचे कार्य पडिलें म्हणून निकडीनें लेहून आणविले असतां समयास न आले, जाणून[4] इतराजी करून त्यांची सरनोबती दूर करून राजगडी कडतोजी[5] गुजर किल्ल्याचे सरनोबत शाहाणे, शूर असून त्यांनीं बहुत कामें केलीं होतीं, त्यांस आणून, त्यांचे नांव प्रतापराव ऐसें ठेऊन सरनोबती दिल्ही. दोही पादशाहीचा[6] हिसाब न धरितां मर्दुमी करून, स्वारी शिकारी करून लढाई करणें, शहरें मारणें, करूं लागले. शाहाणे कर्ते, मर्द, विश्वासू ऐसे जाले. त्यांनीं बालाघाट,[7] परांडा, हवेली, कलबर्गे, आवसें, उदगिरि तहद गंगातीरपर्यंत भागानगरचे पादशाहींत स्वारी करून, शहरें मारून लूट घेऊन आले.

शाहाजी महाराज यांजपाशीं व्यंकाजी दत्तो, मकाजी आनंदराव पाळक लेंक भोंसले सेवेंत होते. [ ते ] निघोन महाराजांकडे कर्नाटक प्रांताहून आले. सरदार चांगले, मर्द, वडिलांकडोन आले म्हणोन बहुत गौरव करून, नवाजीस करून वाढविले. कामें सांगितलीं.

## सुरतेस कोटयावधीचा माल सांपडला.

यानंतर सुरत शहर मातबर, स्वारी करावी या विचारें हरकारें बातमीदार बहिरजी नाईक पाठविले होते. ते बातमी आली [ कीं ] बहुत द्रव्य सांपडेल व हे प्रांतही मोठा आहे; त्याजवरून विचार करून महाराजांनीं प्रतापराव गुजर सरनोबत निळो सोनदेव व अण्णाजी दत्तो सुरनीस, मानसिंग मोरे, रुपाजी भोंसले, मकाजी

१. 'नेमणुकी' २. 'जेतोजी' ३. 'प्रतापगडास' ४. 'जाणोन' ५. 'तानाजी' ६. 'पादशाहींतील' ७. 'बालेघाट'

आनंदराव, व्यंकाजी दत्तो आणखी सरदार नामी नामी, फौज, पंचवीस हजार दाहा हजार हषम निवड करून लांब लांब मजली करीत कोळवणांतून सुरतेस रवाना केले. आपणही वरकड फौजसुद्धां वरून चालले. तों सुरतेचा सुभा चालून आला, त्यासि मोडिलें. कोटास मोर्चे दिल्हे. पांचचार दिवस मुक्काम केला. सावकार बहुत व मातबर होते. मोतीं, माणिक हरजिन्नस जवाहीर, सोनें, रुपें, द्रव्य कोट्यावधींचा माल सांपडला.

## मोंगली फौज मोडली : रायबागीण बुडविली.

सुरतेवरि स्वारी महाराजांची गेली हें औरंगाबादेस कळल्यावरि [ तेथील सुभेदार ] याणीं मोहबतखान व दाऊदखान आठदाहा हजार फौजेनिशीं सुरतेचे कुमकेस पाठविले. उदाराम माहूरकर याची स्त्री रायबागीण व त्याचे लेंक जगजीवन ही पांचचार हजार फौजेनिशीं दुसरे मार्गें आले. ऐशा दोन्ही फौजा दो वाटांनीं चालून आल्या असतां त्याजवरून महाराजांनीं सारे लोक पुढें गेले होतेच, आपण सडे होऊन फौजेचे तोंडावरि गेले. त्यांत रायबागीण जात होती त्या मार्गेंकरून बोरटीकर देशमुख राजपाटील व यशवंतराव रामाजी, विश्वासराव हतनूरकर व दिनकरराव बागराव यांस हुकूम महाराजांनीं केला जे, " रायबागीण उमरखिंडींतून जाऊं न द्यावी, बुडवावी. " ऐसें सांगून रवाना केले. त्यांणीं जाऊन वाट बंद केली. आपण मोहबतखानावरि गेले. खंडासें[1] म्हणून शहर आहे त्यानजीक गांठ पडली. युद्ध दोन प्रहरपर्यंत होऊन मोंगली फौज घोडीं घालून मोडिली. चार हजार घोडे, दहा हत्ती पाडाव केले. लूटही फार सांपडली. कांहीं लोक पळून गेले त्यांचा पाठलाग न करितां सुरतेची लूट निभावून जाणें, रायबागीण आली तिचें पारिपत्य करणें म्हणून तसेच चालून आले. बागराव वगैरे सरदार यांनीं माने यांचे तळ्यावरि[2] जाऊन तेथून रायबागीण येतां खिंडींत अडविली होती, तों महाराज येऊन पावले. आणि वेढा देऊन कांहीं लढाई देऊन तिजला बुडविली. दोन तीन हजार घोडीं, पांच हत्ती पाडाव केले. रायबागीण व तिचा लेंक जगजीवन [ हीं ] धरिलीं. ती शरण आली.[3] याप्रमाणें महाराजांनीं सुरतेची स्वारी करून, दोन्ही फौजा लुटून, यश घेऊन, शत्रूवरि दहशद घालून लूटसुद्धां सुरक्षित रायगडास येऊन पावले. मार्गीं येतां रामनगरही मारिलें. रायबागीण हीस बहुमान[4] देऊन सोडून दिली.

## महाराज दैवी पुरुष !

त्याजवरि प्रबळगडावरि किल्लेदार केसरसिंग हाडे रजपूत होते. भेदानीं किल्ला

---

१ ' खेडास ', ' खंडाचे ', ' खेळासे ' २. ' तळावर ' ३. ' स्मरण जाली ' ४. ' बहुतमान '

न ये जाणून महाराजांनीं स्वारी केली. मोर्चे लाविले. किल्ला कांहीं दिवस भांडला. महाराजांचा प्रताप विचित्र ! किल्ला बहुत थोर विस्तीर्ण असतां महाराजांची हल्ला जाली कळोन, केसरसिंग याणीं कबिले यांचें जोहर केलें. एक लेंक व आई चुकोन राहिली. केसरसिंगानीं चालून घेतलें. खासा व आणखी रजपूत रणीं ठार जाले. किल्ला फते जालियावरि महाराज किल्ला पाहावयास पालखींत बसोन चालले. ते समयीं शेला पालखींतून बाहेर पडला, त्यास बोरीची कांटी लागली. तेव्हांच पालखी उभी केली आणि बोलले जे, "या कांटीनें[1] आम्हांस उभे राहा म्हंटलें.[1] तेव्हां खालीं द्रव्य आहे. खाणावें," म्हणून सांगितलें. खाणून पाहातां पांच चार लाख मोहोरांचा चौत्रा[2] सांपडला. महाराज दैवी पुरुष ! नंतर किलियावरि गेले. केसरसिंग वगैरे रजपूत ठार जाले [ होते ] त्यांस अग्नि देवविला.[3] त्याची आई व लेंक सांपडलीं. तीं गौरव करून जवळ ठेविलीं. कांहीं दिवशीं त्यांसि समाधानानें 'आपले देशीं जातों,' बोललियावरि वस्त्रें द्रव्य देऊन लाऊन दिल्हीं. याप्रमाणें प्रबळ किल्ला महाराजांनीं फते केला.

### महकबसिंग रजपूत ठार मारिला.

हें वर्तमान व आणखी मुलूख घेतला [ तें ] दिल्लीस औरंगजेब पादशाहीस समजलें. तिकडील बंदोवस्तासच चारपांच वर्षें लागलीं. सुरतेवरि स्वारी करून महाराजांनीं सुरत मारिली; किल्ले, कोट, ठाणीं दौलताबाद तालुक्यांतील त्यांनीं घेतलीं; फौजा बुडविल्या; व स्वारी करून प्रांत लुटतात; धामधूम मांडिली, हें वृत्त समजले. यावरि बहुत चिंताक्रांत होऊन औरंगाबादेस सुभेदारीस इखलासखान व महकूबसिंग ठेविले [ होते ] त्यांस पादशाहांनीं नसिहत[4] करून लिहिलें जे, "तुम्ही काय करितां ! अफजल मोठे आंगेजणीनें शिवाजीनें मारिला. विजापुरी पादशाहात किल्ले प्रांत बहुत घेतला, त्याजकडील अमीर मोठे मोठे चालून गेले ते नामोहरम केले." हें वर्तमान मोठे सर्द होऊन [ औरंगाबादेस ] लिहिल्यावरून महकूबसिंग रजपूत, सुभे याणीं दहा वीस हजार फौजेनिशीं रवाना केला. तो चालून आला. त्याजवरि प्रतापराव गुजर सरनोबत फौजसुद्धां पाठविले. नगरानजीक गांठ पडली. युद्ध बहुत जालें. महकूबसिंग रजपूत ठार झाला. दाहा हजार घोडीं व हत्ती व लूट बहुत सांपडली. ती घेऊन माघारे आले. त्याजवरि दुसरे वर्षीं स्वारी त्या प्रांतीं महाराजांनीं करून औरंगाबादेचा पुरा मारिला. जालनापूर पेठ झांबाडून,[5] सुभा चालून आला त्यांशीं युद्ध देऊन मोडिला. याप्रमाणें फते केली, आणि रायगडास आले.

---

१.१. 'ठिकाणीं जे आम्हांस उभें केलें.' २.'चबुत्रा' ३.'अन्नी देववली', 'अन्न देववला', 'अग्नि' ४. 'नसहित' ५. 'झाडून'

## हिंदुधर्मस्थापना, धर्मेंकरून प्रजापालन करणें...

नंतर महाराजांनीं विचार केला जे, " किल्ले, कोट प्रांत घेतला; फौज व पागा आपल्याजवळ जाली; जागांजागांचे माणूस उत्तम तितके आपण जमा केले; हषमी लोक जागांजागांचे नामी ठेविले; तसेच सरकारकूनही मोठे, कर्ते, शाहाणे मेळविले; ते समयीं आपण धर्मस्थापनेची इच्छा धरिली, हिंदुधर्मस्थापना[1] हेंच मानस, तसेंच देवीनें कृपाकरून आजपर्यंत घडविलें; पुढेंही शेवटास देवच[2] नेणार[3] म्हणून आक्रम केला; राज्य साधिलें. त्याचा पाया रीत घालून, धर्मेंकरून प्रजापालन करणें हें सिद्धीस न्याहावें[4] " म्हणून चित्तांत आणून, 'पूर्वी जे जे राजे धर्मेंकरून राज्य करून वृद्धीस पावले, ते कोणते रीतीनें चालले व शास्त्रांचे ठायीं पुराणांतरीं महान् राजे आचरण करीत आले, त्या अन्वयें आपणही करावें' ऐसें केलें.

याप्रमाणें अफजलवध नानाप्रकारें यवनाशीं युद्ध तृतीय प्रकरण समाप्त.

---

श्रीभगवानउवाच.

संरक्षणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम् ॥<br>
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ १ ॥<br>
रक्षावयासि साधूंतें माराया पातकी जनां ॥<br>
स्थापावयासि धर्मातें जन्में[5] युगयुगांतरीं ॥ १ ॥

---

१. 'हिंदुधर्म स्थापावा' २. 'तोच' ३. 'नेणार नेईल' ४. 'न्यावें' ५. 'जन्मभि'

## प्रकरण चतुर्थ

# राज्यमर्यादास्थापन व पितृदर्शन

श्रीशिवाजीमहाराज [ यांनीं ] मनोरथ धरिला तसें श्रीनें राज्य, प्रांत, स्थळें, देश, दुर्ग ऐसें करून दिल्हें. यवन यांचें प्राबल्य होऊन धर्म-उच्छेद जाला, तो [ धर्म ] स्थापावा ऐसा संकल्प केला, त्याअन्वयें श्री कृपा होऊन यवनांचा पराभव व्हावा ऐसें घडूं लागलें. या उपरि धर्मेंकरून चालावें म्हणोन [ महाराज ] बंदोबस्त करिते जाले.

### नव्या, जुन्या नेमणुका

पेशवाई मोरो त्रिमळ पिंगळे यांस, साहा वर्षें शामराजपंतांनीं केलियावरि त्यांची काढून दिल्ही होती; तेच कायम करून त्यांचे स्वाधीन तालुका प्रांत केला, तोच कायम करून दिल्ही.[1] निळो सोनदेव यांस बाळकृष्णपंत हणमंते यांची मजमू[2] काढून दिल्ही होती तेच कायम केली. आणि त्यांणीं दोनतीनशें कारकून दफ्तरचे ठेऊन एकवेरजी लिहिणें दफ्तर वगैरे सालाचे सालास पाहून करीत असावें, ऐसें केलें. अण्णाजी दत्तो[3] [ यांस ] सुरनिसी होती व तालुका प्रांत होता तो कायम केला. सोनोपंत यांजकडे डबिरी दिल्ही. दत्ताजीपंत यांजकडे [ प्रथम ] पागेची सबनिशी होती. त्यांस एके समयीं पागेचा झाडाचंदी[4] विचारितां तोंडानें हजार पांचशें घोड्यांचीं नांवें व चंदी नांवनिशीं त्यांनीं सांगितली; याजवरून यादी आणवून पाहातां [ जमली ], कांहीं एक अंतर नाहीं हें पाहून बहुत तारीफ करून त्यांजकडे वाकेनिशी, गंगो मंगाजी यांची दूर करून दिल्ही[5] [ होती ] तेच कायम केली.[6] प्रतापराव गुजर सरनोबत होतेच. पंडितराव उपाध्यक्ष, धर्माध्यक्ष रघुनाथभट व बाळंभट केले. न्यायाधीश निराजी रावजी केले. याप्रमाणें अष्टप्रधान असावे ते ते दरख पाहून केले, आणि यांणीं तालुके वहिवाटावे व फौज घेऊन कामगिरीस जावें. सन्निध त्यांस एक एक मुतालीक करून देऊन यांणीं कामकाज चालवावें. खासा [ प्रधान ] असतील [ तेव्हां ] त्याणींही करावें. याप्रमाणें करून दिल्हें. बाळाजी आवजी चिटणीस होतेच. दाहापांच कारकून लिहिण्यास ठेवून, त्यांचा बंदोबस्त करून देऊन, त्यांनीं चिटणिशी करावी. माहालमुलूक येथें व सरदारांबरोबर त्यांचे

---

१. 'केला.' २. 'मुनिमी' ३. 'सुरनीस.' ४. 'झाडचंदी', 'झाडा चंदी',
५.६. 'आणि गंगो मंगाजी यांजकडे पागा दिली.'

कारकून चिटणिशीवर एक एक जावा. याप्रमाणें करून दिल्हें. फडणिशी, मजमूकडील दफ्तरदारी, चिमणाजी आवजी [ कडे ] होतीच. पारसनिविशी नीळकंठराव प्रभु यांस दिल्ही. आणि शेषावा नाईक पुंडे यांस पूर्वी मालोजी राजे यांणीं पोतदारीविशीं वचन दिल्हें होतें, त्यांचा वौंश शामजी नाईक पुंडे यांजकडे पोतदारी होती ती कायम केली.

### बारा महाल व अठरा कारखाने

माहाल बारा व कारखाने अठरा केले त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें :—

द्वादश कोश यांस बारा माहाल[1] म्हणावें.

| | |
|---|---|
| १. अंतःपुर–दरुणी माहाल. | १. माहाल–टंकशाला. |
| १. द्रव्यभांडार–माहाल पोतें. | १. माहाल शिबिकादि–यानें. |
| १. धान्यागार–माहाल कोठी | १. माहाल इमारत. |
| १. अश्वधन–माहाल पागा. | १. माहाल सौदागिरी[3]. |
| १. गोधन–माहाल थटी. | १. माहाल चौबिना.[4] |
| १. आराम[2] क्षेत्रें–माहाल शेरीबाग. | १. वसनागर–जामदारखाना. |
| ६ | ६ |

१२

### अष्टादश शाला–अठरा कारखाने

| | |
|---|---|
| १. गजशाला–हत्तीमाहाल, पीलखाना. | १. मल्लशाला–तालीमखाना. |
| १. अंबारखाना–धान्यसंग्रह-स्थल. | १. रत्नशाला–जवाहीरखाना. |
| १. भेरीदुंदुभी–नगारखाना. | १. पाकशाला–मुदबखखाना. |
| १. यंत्रशाला–तोफखाना. | १. शस्त्रशाला–शिलेखाना. |
| १. वैद्यशाला–शरबतखाना. | १. तांबूलशाला–शराबखाना.[5] |
| १. पानीयशाला–आबदारखाना. | १. रथशाला–गाडीखाना. |
| १. उष्ट्रशाला–शुतखाना.[6] | १. जिनसखाना.[7] |
| १. शिबीरशाला–फरासखाना. | १. लेखनशाला–दफ्तरखाना. |
| १. खेटकशाला[8]–शिकारखाना. | १. नाटकशाला–नटखाना. |
| ९ | ९ |

१८

१. 'माहल', 'महाल' २. 'आरामक्ष' ३. 'सौतगी' ४. 'छबिना', 'चौबिना' ५. 'सराफ' ६. 'उष्टरखाना' ७. 'जिन्नसखाना' ८. 'खटकशाला'

याप्रमाणें माहाल व कारखाने केले. त्यांसि दरोगे अधिकारी कारकून व हवालदार वगैरे त्या त्या कामाचीं शाहाणीं माणसें उपयोगी पाहून बंदोबस्त करून दिल्हा.

## योग्यतेनुरूप अधिकारपदें, नेमणुका

रघुनाथ बल्लाळ कोरडे सबनीस होते, त्यांजकडे इमारत, किल्ले, कोट वगैरे पाहून करावें व सामान किलियावरील भरती, चौकशी करावी म्हणून सांगितलें. रावजी सोमनाथ शाहाणे पाहून कारभारांत ठेविले, व राजापूर सुभा त्यांजकडे होताच. आबाजी सोनदेव [ यांस ] कल्याण प्रांत सुभा होता. त्या प्रांतीं किल्ले, कोट यांच्या इमारती त्यांजकडे सांगितल्या. रावो बल्लाळ अत्रे यांस स्वारांचा सुभा दिल्हा. राघो मित्र म्हराठे यांस हुजरे लोकांचा[1] हवाला दिल्हा. व खासबारदार, इटेकरी, पटेकरी, ढालाईत, जासूद, काशीद वगैरे जिलिब्रीचे चाकरीचे लोक यांस सबनीस एक, एक हवालदार, नाईक पाईक करून नेमून दिल्हे. गोमाजी नाईक पानसंबळ यांस कापडाचे जामदारखानियाचा हवाला दिल्हा. मातबर सरदार, शरीरसमंधी निंबाळकर, घाटगे, शिर्के, मोहिते, माहाडीक, जाधव, पालकर, मानसिंग मोरे, रूपाजी भोसले, मकाजी आनंदराव वगैरे यांस पागा यांचे सुभे व सरदाऱ्या दिल्या. कंक, मालुसरे, फर्जंद, पासलकर, नाईक व देशपांडे मावळचे प्रभु वगैरे मोठे यांनीं कामें केलीं, त्यांस मावळे लोकांच्या सरदाऱ्या व पागा निसबतीस योग्यतेनुरूप देऊन वाढविलें. पायचे लोक याची सरनोबती येसजी कंक यास दिल्ही.

## रायगडावरील बंदोबस्त

रायगड जागा बहुत थोर, बांकी, वेलाग, किल्ला फार चांगला, राजधानीस योग्य स्थळ जाणून किल्ल्याचें काम इमारत आबाजी सोनदेव यांस सांगून कडे तासविले, बंदिस्त केले आणि वेलाग केला. आणि आंत राजमंदिर, दौलत-बंक, प्रगटसभा व मंत्रसभा व धर्मसभा व चित्रसभा व आदर्शमंदिर ऐशीं नांवें ठेवून त्याप्रमाणें जागें बहुत तरतुदीच्या[2] व माहाल राहण्यांचे[3] निराळे निराळे, याप्रमाणें खासगत राहाण्याची जागा करविली. तशीच पागा घोडियांस राहण्याची चिरेबंदी लादणीचीं घरें, गजशाला, पाकशाला, कोठी वगैरे अठरा कारखाने, बारा माहाल, यांचीं स्थळें करविलीं. बाजार दुरस्ता चिरेबंदी जोतीं घालून करविला. मातबर सरकारकून, सरदार व कारकून लोक यांस घरें सरकारच्या इमारती करून ठेविले. ज्याची जशी योग्यता तशी त्यास करून जागा दिली.

१. 'हुजूर लोकांचा' २. 'त र दीचे' ३. 'राण्यांचे' असा काल्पनिक पाठ साने देतात तो अयोग्य होय.

मातुश्री जिजाबाईसाहेब यांचे खासगीचे लोक, सेवेचे व शिबिकेचे पुराणिक, नित्यदान वगैरे धर्म करणें यास खासगीखर्च पाहिजे तसा नेमून देऊन त्यांस दिवाण, कारभारी करून दिले; व चार माहाल त्यांस लोक व सेवेचे लोक व बायका व खासगीखर्च वगैरे यांची नेमणूक करून देऊन, त्याजप्रमाणें तनखा लावून देऊन दिवाण एक व दरखदार चिटणीस, फडणीस यांजकडील कारकून नेमून देऊन पुराणिक ब्राह्मण निराळे निराळे बंदोबस्त करून, राजधर्म त्याप्रमाणें खोजे व सेवेच्या बायका चौकीच्या वगैरे करून देऊन, पुराणिक यांजपासून नित्य त्यांनीं पुराण, स्त्रियांचे धर्म व पातिव्रत्य-धर्म व इतिहास श्रवण करावें ऐसें करविलें. कारभारांत बोलों नये. कदाचित् उत्तम गोष्ट बोलणें तरि आग्रह न करितां महाराजांची मर्जी पाहून विनंति मात्र करणें. करणें न करणें पाहून महाराज करतील तसें मर्जीनें आज्ञेनें वागावें. याप्रमाणें धारा करून दिल्हा.

## प्रत्येकाचे अधिकार, मर्यादा

कारभारी यांणीं ज्याजकडे जो कारभार नेमला व ज्यांचे जे हुद्दे तें ते त्याचे त्यांणीं करावे, व कोण्हाचें काम [ दुसरे ] कोणीं करूं नये व आग्रह कोणाचा कोणीं धरूं नये, द्वेष करूं नये. तत्रापि एखादे ठाईं [ द्वेष ] पडल्यास महाराजांनीं निखालसता करून द्यावी. आज्ञा करतील तसें चालावें. द्वेष फारच पडल्यास त्यांत त्यांत शरीरसमंध करून देऊन मोडावे. लहान कामाचे हुद्देदार यांणीं थोर लोक यांची अमर्यादा,[1] महाराजांचे जवळ असणें व कृपा, याजमुळें करूं नये, व कारभाराविषयी बोलों नये. आपलाली सेवा करून मर्यादेनें असावें. यांत अंतर पडल्यास शिक्षा करावी. तसेंच सरकारकून यांणीं जे समयीं ज्याची चाकरी व उपयोग तशी घालमेल करून[2] करणें आल्यास[3] दुसरें काम अथवा जसें सांगितलें तसें [ लोकांनीं ] निष्ठेनें चालावें, त्याप्रमाणें सर्वांनीं मान्य करून चालावें, ऐसें केलें. शरीरसमंधी व लोक व पागे, सरदार, शिलेदार यांणीं आपलें बोलणें, काम असेल तें आपले नाईक जुमलेदार यांजपाशीं बोलावें. त्यांणीं सरदारासि बोलावें. त्यांणीं सरनोबतास सांगावें अथवा मुत्सदी यांजपासून बोलवावें. रूबरू गवगवा काडीमात्र करूं नये. सरदार, सोयरे लोक, शिपाई यांणीं महाराजाशींच एखादा अर्ज करणें तरि कारकून यांजपासून करवावा. रूबरूच एखादी गोष्ट बोलणें, ती मर्यादेनें बोलावी. त्यांचें ऐकून उत्तर कारकुनापाशीं अगर अमुक कारभारी यांस सांगतों म्हणून गौरव करून, विडे वगैरे देऊन, निरोप द्यावा. कारभार विषयांत ज्यास जें सांगितलें असेल त्याखेरीज [ दुसरे कोणीं ] काडीमात्र बोलों नये. जवळ असणार, कृपेंतील, त्यांणीं सर्वकाळ जवळ असोन शिपाईगिरीच्या, घोडियांच्या

१. अमर्यादा अथवा ' २. ' करूं नये ', ' करावी ' ३. ' असल्यास '

वगैरे गोष्टी बोलाव्या. त्यांजवर कृपाही करून वस्त्रें, भूषणें द्यावीं, घोडीं द्यावीं. परंतु कारभार करणें तो सरकारकून यांणींच करावा. [यांणीं ] आपलें बोलणें असेल तें कारभारी यांजपाशीं बोलोन बोलवावें. याप्रमाणें बंद बांधून दिल्हे.

### किल्ले, कोट, ठाणीं यांजरील नमुनेदार व्यवस्था

किल्ले, कोट ठाणीं घेतलीं त्यांचा बंदोबस्त सुभेदार एक व हवालदार एक व सबनीस व सरनोबत व तट-सरनोबत व फडणीस[1] कारखानीस[1] याचा[2] हस्तक हे दरखी अधिकारी[2] करून दिल्हे. त्यांत हवालदार इतबारी व घरंदाज, कुलीन, मर्द शाहाणे ऐसे पाहून म्हराठे ठेविले. सुभेदार व सबनीस, ब्राह्मण देशस्थ, कराडे, कोंकणस्थ, मध्यंदिन ऐसे विश्वासू शाहाणे मर्द स्वामिसेवातत्पर पाहून योजिले. कारखानीस प्रभु लोक, बाळाजी आवजी प्रभु चिटणीस[3] यांचे निसबतीस धंदा देऊन त्यांचे तर्फेचे नेमून दिल्हे. सरनोबत व तट-सरनोबत हे म्हराठे केले. हवालदार यांणीं सदरेस कारभार करावा. परवानगी-रसानगी दरवाज्याची व किल्ल्याची[4] त्यांजकडे. किलियाचा तनखा, दाणा-गल्ला, दारूगोळा, सामान आणवणें हाही[5] कारभार त्यांजकडेच, शिक्का त्यांचे नांवें, किलियाचें मुख्यत्व त्यांजकडे, सुभेदार यांणीं सर्व कारभार करावा तो त्यांचे विचारें, अनुमतें करावा. सबनिसांकडे हाजिरी लोकांची व चौकशी. कारखानिसांनीं कोठीचा जिन्नस, जमा व खर्च व दारूगोळा, इमारत, लोकांस रोजमरा वाटणें हें लिहिणें करणें, त्यांजकडे. याप्रमाणें करून दिल्हें. चालण्याचे कानू-जाबते[6] करून दिल्हे. त्याप्रमाणें एकाचें काम एकानें न करितां[7] सर्वांनीं एक लक्षेंकरून चालावें, याजप्रमाणें किल्ल्याचें काम नाजूक जाणून फार सावध, इतबारी, चांगलीं माणसें रीतीची[8] योजून किलियास ठेविलीं, अश्वारूढ व सभासद व गडकरी, मेटकरी, परवारी रामोशी ऐसें करून दिल्हे. परवारी, रामोशी यांणीं तटाखालील चौक्या कराव्या. कदाचित् एकांत एक विरुद्ध चालूं लागले, तरि हें वर्तमान कळतांच बदलून दुसरे ठेवावें. आणि रोखापत्र याजवरि शिक्का करणें व सरकारपत्र येणें, हें सर्व हवालदार यांचे नांवें यावें. संध्याकाळीं दरवाजा लावून कुलूप लावावें, आपण येऊन तें मागतीं ओढून पाहून हवालदार यांणीं आपले आंगें-करून किल्ल्या घेऊन जाव्या. आपल्या जवळ उशासि ठेवाव्या. प्रातःकालीं येऊन, कुलूप काढून, दरवाजा उघडावा. रोज गस्त[9] सर्व दरखदारसुद्धां घालावी. जागां जागां पाहरे यांची चौकशी हवालदार यांणीं करावी. याजवरि सरनोबतांनीं गस्तीची व

१.१. 'फडणी', 'फडनीस कारखाननीस २.२. "यांच्या हस्तकीं देखरेखी अधिकारी" ३. 'चिटनिवीस.' ४. 'किल्याचे' ५. 'बाह्य कारभार' ६. 'कानून जाबते', 'कानूकायदे' ७. एकानें करितां' ८. 'तीच' ९. 'घस्त'.

लोकांची रात्रीची चौकशी करावी. तटसरनोबत यानीं किल्ला लाहान थोर, त्यांचे पाहरे त्यांस दोनचार पाहारे नाजूक जागा[1] जागे असतील त्यांची चौकशी त्यांणीं करावी, किल्ला कोट पाहून माणसांची भरती नेमणूकी [ करावी ] त्यांस अडिसेरी[2] व नख्ती वगैरे वेजमी किल्ला पाहून, जकीरा दाहा पांच वर्षांची वेजमी गल्ला, लाकूड-फाटें, जिन्नस-मात्र दारूगोळा व चुना बांटून तयार, ऐसे सुद्धां, अमके किल्ल्यावर अमकें सामान, याप्रमाणें धारे बांधून दिल्हे. किल्ल्याचे तट जेथें सोपे होते [ तेथें ] ते तासून व सुरुंग लावून इमारती करून वेलाग करविले. कोणतेही किलियास इमारत नाहीं ऐसें नाहीं. हवालदार यांस दिवटी, भालदार, पालखी योग्यतेनुरूप किल्ला पाहून नेमून दिल्हें. वरकडांस दिवटी, चाकर, पोरगे वगैरे नेमून दिल्हें. हवालदार यांणीं रात्रंदिवस सदरेस सावध, लोकसुद्धां, हत्यारबंद असावें. किलियाखालीं नाकियांस, वाटेचे जागां मेटे, तेथेंही लोक, चौक्या ठेवाव्या.

दाहा माणसांचा दाहिजा, त्यांत एक नाईक नऊ पाईक[3]; त्यांत बंदुखी व आड-हत्यारी, सांग [वाले] बरची [वाले,] इटेकरी, पटेकरी पाहून ठेविले. लोक ठेवणें [ते] खासा महाराजांनीं आपण नाईक पाईक करणें [ तें करावें. ] जसे माणूस मर्द चांगले इतबारी असेल त्याची परीक्षा, हाजिरी करून ठेवावे. आणि कामें योजून दिल्हीं, त्याप्रमाणें किल्लेकिल्ल्यांचे बंदोबस्त निराळेनिराळे करून देऊन, ते किल्ले सुभेदार, मामलेदार, तालुकदार यांचे निसबतीस लावून, त्यांणीं किलियावरि सामान[4] नवें जुनें करवणें, खर्च लोकांस वगैरे जाला तो पाहून भरती करून देणें[5], तें सरकारांतून[6] तालुकेयांस नेमून दिल्हें, त्यांस विचारून करून द्यावें. लोक व दरफदार यांची तगिरी व बाहाली, गयाळ, मयत, नाकारे कामगार [ यांस दूर करणें ] हें हुजूर-सनदेनें व्हावें. त्याचा इतला कोण्हाकडे नाहीं. तालुकदार यांणीं करणें तें महाराजांच्या आज्ञेप्रमाणें करावें. ऐसें रीतीनें सर्व कामें विभागपरत्वें लावून देऊन आज्ञेखेरीज पाय पालटूं नये आणि जेथील तेथें आयास न होतां घडत असावें असें करून दिल्हें. किल्ले कोट हे आपले राज्याचा जीवप्राण; प्रांत घेतले त्यांचें संरक्षण, मोठीं मोठीं संकटें पडलीं असतां किल्ले कोट, जंजिरे सावध, तरि मोठेही शत्रूंचा हिसाब धरावयास नको[7] म्हणून किलियांचा बंदोबस्त फार बारीकपणें करविला.

## पागा—बारगीरपासून सरनोबतपर्यंत यांचीं कर्तव्यें

आतां मुलुख व प्रांत यांचा बंदोबस्त केला जे, प्रांताचे प्रांतास सुभा.[8] त्यास मजमदार, चिटणीस, फडणीस, दफ्तरदार, हुजूरचे दरखदार यांचे निसबतीचे, याप्रमाणें

---

१. 'जागां जागां' २. 'अडिस्त्री' ३. 'शिपाई' ४. 'सामान यत्किंचित्.' ५. 'देणें याप्रमाणें त्यांनीं करणें' ६. 'सरकारकून' ७. 'धरावयाचा नाहीं' ८. 'सुभेदार नेमिल'

असावे. गांवगन्ना[1] कमावीसदार त्यांणीं सर्वांनीं [ वसूल ] तालुकदार यांचें अनुमतें करून, हिशेब त्यांजपाशीं आणून, त्यांचे अनुमतें दफ्तरांत दफ्तरदार यांजपाशीं गुजरावे, ऐसें करविलें.

पागा : मोंगलमवाशी लुटले त्यांचीं घोडीं व खरेदीचीं[2] घोडीं व शिंगरें व मादवान असे निरनिराळी जागा चांगली पाहून तयार करवून[2] व दर्यांतील वगैरे अरबी, कच्छी, ताजी, माणकी ऐसे मोठेमोठे अवलादीचे,[3] निगेनें जपून राखणार करोल-निशाण लावणार व आडहत्यारी, ऐसे रूबरू परीक्षा घेऊन पाहून[4] शिलेदार ठेवणें तेच ठेविले. निराळे ठेविले नाहींत. घोड्यांची किंमत करून पैका देऊन, पागेंत लाविलीं. कारण[5] त्यास आपला घोडा लागून घोडें ताजे राखणार नाहीं, चाकरी नकोशी वाटल्यावरि निघोन जाईल म्हणून [ शिलेदार ] पागाच करून ठेविले. पंचवीस घोडियांस एक हवाल- दार नेमिला. दाणा, वैरण, जिन्नस, सामान सर्व पाहून जतन त्यांणीं नगासुद्धां[6] चौकशी करावी. चाकरी माणूस व बारगीर सांगणें त्याजकडे. तो मर्द, शाहाणा, इतबारी ऐसा पाहून बारगीर ठेविला. पंचवीस घोडियांस पखाली एक व नाल- बंद एक. याजप्रमाणें पांच हवाले म्हणजे सवाशें घोडे, यांस जुमला असें नांव. त्यास एक जुमलेदार व कारकून एक नेमिले. ऐसें पांच जुमले त्यांस एक सुभेदार असावा.[7] तो नामांकित, मर्द; त्यास पालखी व कारभारी मुजमदार असावा.[8] त्यांणीं सर्व कारभार करावा. असे सुभेदार दाहा म्हणजे एक हजारी त्यांस सरदार, मराठे मर्द, इतबारी पाहून, सरदारी देऊन, त्याचे स्वाधीन तितके केले. त्यास मुजुमदार, दिवाण व जमेनीस एक याप्रमाणें देऊन त्यास पालखी व हत्ती उंट, याप्रमाणें करून दिल्हें. याप्रमाणें त्यास पंचहजारी यांचे स्वाधीन पांच हजार. तो फार मातबर सरदार; त्यास लवाजिमा, नौबत निशाण, हत्ती वगैरे करून देऊन पद्धति केल्या. त्यांणीं सर्वांनीं सरनोबत यांचे आज्ञेंत राहून स्वारी-शिकारी करावी, असें केलें. कांहीं शिलेदार मानकरी[9] ठेविले. त्यांणींही सरनोबताचे आज्ञेंत वागावें. घोडियाचे वोळखणीस मागें चौकावरि, फऱ्यावरि, शिक्का केला तो करावा, ऐसें केलें. [ सर- नोबत ] यांजपाशीं सर्व दरखदार, दिवाण, मजमदार, चिटणीस, फडणीस, जमेनीस, वाकेनीस असे करून दिल्हे. हत्ती, अंबारी, जरीपटका, हत्तीवरील नोबत ऐसें दिल्हें.

१. 'गावगणा' २.२. 'तशी खरीदी करून व शिंगरें-पागा, मादवान-पागा वगैरे जागा चांगली पाहून ठेवून, उत्पन्न करून तयार करून,' ३. यापुढें, 'घोडे, घोड्या आणून पागा जमविल्या बारगीर घोडियास, ती मर्द, घोडे' हा मजकूर अधिक ४. यापुढें 'त्यास एक पोरगा याप्रमाणें दिल्हा.' हा मजकूर अधिक. ५. 'पागा म्हणजे खासगी झाली. शिलेदारीनें ठेविल्या.' ६. 'निगासुद्धां' ७. 'म्हणावें.' ८. 'एक' ९. 'मानकरी याचे'

वाकेनिसानीं त्याचा वाका दिनचर्या लेहून नित्य पाठवीत असावें. वरकड दरखदारांनीं आपलाले दरख करावे.

### हेरगिरी नालबंदी इ.

बातमीस हलकारे ठेविले. त्यांची नाइकी बहिरजी यांस दिल्ही. त्यांजवरि महाराजांचा इतबार. अशी[1] बातमी सर्व मुलुखांतील स्वराज्य परराज्यांतील ठेविली. नाईक याणें पत्रें पाठवीत असावीं, तीं चिटणिसानें नित्यचे नित्य दाखवीत असावीं.[1]

घोडियांस नालबंदी महिनापंधरा दिवशीं करीत जावी. जसें काम तसें नवे नाल लागतील ते पाडणें. लोखंड निवेल तें नवे नालांस अमकें लागलें, एकंदर नवे नाल अमके लागले, त्यांचें लोखंड अमके खंडी जालें, ऐसें सालास पागे यांणीं सरकारजमेस धरून समजावावें. याप्रमाणें बारीक चौकशीनें धारे केले.

### विधिनिषेध

सरनोबत यांणीं पागा घेऊन स्वारीस जावें, मुलख मारावा. त्याची लूट काडी-मात्र बाहेर जाऊं न देतां आणून रुजू करावी.[2] आठमाही स्वारी करावी. नदीनाले भरले नाहींत तों आपले परत यावें. लूट[3] सरकारी शिवाय ज्याची त्यास द्यावी.[3] छावणीस जागां जागां [ प्रांतात ] नेमणूक असेल तशा पागा पाठवाव्या. लष्करांत बटीक, बायको, कळवांतीण[4], कलाल नेऊं नये. कारण माणूस बेखबर[5] राहतें. असावध असलिया दगा पावेल. व्यसनी माणूस असलिया चाकरी होणार नाहीं. चुकावील. धावणी धुपणी होणार नाहीं. सरकारकामास अंतर पडेल. म्हणून ताकीद

---

१. १. ‘ बातमीचें झाडून काम बहुतच तरतुदीनें राखून मुलुखांतील, स्वराज्य व परराज्य व सरकारकून, सरनोबत, सर्व सरदार, सुभे, मामले व शहरें यांजकडील, किल्ले वकील गेले त्यांजपाशीं हलकारे यांजकडील बातमी सर्व त्या नाइकापाशीं आखबार लाखोटेपत्रें व जबानी यावी. त्यांणीं सर्व बातमी येईल ती [ महाराजांस ] कळवावी. पत्रें येतील तीं चिटणिसापाशीं द्यावीं. त्यांणीं त्यांचे सारांश लेहून, यादी करून, नित्यचे नित्य दिनचर्या येतील तैसें समजावीत असावें. ’ २. यापुढें, ‘ येवशीचा बंदोबस्त : प्रथम स्वारि निघालेवरि एक मजल जावें. तेथें ज्यां जें असेल तें सर्व, जमेतीस यांणीं लिहून ठेवावें. ’ हा मजकूर अधिक. ३.३ ‘ तेव्हां जवळ आलियावरि लूट सरकारजमेस आली ती आलीच. बाकी मोजदाद करून, स्वारी जातां लेहून ठेविलें त्याप्रमाणें ज्यांचें त्यास देऊन बाकी सरकार जमेस करावें. त्यांत ज्यास जें पाहिजे तें त्याचे तैनातींत धरून किंमत करून द्यावें. ’ ४. ‘ कलावंतीण ’ ५. ‘ बेखबरदार ’

केली. नेईल त्यास शिक्षा करावी. म्हणून ताकीद करून करविलें. आणि लुटींत बायको, पोर धरूं नये. ब्राह्मणवस्तीस व देवास उपद्रव न लावावा. गाई धरूं नये. धरल्यास गाईवासरांची तडातोड होईल, यास्तव हें करूं नये. खंडणींत [ ब्राह्मण ] वोल घेऊं नये, यवन घेत जावा. अशी ताकीद केली. [ आज्ञेस ] अंतर पडल्यास क्षमा न करितां, शिक्षा करून चाकरीवरून दूर करूं असे धाक[1] लावले. महाराज आपणांस पाहिजे तसें देणार, मग अंतर कां करावें ? म्हणून लाहानापासून थोर निष्ठेनें, इमानानें, आज्ञावचन [ पाळून ] केवळ ईश्वर आपला, त्याची अवज्ञा न करितां चालते जाले. स्वारी येतां झाडून तैनातीचा हिशेब करावा, याप्रमाणें करविलें.

महाराजांनीं मावळे लोक वगैरे हशमी जमविले. त्यांत पांच हजार माणूस निवड धावणार असें स्वारीबरोबर ठेविले. करोल, सांग, बरची, पटेकरी यांच्या जमाती केल्या. तीस, चाळीस, साठ, शंभर ऐसे लोक, त्यांत सरदार त्यांस कारकून, असे जथे केले. त्यांणीं स्वारीबराबर चालावें. पुढें, मागें, बाजूनें चालण्याची नेमणूक त्याप्रमाणें चालावें. त्यांस पोशाख चांगले. मंदील बांधावयास, सखलादा, व ताडपत्री व पैठणी पासोड्या, याप्रमाणें हजार दोन हजार माणूस कोण्हास सोन्याची, व कोण्हास रुप्याचीं कडीं, मोहनमाळा[2] व कंठ्या, व हत्यारांस सोन्यारुप्याचे कट, तैनाळ करून दिल्हे.

स्वारीस पागा जाणार, त्याखेरीज हुजूरपागा जवळ नेहमीं पांच हजार घोडीं, तीं बहुत चांगलीं, जीनसामान सोन्यारुप्याचें व त्यांजवरि बारगीर मोठेमोठे लोक, करोल[3] हत्यारबंद, पालखीनशीन ऐसे ठेविले. खासे घोड्यांवर सोनें, रुपें, जडावाचें जीन व सरोसरा, ऐसीं दोनशें घोडीं. याप्रमाणें पांच हजार पागा बराबर जवळ नेहमीं राहावी ऐसें ठेविलें. सर्वांस तैनात केली. ती समयाचे समयास पावावी. शिवाय लग्न, मुहूर्त हरएक प्रयोजन त्यांची नेमणूक ब्राह्मणांस अमके रीतीनें, वरकडांस ज्याचे त्याचे योग्यतेनें देणें तें देववावें. कोण्हीं कर्ज करूं नये. उफानखोरी[4] करूं नये. माणूस योग्य पाहून ज्याची जशी प्रतिष्ठा तशींच वस्त्रें भूषणें देऊन त्याहून अधिक त्याणीं करूं नये. ज्याची तैनात करणें त्याचें कुटुंब व खर्च, योग्यता पाहून त्या अजमासें चौकशी करावी. देणें थोडे[5] खर्च फार[5] तरि कर्ज करील, खर्च थोडा देणें फार तरि बेज्याही[6] वर्तणूक करून दिवाळखोर होईल. अशानें अधिकच व्यसनी होईल, जाणोन योग्यायोग्य पाहोन [ तैनात ] करून द्यावी. मर्यादेहोन अधिक कोणी केलें आणि व कर्ज केलें तरि त्यास दूर तत्काल करावें.

पागा राहाण्यास छावणीच्या जागा, तेथें पागा गेलियावरि सुभेदार यांणीं दाणा, चरीदा, माणसें राहाणें हजरी गैरहजरी पाहून चौकशीनें बेजमी[7] करून

---

१. ‘ भय ’, २. ‘ मोहनमाला ’. ३. ‘ करवल ’ ४. ‘ फैजखोरी ’ ५.५.‘ खर्च थोडा देणें फार ’ ६. ‘ बेनाहक ’, ‘ बेज्यहा ’ ७. ‘ बेगमी ’

चालवावें. हिशेब होऊन, देणें फाजील हुजूर परवानगीनें द्यावें. कामकाजें केलीं त्यांचीं चौकशीनें बक्षिसें द्यावीं. वाढवावीं. निकामी, अथवा योजिलें स्थळीं कामाचें नाहीं तरि दुसरा [ माणूस ] अधिकारी यांणीं समजावून ठेवावा. याप्रमाणें छावणीचे दिवसांत करून, मागुती स्वारीशिकारीस आज्ञेप्रमाणें मनसब्यानुरूप तयार असावें, जावें. फौज घरीं राहिली, निःकारण[1] तैनात वाढली, निःप्रयोजन खात बसले तर कार्य राहातें, दहशत [ राहात ] नाहीं, राज्य साधणें घडत नाहीं, कृतकृत्य मानून, शत्रूंशीं सख्य करून राहिल्यास तें [ राज्य ] वृद्धीस जात नाहीं, व शत्रु आहेत [ ते ] हेंही हरण करितात, [ तेणें करून ] सुख पडत नाहीं. यास्तव प्रतिवर्षीं स्वारी करावी, ऐसें करविते जाले. लूट येईल ती जमा करून, कापड व दागिने नीट करावे, त्यांस किंमती घालून जे जिन्नस असतील ते ज्यास जसे पाहिजेत तसे त्याचे वेतनांत द्यावे. वेतन समयास न पावलें तरि त्याचें कुटुंब उपवाशीं मरेल. त्याचा द्रोह श्रेयष्कर नव्हे. तसेंच माणूसही दिलगीर असलेयास नाशास कारण. फितवा-फांदडा करून अपाय करील. म्हणून महाराज सावधपणें असें [ वेतन समयास पावेसें ] करविते जाले.

### हषम-नाईक-हवालदार-सरदार

हषम मावळे लोक, त्यांत दहाना[3] एक नाईक. पांच नाईकांस हवालदार एक. पांच हवालदार त्यांस एक जुमला. पांच जुमल्यांस सरदार एक. त्यांस तैनाती यथायोग्य कुटुंब तशा द्याव्या. चांगलें माणूस गुणी दुसरीकडे जाईल म्हणून योग्य तसें केलें. लग्न-मुहूर्त-प्रयोजन यास नेमणूक करून द्यावी. त्यास खर्च त्यांणीं अधिक करूं नये. उफानखोरांचें[4] पारिपत्य करावें. बदराहा चालेल त्याची क्षमा किमपि, [ कोण्हीं ] न करावी. यथायोग्य पाहून शिक्षा[5] करावी. अल्प अन्यायीं उग्र दंड, न करावा; बहुत अन्याय त्यास स्वल्प दंड न होतां पाहून करावें, ऐसें केलें. शेतकरी चाकरी लोक यांचा धारा रयतेप्रमाणें करून त्यांचे तैनातींत द्यावा. वरकड पावणें नख्त,[6] गल्ला, कापड, जिन्नस देऊन, बाकी [ राहिल्यास ] वरात देऊन झाडा सालाचे सालास हजरी गैरहजरी पाहून करावा. बाकी ठेवूं नये. कोणास मोकासा देऊं नये. वरात देऊन पावावें.[7] मोकासा दिल्यास त्यांचीच सत्ता गांवांत होऊन रयतेस उपद्रव देतील. यास्तव [ मोकासे ] न दिल्हे. वेकैदी करितील, जमेदार [ व ] ते एक होऊन रयत नागवितील, यास्तव [ मोकासे ] न दिल्हे. राजा शासन न करि तरि प्रजा भीत नाहीं. प्रजा कशी ? तरि जसे मस्त हत्तीस भयभीत होतात; तोच गज मदरहित जाल्यास त्याची हेळणा करितात; अथवा सर्प विषरहित त्यांस भीत नाहींत, हें

---

१. 'निष्करण', 'निःप्रयोजन' २. 'सोनेदागिने' ३. 'दाहिजा' ४. 'तुफानखोरांचे' ५. 'क्षमा' ६. 'नगदी' ७.. 'पाठवावें,'

जाणून यथान्याय शिक्षा प्रजेस करून चाल करून दिल्ही.

### रयतेस बेजाबता कोण्हा एकाचा उपद्रव न लागावा.

सुभे तालुके दिल्हे [ त्यांस ] जसे शत्रु जवळ लगतीं,[१] त्याप्रमाणें प्रतिकारार्थ हषम फौज त्यांचे जिमेस नेमोन देणें ते देऊन ठेविली. प्रांताची लावणी, गांवगन्ना मोजणी करून धुरुंग, चावर, रुके, पैके, दोऱ्या, खंड्या व खडक्या आदिकरून ज्या देशीं जशीं नांवें, जशी चाल, त्याप्रमाणें काठी घालून बिघे करून त्यांस इस्ताव्यानें कौल देऊन व मालाचा अजमास करून [ आकार करून ] वसूल घ्यावा, ऐसें करावें. ज्याजती जलाल[२] रयतेस लागूं न द्यावा. याप्रमाणें ताकीद केली. वतनदार कदीम पाहून अभय देऊन आणावे. त्यांच्या मनसुब्या बरहक करून त्यांचे हातें काम घेऊण लावणी करावी. ऐसें करून जमीदार, वतनदार आदिकरून त्यांस हकरुसूम यांचे धारे नेमणूक करून दिल्ही. रयतेस बेजाबता कोण्हा एकाचा उपद्रव न लागावा, हलकूद[३] चालावें. सरकार चाकरी याप्रमाणें करावी, ऐसें केलें. पूर्वींही धारे दादाजी कोंडदेव व मोरोपंत व अण्णाजी दत्तो वगैरे यांणीं केले, ते चालवावे.

### देवब्राह्मणप्रतिपालन

प्रांत, देश हस्तहत जाले तेथें थोर थोर देवस्थानें होतीं, त्यांस प्राचीन धर्मादाय चालत आले [ ते ] यथास्थित चालावे व नवीन देवस्थानें पाहून त्यांच्या पूजा-अर्चा, नैवेद्य, उत्साह,[४] अभिषेक, नंदादीप करून दिल्हे, व त्यांस पारपत्यगार नेमून देऊन त्यांची स्वस्थता केल्याप्रमाणें चालावेसें केलें व ग्रामदेव यांस [ नैवेद्य ] नंदादीप चालते केले. तसेंच थोरलहान क्षेत्रें येथें ब्राह्मणांचीं कुटुंबें पाहून त्यांस वर्षासनें, नेमणुका त्याच गांवीं करून दिल्ह्या, व थोर थोर सत्पुरुष यांसही गांव, भूमि, उत्साह चाले ऐसें करून दिल्हें.

वेदशास्त्र अगदीं उच्छिन्न जालें [ होतें, ] त्यांस एक ग्रंथ अध्ययन[५] केले त्यांस मणभर धान्य; दोन ग्रंथ अध्ययन केले त्यास दोन मण; पंचग्रंथ, दशग्रंथी यांस पांच मण दाहा मण परीक्षा करून द्यावें. तसेंच पंडित जसा जो विद्वान् त्यास योग्यता पाहून, स्वदेशी असल्यास त्यांस भात विदेशी यांसि द्रव्य याचीं वर्षासनें, श्रावणमासीं सर्वांस पंडितराव यांणीं परीक्षा करून अधिक विद्या होईल त्यास अधिक मोईन[६] वाढवावी. मोठे मोठे पंडित, वैदिक, प्रतिष्ठित येतील त्यांच्या सभा करून, सत्कार करून त्यांस शंभर पन्नास रुपये अधिकही योग्यतेनुरूप द्यावे, ऐसें

१. ‘ वागतात ’ २. ‘ जुलूम ’ ३. ‘ हलकूप ’ ४. ‘ उत्स ‘ उछाहा ’
५. ‘ अधीत जाला. ’ ६. ‘ मोईन्न ’

करून दिल्हें. याजमुळें दिवसेंदिवस अधिक विद्या वृद्धीस पावती जाली. अग्निहोत्रें घेणार, त्यांस तितकें द्रव्य देऊन घेवावें. त्यांची मोईन अधिक करावी. तसेंच यज्ञ करणार, त्यांस द्रव्य लागेल तसें मोईन बांधून देऊन यज्ञ करवावे. याप्रमाणें देवब्राह्मणांची स्थापना करून नित्यदानें नैमित्य[1] प्राप्त जालें असतां कसें करावें त्याप्रमाणें केलें. तसेंच जागां जागां अन्नछत्रें व नित्यब्राह्मणभोजन, इच्छाभोजन ब्राह्मणांस यांचे निबंध बांधून दिल्हे. ब्राह्मण आपले राज्यांतील दुसरे राज्यांत यांचा§ करावयास न जावे ऐसें केलें.

## राष्ट्रांत कोठें चोरभय नाहीं.

आपले राज्यामध्यें चोरभय अगदीं नसावें ऐसें मनांत आणून जागां जागां बेरड, चोर, आडेकरी[2] होते त्यांस धरून आणून कित्येकांचे शिरच्छेद केले. आणि ज्या ज्या देशांतील होते त्या त्या प्रांतांतील किल्ले, ठाणीं, कोट येथें असाम्या[3] नेमून देऊन त्यांस शेतें वगैरे देऊन गडकरी यांस घेरियाचे चौकीस नेमून, त्यांची जीविका चालेसें करून, यांतून चोरी कोणी केली असतां शिरच्छेद करावा, ऐसें केलें. प्रतिगांवास रखवाली एक बेरड त्या किल्ल्याचा त्या प्रांतांत असावा. चोरी जालियां त्यानें भरून द्यावी, नाहीं तर पत्ता लावून द्यावा, ऐसें केलें. याजमुळें राष्ट्रांत कोठेंही चोरभय नाहीं ऐसें जालें.

## तोफखाना, पीलखाना, उष्टरखाना

तोफखाना याचा बंदोबस्तः—लाहान मोठ्या तोफा त्यांस गाडे करऊन, त्यांस दुसरे छकडे दारूगोळ्याचे, व दारू बहुत चांगली तयार असावी. माळेस बैल ज्या तोफेस जसे पाहिजेत तसे दोहेरी सामान, सुतार, लोहार, चांभार, रसीदार, तबलदार,[4] गोलंदाज, असें पाहिजेत तसें करून, तोफखान्याकडे हत्ती तोफांस एखादे वेळेस लागतात याकरितां नेमून, गारदी व पायदळ[5] एक एक तोफेस अमके असावे असा नेम करून अधिकारी कारकून व हवालदार, मर्द, शाहाणे, तरतूद करणार, त्यांणीं दारूगोळा, बाण कैच्या तयार करणें, तरतुदीनें व जवांमर्दीनें, तोफा लावणें, काढणें, कवायती करणें, ऐसें करावें. ऐशा दोनशें तोफा तयार चालू.[6] बाकी[7] गाड्यावर राहाव्यासें केलें.

हत्ती पीलखान्यांत तीनशें साडेतीनशें होते.[8] त्यांतून सरदार व पागा याचे निसबतीस नेमणूक तसे देऊन, बाकी खाजगीकडील जिलिबीचे व स्वारीचे निशाण

१. ‘ नैमित्तिक ’ §=याञ्चा. २. ‘ आडेकर, ’ ३. ‘ असावेसें नेमून देऊन ’ ४. ‘ तलफदार ५. ‘ गारदी पायदळ ’ ६. ‘ चालऊन ’ ७. ‘ नेहमी ’ ८. ‘ हत्ती ’

नोबतीचे नामी, मर्द पाहून नेमून, कोतवाल अंबाऱ्या, हौदे असे शंभर हत्ती तयार असावेसें केलें. त्यांचीं सामानें व चारणीच्या जागा व रतीब वगैरे नेमणुका करून दिल्ह्या.

तसेच उंट हजार दीड हजार होते. यांत लदाऊ[1] निसबतीस पागा वगैरे व सांडणीस्वार व सुतारनालाचे[2] वगैरे ऐसें करविलें.

## गाई–म्हशींची व्यवस्था

थटी–गाई, म्हशी बहुत. दोन चार हजार गाई, त्यांचीं खिलारें केलीं. तीं मानदेश, भिंवरथडी वगैरे गवताचीं रानें पाहून जागां जागां ठेविलीं. त्यांची शुश्रुषा गौळी चाकर ठेवून बहुत रीतीनें व्हावी ऐसें करविलें, तसेंच महिषी पांच हजार, खिल्लारें करून त्यांस गौळी व धनगर यांचे स्वाधीन केल्या. यांणीं देशांत व कोंकणांत सड्यांवरून जागां जागां राहावें. त्यांचे धारे व मोजदादी करून लोणी वगैरे उत्पन्न यावें. एकादे समयीं जिकडे जसें खर्चास दूध वगैरे ब्राह्मण-भोजनास पाहिजे तरि तसें हजारों शेर एकदांच यावें; तसेंच लोणी तूप यावें; ऐसें करविलें. तसेंच मेंढरे यांचे धनगर करून खिलारें पंचवीस हजार करविलीं. त्यांची मोजदाद वर्षांतून दोन वेळ ठेवावी. उत्पन्न खर्च पाहून दसऱ्याचे वगैरे खर्चाची येण्याच्या मोइनी केल्या.

## नित्यविधि, त्यांत न्यूनाधिक होऊं नये.

याप्रमाणें सर्व दौलतीचा बंदोबस्त बहुत तरतुदीनें करून आपण नित्य दिनचर्या करण्याचे नेम केले कीं, उषःकालीं उठावें. ते समयीं गायक यांणीं श्रीभगवंताचे स्तुतिपाठ [ करावे. ] वीणा, मृदंग [ इत्यादि ] मंगलवाद्यें, नगरखाना यांचें श्रवणें करून उठावें. कांहीं प्रातःस्मरण करून सर्वकर्ता भगवान हे संकल्प करून शौच विधियुक्त करावा. नंतर गोसेवनदर्शन, मंगलालंभन करून स्नान गंगादिमहा-नदीच्या उदकें करावें. जप-ध्यान,[3] देवतार्चन करावें, तें समयीं सर्व शिष्ट ब्राह्मण सभापंडित यांणीं धर्मचर्चा करावी. पुराणश्रवण करून, चार घटका दिवसास तिलक वस्त्रें अलंकार भूषणें घेऊन तिरंदाजी व निशाण एक घटका करून सभेस यावें. तेथें सर्व कार्यकर्ते कारभारी वगैरे यांणीं आपलालीं कार्यें विचारून करावीं. जे जे दर्शनास येतील त्यांजकडे कृपायुक्त अवलोकन करून त्यांचे मुजरे घ्यावे; कोणाकडे अवलोकन करून किंचित् आपण हास्य करावें; कोणाशीं कांहीं भाषण करावें; कोणास कार्य सांगावीं. ऐशीं सर्वत्रांची अंतःकरणें वेधून घ्यावीं. सर्वांस भासावें जे, ' माझे ठायीं कृपा विशेष आहे. ' ऐसा सर्वत्र आले त्यांचा गौरव करावा. दाहा घटका दिवस

१. ' लढाऊ ', ' लदाड ' २. ' सुरनाळा ', ३ . ' जप '

आलियावरि दोनचार घटका विविक्तस्थानीं ज्याचा[1] करणें त्याशीं मंत्रविचार करावा. नंतर बारा घटका दिवसास ब्राह्मणभोजनाचें उदक सोडून, नैवेद्य करून सर्व[2] पंक्तिभोजन करणार यांसहवर्तमान भोजन करावें. आणि तांबूल घेऊन चार घटका पुन्हां मंत्रसभेचे ठाई बसून पत्रें आलीं व पाठविणें तीं अवलोकन करणें व कार्ययोजना व मागील दिवशीं आयव्यय झाला, दुसरे दिवशीं करणें, तो हें पाहून चार घटका अंतःपुरांत वामकुक्ष करावा. बारा घटका दिवस राहतां पुन्हां सभेस येऊन सर्व कारखाने, माहाल यांची चौकशी पाहाणें; आपण जाऊन पाहाणें करावें. सभा करून न्याय-मनसुबी जाली केली ती अवलोकन करून दाद-फिर्याद मनास आणावी. साहाचार घटका दिवस राहातां बाहेर स्वारी बाग, आराम देवालय[3] अथवा कारखाने यांत जावी. आणि घोडीं फेरणें, बोथाट्या वगैरे खेळून सायंकाळ जाला असतां येऊन सभेस बसून सर्वांचे मुजरे घेऊन, दोन घटका रात्रीं जपध्यान करून, कांहीं पुराण व दासबोध दोन समास श्रवण करून भोजन करावें. तांबूल घेऊन सभेस दोन घटका बसोन कारभार-विचार करून एकांतीं चार घटका बसावें. बातमी, नाजूक कामें, पत्रें आलीं तीं व चोरबातमी[4] हेर ठेऊन आली ती व द्रव्याचे, धान्यांचे निरख हे श्रवण करून अंतःपुरांत जावें—याप्रमाणें नित्यविधि नेमिला तसें त्या त्या घटका विभागल्या त्यांत तेंच करावें. न्यूनाधिक[5] होऊं नये, ऐसे नेम केले. याखेरीज नैमित्तिक अवश्य कर्तव्य कार्य उत्पन्न होईल तें सावधपणें त्यांतच निरालस्यपणें करीत असावें.

याप्रमाणें सर्व कारभारी यांणींही नियमेंकरून चालावें. आपलाले कार्यास तत्पर असावें, अशीं मनुष्यें, केवळ रत्नेंच, अशीं संग्रह केलीं. आपण सर्वगुणसंपन्न होत्साता सर्व गुणी जन यांचे गुण समजावे. त्याअन्वयें त्यांचे सत्कार करावे. विनोद, हास्य व रहस्य गोष्टी एखादे समयीं करणें तें दोन चार असामी चांगले योग्यतेचे, दुर्व्यसनी नव्हेत, त्यांजशींच एकांतीं[6] कोणा एकास न समजे असें करावें. लघुमनुष्य अथवा दुर्गुणी यांशीं बाहेर सभेंत करूं नये. आपण करूंच नाहीं; आणि कोणीं केलें असतां त्याचा तिरस्कार करावा, याप्रमाणें करिते जाले. सर्व काल युद्धचर्चा व घोडीं शस्त्रें यांची चर्चा व परराज्यसाधनाची चर्चा करीत असावें. कांहीं एक चित्तास विराम पाहिजे तरि भुखन[7] कवि याजपासून मनोरंजन करावें.

## कविभूषण व त्याचे शिवभूषण काव्य

भुखन-कवि हे, दिल्लीस पादशाहापाशीं त्यांचे बंधु चिंतामण कवि मनोरंजन करून होते, त्यांचे घरीं असतां, घरांतच राहातात ऐसें कोणीं घरच्यानें म्हटलें.

---

१. 'ज्याशीं' २. 'सर्वांस' ३. 'आरामदेव' ४. 'चार बातमी'
५. 'न्यूनाधिक्य' ६. 'एकांतस्थानीं' ७. 'भुखान'

तेव्हां आम्हांस यवनांचें अन्न भक्षावयाचें नाहीं म्हणोन निघोन प्रथम कमाहूचे पहाडांतील राजा याजकडे जाऊन बहुत चतुरपणें त्याचें मनोरंजन करीत होत्साते राहिले. त्याणें यांचा बहुत सन्मान करून दक्षणा लक्ष रुपये घरास जाण्यास निरोप-समयीं दिले. आणि गर्वेंकरून भाषण केलें कीं, " ऐसा दाता पृथ्वीवर [ दुसरा ] कोण आहे ! " असें बोलला. ते कवीनें ऐकोन त्याजवरि तत्काळ उत्तर केलें कीं, " ऐसे दाते शतंभीष्म बहुत आहेत. परंतु ऐसा याचक कोणी तुम्हीं पाहिला नसेल[1] कीं, लक्ष रुपये गर्वोक्तीनें दिल्हे हे तुच्छ समजून[2] या द्रव्यास स्पर्श करावयाचे नाहीं," [ असें ] म्हणून निघाले, ते दक्षणप्रांतीं शिवाजी महाराज यांची कीर्ति श्रवण केली होती, तेथें येऊन महाराजांची भेटी घेतली आणि महाराजांस विचारिलें कीं, " यवनांचा शत्रु कोणी असेल त्याजपाशीं आम्हीं राहाणार. " तेव्हां महाराजांनीं उत्तर केलें कीं, ' मी यवनांचा काळ आहें ! ' त्याजवरून महाराजांपाशीं राहून मनोरंजन बहुत प्रकारें कविता करून करिते जाले. आणि महाराजांचा प्रताप पाहून नूतन ग्रंथ ' शिव-भूखन ' म्हणून कविताबद्ध करिते जाले. महाराजांची मर्जी बहुत प्रसन्न क्षणक्षणाचे ठायीं करिते जाले. ऐशी वहिवाट पांचचार वर्षें जाली. नंतर महा-राजांची आज्ञा घेऊन दिल्लीस घरास जाण्यास निरोप घेतला. महाराजांनीं वस्त्रें भूषणें, हत्ती, घोडे, जवाहीर, लक्षावधि रुपये देऊन पुन्हां येण्याविषयीं आग्रह केला. त्यांणींही लौकर येतों ऐसें मान्य करून गमन केलें.

**' पादशहानें हात धोऊन कविता ऐकावी! '**

दिल्लीस गेलियावरि तें वर्तमान पादशाहास समजलें कीं, भूखनकवि शिवाजी-राजे यांजकडून सन्मान पावून आले. ऐसें ऐकोन त्यांचे बंधु तेथें चिंतामणकवि यांस आज्ञा केली कीं ' तुमचे बंधु भूखनकवि भेटीस आणावे. ' त्याजवरून चिंता-मणकवि यांणीं सांगितलें, ' आमचे यजमान आपणांस बोलावितात. ' तेव्हां उत्तर केलें की, " आमचे यजमानांचे हे शत्रु, त्यांचें दर्शन आम्हांस कशास पाहिजे ? आमचे मुखांतून शिवाजीमहाराजांचे प्रतापावाचून दुसरें निघावयाचें नाहीं. त्या-योगें यांस क्रोध येईल. " तेव्हां [ चिंतामण ] यांणीं बहुत प्रकारें सांगितलें, व पादशाहास अर्ज केला जे, " कवि दर्शनास येतील, परंतु शिवाजीचे प्रताप वर्णितील, आज्ञा जाली तरि आणूं. " पादशाहांनीं ' [ घेऊन ] यावें ' आज्ञा केली. त्याज-वरून चिंतामणकवि भूखनकवि यास घेऊन गेले. भेटी जाली. हुकूम जाला कीं, ' कांहीं वर्णन करावें. ' तेव्हां यांणीं सांगितलें कीं, " आपण हात धोऊन बसावें. आम्ही वर्णन वीररस [ पर ] करूं, ते समयीं आपला हात मिशांवर जाईल. " तेव्हां ' हात धुण्याचें[3] कारण काय, ' विचारिलें असतां " आपणांस शृंगार प्रिय,

१. ' नाहीं ' २. ' आहेत ' ३. ' धुवणें '

आमचे बंधू शृंगाररस वर्णितात, तेव्हां आपला हात विजारेस लागतो. त्याजकरितां हात धोवावा, हात धोऊन बसावें." नंतर पादशाहांनीं सांगितलें जे, "आमचा हात मिशीवर न गेला असतां, शिरच्छेद करूं." [ असें ] म्हणून हात धुतला. भुखनकवि यांणीं वीररसपर कवित्ते[1] म्हणावयास प्रारंभ केला. [ त्यांत ] आधी महाराजांचा प्रताप वर्णिला. तेव्हां पादशाहानें[2] "आम्ही सार्वभौम[3], सर्व राजे आम्हांस करभार देतात तेव्हां मांडलिक राजे होत, ऐसें वर्णावें," म्हणून आज्ञा केली त्यावरून पृथ्वींतील सर्व राजे पुष्पवृक्ष होत आणि पादशाहा भ्रमर, सर्वांचा मधु सेवन करणारे, ऐसें वर्णून; त्यांत शिवाजीमहाराज हे चंपकवृक्ष होत ऐसें वर्णिलें; कारण चंपकास भ्रमर शिवत नाहीं. तेव्हां पुन्हां पादशहांनीं "हात धुवविला याचें कारण वर्णावें" सांगितलें असतां साहा कवित्ते उत्कृष्ट वीररसयुक्त वर्णन केलीं. सातवे कवित्तास पादशाहाचा हात मिशीवर अकस्मात् आवेश येऊन जाता जाला. [ तें ] पाहून कवित्व आटोपिलें. पातशाहा बहुत खूष जाले. आणि सन्मान, बक्षीस, वस्त्रें जवाहीर, हत्ती दिल्हे. गौरव केला. हें वर्तमान महाराजांकडील वकील यांणीं सर्व लिहिलें. त्याजवरून महाराज बहुत प्रसन्न होऊन पुन्हा येण्याविषयीं पत्रें पाठविलीं. आणिलें.

### महाराज रत्नपारखी, गुणग्राहक, निर्व्यसनी

याप्रमाणें महाराजांनीं एक एक मनुष्य रत्नाप्रमाणें परीक्षा करून वाढविलें [ व ] त्याचा संग्रह केला. तसेंच नाना प्रकारचें गुणिजन यांचा संग्रह केला. गायक व विद्वान् येतील त्यांचे मनोरथ पूर्ण करून दिगंत कीर्ति जावी ऐसें केलें. त्यांस सत्कार व द्रव्य देणें, गायन नृत्य अवलोकन ऐकणें समयाचे समयास, त्यांचे ठाईं व्यसनासक्त न होतां करिते जाले. तसाच कोणतेंही दुर्व्यसन अणुमात्र नाहींच. शिकार करणें [ तो ] राजधर्म. ते महिन्या दोन महिन्या एखादे समयी [ करावी. ] त्याचे कारखानदार चित्ते-बाज, पायदामे[4] व पक्षी-बाज,[5] लगड, वाघरा, जाळीं वगैरे जल स्थल व खेचर म्हणजे आकाशपंथें गमनकर्ते अशी तीन प्रकारची शिकार. यांत मनुष्यास पीडा करणार दुष्ट पशु इत्यादि व्याघ्र, वृक प्रयत्नें मारावे. मेध्य[6] मृगादिक कार्याकारण श्राद्धादिकांस वधावे, ऐसें करिते जाले.

### राज्याचे निबंध बांधून सर्वगुणसंपन्न जाले.

याप्रमाणें राज्य आक्रमण करून, त्याचे निबंध बांधून सरकारकून, पागा, लोक, फौज, सेना, कोश, खजिना [ असे ] सर्वगुणसंपन्न जाले. सर्व मंत्री, कार्यकर्ते

१. 'कविता', २. 'आम्हांविषयीं कवित्व म्हणावें सांगितलें आणि', ३. 'सार्वभौमपद आमचें' ४.'पायवाके' ५.'शाहीन, बहिरी' ६.'मध्यम'

यांसहवर्तमान राज्याचे धारे करून राज्य करणें तें, षड्गुण संधि, विग्रह, या [ न ] संस्थान, आसन, द्वैधीभाव, यांस यथाकाल अनुसरून करिते जाले. संधि म्हणजे शत्रु कसा आहे, त्याचें उणें कोठें कसें आहे [ हें ] पाहाणें व त्याशीं मैत्री अथवा विरुद्ध करणें न करणें या [ स ] संधि म्हणावें. विग्रह म्हणजे प्रयत्नेंकरून शत्रूशीं अथवा परराजा याशीं कलह निर्माण करणें. यान म्हणजे आपलें बल व दुसरेयाचें बल कसें ही विविक्षा करून त्याजवर चालून जाणें, तें कोणते प्रकारें कसें जावें हें पाहाणें यास यान म्हणावें. संस्थान म्हणजे उपेक्षा करून आपले स्थलीं उगेच असणें अथवा देशाचे[1] ठाईं जाऊन कोठें राहावें, युद्धभूमीस कोठें उभें राहून व्यूहरचना[2] कशी करावी, हें जाणणें.[3] द्वैधीभाव म्हणजे कांहीं मैत्री व कांहीं आपला दर्प त्याजवर ठेवणें, दाव ठेऊन चालणें, हे साहा गुण कोठें कसें करावे हें पाहून योजना करिते जाले.

### द्वादशमंडळ–शत्रुमित्र विचार

द्वादशमंडल--अरी, मित्र, उदासीन; पैकी आपले राज्याचे भोंवतें चहूं बाजूंस राज्याचे लगत राजे. त्यांत प्रथम जवळ राज्य असें त्यासि अरी म्हणावें. त्यांशी आपणाशीं नित्य समंध. त्यासि सर्वकाळ रक्षीत असावें. त्याचे पलीकडे ज्याचें राज्य त्यास मित्र म्हणावें; कांकीं, त्याचा आपला अरी एक. त्याजमुळें सहज मैत्री असती. त्याचे पलीकडे राजा तो आपला उदासीन. विशेष त्याशीं आपणांशीं कारण नाहीं. प्रसंगेंकरून त्याचें राज्य घेणें तरि अथवा मैत्री करणें तरि प्राप्तकालेंच करावी. ऐसें चहूं दिशांस[4] तीन तीन यांची विविक्षा पाहाणें, यास द्वाशमंडलविचार म्हणावें. तसेंच शत्रु व मित्र यांत सहजशत्रु व सहजमित्र, दुसरे कृत्रिम शत्रु, कृत्रिम मित्र हे परीक्षा करणें. सहजमित्र आपले कन्येचे पुत्र, बापाचे बहिणीचे पुत्र, आईचे बहिणीचे पुत्र मातुल, शालक, व मध्यमंडळराजा होत, बंधु व बापाचे बंधूचे पुत्र व दायाद व आपले मंडळाजवळ ज्याचे राज्यमंडळ तो राजा, यांस सहजशत्रु म्हणावे. आतां कृत्रिम शत्रु[5] म्हणजे सहजमित्र जे आहेत त्यांशीं कांहीं कारणें करून शत्रुत्व करणें आलें व उदासीनमंडळचा राजा याशीं शत्रुत्व करणें, राज्य घेणें आलें तर यास कृत्रिमशत्रु म्हणावें. तसेंच सहजशत्रु जे त्यांशीं मैत्री कार्य करून संपादून त्या अन्वयें कार्य करणें, अथवा जवळ ज्या राजाचें मंडळ त्या राजाशीं सख्यपणें राहणें पडल्यास[6] त्यास कृत्रिममित्र म्हणावे. तसेंच वृद्धिक्षयस्थान जाणणें म्हणजे आपली वृद्धि राज्य सैन्य, कोश कसे आहेत दुसरियाचे कसे आहेत, उणे असल्यास धीर धरणें, [ दुसरियाचे ] अधिक जाल्या उद्योग करणें, यास म्हणावें. यांची सर्व विविक्षा करावी.

---

१. 'त्याचे देशाचे ठायीं' २. 'युद्ध-रचना' ३. 'संस्थान म्हणावें.' ४. 'देशसे', 'दिशेस' ५. 'मित्र' ६. 'सख्य राखणें.

**सप्तदुर्गव्यसनें यांचा त्याग, देश काल वर्तमान उपाय इ.**

सप्तदुर्व्यसनें यांचा त्याग–द्यूत म्हणजे पण करून खेळणें व मद्यसेवन, गायनाचेच ठायीं आसक्त होणें, शिकारीचाच बहुत छंद, तसेंच स्त्रियांचे ठाईं आसक्त बहुत होणें[1] – हीं कामज[2] चार; क्रोधज[3] तीन—दंड उग्र करणें, पारुष्य म्हणजे दुसरियाचें उणें भाषण करणें, अर्थदूषण म्हणजे दुसरियानें उत्तम कर्म केलें त्यास दोष ठेवणें, हीं तीन, एकूण सात व्यसनें यांचा त्याग करणें, यांस सप्त-व्यसनत्याग म्हणावें. यांचा त्याग करून देश, काल, वर्तमान पाहून कोठें काय करावे यांचे ते उपाय—साम, दान,[4] दंड, भेद करिते जाले. साम म्हणजे [ शत्रूशीं ] समानत्वें[5] चालणें, दान म्हणजे कांहीं देऊन चालणें, भेद म्हणजे त्याचें राज्यांत फितूर करणें, दंड म्हणजे त्याजवर निग्रहच करणें, हें पाहून करिते जाले. काल म्हणजे कोणते कालीं काय कर्म करावें, देश म्हणजे कोणते प्रकारें कोणते स्थळीं जावें, वर्तमान म्हणजे तेथें व आपले इकडे विचार कसा इत्यादि पाहाणें पाहावें. दत्तापहार म्हणजे आपण दिलें तें पुन्हां हरण करणें तो कदापि कोण्हाचें हरण करूं नये. शब्दार्थज्ञान म्हणजे परराज्यांतील दूत येतील त्यांचें यांचें व आपले मंत्री यांणीं बोलणें व पत्रें आलीं व पाठवणेचीं यांचा अर्थ जाणून जें करणें तें धर्मेंकरून उत्तर करणें, समजणें. ऐसें नीतिकरून राज्य चालविते जाले.

त्यायोगें राज्याचे ठायीं बहुत सुभिक्ष व सर्व प्रजा, मनुष्यमात्र[6] सुखरूप असोन पृथ्वीच्या ठायीं रसधान्यादिकांची ज्या ज्या कालीं जें जें होणें तें होतें अशी उत्पत्ति बहुत जाली. कालाचे कालास वृष्टि होणें, कोणतेंही ईतिभय[7] नाहीं. गाईं दुग्ध बहुत देत्या जाल्या. फलपुष्पवृद्धि होती जाली. मनुष्यमात्रास स्वल्पप्राप्ति जाली तरी त्यायोगेंकरून यथास्थित[8] सुख होतें[9] जालें. राजद्रव्य येईल त्यांतच सर्व[10] प्रपंचकार्य नित्यनैमित्तिक कर्में हीं होऊन[10] द्रव्यसंग्रह होत असावा अशी वृद्धि[11] आपलाले धर्मेंकरून चालण्याच्या योगें सर्वांस होऊन सर्वजन सुखी राज्यांत असते जाले. सर्वांस धर्मेंकरून चालावें हे वासना निर्माण होती जाली. याप्रमाणें धर्म स्थापून धर्मेंकरून राज्य संपादन करून नीतिमर्यादेंकरून सर्वांचें, सेवक पदरचें यांचे व प्रजा यांचें पालनपोषण करिते जाले; आणि नीतिमर्यादेप्रमाणें दौलतही संपादन केली व त्याचा बंदोबस्त नीति, राजधर्म राज्य करण्याचा आहे त्याप्रकारें केला.

हें वारोंवार[12] वृत्त शाहाजी महाराज यांस श्रुत होण्याकरितां लिहीत गेले. त्यांतच आपलें नि दर्शन[13] घडावें, संपादिला जो अर्थ त्याचा उपभोग आपणांस घडावा,

---

१. 'बोलणें' २. 'कामें' ३. 'क्रोधन' ४. 'दाम' ५. सामानत्वें' ६. 'मनुष्य–मंत्री' ७. 'अर्थभय' ८. 'त्यांतच' ९. 'व्हावें' १०. १०. 'मनुष्याचे प्रंच होऊन' ११. 'बरकत सर्वांस' १२. 'वारंवार' १३. 'आपलें निदर्शन'

अशी उत्कंठा लिहीत गेले. त्याजयोगें त्यांणींही लोभास्तव उत्तर पाठविलें, " तुम्हांस भेटावें, पाहावें, असा हेतु रात्रंदिवस मनीं वागतो व पुत्राचे प्रताप श्रवण करून बहुत संतोष होतो,[1] " असें लिहिलें आणि श्रीजेजोरीचे देवास नवस केला होता जे, ' शिवाजीराजे राज्य साध्य करून हिंदु-धर्म-स्थापना करण्याचें इच्छितात, तें सिद्धीस निर्विघ्न जावें, म्हणजे लक्ष रुपयांच्या सोन्याच्या मूर्ति करून पाठवूं.[2] ' त्याप्रमाणें तेथें कर्नाटकी कारेगार यांजपासून चांगल्या मूर्ति तयार करवून पाठविल्या. शिवाजी महाराज यांस भेटावें, जाऊन पाहावें, आणि चिरंजीवानें अद्भुत पराक्रमें संपादन केलें. तें राज्यही पाहावें अशी उत्कंठा रात्रंदिवस मनीं, याजकरितां पादशाहाचे निरोपाचा उद्योग केला जे, " बहुत दिवस जाले, श्रीकुलस्वामींचें दर्शन घेणें त्यांस गेलें पाहिजे. " तेव्हां पादशहांनीं " तुम्ही जातां, तुमचे पुत्र आफरी होऊन वर्ततात, त्यांस बहुत प्रकारें युक्ति–प्रयुक्तीचा बोध करून भेटीस आणावें, त्यांणीं तुमचे रीतीनें पादशाहींतील अमीरे-चालीनें[3] चालावें, याउपरि तुमचा बोध श्रवण करून आले असतां वजिरी सांगोन सर्व पादशाहात त्यांचे स्वाधीन करून सेवा घेतां येईल, अशा प्रकारें शिवाजी राजे आपले ज्यायोगें होतील त्यायोगें राजकारण लावावें, " [ असें ] सांगितलें असतां शाहाजी महाराज यांणीं, " पुत्र आपले स्वाधीन आहेत नाहींत ही खातरजमा पूर्वीं जाली आहे; तत्रापि प्रयत्न जो करण्याचा तो तितका करून पाहातों, आम्हांस आपणांवाचून अन्य प्रकार किमपि करणें नाहीं; श्रीकुलस्वामीचें दर्शन घेऊन नंतर आपले कार्यार्थ पुत्राचीही भेटी घेऊन, अनेक प्रकारें चार गोष्टी युक्तिविचाराच्या[4] सांगोन आज्ञेंत चालावे ऐसें करून पाहातों, " म्हणून सांगून पाठविलें. तेव्हां पादशाहास राजे वश व्हावे उत्कंठा होतीच. " जाऊन करून पाहावें, जाल्यास उत्तम, नाहींतर तुम्हीं तरि त्यांत मिलाफी होऊन[5] राहूं नये, फिरोन आमचे मात्र आम्हांपाशीं यावें, पुत्रलोभ मनीं धरूं नये " ऐशी खातरजमा करून घेऊन निरोप दिल्हा. यांजलाही भेटून पुन्हां इकडील दौलतीचे बंदोबस्तास येणें अवश्य होतें, कबूल करून घरीं येऊन बंदोबस्त करून त्या प्रांतींहून येणें जालें.

### ' श्रीचा वर पूर्वीं जाला तेच पुत्र तुम्ही '

श्रीतुळजापुरीं येऊन श्रीदेवीचें दर्शन घेऊन देव-ब्राह्मणपूजा करून, श्रीपंढरीस येऊन पुढें पत्रें पाठविलीं. तेथून श्रीशिखरशंभुमहादेवदर्शन, ब्राह्मणभोजन, महापूजा करून येतों, अशीं पत्रें आलीं. त्यांजवरून तेथें इकडोन पुढें लोक पाठविले. ते गेल्यावर शिवाजी महाराज सामोरे जाण्यास निघाले. बहुतां दिवशीं दर्शन तें देवालयींच

१. ' जाला ' २. ' पाठवावा ' ३. ' अमार चालीनें '
४. ' विचाराच्या ' ५. ' मिळून '

श्रीदेवासंनिध घ्यावें हा निश्चय करून, मार्गीं जागां जागां प्रांतांत येतील तेथें सर्व तरतुदीनें सामान करविलें. आपण व सर्व सरकारकून लोक फौज, सरदार, पागा, हत्तीसह संपत्ति जमा करून पुढें सरनोबत यांस पाठविले. तों महाराज श्रीजेजोरीस आले, तेथें आपण जाऊन पोहोंचले. आणि श्रीचे संनिध भेट[1] घेतली. जिजाबाई-साहेबही श्रीसंनिध भेटली व राजस्त्रियांही भेटविल्या.[2] तिकडोन व्यंकोजीराजे व तुकाबाईसाहेब व सर्व कारभारी, सरदार लोक आले, त्या सर्वांस भेटले. आणि इकडील सर्व कार्यकर्ते यांच्या व सरदार लोक यांच्या भेटीचा समारंभ करून भेटविले. शाहाजी महाराज पालखींत बसलियावरि, आपण पायउतारा, जोडा न घालितां, पालखी धरून बहुत मर्यादेंकरून लष्करांत डेऱ्यास आले. [ महाराज ] बसलियावरि, पुढें [ राजे ] मर्यादेनें उभे राहिले. ते समयीं महाराजांस [ शहाजी राजे ] पुढें जवळ घेऊन बहुतच आनंद [ युक्त ] व संतोषी होऊन दानधर्म करिते जाले. आणि "श्रीचा वर पूर्वी जाला तेच पुत्र तुम्ही; जगविख्यात पराक्रम केलात; धर्म-रक्षक[3] तुम्ही निर्माण जालां; तुमचेयोगें सर्व कुळ धन्य जालें! सिसोदे यांचे कुळांत निर्माण जालां. त्यांचे धर्म ते पालन तुम्हीं करून या प्रांतीं आलां[4] असतां पुन्हां कुलाचा उदय केलात!!" म्हणोन बहुत गौरवून बोलले असतां [ राजे ] उठोन नमस्कार करून "सर्व प्रताप स्वामींचे पुण्याचा व चरणांचा, स्वामीचे आशीर्वादें, आज्ञेनेंच करणें तें केलें!" म्हणोन बहुत विनयें[5] व नम्रतेनें बोलले. आणि देवब्राह्मण दानधर्म बहुत केला. ब्राह्मणभोजनें बहुत करून पुण्यास निघोन येते जाले. तेथें दोन महिने राहून, बरोबर लोक सरदार आले त्यांचें आदर-आतिथ्य बहुत-प्रकारें केलें. सन्मान केले. महाराजांची नित्य सेवा करणें व सर्व वर्तमान सांगणें, कारभार होणें तो आज्ञा घेऊन कागदपत्र लिहिणें महाराजांचे नांवें, ऐसें करिते जाले. सर्व संपत्ति हत्ती घोडे दाखविले. महाराज यांणीं तयार करविल्या व मिळविल्या त्या तलवारी बहुत किंमतीच्या, त्यांत आपले हातीं होती ती दिली. ती परम यशस्वी, तिचें नांव तुळजा ऐसें ठेऊन नित्य पूजा भवानी-बरोबर करावी.

### 'महाराजांचें वृध्दाप्य यांत यांस बहुत प्रकारें जपावें'

नंतर प्रतापगडीं जाऊन देवदर्शन करावें, राजगड, रायगड, सर्व संस्थानें पाहावीं, असा हेत धरून[6] राजगडास जाऊन प्रतापगडास आले. देवदर्शन करून तेथील सर्व संपत्ति दाखवून अफजलखान बुडविला, पराक्रम तरतूद ज्या स्थळीं

---

१. 'भेटी' २. 'भेटल्या' ३. 'रक्षिक' 'रक्षिला' ४. 'आलों' ५. 'विनतीनें', 'विनीती व नम्रपणें', 'विनंती नम्रपणें' ६. 'घेत करून', 'हेत करून', 'होती ती'

जसें केलें [ तसें ] तें निवेदन केलें. तेथून रायगडास जाऊन तेथील राजमंदिरें, दौलत, हत्ती,‡ घोडे, पागा, फौज सर्व दाखविलीं. तदनंतर सातारियास येऊन श्रीरामदासस्वामींचें दर्शन करवून सर्व स्थळें दाखवीत पन्हाळियास गेले. तेथें महाराजांस व तुकाबाईसाहेब व व्यंकोजी राजे यांस पाहिजे ते पदार्थ नजर केले. पोषाख, जवाहीर, हत्ती, घोडे पाहिजे तें देऊन बराबर खर्चास खजिना मुबलग[1] दिला. मेजवान्या केल्या. सर्व गुणिजन यांचें गुण दाखविले. बराबर [ चे ] सर्व सरकारकून, सरदार यांस मेजवान्या करून वस्त्रें जवाहीर यथायोग्य व लोकांस वस्त्रें दिली. महाराजांचे सेवेचे लोक यांस वस्त्रें, भूषणें, बहुत द्रव्य देऊन, " महाराजांचे वृध्धाप्य[2] यांत यांस बहुत प्रकारें जपावें.[2] " असें सर्व सांगोन, " कांहीं दिवशीं, मीही त्या प्रांतीं दर्शनास येण्याचा योग करितों, " ऐसें बोलोन, " येथें राहण्यांत तिकडील दौलतीचा बंदोबस्त राहणार नाहीं " हें शाहाजी महाराज यांचें म्हणणें व जाण्याचा मानस, याजवरून जाण्याचा बेत ठरवून, " जातां पादशाहाशीं गोडच बोलून पुढें जाण्याचा योग[3] करावा." ऐसें म्हणोन बहुत संकटें-करून व प्रयासें वारोंवार पायांवरि मस्तक ठेवून निरोप दिल्हा.

चार महिने या प्रांतीं महाराजांनीं राहून, नंतर विजापुरास जाऊन तेथील बोलणें याउपरि सफाईनें चालावें असें बहुत करून केलें आहे म्हणून सांगोन, शिवाजी महाराजांनीं पादशाहास पोषाख, जवाहीर, हत्ती, घोडे, दिले ते ' आपणांकरितां पाठविले ' म्हणोन देऊन चंजाऊर[4] प्रांतीं निरोप घेऊन गेले.

याप्रमाणें महाराजांनीं राज्यसाधन केलें. त्याचे धारे, पाये अचल. पुढें बहुत काळ या पायांनीं जो चालेल त्यास भय कदापि नव्हे,[5] ऐसे नीतिमर्यादेचे पाये घालोन, वडील शाहाजी महाराजांस आणोन, त्यांस सर्व पराक्रम व संपत्ति दाखवून व वृत्त निवेदन करून दर्शन घेतलें. संतुष्ट केलें.

राज्यमर्यादाकथन [ आणि पितृदर्शन नाम चतुर्थ ] प्रकरण समाप्त.

---

‡ ' होती ती, ' १. ' मबलग ' २. २. ' वृद्धाप्यांत बहुत प्रकारें जपावें ', ' वृद्धाप्य यांस बहुत प्रकारें जपावें. ', ' वृद्धाप्य यांत बहुत प्रकारें जपावें. ' ३.' बेत ' ४. ' तंजावर ' ५. ' न व्हावें, ' ' धर्म होऊं देणार नाहीं. '

प्र क र ण पं च म

# दिल्लीपतिपराभव

## शिवाजी राजा मसलतीनें आटोपत नाहीं !

“ श्रीशिवाजी राजे यांणीं राज्य सोडवून,[1] किल्ले, कोट, ठाणीं प्रांत बहुत घेतला; त्यांत[2] राज्यांत बहुत रीतीनें मर्यादेनें पाये घालून चालतात; मनुष्यें पदरीं बहुत चांगलीं मेळविलीं; त्यांचे जवळ खजिना, द्रव्य बहुत जालें; त्या योगेंकरून व युक्तीनें[3] बहुतच मनसबेबाज; मोठे धाडसेंकरून शिपाईगिरी ते करितात; बहुत लोकांचा जमाव करून त्यांनीं किल्ले कोट फार घेतले; नवीं स्थळें, लोक, खजिनाही विपुल केला, सर्व लोक एकदील व सुखी केले. फौज फार व माणसें पराक्रमी; सरदार, सरकारकून मोठे मोठे मनसबेदार[4] मेळविले; बालाघाट, परांडें,[5] कलबर्गें, आवसें,[6] उदगिरी, गंगा-तीरपर्यंत स्वारी-शिकारी करितात; औरंगाबादेचा त्यांनीं पुरा लुटला; जालनापूर मारिलें; महकूबशिंग[7] व आपले सुभ्याची फौज गेली ती मारिली, गर्दीस मेळविली, हत्ती पाडाव नेले; सुरत मारिली; रायबागीण व मोहबतखान सरदार गेले ते बुडविले ” हीं वर्तमानें वरचेवरि दिल्लीस पादशाह औरंगजेब यांस कळल्यावरून पादशाह बहुत दिलगीर होऊन विचारांत पडले कीं, “ आम्ही या प्रांतींच बंदोबस्तास गुंतलों. हा सोडून जावें, तरि मूळ हें; यास अपाय होईल. शिवाजीनें तरि धुम मांडली, तिकडील पादशाहाती जेर करून, आमच्या फौजा बुडवून, लुटून त्यानें प्रांत घेतला. तो गुमान राखीत नाहीं. विजापूरची तरि पातशाहातच त्यानें घेतली; अफजलखान मोठे धाडसें,[8] आंगेजणीनें मोहरा मारिला; वरकडही उमराव नामोहरम केले. पादशाहाजादे व दिलेलखान मध्यप्रांतीं होते यांणींही राजे यांचा उत्कर्ष लिहिला. तेव्हां आपण जाऊन मसलत करणें ठीक नाहीं. शिवाजीराजा मसलतीनें आटोपत[9] नाहीं. अगोदर दोन्ही पादशाहाती-भागानगर व विजापूर-हस्तगत होतील[10], तेव्हांच जें घडणें तें घडेल. नाहीं तरि एकटेच शिवाजीराजे आंगेजणी करितील. प्रसंगीं त्यांसही साह्य करितील. नामोष जाईल. ” यास्तव विचार करून एखलास-खान याच्या[11] सुभ्याची तगिरी[11] करून, पादशाहाचे मातुल शाइस्ताखान यांस सुभा देऊन, नवाजीस करून, फौज तोफखाना वगैरे सामान बहुत पोख्त व खजिना

---

१. ‘ सोडून ’ २. ‘ त्या ’ ३. ‘ युक्तिकरून ’ ४. ‘ मनसबदार ’ ५. ‘ परांड ’ ६. ‘ आवढें ’ ७. ‘ महकूबसिंग ’ ८. ‘ धाडीस ’ ९. ‘ आटो-पीत ’, ‘ आटोपती ’ १०. ‘ होईल ’, ११. ११. ‘ याची सुभेतगिरी ’

ऐसे बराबर मुचलक साहित्य देऊन रवाना केलें. "शिवाजीराजे यांचा बंदोबस्त हरतऱ्हेनें दोन्ही पादशाहातींत अहटा[1] साह्य करून[1] आधीं करावा," हें सांगून रवाना केले. बराबर रोहिले, पठाण, उदबक व रजपूत वगैरे पोख्त सरदार दिल्हे. ते दरमजल येते जाले. त्यांणीं येतां अगोदर सुभ्याचा बंदोबस्त केला. आणि मग ते महाराजांवर चालून आले.

## आंगीं आविर्भाव, श्रीदेवीचा संचार

[इकडे] महाराज रायगडीं होते; तेथून त्यांनीं सर्व तयारी करून फौज व सरदार, पागा आणवून, जमाव करून राजगडास[2] आले. तमाम हषम एके ठायीं केले. सर्व सरकारकून, सरदार जमाव करून विचार केला जे, "गनीम चालून आला. यास कोणते उपायें व हुनरें करून जेरजूर[3] करावा, तंबी कशी पोंचवावी, आपली फौज लोक जायां न करितां कसा उपाय करावा?" ते समयीं सर्वांचे विचारें संमतें, "मोंगली फौज; बाहेर कहीकवाड, सामान, रसद समागमें आहे, त्यास जवाब[4] धरून. बंदी करून, आधींच पुढें तोंड देऊन लढाई कशास करावी? बंदी करून गनीम घाबरा पाडावा.[5] एखादे गडसंधीस[6] मारून काढावा, किंवा एकादे किलियास येऊन मोर्चे देऊन बसूं द्यावा, तेथें मारावें. ऐसें कित्येक प्रकारें कावेसीनेंच[7] घाबरा करावा!" ऐसें ठराऊन महाराजांनीं, "संकट आलें यास काय करावें?" म्हणून श्रीदेवीची प्रार्थना केली. त्याजवरून आंगीं आयुर्भाव[8] होऊन सांगितलें जे, "सर्वांस सांगा, चिंता करूं नका. जसा अफजल मारिला, तसाच याचाही अपजय करून लावून[9] देईन. तुम्हांस यश देईन." इतकीं वाक्यें निघालीं तीं चिटणीस, वाकेनीस यांणीं लिहिलीं. तीं वाक्यें संचार गेलियावरि उभयतांनीं श्रुत केलीं. महाराजांनीं ऐकून घेऊन, "सर्व पार पाडणार श्री समर्थ! त्यांनीं अंगीकार केला आहेच तर चिंता नाहीं. शत्रूचें पारिपत्य करूंच, हे उमेद धरून.[10]"

## 'तुम्ही शिपाई खरे मर्द आहां!'

खान येतांच आधी चाकणचे किल्यास मोर्चे दिले. ते समयीं संभाजी कावजी पागे होते. बळकट, घोडें उचलावे ऐसें बळ, मर्द होते. त्यांजवरि महाराजांची इतराजी काहीं कारणेंकरून जाली होती. त्यांणीं पागासुद्धां जाऊन खानास भेटले. व बाबाजी राम होनप, देशपांडे प्रांत पुणें, हे पुढें जाऊन

---

१. १. 'तह व साह्य घेऊन' २. रायगडास' ३. 'जेर' ४. 'जबाब'
५. 'करावा', 'घाबरा पाडून' ६. 'गलीसंधीस' ७. 'कावेबाजीनें'
८. 'आयुरभाव', 'आविर्भाव' ९. 'मारून' १०. 'धरिली'.

बराणपुरींच खानास मिळाले. माहितगार म्हणून त्यानें जवळ सन्मानें ठेविले. चाकण किल्ला फिरंगोजी नरसाळा हवालदार याणें भांडविला[१]. ईशान्य कोनींचा बुरूज सुरुंगानें [ खानानें ] उडविला. तेव्हां किल्ला जेर जाला. कौल घेऊन महाराजांची आज्ञा नेऊन[२] किल्ला नरसाळे याणें तहानीं[३] दिला. त्यास "तुम्ही शिपाई खरे मर्द आहां! तुम्हांस वाढवितों. आम्हांपाशीं राहावें." म्हणून खान याणें म्हटलें असतां 'ये समयीं राहात नाहीं,' म्हणून निघोन नरसाळा महाराजांकडे आला. महाराजांनीं त्यास शर्त केलीस म्हणोन नवाजून किल्ले भूपाळगड येथील हवाला देऊन पाठविलें. चाकण घेऊन खान याणें पुणियास मुकाम केला.

### अद्भुत साहसकर्म : खानास शास्त केली.

इकडे महाराजांनीं प्रतापराव गुजर सरनोबत यांस तमाम पागा[४] देऊन कही-कवाड चालूं न द्यावें, रसद बंद करावी, अंतरें करून रोखून गनीम धरावा, म्हणोन रवाना केलें. आपण खासा तमाम मावळे लोक निवड करून राजगडाहून सिंहगडास आले. तेथून विचार केला जे, "कांहीं एक साहसकर्म करून खान यास मारावा, खानाचे गोटावर चालून जावें, छापा घालावा, आपणच जाऊन खानाचें डोचकें कापून आणावें!" ऐसे कित्येक वेत चित्तीं दृढ करून कवाईत केली जे, 'कात्रजेचे घाटांनीं जाग जागां झाडांस पोत बांधावे आणि बैलांचे शिंगांसही बांधावे; करणेकरी शिंगाडे पांचपंचवीस यांणीं डोंगरांत विकट जागियांस असावें. त्यांणीं आम्ही फते पाऊन इशारतीचा करणा सिंहगडचे वाटेस एक वाजवूं, ते समयीं पोत उजळणार मावळे लोक त्याजबरोबर नेमोन दिल्हे होते त्यांणीं पोत उजळावे, करणेकरी यांणीं करणे, शिंगें, बाजे करून सर्वांसह निघोन जावें, म्हणजे त्या मार्गीं[५] छापा आला असें पाहून फौज व खान तिकडे जाईल. इकडे अवकाश पडल्यास[६] गोट लुटावा अगर पडेल तशी मसलत करून आपण सिंहगडास पोंचावें,' असें[७] [निश्चित] करून,[७] मावळे लोक यांस सिंहगडचे वाटेनें जागां जागां हजार पांचशें ऐसे जथे करून देऊन घाल-णीचे जाग्यांस उभे केले. त्यांणीं करण्यांतील बारीक नळीची इशारत होतांच येऊन मिळत जावें, ऐसें सांगून आपण आंगांत जिरोटोप त्याजवरि आंगराखा,[८] पागोटें घालून, चोळणा काच्या घालून, तरवार बिचवा एका हातीं, वाघनखें एकें हातीं, पाठीशीं ढाल, याप्रमाणें [ तयारी ] करून पायउतारा बराबर धारकरी येसजी कंक, तानाजी मालुसरे, दादाजी[९] बापूजी देशपांडे व चिमणाजी बापूजी देशपांडे व सुरवे ऐसे घेऊन, मातबर निधडा[१०] माणसे पंचवीसतीस असामी केवळ जवळ असावें ऐसे करून पांच साहा हजार लोक निवडून घेतले, ते ठेवीत ठेवीत आंवे[११]-वोहोळ

१. 'भांडविली' २. 'घेऊन' ३. 'तह करून' ४. 'पागोटी' ५. 'मार्गें' ६. 'सांपडल्यास' ७.७. 'असा ठराव करून' ८. 'अंगरखा' ९. 'बाबाजी' १०. 'निधाडा', 'निधड' ११. 'आंबील'

येथपर्यंत आले. पांचसातशें तेथें ठेवून, गोटानजीक दोनतीनशें ठेवून, गोटांत राजे शिरले. काळोख, भाद्रपदमासचा, त्यांत कांहीं पाऊस त्या दिवसांत होता. गोटांत शिरून कोण्हीं पुशिलें 'कोण ?' म्हणोन, तेव्हां 'चौकीचे लोक' म्हणोन सांगत सांगत बाडाजवळ आले. बागेलगत बाड होतें. त्यांत येऊन झाडांचे आश्रयानें चौकी चुकावून, बाड चिरून, वरकड लोक बाहेर ठेवून, एक दोन असामी[1] धारकरी बराबर येसजी कंक, दादाजी बापूजी देशपांडे घेऊन बाडांत[2] शिरले. आंतील डेऱ्याजवळ गेले. तों खोज्या[3] जागा होता, त्यास[4] एकजण तरवार मानेवरी ठेवून बसविलें.[4] आणि आपण खासा पुढें गेले. खानाचा लेंक निजला होता त्यास तेथेंच जेब करून निजले जागांच मारिला. आणि खानाचे बिचोव्यांत गेले, आणि छातीवर चढोन बसले. वार करावा तों बायकोनें जागी होऊन पाहिलें, आणि पाय धरिले. तिजला दबाविली. तेव्हां तिनें 'ये समयीं मारूं नये. जीवदान द्यावें व मजला चुडेदान द्यावें' ऐशी बहुत ग्लानी करून, करुणा भाकून प्रार्थना केली. महाराजाचे अंतःकरणात द्रव जाला[5] परंतु "आपण येऊन हें कर्म केलें व निभावून गोट पार होऊन, बचावून आपलें लोकांत मिळून गेलें पाहिजे यास कसें करावें ?" म्हणून मनांत विचार करून, "खान वांचून मोहीम केली तरी काय चिंता ? पारिपत्य करीन, रणांत मारीन" म्हणून बहुत सावधपणें खबरदारीनें दाबून धरून गळ्यावरि तरवार ठेविली[6] व एक हातें पोटास नखें लाविलीं,[7] आणि खान यास बोलिले जे, "ये समयीं तुझा प्राण वांचविला तरि इमान द्यावें जे आम्ही हात धरून नेऊन; तेथपर्यंत न बोलतां बराबर यावें; तेथून सोडिल्यावरि जावें; आणि कांहीं तरि शास्त करितों याकरितां शास्ताखान म्हणवावें.[8] बायकोनेंही बराबर यावें. याप्रमाणें उभयतां इमान कुराण[9] शपथ घेऊन, मधीं गलबल केलिया मारून टाकूं." असें करार करून हाताचीं दोन बोटें कापून घेतलीं. ते समयीं शास्ताखान भयाभीत जाला. त्यास हातीं धरून बायकोसुद्धां बाडापाशीं येऊन, आल्या वाटेनें बाहेर आपले लोकांत येऊन, "शिवाजी तो मी, तूं मोहीम करून आलास, तुझें पारिपत्य करीन. यास्तव युद्ध न करितां फिरोन जावें. नाहीं तरि मारीन." असें बोलोन तेथून गोटाबाहेरील लोकांत मिळून, आंबे[10] बोहोळांत लोक ठेविले होते त्यांत मिळाले आणि इशारतीचा करणा केला. तों लोकांनीं कात्रजेचे डोंगरांत पोत उजळले व करणे वाजविलें. खान बहुत सर्द, खजील होऊन गुल न करितां बाडांत आले. तों लेंक मारिला, हें लोकांस सांगण्यास देखील शरमिंदे जाले.

१६०३६

---

१. 'असामी निकम' २. 'बागेंत' ३. 'खान' ४. 'त्याचे मानेवर तरवार ठेवून एकजणास बसवून' ५. 'आला' ६. 'ठेविली होती.' ७. 'लाविलीं होतीं' ८. 'म्हणावें' ९. 'खुरून' १०. 'आंबील'

### जसा कालिया साप पत्न्यांचे करुणेंकरून जित सोडिला.

इतक्यांत खोजे वगैरे चौकीचे लोक यांत गुल जाली. लष्करांतही छापा आला अशी एकच गुल होऊन, लोक तयार होऊन कात्रजेचे वाटे व चहूंकडे धांवूं लागले. गलबल पडली. यांत कोणी कोणास मिळेना. कांहीं पळूं लागले. कांहीं तयार होऊन छाप्याचे रोखें चालले. तों महाराजांनीं जागां जागां लोक ठेविले त्यांचे इशारतीच्या संकेताप्रमाणें मेळवीत मेळवीत मोठे प्रतापें यश घेऊन, जसा कालिया साप पत्न्यांचे करुणेंकरून श्रीकृष्णजीनें जित सोडिला, ऐसा खान याचे मानेवरि तरवार ठेविली असतां, काढून, शासन करून, सोडून देऊन, सिंहगडास विजयी होऊन सुरक्षित येऊन पावले.

### ना-हिंमत होऊन खानानें पुणें सोडिलें.

तों प्रातःकाळीं गनिमाच्या फौजा झाडींत[1] जाऊन झाडांस व बैलांचे शिंगांस पोत बांधिले [ आहेत ], छापा नव्हे ! असें पाहून सिंहगडाखालीं येऊन उभ्या राहिल्या.[2] ते समयीं किल्ल्यावरून तोफेची मारगिरी केली. त्यांणीं निशाणाचे हत्तीस गोळा लागून पडिला. लोकही फार जायां जाले. ऐसेंहि जालें असतां महाराजांनीं विचार केला जे, " मोंगल वेढा घालून बसले. यास्तव किल्ल्याचा बंदोबस्त करून, आपण पलीकडील वाटेनें उतरोन राजगडास जाऊन पावावें. शास्ताखान ते दिवशीं फौजेसुद्धां किलियाजवळ उभे राहिला. " पाउसाचे दिवस, शिवाजी दगेखोर, मोठी[3] आंगेजणी पाहिली. अफजल मारिला असें ऐकिलें. तसेंच आम्हांसही केलें असोन सोडिलें, जीवदान दिलें व शास्त केली. मोर्चे देऊन बसण्याचे दिवस नाहींत; फौज पावसानीं सडेल; फौजेंत फितवा असेल, तरिच डेऱ्यापर्यंत लोकसुद्धां येऊन पोंहचून बाडांत पोहोंचले, आणि आपणावरि एहसान[4] केलें. " ऐसे प्रकारें कित्येक अंदेशे मनांत आणून, बाजतबरसात मसलत करणें पाहून करितां येईल म्हणून ना-हिंमत होऊन, पुणें येथें शिवाजीचे नजीक राहाणें ठीक नाहीं जाणून, दरमजल कोस दोन कोसांच्या मजली करीत करीत पेडगांवीं[5] जाऊन छावणीस राहिला.

याप्रमाणें शास्ताखान यास शास्त करून नामोहरम करून घालविला. महाराज बहुत संतोषी जाले. बरोबर लोक नेले त्यांस सर्वांस नावाजून, आपले बरोबर धाडसें केलीं म्हणून सर्फराजी करून बक्षिसें दिल्हीं. देशपांडे दोन असामींस – दादाजी बापूजी व चिमणाजी बापूजी – यांस पालख्या दिल्ह्या.

---

१. ' झाडांत ' २. ' उभा राहिला ', ' उभे राहिला ' ३. ' मोठा '
४. ' अहसान ' ५. ' पेंडगावीं '

## ‘ शिवाजी बडा सैतान पैदा हुवा ! ’

शास्ताखानाचें पारिपत्य केलें, नामोहरम होऊन छावणीस आले हें वर्तमान दिल्लीस गेलें. ते समयीं पादशाहांनीं आश्चर्य केलें, व त्यास क्रोधही आला. “ शिवाजी बडा सैतान पैदा हुवा,” असें पादशाह बोलले. “ जें कोण्हीं आजपर्यंत कर्म न केलें, तेंच करितो. आपले सुभे बुडविले. खान गेले त्यांची गति अशी केली. किल्ले, कोट, मुलूख घेतला. त्याचा बंदोबस्त, पारिपत्य चांगलें जालें पाहिजे, ” म्हणून बहुत विचारांत पडून, खानाचे बराबर सरदार लोक दिले होते त्यांजवर इतराजी करून त्यांचे मनसब, सरंजाम जप्त केले आणि खानानें इतकें सामान बराबर दिलें असतां जाऊन आब गमावला, नामोहोरम जाले. शास्तही करून घेतली म्हणून ‘ तुम्हीं हुजूर निघोन येणें,’ ऐसें फर्मान समजाविलें, पाठविलें आणि हुजूर बोलावून घेतले. [ खान ] निघोन गेले.

## शाहाजी महाराजांचा अपघाती मृत्यु

यानंतर शाहाजी महाराज चंजाऊर प्रांतीं बेंगरूळ तालुकियांत होते. तेथून रणदुल्लाखान वगैरे फौज चित्रदुर्ग तालुकियांत होती तेथें मदतीस बोलाविलियावरून आले. त्या तालुकियांतील गांव बोदेकीर[१] म्हणून तुंगभद्रा-तीरीं आहे. तेथें शिकारीस गेले. तों सश्याची शिकार उठली. त्याचे मागें घोडा लाविला. तेव्हां गवचींत[२] घोड्याचा पाय जाऊन अटकळला.[३] घोडा व आपण तेच स्थळीं पडले. तेथेंच समाप्त जाले. शके १५८३ प्लवनाम संवत्सरे, माघ शु॥ पंचमीस कैलासवास केला. हें वर्तमान महाराजांस आलें. तेव्हां बहुत श्रमी होऊन “ आपण आजपर्यंत पराक्रम केले ते महाराजांस वारोंवार लिहिले, त्यांणीं गौरव केला; याउपरि आपणांस वडील नाहींतसे जाले, ” म्हणून खेद केला. जिजाबाईसाहेब यांणीं सहगमन करण्याविषयीं आग्रह धरिला, हें पाहून आपण जाऊन मांडीवर बसोन राहविली. बहुत रीतीनें समाधान केलें. आणि सांपराईक[४] उत्तरक्रिया आरंभून लक्षावधि रुपये दानधर्म महादानें केलीं. बोदेकीर येथें महाराजांची छत्री बांधविली. आणि तो गांव महाराजांची पूजाअर्चा व खर्च तेथें पारिपत्यगार नेमून चालावा ऐसें[५] करून त्यांस लावून दिल्हा.[६]

## जयसिंगाची योजना : महाराजांचे अंगीं श्रीचा संचार

यानंतर पादशाहानें विचार केला जे, “ मिरझा जयशिंग[६] यांस मोहिमेस पाठवावें. हे हिंदु आहेत. राजकारण तह करून अथवा युद्ध करून हातीं लागल्यास

१. ‘ बेदेकीर ’, ‘ बंदेकीर ’, ‘ बांदेकीर ’ २. ‘ गवेचीत ’ ३. ‘ अटकला ’
४. ‘ सांप्रदायिक ’, ‘ सापराहेक ५. ५. ‘ म्हणून त्यांचे ताब्यांत केला. ’
६. ‘ मिरजा जैसिंग ’

घ्यावे अगर मसलत करावी," म्हणून जयशिंग यांस सांगून सुभेदारी देऊन त्यांचे बराबर दिलेलखान पठाण विश्वासू मातबर सरदार दिल्हे. फौज, तोफखाना, वगैरे सामान बहुत पोख्त करून दिल्हें. ते दरमजल येऊन, औरंगाबादेस पोहोंचोन सुभ्याचा बंदोबस्त केला, आणि महाराजांवरि चालून आले.

तेव्हां महाराजांना[1] विचार पडला जे[1], "दोन सुभे दिल्लीचे आले ते बुडविले. श्रीनें त्यांचें पारपत्य केलें. हल्लीं मातबर सरदार मोठे आंगेजणीचे व सामान भारी घेऊन[2] आले. बरें, देव पार पाडणार! तेव्हां काय चिंता आहे?" म्हणून श्रीची प्रार्थना केली जे "या शत्रूचा पराभव कसा करावा?" ते समयीं श्रीचा संचार आंगीं होऊन बोलिले जे, "अरे मुला, ये समयींचा प्रसंग कठीण आहे, याचा पराभव घडत नाहीं. तुजला दिल्लीस जाणें घडेल, तेथेंही कठीण प्रसंग प्राप्त होईल, परंतु तेथून निभावून आणीन, तीर्थयात्रा बहुत घडतील, आजपर्यंत रक्षिलें, तसेंच रक्षीन," अशी आज्ञा जाली. ते चिटणीस व वाकेनीस यांणीं लेहून ठेवून[3] त्याप्रमाणें वाचून दाखविलें. तें ऐकून घेऊन बहुत संतोषी जाले. "सर्वप्रकारें श्री निभावणार आहे," ऐसें बोलले. आणि विचार केला जे, "जयशिंग आले, हे हिंदु आहेत, यांशीं सख्याचेंच विचारें बोलावें." म्हणून रायगडानें निघोन राजगडास आले, फौजा जमा केल्या.

### 'आम्ही–तुम्ही हिंदु, तुमचा बच्याव करावा हा हेतु'

[इकडे] जयशिंग व खान भीमा उतरून आले. तों राजे राजगडीं आले हें कळोन सिंहगड व पुरंधर यांचे मधीं येऊन मुक्काम करून राहिले. आणि जयशिंग यांणीं महाराजांचें चरित्र व राज्य-आक्रमणशक्ति पाहून "हा राजा हिंदु, परम धार्मिक, भला, धर्मस्थापना करणारा, नीतिकरून राज्य चालवितो; यास कसेंही बचवून[4] पादशाहाची चाकरीही मनसवेचे युक्तीनें बजावावी. याशीं युद्ध केलें असतां जय अथवा अपजय कसें पडेल कोण जाणे! याची फौज व लोक, सामान चांगले जातीनें मनसबा करणारा, व ठिकाणें चांगलीं बांकीं, सर्वगुणसंपन्न आहेत. वरकड सरदार नामोहरम होऊन गेले तसे आपणासही घडल्यास[5] ठीक[6] नाहीं[6]. आपण आब[7] रक्षून जावें," ऐसा विचार करून महाराजांकडे सख्याचें अनुसंधान करावेंसें करून, वकिलाबराबर सांगून पाठविलें जे, "औरंगजेब बलवान पृथ्वीपति. त्याशीं तुम्हीं सख्य करावें; शत्रुत्वेंच राहून परिणाम या कालीं लागणार नाहीं; आम्ही हिंदु जयपूरचे राजे, तुम्ही उदापूरचे[8] घराण्यांतील सिसोदे थोर

१.१. 'महाराज विचारांत पडले जे' २. 'असे' ३. 'ठेविलिया' ४. 'रक्षून' ५. 'घडलेल्या', 'घडेलेया', 'घडल्या', ६.६. 'कठीण' ७. 'अबरू' ८. 'उदेपूरचे'

वौंश[1] आहां. धर्मस्थापना हिंदुधर्माची तुमचे कुळीं परंपरा चालत आली तीच करितां. यास्तव तुम्हांस अनुकूल आहों. तुमचा बच्याव करून राज्य रक्षावें हें आमचे चित्तांत बहुत आहे. तुमचें मानस काय तें कळवावें, " म्हणून[2] सांगून पाठविलें असतां महाराजांनीं गोष्ट मनांत आणिली[3] तसाच[4] यांचाही भाव आला. "श्रीची आज्ञा तसें एक वेळ दिल्लीस जावें, आपला पूर्व प्रांत दृष्टीस पडून गंगादि यात्रा पुण्यक्षेत्रें हेंही घडेल. यास्तव सख्याचें बोलणें आलें तेंच उत्तम, " म्हणून वकील आले त्यांचा गौरव बहुमान करून आपले वकील त्यांजबराबर पाठवावे, बोलणें लावावें, हा विचार करून, सर्वांचे[5] विचारें विचार ठरावांत आणून, रघुनाथभट पंडितराव यांस हत्ती, घोडे लवाजिमा बरावर देऊन त्यांजबराबर वकिलीस पाठविलें. जयसिंगराजे यांस व खानास बहुमान, वस्त्रें, पोशाख पाठविले.

## 'तुम्ही देवब्राम्हण संरक्षितां, हें आम्हांस संतोषकारक... '

ते [ रघुनाथपंत ] जाऊन भेटल्यावरि बोलणीं जालीं. त्यांत महाराजांचें बोलणें, "आपण पादशाहाशीं सख्य असावें [ म्हणतां ] तेंच आम्हांस कर्तव्य. आम्हांकडे प्रांत व किल्ले, मुलख आम्हीं आपले बाहुबळें करून पर-तालुकियांतील मेळविले, त्यांस पादशाहाकडून उपसर्ग नसावा; आणि पादशाहाची स्वच्छता[6] घडावी; भेटी होऊन अधिक सरफराजी व्हावी, हें आपणांस आवश्यक आहे; त्याअर्थी आमचा आपणांशीं दुसरा अर्थ नाहीं." हें बोलणें बहुत निखालसतेचें ऐकून घेऊन जयशिंगराजे यांणीं उत्तर केलें कीं, "तुम्ही हिंदुधर्मउच्छेद जाला तो दक्षणप्रांताचे ठाईं स्थापना करून देवब्राह्मणसंरक्षण करितां हें आम्हांस संतोषकारक आहे. तुम्हीं आमचे रामशिग जसे पुत्र तसेच आम्हांस आहां तुम्हांशीं शपथपूर्वक दुसरा अर्थ नाहीं. तुमचे मतलब पादशाहाकडून काय काय करून घ्यावयाचे असतील ते लेहून पाठवावे. समजवावें,[7] त्यासारखे पुढील बोलणें चालू होईल,[7] " म्हणून वकिलापाशीं सांगून दिलेलखान याची भेट करविली. त्यास बहुमान वस्त्रें, जवाहीर आणिलें तें देऊन[8] बोलणींही समजाविलीं. त्याची सलाह घेऊन, पंडितराव यांस वस्त्रें बहुमान देऊन, त्यांजबरोबर महाराजांस बहुमान वस्त्रें, जवाहीर देऊन परतून रवाना केलें.

## दिलेलखानाचा तहास विरोध

ते महाराजापाशीं येऊन जयशिंगाची बोलणीं समजाविलीं. महाराजांनीं सर्व

---

१. 'वंश' २. 'असे' ३. 'आणिले' ४. 'तसेच' ५. 'सर्व सरकारकून यांचे'. ६. 'स्वस्थता' ७. ७. 'समजावे. त्यासारखा पुढील विचार होईल' ८. 'देविले'

आपले मतलब लेहून काढिले. " आम्हीं राज्य घेतलें हें दरोबस्त आमचें आम्हांकडे राहावें. वरकड दक्षण प्रांत यांतील चौथ, सरदेशमुखी आम्हांकडे चालावी. किल्ले, कोट घेतले ते व नवे केले ते आमचे आम्हांकडे असावे आणि सख्य घडावें, " ऐसे मतलब सांगून पुन्हा वकील रवाना केले. आणि त्यांणीं जाऊन यादी दाखविल्या, बोलणीं सांगितलीं. तेव्हां महाराज तह करितात हा सिद्धांत जयशिंगास निश्चयाचा कळला. आणि. भेटी 'व्हावी नंतर परस्परें निखालसता ठरोन, बोलणीं करार करितां येतील, ऐसा ठराव केला. तेव्हां दिलेलखान यांचे विचारें, " लागलीच भेटी घेऊन बोलणीं पक्केपणांत आणून या जातीचा तह ठरवूं नये; सर्व वाके पादशहास लिहून पाठवून तेथून आज्ञा येईल त्या अन्वयें पुढील विचार करावा. मसलत[1] करून आलों. हा दाब[2] वाढवून[3] कांहीं प्रांत, किल्ले सोडवावे आणि नंतर करणें तें करावें. पादशाहाकडील उत्तरें येत तों आम्ही पुरंधर घेतों, तुम्हीं सिंहगड घ्यावा. " असा[4] आग्रह त्याचा पडला[4]! ते समयीं " शिवाजी राजे तहानें येतात हें वाईट नाहीं. पादशाहाचे आज्ञेप्रमाणें त्यांचेंही बरें करून पादशाही मतलब मनांत[5] आणून[5] आपलेसे करावे, दौलताबाद तालुक्यांतील प्रांत, किल्ले घेतले ते तहानीं सोडवावे हें उत्तम, " असें [ जयसिंगानें ] सांगितलें असतां खानाचा आग्रह न सुटला. " पादशाहास लिहून करणें तसें करूं, " म्हणून वकिलास निरोप देवविला.

### मावळे लोक हे शिवाजीचा सैतानखाना

आणि [ खान ] आपण कूच करून, पुरंधरानजीक येऊन, मोर्चेबंदी करून वेढा घातला. रुद्रमाळचे डोंगरावर दमदमे रचून, तोफा चढवून मारगिरी केली. आणि 'हल्लेनीं किल्ला घ्यावा, किल्ला म्हणजे हिसाब काय आहे ? हल्ला करावा.' ऐसा विचार केला. ते समयीं महाराजांनीं राजगडाहून केदार दरवाज्याकडून रसद पोहचविली. लोकांची भरती केली. वरचेवरि मदत करिते जाले. मोर्चे मारून उठऊन[6] दिल्हे. त्याजवरून फारच अभिमानेंकरून आग्रहास खान प्रवर्तला. आपली कुल जमियत एक करून, आपण खासा नारायणाचे देवळापाशीं उभे राहून, लोक पायउतारा करून, किलियावरि हल्ला चढविली. तोफांची[7] मारगिरी करून पेंढार वगैरे पुढें घातलें; त्याचे मागें गारदे;[8] त्यांचे मागें पठाण लोक, तोफा; त्यामागें असें करून आपणही चालून घेतलें. याजवरून किलियावरून मुरार बाजी देशपांडे माहाडकर प्रभु मावळे लोकांचे सरदार होते, त्यांणीं लोक निवड करून, धारकरी घेऊन, हल्लेवरि चालून घेतलें. पेंढार कापून पिटलें. मागें पठाण व गारद होते, ते उभे राहिले, त्यांजवरि सरसून आले. पठाण

१. 'मतलब' २. 'दावा' ३. 'बसवून' ४. ४. 'ऐसें बोलणें आग्रहाचें पडलें.' ५. ५. 'करून' ६. 'उधळून' ७. 'तोफेची' ८. 'गारद'.

हजार दोन हजार गोळी व तरवार चालवून रणीं पाडिले. मावळे लोकही बहुत पडिले. सारी हल्ला मारून डोंगराखालीं पिटीत आणिली. तेव्हां खासा दिलेलखान चालून गेला. त्याजवरि मुरार बाजी लोकसुद्धां चालून आले आणि लोक मारीत सुटले. तेव्हां खानही आपले जागां दंग जाला. पुढें हल्ला चालेनासें बाजी याणें केलें. खान तोंडांत बोट घालून चकित जाला. 'शिपाईगिरीची शर्थ केली! मावळे लोक हे शिवाजीचा[1] सैतानखाना आहे म्हणून बोलोन, 'कौल घ्यावा' असें सांगून पाठविलें असतां "तुम्ही तुरुकडे,[2] तुमचा हिसाब काय? तुमचा कौल कशास पाहिजे? मी शिवाजीचा चाकर आहें! मरून खस्त होऊन तुम्हांस नामोहरम करीन!!" ऐसें बोलोन पुढें चालून घेतलें. तेव्हां दिलेलखान याचे हातचा[3] तीर लागून, आणखीही जखमा बहुत चढून रणीं ठार पडले. लोकही त्यांजबरोबर बहुत पडले. वरकड सांवरून निघोन किल्ल्याबर गेले. तों महाराजांकडील आणखी नामी लोक भरतीस आले ते पोहोंचले. नगारे, करणे वाजूं लागले कीं किल्ला हुशार आहे, तोफा चालूं लागल्या, धोंडी लोटल्या. हें कळोन खान खजील होऊन शेवटास हल्ला जाणार नाहीं. हटानें करणें, लोक मार[ वि ]णें चांगलें नाहीं, म्हणून गोटास आले. अस्तमानही जाला.

## सुलतानढवा गर्दी करून घालून बुडविला

तेव्हां जयशिंग यांणीं सांगून पाठविलें जे, "हें करितां हें चांगलें नाहीं. शिवाजी राजाचीं माणसें एकाहून एक अधिक आहेत. किल्ला येणार नाहीं. एक किलियास इतकीं माणसें खराब केलीं. खडे खावविले. तेव्हां सारे किल्ले मोठे झाडींतील कोंकणबांधारी वगैरे कसे येतात[4]? शयाद्रीचे[5] किल्ले विकट, झाडीं रान त्यांस तेथें कसें कराल? शिवाजी राजा राजकारणकरून येऊन भेटत होता तें सोडून विश्वासही गमाविलात. राजकारण तोडिलेंत. पुढें विचार काय? इतक्यांत सिंहगडावरि सुलतानढवा [ करावा ] म्हणून सरदार फौज देऊन मोर्चे लावावयास पाठविला होता, त्यास महाराजांनीं छापा पाहाटेस पांच चार टोल्या[6] करून गर्दी करून घालून बुडविला,[7] सरदार मारिला, फौज लुटून घेतली," हेंही वर्तमान आलें याजवरून खान सर्द होऊन जयशिंग यांसि बोलिले जे, "राजे यांसि पुन्हां भेटीचें राजकारण विश्वास जेणेंकरून होय त्या रीतीनें करवावें; परंतु त्यांत पुरंदरास मोर्चे आम्हीं लावून हल्ला केली, प्रतिज्ञा केली असतां गोष्ट न घडली येविषयीं किल्ल्यावर आमचें निशाण त्यांनीं घेऊन [ आमचे ] लोक चढवावे. पुन्हां किल्ला

---

१. 'शिवाजीपाशीं' २. 'तुरूख' ३. 'हाताचा' ४. 'येतील' ५. 'सह्याद्रीचे' ६. 'वेळां' ७. 'उडविला'

त्यांसच तहांत घ्यावा. हें मात्र करून घेऊन मागील बोलणें आहे त्याप्रमाणें चालवावें. ”

## खान शर्मिदा झाला

याजवरून जयशिंग राजे यांगीं “ प्रयत्न करून घडेल तितकें पाहूं ” म्हटलें.[1] महाराज यांचें जैसिंग यांचें चित्त मिळालें होतेंच. खानाचे दुराग्रह यामुळें वकिलास निरोप दिला. आंतून ऐक्यता[2] होती.[2] पुन्हा वकील पाठवून “ जाली ती गोष्ट बरीच जाली. याउपरि पूर्वी बोलणें आहे तेंच कायम करून किल्ल्यावरि मात्र एक वेळ निशाण घ्यावें आणि किल्ला तुम्हींच ठेवावा ” [ असें ] सांगून पाठविलें असतां, महाराजांनीं सांगून पाठविलें जे, “ निशाण [ तुमचें ] घेऊन किल्ला दिल्हा हें कांहीं घडणार नाहीं. खानानीं दोनशें पांचशें हजार लोकांनिशीं पाहिजे तसें किल्ल्यावरि येऊन किल्ला पाहून फिरोन जावें ” ऐसें सांगून पाठविलें. यावरून खान किल्ल्यावर जावे ऐसें ठरोन खानास पांचशें लोकांनिशीं किल्ल्यावर घ्यावें ठरलें, आणि किल्ल्यांवरि दोन हजार माणसें बहुत नामी लोक सामान, तोफा वगैरे बहुतच तरतुदीचे शिलेगोष दुरस्ता उभे [ करून, ] सदरेस बैठक तरतूद करून [ खानास ] वरतें घेतलें. सामान पाहातां बहुत चांगलें, दगाबाजी करूं म्हणतां चालावयाचें नाहीं, गर्दीस मेळवितील, दगा पावूं, म्हणोन खालीं उतरोन येऊन शर्मिंदे जाले. “ केलें[3] कर्म शेवटास न गेले[3]; किल्ले, कोट घेणें अवघड गोष्ट; राजे यांचे माणूस बहुत चांगले, मर्द व तरतूद राजाची [ चांगली ] लढाई करण्याची शर्त जाली ”[4] म्हणोन गोटांत आले. भेटी व्हावी हा सिद्धांत जालाच होता. परंतु रुद्रमाळ खानानीं दमदमे रचून घेतली ती परत द्यावी आणि पुरंधरापासून फौजा उठून जाव्या, नंतर भेटीचा योग घडेल असें सांगून पाठविलें. यावर रुद्रमाळ परत दिली. फौज उठविली.

## ‘ तुम्ही आम्ही शरीरसंबंधीच ! ’

यानंतर पंडितराव यांसि पुन्हां रवाना केलें. ‘ तुमचा विश्वास कसा पडतो ? एक वेळ [ बोलणें ] ठरावांत आणिलें[5] असतां तुम्हींच तह बिघडविला. आतां भेटी कशी घ्यावी ? हे खातरजमा व्हावी. ” म्हणून [ रघुनाथ पंडित ] बोलल्यावर आणशपत खानासह निखालसता जयशिंग यांणीं करून देऊन “ यादीचा करार ठराऊन लिहिले मतलबाप्रमाणें पादशाहापासून करून[6] आणून ” ऐसें ठरावून खातरजमा केली. जयसिंगाचें म्हणणें, “ तुम्ही आम्ही एक रजपूत. तुम्ही

---

१. ‘ म्हणोन ’ २. २. ‘ एक विचार होता. ’ ३. ३. ‘ नेम शेवटास न गेला. ’ ४. ‘ करितात ’ ५. ‘ आलें ’ ६. ‘ ठरवून ’

राणे सिसोदे, आम्ही कछवे, शरीरसमंधीच[1] आहों; जसें रामशिंग तसेंच तुम्ही आम्हांस; दुसरा विचार[2] नाहीं. तुमचें बरें तें सर्व प्रकारें करीन," असें सांगून वकील रवाना केले.

त्यांणीं जाऊन सर्व वर्तमान समजलियावरून[3] भेटीस आले. आपली फौज व हषम लोक निवड करून बराबर घेऊन उभयतां पेशवे व सुरनीस संभाजी महाराजांपाशीं फौज पंचवीसतीस हजार व हषम असे किल्ल्याचा बंदोबस्त करून ठेविले. बराबर सरदार, सरकारकून[४], फौज, पागा पंचवीसतीस हजार लोक व हषम दाहा हजार घेतली व फौजेंत मावळे लोक घेतले. त्यांस पोषाख बादली[५] व पैठणी घोड्यांस सामानें सोनें रुपें यांचीं; व मुत्सद्दी सरदार वगैरे यांचे आंगावरि जवाहिरें; तसेंच हत्तीचीं सामानें भरजरी, पायीं सोन्यारुप्याच्या सांखळ्या; अंबाऱ्या, हौदे सोन्यारुप्याचे ऐसें शेंपन्नास; तसेंच खिजमतगार हुजरे वस्त्रें अलंकार सोन्याचे येणेंकरून युक्त; पायचे सरदार यांस सोन्यारुपे [ चीं ] कडीं, सांखळ्या, कंठ्या, दुर्हींकरून युक्त; याप्रमाणें स्वारी सिद्ध करून, आपण खांसा साधा पोशाक करून अंबारींत बसोन, हातीं तरवार तीर-कमान घेऊन, पाठीमागें मुत्सद्दी व सरकारकून व सरदार यांच्या अंबाऱ्या पंचवीस चाळीस, पुढें कोतवाल, जिलीब[६] लोक, शाहाजानी धाडी, करणे, शिंगें रुप्याचीं पंचवीस पन्नास[६], ऐसें भेटीस आले. जयशिंग यांचा इतबार पक्केपणें[७] पुरला[७] होताच; बेकिलाफ उभयपक्षींही जाला होताच.

## सरदार कोण व राजा कोण हा संदेह !

महाराज आले हे बातमी येतांच जयसिंगही खान यास बराबर घेऊन, फौज स्वारी तयार करून सामोरे गेले. आणि उभयतांकडील[८] लोक, सरदार हजार पांचशें खासे नेमून त्यांच्या समारंभेंकरून भेटी करविल्या. नंतर खासाही भेटले. परस्परें बहुत आदर जाले. महाराजांचे लोक व सामान तरतूद पाहून सर्वही बहुत चकित जाले. "ज्याचें देणें व संपत्ति अशी ! तेव्हां लोक जिवाची परवा कशास ठेवितील ? किल्ले कोट घेणें, मोठे धाडसाचीं कर्मे करणें हें असें सामान असतां अगाध काय ?" ऐशी चर्चा करूं लागले. सर्वांचे पोशाख व आभरणें, अमीर[९] लोक, मातबर मातबर सरदार पाहून राजा कोणता हा संदेह जनास पडला.[९] महाराजांनीं जवाहीर देखील आंगावर विशेष घातलें नाहीं. भेटी जालियावरि जयशिंग व महाराज एके अंबारींत

१. 'शरीरसंबंधीच' २. 'प्रकार', ३. 'कळवलियावरून' ४. 'सरकारखानदार' ५. 'बाधली' ६. ६. 'संगे लोक मर्द होते शिंगाडे यांची शिंगें रुप्याचीं होतीं. ७. ७. 'पुरा' ८. 'इकडील तिकडील' ९. ९. पाहूनही सरदार कोण व राजा कोणता हा संदेह त्यांना झाली.'

बसून डेरियास आले. तेथेंही एक आसनीं बसले. विडे, पान आदर[1] होऊन गोटास जाण्यास निरोप दिल्हा.

**भेटीगांठी, मेजवान्या, निखालसता**

दुसरे दिवशीं, "दिलेलखान यांचे डेरियास जावें, पादशाही इतबार अमीर आहेत" म्हणून जयशिंग यांणीं सांगितल्यावरून ठरलें. बरोबर सुभानचिंग मामा दिल्हे. त्यांसह महाराज त्यांचे डेरियास जातां खान गोटाबाहेर सामोरे आले व घेऊन गेले. वस्त्रें बहुमान, जवाहीर, हत्ती, घोडे राजे यांस दिल्हे. मानकरी व मुत्सद्दी यांस वस्त्रें, जवाहीर देऊन तहाचें बोलणें परस्परें चालतें जालें. सुभानशिंग यांणीं राजियाचें बोलणें सांगितलेयावरून, "जयशिंग राजे सुभेदार, वडील[2], पादशाहाचे इतबारी, आम्ही त्याचे ताबिनांत, ते करितील त्यांत आम्ही आहों," ऐसें खान सफाईकरून बोलले. महाराज गोटास आलें. नंतर जयशिंग व दिलेलखान यांस मेजवान्या महाराजांनीं बहुत तरतुदीनें केल्या. हत्ती, घोडे, जवाहीर, वस्त्रें दिल्ही. व मातबर सरदार अमीर यांसही वस्त्रें जवाहीर योग्यतेनुरूप दिल्हें. त्यानंतर खान व जयशिंग यांणींही महाराज यांसि मेजवान्या केल्या. सरकारकून सरदार यांस वस्त्रें, जवाहीर दिल्हें. महाराज यांस वस्त्रें जवाहीर, हत्ती, घोडे, देऊन समारंभ केला. जयशिंगांची ममता, मनःपूर्वक बोलणें, उत्तमप्रकारें निखालसता* जाल्या. "राजा परम धार्मिक, कुलीन होय, यास यश येऊन दिवसेंदिवस वृद्धिंगत पावावें.[3] दैववान्, पराक्रम याचा[4] विचित्र, यास्तव जसें साहित्य होईल तसें याचें करावें, यास राखावें," म्हणून[5] करिते जाले. ते समयीं जंजिरेकर सिद्दी संबूल हपशी[6] जयशिंग यांजकडे आले होते. महाराजांनीं 'जंजिरा आम्हांकडे देववावा' बोलणें घातलें असतां, "पादशाही चाकर ते, औरंगजेबाची आज्ञा पाहिजे. तुमचे मतलबांत[7] लिहून पाठवूं," ऐसें उत्तर केलें. नंतर राजे निरोप घेऊन राजगडास आले.

**तहनामा : जंजिऱ्याचा विचार नाहीं.**

[जयशिंगानें] तहनामे लेहून, त्यांत पूर्वी[8] कलमें लिहिलीं [तीं] व जंजिरे याचेंही कलम लेहून[8] आणविले.* डाकेवरि रवाना केलें. येथें जालें वर्तमान वाके सर्व लिहिले. "राजे भेटीस दिल्लीस यावयाचें ठरलें. यादीवर[9] रुकार होऊन सनदा[9] याव्या. आम्ही उभयतां बाहादारीस-निभावणीस ठेवावे[10] म्हणजे दिल्लीस येतात,[11]"

---

१. 'अत्तर गुलाब' २. 'वयें वडील' * 'महाराजांशीं' ३. 'पावो' ४. 'करणें' ५. 'असा विचार करून', ६. 'हबशी'. ७. 'मतलब'. ८. ८. 'पूर्वकलम जंजिरे याचें लिहून' *'आणिलें' ९. ९. 'यादी व रुकारसनदा' १०. 'व्हावें' ११. 'येतों,'

नंतर आपणही सफाई करून सर्फराज करावे." ऐसे कितेक प्रकार जयशिंग यांणीं लिहिणें ते लिहिले. आणि कूच करून नदी भीमातारीं मुकाम केला. नंतर पादशाहाचीं उत्तरें आलीं : "उभयतां निभावणी बाहादारीस[1] व्हावें, जंजिरे कलम बोलों नये. वरकड किल्ले, कोट पादशाही दौलतींतील सोडावे. त्यांतही दौलताबादेखालील प्रांत किल्ले हे सोडावे. चौथाई व सरदेशमुखी करार करावी. हुजूर भेटीस आलियावरि येथून प्रांत, किल्ले सफाईची चाल पाहून देणें तें देतां येईल." ऐशीं यादीवर उत्तरें स्वाल होऊन आलीयावरि महाराजांस पत्रें पाठवून आणवून पुन्हां जयशिंगांनीं ठराव केला, "विजापूर प्रांतांतील त्या पादशाहींतील [ प्रांत किल्ले ] घेतले त्याजविषयीं बोलों नये, व त्या लगतीं कांहीं प्रांत व किल्ले दौलताबादेखालील हेही जुन्नर वगैरे तालुके राहावे.[2] बाकी सत्तावीस किल्ले, त्रिंबक नासिक प्रांत, बागलाण, खानदेश, सोडावे," ऐसें ठरोन करार यादी, तहनामे करून, 'उभयपक्षींचे वकील जाऊन तेथून तहनामे करार होऊन यावे, नंतर जाण्याचा बेत करावा,' ऐसें ठरावून आपले कडील माणूस मातबर देऊन महाराजाकडील सोनोपंत डबीर यांचे मेहुणे रघुनाथ बल्लाळ कोरडे, बरे, शाहाणे, पारसनीस होते जाणून, दिल्हे आणि दिल्लीस रवाना केले.

## जयशिंग व महाराज एका अंबारींत : खानास असह्य

जयशिंग राजे व दिलेलखान औरंगाबादेस जावयाचा विचार ठरावून जावां विजापूर प्रांतीं खंडणी घ्यावयाची, महाराज बरावर फौजमुद्धां यावे म्हणोन बोलोन कूच करून निघाले. जयशिंग व महाराज यांणीं एके अंबारींत बसावें, उभयतांची बहुत निखालसता, हें पाहून आपली अंबारी मागें चालवणें वगैरे दिलेलखानास असह्य वाटूं लागलें. तेव्हां पेडगांवीं आपले राहण्यास ठाणें बांधावयाचें म्हणून काम लावून तेथेंच खान राहिले. महाराज व जयशिंग पुढें गेले. खंडणी जाली. नंतर महाराज, 'दिल्लीचे जाब येतांच जाणें पडेल, किल्ले कोट वगैरेचा बंदोबस्त जाला पाहिजे,' म्हणून निरोप घेऊन निघाले. जयशिंग औरंगाबादेस गेले.

## किल्लेकऱ्याची परीक्षा

राजे पन्हाळियावरून गेते जाले. तेव्हां महाराजांनीं विचार केला जे, "आपण किल्ल्यांची खबरदारी केली तसे रीतीनें किल्लेकरी चालून खबरदार, सावध आहेत नाहींत पाहावें." म्हणून रात्रीसच किलियावरि गेले. आणि हवालदार यास, हाक मारून, "महाराज आले, गनिमाची झड मागें आली आहे, दरवाजा उघडून किल्ल्यावरि घेणें." ऐसें सांगितल्यावरून तटावरि सारे अधिकारी

---

१. 'बहादरी सांगून' २. 'राखावे.'

दरखदार[१] व लोक घेऊन हवालदार येऊन उभे राहून रात्रीस दरवाजा उघडूं नये हे कैद महाराजा[२] करून दिल्ही, यास्तव उघडीत नाहीं; शत्रु आला असला तरि घेरियाचे लोक व खाली हुशार करून रोखून राखितों, महाराजांनीं दरवाज्यानजिक खालीं तटालगत असावें; येथूनही[३] तोफा व लोक करवळ उभे करून पुढें येऊं न पावे ऐसें करितों.[३] " ऐसा अर्ज केला असतां, "तुमची सर्फराजी होईल, आज्ञाही आमची व परवानगीही आम्हींच सांगतों, दरवाजा उघडावा," ऐसें बोलल्यावरि,[४] "दरवाजा उघडीत नाहीं, रात्र थोडी आहे, मागील गलबल पडूं देत नाहीं," ऐसें उत्तर केलें. याजवरि "तुमचें पारपत्य केलें जाईल. तुम्हीं चाकर इतबारी, हुकमाप्रमाणें[५] चालावें तें घडत नाहीं, हें चांगलें नव्हे, पारिपत्यें होतील," असें भयही घालून सांगितलें. तथापि दरवाजा उघडिलां[६] नाहीं. प्रातःकाळ जाला, तों सर्व कारभारी, हवालदार हात बांधोन, दरवाज्याजवळ येऊन कुलपें काढिलीं. आणि महाराजांस आंत घेऊन, "आम्ही अन्यायी, पारिपत्य करणें असेल तें करावें[७] " असें बोलले. यावरि महाराज त्यांजवरि बहुत संतोषी जाले. त्यांस नावाजून सर्फराज केलें आणि वाढविलें. "आज्ञा तसें चालतां, इमानी इतबारी, प्रमाण आहां," ऐसें बोलोन त्यांचा गौरव केला, आणि निघोन सातारियावरून राजगडास चालले. श्रीरामदासस्वामींचें दर्शन घेऊन, सर्व वृत्त निवेदन करून, 'दिल्लीस जाणें प्राप्त, कैसें करावें ?' विचारिलें. "जावे, फते पावाल, संकट दूर होईल, तूर्त प्रसंगें जाणेंच प्राप्त आहे," ऐशी आज्ञा जाली.

## मुरार बाजीचा पराक्रम

नंतर आज्ञा घेऊन राजगडीं पावले. तेथें आलियावरि मुरार बाजी यांणीं पुरंधरीं लढाई बहुत शर्तीची मारली, शिपाईगिरीची सीमा केली, शेवटीं जखमा लागून मुर्दाचें मांस ढालेंत भरून नेलें, यावरून बहुत संतोषी होऊन, त्यांचे पुत्र बाजी मुरार यांस आणून, नवाजिसी करून, पालखी, वस्त्रें बक्षीस देऊन, त्यांची सरदारी त्यांस सांगून, दोन गांव उरवडें वगैरे म्हणून मुठेखोरें[८] यांतील इनाम वंशपरंपरेनें करून दिले. याप्रमाणें सर्फराज केलें. यानंतर स्वारी रायगडावर गेली.

## दिल्लीस जाण्याचा विचार पक्का ठरला.

यावर दिल्लीहून पादशाहांनीं विचार केला जे, "शिवाजी राजे यांस तह

१. 'खबरदार' २. 'महाराजांनीं' ३. ३. 'शत्रु पुढें न येण्याचा बंदोबस्त वरून करून रोखून पुढें येऊं देत नाहीं.' ४. 'बोलविल्यावरि'. ५. 'सांगितलेप्रमाणें', ६. 'उघडीत', 'उघडीतना', ७. 'करवावें' ८. 'मुसेंखोरें',

ठरावून, आपणापाशीं आणून कसेंही करून निरोप न देतां गोवून ठेवावें. सफाईनें चालिल्यासि[1] इकडीलच मातबर कामें सांगावीं. किंवा[2] शिवाजी दगाबाज हुनरी आहे, कोठेंही अंतर पाहून करूं[3] येईल तसा विचार करावा. उगेच मसलत लांबवून सरदार फौज पाठविणें, खासा स्वारी करणें, हें या करण्यांनीं घडत नाहीं, " म्हणोन सर्व तहनामा, जयशिंग यांणीं लिहिलेप्रमाणें, 'चौथ, सरदेशमुखी बिजापुरी प्रांत तालुके व त्या लगत किल्ले कोट करार करून, जंजिरे याचें कलम गाळून, 'हें बोलूं नये;[4]" असें करून 'सत्तावीस किल्ले व तो प्रांत सोडावा; पादशाही उमराव म्हणवून[5] येथें भेटून रुजू होऊन सर्फराज होऊन जावें, ऐसें ठरवून यादीवर स्वाल[5] व सनदा करून[5] जयशिंग यांजकडे रवाना केलें. 'तुम्हीं बाहादार[6] होऊन खातरजमा करून रवाना करावें,' लिहिलें. वकील गेलेयाचीं पत्रें रवाना करविलीं. तीं जयशिंग यांजपाशीं येऊन पावलीं. यावर त्यांणीं पंडितराव यांस बोलावून घेऊन महाराजांकडे सर्व रवाना केलें. ते घेऊन आले आणि दिल्लीस जाण्याचा विचार पक्केपणें ठरावांत आला.

**'कसाही प्रसंग पडलिया निभाऊन येऊं!'**

याजवरून कारभारी मातबर या सर्वांस विचार पडला जे, "हें कर्म दुर्घट दिसतें. दिल्ली म्हणजे दोन महिन्यांची वाट, स्वदेश नव्हे, तेथें जाणें! औरंगजेब केवळ दैत्य होय! हें संकट कसें निभावेल?" ऐसा विचारही कोण्ही कोण्ही महाराजांस सांगूं लागले. महाराजांनीं उत्तर केलें कीं, "एक वेळ दिल्लीस जाणेंच प्राप्त. श्रींनींही जाणें घडेल, परतोन[7] निभावून आणीन, आज्ञा केली आहे. तो प्रांत, दिल्लीचें स्थान व पूर्वील आपले वडिलांनीं उत्तरप्रांतीं राज्यें केलीं ती जागा अवलोकन तरी करावी. आणि त्या प्रांतीं भागीरथीं, यमुना हीं तीर्थें करावीं. बाहादारही बळकट आहेत. पादशाही तहनामे करार होऊन आले. यांत आपणांस चौथ, सरदेशमुखी हे राज्यविभाग असे कायम जाले. पुढें श्रीहरि करणार तसें घडेल. कसाही प्रसंग पडलिया कळेल तसें निभाऊन येऊं." ऐसा सिध्धांत करून सर्वांस सांगितलें आणि 'जावें' हाच विचार सबल पक्ष ठरविला. देशीं जिजाबाईसाहेब व राजारामसाहेब यांस ठेविलें. मोरोपंडित पेशवे, आण्णाजी दत्तो सुरनीस व निळो सोनदेव मजमदार हे तीन सर्वाध्यक्ष नेमून यांचे स्वाधीन राज्य करून रायगड प्रांतांत ठेविले. आपण बराबर संभाजी राजे घेतले. कारभारी निराजी रावजी न्यायाधीश, बाळाजी आवजी चिटणीस, त्रिंबक सोनदेव डबीर, जीवनराव माणको, नरहर बल्लाळ सबनीस, दत्ताजी त्रिंबक,[8] राघो मित्र, प्रतापराव गुजर सरनोबत, दावजी गाढवे, हिरोजी फर्जंद वगैरे

१. 'चाललेस', २. 'कीं', ३. 'करून'. ४. 'म्हणून' ५.५. 'स्वाद करून सनदी करून' ६. 'बहादर' ७. 'परंतु' ८. 'दत्ताजी गंगाजी'

कित्येक मातबर सरदार विश्वासू घेतले. पांच चार हजार पागा चांगली निवड करून घेतली व फौज पांच हजार घेतली.[1] त्यांत हषमी सरदार कंक,[2] मालुसरे, देशपांडे ऐसे घेतले. सर्व राज्याचा बंदोबस्त 'पूर्वी धारे करून दिल्हे याप्रमाणें चालावें' ऐसें करून देऊन सर्व फौज व पागा हषम लोक राज्यरक्षणास ठेविले. "तिकडे कसाही प्रसंग पडिला असतां तुम्ही जवांमर्दीनें राजारामसाहेबांस घेऊन राज्य रक्षावें," ऐसें पेशवे, मजमदार, सुरनीस यांस सांगोन आपण औरंगाबादेस आले. जयसिंग यांची भेटी जाली. बोलणीं होऊन त्यांणीं बाहादार उभयतांनीं या प्रांतींच राहावें ऐसें ठरोन रामशिंग—त्यांचे पुत्र, चार हजार फौजेनिशीं बराबर दिल्हे. ते व महाराज निघोन दरमजल नर्मदा चंबळ उतरून मथुरेस पावले.

### हेतुपूर्वक अपकुशन करणारा ब्राह्मण

रामशिंग यांणीं राजे यांस घेऊन आल्याचें वृत्त पुढें पादशाहांस लेहून पाठविलें. त्यांणीं मुक्कामाचे मुक्कामास सर्व बंदोबस्त आदरेंकरून निखालसतेनें करविला. शिवाजी राजे कसेही येऊन भेटावे हेंच मानस. राजे मथुरेस गेले ते कांहीं दिवस गोकुल-वृंदावन करून नंतर निघतेसमयीं मथुरेचे चोबा ब्राह्मण एकटां पुढें आला. हत्तीवर बसावें तों अवलोकन केला. त्यास महाराज बोलले, "बेवकूब ब्राह्मण ! समय न पाहातां आला!" उत्संगळ शब्द ब्राह्मणास महाराजांचे मुखांतून निघाला. तो ब्राह्मणानें ऐकून प्रतिशब्द तसाच देऊन, "मी नव्हे, राजा, तूंच तसा होस!" म्हटलें. तेव्हां त्यास पुढें बोलावून, हातीं धरून, "आम्ही तुम्हांस बोललों, हे क्षमा करावी" म्हणोन गौरवून विचारिलें जे, "तुम्ही आम्हांस असें कां बोललां?" यांणीं उत्तर केलें, "आम्ही प्रमाण बोललों व तुम्ही बोललां तेंही योग्यच. असे समयीं आम्हीं पुढें येऊं नये, परंतु अकस्मात् आलों. आम्ही बोललों कसें, तरि दिल्लीश्वर केवळ रावण व ऐसा क्रूर होय! त्याचे भेटीस तुम्ही मोठा प्रताप करून, त्याचें राज्य घेऊन थोडके फौजेनिशीं जातां, आणि पुत्रही समागमें नेतां, हा कोण विचार केलात? चांगलें नाहीं." असें म्हणतां त्याचे बोलण्यास बहुत चांगलें ऐसें मानून त्याचा सन्मान वस्त्रें-द्रव्येंकरून केला आणि तेथील उपाध्यिक[3] त्यास दिलें. दरसाल पांचशें रुपये वार्षिक करून दिल्हें. त्याचा गांव त्या प्रांतींच लावून दिला. रामशिंग यांस सांगून चालावा ऐसें केलें. तो अद्यापि चालत आहे. नंतर त्यासही समागमें घेऊन दरमजल दिल्लीस गेले. जाऊन पावलियावरि रामशिंग यांणें पादशाहास भेटून राजे आले येविषयीं अर्ज केला. त्याजवरून 'दिवस मुहूर्त चांगला पाहून भेटीस आणावें,' सांगितलें. त्याप्रमाणें उत्तम दिवस पाहून भेटीस नेले.

---

१. 'घेतले' २. 'लोक' ३. 'उपाध्येपण'

## कुर्नीस केली नाहीं.

ते दिवशीं पादशाहांनीं बहुत तरतुदीनें अदालत मजालस करून सर्व वजीर, बक्षी, व उमराव मातबर जमा करून यास नेलें. भेटीस जाण्यापूर्वीं नजर करणें, कुरनिशात[१] व दाब-आदाब[१] बजावणें पादशाही कायदे सर्व रामशिंग यांणीं सांगून ठेविले जे "प्रसंगीं तुम्ही येथें आलां तेव्हां येथील रंग राखून, आपले मतलब सिद्ध करून देशीं जावें हें उत्तम!" ऐसें बहुत रीतीनें सांगून ठेविलें. 'बरें' बोलले असतां, भेटीस गेलियावरि 'यवनास भुईस हात लाऊन सलाम करणें हें काय?' हे ईर्षा मनात येऊन बावरेपणें रामशिंगानीं सांगितला मार्ग सर्व सोडिला आणि कुर्नीस केली नाहीं. हें रामशिंगानीं पाहून, नजर घेऊन, आपण पुढें होऊन, [ रामशिंग याणींच ] केली. उजवे बाजूस अमीर [ उभे ] होते, त्यांत उभे राहण्यास हातानें पादशाहानीं दाखविलें. त्याजरून खान व रोहिले वजीर राजे मारवाडकर जसवंतशिंग यांचे वरते जाऊन उभें राहावें[२], ते बसले. हें रामशिंग याणीं पाहातांच आपण पुढें होऊन उभे राहिले. तेव्हां पादशाहानीं खुणेनें विचारिलें. [ तेव्हां रामशिंग बोललें ] "दक्षणी राजे होत, अदालत कधींच पाहिली नाहीं." ऐसें बोलले. ते समयीं पादशाहानीं मनांत आणिलें जे, 'कुलूब[३] खंबीरच हा होय.' म्हणून तोंडास रुमाल लावून किंचित् हास्य करून आश्चर्य केलें आणि सन्मानरीतीप्रमाणें 'कधीं आलां? काय खबर आहे?' हे प्रश्न केले. यांणींही उत्तरें समर्पक केलीं. विरस[४] न दाखवितां[४] सन्मानें करून बोलोन डेरियास जाण्यास निरोप, विडे देऊन दिला. खर्चास व मेजवानी पाठविली. फौजसुद्धां अजमास करून दरमहा बांधून देविला. रामशिंग बराबर डेरियास घेऊन आले. "येथें आलां, तेव्हां फार विचारें चालावें, केली ही गोष्ट पूर्वीं आपण सांगितलें असतां कशी केलीत?" ऐसें बहुत प्रकारें ममतेचे अर्थें सांगून हवेलीस निघोन गेले. याजवरि[५] कांहीं दिवशीं पादशाहांनीं यांस राहाण्यास, हवेलींत राहावें[५] व फौजही आसपास जवळ उतरावी ऐसें ठिकाण, हवेली योजून देवविली. तेथें आपले सलतनतेनिशीं जाऊन राहिले.

## फंद करतील ही बादशहास भीति!

त्याजउपरि रामशिंग मधेस्त[६] याजपाशीं "करार यादीबुदी जाल्यावरून देशींहून आलों, येण्याचें मानस तसें केलें, इकडील हवा मानत नाहीं, यास्तव कराराप्रमाणें करून देऊन, तिकडील कार्यभाग[७] सांगणें ते सांगून निरोप देववावा" हें बोलणें

१. 'खुरनिषाद आदाब बजावणें' २. 'न राहतां' ३. 'पुरुष', 'कुरूप' ४. ४. 'सनदा दाखवता' ५. ५. 'त्यांजवर महाराज कांहीं दिवस पादशाहानें हवेलींत राहावें' ६. 'मध्यस्थ', 'मध्यस्थी' ७. 'काय'

लाविलें. 'बरें आहे' असें पादशाह बोलले, आणि "राजे यांणीं आम्हांपाशीं असावें, मोठीं मोठीं कार्यें करावीं, सर्फराजी अधिक करून घ्यावी, जाण्याची तातड कां करितात? त्यांचे मतलब करार तर होऊन गेले आहेतच," असें उत्तर जालें. नंतर राजे यांणीं वरकड वजीर मातबर यांच्या भेटी घेण्याविषयीं विचारिलें. ते परवानगी जाली. ज्यांचे घरीं जाणें योग्य, त्यांच्या भेटी घरीं जाणेंयेणें केलेयावरि रामशिंग यांजपासून बोलविलें जे, "राजे यांचें म्हणणें प्रमाणें* आलों, कराराप्रमाणें मतलब कागदपत्र होऊन निरोप द्यावा.[1] पुन्हां जे समयीं प्रसंग, उपयोग काम पडेल ते समयीं पत्रें येतील तेव्हां पाहिजे सामान तसें घेऊन. येऊन कामगिरी[2] असल्यास बजावूं," ऐसें बोलणें लाविलें. पादशाहानें ऐकोन घेतलें, आणि मनांत आणिलें जे, "प्रथम भेटीस[3] यांणीं कुरनीस, दाब–आदाब न केली, व पुढेंही येथें राहून स्वच्छतेनें[4] नौकर म्हणवून चाकरी करावी, हुकुमांत[5] चालावें असें होईल हें दिसत नाहीं; वरकड बहुत योग्य, मर्द व शिपाई, मनसबेदार,[6] धाडसाचे माणूस, सर्वगुणसंपन्न, दैववान पुरुष. आपले हातीं लागून, हुकमांत चालून निखालसता जालियास वजिरी देऊन सर्व राज्यभार यांजवर ठेवावा ऐसी योग्यता याची आहे. निरोप दिला असतां जाऊन फंद करण्यास चुकावयाचे नाहींत, कसेंही येथें ममतेंत गोंवून ज्या रीतीनें येतील तसे आणावे. करार व तह ठरला, बाहादारही मोठे दिले, त्याअर्थी [ आपण ] वावगी गोष्ट करणें युक्त नाहीं. ममतेंनें व बोलण्यानें हातास लागले तरि घ्यावे, नाहीं तरि दाब ठेवून तरी हातीं घ्यावे. निरोप देणें ठीक नाहीं." ऐसें दृढनिश्चयांत आणून रामशिंग याजपासून सांगितलें जे, "राजे आले, मोठे कर्ते शिपाई आणि मनसब्यानीं, चतुरतेनें सर्व गुणें योग्य.[7] यांसि चाकर म्हणवून. तिकडील जाहागीर आहे ते राखून. इकडेही करोडों रुपयांचा तालुका स्वाधीन करितां येईल. लाख पन्नास हजार फौज बाळगून आम्हांजवळ या प्रांतींच राहून कामें काजें करावीं. तिकडेही पुत्र ठेवून चालवावें. तिकडील पादशाहातींत बंडें वाढलीं तीं मोडावीं. तो तालुका व इकडील[8] घेऊन त्यांचा [ व ] फौजेचा बेहडा करून घ्यावा. चाकर म्हणवून सर्फराजी करून घ्यावी. यांत सफाई दिसलियावरि वजिरीही यांस सांगावी, सर्व इतबार ठेवावा ऐसें आमचे चित्तीं आहे व या कामास लायखही राजे आहेत. यास्तव तुम्ही कसेही उपायें राजे यांस या मतलबावरि आणावें."

### जाफरखानाशीं संधान

याजवरून रामशिंग यांणें सर्व वृत्त सांगितलें. यांची खंबिरी[10] [ अशी कीं ]

---

* 'प्रथम' १. 'घ्यावा' २. 'कामगारी' ३. 'भेटींत', 'भेटीं'
४. 'स्वस्थतेनें' ५. 'हुकूममात्र' ६.'मनसबदार' ७. 'संपन्न' ८.'यांणीं'
९. 'वाईकडील' १०. 'याची खंबीर'

"या प्रांतीं राहाणें व इकडील दौलत घेणें घडावयाचें नाहीं. मतलब करारांत आले ते करून देऊन त्या प्रांतीं सुभे आहेत त्यांसहवर्तमान तिकडील कामगिरी सांगावी. ती बजावून देऊन." ऐशींच बोलणीं पडत गेलियावरून "शिवाजीची खंबीर ढळत नाहीं, हातीं लागत नाहीं, कसें करावें," हाच विचार करिते जाले. "ऐकत नाहीं त्याअर्थीं दाबूनही पाहावें," म्हणून एके दिवशीं जाफरखान अमीर पादशाहाचे केवळ इतबारी, खिलोणें[1] जवळ होते, त्याजपाशीं खुलासा निघाला जे, राजे कुरनूश करीत नाहींत व हुजूर चाकरी करून राहात नाहींत. बहुत खंदेपणा जात नाहीं. त्या अर्थीं जरब देणें प्राप्त," ऐसें रोषयुक्त बोलणें पडलें. ते समयीं जाफरखान, शास्ताखान यांचे आप्त, याजमुळें पादशाहाची मर्जी पाहून अधिकच चढीं देऊन बोलले. हे बातमी राजे यांस लागली[2] तेव्हां जाफरखान यांचे हवेलीस जाऊन, त्यांस कित्येक अर्थ ममतेचे; "तुम्ही पादशाहापाशीं बहुत लगत व मेहेर-बानींत आहां; आमचें साहित्य करीत असावें," बोलले असतां त्यांणीं मनावरतें 'बरें' म्हणोन, महाराजांचा संशय, काय करितील हा दाब भेटण्यांत बसण्यांत वाटून[3] गांठ सोडोन, निरोप वस्त्रें देऊन लावून दिल्हें.

### चौक्या, पहारे, कैद : रामसिंगाची मधेस्ती

पुन्हां पादशापाशीं बोलण्याविषयीं रामसिंगास महाराजांनीं सांगून बोलविलें जे, "दक्षणची मसलत सर्व आपणांस सांगावी, येथून मर्जी असल्यास फौज सामान द्यावें, किंवा तिकडे जयसिंगास हुकूम करावा. ते व आपण मिळोन सर्व दक्षण काबीज करून देतों," ऐसें बोलविलें असतां पादशहाचे मनांत प्रशस्त न पडे. अधिकच संशय वाटूं[4] लागला. आणि करार शपथ दिल्ही व बाहादार दिल्हे हे अडचण, तेव्हां केवळ बेमानी दाखविणें चांगलें नाहीं. परंतु जरब देऊन आपले मनांत तसे पल्ल्यावर आणावे म्हणून पोलादखान यांसि हुकूम केला जे, "राजे यांचे मोकाबल्यानीं तुम्ही आपली फौज पंचवीस हजार घेऊन, लोक सुद्धां उतरोन चौकी द्यावी, आणि हुकुमाशिवाय बाहेर जाणेंयेणें न घडे ऐसें करावें," म्हणून[5] चौक्या पाठविल्या ते भोंवतें दुरून येऊन उतरले. हें राजे यांस समजल्यावरि रामसिंग यांस सांगून पाठविलें, "तुम्हीं बाहादार असून हे गोष्ट काय आहे? अर्ज करावा. पादशाहाची मर्जी आम्ही येथेंच असावेंशी दिसती. ते आम्हांस मान्य आहे," ऐसें बोलविलें. तेव्हां त्याणीं अर्ज केला. ते समयीं [ बादशाहानीं ] "राजे यांचें अंतःकरण शुद्ध होऊन, हुजूर राहून; चाकरी मोठे इतबाराची करावी. तें ऐकत नाहींत, यास्तव हें करणें प्राप्त पडलें. वरकड तुम्ही या पल्ल्यावर[6] आणावें. या

---

१. 'खिलावणें' २. 'कळलीं' ३. 'वाढवून' ४. 'वाढूं' ५. 'ऐसें सांगून' ६. 'आपल्या बोलण्यांवर'

पल्ल्यास येत तों[1] हेंच करावयाचें. वरकड जयशिंग राजे व दिलेलखान बाहादार असून सरकारी करारनामें गुंतले आहेत. राजे यांस वांकडें करणें तरि पारिपत्य करण्यास काय गुंता होता? परंतु ते गोष्ट करावयाची नाहीं. तुम्हीही सुभेदार यांस लिहून राजे निखालस पक्केपणें होऊन सरकार-आज्ञेंत चालत ऐसें त्यांणींही लेंहून सांगून करावें," म्हणून सांगितलें. तें शिंग यांणीं राजे यास येऊन कळविलें.

## सरनोबत, सरदार वगैरे लोकांस निरोप

ते समयीं राजे यांनीं शिंग यांस सांगितलें जे, "आम्हांस पादशाहाची मर्जी अशी आहे त्या अर्थी आम्ही येथेंच राहातों. जेव्हां निखालसता पडत जाईल तेव्हां तसेंच कामकाजही करितां येईल. परंतु चिरंजिवास व फौजेस इकडील हवा मानवत नाहीं, यास्तव निरोप देववावा. कार्याकारण माणसें ठेवून घेणें तें घेतों. बाकी लावून देतों." त्याजवरून पादशाहास विचारिलें. त्यांणीं "लोक फौज जाऊं देणें हें सहजांत काम होतें, हालकूद[2] होतात, त्या अर्थी निरोप द्यावा" सांगितलें. पुत्रास लावून देणें ते "तिकडे जाऊन फंद न करितसे जिम्मेदार मधेस्त देऊन रवाना करावे," ऐसें बोलले. तें शिंग यांणीं सांगितल्यावरि "जिम्मेदार देणें कशास? व आम्हांस या प्रांतीं कोण जिम्मेदार होतो? पादशाहाची मर्जी तसे उभयतांही राहातों." म्हणून शागीर्दपेशा, कांहीं पागा कार्याकारण ठेवून, हषमपैकीं कांहीं सरदार ठेवून, कारभारी मंडळी ठेविली. वरकड कारकून, पागा, फौज सर्व प्रतापराव गुजर सरनोबत, दत्तो मंगाजी, त्र्यंबकराव वाकनीस यांजबराबर जावे, चांगलीं घोडीं हत्ती वगैरे जावे" सांगितलें. त्यांणीं जातां आड घातली, "साहेबांसाठीं प्राण गेले तरी जावोत, परंतु टाकून जाणें[3] घडणार नाहीं.[3]" ऐसा सरनोबत, सरदार व लोक यांचा निश्चय जाणून सर्वांचे समाधान करून, प्रतापराव यांस "हा प्रसंग ऐसेच रीतीनें, मोठे हुनरें यांतून बचावून जाण्याचा आहे, समजोन तुम्हांस निरोप दिल्हा. याजकरितां 'जावें' सांगितलें. याजवरून देशीं सर्वांस लावून दिलें. आणि प्रधान वगैरे कारभारी यांस सांगावें, "ते व तुम्हीं बहुत खबरदारीनें रहावें, आम्हांविषयीं काडीमात्र चिंता करूं नये व जिजाबाईसाहेब यांसही समाधान करून सांगावें," ऐसें सांगून लावून दिल्हें.

## मिठाईच्या डाल्या भरून पाठविण्याचा बाहाणा

त्याजवर विचार चित्तांत केला जे, "या संकटांतून पार कसें पडावें? पादशाहाचें म्हणणें तसें इमान प्रमाण देऊन; आपण अवलंबिलेला मार्ग यवनांचें अन्न न घेणें, धर्मस्थापना करणें तें सारे सोडून; त्यांचे म्हणवून त्यांजवळ वजिरी व दौलत मेळवून राहावें; किंवा मोठें धाडसें, हुनरेंकरून यांतून बचावून

---

१. 'येईतों' २. 'हाल खूप', ३.३. 'जाणार नाहीं'

जाण्याचा समय आहे तसें करून आपले संकल्प सिद्धीस न्यावे; तरिच[१] [तें] घडेल.[१] त्या अर्थी आपणांस तरि प्राणही गेले असतां [हा] संकल्प सोडावयाचा नाहीं. यास्तव जाहांबाजीनें, श्रीवर भार ठेवून, पार पडावें" हाच निश्चय करून, 'आठा दिवशीं आपले गुरुवारचा उत्साह करितों' ऐसें करून सर्वांस मिठाईच्या डाल्या भरून पाठवाव्या असा बाहाना[२] निर्माण करून पाठवूं लागले. मिठाईच्या डाल्या कशाच्या[३] जातात ऐसा चौकीस संदेह जाला. यावरून चौकशी केली. एक, दोन, चार वेळ पाहिलें असतां मिठाईच जाती, डाल्या, बहंग्या भरून जातात, हें कळोन चौकशी पहारेकऱ्यांनीं[४] सोडिले. आणि महाराजांची दिनचर्या व बारीक बातमी, काय उमेद, पल्यावर येतात न येतात, हे पादशाहानीं ठेविली होतीं. ते पादशाहास राजे राहाण्याचा निश्चय करून, निखालसता होऊन, आपण इकडील चाकरी चाकर म्हणून करावी, मनसब दौलत मेळवावी, बहुतच निष्ठेनें चालावें, ऐसें खबिरांत आलें असें दिसोन बातमी जाण्याजोगें बोलणें करण्यांत निःसीम डौल महाराज दाखवूं लागले.

### मारुतीनें लंकेत जाऊन जशी ख्याति केली...

जयशिंग व रामशिंग यांनीं शपथपूर्वक बाहादार होऊन आणिलें असतां, पादशाहांनीं बेइमानी नजर धरली. याजवरून त्यांनीं महाराजांशीं अंतरंगापासून दुसरा विचार ठेविला नाहीं. सर्व बातमी राखणें व बाहेरून राखण करणें,[५] खर्चास पावतें करणें, पादशाहाशींही बोलणें वगैरे सर्व ते करिते जाले. त्याजवर महाराजांनीं चौकीचे लोक यांसि बहुत सफाई दाखविणें, आदर करून बोलणें, मेजवान्या करणें, वस्त्र द्रव्य देणें, जवळ बोलावणें, ताजीम-नवाजू, विडे-पान करून, आपलेसे करून, त्यांत बोलणें पादशाहास उत्कंठेनेंच सफाई दिसोन कृपा कधीं करतील, असेंच [महाराज] दाखविते जाले. ह्या बातम्या वरचेवरि पादशाहासही कळत गेल्या. ऐसें दृढ[६] जालियावरि आपले कारभारी लोक इतबारीसुद्धां निघण्याचा बेत सिद्ध केला. ज्या मार्गेकरून जाणें व तीर्थें करणें तीं तीं मोठीं शहरें व क्षेत्रें येथें हुंड्या करून सावकारींत द्रव्य श्रीकाशीसुद्धां जागां[७] जागां[७] रवाना केलें. फौज पागा, लोक आधीं रवाना केले होते. व दिल्लींत राहिले लोक यांत कोण्हास दुखणें, कोण्ही चाकरी टाकिली, कोण्ही उठोन गेले, ऐसें करून संकेत करून त्यांतही देशीं जाणार, व पाठवणें, त्यांस जावयास सांगितलें. केवळ बराबरच निभावावयाजोगे व घ्यावयाचे त्यांचे संकेत सांगून पडद्यांनीं अमके स्थळीं राहावें ऐसे ठेविले. कांहीं रामशिंग याचे आश्रयेंकरून घालविले. आणि देशचे लोक राहात नाहींत, उठोन जातात,

१. १. 'हा विचार पडला' २. 'भाहाना', 'बहाणा' ३. 'कशा' ४. 'करणें' ५. 'राखणें' ६. 'तयारी' ७.७. 'जातां जातां'

ऐसें दाखवून, राहिले तेही युक्तीनें हलके केले. नंतर शहरचे लोक शागीर्दपेशास वगैरे दोन-चारशें ठेविले. यांणीं दुरोन असोन चाकरी करावीसें केलें. आपले शरीरास आराम नाहीं हा बाहाना करून आपण निजले. प्रहर साहा घटका दिवस येईतों निजावें, बहुत करून आंतच गैरराबत्यांत राहावें ऐसें करूं लागले. राबता गैरराबता ऐसें आठ पंधरा दिवस करून दाखवून कामकाजाशाठीं कारकून, कारभारी हुजरे लोक जाणें येणें तसे वेतांनीं सारे बाहेर काढिले. श्रीमारुतीनें लंकेंत जाऊन जशीं ख्याति केली, सीताशुद्धि घेऊन निघोन गेले, तसें आपण युक्तिकरून जाहांबाजीनें हुनर करून पादशाहास दगा देऊन जावें, म्हणून श्रीदेवीस प्रार्थना केली. देवीनेंही आश्वासन दिलें, "निघणें, निभावून नेईन," ऐसा स्वप्नगत दृष्टांत होऊन सांगितलें. यांवरि सर्वांस आर्वी काढून दिलें. त्यांणीं अमके पुऱ्यांत जाऊन गुप्तरूपें असावें, हे जागा‡ वगैरे आधींच निश्चयांत आणिलें. तेथें सर्व पोहोंचले, अशी बातमी आणून आपण खासा व संभाजीराजे पेटारियांत बसोन गुजरीचे वेळेस मिठाईच्या वंग्या जातात म्हणून त्यांत निघाले. पलंगावरि खासा पोषाख तसाच ठेवून हिरोजी फर्जंद यास बेत सांगितला कीं, "तूं पलंगावरि रजईची वळकटी करून, निजले आहेतसे दाखवून बुक्या मारीत बसावें. मध्यरात्रीनंतर निघोन अमके स्थळीं येऊन पोहोंचावें." याप्रमाणें तो पलंगापाशीं बुक्या देत खोलींत बसला. "महाराजांनीं जावें, मागें आपणांस जसें पडेल तसें पडो, महाराजांचे कृपें आपणही निघोन येतों," म्हणून राहिला. प्रातःकाळ जाला, चार घटका दिवस आला. "महाराजांस निद्रा लागली आहे, गुल करूं नका," ऐशी ताकीद करून आपणही निघोन 'कामास जातों,'[१] म्हणोन ठिकाणास गेला. महाराज व सर्व निघाले ते शहरचे पश्चिमेस पुरा बाहेर होता तेथें बेताप्रमाणें सर्व एक होऊन, आठ चार दिवस वेष पालटून, जागां जागां फुटून, कोण्ही बैरागी, कोण्ही गोसांवी ऐसे होऊन, ब्राह्मण वाणी[२] शूद्र वैश्य[३] ऐसे करून[४] राहिले.

## राजे निघोन दग्यानीं गेले !

इकडे प्रहर दिवस आला, हालचाल नाहीं, ऐसें पाहून शहरचा शागीर्दपेशा नवा[५] ठेविला ते चौकीचे लोक पाहतात तो राजे नाहींत ! तों कारभारी आदिकरून कोण्हीच नाहींसें पाहून गुल केली. चौकशी करितां 'निघोन गेले, नाहींत !!' असें समजून पोलादखान यास समजाविलें. त्यांणीं पादशाहास जाऊन अर्ज केला जे, "राजे निघोन दग्यानीं गेले." हें पादशाहास कळलियावरि त्याची पोलादखान याजवरि इतराजी होऊन, मनसब जपत करून चौकी बसविली व राजे निघाले ते

‡ 'जागे' १. 'कामाहून येतों' २. 'यांणीं' ३. 'शूद्रवेश' ४. 'वेश घरून' ५. 'नांव'

रामशिंग याचेच सलेनीं निघाले असतील हा संशय धरिला. तो रामशिंग याणेंही अर्ज केला जे, "शिवाजी राजे निघोन गेले. आपण शपथ देऊन आणिले असतां हजरतीनें चौकी पाठविली, दस्त केलें. मर्जी सरकारची!!" बोलले. तेव्हां "काय चिंता ? राजे जातील तेथें पारिपत्य करीन. तुम्ही मधेस्त[1] म्हणून इतकी सबुरी केली," ऐसें म्हणून शहरांतही चौकशी करविली. तमाम तालुकेदारांस पत्रें पाठविलीं, "जेथें राजे सांपडतील तेथें दस्त करावे" व मार्गांनींही लोक रवाना केले. परंतु शोध न लागे. तेव्हां[2] हरिफाई करून निघोन गेले हे मनांत शाहा अपूर्व मानिते जाले.

## संभाजीराजांना मथुरेंत ठेविले.

[ इकडे ] महाराज आठचार दिवस नानाप्रकारचे वेशें राहून[3] तेथून पुढें मथुरेस रवाना झाले, आणि दहावीस असामी कारभारी व हुजरे सरदार इतके एकजिवाचे बैरागी होऊन मथुरेस जाऊन पावले. तेथून देशीं जाणें ठीक नाहीं; चौकशी बहुत चालली आहे. निभाव पडणार नाहीं; आपणांस यात्रा भागीरथी, काशी वगैरे करणें; संभाजीराजे लहान, त्यांचा पायीं निभाव पडणार नाहीं; म्हणून मथुरेंत काशीपंत व कृष्णाजीपंत व विसाजीपंत त्रिवर्ग बन्धु, देशस्थ ब्राह्मण, मोरोपंत पेशवे यांचे आप्त, विश्वासू, रोजगारी तेथें होते, त्यांचेजवळ मथुरे उपाध्ये यांचे विचारें ठेवून, आम्ही अमके मार्गी जाणार तें न समजों देतां, आम्ही अमूक स्थळीं आलियावरि सांगून पाठवूं, तेथें[4] घेऊन यावें[4] असें सांगून ब्राह्मणाचा वेष संभाजी राजे यांस देऊन गुप्तरूपें ठेविलें. समागमें विसाजीपंत व चोबे उपाध्ये यांस घेतलें.

## म्हातारीस आश्वासन : तसेंच वेशेंकरून राजगडास आले.

आपण सर्व मंडळीसह बैराग्याचे वेश धारण केले होते, तसेच बैराग्यांचे मेळ्यांत मिळोन तेथून कुरुक्षेत्रास गेले. तेथून उत्तरमानस, हरिद्वार करून, गंडकी, अयोध्या दर्शन करून, श्रीकाशी व प्रयाग हे यात्रा करून गयेस आले. तेथें गयावर्जन केलें. निघतां श्रीविष्णुपदावरि मोहोरा घालून, पद भरून गुप्तरूपें निघाले. त्रिस्थली यात्रा, कार्तिकस्नानें माघस्नानें सांग करून बराबरचे सर्व [ लोक ] यांजपासून यात्रा[5] वगैरे करवून, देवगड चांदें येथें येऊन, श्रीगंगातीरींचीं क्षेत्रें करीत करीत उत्तरमानस[2] करून दक्षिणमानसीं सुरक्षित वीस बवीस महिनियांत[6] पावले. महाराज पुण्यश्लोक, त्याप्रमाणें पुण्यक्षेत्रें यात्रा व देवदर्शन[7] घेऊन निभावून आले.

१. 'मध्यें' 'मध्यस्थ' २. 'येथें' ३. 'धरून कांहीं' ४.४. 'घेऊन जाऊं.' ५ 'गयावर्जन' ६ 'मानस' ७ 'महिन्यांनीं'

गंगातीरीं मंथनकालेश्वरादि करून कुशतर्पणास आले. तीर्थविधि केला. तेथून पुढें एके गांवीं येऊन राहिले. त्या गांवीं गरीब एक कुळवाडी होता, त्याचे गोठ्यांत राहिले. त्याची आई वृद्ध होती, ती स्वाभाविकपणें, " तुम्ही वैरागी आलां, अन्न द्यावें, परंतु गांवीं देशींची फौज येऊन गांव लुटून नेला. काय करावें ? " ऐशी बोललियावरि यांणीं ' देशींची फौज कोणकोणाची आली ? ' विचारलियावरि " शिवाजी राजा याचा तेलंगराव सरदार फौजा घेऊन आला, गांव लुटला. शिवाजी राजा दिल्लीस गेला, त्यास पादशाहानें पारिपत्य कां अद्यापि न केलें ? आम्हां गरिबांस बहुत उपद्रव होतो. " असें बोललियावरि महाराज मनीं फार समाधान पावले जे, " आपण विदेशीं गेलों असतां प्रसंगेंकरून मोठे संकटांत पडलों, देवानें निभावून हे दिवस दाखविले. प्रमाण. परंतु आम्ही नसतां आम्हांप्रमाणें राज्य रक्षून सर्वांवर दाब आहे. अम्मल उगवितात तेव्हां बहुत‡ केली. " [ असें ] मानून तिजला आश्वासन दिलें कीं, ' तुझें बरें होईल. तुझें नांव काय ? वतन[१] वगैरे विचारून घेतलें. तेथून भागानगरचे तालुक्यांतून विजापूरचे इतल्ल्यांतून महाराज जवळ देशीं येऊन पन्हाळा प्रांतीं आलियावरि सांगून पाठविलें आणि आपण तसेच वेशेंकरून राजगडास येऊन पावले. मातुश्रीचें दर्शन घेतलें. शके १५८८, पराभवनाम संवत्सरे, मार्गशीर्ष वद्य दशमीस आले. तें समयीं बहुत आनंद होऊन कुरवंड्या व दानधर्म, साखरा वाटणें वगैरे मातुश्रीनीं करऊन सर्वांसह मंगलस्नानें करविलीं. तोफांची सरबत्ती केली. [ महाराजांनीं ] वस्त्रें भूषणें सर्वांसह परिधान केलीं.

### महोत्साह : बरोबरीचे यांचा गौरव, नेमणुका

हें वर्तमान सर्वांस[१] राज्यांत महाराज येऊन पावले ऐसें कळतांच तमाम सरकारकून व सरदार, सुभेदार व कारखानदार व दैशिक[२] व ग्रामिक[३] लोक व उदमी सावकार सर्व दर्शनास येते[४] जाले.[४] आणि सर्वांनीं नजरा व पोषाख व आपले तालुकियांतील उत्तम पदार्थ जिन्नस उपायनें नजरा घेऊन येऊन भेटले. सतके महाराजांवरून केले. ऐसा मोठा उत्साहसमारंभ होता जाला. किल्लोंकिल्लियांस तोफा-सरबत्ती केली. लोक आले त्यांचे गौरव भाषण-अवलोकनेंकरून योग्यतेनुरूप महाराजानीं सर्वांचे केले. मोठे संकटांतून निभावून महाराज देशीं आले. उत्साह करून[५] दानधर्मही बहुत केला. बराबर गेले होते त्यांस श्रमसाहस ज्यांणीं जसें केलें त्यांस त्याप्रमाणें गौरव व नावाजिसी करून तैनाता जाजती व पोषाख जवाहीर देणें, पालख्या, हत्ती, घोडे वगैरे देणें तसें दिल्हें. महाल गांवही दिल्हे. निराजी रावजी न्यायाधीश व त्रिंबक सोनदेव डबीर व बाळाजी आवजी चिटणीस यांस तिघांची तारीफ करून[६]

‡ ' बरे ' १. ' सर्व ' २. ' देशक ' ३. ' ग्रामक ' ४.४. ' आले "
५. ' सर्वांस जाला.' ६. ' केली, '

तुम्हीं§ सेवा बहुत केली. मोठें कारस्थान, उपयोगीं पडले म्हणून बहुत कृपा करून अंतरंगांत ठेविले. शिवाय आणखी कारकून, सरदार, हुजरे वीस पंचवीस असामी यांनीं दिल्लीस व यात्रेबराबर सेवा केली त्यांस बहुत सर्फराज केलें व वाढविलें. हिरोजी फर्जंद यास पालखी व बक्षीस घेऊन वाढविलें. पागा-सरदारी दिली. आणि त्रिंबक वगैरे किल्ले तहामध्यें सोडिले होते, त्यास पेशवे यांस ते किल्ले प्रांत घ्यावा म्हणून रवाना केलें. फौज पागासुद्धां जाऊन चहूं महिन्यांत सोडवून, फते करून, प्रांतसुद्धां अम्मल बसविला. चाकण वगैरे ठाणीं घेतलीं. संभाजी कावजी तिकडे [ मोंगलाकडे ] मिळाले होते, त्यांस चाकणप्रांतींलोक गेले त्यांणीं पागासुद्धां लुटून मारिलें.

### पितापुत्रावर आरोप : काशीपंत ‘ विश्वासराव ’ झाले.

तिकडे दिल्लीस शोध बहुत रीतीनें करितां न लागला. शिवाजीराजे गेले हा अपराध रामशिंग याजवर ठेवून जयशिंग याचा सुभा तगीर केला. आणि दिल्लीस हुजूर बोलावून घेतलें. दिलेलखान यास सुभेदारीचें काम सांगितलें.

गंगातीरीं येतां महाराज ज्याचे घरीं राहिले होते त्याचे आईस आश्वासन दिलें होतें. देशीं आल्यावरि त्याजला कुटुंबासह बोलावून आणून द्रव्य, वस्त्रें दिलीं. लूट काय गेली विचारून तितकें द्रव्य आणखीं दिलें आणि सेवेसि ठेविलें.

[ पुढें ] मथुरेस पत्रें पाठविलीं जे, “ देशीं सुखरूप पावलों. याउपरि सावधपणें संभाजीराजे यांस घेऊन येणें, ” ऐसें काशीपंतांस लिहिलें. त्यांणीं संभाजीराजे यांस घेऊन येतां, वाटेनें त्यांचें स्वरूप सुंदर, सतेज, तेव्हां हा कोणी मातबर आहे ऐशी चौकशी पडली. ते समयीं “ आम्ही ब्राह्मण, हा आमचा मुलगा, ” म्हणून फराळ एके जागां बसोन काशीपंतांनीं केला. ऐसे प्रकारें संकटेंकरून निभावून आलियावरि महाराज फार संतोषी होऊन, ‘ विश्वासू खरे ! ’ म्हणून ‘ विश्वासराव ’ ऐसा किताब देऊन वाढविलें. तिघे भाऊ यांस पालख्या व मातबर तैनाता करून वाढविलें. लाख रुपयांचे होनांचा त्यांजवरि सुवर्णाभिषेक करून बक्षीस दिल्हें.

किल्ले प्रांत येथील महाराज यांणीं दिल्लीस गेलियापूर्वीं[1] बंदोबस्त करून देऊन इमारती करविल्या, त्याप्रमाणें चालल्या होत्याच. सर्व किल्ले, कोट पाहून, तयार[2] त्या चांगल्या वाईट अधिकउणें कोठें करणें तें, नवीन करवणें तें करविलें. लोक सरदार वगैरे जेथें जैसे पाहिजेत तैसे ठेवणें, जुने ठेविले [ होते ] त्यांजपासून कामकाज कसें चालले[3] उपयोग गैरउपयोग पाहून, नवे जुने करार, दूर करणें, हें सर्व पाहून, आपण राज्यांत हिंडोन, श्रीस्वामींचें दर्शन व श्रीजेजोरी, शिंगणापूर

---

§ ‘ व या समयीं यांची ’ १. ‘ जाण्यापूर्वीं ’ ’ २. ‘ तयार जाल्या, ’ ३. ‘ कसें घेऊन ’, ‘ कसें कसें ’

शंभू, प्रतापगड देवी [ यांचें ] दर्शन करून मागती रायगडीं आले.

### बाळाजी आवजी : चिटणीसयोग्य

[ एकदां ] बाळाजी आवजी चिटणीस यांस राजकारणी पत्र त्याहावयास सांगितलें होतें, तें पत्र निकडीनें जावयाचें म्हणोन त्यांस बोलावून आणोन 'पत्र सत्वर गेलें पाहिजे, आणा' म्हणोन आज्ञा केली. ते समयीं पत्र लिहिलें नव्हतें. महाराजांनीं पत्र 'आणा' म्हणतांच 'लिहिलें आहे,' बोलले. तों 'वाचून दाखवा' आज्ञा जालियावरि खिशियांत हात घालून दोन बंद कोरे कागद, गुंडाळी होती, ती काढिली आणि अस्तमानसमयीं दिवटी जवळ होऊन पत्र साद्यंत वाचून दाखविलें. त्याहावयास सांगितलें तसे मतलब बहुतच कारस्थानीचे, त्या अन्वयें लिहिणें म्हणोन [ महाराजांनीं ] तारीफ केली. तों दिवट्या हांसला. त्यास महाराजांनीं 'कां[1] हांसलास' म्हणून विचारिलें. त्याणीं न सांगावें तरि हुकुम जाहाला, बोललें पाहिजे, म्हणून यांजकडे पाहिलें. तेव्हां हे विचारांत पडून जालेप्रमाणें सांगितलें जे, "कागद तयार नव्हता म्हणून कोराच वाचिला. आतां तयार करणार. अपराध केला, क्षमा करणार स्वामी समर्थ [ आहेत ! ]" ऐसें बोलोन मुजरे केले. तोंच दिवट्यानींही कागद कोराच वाचिला यास्तव हांसलों[2] म्हणून कुरनीस[3] केलीं. त्याजवरि 'बरें[4] केलें, पत्र[4] लेहून वाचून दाखवा' बोलले. ते समयीं तेथेंच बसोन पत्र लिहिलें आणि पुन्हां वाचून दाखविलें, तों पूर्वी वाचिलें त्याप्रमाणेंच अक्षरें व मतलब संगतशुद्ध ! पूर्वी वाचलें तें व फिरोन वाचलें यांत तिळप्राय न्यूनअधिक[5] नाहीं ! ! पाहून बहुत संतोषी जाले. तारीफ केली. 'चिटणीसयोग्य व तर्ककरून योग्य' ऐसा गौरव करून पोशाख अंगावरील उताराचा व मोत्यांची कंठी व पदक व शिरपेंच बक्षीस दिल्हें. ते समयीं यांणीं अर्ज केला जे, "सर्व राज्यांतील, सरकारकून, सरदार, किल्ले, कोट, ठाणीं येथील चिटणिसी व कारखानिसी व जमिनिसी[6] तीन धंदे स्वामींनीं करून दिल्हे ते बक्षीस असावे; कोठें चालत नाहींत ते चालावे; व दाभोळ सुभे येथील सरदेशमुखीचें वतन आपणांस करून द्यावें." त्याजवरून महाराज कृपावंत होऊन वचन दिल्हें. धंदे त्यांजकडे[7] राज्यांतील सांगितले; दाभोळचे सरदेशमुखीचीं वतनपत्रें करून दिल्हीं. दिल्लीचे स्वारींत बहुत उपयोगीं पडले; याजवरून राजकारणी कारभार, समीपचा कारभार, विश्वास[8] ठेवून बहुतच कृपा महाराज करूं लागले.

### संभाजीविवाह : किल्ले, ठाणीं परत घेतलीं.

संभाजी महाराज यांचा विवाह करावा ऐसा सिध्धांत करून पिलाजी सिरके

---

१. 'कोणास' २. 'हांसें आलें.' ३. 'खुरनीस' ४.४. 'बारपत्र' ५. 'न्यूनाधिक्य' ६. 'जमेनसी' ७. 'याजकडे' ८. 'विश्वासू'

यांची कन्या शरीरसमंध‡ सिद्धांत करून बहुतच तरतूद साहित्य करऊन मोठें समारंभेंकरून पांचचार लक्ष रुपये खर्च होऊन करिते जाले. वधू जाली त्यांचें नांव येसूबाईसाहेब ऐसें ठेविलें. नंतर वराडप्रांतीं स्वारीस गेले. दिलेलखान सुभा औरंगाबादचा करून होते. त्यांचे ताबिनांत आणखी लोक वगैरे सामान देऊन एखलासखान पादशहांनीं दिल्लीहून पाठविले. तेही आले. 'महाराज यांनीं देशीं येऊन सत्तावीस किल्ले व ठाणीं व बागलाण घेतलें. मुलख मारितात,[१] स्वारीशिकारी करितात, वराडांतील करंजें शहर मारिलें, बहुत मत्ता सांपडली, तेथून बराणपुरास महाराज गेले, तेथील पुरे मारिले.' हें वर्तमान दिलेलखान यांस कळोन आपण बहलोलखान व बहादरखान, एखलासखान जमियतसुद्धां चालून आले. इंद्रायणी नजीक गांठिलें, तेव्हां युद्ध करून दबाऊन राखून, महाराज राजगडीं[२] जाऊन लूटसुद्धां पावले.

### बंदोबस्तासाठीं शाहाजादा याची रवानगी

हें वर्तमान–'राजे पुन्हा देशीं गेलेयावरि स्वारीशिकारी करितात, फंद करितात,' औरंगजेब यास कळलें.[३] ते समयीं बहुत दिक होऊन, 'मोठा शत्रु शिवाजी निर्माण जाला. हस्तगत जाला असतां हरिफाईनें हातचा निघोन गेला. जो सुभा पाठवावा त्याचे हातें कांहीं एक घडत नाहीं. खासा आपण जावें तरि इकडील बंदोबस्त राहिला पाहिजे;' म्हणोन आपले पुत्र शाहाजाहा यांसच सुभेदारी देऊन रवाना केलें. बराबर सरदार मातबर भावशिंग रजपूत वगैरे दिले. ते निघोन औरंगाबादेस येऊन पावले. हें वर्तमान महाराजांस कळलें. दिल्लींत[४] जाण्यांत[४] शाहाजाहाँ याची रीत सर्व माहीत जाली होती. "द्रव्याचे लालची, पेंडीचें[५] ढोर अशी आहे! काय चिंता आहे?" असें महाराज बोलले. पादशाहांनीं पुत्र येतां त्यांस "तुम्हीं शिवाजीचे गळां पडूं नये. तुमचे वस्तु त्याशीं मसलत निभावणार नाहीं, त्याशीं द्वेष न करावा, सुभे बुडविले तसे पादशाहाजादा बुडविला ऐसें लौकिकांत आलें असतां ठीक नाहीं. पादशाहीस अपाय होईल. यास्तव तहानें व गोडीनेंच आपलेसें करून प्रांत जतन करावा," ऐसें सांगितलें होतें. त्याजवरून त्याचें मानस तह करावा ऐसेंच होतें. "पूर्वी महाराज दिल्लीस गेले ते समयीं 'यांचे ठायीं[६] पादशहांनीं नजरबंदी केली, हें ठीक न केलें. शिवाजीराजासारखे अमीर हातीं राखावे" ऐसेंच शाहाजादे यांचे संमत होतें. आंतून सफाईच होती. तेच हल्लीं आले. परंतु मनसबा काय, हा संशय [महाराजांस] होता, तों शहाजादा याणीं राजकारण तहाचें पाठविलें जे, "तुम्हीं आम्हीं सफाईनें चालावें." ऐसें

---

‡. 'शरीरसंबंध' १. 'मारीत' २. 'रायगडीं' ३. 'कळली' ४.४. 'दिल्लीस गेले तेव्हां' ५. 'पेंढीचें' ६. 'यांचें ठायीं आदरन्याय'

तिकडून आल्यावरून महाराजांनीं " बरें आहे, तूर्तच बिघाड कशास पाहिजे ? त्याचा आदर आहे तों काय मतलब आहे हेंच पहावें, " म्हणोन आपणही रुकार देऊन राजकारण चालविते जाले.

### शाहाजादा–महाराज यांचा तह

[ परंतु ] मुसलमान सरदार यांशीं राजकारण करणें, बोलणें, [ यांस ] विश्वास पुरत नाहीं. तेव्हां भावशिंग[1] आहेत कळलें, याजवरून " आपणही भावशिंग यांचे विद्यमानें बोलावें, " ऐसें ठरवून बाळाजी आवजी चिटणीस यांचा व भावशिंग यांचा दिल्लींतील स्नेह. त्याजकडे पाठवणें, जाणें, येणें हे करीत होते. याजवरून चिटणीस यांस बराबर लवाजिमा, पागा, हत्ती घोडे, लोक देऊन राजकारणास पाठविलें. त्यांणीं जाऊन पादशाहाजादे यांची व भावशिंग यांची भेट घेतली. महाराजांनीं वस्त्रें, जवाहीर, हत्ती पाठविले ते पावते केले आणि बोलणें चालतें केलें जे, " राजे आपण होऊन, 'पादशाहास भेटावें, कामकाजें करावीं, येथें[2] बोलणीं तह ठरले तसे मुद्दे हासल व्हावें' म्हणोन दिल्लीस गेले. दरम्यान मातबर दिल्हे असोन चौकी बसविली. बदनजर[3] जाली. बाहादार यांचेंही कांहीं न चाले. तेव्हां विश्वास कोणते[4] रीतीनें धरावा ? राजकारण कसें चालावें ? " हें बोलले. ते समयीं शाहांनीं उत्तर केलें कीं, " पादशाहाचे अंतःकरणांत राजाविषयीं विपरीत भाव कांहीं नव्हता व हल्लींही नाहीं. निखालस होऊन आपणापाशीं राजे यांणीं राहावें, वजिरीचीं कामें यांचे हातून घ्यावीं, हें[5] कबूल न करीत. याजवरून हरयेत्नेंकरून दाबून करावें म्हणोन करावयास गेले, तें राजांस मानलें नाहीं. आणि ते निघोन आले. पुढेंही आम्हांस येतेसमयीं आज्ञा केली जे, 'राजे यांशीं वांकडें न होतां[6] जाली ती गोष्ट बरीच समजून[7] शिवाजी राजे सारखे मनुष्य मागें जालें नाहीं व पुढें होणार नाहीं. म्हणून आमचे हातीं लागावे असा[8] यत्न केला असतां, वांकडे मानून[9] गेले. बरें असो. त्यांची मर्जी. तिकडेच राहून कामेंकाजें करावीं. पूर्वीं तह जाले तेच कायम करून देऊन त्याचे विचारें चालावें. आम्हांस वांकडें करणें असतें, तर तेच समयीं करितों. परंतु शिवाजी राजे अशा रीतीनें गेले हें त्यांणीं युक्त न केलें !' ऐसें बोलोन 'सफाई करावी,' या प्रमाणें हुकूम आहे. " ऐशीं बोलणीं जालियावरि चिटणीस यांणीं " हल्लीं आपण या रीतीनें बोलतां व भावशिंगही खातरजमेनीं सांगतात, त्या अर्थी हें सर्व वृत्त महाराजांस लेहून उत्तरें आणवितों. नंतर पुढील बोलणें चालऊं.[10]" म्हणोन दोण्हीकडील सर्व बोलायचें[11] अर्थ लिहून पाठविले. त्याजवरून महाराजांची आज्ञा आली, " बोलणें सिद्ध[12] करून मतलब राखणें[13] " ऐशीं उत्तरें

---

१. 'भावसिंग' २. 'तेथेच' ३. 'नजरबंदी केली' ४. 'कोण्हे' ५. 'हा त्यांचा हेतू' ६. 'चालावें' ७. 'जाली' ८. 'म्हणोन' ९. 'जाणून' १०. 'बोलूं' ११. 'आपलें बोलणें व शहाचें जालें तें' १२. 'चालू' १३. 'सिद्ध करावें'

गोलियावरि पुन्हा बोलणें केलें. " आपण सफाईनें चालणार तें कसें ? आम्हांस वांकडें चालावयाचें नाहीं. पूर्वील ठेवणें[1] सारी फौज कुमकेस येणें अथवा समक्ष भेटी होणें हें पुरतेपणें परस्परें निखालसता पडल्यावांचून[2] घडणार नाहीं. कांहीं मुलूक करार तहाशिवाय करून थोडी बहुत फौज नेहमीं कुमकेस पाहिजे तशी राहील. " त्याजवरून बोलण्यांत तह ठराव जाला कीं, " संभाजी राजे यांचे नांवे पांच हजार फौजेचा सरंजाम लाऊन देऊन त्यांत पांच हजार फौज नेहमीं राहावी, मातबर माणूस कोणी याणीं ते लोक घेऊन राहावें. त्याचे नांवें हातें मदतीचें कामकाज घ्यावें. " त्याजवरून उभयपक्षींचीं बोलणीं सिध्धांतांत आणून ठराविलें जे, " सत्तावीस किल्ले बांधारी खानदेश, बागलाण प्रांत सुद्धां घेतला तो महाराजांनीं सोडावा, मनसब पांच हजार फौजेस सरंजाम जाहागीर आवंढे[3] बाळापूर वऱ्हाड प्रांतीं तालुका लाऊन द्यावा; व पूर्वीचे करार आहेत त्या प्रमाणें चौथाई, सरदेशमुखी चालावी; विजापूर तालुक्यांतील प्रांत किल्ले व त्या लगत दौलताबादेखालील किल्ले मुलूक पेशजीचे तहाप्रमाणें महाराजांकडे राहावे. " याप्रमाणें तहनामा ठराऊन महाराजांकडे लेहून पाठविलें आणि उत्तरें आणून करार ठरविला. शाहाजादे यांचीं दस्तकें व सरंजाम तालुक्यांच्या सनदा वगैरे घेऊन बाळाजी आवजी चिटणीस महाराजांपाशीं आले. महाराजांस जवाहीर, वस्त्रें, हत्ती, घोडे वगैरे शाहाजाद्यानीं दिले ते आणून प्रविष्ट केले. तिकडील वकील बराबर घेऊन आले, त्यांस महाराजांनीं सत्तावीस किल्ले यांच्या चिठ्या देऊन, वस्त्रें देऊन निरोप दिल्हा. मनसबेस वऱ्हाड प्रांत व आवंढा पट्टा दोन किल्ले व त्याखालील मावळे[4] ऐसा लावून घेतला. त्यास अंमल बसवण्यास रावजी सोमनाथ सुभेदार करून कांहीं फौज लोक देऊन पाठविले. तों अंमल बसल्यावरि पांच हजार फौज औरंगाबादेस चाकरीवरि पाठवावीसें करून अंमल बसला तेव्हां प्रतापराव गुजर सरनोबत सरदार, त्याजबरोबर कारभारी अनाजी रंगनाथ मळेकर व येसाजी मल्हार ऐसे दिल्हे. ते शहरास जाऊन राहिले. शाहाजादा व महाराज यांचा तह होऊन बहुतच सफाई परस्परें निखालसता होऊन चालूं लागले.

### पादशहास तह अप्रशस्त : महाराजांनीं लगेच उठाव केला

[ नंतर ] शाहाजादे यांणीं तहाचें सर्व वर्तमान पादशाहास लिहिलें. तेव्हां त्यांस तह जाला हा प्रशस्त वाटला नाहीं. " शिवाजी राजे निःसीम आपलेसे होऊन तिकडील दक्षण प्रांत दोन्ही पादशाहाती भागानगर, विजापूर सोडवून आपणांस द्यावे, त्यांतूनच आणखीही प्रांत आपले फौजेचे वेजमीस लावून घ्यावा, "

१. 'होऊन चालावें.' २. 'झालेंशिवाय' ३. 'आवसें', 'त्याखालील मावळें' ४. वऱ्हाड प्रांत', 'माहाल'

ऐसें पादशाहा लिहीत गेले. महाराज यांणीं[१] तह जाला याजमुळें दोन वर्षें[१] स्वारी करणें तें विजापूर तालुका वगैरे यांतच करून खंडणी वगैरे घेऊं लागले. किलियाच्या इमारती पाहाणें, दौलतीचा बंदोबस्त, उपभोग हेंच केलें. दोन वर्षें तह चालला असतां दिल्लीहून ओरंगजेबाचे चित्तांत आलें जे, “ याप्रमाणें राजे यांशीं तह करून चालणें ठीक नाहीं. अधिकच बळावत चालले. दोन्ही पादशाया त्यांनीं घेतलियावरि इकडीलही मसलत करतील. यास्तव त्या पादशाहींतील प्रांत, किल्ले, खंडणी घ्यावी ते आपणांस द्यावी तें घडत नाहीं. त्या अर्थी तह मोडावा. स्वारी करणें, प्रांत किल्ले घेणें ते, तेच घेतात. हें पुढें जड[२] पडेल. ” याजवरून शाहाजादे यांस लिहिलें जे, “ राजे यांजकडील [ त्यांनीं तहांत ] प्रांत, किल्ले घेतले[३] ते माघारे घ्यावे, फौज सरनोबत [ यांस ] घालवून द्यावें. हात पोंचल्यास लुटून घ्यावें ” तेव्हां शाहाजादे यांची व महाराजांची अंतर्यामीं निखालसता यामुळें त्यांणीं सरनोबत यांस सूचना केली व महाराजांसही लिहिलें, तेव्हां महाराजांनीं सरनोबत व फोज बोलावून[४] घेतली.[४] आवंढे[५] वगैरे तालुका त्यांणीं जफ्त केला. महाराजांनीं मोरोपंत पेशवे यांस फौज देऊन रवाना केलें. सालेरीपासून सर्व तालुका सत्तावीस किल्ले घेवविले. बागलाण, खानदेश [ यांत ] अम्मल बसविला. आणि सरनोबत वगैरे सर्व फौज घेऊन खासा स्वारीस निघाले ते बऱ्हाणपूरपर्यंत गेले. खानदेश खंडणी घेत लुटीत गेले. बऱ्हाणपूरचे मारिले. ते लुटून वऱ्हाडप्रांतीं येऊन करंजें वगैरे शहरें मारीत मुकाम करीत बे-मबलग[६] लूट करीत[७] खंडणी घेत[८] येत असतां दिलेलखान व बाहदारखान व एखलासखान, बहलोलखान व इंद्रमणि ऐसे उमराव चालून आले, त्यांशीं युद्ध करून, तंबी पोहंचऊन दबाऊन सारिले. आणि महाराज हिसाब न धरितां पराभव करून राजगडीं येऊन पावले.

### दिलेलखान, एखलासखान, बहलोलखान यांचा समाचार

[ इकडे ] पेडगांवपर्यंत दिलेलखान मागें आला, आणि फौज माघारीं घेऊन, दाह हजार फौजेनिशीं सालेरीवरि पेशवे यांजवरि चालून गेला. हें वर्तमान महाराजांस कळतांच प्रतापराव गुजर, यांस पागा फौजेनिशीं तिकडे रवाना केले. त्यांणीं दरमजल जाऊन दिलेलखान याजवरि छापा घालून गांठून घाबरा केला. कही व रसद बंद केली. दिलेलखान व एखलासखान युक्तीनें निघोन कोणारगड येथें रुमाजी नळगे[९] दोन हजार लोकांनिशीं होते, हे बातमी लाऊन लुटावे म्हणून चालून गेले. तेथें मावळे लोक यांणीं गट बांधून युद्धाची शर्त केली. दोन हजार

१. ‘ तहनाम्याकरितां स्वारी करणें ती ’ २. ‘ जसें ’ ३. ‘ दिले ’ ४.४. ‘ फौज पत्र पाठवून मागें आणविली. ’ ५. ‘ आवसें ’ ६. ‘ बे मुगलबा ’, ‘ बेमबलग ’ ७. ‘ व द्रव्य ’ ८. ‘ घेतली आणि ’ ९. ‘ जगदे ’

पठाण रणीं पाडिले. रुमाजी नळगे§ रणीं ठार पडिले.* नंतर सालेरीस खान जाऊन मोर्चे देऊन बसले. तों प्रतापराव जाऊन पावले. घाटाकडून मोरोपंत पेशवे चालून आले. मोंगल मधींच घेरून घाबरा केला. रसदबंदी केली. तेव्हां मोर्चे सोडोन निघोन चालला. तो लगट करून एखलासखान यांसि गांठलें. युद्ध बहुत जालें. पांच हजार माणूस पठाण घोडे घालून मारिले. एखलासखान सडा पळून गेला. दिलेलखान दुसरे वाटें घाटावर गेला. त्याजवरि मराठे जाऊन पडले, त्यांजला सांवर पडूं[१] दिला नाहीं. ते निघोन मातबर मजली करीत औरंगाबादेस पोंचले. पेशवे यांस लूट बहुत सांपडली. हत्ती, घोडे पाडाव करून आणिले. बराबर सरदार आनंदराव व्यंकोजी दत्तो, रुपाजी भोंसले, सुरेराव काकडे, खंडोजी जगताप, संताजी जगताप, मानसिंग मोरे, विसाजी बल्लाळ, मोरो रंगनाथ, मुकुंद बल्लाळ हे होते. त्यांणीं लढाईत बहुत शर्त करून कामें केलीं. सुरेराव काकडे रणीं पडले. बहलोलखान सरदार लढाईत पाडाव आले. हें वर्त्तमान सर्व महाराजांस लिहिलें. त्याजवरून बहुत संतोषी होऊन तोफा करविल्या. जासूद पत्रें घेऊन आले त्यांस सोन्याचीं कडीं, वस्त्रें बक्षीस दिल्हें. बहलोलखान व आणखी सरदार पाडाव आले त्यांस वस्त्रें देऊन रवाना शहरास खर्चास देऊन केले.

### प्रतापराव यांचें निधन : हंसाजी 'हंबीरराव' झाले.

याजवरि विजापूरकडील रणमस्तखान व बेहेलोलखान पन्हाळ प्रांतीं यावें म्हणोन सदलकोल्हार[२]पर्यंत धामधूम करीत आले. हें वर्त्तमान कळतांच सरनोबत यांस फौजसुद्धां[३] रवाना केलें. त्यांची यांची गांठ उंबरटी[४] तालुकियांत पडली. युद्ध जालें. दोनप्रहरपर्यंत लढाई चालली. पाणी नाहीं. [ त्यामुळें ] मोंगल आयास आणिला. ते समयीं तह करून "महाराजांकडील प्रांतांत याउपरि येणार नाहीं" असा करार करून घेऊन[५] नंतर मोंगलांस जाऊं दिलें.[५] हें वर्त्तमान महाराजांस कळलियावरि सरनोबत यांस "तह मोंगल सोडिला हें ठीक न केलें. आयास आला तसाच बुडवावा,[६] हें कां न केलें?" ऐसें महाराजांनींही पुष्कळ प्रकारें त्यांस लिहिलें. सरनोबत तह करून भागानगर प्रांतीं देवगड, रामगडपर्यंत स्वारी करून खंडणी चौथाई घेत घेत पुन्हां[७] देशीं आले.[७] तों रणमस्तखान व बेहेलोल-

---

§ 'नलगे' * 'यांस ठार मारिलें.' १. 'घेऊं' २. 'संपगांव', 'सदल कोल्हार', 'सदल काल्हार' ३. 'सरंजाम तोफा पागा लोक वगैरे मोठी तयारी करून देऊन सरदारासुद्धां' ४. 'बरटी', 'उमरटी' ५.५. 'निघोन गेला' ६. 'बडवावा' ७. ७. 'मजल दरमजल पांचचार कोशांचा मुक्काम करीत करीत देशीं सुखरूप येऊन पोहोंचले.'

खान हे[1] दोघे पुन्हा तयारी मोठा सरमजाम तोफा लोक खजाना जमा[1] करून पनाळ प्रांतावर आले. हें वर्तमान महाराजांस कळलें. महाराजांनीं सरनोबतांस "तुम्हीं[2] तह करून सोडिला असतां चालून आला. इतबार धरिलात. तेच समयीं बुडविला नाहींत." म्हणून शब्द लाविला. पुन्हां त्यांजवर रवाना केलें.[2] ते गेले.[2] बावसे[3] ज [ न ? ] व सरीवर[3] जाऊन मोंगल गांठिला. युद्धप्रसंग बहुत जाला. प्रतापराव याणीं 'बेइमानी केली.' हा महाराजांचा शब्द आला म्हणून लोक निवड करून घोडे चालविले. त्यायोगानें खराबी बहुत केली. तों प्रतापराव गोळा लागून एकाएकीं रणीं ठार पडिले. ते समयीं हंसाजी मोहिते सरदार जुमलेदार होते, त्यांणीं सरदार पडले असतां त्यांची[4] चिंता वगैरे न करितां मोठे धाडसेंकरून, 'आपण आंगेजणीनें लढाई करून यश संपादावें' असें मनीं आणून पुन्हां स्वतः फौजेसह वर्त्तमान[4] चालून घेतले, आणि मोंगल कापून काढिला हें त्यांचें अद्‌भुत कर्म पाहून धीर न पुरे, तेव्हां मोंगल पळूं लागला. मोड जाला. तेव्हां विजापुरापर्यंत पिटीत घालविला. हंसाजी मोहिते फते पावले. सर्व संभाळून महाराजांचे प्रतापें रायगडीं आले. महाराजांनीं वस्त्रें-भूषणें देऊन फारच नावाजीस करून 'हंबिरी केली,' म्हणोन 'हंबीरराव' ऐसा किताब दिल्हा आणि सरनोबती त्यांजलाच करार करून वस्त्रें दिल्हीं.

## हंबीररावांचा पराक्रम

[ नंतर त्यांस ] स्वारीस पाठविलें. ते बागलाण प्रांतीं जाऊन गुजराथ प्रांतीं गेले. अमदाबाद प्रांतापर्यंत जाऊन मुल्क लुटून, शहरें मारीत खंडणी घेऊन नर्मदा-तीराकडून बराणपुरीं आले. खानदेशींची खंडणी करून माहूर तालुकियांत जाऊन, तेथील खंडणी केली. जालनापूर, शिंदखेड येथील खंडणी घेऊन गंगातीरीं देशीं आले. तों दिलेलखान व आणखी उमराव चालून आले. ते समयीं लांब लांब मजली करून चालले. मागें गनीमही चालला. त्यांस दबाऊन राखून यश घेऊन महाराजांचे दर्शनास आले. सुरक्षित लूटसुद्धां खजिनासुद्धां पावले. सर्व महाराजांस नजर केली. व एकंदर वृत्त महाराजांनीं विचारिलें तेव्हां त्यांनीं जसें जसें ज्या ज्या ठिकाणीं होत गेलें

---

१.१. 'पुन्हां जमाव' २.२. 'तुम्हीं ज्याला तह करून सोडिलें तोंच फौजेसुद्धां सरदार रवाना करितो, आणि ते सरदार चालूनही आले. त्याचा इतबार कोणते आधारें कशावरून धरिला? करणें योग्य हें होतें कीं त्यांस तेच समयीं बुडवावें ते न करितां तह करून आला म्हणून तुम्हांस शब्द लाविला. तर तुम्हींच पुन्हां यांजकरितां जाणें.' ३. ३. 'बावस नवरीवर', 'बावसे ज (न ?) वसिरीवर', 'हावसे ज (न ?) वसरीवर' ४.४. 'लढाई सांवरून आंगेजणीं करून पुन्हां'

तसें तसें सर्व इत्थंभूत महाराजास निवेदन केलें. महाराज बहुत संतोष होते जाले. नंतर त्यांस निरोप दिला.

नंतर कानो मोरदेव गपचूप यांस सरनोबतांची मजमू होती, ती दूर करून अनाजी रंगनाथ पुरंधरचे[1] सबनिसीवर होते, ते शाहाणे कर्ते पाहून त्यांस सरनोबताची मजमू दिल्ही. बकाजी फर्जंद यांस कारभार दिल्हा. संताजी घोरपडे यांणीं कामें बहुत केलीं. शिपाई मर्द जाणोन हंबीरराव यांणीं विनंति केलियावरून तैनात जाजती करून जुमलेदारी दिल्ही. तसेच धनाजी जाधवराव हे व्यंकोजी खांडेकर यांचे जुमल्यांत होतें, त्यांस ते सरदारी योग्य जाणोन त्यांसही जुमलेदारी दिल्ही. याप्रमाणें दोन सरदार हंबीरराव यांणीं विनंती केल्यावरून[2] उभयतांस[2] वाढविले. याप्रमाणें हंसाजी मोहिते, बीड[3] परगणे याचे देशमुख; यांणीं चाकरी मर्दुमी केली.

[ या प्रकारें ] महाराज यांणीं दिल्लीहून सरदार आले व मसलत जाली असतां नामोहरम त्यांस केलें. [ स्वतः ] दिल्लीस जाऊन ख्याति करून युक्तीनें व आपले जोरानें [ परत ] आले. ऐसें दिल्लीपति यांसि नामोहरम केलें. महाराज राजगडाहून रायगडीं गेले.

याप्रमाणें दिल्लीपतिपराभव प्रकरण पंचम समाप्त.

१ ' पुरंधरे ', २.२. ' करून ' ३. धीड '

# प्रकरण षष्ठ

# दक्षण-दिग्विजय

## हताश औरंगजेब

श्रीशिवछत्रपति यांशीं[1] औरंगजेब यांणीं बहुत प्रकारें[2] पूर्वी शाहाजादेपणांत औरंगाबादीं असतां, राजांचा पराभव करावा म्हणोन प्रयत्न केला. पुढें दिल्लीस जाऊन पादशाहा जालियावरि यांचा पराभव करावा म्हणोन सुभे पाठविले. त्याचे[3] वस्तु [ काहीं ] न जालें.[3] त्यानंतर भेटीस नेऊन आपलेसे करावे, म्हणोन दिल्लीस नेऊन दगाबाजी केली असतांही न चालली.[4] आणखी मोहीम केली तेही पराभवातें पावली. तेव्हां आपले ठायीं, "ईश्वरानींच त्यांजला वैभव दिलें, आपण यत्न करणें ठीक नाहीं," म्हणोन पराभवातें पावून राहिले.

## युवराजशिक्षण

महाराजांचा प्रताप दिवसेंदिवस वाढत चालला. संभाजी राजे प्रबुद्ध जाले. त्यांस व राजारामसाहेब यांस विद्याभ्यास करवावा, सुशिक्षित असावे, म्हणोन घोड्यावरि बसणें, शास्त्रविद्या, शस्त्रविद्या, तालीम, तिरंदाजी सर्व करविते जाले. आपण राजे व हे राजपुत्र. पुढें राज्यास अधिकारी हेच. आपण महाराष्ट्रराज्य आक्रमून धर्मस्थापना केली, ते पुढें वृद्धीस यांचे हातें पावावी.[5] अष्टप्रधान यांतच राजपुत्रांची गणना आहे. सर्व अमात्य राजाचा वाम भुज, युवराज राजपुत्र हा सव्य भुज असें आहे. त्या अर्थी हे सुशिक्षित असावे म्हणून लेखनादि अभ्यास करवून[6] पंडितांचा सहवास करविला. आणि उत्तम वृद्ध सेवक त्यांचे समीप ठेविले. दंडनीति, राजधर्म, हे सांगविले.[7] "राजपुत्रधर्म,[8] पितृसेवा कायावाचामनें करावी; जीं कर्मे करणें तीं पित्यास संतोष उत्पन्न होय अशीं करावीं; कोणतेंही कर्म पित्यास तिळप्राय विषाद उत्पन्न होय ऐसें करूं नये; पित्याची कृपा ज्याजवर असेल[9] त्याजवरि आपण कृपाच करावी; ज्याचे ठायीं पित्याचा द्वेष त्याशीं आपणही करावा, त्यासि प्रीति[10] करूं नये; पित्यानीं संतुष्ट

---

१. 'यांची' २. 'बहुतप्रकारें स्पर्धा करून' ३. ३. 'त्याचा कांहीं यत्न न चाले' ४. 'नच जाली' ५. 'पाववावी' ६. 'करविला.' ७. 'सांगितले,' 'समजाविले' ८. 'राजपुत्रीं' ९. 'आहे' १०. 'जवळ'

होऊन युवराजपद कारभार सांगितला असतां गर्वारूढ होऊं नये; संपत्तीचे व तारुण्याचे मदेंकरून उन्मत्त होऊं नये; पिता, माता व भगिनी व बंधु, मित्र व वल्लभ थोर थोर प्रतिष्ठित असतील त्यांचा व प्रजादिकांचा अपमान करूं नये; मोठीही[1] वृद्धि पावला असतां पित्याची आज्ञा उल्लंघन करूं नये, हाच पुत्राचा धर्म श्रेयस्कर आणि भूषणापेक्षां भूषण होय. बंधुवर्ग असतील त्यांत आपण युवराज जालों, कारभार करतों, म्हणून गर्व धरून आपण सर्वांहून अधिक ऐसें कदापि मानूं नये. राजाची आज्ञा पालन न केली व बंधूंची अवगणना केली असतां द्रोहें करून तो युवराज पदच्युत होतो. यदु आदिकरून राज्यास सिंहासनादि करून युक्त पूर्वी असतांही अनधिकारी[2] जाले. पितृद्रोहेंकरून असें घडलें. ज्येष्ठ असतांही असें जालें व बंधुहेळना करून दुर्योधनादि नाश पावले. यास्तव बंधुवर्गाचे अर्थ त्यांस देऊन त्यांचीं मनोधारणें[3] रक्षून विशेष वाढूं न देतां रक्षावें. बहुत नम्रत्वेंकरून सकल-गुणसंपन्न असोन सर्व मंत्री व सेवक[4]-जन[4] उत्तम यांचा सहवास व युक्तिश्रवण करून राज्यांतील माहितगारी व राज्य करण्याच्या युक्ति अवगत करून घ्याव्या. त्यांची मान्यता रक्षावी. उत्तम जनाची संगति करावी. नीच व दुर्व्यसनी यांशीं[5] कदापि मैत्री करूं नये, त्यांचा सहवास न करावा, असे बोध करविले. राजांनीं पुत्रांस बहुत प्रकारें रक्षावें. मत्त हत्तीस अंकुश नसल्यानें तो अनर्गल होतो, सर्वांचे घात करितो; तसेंच पुत्र रक्षिले नाहींत, आणि लघुमनुष्यांची संगति त्यास जाली व मद जाला असतां, आपणच राज्य करावें म्हणून इच्छा धरून अनर्गल होतील. तेणेंकरून राज्यक्षय होईल. जसें[6] मांस-आमिष अमुक स्थळीं आहे ऐसें व्याघ्रास कळलियावरि त्याचें निवारण होत नाही, तसेंच पुत्रांचें निवारण मग करूं गेलें[7] तरी घडत नाहीं. यास्तव उत्तम सुशिक्षित, प्रौढ सेवक सावध ऐसे जवळ ठेवावे. सिंहाचे पिलांस असावध रक्षक असले तरि त्यांसच भक्षून आणखी जनांचा[8] नाश करितात, यास्तव सावध असावे. राजाचे कुळीं अनीतिमान पुत्र निर्माण जाला म्हणजे तें राज्य व कुळ शीघ्र क्षयास जातें. म्हणोन बहुतच नीतीनें रक्षिणें तसें रक्षिलें. आणि मातबर सरकारकून प्रौढ यांजपाशीं बसावें, दरबारांत बसावें, कारभारांत[9] माहीत होत जावें ऐसें सांगून तसें त्यांकरवीं करविते जाले. श्रीरामदास-स्वामी यांचें दर्शन, सहवास करण्यास त्यांस पाठविलें होतें.

### न्यायाधीश : त्यांचें महत्त्व

तसेच निळो सोनदेव मजमुदार वारले. त्यांचे पुत्र दोघे. वडील नारोपंत,

---

१. 'कोणीही' २. 'अनाधिकारी' ३. 'मनोधार' ४. 'सेवकजेन' ५. 'यांची' ६. 'जें' ७. 'लागलें' ८. 'जनास भक्षून' ९. कारभार'

धाकटे रामचंद्रपंत. परंतु नारोपंत नाकाबिल,* आर्ष होते. म्हणून रामचंद्रपंत यांसच पद देऊन मजमूचें काम त्यांजपासून घेऊन§ चालविलें. निराजी रावजी न्यायाधीश हे परम चतुर, शाहाणे, तर्कज्ञ, यांस न्याय करण्याविशीं, राज्यांतील अनेक प्रकारचे न्याय येतील ते नीतीनें करावे, दंड करणें त्यास न केला व न करावा त्यास केला असतां राज्यास अकल्याण, न्याय करणें त्यांत लोभ धरून वृत्ति-उच्छेद जाली[1] असतां परम पाप, त्यायोगें राज्य क्षयास पावतें, यास्तव नीतिशास्त्राप्रमाणें विद्वान्, पंडित ब्राह्मण व सभासद चतुर व सभ्याधान[2] म्हणजे न्यायास[3] आले त्यांस बोलावणें आणणें करणार[4] यांस म्हणावें, तसेच आणखी न्यायकर्ते दाहापांच घेऊन, सर्वांचे संमतें न्याय निवडून, राजास निवेदन करून, किमपि अन्याय होऊं न देतां करीत असावें म्हणून सांगितलें व कोणाचीही दाद-फिर्याद आली असतां लागलीच[5] मनास आणली नाहीं, असें न घडतां करावें. न्याय करणें ते बहुत दिवस लावून त्याची जीविका[6] बुडाली असें न होतां तत्काळ गोरगरीब सर्वांचे न्याय होत असावे. कोणासही विपरीत शासन, द्रव्य-हरण होऊं नये असें बहुत रीतीनें सांगून, मुख्य गोष्ट राजाचा धर्म प्रजापालन करणें व न्याय अन्याय पाहाणें, धर्म कोण्हीं आचरिला व अधर्म कोण्हीं केला हें पाहून शिक्षा करणें, यास्तव हें सावधपणें करावें. नाहींतरि राज्यास वाईट म्हणून सांगून, लघुजन यांचे न्याय करणें ते त्या त्या ज्ञातींतील सभ्य असतील व त्यांचे त्यांचे धर्म असतील त्याअन्वयें व देशधर्म व ज्ञातिधर्म विवक्षा करून करीत जावे, असें सांगून करविते जाले.

### मद्यप्राशनानें कार्यनाश : मनस्वी पापाचार

महाराजांस मद्यप्राशन करणार व कैफी मनुष्य यांचा बहुत त्रास. सेवेचे लोक व समीप राहाणारे यांणीं कैफ सेवन केला तरि तत्काळ त्यास शिक्षा करीत. बहुतच [ कैफ ] केला, व्यसनी जाला, तरि सेवेंतून दूर करीत. कलाल यांचीं दुकानें सरकार आज्ञेखेरीज असों नयेत. ठेवावीं त्यांजवरि सरकार पागा व कारखाने यांस मद्य परवानगीनें चिठीनें देत जावें अशी ताकीद होती. सैन्यांत तरि तें अगर्दी[7] जाऊं देऊं[7] नये. कैफी माणूस जालें म्हणजे बेखबरदार होऊन कार्यनाश होतो, द्रव्यनाश होतो आणि मनस्वी पापाचार घडतो. म्हणोन बहुत मर्यादा शिक्षा करणें, असें करून ठेविलें.

### त्र्यंकोजीराजे उदासीन : कारभाऱ्यांची कर्तव्यबुद्धि

शाहाजी महाराज यांणीं चंजाऊरीं प्रांतीं राहून तो प्रांत जतन[8] केला. ते

* 'नाकबिल' § 'महाराजांनीं' १. 'जालें' २. 'सभ्य धान' ३. 'ज्यास' ४. 'करणें ५. 'न लागली' ६. 'जीविता' ७. ७. 'नेऊं' ८. 'रक्षण

कैलासवासी समाप्त जाले. ते समयीं नारो त्रिमल हणमंते कारभारी सर्वाभ्य आणि व्यंकोजी राजे तेथें होते, यांणीं त्यांचे विचारें चालोन रक्षावें ऐसें केलें. नारोपंत यांणीं अग्निहोत्र घेऊन सोमादियज्ञ करून दीक्षित जाले. त्यांचे पुत्र रघुनाथ नारायण बहुत कर्ते व शाहाणे, धूर्त, विद्वान् ऐसे जाले. शाहाजी महाराज वारल्यावरि त्यांणीं दौलत कायम राखून द्रव्यादिसंग्रह बहुत केला. व्यंकोजी राजे यावत् बालत्व दशा होती तावत् त्यांचेच करण्यांत चालत आले. नंतर स्वतां[1] पाहावें, पराक्रम थोडा असून व्याप करावे,[1] हे इच्छा धरिली. परंतु बुद्धिकरून कमी पडले. आणि सांगितल्याप्रमाणें चालावें तेंही न घडे. असे होऊन कारभारी व थोर माणसें यांचे[2] केलें[2] चांगलें न वाटून, सामान्य जन, हलकीं माणसें यांची प्रतिष्ठा बाळगून[3] त्यांचें ऐकूं लागले. याजवरून रघुनाथपंतीं विचार केला, "यांजपाशीं राहून वडिलीं मिळविली ती प्रतिष्ठा जतन होणें संकट दिसतें. धणी हे खरे, परंतु शिवाजी महाराज यांचे गुण व कर्तृत्व दिवसेंदिवस वृद्धिंगत होत चाललें. दौलतीचे खावंद ते. त्यांचे दोष आपणांवर येतील. यास्तव स्नानसंध्या करून स्वस्थ राहावें, क्षेत्रवास करावा ऐसें मनांत येतें. परंतु दौलतीस कमी आपण असोन पडेल, हाही स्वामिकार्याचा दोषच होय. म्हणोन ते कांहीं ऐकतील तितकें सांगावें.' ऐसे उदासवृत्तीनें कांहीं करतील तें पाहावें ऐसें करूं लागले. [व्यंकोजी राजे] बहुतच विलक्षण, कांहीं बांकडें केल्या, "राजेसाहेब, आम्ही तुमचे परंपरा वडिलोपार्जित सेवक, तुमचें हित करावें हें आम्हांस श्रेयस्कर जाणून करतों, तें आपणांस चांगलें वाटत नाहीं. सामान्य माणसांचा सहवास आपण[4] धरतां हें चांगलें नाहीं. वडिलीं कीर्ति कशी अर्जविली, तसेंच वडील बंधु शिवाजी राजे यांणीं कसें राज्य वृद्धीतें पाववून दिगंत विख्यात लौकिक[5] संपादिला,[5] त्यांचे भाऊ आपण म्हणून तसें चालावें. विख्यात व्हावें. आहें, हें रक्षून नवें राज्य साधून पराक्रम करावे. आम्ही समीप असतां कांहीं न जालें असें शिवाजी राजे म्हणतील. आमचे हातें सेवा घ्यावी व आम्हींही करावी हेंच आम्हांस उचित. द्रव्य व लोक पदरीं असतां नाचीजपणें लोकांहातीं द्रव्याचा व्यय व्यर्थ करवितां. वडिलीं कीर्ति मेळविली त्याहून अधिक करून दाखवावी. तरीच त्या कुळांत जन्म घेतल्याची योग्यता आहे." ऐसे बुद्धिवाद बहुतां[6] रीतींनीं केले असतां त्यांचे विचारास न येऊन त्यांचे ठायीं दिवसेंदिवस अनादर करूं लागले. हितावह बोलणें तेंच अनहित वाटूं लागलें. त्याजवरून त्यांणीं सर्व वृत्त, यांची चाल, महाराजांस लिहिली. महाराजांनींही पत्रें लिहिलीं कीं, "तुम्ही उदासीन राहातां, रिकामे लोकां-

---

१.१. 'स्वतां व्याप व पराक्रम थोडा असोन कारभार करावा' २.२. 'त्यांनीं केलेलें' ३. 'बोलगुज' ४. 'आदर' ५.५. 'जाले आहेत?' ६. 'बहुत'

हातीं कांहीं एक उद्योग* न करितां द्रव्य खाववितां, वडिलीं थोर माणसें विश्वासू जोडिलीं त्यांचे अनादर करितां, [ हें ] विहित नव्हे !" परंतु लघुमनुष्यांनीं बुद्धीस भ्रंश बहुत केला. ते समयीं पंतांनीं विचार केला जे, "यांचें अन्न वडिलोपार्जित भक्षिलें. तेव्हां यांचे ठायीं वाईट इच्छिणें योग्य नाहीं. यास्तव यांचे वडील बंधु शिवाजी राजे, महाराजांचे ज्येष्ठ पुत्र, राज्याचे अधिकारी, त्यांजपाशीं जावें हेंच उत्तम."

## कर्तव्यनिष्ठ व स्वाभिमानी पंतांचें राजकारण

ऐसें मनांत आणून एके दिवशीं व्यंकोजीराजे यांस बोलण्यांत बहुत प्रकारें बुद्धिवाद केला असतां, त्यांणीं विचाराचे मार्ग एकीकडे ठेवून उत्तर केलें कीं, "तुम्ही चाकर, सांगूं तितकें करून असावें." ऐसें बोलिले असतां रघुनाथपंतीं तत्काल उत्तर केलें कीं, "राजे हो ! आम्ही तुमचे सेवक खरेच, परंतु तुम्हांपासून गेलियावरि तुमचे अर्धासनींच बसण्यास योग्य आहों." हें उत्तर केलियावरि त्यांस फारच वाईट वाटलें. ते समयीं पंतीं कुटुंबासह[1] निरोप घेतला जे, "शिवाजी महाराज यांचें दर्शन करून येतों," म्हणोन निघाले.[2] "आपण येथें प्रसंगीं बोललों तसेंच करून दाखवावें" हेंच चित्तीं आणून "हर एक पाळेगार याशीं सख्य करून शेवटास नेणें[3] तरि यांचे राज्यास विपरीत. हें करणें अश्लाघ्यच[4] होय. शिवाजी राजे यांस राज्य साधण्याचा बहुत हव्यास, दिवसेंदिवस अधिकच संपादन करितात, त्यांजकडे जावें" हाच सिद्धांत केला. "त्यांतही आम्ही त्यांचे वडिलांचे पदरचे, म्हणोन उगेच जाणें ठीक नाहीं. राजे यांस राजकारणाचा आदर बहुत, तेव्हां इकडील संस्थानें यांचीं राजकारणें घेऊन जावीं. म्हणोन चंदी वगैरे राजकारणें सिद्ध केलीं. हें राज्य नवीन राजांचे पदरीं घालावें हें सिद्ध केलें. आणखी कित्येक राजकारणें करून कर्नाटकांतून महाराजांकडे जावें म्हणून यावयास निघाले. ते समयीं मनांत विचार आणिला जे, "विजापूरची पादशाहात बहुतकरून सुटली व दबावांत[5] आली, हाताखालीं[5] घातली आहेच. तेव्हां महाराजांस कर्नाटक प्रांतीं येण्यास भागानगरची पादशाहात मर्धा आहे. हें महाराजांस मनसब्याचे अर्थें येण्यास अवघड दिसेल. यास्तव भागानगरचेंही राजकारण[6] [ व ] सख्य जातां[6] सिद्ध करून जावें." म्हणून भागानगरानजीक आले. तेथें आकण्णा मादण्णापंत हे कुल्कारभारी[7] वजिरी करीत होते. त्यांस कसें भेटावें ? राजकारण परिस्फुट आधीं न होतां सिद्धीस जावें म्हणून, त्यांस थोर ब्राह्मण पंडित आले म्हणजे त्यांचेठायीं विशेष प्रेमा होता जाणून, आपण पंडित होऊन, प्रातःकालीं स्नानसंध्यासमयीं जावेंसें करून सर्व लवाजिमा दूर

*'उद्योग' १. 'कुटुंबास' २. 'निघोन' ३. 'नेलें' ४. 'अश्लाध्याचें' ५.५. 'दबावांत' ६.६. 'राजकारण जाणून सख्य सिद्ध' ७. 'कुल्ल-कारभारी'

दाहा वीस कोशीं ठेवून, त्यासमयीं गेले.

**पंतांचें पांडित्य : मादण्णापंत अनुकूल केले.**

मादण्णापंत बहुत थोर, ब्राह्मणांचे ठायीं निष्ठा, दानधर्मशील, नित्य लक्ष-भोजन व्हावें, तें भोंवतीं अन्नछत्र करून त्यांतून सर्वांची [ भोजनें जाल्याची ] बातमी आलियावरि आपण भोजन करावें असें वृत्त चालवीत होते, हें जगविख्यात[१] आहे, त्यांची भेट घेतली. तेथें पंडितजनसमाज सभा होऊन शिव सर्वोत्तम व विष्णु सर्वोत्तम हा विषय [ निघून ] बोलणें चाललें होतें. तेव्हां रघुनाथपंत हे वैष्णव स्वतां असतां त्यांणीं शिव सर्वोत्तम हाच पक्ष अंगीकार करून, शिव सर्वोत्तम हें स्थापून सर्वांचें समाधान केलें. विष्णुपक्ष निर्बळ जाला असतां पुन्हां वैष्णवपक्षीं बोलणें करून विष्णु-सर्वोत्तमपक्ष-स्थापना केली. आणि पुन्हां द्वैतवादियांस दूषण करून अद्वैत प्रतिपादन केलें. तेव्हां मादण्णापंत बहुत संतुष्ट[२] होऊन बहुत थोर विद्वान् जाणून, गौरव करून, स्तुति केली. " आपण स्वामी सत्पात्र थोर आहां, " असें म्हणून " कोठून आलां, काय अपेक्षित, आज्ञा करावी, " असें आण्णांनी विचारिलें. ते समयीं यांणीं उत्तर केलें कीं, " आम्हांस द्रव्याची किंवा भूमिग्राम-जीविकेची अपेक्षा किमपि नाहीं. आपण बहुत सुज्ञे,[३] धर्मिष्ठ, शास्त्रज्ञ आहां. आपणांपाशीं एकांतस्थलीं कांहीं एक चर्चा चार घटका करावी इतकी मात्र इच्छा आहे. " ऐसें बोलल्यावरि पंत यांसि एकांतीं घेऊन गेले. तेव्हां यांणीं " आम्ही पंडित याचेक[४] नव्हे, शिवाजी महाराज यांचे सेवक आहोंत. रघुनाथपंत नामाभिधान. राजेसाहेबांकडे कर्नाटकचीं राजकारणें गेलीं आहेत व या प्रांतींचीं आपलीं स्थळें पाहावीं, यास्तव चंजाऊर प्रांतीं जावयाचें[५] योजून आपणांशीं व या पादशाहींत स्नेह करावा; आपणांपासून समयपरत्वें उपयोग पडावे; तिकडून इकडील उपयोग तेच पडावे, ऐसें चित्तीं धरून आपली भेट घ्यावी अशी आज्ञा; यास्तव आलों. आपण धर्मशील व राजे धर्मस्थापना करावी हा अभिमान धरितात, करितात. त्यांस आपण साहाय्य असावें. आपले प्रभु यांचाही उपमर्द न करितां आपले प्रभुसहवर्तमान सख्य घडावें. " हें ऐकून मादण्णापंत पंतांवरि बहुत समाधानी[६] जाले. पंतांचें बोलणें व युक्ति थोर असून असे प्रकारें येऊन भेटले. महाराजांची कीर्ति पूर्वपरिचितच[७] व यांचीही ऐकिली होतीच. तेव्हां बहुत आदर करून बोलणीं होतीं तीं तदपेक्षापूर्वक[८] ऐकून त्याविषयीं सिद्धांत शपथपूर्वक स्नेह अक्षयी चालावा, दोहींकडील मनोदय सिद्धीस जावे ऐसें करून, पंतांस ठेवून घेऊन सर्व लवाजिमा आणविला. पादशाहाची भेटी

१. ' नगरविख्यात ' २. ' संतोषी ' ३. ' सुज्ञ ' ४. ' याचक '
५. ' त्यांस जावयाचें आहे, योजून ' ६. ' पंतावरि बहुत समाधान '
७. ' पूर्वी परिचितच ' ८. ' तितके पक्ष '

करवून, जातां या मार्गें जावें, भेटी घडाव्या, ऐसें करून मेजवानी वस्त्रें देऊन, पादशाहासह[1] पत्रें राजे यांस दिल्हीं. याप्रमाणें राजकारण सिद्ध करून पंत निघाले आणि महाराजांचे दर्शनास आले.

**पंतसन्मान : पंतांनीं महाराजांस दक्षणदिग्विजयार्थ सिद्ध केलें.**

महाराजांस[2] हें कळलियावरि[3] पुढें सामोरे जाऊन, सन्मानें करून पंतांस घेऊन आले. [ रघुनाथपंतांनीं ] महाराजांस त्या प्रांतींचे पदार्थ आणिले ते नजर केले. तो प्रांत बहुत सुवर्णाचा, होनाचा, त्यांत सुवर्णाचे बिचोबा, चांदण्यांस खांब सोनियाचे मढींव, व दिवट्या सोनियारुपियाच्या शतावधि, तसेच अंबाऱ्या हौदे व घोडियांचीं[4] सामानें नजर आणिलीं. खजिनाही आणिला, तें सर्व नजर केलें. महाराज बहुत प्रसन्न जाहाले. पंतीं कर्नाटक प्रांतींचीं चंदीचीं वगैरे स्थळांचीं राजकारणें आणलीं[5] होतीं[5] तींही यथावकाशें श्रवणारूढ केलीं. महाराजांस राज्यसाधनाविषयीं प्रेमा व हव्यास.[6] त्यांत राजकारणें पक्कीं करून घेऊन पंत भेटीस आले होते. व्यंकोजीराजे यांचे अव्यवस्थितपणा[7] पूर्वार्जित दौलत सर्व तेथें,[8] शाहाजी महाराजांपाशीं पदार्थ राहिले ते यावे, राज्य पाहून नवीन संपादावें, तेथील बंदोबस्त पक्केपणें राहावा, हे उत्कंठा महाराजांस जाली. आणि ते पंतावरि बहुत संतुष्ट जाले. “ मुजमूचा धंदा आपला परंपरागत आपणांकडे चालवा ” असें पंतांचें बोलणें पडलें. त्याजवरून त्यांस वस्त्रें देऊन सांगितला. आणि चंजाऊरप्रांतीं जाण्याचा सिद्धांत करून तयारी करविली. बरोबर पागा चाळीस हजार घेतली. तसेच हाषमही[9] घेतले. चतुरंग सेना— म्हणजे गज रथ, अश्व, पदाति यांस म्हणावें—तसें सैन्य बहुत तरतुदीनें घेऊन शत्रुपराभव करणें दैवावरि भार घालून करणें युक्त नव्हे. दूर जाणें तेव्हां द्रव्य बहुत व सेना व राजकारण ही तिन्हीं दृढ असावीं. राजकारणें पंत पक्की करून आलेच होते. सेना व द्रव्यही अनुकूल होतीच,[10] म्हणून तींही बहुत घेतलीं. मनसबा कसा करावा, कसें जावें, हें पंतांसह विचार करितां पूर्वीं थोर थोर राजे शास्त्राधारें नीतिकरून चालत आले. तीं तें[11] शास्त्रमत पंतांनीं उद्घाटन[11] केलें जे, “ शत्रुपराभवास मुख्य कारणें दोन आहेत. एक दैव व पुरुषप्रयत्न. त्यांत दैव हा पूर्वपक्ष; दैव पंगू होय. प्रयत्न हा सिद्धांत होय. कसें ? तरि जे उत्तम मुहूर्तें निघाल्या कार्यसिद्धि होती, तरि सेना-आदिकरून कशास पाहिजे ? सुमुहूर्तें एकटेंच जाऊन जय पावावें. म्हणजे दैवप्रधान[12] प्रमाण.

---

१. ‘ पादशाहास ’ २. ‘महाराज ’ ३. ‘ किलियावरती ’ ४. ‘ चवघड्यांचीं ’ ५.५. ‘ घेऊन आले, ’ ६. ध्यास ’ ७. ‘ अव्यवस्थित चालणें ’ ८. तेथें राहिली ९. हशम लोकही ’ १०. ‘ आहेतच, ’, ११.११. ‘ तें शास्त्रमत पंतांनीं निवेदन केलीं. ’ १२. ‘ दैवप्राधान्य. ’

अथवा अन्य सामान्य जन यांणींही उत्तम मुहूर्तेंकरूनच राजाचा पराभव करावा ऐसें व्हावें, तें घडणार[1] नाहीं; अथवा विजयप्रद मंत्र-अनुष्ठानेंच करून जय होत असावा तें घडत नाहीं. यास्तव सैन्य, द्रव्य, अमात्य, मंत्रज्ञ, हें मुख्य साधन. तेव्हां प्रयत्न हाच सबल पक्ष होय. आणि दैव[2] व प्रयत्न यांचें ऐक्यच आहे. एकास एक दोन्हींही अनुकूल पाहिजेत. एक नसल्यास एकेंच करून सिद्धि होत नाहीं. रथास[3] एकच चाक असल्यास[3] रथ चालत नाहीं. यास्तव याअर्थीं पाहातां येत्नावांचून दैवेंच करून कार्यसिद्धि होणार नाहीं. तेव्हां मुख्यत्व प्रयत्नाकडे. दैव त्यास साह्यभूत, पंगू आहे. प्रयत्नेंकरून सिद्धीस जातें. म्हणून दोन्हींची अपेक्षा धरून चालावें. दैव प्रयत्न पाहातां दोन्ही एकच होत. " ऐसें पंत बोलले असतां महाराज ही सर्वजाण. [ त्यांस ] फारच मानवलें. आणि सुमुहूर्त पाहून अनुष्ठानप्रयोगादि ब्राह्मणांस सांगोन, सर्व सैन्य, उत्तम उत्तम शूर सरदार, कारभारी, सामान पोख्त, ऐसें घेऊन निघते जाले. राज्याचा मागीळ बंदोबस्त केला. उभयतां पुत्र यांस ठेविलें व मोरोपंत पेशवे अंणाजीपंत सुरनीस हे मागें ठेविले. दिल्लीस जातां मागें यांणीं राज्यकारभार चालविला हें जाणून राज्य त्यांचे स्वाधीन करून, जवळ शत्रु होते त्यांशीं जसे रीतीनें सख्य अथवा आपण गेले असतां मागें त्यांचा उपसर्ग न पडे, राज्यरक्षण होय, असें सर्व पाहून, राजकारणें[4] राखून, फौजही पाहिजे तशी ठेविली. बहादूरखान याशीं कांहीं शत्रुत्व होतें त्यासि ममतेंत घेतला. विजापूरचा तह होताच.

## ' हेच हत्ती बाळगिले आहेत '

[ यानंतर ] आपण निघोन विजापुरी देशांतून भागानगर प्रांतीं गेलें. भागानगरास रघुनाथपंत यांसि पुढें पाठविलें. समागमें निराजी रावजी दिल्हें. उभयतां जाऊन भागानगर प्रांतांतून जातां प्रांतास तिलप्राय उपसर्ग लागूं न दिल्हा. बहुतच कैदें करून, दाणा, वैरण, लाकूड आदिकरून सर्वांनीं विकत घ्यावें. काडीमात्रास कोणीं ढका लावूं नये; बेकैदी केली असतां त्याचीं हातबोटें[5] तोडावीं,[5] ऐसा बंदोबस्त करविला. महाराजांची कैद, आज्ञा उलंघन कोण्हीं एक न करावी ऐसी होतीच. भागनगरासमीप गेलियावरि मादण्णापंत सामोरे येऊन, आदरेंकरून भेटी जाल्या. पादशाहाही दादमहालावरि आले. महाराजही गेले. पादशाहाची व महाराजांची भेटी दादमहालावरि जाली. उभयतां गालिचा[6] टाकून[7] एकासनीं बैसले. बरोबर महाराजांकडील हंबीरराव सरनौबत व रघु-

१. ' तें तर घडत नाहीं ' ' घडणार नाहीं. ' २. ' द्रव्य ' ३.३. ' एकच रथास चाक असल्यास ' ४. ' राज्यकारनें ' ५. ५. ' बोटें हात तोडावे ' ६. ' गालिच्यावरि ' ७. ' टेकून '

नाथपंत व निराजीपंत व दत्ताजीपंत वाकनीस व बाळाजी आवजी चिटणीस असे होते, त्यांसही बसण्यास परवानगी होऊन बसले. मादण्णापंत यांणीं पादशाहा-कडून फारच निर्मळपणें निखालसता[१] करविली. महाराजांनींही सफाईनेंच भेट घेऊन परस्परें आदरेंकरून बोलणीं जालीं. बराबर लोक, सरदार होते त्यांचे सन्मान करून त्यांस पादशहाणें दर्शन दिल्हें. लोकाचे कु वा न [ ? ] व सेना पाहून आपले ठायीं पादशाहा बहुतच दंग जाले. तारीफ केली. "लोक असे व त्यांस देणींही तशींच. तेव्हां मोठेमोठे धाडसाचीं कामें आंगेजणीनें होणें अशक्य काय?" म्हणोन लोकांची तारीफ केली. "हत्ती नामी किती आहेत?" असें पादशाहानीं विचारलियावरि मावळे लोक कंक, मालुसरे मोठेमोठे सरदार पन्नास[२] शंभर ब-पोशाख[३] व सामानसुद्धां होते ते आणवून मुजरे करवून भेटविले, आणि "हेच हत्तीं बाळगिले आहेत!" म्हणोन महाराजांनी उत्तर केलें! तेव्हां पादशहांनीं बहुत आश्चर्य मानिलें. तारीफ करून महाराजांची स्तुति फार केली. परस्परें स्नेहाचे रीतीनें बोलणीं होऊन शाहांनीं शिवाजी महाराजांचा आदर[४] सन्मान बहुत करून विडे पान, वस्त्रें, जवाहीर, हत्ती, घोडे दिल्हें. महाराजाचे आंगास आपले हातें अत्तर लाविलें. निखालसपणा फारच जाला. बराबर मातबर कारभारी होते त्यांस वस्त्रें कंठ्या सिरपेंच दिल्हे. सरदार यांसही वस्त्रें दिल्हीं. नंतर महाराज निरोप घेऊन डेरियास आले. एक महिना भागानगरीं मुकाम होता. मादण्णापंत यांचे मार्फतीनें राजकारण, त्यांचें[५] नित्य महाराजांकडे येणें जाणें असें करीत होते.[५] महाराजांस व सर्व मुत्सद्दी सरदार यांस मादण्णापंत यांणीं मेजवानी करून भोजनास नेलें. सर्वांस वस्त्रें दिल्हीं, व महाराजांसही वस्त्रें, जवाहीर, हत्ती, घोडे, नजर केले. महाराजांनीं मादण्णापंतांस मेजवानी भोजनाची केली. वस्त्रें, जवाहीर, हत्ती, घोडे व त्यांजकडील मंडळीस वस्त्रें दिल्हीं. आणशफत होऊन निखालसता जाली. पादशाहासही महाराजांनीं डेरियास आणोन बहुत तरतुदीनें मेजवानी वस्त्रें, जवाहीर व सर्व अमीर यांस यथायोग्य वस्त्रें जवाहीर दिल्हें. शफत-प्रमाण जाहालें. पादशाहांनीं "हे पादशाहात तुमची होय, दुसरा विचार नाहीं," ऐसा भाईचारा करार उभयपक्षींचा जाला. वरकड भागानगरीं अमीर, मनसबदार होते [ त्यांस ] ज्याची जशी योग्यता, जसा आदर करावा, तसे रीतीनें त्यांचे घरीं जाणें व त्यांस आणणें ऐसें केलें. आणि सर्व आपले लक्ष्यांत घेतले, सुदिन पाहून पादशाहाचा निरोप घेतला. निरोपास हत्ती पांच, घोडे पांच, वस्त्रें, जवाहीर, पोशाक पांच, ऐसा बहुमान महाराजांस शाहांनीं दिल्हा. परस्परें हरएकविशीं साह्य

---

१. 'स्वच्छता' २. 'पांचपन्नास हजार लोक' ३. 'बं हा'
४. 'आपण'. ५.५. 'महाराजांकडे येणें जाणें असें होते.'

करावें ये विशीं शफत-प्रमाण होऊन निरोप घेतला.

भागानगरीं केशवबोवा महापुरुष तेथें होते. त्यांचे भेटीचा लाभ जाला. सत्पुरुषांचे ठायीं महाराजांचा बहुत आदर, त्यांचें कीर्तन तें उपदेशच होय, जाणून श्रवण करते जाले. त्यांचा सत्कार द्रव्य, वस्त्रें, भूषणें देऊन केला. भागानगरीं वकिलीस प्रल्हादपंत ठेविले.

### योगभ्रष्ट महाराज : श्रीची इच्छा प्रमाण

[ तेथून ] करनाटकप्रांतीं जाण्यास निघाले ते तुंगभद्रातीरास करनोळ कडपें येथें गेले. तेथें खंडणी पांच लक्ष[1] होन घेऊन, तेथून निवृत्तिसंगमीं स्नान करून[2] श्रीशैलास गेले. अंतरपुरीवर[3] सर्व फौज ठेवून सडे गंगास्नानास गेले. तेथें गेलिया-वरि [ तें ] बहुत रम्य स्थान पाहून तेथेंच वास करावा ऐशी, योगभ्रष्ट महाराज, त्या योगेंकरून, बुद्धि उत्पन्न होती जाली. कारभारी होते त्यांसि बोलों लागले जे, "आमचे मनोरथ सर्व संपूर्ण श्रींनीं[4] केले. उभयतां पुत्र आहेत. तुम्ही सर्व कारभारी प्रतिसृष्टिकर्ते असेच आहां तसेंच द्रव्यादिसंग्रह सेना,[5] प्रांत, किल्ले, कोट, हें संपादिलें आहे. याउपरि आमचे बुद्धीस परावृत्ति जाली कीं असे स्थानींच राहून वास करावा," ऐसें बोलो लागले. याजवरून सर्वांसही संकट निर्माण जालें. बहुतांनीं सांगणें, विनंति करणें, तशी केली असतां वृत्ति फिरेना. राजे सर्वज्ञ, त्यांस सर्व अवगत. तेव्हां रघुनाथपंतीं श्रीची प्रार्थना केली. त्यासमयीं श्रीदेवीचा[6] महाराजांचे आंगीं आयुर्भाव[7] जाला.[7] आणि बोलली जे "तुजला या कर्मेंकरून मोक्षप्राप्ति घडावयाची नाहीं. तुजपासून अमानुषी कर्मे दुर्घट करविलीं व आणखीही करावयाचीं आहेत. महत्कृत्यें पुढें घडावयाचीं[8] आहेत. धर्मस्थापना[9] व प्रजापालन करावयास अधिकारी तुजला केलें आहे. मनीं कर्म धरलेंतें न धरावें." ऐसें जालें तें लेहून ठेविलें. तें श्रवण करविलें.[10] आणि आज्ञा श्रीची अशी जाली म्हणोन रघुनाथपंतीं सर्वांनीं बहुत प्रकारें प्रार्थना केली. ते समयीं 'श्रीची इच्छा, आज्ञा, ते करणें प्राप्त' म्हणोन ते स्थळीं लक्षब्राह्मणभोजन करण्याचा संकल्प करून, करविलें. धर्मही बहुत केला. घाट बांधविला. तपस्वियांस स्नानसंध्येस गुहा[11] बांधविली. दाहा बारा दिवस तेथें होते.

### शीरखान गर्दीस मेळविला : येल्लूर फत्ते : चंदी काबीज

याप्रमाणें तेथून दरमजल चंदीप्रांतीं गेले. येल्लूरचे ठाण्यास वेढा घातला. जवळ डोंगर चांगले होते ते पाहून किल्ले वसविले. त्यांचीं नांवें साजरागोजरा

१. 'हजार', २. 'वरून', ३. 'अनंतपूर', ४. 'श्रीजीनीं' ५. 'लोक' ६. 'श्री देवी' ७.७. 'आविर्भावली' ८. 'व आणखी करावयाचें महत्कृत्य पुढें घडावयाचें आहे.' ९. 'स्वधर्मस्थापना' १०. 'केलें' ११. 'मठ

ऐशीं ठेविलीं. येलूरास मोर्चे लावून जेर केलें तों शीरखान चालोन आला. नरहरी बल्लाळ सबनीस यास दाहा हजार मावळे लोक देऊन व फौज देऊन मोर्चे किल्ल्यास लाविले, तसेच कायम ठेवून आपण त्रिमली[1] महालास शीरखानावरि चालून गेले. त्याजपाशीं पांच हजार पठाण तोलदार होते व हत्ती, द्रव्य बहुत होतें. त्याशीं झगडा जाला. महाराजांनीं आंगेंकरून घोडे चालवून धारकरी यांजबरावर तरवार केली, आणि शीरखान मोडून उधळिला. गर्दीस मेळविला. त्याचे हातीं मुलूख होता तेवढा काबीज केला. पांच हजार घोडे, बारा हत्ती व द्रव्य मुबलग[2] प्राप्त जालें. यश घेऊन माघारे आले, तों येल्लूर नरहरिपंतीं फते केलें. नंतर महाराज निघोन चंदीस गेले. वेढा घातला. मोर्चेबंदी केली. पूर्वीं रघुनाथपंतीं राजकारण पक्कें केलें होतें. आयास न करितां किल्ला बोलों[3] लागला. विजापुराकडील त्या किल्यांत खानखान[4] याचे लेंक रूपखान व नासर महंमद होते, ते कौल देऊन बाहेर काढिले. त्यांचे मतलब निघते समयीं करार केले त्याप्रमाणें द्रव्य व कांहीं देश त्यांस देऊन समाधान करून स्थापिलें. चंदी-प्रांतीं, किल्ले, कोट, ठाणीं होतीं तीं महाराजांनीं घेऊन विठ्ठल पिलदेव गारूडकर[5] यांस सुभा चंदीचा सांगितला. रामाजी नळगे यास किलियाचा हवाला दिला. तिमाजी केशव यास सबनिशी सांगितली. रुद्राजी साळवी यास इमारतीचें काम सांगितलें. याप्रमाणें चंदी प्रांतघेऊन, बंदोबस्त करून महाराजांनीं अरंदिरी[6] नजीक त्रिवादी कावेरीतीरीं येऊन मुक्काम केला.

### ‘ पितृधनांत आमचा अर्धा वांटा ’

संताजीराजे शाहाजीराजे यांचे नाटकशाळेचे पुत्र, बहुत शूर, शाहाणे होते, ते चंजाऊरहून[7] व्यंकोजीराजे यांजपासोन निघोन भेटीस आले. महाराजांनीं आपले बंधुच म्हणून बहुत आदरेंकरून भेटी घेतली. सन्मान करावयाच्या रीतीनें केला. जवळ ठेविले. त्यांचें अंतर्याम बहुत शुद्ध समजलियावरून चंदीचे ठाण्यांत मुख्यत्व सांगून पाठविले. आणि तेथून व्यंकोजीराजे यांस पत्र पाठविलें जे, “ आपलेकडील गोविंदभट गोसावी व काकाजीपंत व निळोबा नाईक व रंगोबा नाईक व तिमाजी यख्तियारराव असे भले लोक पाठवून द्यावे. ” त्याजवरून व्यंकोजीराजे यांणीं पाठवून दिले. त्यांजपाशीं महाराजांनीं सांगितलें जे, “ कैलासवासी महाराज यांणीं कैलासवास केला यास तेरा वर्षें जालीं. महाराजांचें द्रव्य व जडजवाहीर, हत्ती, घोडे, मुलूख, हें रघुनाथपंतीं तुम्हांस राज्यीं बसवून संपूर्ण[8] तुमचे स्वाधीन जालें.[8] ऐशियास तें पितृधन होय. आमचा अर्धा वांटा

१. ‘ त्रिनोमल ’ २. ‘ जाबलगा ’ ३. ‘ बाके ’ ४. ‘ खान ’, ‘ खानखाना ’ ५. ‘ गोराडकर ’, ‘ गारूढकर ’ ६. ‘ अरंदी ’, ‘ अरदरी ’ ७. ‘ चंजाउरीं ’ ८. ८. संपूर्ण जाली ’, पूर्ण तुमचें स्वाधीन केलें. ’

तुम्हींच आजपर्यंत उपभोग केला. तो आम्हीं तुम्हांपाशीं मागावा तरि बहुत दूर होतों. बरें बोलें[1] तुम्ही देणार नाहीं. म्हणून आजपर्यंत आम्हीं सबूरी केली, जे 'तुम्ही महाराजांचे पुत्र आहां. खातात[2] तोंपर्यंत खावोत. मालाचे धणीच आहेत. आम्हांस जे समयीं पाहिजे व फावेल ते समयीं व्यवहार सांगून घेऊं,' ऐसें मनीं धरलें होतें. ऐशियास राजकारण प्रसंगें करून आम्ही कुतुबशाहाचे भेटीस भागानगरीं आलों; तेथून कर्नाटकांत आलों; या प्रांतीं येऊन चंदी घेतली; वरुण-तर्फेचा मुलूख हस्तगत केला; शीरखान झगड्यांत गर्दीस मेळविला; शीरखानाचे हातीं प्रांत होता तेवढाही घेतला. कावेरीतीरीं येऊन भले लोक पाठवावे असें तुम्हांस लिहिलें. त्याजवरून तुम्हींही पाठविले. त्यास "याप्रमाणें तुम्ही जाऊन आमचे निरोप सांगावे." म्हणोन सांगोन पत्रेंही या अन्वयें लेहून दिल्हीं. आणि त्यांजबरोबर आपलेकडील बाळंभट गोसावी व कृष्णजोशी[3] व कृष्णाजी सखाजी असे देऊन रवाना केले.

### व्यंकोजीराजांनीं कपटबुद्धि धरली.

त्यांणीं जाऊन महाराजांचे बोलणें व सर्व वृत्तांत सांगितला असतां ते गोष्ट मनांत न आणितां कपटबुद्धि धरून[4] व्यंकोजी राजे आपणच खासा भेटीस निघोन आले. आणि नम्रत्वें बोलोन वांटियांचे बोलणें न करितां, सारेंच आपण खावें ऐसा चित्तीं निश्चय धरिला. महाराजांनीं बहुता रीतीनें बोलविलें, परंतु वांटा द्यावा हें अंतःकरणीं न येई. तेव्हां महाराजांनीं विचार केला जे "हे जें धाकटे भाऊ, आधीं बोलणीं निश्चयांत आणून यावें, ते आधींच आपण होऊन[5] भेटीस आले. यांसि धरावें, वांटा घ्यावा, तरि ही गोष्ट थोरपणाचे इजतीस[6] लायख नाहीं." या निमित्त राजें यांस वस्त्रें बहुमान देऊन निरोप दिल्हा. बरोबर पाठवण्यास रूपाजी भोंसले व मानसिंग मोरे[7] व अनाजी रंगनाथ मळेकर[8] देऊन चंजाउरास पोंचऊन आले.

व्यंकोजी राजे गेलियावरि पुन्हां महाराजांनीं शामजी नाईक पुंडे व कोनेरीपंत[9] व शिवाजी शंकर यां हातें बहुता रीतीनें सांगून पाठविलें कीं, "तुम्ही व आम्ही वांटे करून घेऊन परस्परें समाधानें राहावें. गृहकलह वाढविलिया उभयपक्षींही वाईट. कष्ट होत. पूर्वी पांडव कौरव बहुत कष्टी जाले. हें मनांत आणून कलह वाढवूं नये. आम्ही आपला पितृधनाचा अर्धा वांटा मागतों तो द्यावा. हें न करतां धर्म सोडून आमचा अर्धा वांटा आजपर्यंत खादला, पुढें खाऊं इच्छितां, हें

१. 'बोलून' २. 'खातील' ३. 'कृष्णंभट जोशी' ४. 'करून' ५. 'बोलून' ६. 'इजतीमध्यें ७. 'मोरवे' ८. 'मलकर,' 'केळकर' ९. 'कान्होरीपंत'

विहित नाहीं, असें सांगून पाठविलें असतां उत्तर यथास्थित न करितां त्यांस लावून दिल्हें. महाराजांनीं विवेक केला जे "आपणच आलों. ते भेटीस येऊन गेले. कनिष्ठ बंधु, त्यांजवरि जातीनें जाऊन पुरुषार्थ करणें विशेष नव्हे." एसें समजून उपेक्षा केली.

## आंगी आविर्भाव, भविष्यवाणी

यानंतर आरंदर[1] नजीक त्रिवादी[2] कावेरी-तीर याचे मुकामीं रघुनाथपंत यांस, पुढें या राज्याचें भविष्य कसें आहे, हें महाराजांस प्रार्थना करून देवी आणोन विचारावें एेशी इच्छा होऊन विचारिलें. शालिवाहान शके १५९९ प्रमादी[3] नाम संवत्सरे, चैत्र बहुल त्रयोदशी भौमवारे ते दिवशीं महाराजांचे आंगीं श्री भवानी आयुर्भाव होऊन भविष्य सांगितलें. तें वाक्य बाळाजी चिटणीस व वाकेनीस[4] यांनीं लेहून ठेविलें :—

१. देशीचें राज्य तांब्र घेईल. रायगड जाईल. संभाजी राजा सांपडेल. हैराण होतील. कलम १

१. चंदीस राजाराम राज्य करील. चंदीचे राज्याकडून मागती देशीचें राज्य प्राप्त होईल. कलम १

१. पुढें मागती राजा शिव नामें होईल. दिल्लीपावेतों राज्य घेईल. एकराज्य करील. कलम १

१. पुढें भोंसले यांचें राज्य सत्तावीस पिढ्या होतील. एक हजार वर्षेंपर्यंत[5] शक चालेल. कलम १

१. पूर्वजन्मी शिवाजीनीं सत्तावीस कावडी स्व-आंगें भागीरथीच्या आणून रामेश्वरीं घातल्या व सत्तावीस जन्म[6] श्री भवानीस शिरकमलें वाहिलीं. कलम १

१. या पुण्येंकरून सत्तावीस पुरुष भोंसले यांचें राज्य चालेल. सत्ताविसावा पुरुष राजा गर्भांध होईल. तो राज्य सर्वस्वी बुडवील. कलम १

एकूण कलमें साहा.—याप्रमाणें श्रींनीं आंगीं येऊन रघुनाथ हणमंते यांणीं श्रीस प्रार्थना केली त्याजवरून सांगितलीं तीं लिहिलीं आणि गुप्तरूपें महाराजांस दाखवून ठेविलीं.

महाराजांनीं चंदी आदिकरून मोठीं मोठीं स्थळें[7] व किल्ले, प्रांत साध्य केले. येलूरचा कोट बहुतच मजबूद, ज्याचे खंदकांत पाणी, त्यांत सुसरी, असा बळकट होता. तोही घेतला. महाराजगड व जगदेवगड व कर्नाटकगड हेही घेतले. दोन चार कोटींचें राज्य साधिलें.

१. 'आरंदी' २. 'त्रिवापी' ३. 'प्रमोदी', 'प्रमाथी' ४. 'वाकेनीस जमेनीस' ५. 'वर्षे' ६. 'जन्मे' ७. 'संस्थानें'

ते समयीं दिल्लीस वकील व बातमीदार होते त्यांचीं पत्रें आलीं जे, "पादशाहास दक्षण-प्रांतीं जाण्याची इच्छा अंतर्यामीं निर्माण होऊन, फौज सामान तयारी करून आपले प्रांतांत किल्ले कोट यांचे बंदोबस्तास म्हणोन निघणार!" निघाले हें वर्त्तमान समजलें. तेव्हां देशीं जावें, आपला बंदोबस्त राखावा म्हणोन निघावयाचा विचार करून, चंदी वगैरे राज्य सोडविलें, तेथें संताजीराजे व रघुनाथ नारायण हे मुख्यत्वेंकरून ठेविले; व हंबीरराव सरनोबत* व फौज कांहीं तेथें ठेवून पक्का बंदोबस्त वहिवाट होई तोंपर्यंत सारी फौज नेणें ठीक नाहीं, म्हणून दाहा हजार फौजेनिशीं सरनोबत यांस ठेविलेः आणि महाराज घाट चढून कोल्हार बाळापूर तालुक्यांत आले. तेथें ठाणीं घेतलीं. प्रांत काबीज केला, व किल्ले कोट घेतले. नवे किल्ले डोंगर पाहून वसविले. त्या प्रांतींचे पाळेगार कित्येक गर्दीस मेळविले व ज्यांणीं खंडणी सालाबाद करार केली त्यांस स्थापिलें. प्रांत घेऊन त्या प्रांतीं[1] कांहीं फौजेसुद्धां मानसिंग मोरे[2] व रंगो नारायण ठेविले. अरणीचा कोट वेदो भास्कर याजकडे शाहाजी महाराज यांणीं दिला होता, त्याप्रमाणें महाराजांनीं, त्यांचे पुत्र आठजण[3] होते ते येऊन भेटले. बहुत मर्द, शूर, कर्ते पाहून त्यांस तो तालुका प्रांत सुद्धां तीन लक्ष होनांचा इनाम करून देऊन सेवा सांगून चालविला. त्यांणी त्या प्रांतीं फौज ठेवून प्रांत रक्षावा, सेवा[4] करावीसें केलें.[4] श्रीरंगपट्टण वगैरे खंडण्या घेऊन, गदग लक्ष्मेश्वर येथें आले. दोनही कोट घेतले. खानगौडा देसाई पळोन गेला. गदग प्रांतीं आले. बेलवाडें[5] कर्यातीचे मार्गें येतां मलव्वाई[6] देसाईण इणें महाराजांचे फौजेचे कहीकबाडास उपसर्ग दिला. हें वर्त्तमान कळतांच बेलवाडें[7] यास मोर्चे दिल्हे. सत्तावीस दिवस कोट भांडला. नंतर घेतला. ठाणें घेतलें. मलव्वाई देसाईण धरली. स्त्रीस शिक्षा काय करावी? म्हणोन एक दोन गांव खाऊन असावें, अशी हलखूद[8] करून राखिली.

कोल्हार प्रांतीचा बंदोबस्त करून, महाराज पुढें येतां विजापूरकराकडील[9] हुसेनखान माईणा व लोदीखान दाहा हजार स्वारानिशीं आपला प्रांत चंदी वगैरे घेतला म्हणोन चालोन आले. त्यांस तंबी पोहोंचून मोडून गर्दीस मेळविलें. घोडे, हत्ती पाडाव करून तेथून कोपाल तुंगभद्रातीरीं आले. कित्येक पुंड पाळेगार यांजपासून खंडणी घेऊन, पादाक्रांत करून आपलेसे केले. वर्षास[10] खंडणी देणें याचे धारे बांधिले. बावलीखान पठाण आपले प्रांतावर चालून जातो, हें वर्त्तमान महाराजांस

* 'सरनौबत' १. 'प्रांतींचीं' २. 'मोरवे' ३. 'साहाजण' ४.४. 'सेवा करावीशी केलें.' 'सेवा करावी असें केलें.' ५. 'बलवड', 'बेलवेड', 'बेलवाडी' ६. 'मल्हाई,', 'मलवाई' ७. 'बलवड यास' 'बेलवडें यास' 'बेलवड्यास' ८. 'हलकूद' ९. 'विजापूरकडून' १० 'वर्षासन'

कळतांच निळोजी काटकर यास फौजसुद्धां त्यांजवर पाठविलें. त्याणीं दुरगाबाज[1] येथें गांठिलें. युद्ध जालें. बावलीखान[2] यास बुडविलें.

### व्यंकोजीराजांना दुर्बुद्धि झाली.

त्यासमयीं व्यंकोजी राजे कावेरी-तीरींहून निरोप घेऊन गेले होते. महाराजांस मनसब्याचे रीतीनें देशीं येणें प्राप्त व आपणच त्यांजवर मसलत करणें ठीक नाहीं जाणोन निघोन आले. पत्रें व शामजी नाईक पाठविले असतांही त्यांचें अंतःकरण शुध्ध जालें नाहीं. महाराज तोरगळ प्रांतीं येऊन पोहोंचले असतां तिकडे संताजी भोंसले व रघुनाथपंत व हंबीरराव सरनोबत त्या प्रांतीं ठेविले होते, त्याजवर व्यंको-जीराजे यांणीं कांहीं मोंगली फौज, मोंगलाकडील सरदार यांशीं राजकारणें करून, दुर्बुद्धि धरून तुरूख लोक जमा केले, मेळविले. आणि त्यांचे बुद्धीस लागून व जवळ मुत्सद्दी हलकीं नाकाबिल माणसें यांचे सल्लयानें खासा आपणच चालून आले. युद्ध करावें ही बुद्धि धरून आपली सारी जमियत[3] एकवट करून येऊन, वालगोंडा-पूर येथें येऊन पोहोंचले. तेव्हां महाराजांकडील फौज चालून रघुनाथपंत व सरनौबत सर्व मिळोन पुढें गेले.[4] कित्येक प्रकारें सांगून पाठविलें. परंतु विचार न करितां महाराजांनीं प्रांत सोडविला, हा सारा आपणांकडे असावा हेंच चित्तीं भरून चालून घेतलें. पंत यांणीं मर्यादा रक्षून लढाई द्यावी म्हणतां, तुरूख लोक यांणीं निकड केली. तेव्हां महाराजांचा बचाव राखोन, घोडे चालवून फौज मोडून गर्दीस मेळविली. व्यंकोजी राजे यांजकडील प्रतापजी राजे व भिवजी राजे व शिवाजीपंत डबीर ऐसे तिघे पाडाव केले. कित्येक मारिले. पराभव पावोन, व्यंकोजी राजे शें दोनशेंनिशीं, याणीं[5] कसे धरावे म्हणोन मर्यादा केली म्हणोन पळोन गेले.

### बंधूस कानपिचक्या

हें वर्तमान सरदार व पंत यांणीं मुकाम मजकुरीं महाराजांस सविस्तर लिहून पाठविलें. तेव्हां राजे यांसि पत्र[6] लिहिलं[6] जे, "याउपरि वांट्याचा वगैरे निर्गम करावा. नाहीं तरि चंजाऊर सुद्धां अंमल बसविणें प्राप्त आहे." महाराजांस बातमी येऊन पावलियावर व्यंकोजी राजे यांस पत्र निषेधयुक्त पाठविलें जे "तुम्ही महारा-जांचे पुत्र, बहुत थोर लोक, असें असोन कांहींच विचार करीत नाहीं. धर्माधर्म विचारीत नाहीं. असें करितां कष्टी व्हाल. तुम्ही म्हणाल कीं, 'काय विचार करावा?' तरि ऐसा विचार करावा होता कीं 'अधर्मेंकरून आपण आजपर्यंत खादलें, आतां आर्धा वांटा मागतात तो द्यावा. त्यांचा भाग त्यांस देऊन आपण सुखरूप राहावें;

---

१. 'दुरंगाबाद' २. 'हावेलीखान' ३. 'जमायत' ४. 'मेले' ५. 'त्यांस' ६.६. 'पत्रेंही लिहिलीं'

श्रीमहादेव श्रीतुळजाभवानी यांची त्यांजवरि पूर्ण कृपा जाली आहे, दुष्ट तुरूख[1] लोक ते मोडितात[2] आणि आपण आपले सैन्यांत तुरूख लोकही मेळविले असतां जय कसा होईल ? तुरूख[3] लोक त्यांपुढें कसे जगूं पाहतील[3] ?' हा विचार करावा होता. आणि युद्धाचा प्रसंग पाडावा[4] न होता.[4] दुर्योधनाची बुद्धि करून लोक मारविलेत. सेवकांहातीं अपजय पावून लौकिक करून घेतलात ! पुढें तरि ये जातीचा हट्ट न करणें. कित्येक प्रांत आमचे आम्हीं घेतले. अरणी, बेंगरूळ, कोल्हार, होसकोट, सिरकटें किरकोळ जागा व चंजाऊर असें तुमचे[5] हातीं राहिले. तें आमचे विभागाचें आमचें लोक यांचें स्वाधीन करावें. नख्त पैके व जडजवाहीर, हत्ती, घोडे यांचा अर्धा वांटा महाराजांचे हातची वस्तु मात्र विचार करून आम्हांशीं संधि तुम्हीं करणें. तुम्ही ऐसा संधि निर्मळपणें केलियावरि, आम्ही आपणापासोन तुंगभद्रा[6] ऐलाड पनाळा प्रांतीं तीन लक्ष होनांची दौलत तुम्हांस देतों. अथवा आम्हांजवळील[7] तुम्हांस मानेना,[7] तरि कुतुबशाहाशीं बोलोन त्याजपासून तुम्हांस तीन लक्ष होनांची दौलत देववितों. दोहींतून एक मनीं धरून मान्य करणें. हटाचे हातीं न देणें. आपणांत आपण गृहकलह करावा आणि कष्टी व्हावें, याचें प्रयोजन नाहीं. याउपरि तरि आपला आमचा संधिव्यवहार करावा ऐशी बुद्धि मनीं धरून वांटियाचा व्यवहार निर्गमांत आणून टाकणें आणि सुखरूप असणें. गृह-कलह बरा नव्हे. आम्ही तरि वडीलपणीं आजपर्यंत सांगितलें. आतांही[8] सांगतों. ऐकाल तरि बरें. तुम्हीच सुख पावाल. न ऐकाल तरि तुम्हीच कष्टी व्हाल !" याप्रमाणें लिहून कितेक पर्याय पाठविले, व रघुनाथपंतासही "याउपरि तह करून घ्यावा, ते खातात ते महाराजांचे पुत्रच आहेत, खावोत; तटी[9] न लावितां, त्यांचा स्वरूप-नाश न करितां, आब राखून सख्य करणें." ऐसें लिहून पाठविलें.

### शब्द खरा करून दाखविला.

यावर व्यंकोजीराजे यांचे मागें महाराजांची फौज गेली होती, बोलणें लागलें होतें. तों महाराजांचें पत्र निषेधाचें गेलें. तें पाहून, "वडील बंधु वडिलांप्रमाणें व त्यांचें दैवही विचित्र, त्यांशीं कलह करणें चांगलें नव्हे.[10] आपण केलें कर्म सर्वांचे बुद्धीस लागलीं[11] हें वाईट फार केलें." या प्रकारें बहुतच पश्चात्ताप होऊन संधीचें राजकारण लावून, तह ठरविला. रघुनाथपंतांची भेट व्हावीसें केलें.[12] जाल्यावरि

१. 'मूर्ख' २. 'मारितात' ३. ३. 'दुष्ट मूर्ख लोक त्यांपुढें कसे जगूं पाहतील' ४.४. 'पाडायाचा नव्हता', 'पाडावा नव्हता.', ५. 'आमचे' ६. 'तुंगभद्रापलीकडे' ७.७. 'हा न माने तरी' ८. 'असतांही' ९. 'तटी' १०. 'चांगलें न केलें', 'चांगलें न झालें' ११. 'लागले' १२. 'भेटी व्हाव्या ऐसें'

पंतीं आड घातला[1] जे, "आम्ही शिवाजी महाराजांचे सेवक, तुम्ही धाकटे बंधु, आमची भेटी होणें ते महाराजांचे इराद्याप्रमाणें बराबरीहून अधिक व्हावी." ते समयीं त्यांणीं मान्य केलें. मध्यें डेरे देऊन तिकडून राजे हत्तीवर बसोन आले. तसेच आपणही अंबारींत बसोन मागें सरनौबत व संताजी भोसले यांच्या अंबाऱ्या ठेवून पोशाख वगैरे जिलिबी, निशाणें एकसारखें करून, जितके चालले तितकेच आपण चालून डेरियासमीप बराबरीनें आले. हत्तीवरून उतरणें ते राजे उतरल्यावरि आपण उतरले. डेरियांत बराबरीनें हात धरून आले. मसनदी दोन करविल्या होत्या. भेटी जाल्यावरि बसावयास मसनदीपाशीं बराबरीनें हात धरून गेले. आणि पंतांनीं हात सोडून घेऊन, "या मसनदीचे आम्ही चाकर. याजवर बसण्यास योग्य तुम्हीच" म्हणोन राजे यांस बसवून, आपण मुजरे करून पूर्वमर्यादेप्रमाणें बसले. "जसे शिवाजी महाराज तसेच आम्हांस तुम्ही. 'साहेबांपासून गेलियावरि अर्धासनीं बसण्यास योग्य ऐसे चाकर आहों,' ऐसें बोललों. तेव्हां स्वामींनीं 'तुम्ही चाकर, सांगूं तितकें काम करावें' असें सांगितलें म्हणून इतकें करावें लागलें. बरकड जसे चाकर तसे आम्ही चाकर नव्हे, असें समजूनच वडिलीं पालग्रहण केलें आहें, तसेंच आपणही करावें. आम्ही तुमचे हितावांचून प्राणही गेला तरी चालावयाचे नव्हत, व स्वामी वांकडे चालले असतां विनंति करावयास चुकावयाचे नाहीं. आम्ही हीं संस्थानें व राज्य साधण्याविशीं विनंति करीत गेलों, आपण न ऐकिलें. लहान माणसांचेंच पथ्य पडत गेलें. महाराज पराक्रमी; सांगतांच दूर देशीं असतांही[2] राज्य साधावें, पराक्रम करावे, म्लेंछ दुष्ट संहार करावे, धर्म स्थापावा[3] हेच वासना; तसीच हिंमत करून, आमची विनंति मान्य करून येऊन तीन चार कोटींचें राज्य संपादिलें. तुमचे ठायीं महाराजांचा मोह बहुत, इतर भावना किमपि नाहीं. बहुत लोभ ममता आहे. वारंवार आम्हांस लिहिणीं[4] येतात.[4] 'या उपरि स्वच्छपणीं पूर्वी जसें श्रीरामचंद्रजीचे आज्ञेंत लक्ष्मण भरत चालले तसेंच चालत जावें हाच आपला धर्म. येणें करूनच वृद्धीस पावाल. हरएक कारण पडल्यास आम्हांस आज्ञा करीत जावी. ते समयीं आम्ही सेनासह येऊन साह्य करूं.' आम्हांस जसे महाराज तसेच तुम्ही, दुसरा विचार नाहींच, कार्यप्रयोजनाव्यतिरिक्त उगेंच लोकांहातीं निष्कारण खाववूं[5] नये. महाराजांचेच प्रमाणें उद्योग करून राज्यसाधन करावें." ऐसें कित्येक प्रकारें बोलोन, निरोप घेऊन, निमे प्रांताचा ऐवज त्यांज-कडील येत जावा, असें करून घेऊन, व पूर्वीचे पदार्थ हत्ती, घोडे जवाहीर मर्जीस येईल तें महाराजांस रवाना करावें, असें सांगोन निघोन आले. चंदी प्रांतीं पावले.

१. 'घातली' २. 'असतांही परंतु' ३. 'धर्मस्थापना' ४. ४. 'लिहितात' ५. 'खाटावूं'

## प्रतापगडीं श्रीदेवीचें, रायगडीं मातोश्रींचें दर्शन

इकडे महाराज तोरगळप्रांतांतून पनाळियावरून साताराप्रांतीं येऊन, श्रीस्वामीचें दर्शन करून, प्रतापगडीं श्रीदेवीचें दर्शन केलें, आणि रायगडावर येऊन पावले. मातुश्रीचें दर्शन घेऊन तिजला तिकडील सर्व वृत्त निवेदन केलें. उत्तम पदार्थ आणिले ते दाखविले. द्रव्यही बहुत आणविलें तें सर्व निवेदन केलें. आणि भागानगरीं पादशाहास व मादण्णापंतास लिहून पाठविलें जे, कर्नाटकप्रांतीं स्वारी करून यश व प्रांत घेऊन, स्वदेशीं येऊन सुरक्षित पोहोंचलों. त्या वरून त्याणीं वस्त्रें बहुमान, हत्ती, घोडे, जवाहीर देऊन निराजीपंत तेथें ठेविले[1] होते ते व आपले वकील ऐसे पाठविले. महाराजांनीं वकिलांस बहुमान करून निरोप दिला.

## परत येतां येतां उभयतां सरदारांचा पाडाव

महाराज देशीं आलियावरि कांहीं दिवस कर्नाटकप्रांतीं फौज व सरनोबत यांस[2] बाकी फौज घेऊन हुजूर येणेंविषयीं त्यास त्यांणीं लेहून आणविले.[2] त्यास व्यंकोजी राजे यांचा तह जाला, व तिकडील राज्य साधिलें. तिकडील बंदोबस्त [ संबंधें ] रघुनाथपंतीं वर्त्तमान लिहिलें यावरून संताजीराजे व रघुनाथपंत यांणीं राहून दौलत तिकडील सांभाळावीसें करून ठेवून, दाहा हजार फौज त्यांजपाशीं देशींची नेहमीं राहावी, असें करून ठेविलें. आणि हंबीरराव सरनोबत यांस बाकी फौज घेऊन हुजूर येणेविशीं लिहून आणविलें. त्याजवरून सरनौबत निघोन देशीं महाराजांचे दर्शनास येतां मार्गीं हुसेनखान माइणा व लोदीखान चालून आडवे जाले. त्यांस सरनोबत यांणीं युद्ध करून मोडले. हुसेन खान आणि लोदीखान उभयतां पाडाव केले. फौज लुटली. फते पावून त्यांस घेऊन आले. महाराज बहुत संतोषी होऊन, सामोरे जाऊन भेटी घेतली. सर्वांस आदरें करून ज्यांणीं ज्यांणीं जशी सेवा केली होती, ते जाणोन त्याप्रमाणें त्यांस बक्षीस, बहुमान, तैनात वाढविणें ते करते जाले. हुसेनखान व लोदीखान यांस वस्त्रें बहुमान देऊन खर्चास व लवाजिमा देऊन विजापुरीं जाण्यास निरोप दिला.

याप्रमाणें महाराज यांणीं दक्षणप्रांत सर्व यक राज्य पश्चिमसमुद्रापासून श्रीरामेश्वरापर्यंत दक्षिणचें यक आज्ञा ऐसें केलें.

दक्षणदिग्विजय प्रकरण समाप्त.

---

१. ' पाठविले ' २. २. ' ठेविले होते.'

प्रकरण सप्तम

# राज्याभिषेक

**' राज्याभिषेक, छत्रसिंहासन करून धर्मेकरून राज्य करावें ......'**

श्रीशिवाजी महाराज यांणीं दक्षणप्रांतीं जाऊन चंदी वगैरे स्थळें हस्तगत केलीं. वरकड मांडलिक राजे, पाळेगार सर्व पादाक्रांत जाले. करभार खंडणी प्रतिवर्षी द्यावयाचीं त्याचीं वार्षिकें बांधिलीं. विजापूरची पादशाहात सर्व हस्तगत जाली. भागानगरचे पादशाहांशीं सख्य बहुतच अकृत्रिम जालें. दौलतावादची पादशाहात दिल्लीचे पादशाहांनीं पूर्वी घेतली, सुभे ठेविले, तेही पराक्रमेंकरून बुडवून त्यांचे प्रांतांतील किल्ले व स्थळें बहुत घेतलीं; सुभे बुडविले; दिल्लीस जाऊन पादशाहाची हिंमत व कर्तृत्व पाहिलें. साडेसहा सुभे दक्षणप्रांत, यांत बहुतकरून राज्य आपणांस हस्तगत जालें, व राहिलें त्यांत चौथाई, मोकासा, बाबती, घासदाणा, साहोत्रा ऐसे तह आपले जबरीनें करून निमे अंमल आपलें स्वराज्य त्यांतही[1] जालें.[1] एक दिल्लीपति राहिले. त्यांचाही उपमर्द आपण केला. त्यांणीं जे जे सरदार पाठविले ते मारिले. ते गर्दीस नेले. रामेश्वरपर्यंत एक साम्राज्य[2] आपण केलें. याउपरि आपण असे रीतीनें राज्य करणें,[3] तेव्हां पाळेगारांतच संख्या[4] आपली होती. यास्तव याउपरि राज्याभिषेक करून, छत्रसिंहासन करून, पूर्वी धर्मेंकरून राजे राज्य प्रधानयुक्त[5] करीत आले, तसें करावें हें महाराजांनीं अंत:करणांत आणून, उद्योग करण्यास प्रारंभ केला.

**हताश, हवालदील औरंगजेब**

या समयांत दिल्लीहून औरंगजेब बहुत प्रकारची फौज[6] घेऊन तरतुदीनें[6] निघाले, तेव्हां त्यांनीं मनीं विचार केला कीं, दक्षण प्रांतीं जाण्यास विजापूरची पादशाहात बुडाल्यांतच[7] जमा आहे. शिवाजी राजे यांणीं त्यांचा सर्व प्रांत व स्थळें घेतलीं असतां त्यांशींच सख्य करून स्थळ रक्षून राहिले आहेत.[7] भागानगरचे

१.१. ' त्यांतही सामील झालें ' २. ' एकसाहा राज्य जालें ', ' साम्राज्य जालें ' ३. ' केलें तर ' ४. ' संख्य ' ५. ' अष्टप्रधानादियुक्त ' ६. ६. ' फौजेची तरतूद करून ' ७. ७. ' बुडाल्यांत आहे परंतु शिवाजी राजे यांणीं साह्य शर्तीनें करून, दिलेलखान याणीं मसलत केली, जेर करून, कोट घ्यावा, इतक्यांत रक्षिली. आपले फौजेचें कांहीं एक चालूं दिलें नाहीं. '

पादशाहा त्यांची त्यांची भेटी होऊन अतिसख्यत्व मादण्णापंत तेथील वजीर त्यांचे योगें जाहलें, तेव्हां दोन्ही उद्योग केले असतां शिवाजी राजे त्यांचें साह्य करणार. त्या अर्थी जावें तरि त्यांजवरिच मोहीम करावी. त्यास[1] आपल्या फौजा व सरदार गेले ते नामोहरम केले. आपण जाऊन त्यांशीं[2] लढावें तर शिवाजी दैववान्, फौज खजिना याजपाशीं बहुत. त्यांतही उमराव, सरदार, मुत्सद्दी हे जवांमर्द, मनसबेबाज बहुत संग्रह त्यांनीं केला. त्यांचा पराभव या काळीं आपले हातें घडावयाचें दिसत नाहीं. जातीनें खबरदार असे की, विजापूरकर यांचें सर्वस्व घेऊन ईहसान त्यांजवर केलें. भागानगरकर तरि तेच ऐसे जाले. तेव्हां याचें साह्य ते सर्व प्रकारें करितील. यास्तव आपलेच प्रांतीं राहून बंदोबस्त करावा. आपण त्या प्रांतीं चाल केली असतां ते आमचे या प्रांतावरि चालून येण्यास याउपरि चुकणार नाहींत. म्हणून किल्ले रणथंबोहर,[3] मातबर, जागा, किल्ला बहुत मजबूद, तेथील सुभेदार पादशाहाशीं बदलून हुकूम न मानितां राहिला होता, त्याचें पारिपत्य करावें हा विचार सर्व वजीर आदिकरून उमराव यांचे विचारें करून त्या प्रांतीं औरंगजेब गेले.

## क्रूरकर्मा इलाचीबेग

एके दिवशीं वजीर[4] सर्व मिळून 'कशी मसलत करावी' म्हणून विचारास बसले. तों मोर्चेल-बारदार इलाचीबेग म्हणून मोर्चेल घेऊन मागें उभा होता. तो पुढें येऊन त्याणें अर्ज केला जे, "हजरतीस इतका विचार कां पडला ? मजला पाठवावें. दोन फरमान, एक किल्लेदार यास व एक लोकांस ऐसे दोन-द्यावें. एकटाच जाऊन किल्ला फत्ते करून येतों." त्याजवरून त्यास नवाजून दोन फरमान दिल्हे, आणि वस्त्रें देऊन रवाना केला. तो एकटाच किल्ल्यावरि गेला. वरतीं जाऊन त्याणें किल्लेदार यास एकीकडे 'हुकूम सांगावयाचा आहे' म्हणोन उठवून नेला आणि तेच स्थळीं कटार चालवून, गळा कापून, शीर रुमालांत घेऊन बाहेर येऊन "हरामखोर सरकार[5] हुकमें करून मारिला.[5] तुम्हांस पादशाही फर्मान आहेत," म्हणून काढून देऊन, सर्वांचा दिलासा करून, किल्लेदार याचा लेंक यास खातरजमा करून, पादशाहापाशीं येऊन पोहोंचला, वर्तमान समजाविलें. पादशाहांनीं किल्लेदार याचे लेंकास किल्लेदारी, सुभा दिल्हा, आणि "या उपरि हुकमाखेरीज न चालावें" सांगितलें. "इलाचीबेग याणीं शर्त केली, परंतु त्यास समीप ठेवणें सेवेमध्यें ठीक नाहीं," ऐसें वाटून यास वाढवून दूर ठेवावा म्हणून सरदारी देऊन वाढविला, आणि तेथें छावणी करून पादशाहा राहिले. शिवाजी राजे यांचा प्रताप,

१. 'त्यांणीं' २. 'त्यांचे बळें' ३. 'रणथंबोर' ४. 'सर्व मिळून', 'वजीर व सर्व' ५. ५. 'सरकार हुकूम यानें अमान्य केला यास्तव यास मारिला.'

फौज पराक्रम विशेष जाला, दक्षण प्रांतीं जाणें ठीक नाहीं म्हणून त्या प्रांतींच पादशाहा राहिले.

नंतर हें सर्व वर्त्तमान वकील यांणीं हरवडी बातमी अंतर्यामची[1] व बाह्यरंग[1] वजीर आदि मसलतीची घेऊन लिहिली. याजवरून विचार केला कीं, " दिल्लीपति याजवरि आपलें तेज पडलें. आपण सिंहासनाधीश्वर व्हावें. आपलेपाशीं सर्व सरकारकून, मंत्रविशारद, शूर निपुण, राजकार्याचे ठायीं दक्ष, जनांचे ठायीं दया, परोपकारकर्त्ते ऐशांचा संग्रह जाहला तो किती ? अमात्य व सेनाधिकारी तो किती ? एक एक योग्य असे चतुरंग सेना व कोश द्रव्य असावें तसा संग्रह जाला तो किती ? सरकारकून व सरदार व प्रांत कोण कोण किती प्राप्त जाले. ते समजण्यासाठीं महाराजांनीं निवडून काढून पाहिले ते बिततपशील:—

| | | |
|---|---|---|
| १. मोरो त्रिमळ पेशवे. | १. रामचंद्र नीळकंठ. | १. रघुनाथ नारायण पंडितराव ‡ |
| १. अण्णाजी दत्तो. | १. बाळाजी रघुनाथ. | १. नरहर बल्लाळ सबनीस. |
| १. रावजी सोमनाथ सुभे[2]. | १. जीवनजी दत्तो. | १. जनार्दनपंत हणमंत मजमदार. |
| १. दत्ताजीपंत वाकेनीस. | १. बापूजी सोनदेव. | १. शामजी नाईक पुंडे पोतदार. |
| १. शंकराजी नीळकंठ. | १. रघुनाथ बल्लाळ कोरडे[3] | १. कृष्ण जोशी. |
| १. नरहर आनंदराव. | १. निराजी रावजी. | १. प्रल्हाद निराजी. |
| १. बाळाजी आवजी चिटणीस | १. गंगो मंगाजी पागे.* | १. चिमाजी आवजी दफ्तरदार. |
| १. प्रभाकर भट[4] उपाध्ये | १. पंताजी[5] गोपीनाथ वकील | १. अण्णाजी रंगनाथ मळेकर. |
| १. विठ्ठल पीलदेव गारूडकर[6]. | १. कान्हेरे पंत. | १. तिमाजी केशव सबनीस. |
| १. त्रिंबक भास्कर. | १. शिवाजी शंकर. | १. कृष्णाजीपंत मथुरे. |
| १. काशीपंत मथुरे विश्वासराव. | १. विसाजीपंत[7] मथुरे. | १. शिवभट उपाध्ये. |
| १. बाळंभट गोसावी उपाध्ये | १. कृष्णाजी सखाजी[3]. | १. शामजी आवजी कारखानीस. |
| १. येसाजी गोविंद. | १. शामराज पद्मनाभ. | १. गोविंदभट उपाध्ये. |
| १. कृष्णंभट गोसावी उपाध्ये* | १. रघुनाथपंत*. | १. नारो सदाशीव.* |
| १. अण्णाजी मल्हार*. | १. दाजी श्यामराव*. | १. आनंदजी सदाशीव.* |

———

[ ४५ ]

१. १. ' अंतरंगची व बाह्यांगची ' * हीं नांवें कीर्तने संपादित प्रतींत अधिक आहेत. इतर प्रतींत तीं वगळून ३८ नांवें आहेत. ‡ ' रघुनाथराव पंडितराव ', ' रघुनाथ पंडितराव ' २. ' सुरे ', ' सुभेदार ' ३. ' कारंडे ' ४. ' भास्कर भट ' ५. ' दत्ताजी ' ६. ' गरूड ' ७. ' विश्वासराव '

या प्रकारें पराक्रम केलेले थोर[1]थोर लिहिले. आणखीही बहुत सुभे, मामले किल्ले कोटांत माहालदार व कारखानदार, असंख्यात कर्त्ते माणूस जाले आहेत.

## सरदार नामांकित बि॥[2]

१. हंसाजी[3] हंबीरराव[4] मोहिते सरनोबत.
१. गोमाजी नाईक पानसंबळ
१. संताजीराजे[5] भोसले, शहाजी महाराजांचे नाटकशाळा-पुत्र.
१. साबाजी भोंसले शिंगणापुरकर.
१. रूपाजी भोंसले सरकारी सरदार.
१. मानसिंग मोरे.
१. महादजी नाईक पानसंबळ.
१. मुधोजी खाजणकर.[6]
१. कोकाटे.
१. आमरोजी[7] पांढरे.
१. अमृतराव निंबाळकर.
१. हांडे.[8]
१. पदाजी[9] काटकर.
१. नेताजी[10] काटकर.
१. पिलाजी शिर्के.
१. तानाजी शिर्के.
१. गणोजी शिर्के पिलाजीचे पुत्र.

१. मकाजी आनंदराव पाळक लेंक.
१. गणोजी दरेकर.
१. कान्होजी आंगरे.
१. संताजी घोरपडे जुमलेदार.
१. धनाजी जाधवराव.
१. तैलंगराव पागे सरदार
१. व्यंकोजी[11] खांडेकर जुमलेदार.
१. सोमवंशी.
१. कानोजी भाडलकर.[12]
१. बहिरजी नाईक इंगळे
१. खंडोजी जगताप.
१. संभाजी काटकर.
१. सूर्याजी काटकर.
१. रायाजी गडघे.
१. देवजी उघडे.
१. केरोजी पवार.
१. परसोजी शितोळे.
१. रायाजी नळगे.
१. येसाजी खांडेकर.
१. बुबाजी पवार.
१. कृष्णाजी घाटगे.

१. गोंदजी जगताप.
१. संताजी जगताप.
१. बाजी नळगे.
१. मालोजी नळगे.
१. संभाजी कावजी.
१. हरजी राजे महाडीक
१. आनंदराव हफ्त हजारी.
१. अचलोजी[13] राजे महाडीक.
१. तुकोजी पालकर.
१. महादाजी नाईक निंबाळकर.
१. येसाजी थोरात.
१. खंडेराव दाभाडे.
१. नेमाजी शिंदे.
१. खटोजी[14] आटोळे.
१. बहिरजी वडगर[15]
१ बळवंतराव देवकांते.
१ भवानराव देवकांते.
१. माहार्णवर.
१. काकडे.
१. कडू.[16]
१. बाळाजी नाईक निंबाळकर.

---

१. 'थोर व' २. 'लोक, नांवाचीं माणसें' ३. 'हसाजी' ४. 'बहिरव' ५. 'राव' ६. 'साजणकर', ७. 'अमदोजी', 'कुमराजी' ८. 'हंडे', 'बांडे' ९. 'दत्ताजी' १०. 'जैतोजी' ११. 'एकोजी' १२. 'भांडवलकर' १३. 'अतलाजी' १४. 'खंडोजी' १५. 'बांडगे' १६. 'लाड'

१. संभाजी शिर्के.
१. जयशिंग पालकर.
१. परसोजी भोंसले.
१. भुजबळराव.
१. अरेराव.
१. बहिरजी घोरपडे
१. कृष्णाजी पवार.
१. मालोजी निंबाळकर.
१. हिरोजी शेळके
१. खापणे.[5]
१. रुमाजी[6] शिर्के.
१. वाघोजी शिर्के.
१. ढमढेरे.[10]
१. उचाले.[11]
१. जेशिंग पालकर.[12]
१. आनंदराव निंबाळकर.
१. बाजी मोहिते.

---

[ ७६ ]

आणखी सरदार, जुमलेदार, पागे, शिपाई लोक बहुत नामी होते.

**मावळे लोक पायदळचे सरदार बि॥ :— नांवनिशी मातबर**

१. येसजी कंक सरनोबत.
१. तानाजीराव मालुसरे.
१. जिवा माहाला.
१. सोन माहाला.
१. राजपाटील यशवंतराव.
१. रामजी[1] विश्वासराव.
१. कृष्णाजी नाईक.
१. सुभानजी[2] नाईक.
१. तान सावंत.
१. कोंडाजी वळखले.
१. बाजीराव पासलकर.[3]
१. बाळाजी[4] प्रभु देशपांडे, हिरडस मावळकर.
१. ठाकुर.
१. ढमाले.
१. दादाजी बापूजी देशपांडे.
१. बाजी मुरार देशपांडे, महाडकर.
१. ढवळे.
१. कुडाळकर.
१. मलघडे.[7]
१. हिरोजी रोटे.
१. रामाजी मोरे.
१. तुकोजी लाड.
१. तुळाजी फर्जंद.
१. हिरोजी भानगिरे.[8]
१. येसाजी दरेकर.
१. सोन दळवी.
१. मुधोजी सासवदेकर.[9]
१. खंडोजी नाईक जासूद.
१. बागराव.
१. दिनकरराव.
१. माल सावंत.
१. डोळे.
१. हरजी नाईक जासूद.
१. सूर्याजी काळे.
१. सूर्याजी मालुसरे.[13]
१. तानाजी दुदुसकर.[14]
१. पिलाजी सणस.[15]
१. जावजी पारळे.
१. मुधोजी फुरणव्हणें.[16]
१. विठोजी कड्ड.
१. इंद्राजी गाडे.[17]
१. महादजी फर्जंद.
१. हिरोजी फर्जंद.
१. नागोजी फर्जंद नाईक.
१. हरबाजी फर्जंद.
१. पारठे.
१. चांगोजी कड्ड.
१. कृष्णाजी भोंसले.
१. गणोजी कावळे.
१. सोमाजी नाईक बंकी.

---

१. 'रामाजी' २. 'सुजाननसी', 'सुभानी' ३. 'पानसलकर' ४. 'बाजी प्रभू' ५. 'आपणे' ६. 'रामोजी' ७. 'मलवडे', 'मनघडे', 'मलंघडे' ८. 'जमनगिरे' ९. 'सिसवदेकर' १०. 'मढदे', 'मढढेरे' ११. 'उचले' १२. 'जैसिंग' १३. 'सूर्याजी मांडरे', 'सूर्याजी मारंडे' १४. 'दुदुसाकर', 'दुंदुसकर' १५. 'सग्रणस' १६. 'हुणकणे' १७. 'गोरड'

१. चिमणाजी बापूजी देशपांडे.
१. राम दळवी.
१. जावजी मोहने.[1]
१. मुधोजी खानवलकर.[2]
१. बाजीराव दरेकर.[3]
१. बापूजी मांडरे.
१. राणोजी दरेकर.

[५७]

## आरमारचे सरदार

१. दर्यासागर.
१. मायनाक भांडारी.[4]
१. इभ्रामखान.

सदरहू प्रमाणें सरकारडून सरदार अष्टप्रधान.

किल्ले कोट व प्रांत बहुत हस्तगत जाला त्यांतील तालुके तपशीलवार—

## प्रांत सातारा व वांई.

१. सातारा.
१. परळी सज्जनगड.
१. वैराटगड.
१. कमलगड.
१. पांडवगड.
१. चंदनगड.
१. वंदनगड.
१. नांदगिरी.
१. वर्धनगड.
१. महिमनगड.
१. ताथवडा

[११]

## प्रांत कराड

१ वसंतगड. मच्छिंद्रगड.
१. भूषणगड.
१. का॥ [कसबा] कराड ठाणें.

[४]

## प्रांत मावळ शेयाद्रि[5]

१. रोहिडा
१. पुरंधर दौलतमंगळ
१. राजगड.
१. दातेगड.
१. विसापूर.
१. लोहगड.[6]
१. नारायणगड.
१. वासोटा.
१. केळंजा.
१. रुद्रमाळ.
१. कोंडणा.[7]
१. तोरणा.
१. कुवारी.
१. तुंग.
१. तिकोना.
१. राजमाची
१. सिवनेरी.
१. मोरगिरी,

[१८]

## प्रांत पनाळा

१. पनाळा.
१. पावनगड.
१. रांगणा.
१. मूधरगड.[8]
१. भूपाळगड.
१. मदनगड.

१. 'माहेने', 'मोहने' २. 'खानवेलकर' ३. 'ढरेकर' ४. 'भंडारी'
५. 'सह्याद्रि' ६. 'घनगड' ७. सिंहगड' ८. 'मूदरगड'

१. खेळणा.
१. गजेंद्रगड.
१. भिवगड.
१. पारगड.
१. गगनगड.
१. बावडागड.

[ १२ ]

## प्रांत कोंकण बांधारी* व जलदुर्ग§

१. मालवण सिंधुदुर्ग.
१. विजयदुर्ग.
१. जयदुर्ग.
१. रत्नागिरी.
१. सुवर्णदुर्ग.
१. खांदेरी.
१. उंदेरी
१. कुलाबा.
१. राजकोट.
१. अंजनवेल
१. रेवदंडा.
१. रायगड
१. भैरवगड.
१. प्रबळगड.
१. अवचितगड.
१. मंडणगड.
१. सहजगड.[१].
१. सिमेरागड[२]
१. महीधरगड.
१. पाली.
१. कलानिधिगड.
१. आरनाळा.
१. सुरंगगड.
१. मानगड.
१. महिपतगड.
१. महिमंडण.
१. सुमारगड[३]
१. रसाळगड.
१. कर्नाळा.
१. भोरप.
१. बालमगड.[४]
१. सारंगगड.
१. कुंभगड
१. मनोहरगड.
१. सागरगड.
१. रत्नगड.[५]
१. सेहगोगड.[६]
१. वीरगड
१. माणिकगड.
१. सिदगड.
१. मंडणगड.
१. बळगड.[७]
१. लिंगाणा.
१. प्रचीतगड.
१. सामानगड.[८]
१. कांगोरी.
१. प्रतापगड.
१. तळागड.
१. घोसाळगड.
१. बिरवाडीगड.
१. महिमतगड.
१. सुभानगड.
१. मित्रगड.
१. प्रल्हादगड.
१. मकरंदगड.
१. भास्करगड.
१. माहुली.
१. कावनई[९]

[५८‡]

* ‘ बंधारी ’; § ‘ नलदुर्ग ’ १. ‘ सहनगड ’ २. ‘ शिकेरागड ’, ‘ सिकरागड ’ ३. ‘ सुरमागड ’ ४. ‘ बल्लाळगड ’ ५. ‘ रणगड ’ ६. ‘ सेटगागड ’ ७. ‘ बाळगड ’ ८. ‘ समानगड ’ ९. ‘ कावऱ्ही ’

‡ वीरगड व घोसाळगड एकच होत. त्यामुळें किल्ल्यांची संख्या येथें ५७ होईल.

## ठाणीं.

| | | | |
|---|---|---|---|
| १. कल्याण. | १. भिवंडी. | १. वांई. | १. कराड |
| १. सुपें. | १. खटाव. | १. बारामती. | १. चाकण |
| १. शिरवळ. | १. मिरज. | १. तासगांव. | १. करवीर. |
| | | | [ १२ ] |

## प्रांत बागलाण.

| | | |
|---|---|---|
| १. सालेरी. | १. अहिवंतगड | १. कणेरा |
| १. मुलेरी. | १. घोडप. | १. हरसळ. |
| १. नाहवा [ नाऱ्हा. ] | | |
| | | [ ७ ] |

## प्रांत त्रिंबक वगैरे.

| | | |
|---|---|---|
| १. त्रिंबक. | १. चावंडस. | १. मार्कंडेयगड. |
| १. रामसेज.[१] | १. चांदवड. | १. करोळा. |
| १. गडगडा. | १. हरींद्रगड. | १. आवंढा[८] |
| १. बहुला.[२] | १. माचणागड. | १. पट्टागड |
| १. हर्षण. | १. मनरंजन. | |
| १. जीवधन. | १. सिद्धगड. | १. राजदेहर.[९] |
| १. खळागड. | १. मनोहरगड. | १. अणकई.[९अ] |
| १. जवळागड. | १. मृगगड. | १. टणकई. |
| १. हडसर. | १. सबळगड. | |
| | | [ २५ ] |

## प्रांत फोंडें बिदनूर[५]

| | | |
|---|---|---|
| १. कोट फोंडें. | १. कोट मंगरूळ. | १. कोट बल्याळ[१०] |
| १. कोट कडवाल.[३] | १. कोट बकर. | १. कोट कलबर्गे[११] |
| १. कोट शिवेश्वर. | १. कोट कठोर.[६] | १. कोट कृष्णगिरी |
| १. कोट काहूर. | १. कोट कहूर[७] | |
| १. कोट अंकोला.[४] | | [ १२ ] |

१. 'रामसेन' २. 'बाहुला' ३. 'कडवळ' ४. 'आकोलें' ५. 'बिदर' ६. 'कठर' ७. 'कडणारा' ८. 'आवढा' ९. 'राजपेहर' ९अ. 'कणकई' १०. 'कोट बल्याळ', 'बाहल्याळ', [हल्याळ ?] ११. लबर्गे'

### प्रांत कर्नाटक वगैरे. प्रांत जगदेवगड.

१. जगदेवगड.
१. वारुणगड.
१. गगनगड.
१. सुदर्शनगड.
१. महाराजगड.
१. कृष्णगिरी.
१. रंम्यगड.[1]
१. सिद्धगड.
१. मल्लिकार्जुनगड.
१. नंदीगड.
१. जवादीगड.
१. कस्तुरीगड.
१. प्रबळगड.
१. मार्तंडगड.
१. दीर्घपल्लीगड.
१. भैरवगड.
१. मंगळगड.
१. रामगड.

[ १८ ]

### प्रांत श्रीरंगपटण.

१. कोट धर्मपुरी
१. कोट तळेगिरी.
१. कळपगड.
१. हरिहरगड.
१. सुंदरगड.
१. महिनंदगड.[२]
१. कोट गरूड.
१. कोट वालगोड.
१. रंजनगड.
१. प्रमोदगड.
१. कोट आठनूर.
१. कोट आलूर.
१. मनोहरगड.
१. कोट त्रिपादूर.[३]
१. कोट शामल.
१. भवानीदुर्ग.
१. कोट दुटाजटी.[४]
१. कोट विराडें[५]
१. कोट अमरापूर.
१. कोट लखनूर.
१. कोट चंगमाल.[६]
१. कोट तूळ.[७]
१. सूर.[८]

[ २३* ]

### प्रांत येलूर तालुके व गड

१. कोट आरकाट.
१. कोट त्रिमल.
१. कोट त्रिकोलनूर.[९]
१. कोट लहनूर.[१०]
१. कोट दळणापट्टण.[११]
१. पाळकोट.[१२]
१. चंजी बाराकोट.[१३]
१. गर्जनगड.[१४]
१. कोट त्रिवादी.
१. कैलास गड.
१. रसाळ गड.
१. कर्नाटक[१५] गड.
१. मडविंड गड.
१. महिमंडण गड.
१. यशवंतगड.
१. चेतपावहळ्ळी.
१. मुख्यगड.
१. प्राणगड.
१. साजरा गड.
१. गोजरा गड.
१. दुमे गड.

१. 'रमणगड' २. 'महिनदीगड' ३. 'त्रिपादुरे' ४. 'दुटा जेटे', 'दुटानेटी' ५. 'विराटें' ६. 'चंदमाळ' ७. 'तळगोंडा' ८. 'कोटकुसार', 'कोटकुसूर' * कोट वालगोड कीर्तनेप्रत देत नाहीं. तेथें संख्या २२ येते. ९. 'त्रिकोनदुर्ग' १०. 'लखनूर' ११. 'पळणापट्टण' १२. 'पाळेकोट' 'पालेकोट' १३. 'चंजिबाराकोट' १४. 'गर्जनगड' १५. 'कर्मट'

| | | | |
|---|---|---|---|
| १. सागरगड.* | १. कोलबलगड.‡ | १. कोट वृंदावन. | १. अनूरगड. |
| | | | [ २५ ] |

## प्रांत वनगड वगैरे तालुका

| | | |
|---|---|---|
| १. वनगड. | १. नरगुंद महंतगड[3] | १. व्यंकट गड. |
| १. गहनगड. | १. कनकाद्रिगड. | १. गंधर्व गड. |
| १. सिमदुर्ग.[1] | १. ब्रह्मगड.[4] | १. ढाकेगड. |
| १. नलदुर्ग,[2] मिरागड. | १. चित्रदुर्ग. | १. सुपें गड. |
| १. श्रीमंत दुर्ग. | १. प्रसन्न गड. | १. हडपसरगड[5] |
| १. श्रीगदन गड. | १. कोपल गड. | १. कांचन गड. |
| १. पराक्रमगड. | १. बाहदूर बिंडा. | १. अचलागिरी गड. |
| | | १. मदन गड.[6] |
| | | [ २२ ] |

## प्रांत कोल्हार, बाळापूर

| | | |
|---|---|---|
| १. कोल्हार. | १. प्रेईवार गड. | १. गणेश गड. |
| १. ब्रह्म गड. | १. सोमशेखर गड. | १. खळ गड. |
| १. वडन्न[7] गड | १. मेदगिरी.[8] | १. बिदनूरकोट. |
| १. भास्कर गड. | १. चेन गड. | १. मलकोल्हारकोट.[9] |
| १. महिपाळ गड. | १. श्रीवर्धन गड. | १. ठाकूर गड. |
| १. मृगमद गड. | १. आंबोनिराई गड. | १. सरस गड. |
| १. हातमंगळ गड. | १. बुधलाफोट. | १. मल्हार गड. |
| १. मंचकप्रकाश गड. | १. माणिकगड. | १. भूमंडल गड. |
| १. भीमगड. | १. नंदीगड. | १. बिरूटकोट. |
| | | [ २७ ] |

## प्रांत बंदी

| | | |
|---|---|---|
| १. राजगड. | १. कृष्णागिरी. | १, आरवंळू गड. |
| १. चैनगड. | १. मदोन्मत्तगड, | १. कालाकोट. |
| | | [ ६ ] |

## प्रांत चंजाऊर व अरणी ¶

* 'सामरगड' ‡ 'कोलबाळगड', 'कोलबडगड' १. 'नुम' २. 'निलगुपेनिराग्र' ३. 'महगड' ४. 'ब्राह्मणगड' ५. 'हडसरपंतगड' ६. 'मदनगड' ७. 'वडचूर' ८. 'मदगिरी' ९. 'मनकाल्हारकोट'
¶ येथील किल्ल्यांची नांवें दिलेलीं नाहींत.

याप्रमाणें व आणखी कित्येक प्रांत, किल्ले हस्तगत जाले. कोठील पाळेगार वश जाहले. शिवाय तुंगभद्रातीर, रामेश्वरपासून देखील गोंडवण, चांदे व वराड ह्या प्रांतांत नर्मदेपर्यंत चौथ, मोकासा अंमल बसऊन[1] चालला.

## 'छत्रसिंहासन प्रथम करून राज्याभिषेक करावा'

तेव्हां सार्वभौमपद करण्यास, सिंहासन करण्यास, अधिकार जाहला. दाहा कोठी खजिना संग्रह जाला, व मंत्री अष्टप्रधान करणें, यांची लक्षणें जशी शास्त्र तसे प्रधान प्राप्त जाहले. सैन्य– अश्व, गज, रथ, पदाति– चतुरंग पाहिजे तसें सिद्ध जालें. आपले पूर्वज पूर्वींपासून छत्रसिंहासनयुक्त राज्य करीत आले त्या कुळीं आपण येऊन त्या सिसोदे कुळींचे धर्म, दुष्ट यवनाचें पारिपत्य, त्यांचें न म्हणवितां करणें, हे श्रींनीं कृपा करून श्री सांबानीं व श्री भवानीनीं आपले हातें चालविला, कुलधर्म जतन केला. आरसीसिंहाचे[2] वंशज छत्रसिंहासन करून राज्य उदापुरीं[3] करीत आहेत, व आपले कुळींचे पुरुष कच्छभूज व नेपाळ येथील[4] राजे राज्य छत्रसिंहासन करून करीतां[5] आपण हे राज्य दक्षण प्रांतींचें प्रतापें सोडविलें. श्री महाराणा सजणसिंह यांचे वौंश आपण. तस्मात् छत्रसिंहासन प्रथम करून राज्याभिषेक-युक्त होत्साते पूर्वयुगीं राजे धर्में व नीतिकरून राज्य करीत आले तसें आपण करावें म्हणून महाराजींनीं दृढ संकल्प केला.

## श्रीचें आश्वासन : साधुसंतांचें। अनुमोदन

राज्य करण्यास अंगें सात–राजा व प्रधान, राष्ट्र, दुर्ग व कोशबल, सुहृद्बल व सेना– हीं सात अंगें असावीं तशीं सिद्ध जालीं. या उपरि सिंहासनाधीश्वर म्हणवावें, ऐसें चित्तांत आणून श्रीस प्रार्थना केली. श्रींनींही स्वप्नगत दृश्य होऊन "तुजला वर दिल्हा तसेच त्या कुलात अंशभूत होऊन धर्म वृद्धिंगत केला, सिंहासनाधीश होणें हाही हेतु पूर्ण करितों," ऐशी आज्ञा जाली. आश्वासन जालें. त्यानंतर मातुश्रींस विनंति केली, त्यांची आज्ञा घेतली. श्रीरामदासस्वामींकडे कारकून पाठविले, विनंति केली, त्यांनीं अनुमोदन दिल्हें. आणि 'कार्यसिद्धि होईल' ऐशी आज्ञा जाली. चिंचवडींचे[3] देव, तुकाराम बावा[3] कडे कारकून पाठवून त्यांची आज्ञा आणिली आणि सर्व राज्यांतील मोठे पंडित, विद्वान् बोलावून व शिबिकादि यानें पाठवून आणिले. सर्व सरकारकून व सरदार जमा केले. आप्त

१. 'बसून महाराजांचा' २. 'आरसिंह' ३. 'मुद्रापुरीं' ४. 'हे करीत आहेत.' ५. 'करिता आहेत.' १. 'करू' २.२. 'संचबल व कोशबल हीं दोन्ही', 'दुर्ग कोशबल हीं दोन्ही' ३. ३. 'इतर साधू' ४.४. सिद्ध कसें होईल.'

सुहृत्संबंधी, इष्टमित्र यांस आणून, सभा करून आपले मनोगत, "या उपरि य अन्वयें छत्रसिंहासन करावें ऐसें आहे, याचा विचार कसा करावा ?" म्हणून स्वतः प्रश्न केला, आणि सर्वांचें अनुमोदन घेतलें. 'राज्याभिषेक करावा' ऐसें सिद्ध जालें.

### 'गागाभट्ट यांचे विचारें सिद्धता करावी.'

शिष्टसंमतें विचार करितां "राज्याभिषेकास आदौ व्रतबंध होऊन [ पुढें ] सर्व विधि जाले पाहिजेत; त्यास श्रीकाशी व पैठण व सर्व क्षेत्रें यांची शिष्ट-मंडळी यांचे विचारावांचून येथें सिद्धता कैसी करावी ?" ऐसा विचार पडला. सर्वही सरकारकुन यांस विचार कसा करावा, ऐसें प्राप्त जालें. ते समयीं बाळाजी आवजी चिटणिवीस यांनीं उठोन विनंति केली जे, "सर्व जे जे मनोरथ स्वामींनीं केले ते ते दुर्घट असतांही घडले. यातच[1] काय अशक्य आहे ? चार वेद, साहा शास्त्रें असें ज्यांचें अध्ययन असें श्रीकाशींत मुख्य भटांचें घर आहे. धर्मवृत्तिग्रंथ[2] त्यांजपासून उत्पन्न होतात. तेच धुरीण पंडित गागाभट्ट अनायासें पैठण येथें महाराजांची कीर्ति श्रवण करून आले आहेत. त्यांस व पैठणचे पंडित यांस आणून त्यांचे विचारें सिद्धता करावी." याजवरून त्यांस उद्योग करून आणावयाची आज्ञा जाली. तेव्हां सर्वांचेंही संमत 'आणावें' ऐसें जालें.

याजवरून केशवपंडित व भालचंद्रभट पुरोहित हे बाळाजी आवजींचें गुरुस्थान, व सोमनाथ भट कात्रे त्यांचेच आश्रित, यांस दाहा हजार रुपये व पालख्या देऊन बावांस व पैठणकरांस आणावयास रवाना केलें. त्यांणीं जाऊन महाराजांचा उद्योग, व मनोरथ त्यांस समजाऊन त्यांशीं व पैठणकर पंडितांशीं एकवाक्यता केली. आणि 'उदापूर, जयपूर येथें राज्यभिषेकविधि होतो त्या प्रमाणें करावें' असें सिद्ध करून घेऊन आले. त्यांचा रायगडीं महाराजांनीं[3] सामोरें जाऊन बहुत सत्कार केला. आदरेंकरून ठेविले आणि इकडील सर्व थोर थोर ब्राह्मण व मुत्सद्दीसहवर्त्तमान सभा केली आणि विचार केला कीं, "हे उदापूरचे[4] राणाजींचे घराण्यांतील[5] वौंश, सिसोदे कुळपरंपरा पुरुष पिढ्या लाऊन या प्रांतीं हिंदुस्थानांतून आले; रजपूतराजवंश महाराष्ट्र देशीं 'म्हराठे' म्हणवितात. उदापूर, जयपूर, येथें राज्याभिषेक, सिंहासन, व्रतबंध होत येतात. जयशिंग यांणीं श्रीकाशी-क्षेत्रादि [ ठिकाणचे ] ब्राह्मण नेऊन अश्वमेध केला; हा सर्व निर्णय ते समयीं जाला आहे. त्या अन्वयें राज्याभिषेकांग व्रतबंध करून अभिषेक करावा; हे त्यांचे[6] कुळींचे. यांस छत्रसिंहासन अधिकार चाललाच आहे. महाराजांचे वय शेचाळीस

१. 'त्यांचें' २. 'धर्मप्रवृत्तिग्रंथ' ३. 'महाराज' ४. 'उदाजीचे'
५. 'घरांतील' ६. 'त्याच'

वर्षांचें, पुत्र दोन जाले असतां अभिषेकाचे पूर्वांगीं व्रतबंध करावा, " ऐसें सिद्ध करून सर्व पंडितजन ब्राह्मण यांचें संमत जालें, सांगितलें. आणि मंत्री लक्षणयुक्त व अभिषेकसंभार साहित्य, समुद्रोदकें व महानद्यांचीं[१] पुण्योदकें व गज, अश्व सुलक्षणीय व स्थळें करीं करावीं, ब्राह्मणभोजन लक्षावधि करावें, व्याघ्रादिचर्में व सुवासिनी, कन्या, सुवर्णकलश, पीठ व सिंहासनादि करण्याचा विधि सांगितला असतां, महाराज बहुत संतुष्ट होऊन, ' राज्याभिषेकास सुमुहूर्तकाल योजावा ' ऐसें सांगितलें.

### सुमुहूर्त काढिला.

सुमुहूर्ताचा नियम शास्त्रीं आहे तो काढिला. पाहाणार ज्योतिषी, गणक,[२] सिद्धांत वक्ते, परमविचक्षण, निपुण ऐसे तीन असावे. यांहून उणे नसावे, अधिक असतील तितके असावे. यथासंभव त्यांणीं विचार करून दक्षिणायन[३] त्यांतही अवश्य कर्तव्यच आलियास कार्तिक, मार्गशीर्ष, व पौष हे घ्यावे. उत्तरायणीं चैत्र व अधिक मास नसावा.[४] पर्जन्यकाल[५] खेरीज सर्व[५] युक्त आहेत. नक्षत्रांत ध्रुवनक्षत्रें व विष्णु-नक्षत्रें असावीं. याप्रमाणें योगकरणादि योग्य असा निश्चय करावा.

या प्रमाणें पाहून सर्वमतें आनंदनाम संवत्सर, ज्येष्ठ शु॥ त्रयोदशी सिद्ध केली, आणि संपूर्ण क्षेत्रें व प्रतिष्ठित ब्राह्मण व मांडलिक राजे, इष्टमित्र,[६] सर्व राज्यांतील सेवकजन यांसि येण्याविषयीं पत्रें आमंत्रणाचीं लेहविलीं.

### रायगड सर्व उत्तम लक्षणें पाहून योजिला.

समारंभास स्थापनाची योजना--मुख्य सिंहासन राजधानी करणें यासि पुण्य-देश, पुण्यभूमि पाहून आसमंताद्भागीं पुण्यक्षेत्रें व महानदी व त्या[७] स्थानीं[७] विपुल उदक, कृत्रिम सरिता म्हणजे पाट नहर यांचें उदक,[८] सर्व धान्यें त्या[९] देशीं व्हावीं, ऐसें स्थान व शत्रूंस दुःसाध्य असावें. याजवरून रायगड[१०] ही जागा सर्व राज्यांत दुःसाध्य व श्रीकृष्णा समीप, सर्व उत्तम लक्षणें आहेत पाहून योजिली. तेथें सिंहा-सनास सभा करविली, ज्या सभेंत सहस्त्रावधि मनुष्यें बसावीं, त्यांसि शीतोष्ण बाधा न व्हावी, चित्रविचित्र स्तंभ व अष्टप्रधानांचीं स्थानें भिंती वगैरे परम रमणीय ऐसें करवून, त्यांस उल्लोच व वितानें म्हणजे चांदवे चांदण्या सुवर्णमय वस्त्रें, किनखाप, बादली ऐशा करविल्या.[११] पटल म्हणजे पडदे ऐसे किनखापी करविले. सिंहासनाचें

---

१. ' महनदींचीं ' २. ' गणना ' ३. ' दक्षिणायन वर्ज ', ' दक्षणावायनें '
४. ' न यावा ' ५. ५. ' पर्जन्यकाल नसावा ', ' वरकड ' ६. ' इष्टमैत्र '
७.७. ' स्थानीं स्थानीं ' ८. ' यांचीं उदकें ' ९. ' त्याच ' १०. ' रायगडीं '
११. ' ऐशीं करविलीं '

स्थान तेथें सुवर्णाचे स्तंभ चार, त्यांत चांदवा अमोल्य जरीचा, त्यास मुक्ताफळांचे गेंदांचे घोंस ऐसें बहुत चांगलें सभास्थान दरवून† सर्व राजमंदिरें त्यांस चित्रें, रंग देऊन जागां जागां उत्तम स्थळें केलीं. थोर थोर ब्राह्मण, मांडलिक राजे येतील त्यांस स्थळें निराळीं निराळीं योग्य ऐशीं करविलीं. आणि मोठे विस्तीर्ण मंडप सभेस व भोजनशाळा वगैरेंस¶ केले. सर्वराज्यातील गुणिजन, वारांगना कलावंत,‡ गायक, व वाद्यें वाजविणारे बहुत कुशल तितिके आणिले. कुंडमंडपवेदि§ करून होमशाळा अभिषेकस्थान परम निपुण श्रोत्री ब्राह्मण धुरीण[1] यांजपासून परम रमणीय असावें तैसें करविलें.

### कुठेंही न्यून नाहीं अशी अद्भुत व्यवस्था !

बहुतजण[2] येणार त्यास दुर्गाखालीं स्थळें, ब्राह्मणभोजनास एक एक स्थळीं पांच पांच हजार ब्राह्मणांची पंक्ति व्हावी, ऐशीं दाहापांच स्थळें निराळीं निराळीं, त्यांस मंडप व पारपत्यगार, पाककर्ते व वाढणार ठेवून तरतूद करून दोन प्रहरीं ब्राह्मणभोजनें होत असावीं. दिव्य षड्रस अन्नें[3] नित्य नूतन उत्पन्न होत असावीं ऐसें करविलें. तसेंच किल्ल्यावर पांच सहस्र ब्राह्मणभोजनास[4] स्थळें[5] व दाहा सहस्र सुहृद् आप्त यांचे भोजनाचीं स्थानें करविलीं. तसेंच लक्षावधि ब्राह्मणभोजन, आप्त व राजे, मांडलिक व सेवकजन व शिष्ट समुदाय यांस अमुक पदार्थ नाहीं किंवा न्युंन्य[6] पडला, सरला असें न व्हावें, ऐशी आज्ञा करून धान्याचे व साहित्याचे पर्वतप्राय डेरे[7] करविले. इच्छिला पदार्थ, ज्यांणीं जो मागितला तो सिद्ध तत्काल व्हावा, कोणा एकास आबालवृद्ध यांचा सत्कार नाहीं जाला ऐसें, चुकोन राहिलें, साहित्य न्यून पडलें, ऐसें न होतां, करणार अध्यक्ष अधिकारी एक एक पदार्थास एक एक अधिकारी एकएक कारखानाच पदार्थांचा, व करण्यास[8] एकएक अधिकारी व मनुष्य, त्यांजवर एक सर्वाध्यक्ष असें योजून करून[9] देविलें. सर्व सरकारकून व सरदार व सुभेमामले[10] कारकून लोक व सेवक लोक असें दाहा पांच लक्ष मनुष्य[11] जमा जालें. पन्नास हजार ब्राह्मणसमुदाय जमा जाला. सर्वांसही मोठा हर्ष-उत्कर्ष, ज्यास जे अधिकार नेमून दिल्हे, सांगितले ते बहुत सावधपणें तिळमात्र न्यून पडों न देतां प्रथमपासून सिंहासनआरोहणापर्यंत, कोणते दिवशीं प्रातःकाळपासून सायंकाळपर्यंत काय व्यवहार होणें, त्याचें साहित्य काय, कोणास काय देणें याचे नियम करून, जावते लिहून, पुन्हा गलबल 'द्या' 'घ्या' म्हणावयाची एकही

† 'करून' ¶ 'वगैरे' ‡. 'कलावतें' § 'कुंडमंडपविधि' १. 'धुरण' २. 'बहुत जन' ३. 'अन्न' ४. ५ 'ब्राह्मण' ६. 'न्यून' ७. 'ढीग' ८. 'कर्में यांस' ९. 'करऊन' १०. 'सुभेमामलेदार' ११. 'माणूस'

पडूं नये ऐसें करून, ज्याचें त्याजपाशीं देऊन, तिळमात्र गरगशा अथवा बोभाट न पडतां तो दिवस सिद्धीस जावा, ऐसें करून दिल्हें.

### राज्याभिषेकांग विधि यथासांग करिते जाले.

व्याघ्रचर्में, मृगचर्में, आणविलीं. समुद्र व पुण्यनद्योदकें आणविलीं. सर्व संभार सिद्ध जाहला. आणि मुहूर्ताचे समारंभाचे पूर्वी[1] सात[2] दिवस पूर्वांगशांतियज्ञ होणें ते ज्येष्ठ शुद्ध पष्ठीपासून त्रयोदशीपर्यंत नेमले. प्रथम ज्येष्ठ शुद्ध चतुर्थीस व्रतबंधाचे समारंभास प्रारंभ होऊन पंचमीपर्यंत यथाविधि व्रतबंधन जालें.[3] ब्राह्मणभोजन दोन दिवसांत लक्ष झालें. तदंग दक्षणा सर्वांस एक रुपयाप्रमाणें दिल्ही.[4] पंडित, वैदिक, शिष्ट यांची संभावना यथायोग्य जाली. त्यानंतर षष्ठीस प्रथम पटबंधनविधि करून ऋत्विजवर्णन पुण्याहवाचनपूर्वक यज्ञास प्रारंभ करून विनायकशांति आदौ केली. सात दिवस अग्नीचीं चिन्हें पाहाणें वगैरे करविलीं. सर्वही कार्य[5] निर्विघ्न होतें जालें. महाराज व ऋत्विज निरशनव्रतस्थ घृत, पय, फळें आहार करून नक्षत्रशांति व ग्रहशांति, ऐंद्रीशांति व पौरंदरीशांति यथाक्रमें करून राज्याभिषेकांगविधि सांगितले तैसे करविते जाले. सात दिवस ब्राह्मणभोजन नित्य पन्नास सहस्र जालें. सर्व जन समारंभास आले, त्यांस मिष्टान्नेंकरून आदर-आतिथ्यसत्कार व शिष्टांचे सत्कार जाले. नित्य सभा, गीत, मंगल वाद्य, भेरी, समारंभ अत्यद्भुत, किमपि व्यंग व प्रायश्चित्त न पडतां सांग जाहला.

### राज्याभिषेकास याप्रकारें प्रारंभ जाहला.

याप्रकारेंकरून त्रयोदशीचा दिवस प्राप्त जाहला असतां, अष्टप्रधान करण्याची योजना करून आठ सिद्ध केले. लेखकद्वय–एक पत्रलेखक व एक गणकलेखक–ऐसे योजिले. ऋत्विज, छंदोगामात्य, प्रधान व द्वादश कोश, बारा महाल व अष्टादश शाळा कारखाने यांचे अधिकारी, देशाधिकारी, नगराधिकारी ऐसे सर्व पृथगाकारें[6] योजिले. सर्वांसही मंगलस्नानें करवून महाराजांनींही[7] मंगलस्नान केलें. विधियुक्त मृत्तिकास्नान, पंचगव्यस्नान व गंगादिपुण्यतीर्थोदकें यांनीं व पंचामृतस्नान केलें. सर्वांनीं शुभ्र वस्त्रें, गंधपुष्प, अलंकार घातले.[8] महाराजांनीं[9] शुभ्रवस्त्रें, अलंकार, पुष्पें परिधान केलें. आणि क्षीरवृक्षाचें आसन सवा हात उंच व रुंद ऐसें करून, तें सुवर्णेंकरून मढवून[10] त्याजवर आरोहण केलें. पट्टराणी

१. 'दिवसापूर्वीं' २. 'दिवस सात दिवस' ३. 'व्रतबंधनें जालीं' ४. 'दिल्हें' ५. 'निर्विघ्न कार्य' ६. 'पृथकाकारें', 'वृथकाकारें', 'प्रथकाकारें' ७. महाराजांनीं' ८. 'करून व' ९. 'महाराजांस', 'महाराज' १०. 'मढून'

पटबंधन करून सोयराबाई[१] साहेब बसली. संभाजी महाराज सन्निध[२] बसले. पूर्वेस मुख्य प्रधान ब्राह्मण मोरोपंडित प्रधान पिंगळे हातीं सुवर्णकलश घृतपूरित घेऊन उभे राहिले. दक्षिणेस क्षत्रियप्रधान असावे ते[३] सेनापति हंसाजी हंबीरराव[४] मोहिते[५] रौप्यकलश दुग्धपूर्ण घेऊन उभे राहिले. पश्चिमेस निळोपंत यांचे पुत्र रामचंद्रपंडित अमात्य ताम्रकलश दधिपूर्ण घेऊन उभे राहिले. उत्तरेस छंदोगामात्य प्रधान रघुनाथपंडितराव सुवर्णकलश मधुपूर्ण घेऊन उभे राहिले. त्यांजपाशींच मृत्तिकाकुंभांत समुद्रजल व महानद्या[६] जल कृष्णा, गोदा, यमुना, गंगेच्या[७] उदकें करून पूर्ण ऐसा ठेविला. उपदिशांचे[८] ठायीं क्रमें–करून अग्निकोनास अण्णाजीपंडित सचिव प्रधान छत्र घेऊन उभे राहिले. नैर्ऋत्यभागीं जनार्दनपंडित हणमंते सुमंत प्रधान व्यजनपंखा घेऊन उभे राहिले. वायव्यकोनास दत्त जीपंडित मंत्री प्रधान चामर घेऊन उभे राहिले. ईशान्यभागीं न्यायाधीश सोनोपंत यांचे पुत्र बाळाजीपंडित न्यायाधीश दुसरें चामर घेऊन उभे राहिले. सन्मुख सव्यभागीं पत्रलेखक बाळाजी आवजी लेखनपात्र[९] घेऊन उभे राहिले. वामभागीं सन्मुख गणकलेखक चिमणाजी आवजी लेखनपात्र घेऊन उभे राहिले. आसमंताद्भागीं सर्व कोश व शाला यांचे अधिकारी उभे राहिले. मध्यें शिष्ट ब्राह्मण, पंडित, वैदिक, श्रोत्री, प्रतिष्ठित उभे राहिले. सुहृद व मांडलिक राजे भोंवते उभे राहिले. आणि अभिषेकास प्रारंभ जाहला. यथाविधि मंत्रोक्तप्रकारें प्रधान, ब्राह्मण व पुरोहित ऋत्विज-सह सुवर्णपात्र शतच्छिद्र करून, त्यांत स्थापित उदकें करून व प्रधान द्रव्यकलश घेऊन उभे राहिले. त्यांसहवर्तमान अभिषेक केला. ते समयीं मंगल वाद्य, भेरी, गायनादि समारंभ सर्वही आकाश पृथ्वी शब्देंकरून पूर्ण जालें.[१०]

## नंतर विधिपूर्वक सिंहासनारोहण केलें.

नंतर मंगलालंभन[११] सुवासिनींनीं आरती केली. आणि कांस्यपात्र घृतपूरित त्यांत मुख पाहिलें व आदर्शांत मुख पाहून ब्राह्मणांस दक्षणासह[१२] दोन दानें[१२] दिल्हीं. आणखी शुभ्र वस्त्रें अलंकार परिधान करून तदनंतर सिंहासनाआरोहण[१३] करण्याचा मुहूर्त होता, घटिकादि स्थापना केली होती, सिंहासन–सभा केली. तेथें क्षीरवृक्षांची वेदी, वट औदुंबराची करावी तशी करून, त्यांस[१४] सुवर्णेंकरून तिकटें[१५] मढऊन[१५]

१. सर्वबाई', 'सर्वाबाई', 'सईबाई' २. 'समीप' ३. 'तसें' ४. 'बहिरव' ५. 'मोहिते – सेनापति' ६. 'महानद्यांचें' ७. 'गंगा यांचे' ८. 'उपदेशेचे' 'उपदशीचे' ९. 'लेखनपत्रें', 'लेखनपत्र' १०. 'जाली' ११. 'मंगलस्नान' १२.१२. 'दक्षणासह दानें' 'ब्राह्मणांस दक्षिणा' १३. 'सिंव्हासनारोहण', 'सिंहासनावर आरोहण' 'सिंव्हासनीं आरोहण' १४. 'त्यास ठोकल्यास' १५.१५. 'तगडे मढून'

रत्नखचित केलें. प्रमाण आहे तैसें केलें. त्याजवरि चित्रें प्रथम वोळ वृषभांचीं, त्याजवरि मार्जारांचीं[1], त्याजवरि तरसांचीं, त्याजवरि सिंहांचीं, त्याजवरि व्याघ्रांचीं ऐशी एका बाजूस आठ याप्रमाणें बत्तीस चित्रें[2] चहूंकडे मिळोन काढून त्यास सिंहासन ऐसें म्हणावें, तैसें सिद्ध केलें होतें. त्याजवरि मृगचर्म घालून त्याजवरि कांहीं सुवर्णादि-द्रव्य घालावें. त्याजवरि व्याघ्रचर्म घालून त्याजवरि कार्पास-आसनें मखमलीचीं मृदु ऐशीं घालून, बादली जरी वस्त्रें घालून, उपेबन[3] म्हणजे लोडे[4] तक्क्ये, मागें प्रभावळ करून त्यास छत्र, त्याजवरि मंडप, चांदवा सुवर्णमय वस्त्राचा, त्यास मुक्ताफळांचे घोंस, ऐसें सुशोभित केलें होतें, उत्तम लक्षणी हस्ती व अश्वरथ[5] सजवून, सुवर्णाचे अलंकार घालून, राजांगणीं सिद्ध असावे तैसे आणिले. आरोहण-मुहूर्त लग्नघटिका[6] नेमिले. त्या लग्नावरि श्रीविष्णूची सुवर्णमय प्रतिमा करून, षोडशोपचार[7] पूजन प्राणप्रतिष्ठा करून[7], सव्य हस्ताचे ठायीं स्थापन केली. तशीच घेऊन त्यासहवर्त्तमान मुहूर्तघटिका पूर्ण होतांच, सिंहासनाचे ठायीं आधीं सव्य जाऊन, सव्य[8] जानू गुडघा[8] देऊन[9], नमस्कार करून, पाय न लावितां पूर्वाभिमुख आरोहण करावें तैसें केलें. ते समयीं एकदांच भेरी व मंगलवाद्यें, तोफा सरबत्ती, नृत्य, गीत, वाद्य जयशब्द एकदांच होण्यास प्रारंभ जाला. तो नाद मोठा, गगनचुंबित शब्द होता जाला ! स्वराज्यांत किल्ले, दुर्ग यांस सूचना केली होती जे, ' एक किलियांच्या तोफा एकानीं ऐकतांच त्यांणीं कराव्या. ' त्याप्रमाणें सर्व राज्यांतील किल्ले, दुर्ग यांवर एकदांच सरबत्ती जाली ! !

### गागा भटजींस लक्ष रुपये दक्षणा

यानंतर सिंहासनीं बसल्यावरि रक्तांबरें रक्तभूषणें सुवर्णमय बादली परिधान केलीं. दिव्य माणिकादि रत्नें, चौकडे, कंठ्या, माळा, शिरपेंच, तुरा, जेहेगा,[10] पोंहच्या[11] ऐसे अलंकार घातले. आणि विधिमंत्रें करून धनुष्यबाणपूजन व खड्गचर्म-पूजन करून ते हस्ताचे ठायीं धारण केले. त्यासमयीं सुवर्णाचीं पुष्पें व रौप्यमय करून वृष्टि केली ! षोडश सुवासिनी यांणीं मंगल आर्त्या, ब्राह्मणकन्या घेऊन, उभे राहून, कराव्या तैसें केलें. त्यांस वस्त्रें, भूषणें, अलंकार दिल्हे. नंतर सिंहासनाचे ठायीं बसल्यावरि मंत्रविधि करणें ते करून ब्राह्मणांचे आशीर्वाद घेणें ते घेतले. ऋत्विज, आचार्य व ब्राह्मणपूजन करून गागा भटजी[12] यांसि लक्ष रुपये दक्षणा

---

१. ' मार्जर ' २.२. ' आठाप्रमाणें बत्तीस बत्तीस चित्रें ' ३. ' उदबैन ', ' उपबर्हण ' ' उपेवन ' ४. ' लोड ' ५. ' अश्वरवथ ', ' आश्वरथ ' ६. ' घटिका लग्न ' ७.७. ' प्राणप्रतिष्ठा षोडशोपचार पूजन करून ' ८.८. सव्य गुडघा ' ९. ' ठेऊन ', ' टेकून ' १०. ' झगा ', ' जेगा ११. पोहच्या ', ' पोंच्या ' १२. ' भट्टजी '

संभावना केली. वस्त्रें, भूषणें दिल्हीं. सर्व ऋत्विज यांस पांच पांच सहस्र रुपये दक्षणा, वस्त्रें, अलंकार दिल्हे. पुरोहित यांस चोवीस सहस्र रुपये दक्षणा वस्त्रें अलंकार भूषणें उपाधिक दिल्हें. शिष्ट मंडळी, पंडित यांस कोणांस सहस्र, पांच शत, दोन शत ऐसें योग्यतेनुरूप दिल्हें. सर्व ब्राह्मणसमुच्चय यास देकार पंचवीस रुपये प्रमाणें मेढा§ करून तेथें खालीं करविला. गोसांवी, तडीतापडी, गोरगरीब, भिक्षुक तितक्यांस देकार दोन, चार, पांच रुपये प्रमाणें देवविला.† किल्ल्याखालीं व वरतीं‡ देकार वांटणेस प्रारंभ एकदांच करविला. याप्रमाणें महाराज शालिवाहन शके पंधराशें शाहांणव आनंदनाम संवत्सरे, ज्येष्ठ शुा त्रयोदशी मंदवासरें[1] सुमुहूर्तें छत्रसिंहासनाधीश्वर जाले. आणि राज्याभिषेक त्या दिवसापासून आपला शक त्यांणीं चालविला.

### सर्वांस योग्यतेनुरूप अधिकाराचीं वस्त्रें दिल्हीं.

सिंहासनारूढ होऊन त्या नंतर अष्टप्रधान यांस व दरखदार, महालदार, कारखानदार सर्वांस[2] ज्यांचे[3] जे अधिकारी त्यांस अधिकाराचीं वस्त्रें दिल्हीं. अष्टप्रधान यांचे दरख करणें[4] मुख्य प्रधान यांस व सेनापति यांस बादली वस्त्रें, पांच सणगें व शिरपेंच मोत्यांचे तुरे, कंठ्या, चौकडे, जगा,[5] शिके-कटारा व ढाल-तरवारा व चौघडे-नौबती व जरीपटके, हत्ती-घोडे व सोन्याच्या दांडीच्या चवऱ्या, याप्रमाणें देऊन पदें करारपत्रें करून दिल्हीं. अमात्य यांस बादली वस्त्रें, पोशाक, व ढाल-तरवार, चौकडा, कंठी, तुरा, शिरपेंच, शिके-कटार, रुप्याचें कलमदान ताडीचें व चवरी, हत्ती, घोडा याप्रमाणें दिल्हें. सचिव पंडित यांस बादली वस्त्रें पोशाक, कंठी, चौकडा, तुरा, शिरपेंच, शिके-कटार, ढाल-तरवार, हत्ती, घोडा, ऐसें दिल्हें. सुमंत व मंत्री यांसही पोशाक दागिने सदरहूप्रमाणें ढाल-तरवार हत्ती-घोडे, चवऱ्या दिल्ह्यं[6]. पंडितराव यांस बादली पोषाक, शिरपेंच, कंठी, चौकडा, तुरा, चवरी, हत्ती, घोडे याप्रमाणें दिल्हें, व न्यायाधीश यांस त्या अन्वयें दिल्हें. तीं त्यांणीं[7] पदें बहुमानें घेऊन महाराजांस नजरा करून मुजरे केले. बाळाजी आवजी यांस चिटणिशीचीं वस्त्रें मंदील, दुमजला दुपेटा, झगा, विजार, कंठी, शिरपेंच, चौकडा, रुप्यांचें कलमदान पेटीचें, चवरी व घोडा याप्रमाणें दिल्हें. तसेंच चिमणाजी आवजी यांस फडणिशीचीं वस्त्रें कलमदान ताडीचें दिल्हें. त्यांणीं मुजरे केले. अष्टप्रधान यांस स्वारीस जाणें, तालुके राखणें, तेथें राहाणें यास्तव सर्वांस मुतालिक करून दिल्हे. त्यांस वस्त्रें बहुमान दिल्हे. राजाज्ञापद[8] शंकाजी नीळकंठ महागांवकर यासि दिल्हें.[8]

---

§ 'रमणा' † 'देवविला', 'देविला' ‡ 'वर' १. 'गुरुवासरें' २. 'सर्व' ३. 'सभांचे' ४. 'करणें केलें' ५. 'व झगे' ६. 'दिल्ह्या' ७. 'तीं', 'ते' ८.८. हें वाक्य फक्त कीर्तने प्रतींत आहे.

वरकड[1] महालदार, कारखानदार[2] यांस ज्याचे त्यास अधिकाराचीं वस्त्रें दिल्हीं. शामजी नाईक पुंडे यास पोतदारीचीं वस्त्रें दिल्हीं. बाळाजी रघुनाथ, सबनीस फौजेचे, यांस बक्षीगिरीचीं वस्त्रें, ढाल-तरवार कलमदान ताडीचें, ऐसें दिल्हें. वरकड सरदार मातबर फौज वागवणार मानकरी यांस जशी ज्याची योग्यता तशीं कोणास साडे तीन सणगें कोणास दोन कंठ्या शिरपेंच ऐसें योग्यतेनुरूप, याप्रमाणें सर्वांचे बहुमान नेमून देवविले.[3]

**याप्रमाणे रस्त्यांतून मिरवत देवतादर्शन करून गृहप्रवेश केला.**

[ नंतर ] मुजरे नजरा घेऊन घोडा सुलक्षणिक[4] सोन्याचे जडावाचें सामान बादली, मोत्यांची झालर, ऐसा साज करून आणिला[5]. त्याजवर आरूढ होऊन, राजांगणांत येऊन सोन्याची अंबारी व त्यास मोत्यांचे अलंकार, जरीबादली[6] गाशे, झालरा[6] ऐसा गज[7] सज्ज करून आणिला, त्या अंबारींत बसले. हत्तीचे मस्तकीं सेनापति एक मोर्चेल व अंकुश घेऊन बसले. पाठीमागें मुख्य प्रधान खवाशींत मोर्चेल घेऊन बसले. वरकड अष्टप्रधान, दरखदार, यांस निराळ्या निराळ्या अंबाऱ्यांत बसविलें. कोण्ही हौद्यांत, कोण्ही घोड्यांवर, याप्रमाणे खासे अंबारीचे पाठीमागे चालणार तितके सरदार वगैरे बसून चालले.[9] सर्व रस्ते, घरें रंगविलीं. ध्वज, पताका, तोरणें लाविलीं. मार्गोनीं झाडून, सडे घालून रांगोळ्या घातल्या. अलंकृत करविले. सर्व नगरदेवता यांच्या पूजा यथासांग नैवेद्य, धूप, दीप ऐसें करविलें. त्यामागें करून पुढें जरीपटका व भगवें निशाण यांचे हत्ती दोन; त्यामागें प्रधान व सेनापति यांचे पटक्यांचे हत्ती, सर्व फौजेंतील निशाणें; त्यांजबराबर हुजूर पागा; करवल[10] लोक, घोडे सोने रुप्याचे सामानाचे, बंदुखा अमोल्य, उत्तम वस्त्रें, आभरणें करून युक्त ऐसे शूर व सेनाधुरंधर पदाचे अधिकारी बिनी संरक्षणास त्यांजबरावर चालले. तोफा गाड्यांवरि चालणार स्वारींतील व रथ अश्वांचे व गाड्या, त्यांचे मागें नाना प्रकारचे शूर अश्वांवर व गजांवर बसणार चालले. त्याचे मागें नाना प्रकारचे पदाति पटेकरी, विटेकरी, सांग बरची-बाणेकरी चालले. खासबारदार बंदुखीचे लोक रणवाद्यें तासे मरफे हलग्या वाजंत्री वाजवीत चालले. त्यांचेमागें कोतवाल हत्ती पन्नास व सांडणीस्वार शंभर व बाणांच्या कैच्या उंटावर चालले. त्यांमागें कोतवाल घोडे शेंपन्नास चालले. त्यांमागें नानाप्रकारचीं मंगलवाद्यें शाहजाने[11] वाजविणार, काळू सनया घोडियांवर बसून नगारची चालले. कर्णेकरी, बांके शिंगें हीं सर्व रुप्याचीं हे चालले. त्यांमागें धाडी

१. 'वर्कड' २. 'खानदार' ३. 'देविले.' ४. 'सलक्षणिक' ५. 'आणिले.', ६. ६. 'जरा बाबगाशे', 'जरीबादगासे', 'जरी बाहगास झालरा' ७. 'हत्ती' ८. 'त्याचे' ९. 'बसवून चालविले' १०. 'करवाल' ११. 'शाहाबाजे'

गाणार घोड्यांवर भाट बंदिजन प्रताप वर्णन करीत चालले. त्यांचे मागें लग्या निशाणें व बाणदार जरी व तोमर, भाले, बोथाट्यांचे लोक व चोबदार वेत्रधारी चालले. हत्तीवर बसलेले* ऐसे शूर मल्ल जेठी लोक चालले. त्यांचे मागें महाराजांच्या हत्ती-भोंवतें पायचे लोक, सरदार मावळे मोठमोठे पोशाक वस्त्रें अलंकार ऐसे सभोंवतें दुरून चालले.¶ कांहीं अंतरेंकरून सर्व अष्टप्रधान, मुतसदी यांच्या अंबाऱ्या शें-पन्नास चालल्या. त्यांचे मागें फौजेचे लोक नेमिले तितकेच याप्रमाणें रस्त्यांतून मिरवत देवतादर्शन करून, त्यांस वस्त्रें, अलंकार, फळें, दक्षणा देऊन पुन्हां रस्त्यानें माडीवरून कन्या सुवासिनी मंगलआर्त्या, दधी, लाह्या, पुष्पे, दूर्वा यांची वृष्टि करितात, ऐसे होत्साते [ महाराज ] राजद्वारीं येऊन, रथांत बसून राजांगणांत गेले. तेथून शिबिकेंत बसून सभाद्वारीं पूर्ण कलश, निंबलोण उतरून टाकिलें. त्यांस वस्त्रें अलंकार दिल्हे, आणि गृहप्रवेश करिते जाले.

आदौ गृहीं कुलदेवता नमस्कार, पूजा करून, फल, तांबूल, दक्षणा अर्पण करून, मातुश्रींस नमस्कार केला. राजपत्न्या यांणीं वोवाळिलें. त्यांस वस्त्रें, अलंकार अमोल्य देऊन सिंहासनाचे ठायीं येऊन बैसले. सर्वांच्या नजरा घेऊन, सर्वांस विडे देऊन, निरोप दिल्हे. ब्राह्मणभोजनें जालीं. इष्टजन, आप्त, यांसहवर्तमान मिष्टान्नभोजन करून तांबूल भक्षिलें.[१] आप्त जनांस निरोप देऊन, मातुश्रींपाशीं बसोन " आपले आशीर्वादें मनोरथ सिद्धीस गेले, " इत्यादि गोष्टी करून मातुश्रींची पूजा वस्त्रादि करून अंतःपुरांत गेले.

द्वितीय दिवसाचे ठायीं सर्व गुणिजन, कलावंतजन[२] यांस विपुल द्रव्य व वस्त्रें देऊन संतुष्ट केलें. मांडलिक राजे व संपूर्ण[३] राष्ट्रजन[३] यांस व पंडित शिष्टसमुदाय आले त्यांचे सत्कार भोजनादि करवून वस्त्रें भूषणें देऊन निरोप दिल्हे.

## स्वराज्य व स्वभाषा शुद्धिकरण

या प्रकारें महाराजांनीं राज्याभिषेकसमारंभ व तरतूद अत्यद्भुत केली. धर्मस्थापना करून राज्य करण्याचे धर्म, यवनाक्रांत पृथ्वी होऊन लोपले होते, ते पुन्हां जीर्णोद्धार[४] करून[४] स्थापिले. सिसोद्यांचे कुळांत उत्पन्न होऊन कुळभूषण कुळधर्मस्थापना केली ! पत्रें लिहिणें तीं " स्वस्तिश्री राज्याभिषेक शक घालून क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति स्वामी यांणीं समस्त-राजकार्य-धुरंधर व समस्तसेनाधुरंधर अथवा राजमान्य राजश्री अथवा राजश्री, " ज्याची जशी योग्यता व कोण्हास कसें ल्याहावें याची पद्धति करून ल्याहावें तैसें[५] केलें. तैसेंच

* ' बसले ' ¶ ' चालून ' १. ' भक्षण केलें ' २. ' कलवांतिनी ', ' कलवांत ' ३. ३. ' संपूर्ण जन ', ' सर्वराष्ट्र जन ' ४. ४. ' केला. स्थापिलें. ' ' करून स्थापिले ' ५. ' लिहावें तैसें '

जमाखर्चीं लिहिणें, झडती, हिशेब लिहिण्यास यवनी नांवें मोडून, गजशाला, अश्वशाला, भंडारगृह, वसनागार, पाकशाळा ऐशीं नांवें ठेवून लिहिणें करावें तैसें[१] केलें. अष्टप्रधान यांचे व्यापार पूर्वीची शास्त्रपद्धति काढून, चाली पाहून केले.

### अष्टप्रधानांचीं कार्यें, कर्तव्यें

मुख्य प्रधान यांणीं सर्व राजकार्य, मंत्र, राजकारणें[२] करावीं; सर्वांशीं समान बुद्धीनें, सर्वांचे अनुमतें कोण्हाशीं द्वेषबुद्धि न करितां सर्वांस घेऊन चालावें. राजहित तें प्राणाहीपेक्षां[३] अधिक, आपला स्वार्थ तिळप्राय न पाहातां, दक्ष व विचक्षणपणें, निरालस्य, सर्वकाळ करीत असावें. सेना घेऊन युद्धादिप्रसंग शूरत्वें[४] राज्य नित्य नूतन साध्य करावें. शत्रूंची बातमी राखून पराभव[५] करावे. राजपत्रें होतील त्यांजवर मुद्रा मुख्य प्रधान यांणीं आपली दुसरी करावी.

सेनापति यांणीं सर्व सेना रक्षण करून, त्यांचे मानसन्मान रक्षून, वेतनें समयाचे समयास पाववून, राजास[६] ज्यांणीं जशी सेवा केली ते निवेदन करून, त्यांस वेतनें, बक्षिसें देववावीं.[७] सर्व सैन्य घेऊन युद्धादिप्रसंग करावे.

अमात्य यांणीं सर्व राज्यांतील आयव्यय जमाखर्च होईल तो लेखनाधिकारी यांजपासून चौकशीनें लिहिणें करवून, आपण पाहून राजास निवेदन करावें. राजपत्रांवर व जमाखर्चाचे[८] हिशेब सर्व राज्यांतील, महालांतील यांजवरि चिन्हें करावीं. राजास नित्य निवेदन करावें. येविशीं दक्ष निपुण असावें, व मोठीं मोठीं राजकार्यें करून युद्धादि प्रसंग सैन्य घेऊन करावे.

सचिव यांणीं राजपत्रें होतील त्यांत न्यूनाधिक अक्षर मजकूर यांचा शोध करून नीट करवावें, व तसेंच महाल, परगणे, यांचे हिशेबाचेही शोध करून राजपत्रावरि 'संमत' करून बारचिन्हें[९] रुजू करावें. युद्धादि प्रसंग राजहित तें करीत असावें.

मंत्री यांणीं मंत्रकार्यांत निपुण असोन राजकारणें राखीत असावीं. राजांनीं जें जें कर्म, कृत्य केलें, त्याची दिनचर्या, वाका, लिहून ठेवावा. आमंत्रण निमंत्रण, राजाचें भोजनादि साहित्य, पदार्थ काय पाहिजे हें पाहात असावें, व राजकार्याविषयीं दक्ष असोन युद्धादि प्रसंग करावे. राजपत्रावरि 'संमत' ऐसें चिन्ह करावें.

सुमंत यांणीं सर्व परराज्यांतील राजकारणें, शत्रूंचे संधिविग्रह पाहून बातमी राखणें, व वकील येतील जातील त्यांचे सन्मान वगैरे करावे. सर्व राजांस निवेदन

---

१. 'करावेंसें' २. 'राजकारण' ३. 'प्राणाहून' ४. 'शुरत्वें', 'शुरत्व' ५. 'पराभवे' ६. 'राज्यास' ७. 'देवावीं' ८. 'खर्चाचे' ९. 'चिन्ह'

करून आज्ञेनें राजकार्य, युद्धादि प्रसंग करीत असावे.[१] राजपत्रावरि ' संमत ' ऐसें चिन्ह करावें.

पंडितराव यांणीं धर्माधिकार, सर्व पंडितजन यांचे व विद्वान् ब्राह्मण यांचे सन्मान करावे. व धर्माधर्मविविक्षा, यज्ञ करणें व शांतिक, पौष्टिक, नित्यनैमित्तिक, काळाचे काळीं सुचवून करवावें. दंड कोणास कसा करावा हा धर्म पाहाणें, प्रायश्चित्ताचे निर्णय व त्याचीं पत्रें होतील त्यांजवर ' संमत ' ऐसें चिन्ह करावें.

न्यायाधीश यांणीं सर्व राज्यांतील न्याय अन्याय–वृत्तीचे व भूमीचे–यांचे सर्वकाल राजास कांहीं एक दोष न लागे ऐसे न्याय करणार अधिकारी व शास्त्रज्ञ ब्राह्मण नेमिले त्यांचे विचारें धर्मता[२] न्याय करून सर्वकाल राजांस निवेदन करावें. पाहात असावें. न्यायाचीं निवाडपत्रें होतील त्यांजवर ' संमत ' ऐसें चिन्ह करावें.

चिटणीस पत्रलेखक यांणीं सर्व राजपत्रें ल्याहावीं[३] व राजकारणपत्रें ल्याहावीं,[३] राजांचें हृद्गत जाणून तत्काल नाना प्रकारचें, कल्पना[४] करून, चतुरपणें लेखन करावें. जें युद्धेंकरून, आयासेंकरून, कार्य होणें तें पत्राचे भाव पाहूनच कार्य होत असावें, ऐसें लेखन करावें. पत्रें येतील त्यांचीं उत्तरें ल्याहावीं. चिटणिशी व फडणिशीं[५] पत्रें कोणतीं कशीं ल्याहावीं, दानपत्रें नांवाचीं, गांवाचें, नूतन इनामाचें, फडणिशींतील पत्रें, लेखक वर्त्तमान भावी घ देशमुख देशपांडे व तालुकदार ऐशीं; चिटणिशी निवाडपत्रें, प्रायश्चित्त वगैरे चिटणिशी, यांचे कानूजाबते ठराव करून दिल्हे, तैसें लिहावें.

फडणीस यांणीं अमात्यांचे संमतें सर्व जमाखर्च लिहिणें तत्काळ लेहून बहुत सावधपणें रक्षावे. राजांस निवेदन करावें. दक्ष विचक्षण गणनक्रियेंत असावें. बारा महाल अठरा कारखाने यांचे अधिकारी यांणीं व तालुकदार[६] सुभे, किल्ले यांणीं आपलाले अधिकार करून, आपलाले हिशेबकितेब लिहून मजमू-[७]दफ्तरीं गुजरावे. त्यांणीं एकबेरजी झडती करून सालाचे सालांत दुसरे सालीं समजावीत असावें. ऐसे निबंध बांधून दिल्हे.

### नवीन अधिकारी : त्यांस नवीन पद्धति

पूर्वींही राज्याचा पाया घालून धारे करून दिल्हे होते व नवीन अधिकारी जाले त्यांस पद्धति करून दिल्ह्या. सभा दरबार करणें व आपण प्रातःकाळापासून उद्योग करण्याचा नेम पूर्वीं केला त्याप्रमाणें करून सभेस बसणें, सिंहासनीं अथवा सदरेस दरबार कारभार करण्यास बसणें, यास समीप सेवक पाठीमागें आठदाहा

१. ' करावे. ' २. ' धमता ' ३. ' लिहावीं ' ४. ' कल्प '
५. ' फडणिशींतील ' ६. ' तालुक्यास ' ७. ' मजमूद '

असामी विश्वासू, तर्कज्ञ, नाईक नाईक असे, हुजरे वगैरे यांणीं मोरचेल, चामरें व विडे, पंखे ऐसे* राजभोग असतील ते घेऊन तितकेच उभें असावे, ते नेमून असावे. त्यानंतर सिंहासनाचे दोन्ही भागीं आप्तविषयी शरीरसंबंधी विश्वासू ऐसे दाहाबारा नेमून दिल्हे तितकेयांणींच§ समीप मर्यादा ठेवून असावें.

प्रथम स्तंभापाशीं मुख्यप्रधान यांणीं बसावें[१]. त्यांजपाशीं अमात्य, त्यांजपाशीं सचिव, त्यांजपुढें मंत्री ऐसे चार प्रधान असावे.[२] उजवे बाजूस वामभागीं पंडितराव, त्यांजपाशीं सेनापति त्यांचेपुढें सुमंत, त्यांचेपुढें न्यायाधीश यांणीं बसावें. उजवे बाजूस, चतुःप्रधानांपुढें,[३] चिटणीस; व डावेकडे फडणीस प्रधानांजवळ बसावें. त्यापुढें मोठे मोठे सेनाधिकारी व शूर लोक, सरदार, शिपाई योग्यतेनुरूप डावे बाजूस बसावे. सव्यभागीं[४] कारभारी उजवे बाजूस मुतसदी[४] व कार्यकर्ते मोठे मोठे सुभे व तालुकदार, महालदार, वकील[५] परराज्यांतील,[५] यांणीं योग्यतेनुरूप बसावें. ज्यांचे त्यांचे मुतालीक व कारकून ज्यांचे जे त्यांचे मागें बसावे. ज्याचें कार्य लागेल त्याणीं पुढें होऊन अर्जविनंति[६] करावी, सांगितली आज्ञा ती ऐकून उत्तर करून पुन्हां स्थळीं बसावें. गडबड तिळप्राय[७] होऊं नये. चिटणीस व फडणीस वगैरे पत्रें[८] लिहिणें वाचणेंची,[८] तेव्हां सिंहासनापाशीं आपलाले बाजूस मर्यादेनें बसोन लिहून वाचून दाखवावें, आज्ञा होईल तें कार्य करावें. आणि बसणें तें आपलाले स्थळीं बसावें. योग्यतेनें कोण्ही कोण्हाचे पुढें अथवा मर्यादा सोडोन थोरांचे स्थळीं बसू नये. ज्याचें जें स्थान[९] त्यांणीं मर्यादेनेंच असावें. चोपदार यांचे नाईक दोन, यांणीं सभेंत सन्मुख असोन येतील त्यांचे नांवें मुजरा द्यावा. ज्याचें स्थान योग्यता तसें कोणाची भीड न धरितां आधींच जपून जेथील तेथें बसवावें. गलबल केली तरि उठवून[१०] बसवावें. दरबारचे[११] देवडीची चौकी चोपदार यांजकडे. मुतसदी यांस बोलावणें, आणणें त्यांणीं जावें.[१२] शूर शिपाई यांस भालदार यांणीं बोलावणें करावें. जे राजकार्यास येणार तेच पाहून घेत असावें. नवीन आल्यास अर्ज करून घ्यावे. सभेंत दोही भागीं मागें सर्व कारखाने यांचे नाईक, हवालदार, हुजरे वगैरे यांणीं दाटी व अमर्यादा न करितां उभें असावें. वरकड लोक यांणीं पुढें सर्व कारखाने यांचे कामाचे उपयोगी त्यांणीं देवडीपाशीं असावें. नाईक असतील त्यांस कार्य सांगितल्यावरि त्यांणीं आपलाले लोकांस सांगून करवावें. जरीपटका निशाण याजपाशीं हुजूरपागेचे लोक व शिपाई लोक यांणीं नेहमीं बसलें असावें. चौकी असावी. देवडीबाहेर लोक

---

* 'एशीं' § 'तितकियानींच' १. 'असावें' २. 'बसावे.' ३. 'प्रधानांपुढें' ४. ४. 'सव्यभागी उजवे बाजूस कारभारी व मुतसदी' ५. ५. 'व किल्लेकरी राज्यांतील' ६. 'विनंति' ७. 'तिळभर' ८. ८. 'लिहिणें, पत्रें वाचणें,' ९. 'स्थळ' १०. 'उठोन' ११. 'दरबारची' १२. 'करावे.'

शिपाई वगैरे यांणीं तयार चौकीवर[1] असावें. बदलीनें यावें जावें. दरवाज्याबाहेर छबिना तयार हत्ती घोडे वगैरे बारी प्रमाणें असावे. ऐशा मर्यादा करून दिल्ह्या.

### संकल्पानुरूप दानपत्रें : अष्टप्रधान व वरकडांस तैनाती

सहस्र गोप्रदानें व सर्व सत्पुरुष यांस वस्त्रें, ग्राम भूमि संकल्प केले. कोणास ग्राम, भूमि देणें तें व सरंजाम देणें ते यवनांचे तहापैकीं[2] चौथाई, मोकासा बाबती ठरलें त्यांत द्यावें.[3] असें देणें द्यावें कीं, पुन्हां आपण अथवा दुसरे यांनीं हरण केलें ऐसें न होतां दिल्हें तेंच अक्षय[4] चालावें, ऐसें करून दिल्हें. अष्टप्रधान यांस तैनाता केल्या. मुख्य प्रधान यांस पंधरा हजार होन, अमात्यांस बारा हजार होन, वरकडांस दाहा हजार होन, याप्रमाणें करून दिल्हें. त्यांत कांहीं मोकासे, सरदेशमुखी ऐसे[5] ऐवज लावून बाकी इतलाखी ऐसें करून दिल्हें. शिवाय तालुके किल्ले यांचे कारभार[6] निसबतीस[7] नेमून दिल्हे. बाळाजी आवजी[8] यांस " तुमची सेवा बहुत निष्ठेनें जाहली व राज्याचे वृद्धीस उपयोग बहुत जाले, यास्तव अष्ट प्रधानांतील पद योजना करणार " म्हणोन अभिषेकापूर्वी सांगितलें. तेसमयीं, " मी कारकून लिहिणार, दरखदार, मजला प्रधानांतील पद न लगे. सर्व काळ चरणांचें सान्निध्य व अक्षयीं कृपा सेवा घडणें यास थोरलें पद घेऊन थोरले सेवेस जाणें चरणांचा वियोग घडेल. माझी सर्व जोड चरणांची सेवा ! यापरता लाभ मानीत नाहीं !! स्वामी कृपा करणार, त्या अर्थीं चिटणिसी स्वामींनीं दिल्ही. हेच अक्षयी वंशपरंपरेनें वतनी करून देऊन चालावी ऐसें अभयपत्र करून, दोन्ही धंदे कारखानिशी व जमेनिशी माझे निसबतीस आहेत ते व चिटणिसी अक्षयी करून घ्यावी. " त्याजवरून कृपाळू होऊन महाराजांनीं चिटणिसीचींच वस्त्रें बहुमान देऊन[9] पत्र शपथयुक्त करून दिल्हें. साहा हजार होन तैनात केली. त्यास कांहीं मोकासे लावून दिल्हे. फडणीस चिमणाजी[10] आवजी यास तीन हजार होन तैनात केली. वरकडही महालदार कारखानदार यांस वगैरे कोण्हास पांच, चार, तीन, दोनशें व शंभर ऐशी होनांच्या तैनाती करून दिल्ह्या. तसेंच लोक, सरदार, पायचे लोक व सेवेचे लोक यांस योग्यतेनुरूप सर्वांस पांच, चार हजार होनांपासून दोनशें, शंभर, पन्नास, पंचवीस, पंधरा पर्यंत तैनाती करून चालवावें ऐसें केलें.

### भागानगर, विजापूर व दिल्ली येथील प्रतिक्रिया !

हे राज्याभिषेक होऊन तख्ते केलें, हें भागानगरीं व विजापुरीं वर्त्तमानें

१. ' चौकीं ' २. ' तहेकीं, ' ' तहेनीं ' ३. ' द्यावीं ' ४. ' अक्षयीं '
५. ' ऐसा ' ६. ' कारभारी ' ७. ' तीसबत्तीस ' ८. ' येवजी ', ' ऐवजी '
९. ' होऊन ' १०. ' चिमाजी '

गेलियावरि[1] कळोन भागानगरकर मैत्रीचे[2] होते,[2] त्यांणीं संतोष मानिला; विजापूरकर भयाभीत,[3] बाह्यात्कारें संतोष दाखवून त्यांणीं वस्त्रें, जवाहीर, हत्ती, घोडे महाराजांस पाठविले; व सर्व पाळेगार मांडलिक हे चंजाऊरपर्यंत सर्वांचीं[4] वस्त्रें, भूषणें, जवाहीर पाठविते जाले. दिल्लीचे पादशाहा रणथंबोहर[5] येथें होते त्यांस सर्व वर्तमान समजलें. ते पादशाहा बहुत खप्पा होऊन दिलगीर जाले. आणि 'खुदानें वर देऊन आम्हांस बाराशें वर्षें पादशाहात दिल्ही ती मर्यादा अवकाश असतां हिंदूंची पादशाहात आम्हांस दिल्ही ती आजच पुन्हां हिंदूंची हिंदूंस देऊन तख्त दुसरें पृथ्वीवर हिंदूंचें जालें. याउपरि चांगली गोष्ट पुढें व्हावयाची व हें तख्त मोडावयाचें कठीण गोष्ट आहे. आपण सुलतान रुकद्दीन[6] याचे कुळांत उत्पन्न होऊन आपले कारकीर्दींत हे गोष्ट घडली, व्यर्थ उत्पन्न जालों ! शिवाजीनीं राणाजीचे कुळीं उत्पन्न होऊन पुन्हां छत्र सिंहासन तख्त केलें, ते धन्य जाले !' म्हणोन तीन दिवसपर्यंत बाहेर दरबारास आले नाहींत. "मक्केस निघून जावें किंवा येच समयीं मसलत करावी तरि बळेंकरून ते अधिक जाले" म्हणून जनान्यांत राहिले. तेव्हां सर्व वजीर व अमीर यांणीं अर्ज करून, "हे गोष्ट ईश्वरी इच्छेची आहे. आपलांही प्रताप, ताले थोर आहेत. प्रेत्नें[7] करून सर्व गोष्टी करितां येतील, म्हणून समाधान करून दरबार करविला. बाहेर आले. आणि सुभ्यास दिलेलखान यास पत्रें लिहिलीं जे, 'कसेंही करून विजापूरची पादशाही कमजोर जाली, तिजवरि मोहीम करून ते हस्तगत करावी. आणि भागानगरास वोढा[8] लावावा. यांत शिवाजी राजे यांची[9] मदत करितात न करितात हें पाहावें. त्यांशीं सख्य होईल तितकें करून, त्यांचे मुलखाचे वाटे न जातां, आधीं हें कृत्य करावें,' ऐसें लिहीत गेले.

## जिजाबाईस मृत्यु : पुन्हां सिंहासनारोहणसभा !

यानंतर त्याच[10] शकांत १५९६[11] ज्येष्ठ वद्य नवमीस जिजाबाई समाप्त जाली. त्यांची उत्तरक्रिया महाराजांनीं लक्ष रुपये लावून महादानें देकार ऐशी केली. बहुत खेद केला कीं, "तीर्थरूप दूर देशीं जन्मप्रभृति राहिले. मातृवियोग नसतां प्राप्त आज जाला !" म्हणून चार महिने पर्जन्यकाळ रायगडींच राहिले. आश्विन शुद्ध पंचमीचे मुहूर्तें पुन्हां सिंहासनारोहणसभा केली.

## 'जोहार करण्याऐवजीं 'रामराम' म्हणा !'

पर्जन्य गेल्यानंतर[12] संभाजीराजे व कारभारीसह महाराज सर्व संपत्ति व

---

१. 'गेलीं. यावरी' २.२. 'मैत्रीच होती' ३. 'भयभीत' ४. 'सर्व'
५. 'रणथंवे' ६. 'रुकदीन', 'रुकनदीन' ७. 'प्रयत्नें' ८. 'वेढा'
९. 'त्यांची' १०. 'त्याचे' ११. '१६०', '१६००' १२. गेला. यानंतर'

सरदार अष्टप्रधान फौजेसह निघोन राजगडीं येऊन प्रतापगडचे देवीचें दर्शन घेतलें. तेथून श्रीरामदासस्वामींचे दर्शनास आले. ते समयीं महाराजांस लोक ' जोहार ' म्हणोन करावयास आले. त्यांस स्वामींनीं विचारलें " हे शब्द अर्थरहित काय आहेत ? यांत अर्थ कांहीं नाहीं, " म्हणतां महाराजांनीं 'वंदन करण्यास जोहार म्हणतात ' सांगितलें, आणि ' काय म्हणून बोलावें ' असें स्वामींस विचारिलें. तेव्हां " राम-राम कां म्हणत नाहीं ? म्हणत जावें, " सांगितलें. तें सर्व जनांस एक समयीं उपदेशस्थानीं जालें.

## चाफळचे श्रीरामास नेमणूक : समर्थांची आज्ञा

महाराजांनीं, " स्वामींनीं पर्वतवास करणें त्या अर्थीं परळी किल्ला आपला, तेथें असावें, सेवा घडावी, " विनंति केली. तेव्हां "चाफळचे श्रीरामजींचे[१] उत्साहाचा बंदोबस्त करावा, " आज्ञा जाली. त्यास अकरा[२] गांवचे मोकासे[२] व सरदेशमुखी श्रीस नेमून अकराशें होन नेमणूक शिवाय करून उत्साह करविला. परळीस कड्यांत कोनाडा जागा करून तेथें येणें, राहाणें करूं लागले. तेथें राजमतें[३] स्थान योजून " मर्जीस येईल तेव्हां राहात जावें, किल्ल्यांचा दरवाजावरचा[४] व हवालदार[४] सर्व आपले आज्ञेंत राहात जातील[५] " सांगितलें. यांणीं " किल्लेदार याणींच आमचे आज्ञेंत चालावें वरकड प्रयोजन नाहीं. " सांगितलें. " जेथपर्यंत तुमचें स्वराज्य होईल, अंमल बसेल, तेथपर्यंत ग्रामदेवता श्रीमारुती असें स्थापावे. " आज्ञा जाली. ती मान्य करून तसें करविलें. पूजा करून पुन्हां राजगडास[६] आले. कांहीं दिवस पुणें वगैरे ठिकाणीं राहिले. श्रीजेजुरी व शिखरचें दर्शन केलें.

## बलात्कारी, अविचारी, उग्र प्रकृति संभाजी

[ नंतर ] संभाजी महाराज यांस " कारभारी[७] यांचा विचार समजोन घेत जावा[७], राज्याचे अधिकारी ज्येष्ठ पुत्र तुम्ही, " म्हणोन आज्ञा केली. परंतु उग्र प्रकृति, महाराजांचे मर्जीनुरूप वागणें पडेना, ऐसें होऊं लागलें. कांहीं दिवस राजगडीं राहून रायगडीं गेले. पांचवडीं राहिले. महाराजांचे मनांत बहुत हेतु " हे राजपुत्र सर्व-गुणसंपन्न असोन यांणीं राज्यभार चालवावा, आपणांस विसांवा व्हावा. " म्हणून बहुता[८] रीतीनें[८] ' मार्गें करून चालावें ' हा बोध करून त्यांचा व्रतबंध करून, युवराज्याभिषेक करावा ऐसें मनांत आणून व्रतबंध केला. परंतु संभाजी महाराजांची मर्जी एक प्रकारची ! कोण्हे एके दिवशीं हळदकुंकू समारंभ, शीतळागौरी, यास

१. ' रामजीचे ' २.२. ' अकरा मोकासे ' ३. ' राजमंदिर तें ' ४.४. ' दरवाजा व ', ' दरवाजा वरचा हवालदार ' ५. ' जाईल ' ६. ' रायगडास ' ७.७. ' कारभार करीत जावा, समजावीत जावें ' ८.८. ' बहूत रितींनीं '

सर्व सुवासिनी स्त्रिया राजवाड्यांत येणार त्यांत कोण्ही रूपवान स्त्री आली. तिजला महालांत नेऊन बलात्कारअविचार जाहला. हें वृत्त महाराजांसही समजलें. ते समयीं बहुत तिरस्कार येऊन बोलले जे, "राज्याचे अधिकारी हे, अगम्याअगमन[1] श्रेष्ठ वर्णाचे ठायीं जालें, सर्व प्रजा हें राजाचें कुटुंब आप्तसमान[2], हे[3] पुत्र जाले तरी काय करावयाचे? यांचा त्याग करीन, शिक्षा करीन!" ऐसें आग्रह करून बोलले. ही बातमी संभाजी महाराज यांस समजली. त्याजवरून दोन घोडियांवरि आपण व स्त्री ऐसे बसोन, पांच पंचवीस माणसें केवळ[4] आपले खासगीचीं घेऊन रात्रीसच निघोन पांचवडास असतां तेथून गेले. ते वेळे दिलेलखान[5] औरंगाबादेस होते त्यांजपाशीं गेले. कांहीं दिवस त्यांणींही संतोष मानून हें कार्यच जालें म्हणून, दरमहा बांधोन देऊन, बहुत सत्कार करून ठेविले. कांही एक फौज लोक जमाव[6] करून ठेविले. आणि दिलेलखान यांणीं आपली फौज कांहीं बराबर देऊन भूपाळगड जाऊन घ्यावा ऐसा विचार करून, राजे यांस रवाना केलें. ते समयीं तसे चालून येऊन, वेढा घालून मोर्चे लाविले. गोळीं गोळा टाकावा तरि संभाजी महाराजच पुढें येऊन उभे राहावे आणि हवालदार यास "दरवाजा उघडावा, नाहीं तरि शिरच्छेद करीन, सर्व लोक मारीन" सांगून पाठविलें. तेव्हां कोण्हास धीर न पुरे. गोळा वाजवितां न ये. भयाभीत होऊन पळूं लागले. फिरंगोजी नरसाळा हवालदार शास्ताखान याशीं चाकण[7] भांडविला[7] तोच होता. विठ्ठल भालेराव सबनीस होते. नामजाद लोक पळून गेले[8] ते समयीं यांसही अवसान न पुरे. लोकांचा पळ सुटला, काय करावें? लोकांची गति हे! आपण दम धरून उभे राहून[9] लढावें[9] तरि महाराज पुढें येणार, गोळा टाकणेस[10] न ये.[10] म्हणून किल्ला सोडून रात्रीस पळून[11] महाराजांकडे गेले. किल्लेकरी कांहीं राहिले त्यांस किल्ला घेऊन धरिले. बहुतेकांचे डावे उजवे करून हातपाय तोडिले. उग्र दंड[12] केलें. असेंच सर्व किल्लेकरी[13] यास समजावें म्हणून दहशत घातली. फत्ते[14] जाहली[14]. कांहीं मनांत[15] विचार केला कीं, हें करणें ठीक नाहीं, म्हणून माघारे निघोन दिलेलखान याजकडे गेलें.

## पुत्रास बोध : अनुताप

महाराजांस वर्तमान समजलियावरि पुत्राचें आचरण ऐसें![16] म्हणून

---

१. 'अगम्य–गमन', 'अगम्यागमन' २. 'अपत्यासमान', 'आप्त त्यासमान' ३. 'हें तरी' ४. 'मावळे' ५. 'खान' ६. 'जमा' ७. ७. 'चाकण भांडविली', 'चाकणा भांडविली' ८. 'पळूं लागले' ९. ९. 'राहावें' १०. १०. 'कसा टाकावा?' ११. 'निघोन' १२. 'शासन' १३. 'किल्ले' १४. १४ 'किल्ले फत्ते करून' १५. 'मनांतही' १६. 'हें'

बहुत खिन्न जाले. आणखी किलियांस[1] येऊन असेंच करतील जाणून ताकीद केली जे, " गोळा वाजवावा, लढावें, किल्ले सोडूं नयेत. " आणि संभाजी राजे यांजकडे कारकून पाठवून बोध करविला[2] कीं, " हें कृत्य तुम्ही करितां हें काय ? आम्हीं श्रम करून राज्य सोडविलें हें तुम्हांसाठीं किंवा कोणासाठीं ? तेथें राहून यवनांचा समागम करून पुन्हां आपली स्थळें व राज्य त्यांचे घरीं चालावें हे बुद्धि धरली, हा अपाय तुमचा किंवा आमचा होतो ? आम्हांस याउपरि कांहीं कर्तव्य नाहीं. एखादे क्षेत्रीं वास किंवा श्रीरामदासस्वामींपाशीं जाऊन बसावें[3] परंतु तुमचीच हानी होईल. मागील जाल्या गोष्टी त्या जाल्या, याउपरि तुम्ही निघोन यावें. पाहिजे तेथें खासगी खर्चास तालुका[4] लावून घेऊन राहावें. कारभार आटोपेल तितका करावा. माहीत व्हावें. " ऐशा कित्येक ममतेच्या विवेकाच्या गोष्टी सांगून पाठविल्या. बोध होईल ते रीतीनें करविला. याजवरून त्यांणीं विचार केला कीं येथें राहून यांजपाशीं अथवा विजापूर भागानगर यांचे पादशाहींत आपले मनोगतानुरूप चालावयाचें[5] नाहीं, ऐसें महाराजांचे लिहिल्यावरून[6] व सांगून पाठवल्यावर[7] अनुताप होऊन स्त्रीसहवर्तमान युक्तीनें निघोन येऊन[8] महाराजांचें दर्शन महाराज पनाळ[9] प्रांतीं होते तेथें येऊन घेतलें.

### घरोबियाचे रीतीनें समाधान करून पनाळयास ठेविलें !

ते समयीं एकांतीं बसवून, " तुम्ही सद्वंश, तुम्हांसाठीं राज्य किती संपादन केलें[10] ! याचे अधिकारी तुम्ही. सर्व प्रजा हें तुमचें कुटुंब, व लेंकराचे ठायीं मानावें.[11] राजे लोक तुम्ही. शतावधि स्त्रिया लग्नें[12] केलीं[13] असतां अथवा शक्तिनसार शतावधि उपस्त्रिया नाटकशाळा ठेविल्या[14] असतां युक्त आहे. परंतु अविचार अगम्यागमन[15] करणें व परस्त्रीबलात्कार हे दोन्ही यशक्षयास कारण. पूर्वीं मोठेमोठे राजे व रावणादि राज्यकर्ते या दोषेंकरून राज्य व कुलक्षयास गेले. हें राज्यक्षयाचें कारण[16] होय." ऐसें घरोबियाचे रीतीनें समाधान करूं ये तसें करून पनाळा[17] प्रांत, तीन लक्षांचा[17] तालुका, त्यांचे खर्चास नेमून देऊन, त्यांस कारभारी विठ्ठल त्रिंबक, बाजी मुरार यांचे नातू देशपांडे महाडकर यांस खासनिसी पद देऊन ठेविलें, सोमाजी नाईक वंकी[18] व बावाजी समशेरबहादर हे सरदार लोक वगैरे देऊन ठेविलें. त्यांची चौकशी सांगितली. संभाजी महाराज

---

१. ' किल्ल्यांत ' २. ' केला ' ३. ' बसों ' ४. ' तालुके ' ५. ' चालणार ' ६. ' लिहिल्यावर ' ७. ' पाठविण्यावर ' ८. ' आले. ' ९. ' पन्हाळ ' १०. ' संपादिलें ! ' ११. ' मोजावें ' १२. ' लग्न ' १३. ' केलें ' ४१. ' ठेवून केलें ' १५. ' अगम्यगमन ' १६. ' करणें न ' १७. १७. ' पन्हाळा प्रांतीं नऊ लक्षांचा ', ' पन्हाळा या प्रांतांत तीन लक्षांचा ' १८. ' बाकी '

यांस बुद्धिवाद करून युक्तीनें वागत तसें करावें, ऐसें सांगून ठेविलें. किलियाची परवानगीरसानगी सर्व हवालदार यांचे जिमेस सर्व कारभार, ऐसें करून हवालदार याचेच निसबतीस काम ठेविलें. यांणीं वरतें असावें. खालीं उतरणें तें परवानगीनें लेहून नेऊन करावें, ऐसें करून ठेविलें. कोल्हापूरचे ठाणियांत महाराजांनीं जनार्दन नारायण सुमंत हे ठेविले. याजप्रमाणें बंदोबस्त करून देऊन नजरबंद ऐसेच ठेविले. आणि महाराज निघोन रायगडीं[1] आले.

## विजापुरकरांच्या मदतीस धांवून गेले !

नंतर दिलेलखान यास औरंगजेब यांणीं विजापूरचें पादशाहावरि मसलत करावी, लिहिलें. शिवाजी राजे यांशीं विरुद्ध न करितां ते पादशाहात हातीं ध्यावी.[2] कमजोर न होऊन[3] जाहली आहे, यांत मखलत करावी. त्याजवरून पोक्त सामान फौज तोफखाना वगैरे करून विजापुरावरि चाल केली. भीमानदी उतरून तमाम मुलूख, शहरें मारीत ठाणीं घालीत[4] शहरानजीक भिडला. खान[5] अलीशान मशऊदखान[2] यांणींही आपली फौज व उमराव जमा करून लढाईचा प्रसंग करविला. परंतु खानाचें सामान भारी, उपाय न चाले. खजिना व सामान यांची कोताई पडली. याजमुळें कांहीं एक येत्न न चाले. याउपरि पादशाही जाती ऐसें समजोन, बहुतच विचारांत पडून विचार केला जे, “ शिवाजी राजे हे आपले पादशाहींतील शाहाजी राजे यांचे बेटे, उमराव. त्यांणीं आपले पादशाहींतील व दुसरें आणखी दैवेंकरून राज्य साध्य[3] केलें. तख्तनिशीन जाले. आम्हांकडील उमराव चालून गेले, खटाई जाली, तत्रापि तह करून संस्थान रक्षिलें. त्यांचे व आपलें अंतःकरण शुद्ध नाहीं, ऐसेंही आहे. त्यांस लिहिणें, मदत करा म्हणणें, हें खुदानें दैवास आणिलें. विरुद्ध समजोन साह्य करितील न करितील. तत्रापि नेकजात[9] थोर उमराव, पूर्वीपासून त्यांचे वडील या राज्यांत वाढले, त्या अर्थीं त्यांसच ‘ साह्य करावें ’ ऐसें ल्याहावें. यांत त्यांची नेकी व कुलीनताही समजेल. मग जसें ताले असतील तसें घडेल. ” म्हणून दृढ विचार करून “ ये समयीचें विघ्न निवारण होण्यास पराक्रमें करून, दैवेंकरून खजिना, फौज सर्वगुणसंपन्न असे तेच आहेत, ” म्हणून महाराजांस कित्येक प्रकारें, “ गनीम बहुत जोरावारी करून येऊन पोहोंचला, हे पादशाहात तुमची, येऊन मदत केली पाहिजे, ” त्याजवरून महाराज यांणीं तेच क्षणीं सर्व फौज, उमराव, पागे वगैरे तोफखाना, दिलेलखानाचें सामान आलें त्याजहून अधिक ऐसें

---

१. ‘ राजगडीं ’ २. ‘ घालावी ’ ३. ‘ जबून ’, ‘ नसून ’ ४. ‘ घेतलीं ’ ५.५. ‘ शाहा अलीशान मशाहुदशाह ’, ‘ खान अलीशान मशऊदखान ’, ‘ खान अलीशान म्हसूरखान ’ ६. ‘ साध्य करून राज्य साधन ’ ७. ‘ नेक भात ’, ‘ खानाजात ’

सिद्ध करून, मजल दरमजल पनाळा प्रांतीं येऊन पोहोंचले. विजापुरानजीक खासा लष्करानिशीं जाऊन मुकाम केला. आणि विचार केला जे, " गनीम सामान बहुत कटा[1] त्याहीमध्यें पठाण जात हटी[2], याशीं लढाईत माणसें जाय न करितां हुन्नरेंच करून खजील होऊन नामोहरम होय[3] तें करावें, " म्हणोन तजवीज केली कीं, त्याचा प्रांत दौलताबाद तालुका यांत आपली फौज पैसावी, वोढा लावावा. त्याजवरून दिलेलखान यास तीन गांवांचें अंतर सोडून, भीमा नदी उतरून, जालनापूर पावेतों त्याचा[4] मुलूख तलफ ताराज करीत[4] चालले. प्रांत, गांव, शहरें मारीत मारीत जालनापुरास जाऊन, चार दिवस मुकाम करून पेठ मारिली. बहुत मालमत्ता हातीं लागली. जालनापूर म्हणजे हें औरंगाबादेपासून चार गावें आहे. त्या जाग्यास शाहाजादा असतां, त्याचा हिसाब न धरितां पेठ लुटून, सोनें, रुपें, हत्ती, घोडे, यांखेरीज मत्ता बहुत सांपडली ती घेऊन पट्टागड तर्फेस स्वार[5] होऊन, कूच करून येत असतां मध्यें रमणस्तखान, असतखान, जाबितखान ऐसेच आणखी सातपांच उमराव आठदाहा हजार स्वारानिशीं चालून आले. त्यांस जाहांबाजीचे हुनरें जैसी तंबी करून ये[6] तैसी करून, लढाई मारून, घोडे, हत्ती पाडाव करून; पट्टियास गेले. मागती तेथून फौज सरदार त्यांचे मुलखांत धुंदी करावयास पाठविले, व मोरोपंडित प्रधान यांस बागलाणांत व खानदेश प्रांतीं सत्तावीस किल्ले मोंगलाचे घ्यावे, मुलूख काबीज करावा, म्हणोन वीस हजार फौजेनिशीं तिकडे रवाना केलें. आणि महाराज पट्टागड[7] किल्ला येथेंच मुकाम करून राहिले.

### खान आगृहास प्रवर्तला : महाराजांच्या फौजांनीं त्यास घेरिलें.

इतकेंही जालें. परंतु दिलेलखान बहुतच विरेस पडून इकडे कसेंही हो, परंतु विजापूर घ्यावें, पादशाही[8] हस्तगत[9] करून नंतर तिकडील विचार करावा, म्हणून बहुतच निकड बसवून तोफांची मारगिरी विजापूरचे कोटास केली. कोणतेविषयीं बाकी ठेविली नाहीं. बहुतच जेरदस्तींत आणिलें. तेव्हां खान अलीशान यांणीं पुन्हां महाराजांस पत्रें लिहिलीं, वकील पाठविले कीं " तुम्ही आपली नेकी करावयाची तितकी करून शाहाजी राजे यांचें पुत्र तुम्हीं, या पादशाहींतील त्यांणीं निमक खादलें त्याची चीज करून, आम्ही वांकडेही तुम्हांशीं चालतों असतां येऊन सर्व प्रकारें साह्य केलें , शर्थ आपणाकडोन करणें ती केली, मसलतही केली कीं, त्यांचे मुलखांत वोढा[10] लावून गनीम येथून उखळून काढून नंतर घेरून मारावा; सर्व मुलूख

---

१. ' कट्टें ' २. ' हट्टी ' ३. ' होय न ' ४. ४. ' तालुकियांत फत्तेराज ', ' त्याचे मुलूक तलफ तराज ', ' त्याच मुलूक त फै त रा ज करीत ' ५. ' स्वारी येऊन ' ६. ' करूं नये ' ७. ' पट्टा ' ८. ' पादशाहा ' ९. ' दस्त ' १०. ' वेढा ', ' ओढा '

त्याचा खराब दराज* केला, वोढा लाविला, कोटांत आम्हांसही द्रव्यानीं सामानानीं साह्य केलें, परंतु दिलेलखान बहुतच हट्टास पडोन तिकडे पादशाहीची सर्व दौलत गेली तरी जावो. परंतु विजापूर घ्यावें ऐसे आग्रहास प्रवर्तला आहे. उखळत नाहीं,‡ कोटानजीक येऊन भिडला आहे. ये समयीं कांहीं एक विचार न करितां तुम्हीं येऊन पोहोंचून पादशाही राखिली पाहिजे. " त्याजवरून महाराज तेथून स्वार पत्रें पावतांच येऊन, फौज मुलखांतील जमा करीत करीत पुन्हां पनाळ्यानजीक येऊन मुकाम केला. पूर्वींही सामान खजिना दारूगोळा पाहिजे तसें [ पाठवून ] वांचविले[1] आणि पुन्हा आलियावर आणखी मागुती द्रव्य व सामान मुबलग पावतें केलें. हरहुनरें सामान दारूगोळा पाठवून हुशार केलें. त्यांचे मुलखांत सैन्य पइसलें होतें तें सर्व बोलावून आणिलें आणि दिलेलखान याजवरि सेनापति वगैरे सरदार, फौज पुढें पाठविली. त्यांणीं जाऊन कांहीं एक अंतरें सडे स्वारीनिशीं[2] उभें राहून कहीकबाड[3] मारावें, रसद गल्ला सामान कांहीं एक पोहोंचूं देऊं नये, ऐसें करून कुल खानाभोंवता जवाब[4] धरून, रस्तेबंदी करून, रोखून धरिला. हें वर्तमान शाहाजाहांस[5] कळोन त्याचे मदतीस औरंगाबादेहून रणमस्तखान व बाजे[6] उमराव आठदाहा हजार स्वारांनिशीं रवाना केले. ते येत असतां त्यांजवरि महाराजांची फौज धावून जाऊन त्यांस मारीत, पिटीत औरंगाबादेपावेतों नेलें. कित्येक शहरें लुटीत व देश खराव करीत परतोन येऊन गनिमास घेरून[7] बैसले.

**पादशाहा खजील : जेरजूर करून खट्टा करून खान उखळला.**

हें वर्तमान, व पंडित प्रधान हे बागलाण खानदेश प्रांतीं गेले. त्यांणीं अहिवंत किल्ला घेतला, अहिवंत म्हणजे जसा पनाळा त्याचे समतुल्य किल्ला मातबर, तसाच नाहावागड, बागलाणचे[8] मुलकांत[8] बहुत कठीण, तोही घेतला; ऐसे दोन किल्ले नामोशाचे, पुरातन जागे, काबीज केले, तेथेंही बहुत मालमत्ता सांपडली. आणि बराबरील जमियत, फौज, होती ती मुलकांत पाठवून लुटोन ठाणीं बसवून बहुत धामधूम केली; कित्येक मुलूक काबीज केलें;[9] हें वर्तमान, व पहिली स्वारी खासा महाराजांनीं केली; जालनापूर मारलें; रणमस्तखान नामोहरम करून दिलेलखानास वेढला.[10] विरेस[11] पडून[12] राहिल्यामुळें तमाम फौज याउपरि व त्यास गरदीस मेळवून औरंगाबाद व दौलताबाद घेऊन इकडे मसलत करितात; ऐसें पादशाहा

---

*. ' पराजय ' ‡. ' असे आग्रह करून उठत नाहीं ' १. ' हुशार केले ' २. ' स्वारीनें ' ३. ' कविला बाड ', ' कांहीं कही बाड ' ४. ' जवाद ' ' जवा ' ५. ' शाहाजास ', ' शाहाजानास ' ६. ' दोन ' ७. ' धरून ' ८.८. ' बागालण म्यानेजे ' ' बाबालाण म्याजे ' ' बागलाणचे दरम्यान ' ९. ' केला ' १०. ' घेरला ' ११. ' विरइस ' १२. ' पाडून '

यांस समजलियावरून, पादशाहा यांणीं रणथंबें येथें डाकेवरि वाक[५] जाहीर जाल्यावरून, बहुत खजील[६] होऊन आहदीवर आहदी दिलेलखानास पत्रें आलीं जे, "या उपरि तुम्हीं आग्रहास न पडतां, युक्तीनें निघोन शाही न बुडवितां, बचावून कळेल तसें निघावें. शिवाजी राजे यांशीं युद्धाचा प्रसंग पाडूं नये." लिहिणीं आलीं.[७] दिलेलखान याचे फौजेंत रुपया शेर, अच्छर* अनाज जालें. हत्ती, घोडे, माणसें, कित्येक मरूं लागलीं. या जाचतीनें[८] सर्व दौलताबादेचा मुलूक खराब करून, वोढा लावून दिलेलखान जेरदस्तींत आणिला. बाहेर माणूस, हत्ती, घोडे कांहीं एक फिरकूं न पावे.[९] निघाले तितके उचलूं लागले. कहीकबाड[१०] रसद न चाले. पादशाहाची लिहिलीं आलीं. तेव्हां दिलेलखानास ऐसें कळों आलें कीं, "आपण येथें दम धरून राहिल्यानीं आपली शाही कुल बुडवितील, गरदीस मेळवितील. विजापूर घेणेची[११] सर्व मसलत राहिली. परंतु याउपरि आपले प्राण व पादशाही सलतनत जाऊं पाहाते. बुडविलियाचें अपेश नशिबास न येतां निघोन कोणते प्रकारें जावें ? निभाव कसा पडतो ? बसोन राहिल्याही बसों देत नाहींत. त्या अर्थी निघोन जावें." म्हणोन विजापूर सोडून दिवसास कोश दोन कोश मजली करीत चालला. याप्रमाणें गनीम जेरजूर[१२] करून, खट्टा[१३] करून उखळला.[१४] खान अलीशान यांणीं जैशी कोट राखण्याची शर्त करावी तैशी करून बहुत शर्त केली. कोट लढवून[१५] राखला.

## विजापूरचे पादशाहाचा गहिंवर !

याप्रकारें सैन्येंकरून व द्रव्येंकरून विजापूरचें साह्य महाराजांनीं केलें ज्या उपायें गनीम उखळून[१६] येईल त्या उपायें उखळून विजापूरचें अरिष्ट दूर केलें. पादशाहात रक्षिली. ते समयीं खान अलीशान बहुत कृतोपकारी होऊन, महाराजांची तारीफ करणें ती करून वस्त्रें, जवाहीर, उत्तम पदार्थ पाठविलें. आणि दाली[१७] तरवार महाराजांकडे पाठविली. "पुन्हां पाहिजे तरि तुम्हीं बांधावी किंवा आपणांस मकेस रवाना करून हे पादशाहात तुमची होय, तुम्हीं सांभाळावी, करावी," म्हणून खिलत व वकील पाठविले. वेकिलाफपणें[१८] बहुतच सरळ होऊन "तुम्ही शाहाजी राजे यांचे पुत्रत्वास उत्तीर्ण जालां. पूर्वीं आम्हीं तुम्हांकरितां शाहाजी राजे यांस पीडा केल्या वगैरे सर्व एकीकडे[१९] ठेऊन हे गोष्टी तुम्हीं करून दिगंत कीर्ति

---

५. 'बाके' ६. 'खिन्न' ७. 'लिहिलीं आलीं', 'लिहिलें आलें' ८. 'जातीनें' *'अर्धशेर' ९. 'यावें' १०. 'कबिला बाड' ११. 'येथें', 'येणेची', 'विजापूर येणें' १२. 'जेर जेर' १३. 'खटा', 'खटक' १४. 'उपलिक' १५. 'लढावून' १६. 'उखळिला.' १७. 'ढाल' १८. 'बेकी कदपणें' १९. 'मिकऊन'

मेळविलीत ! बौंशजपणाची धन्य केलीत ! ! " ते समयीं महाराजांनींही पादशाहास वस्त्रें, हत्ती, घोडे जवाहीर पाठवून वकिलांबरोबर आपले मातबर देऊन, " आम्हीं राज्य सोडविलें त्यांत या पादशाहींतील व आणखीही सोडविलें. तेव्हां आपण आम्हीं वश व्हावें म्हणोन कैलासवासी महाराजांस पीडा केली, परंतु आम्ही त्यांचे स्वाधीन नाहीं समजोन मनसब व मुलूक त्यांजकडेच राखून सर्व शेवटवरि* चालविलें. ते कृतोपकार तुम्हीं केले आहेत. थोर शाहा तख्तनिशीन आपणांस लायख तेंच करीत आलां. आम्ही वादलों, सामान, फौज, खजिना जाला, हें निदानीं तुमचे उपयोगींच[1] पडेल समजोनच संपादिलें, राखिलें. आपले ताले सबळ होते, त्यांणींच आपण फते पावलां. आम्हांकडोन जालें तितकें केलें. कोट जवांमर्दी राखणें आपण शर्त केली. याउपरि आपली पादशाहात, दौलत सुखरूप जतन करून, राखून आपण करावी. आम्हांस संकट पडेल तेव्हां साह्य करण्याविषयीं लिहीत असावें " म्हणोन दाली[2] व तरवार फिरोन पाठविली. आणि तह करारदाद पादशाहांनीं ठरविला[3] कीं, " होसकोटा व बेंगरूळ, अरणी व चंजाऊर आदिकरून पेशजी महाल लागिले आहेत त्यांस पेशकजी[4] व तोफा वगैरे देणें येतें तें माफ असे, दरोबस्त आपणांकडे करार केलें असे चालावें. शिवाय जे नवीन चंदी वगैरे तालुके किल्ले घेतले तेही दरोबस्त आपणांकडे चालावे. यास कांहीं एक अडथळा आम्हांकडून पुन्हां तुम्ही जितका प्रांत वहिवाटितां त्यास व्हावयाचा नाहीं. " याप्रमाणें ठरावून दिल्हें. महाराज यांणीं " बाकी तुमचे तालुके राहिले ते तुम्हीं राखावें, त्यांत आमचा उपद्रव होणार नाहीं, " ऐसें करोन दिल्हें. याप्रमाणें तहनामा ठरविला.

### दिलेलखान निराश, असाहाय्य

[ इकडे ] दिलेलखान संभाळीत संभाळीत निघोन आदवानी[5] कोपळ प्रांताकडे गेला. त्याचे पाठीवर महाराजांनीं फौजा रवाना केल्या होत्या. त्यांनीं व प्रथम विजापुरानजीक जाऊन पट्टा[6] गडाकडे गेले ते समयीं जनार्दनपंत सुमंत हणमंते कोपळ प्रांतांत कांहीं फौजेनिशीं ठेविले होते, त्यांणीं तिकडे कितीक पुंडपाळेगारांनीं फिसाहती केल्या[7] त्यांस मारून काढिलें[8] व हुसेनखानाचा भाऊ कासीमखान दोन तीन हजार स्वारांनिशीं आला होता, त्यास व त्यांचा कबिला व हुसेनखानाचे दोघे लेंक ऐसे कैद केले. हत्ती पांच व घोडे पांचशें पाडाव केले. याखेरीज पुंड पाळेगार यांचा मुलूक व गड, कोट काबीज करून ठाणीं बसविलीं. फते केली. ऐसें असतां दिलेल–

---

*. ' सर्व व्यव्हरीं ' १. ' उपयोगी ' २. ' ढाली ' ३. ' लाविला ' ४. ' दसकशी ' ५. ' आदबानी ' ६. ' देवगडाकडे ' ७. ' फिसाहत केली होती ' ८. ' टाकिलें '

खान व सरजाखान व हुसेनखान येतां बहुत करून जमियत फुटली गेली हें कळोन, हेही पांचसाहा हजार स्वारांनिशीं गनिमावर गेले. मध्यें गनीम घालून जिकडे जिकडे गनीम जाई[1] तिकडे तिकडे जाऊन, जागां जागां गनिमास गोषमाल देऊन तिकडूनही मारून काढिला. तो भीमानदी उतरून पेडेगांवास आपले मुलखांत खट्टा[2] होऊन गेला. दिलेलखान यास ऐसें कळों आलें जे, 'मागती विजापूरची वाट न धरावी !' ऐसा खजील केला.

## सर्व वर्त्तमान चंजाऊरास लिहिलें.

याप्रमाणें महाराजांनीं प्रतापें करून, यश, कीर्ति व अर्थ संपादन केलें. हें वर्त्तमान सर्व व्यंकोजी राजे यांस चंजाउरास लिहिलें कीं, "संभाजीराजे दिलेलखान यांजकडे गेले ते आणावयाचे उपाय बहुत प्रकारें करून आणिले. त्यांसही कळों आलें जे 'पादशाहींत अथवा विजापूर अगर भागानगर पादशाहींत आपले मनोगतानुरूप चालणार नाहीं' ऐसें जाणोन आमचे लिहिलेप्रो[3] स्वार होऊन आले. भेटी जाल्यावरि वरोब्याचे रीतीनें जसें समाधान करूं[4] ये तसें केलें;[4] व दिलेलखान मातबर जमाव करून विजापूरची पादशाहात कमजोर पाहून चालून जाऊन शहरकोटास भिडला. याजवरून खान अलीशान यांणीं 'आम्हांस साह्य[5] करावें' ऐशीं पत्रें पाठविलीं. त्याजवरून दरमजल जाऊन मुलूक मारून शार्तीनिशीं[6] गनीम उखळून मारून काढिला. विजापूरचें अरिष्ट दूर करून पादशाहात रक्षिली.[7] यावरून त्यांणीं तह करून "तुम्हांस चंजाऊर वगैरे तालुकियाचे तोफा व पेशकसी देणें लागत होती ते आम्हांकडे करून दिल्ही व चंदी वगैरे प्रांत तहामध्यें आम्हीं आपणांकडे लावून घेतले. तरि याउपरि हें सर्व आम्हांकडील कारभारी व लोक आहेत त्यांचे स्वाधीन करीत असावें. हें वर्त्तमान तुम्हांस समजावें." म्हणोन पत्रें रवाना केलीं. आणि भूपाळगड गेला होता तो व बाहादूरविंडा घेऊन महाराज यशस्वी होऊन पुन्हां रायगडास आले.

## राजारामविवाह

[ तेथें ] शरीरीं कांहीं व्यथा निर्माण जाली. पुन्हां बरी जाली. यानंतर राजाराम याचा व्रतबंध करून विवाह करावयाची योजना करून बहुत समारंभ व तर्तूद करून करविला. शरीसमंध प्रतापराव गुजर याची कन्या वधू करून केला. एक मासपर्यंत मोठा समारंभ सोहळा लक्षावधि रुपये खर्च होऊन जाला. शके १६०१[8] यांत लग्नसमारंभ केला.

---

१. 'जाय' २. 'खटा' ३. 'लिहिल्यावरून' ४. 'करावें तसें केलें'
५. 'सख्य' ६. 'शर्तनिशीं' ७. 'राखिलीं.' ८. '१६१'

## महाराज अवतारी पुरूष !

यानंतर महाराजांनीं याप्रकारें करून धर्मअर्थकाम[1] तीन पुरुषार्थ अमानुषी[2] कर्में करून केले, ते सर्व यथासांग संपादिले. पराक्रम व चमत्कार केले ते वर्णन करावयास कोणासही शक्ति नाहीं. तत्रापि कांहीं कांहीं संक्षेपेंकरून पूर्वींपासून[3] करीत आले त्या आधारें जाहलें. ज्यांची कीर्ति, तुकाराम बाबा व रामदासस्वामी परत विरक्त वैराग्याचे शिरोमणि यांणीं अभंग, श्लोक करून प्रताप वर्णिला, त्यांस[4] मान्य जाले, असे राजे,[4] यांचें अद्भुत चरित्र दिवसा दिवसाचे ठायीं नाना प्रकारें केलें तें वर्णन करण्यास इतरांस[5] काय शक्ति आहे ?[5] राज्याभिषेक होऊन प्रताप केले ते वर्णिले. याउपरि उत्तरखंड चरित्र केलें जे, तीन पुरुषार्थ साध्य जाले. याउपरि चवथा पुरुषार्थ मोक्ष तो श्रीरामदासस्वामींनीं वरद हस्त ठेवून कृपा केली सांगितला, त्याचें आचरण करावें. शरिरीं व्यथा, याउपरि मर्यादा विशेष नाहीं, हें समजोन विरक्तताभ्यासाचें[6] पुरश्चरण[6] आरंभिलें. मोठे मोठे पंडित ज्ञानी व संन्यासी यांशीं सर्व काळ सहवास करावा, आत्मानात्म विचार करावा, ऐशी वृत्ति उदासीन जाली आणि करिते जाले. पूर्व-युगीं राजे आपण वृद्धापकाल प्राप्त जालियास राज्य पुत्राचे स्वाधीन करून आपण ईश्वरप्राप्तीचा उपाय अरण्यांत जाऊन करीत आले[7] तसे करावें हा हेतु; परंतु पुत्राचे ठायीं गुण असावे ते नाहींत. तसेंच टाकून गेलें असतां अपकीर्तीस कारण होईल, या अर्थीं यावद्देह घरींच सत्समागम करून सद्गुरुबोधित महावाक्याचा उपदेश जाला[8] ते साध्य करून सार्थक करावें हेंच उत्तम. षड्वर्गत्याग करून विषयांपासून विरक्त होत्साता सर्वकाळ भगवद्भजन, श्रवण, मनन, निदिध्यास,[9] कीर्तनादि नवविध भक्तिकरून युक्त[10] ऐसे होऊन सर्वकाळ कालक्षेप करिते जाले. योगादिमार्ग पाहावे ऐसें केलें. पूर्वी युगयुगाचे[11] ठायीं अवतार निर्माण होऊन बहुत दुष्ट दुर्जनांचा नाश करून धर्म स्थापिले; तैसेंच महाराजांनीं अवतार-चरित्र केलें. यज्ञयागादि धर्म ब्राह्मणांपासून चालविले. धर्मवृद्धि करून सर्वांस आनंदरूप प्रजापालन यथाविधि केलें. शके १५९६ पासून राज्याभिषेक जालियावरि शके १६०२ पर्यंत याप्रमाणें चरित्र करून असतां कांहीं दिवशीं ज्वराची व्यथा जाहली.

## मृत्यु समीप : निरवानिरव : भविष्यसंसूचन

या उपरि आपली अवधि पांच सात[12] दिवस इतकी राहिली म्हणोन सर्व

---

१. 'धर्मार्थकाम' २. 'अमानुष्यें', 'अमानुषिक', 'अमानुष्य' ३. 'पूर्वीपासून वर्णन' ४. ४. 'त्यासमान्य असे राजे जाहले' ५. ५. 'इतरांस शक्ति नाहीं' ६. ६. 'व ज्याचें पुरश्चरण', 'भ्याचें पुन्हश्चरण', 'पुन्हांश्चरण', 'व ज्याचें पुरेः चरण' ७. 'करिते जाले' ८. 'जाले यास' ९. 'निजध्यास' १०. 'मुक्त' ११. 'युगायुगाचें' १२. 'पांच चार', 'पांच साहा'

मातबर सरकारकून व सरदार आदिकरून जमा करविले, आणि सर्वांस जवळ बोलावून सर्वांशीं[1] दर्शन, भाषण करणें तसें केलें. प्रधानादि कारभारी व विश्वासू आप्त जवळ बोलावून बसवून सांगितले जे, "हें राज्य आपण मोठे पराक्रमें श्रीचे वरप्रदानें[2] संपादिलें; ऐशीं हजार पागा केली; किल्ले, कोट, जंजिरे, प्रांत व द्रव्यही अनेक प्रकारचें कोट्यावधि संग्रह केले. दानधर्म, यश कीर्ति इहपर दोन्ही साध्य केलीं. पुढें याचें रक्षण करून, आम्हांहून अधिक पराक्रम करून, एक दिल्लीची पादशाहात व उत्तरचें राज्य साध्य करणेंत[3] आयुष्य पुरलें नाहीं; व मेळविलें राज्य व माणसें तुम्ही सर्व मोठे मोठे पराक्रमी यांचीं भूषणें, योग्यता वाढवून अधिक राज्य वाढविणें[4] असे.[5] वडील पुत्र वयें करून योग्य, परंतु क्रूर आणि व्यसनी तेव्हां पुढील विचार यथास्थित दिसत नाहीं. धाकटे पुत्र गुणेंकरून युक्त, परंतु वयेंकरून लाहान व धाकटेच. तेव्हां विभाग करूनही[6] द्यावे,[6] परंतु विभागांनीं चार मातबर लोभाविष्टपणें एकांत एक विरुद्ध चालवितील.[7] तेणेंकरून राज्यवृद्धि राहून कलह प्राप्त होईल. मर्यादा[8] राहाणार नाहीं. वडिलांनीं राज्य करावें, कनिष्ठांनीं त्यांचे आज्ञेंत चालून सेवा करावी, ऐसा राजधर्म; तो योग दिसत नाहीं. शत्रूस संधि होतील.[9] हें राज्य देवाचें देणें, नाश होईल. वडील संभाजी राजे याजकरितां त्याजकडेच सर्व लोक पाहातील, व पाहाणें प्राप्त. परंतु त्यांची चाल एक प्रकार सरकारकून व योग्यतेचीं माणसें ज्यांनीं जिवाभ्य[10] श्रम राज्यवृद्धीसाठी केले तीं थोर थोर माणसें यांच्या अप्रतिष्ठा करील.[11] [नाश करील.[11] राज्याचा व द्रव्याचा नाश करील.[12] बुडविल.[12] लाहान माणसांचे सहवासेंकरून थोरांच्या अप्रतिष्ठा होतील. निर्नायकी[13] होईल. आम्हीं पाया घातला, माणसें गुणसंपन्न मेळविलीं, वाढविलीं तीं राहाणार नाहींत. द्रव्य व खजिना सर्व नाश पावेल. मोठा सबळ शत्रु औरंगजेब तो आपलें स्थल सोडून निघाला असतां, आमचे तेजप्रभावें[14] आपले राज्यांतच राहिला आहे, तो पुढें चाल करील. विजापूर, भागानगर पादशाही कमजोर पडल्या त्या घेऊन हें राज्य घेऊं इच्छील. तेव्हां संभाजीचे हातें[15] रक्षवणार नाहीं परंतु हें होणारच ऐसें दिसतें." म्हणोन एक घटिकापर्यंत नेत्र झाकून स्तब्ध जाले आणि मुखांतून अक्षरें[16] आलीं कीं,[16] "संभाजी दगा पावेल, राजाराम[17] चंदीकडून[17] पुन्हां राज्य रक्षील. मोरोपंडित, निराजी रावजी, रामचंद्र नीळकंठ, संताजी घोरपडे, धनाजी जाधव पुन्हां राज्यवृद्धीस कारण होतील. पुढें शिवनामें राजा होईल तो दिल्लीपर्यंत

---

१. 'सर्वांस' २. 'वरदानें' ३. 'करणें तें' ४. 'वाढवावें' ५. 'येविशी' ६. ६. 'करून' ७. 'चालतील' ८. 'राज्य ऐशी मर्यादा' ९. 'होईल.' १०. 'जीवामय' ११. 'करतील.' १२. 'बुडवितील,' १३. 'निर्भयकी' १४. 'राज्यप्रभावें' १५. 'वस्तु' १६. १६. 'अक्षर आलें कीं' १७. १७. 'राजारामच बळावून'

राज्य करील. " इतकें बोलोन सर्वांकडे पाहिलें. ते समयीं सर्वांस बहुतच कष्ट व दुःख पर्वतपाय जालें कीं, " महाराजांमागें[1] आमचे सर्वांचें वांचणें जीविका व्यर्थ होय ! " ऐसा संकट समय ईश्वरानें प्राप्त केला.[2] यानंतर महाराजांनीं आज्ञा केली कीं " हा मृत्युलोक ! मोठे मोठे अवतारादिक गेले ! होणार अवश्यमेव. [ होते ] उत्तरकाल तसें होतच असतें ! तुम्ही सर्व पराक्रमी आहां. कळेल तसे प्रयेत्न करून राज्य[3] व धर्म रक्षावा.[3] एक विचारें सर्वांनी ही चालावें म्हणून सांगून सर्वांचें समाधान केलें. आणि " बाहेर जवळ बसावें, " अशी सर्वांस आज्ञा केली. आणि आपण श्रीगंगोदक आणून[4] स्नान केलें. प्रायश्चित्त विधियुक्त करून[5] भस्मधारण रुद्राक्ष-तुलसीमालाधारण केलें. आणि दर्भासनीं बैसले. शत गोप्रदानें प्रत्यक्ष करून सहस्त्रगोप्रदानें द्रव्यद्वारां संकल्प केला. आणि श्रीदेवाजीचें नामस्मरण अविस्मरणें करून भगवद्गीता व सहस्रनामें यांचे पाठ करविले. ब्राह्मणांचे घोष ऐसे होत असतां,[6] शके १६० रौद्रनाम संवत्सरे, चैत्र शुद्ध पौर्णिमा, रविवार उत्तरायण, दोन-प्रहरीं देहत्याग करून अवतार समाप्त 'श्रीराम !' एसें म्हणून केला.

## दुश्चिन्हें : हाहाःकार

ते समयी दुश्चिन्हें दिशा धूम्र व नक्षत्रपात, भूमिकंप, इंद्रधनु रात्रीस, ऐसे उत्पात होते जाहलें. शंभुमहादेव येथील तळ्याचें पाणी रक्ताप्रमाणें तीन दिवस जाहले. जलचरें फार मेलीं. ऐसें अनर्थ जाले !

यावरि सर्व कारभारी, कार्याध्यक्ष, आबालवृद्ध स्त्रीजन यांचा मोठा हाहाकार जाला ! ! नंतर सर्व प्रधानादिक मिळोन दरवाजे[7] बंद करून, बातमी बंदोबस्त होय तों न फुटावी, ऐसें करून, शिबिका आणून, सर्व राजचिन्हें व उपचार करून यथाविधि मंत्राग्नि करविला. सहगमन पुतळाबाईसाहेब यांणीं केलें. उत्तरक्रिया साबाजी भोंसले सिंगणापूरकर यांजपासून राजाराम यांस समीप बसवून करण्यास प्रारंभ केला. बहुत दान, धर्म महादानादि करते जाले.

## फलश्रुति

या प्रकारेंकरून महाराज पुण्यश्लोक योगियांसही जे गति असाध्य ते चतुर्विध पुरुषार्थ साधून मोक्षाचे अधिकारी जाले.

प्रकरण[8] समाप्त सप्तम जालें. श्रीरस्तु. मंगलानि भवंतु.[8]

---

१. 'महाराज मागे' २. 'प्राप्त झाला' ३. ३. 'राज्यधर्म रक्षण करावा' ४. 'घेऊन' ५. 'प्रायश्चितविधि केला.' ६. 'होत्साता' ७. 'दरवाजा' ८. ८. हीं वाक्यें कीर्तने प्रतींत नाहींत.

याप्रकारेंकरून महाराजांनीं प्रतापचरित्र[१] करून वैकुंठवास केला. हे कथा श्रवण, मनन, पठण केली[२] असतां सर्व विघ्नें दूर होऊन, पुण्य व यश प्राप्त होईल. आणि सुर्वगुणसंपन्नता प्राप्त होऊन, सकल ऐश्वर्यलक्ष्मी तत्काळ प्राप्त होईल.

## पुढील वर्णन संभाजी महाराजांचे चरित्रांत

पुढें सर्व अष्टप्रधान यांणीं विचार केला जे, संभाजी महाराजांची मर्जी यथास्थित मार्गावरि येण्याचे उपाय करून होय तों पर्यंत, संभाजी महाराज यांस आहेत तसे बंदोबस्तानें राखून, सर्व राज्याचा बंदोबस्त राजारामसाहेब येथें आहेत यांस मंचकारोहण करवून[३] करवावा.[३] नंतर सर्वांनीं महाराजांकडे जाऊन त्यांची मर्जी प्रसन्न करून राज्याभिषेक[४] करणें तसें त्यांस करावें. ऐसा संकल्प करून क्रियासमाप्ति जालियावरि राजारामसाहेब यांस सुमुहूर्तें मंचकारोहण करविलें.[५] शके १६०२ रौद्रनाम संवत्सरें, वैशाख वद्य तृतीया.

येथून पुढें चरित्र जालें तें संभाजी महाराजांचे चरित्रांत वर्णन केलें आहे.

राज्याभिषेक सप्तम प्रकरण समाप्त

४१.१.२८ नाटक चरित्र
१३८१ २५।३।६५

१. ' अवतार चरित्र ' २. ' केलें ' ३. ३. ' करून कार्यें चालवावीं. '
४. ' राज्यभिषेकादि ' ५. ' केलें '

# टीपा

## प्रकरण प्रथम

### पृ. १

**राज्याभिषेक शक**—इ. स. १६७४ मध्ये छत्रपति शिवाजी महाराजांस राज्याभिषेक झाला व त्यावेळेपासून (६ जून १६७४) राज्याभिषेक शक सुरू केला. 'हा शक १०४ वर्षे चालला व इ. स. १७७७ मध्ये दुसरा शाहू गादीवर आला, त्याप्रसंगी सखारामबापू व नाना फडणीस यांना ते गैरसोईचा वाटला आणि त्यांनी हुकूम काढून तो बंद केला,' असे धडफळे यादीच्या आधारे सरदेसाई म्हणतात. (शशि. पृ. १६३) परंतु त्यानंतरही इ. स. १८२९ पर्यंत तो अखंड चालू होता, असे अनेक कागदपत्रांवरून दिसून येते [शिचसा खं. ८ पृ. ७]. या बखरीतील उल्लेखावरूनही ते लक्षात येईल.

**शके १७३ भृगुवासरें**—इ. स. ८ जून १८१०. मात्र चिंतामणराव वैद्य राज्याभिषेक शक १३७ म्हणजे इ. स. १८०७ मानतात (वैऐनि पृ. ६१). ते कोणत्या आधारे हे सांगता येत नाही.

**प्रमोदी**— प्रमोद. मोडी लेखनाच्या सोयीसाठी प्रमोदी, मल्लारी (मल्लार), सुमारी (सुमारे), यासी (यास) अशी रूपे आढळतात.

**शाहू नृप छत्रपति**— दुसरा किंवा धाकटा शाहू (१७५९-१८०८) साताऱ्च्या छत्रपति रामराजे यांचा दत्तक पुत्र. हा त्र्यंबकजी वावीकराचा मुलगा. मूळ नाव विठोजी. १५ सप्टें. १७७७ ला दत्तविधान झाले. मात्र राज्याभिषेक ११।१२।१७७८ला झाला.

**मल्लारी**—बखरकार मल्हार रामराव चिटणीस (मृत्यू ३ जुलै १८२३). शिवाजी महाराजांचे चिटणीस बाळाजी आवजी (पृ. ३२ वरची टीप पाहा) यांचा निपणतू. छत्रपती प्रतापसिंह—धाकटे शाहू महाराजाचे पुत्र—यांचे चिटणीस. सरदार सखाराम हरी गुप्ते यांचे जामात.

छत्रपती शिवाजी महाराजांचे चिटणीस बाळाजी आवजी यांचे पुत्र खंडो बल्लाळ यांस तीन पुत्र (१) जिवाजी (२) बापूजी (३) गोविंदराव. त्यांपैकी थोरल्या शाहू महाराजांचे कारकीर्दीत जिवाजी खंडो यांस चिटणिसी मिळाली. त्यांच्या मृत्यूनंतर (१७४३) गोविंदराव 'चिटणीस' झाले. 'रामराव' हे जिवाजी खंडो यांचे पुत्र. ते शाहू महाराजाचे चिटणीस होते असा उल्लेख कित्येक ठिकाणी आढळतो; पण तो बरोबर नाही. धाकट्या शाहू महाराजांच्या

कारकीर्दीत रामरावांना चिटणीसी मिळावी म्हणून प्रयत्न झाले. परंतु ते यशस्वी झाले नाहीत असे दिसते ( ऐजुले पुस्तक दुसरें पृ. २१-२२ ).

श्री रामरावांस ६ मुले होती. त्यांपैकी मल्हारराव हे ज्येष्ठ पुत्र होत. मल्हार रामरावांनी श्री शिवाजी महाराजांपासून धाकटे शाहू महाराजांपर्यंत ६ छत्रपतींची चरित्रे बोरगाव मुक्कामी लिहिली आहेत. त्याखेरीज शुक्रनीतीच्या आधारे त्यांनी लिहिलेला 'राजनीति' हा सतप्रकरणात्मक ग्रंथ प्रसिद्ध आहे.

**आज्ञा केली...जे**— धाकटे शाहू छत्रपती ४ मे १८०८ रोजी मरण पावले आणि मल्हार रामराव ८ जून १८१० रोजी महाराजांनी चरित्रलेखनास आज्ञा केली असे म्हणतो, तेव्हा यामध्ये काहीतरी घोटाळा आहे हे स्पष्ट आहे.

**तुम्ही पुरातन सेवक लेखनाधिकारी**—चिटणीस घराणे शिवाजीमहाराजांच्या वेळेपासून भोसले घराण्याशी संबधित असल्याने मल्हार रामरावांस 'पुरातन सेवक' असे म्हटले आहे. अशा प्रकारचे चरित्र लिहिण्यासाठीं आवश्यक ते ज्ञान व लेखणीचे सामर्थ्यही त्यांजकडे असल्याने 'लेखनाधिकारी' म्हणून त्यांस गौरविले आहे.

**परम प्रतापी पूर्वज...सार्वभौम राज्यें केली**— श्रीशिवछत्रपती हे रजपूत. सिसोदे वंशाचे—इतकेच नव्हे तर त्यांचा वंशवृक्ष महाभारतातील युधिष्ठिरापर्यंत पोचविता येतो, ही बखरकाराची भावना आहे. मल्हार रामरावाचे चुलते गोविंद खंडेराव यांनी लिहिलेल्या छत्रपती शाहू महाराजांच्या बखरीत यापूर्वीच विष्णुपुराणादिकांच्या आधारे ही वंशावळ दिली होतीच. ती लक्षात असल्यामुळेच वरील प्रकारची आज्ञा झाली आहे असे बखरकार लिहितो.

महाराष्ट्राच्या इतिहासाशी फारसा संबंध नसलेल्या ह्या वंशावळी देण्याचा मोह बखरकारांना आवरला नाही, याचे कारण इतिहासापेक्षा पुराणांकडे असलेला त्यांचा ओढा, आणि राजवाडे यांनी म्हटल्याप्रमाणे, 'शिवाजीचा वृत्तांत देताना शिवाजीच्या वंशाची उत्पती रजपुतांच्या छत्तीस कुळांतील आहे व ह्या छत्तीस कुळींच्या द्वारे शिवाजीचा संबंध युधिष्ठिरापर्यंत जाऊन पोहचतो ही गोष्ट ह्या बखरनिसांना मुख्यतः सांगावयाची आहे. यवनांनी रजपुतांची कित्येक कुळे धुळीस मिळविली, त्यांपैकी काही रजपूत दक्षिणेकडे आले व त्यांतच भोसल्यांचे पूर्वजही आले, वगैरे प्रसंग त्यावेळच्या माहितीला धरून, संगतवार व समाधानकारक वर्णन देताना ह्या पौराणिक व मध्ययुगीन वंशावळींचा प्रवेश बखरीतून स्वाभाविकपणेच झाला... ( १ ) युधिष्ठिरापासून शिवाजीपर्यंत एकसारखी परिमालिका दाखवून द्यावयाची.. ( २ ) युधिष्ठिरापासून औरंगजेबादी मोगलापर्यंत सार्वभौम राजांची मालिका दाखवून द्यावयाची... ( ३ ) दिल्ली येथील सार्वभौम मोगलांची सत्ता तरवारीच्या जोरावर बसविलेली होती व त्यांना दिल्लीच्या गादीला पिढीजात हक्क काहीएक नव्हता, हे दृष्टोत्पतीस येऊन शिवाजीला सार्वभौम सत्ता प्रस्थापित करण्याचा

हक्क पिढीजात प्राप्त झाला होता, हेही वाचकांच्या ध्यानात यावे...अशा त्रिविध हेतूनें प्रोत्साहित होऊन बखरकारांनी या वंशावळी दिल्या आहेत' [ऐप्र पृ. २२३–२४]

**जें श्रवण, पठण, मनन.....असावें**—पुराणादिकांच्या संस्कारामुळे अशा प्रकारची पुराणसदृश्य फलप्राप्ती बखरकार देऊन जातो. आपण लिहीत असलेले चरित्र एका असामान्य कोटीतल्या दैवी अवताराचे असून त्याचे लेखन व वाचन ही दोन्ही परम पुण्यप्रद आहेत, अशी बखरकाराची श्रद्धा आहे. अशा रीतीने बखरकाराची भूमिका चिकित्सक इतिहासकाराची नसून काही अंशी पुराण लेखकासारखी आहे हे लक्षात घ्यावे.

**शास्त्राधार विष्णु...पराक्रम कथा**—शिवाजी महाराजांचे चरित्र लिहिण्यासाठी हाताशी असलेल्या वडिलार्जित कारकीर्दी इ. महत्त्वाच्या कागदपत्रांबरोबर 'शास्त्राधार विष्णु पुराणादि पुराणांतील भाव, दंडनीति, राजधर्म, राजमयूख व रमलशास्त्र' यांचा आधार घेतल्याचे लेखक सांगतो. यातील 'राजमयूख' या ग्रंथासंबंधाने माहिती मिळत नाही. रमलशास्त्र हे यावनी फलज्योतिषशास्त्र होय. त्याचा उपयोग करण्याचे कारण काय, असा प्रश्न रा. ब. साने यांनी केला आहे (शशिछम पृ. ३३), परंतु शके ५१२ त यवनांनी पिठोर राजाचा पराभव केला, ही माहिती बखरकार रमल ग्रंथाच्या आधाराने देतात (पृ. ६ वरची टीप पाहा) येथेही ती रमल ग्रंथातूनच दिलेली आहे. युधिष्ठिरापासून पुलोमापर्यंतची वंशावळ तर विष्णुपुराणातून जशीच्या तशी उचलली आहे. शूरसेनापासून पिठोर राजापर्यंतच्या वंशावळी कोठून घेतल्या याचा अद्याप नीट उलगडला नाही. कदाचित 'राजमयूख' हा रजपूत राजांची वंशावळी देणारा एखादा ग्रंथ असावा व त्यातून ही माहिती उचलली असावी, 'राजन्यकं' (म्हणजे क्षत्रिय राजांची वंशावळ) या शब्दाचे रूप इथे 'राजमयुख' असे लिहिले असावे असा तर्क होतो.

## पृ. २

**पूर्वी तीन युगें**—द्वापर, त्रेता आणि कृत युग.

**कलियुग**—४ लक्ष बत्तीस हजार वर्षांचे कलियुग. त्याच्या दुप्पट, तिप्पट व चौपट द्वापर, त्रेता आणि कृतयुग मिळून ४३ लक्ष २० हजारांचे चतुर्युग होय, ही पुराणांतरीची कल्पना आहे.

**युधिष्ठिरशक**—या शकाचा प्रारंभ इ. स. पू. ३१०१ वर्षांपासून असून तो चैत्रादी सौर वर्षाचा आहे. युधिष्ठिरशक व कलिकाल एकच होत, हे मत महाभारतात व पुराणांतरी प्रतिपादिलेले आहे. बखरकारानेही त्याच मताचा अनुवाद केला आहे. युधिष्ठिरशक कलियुग प्रारंभानंतर ६५३ वर्षांनी सुरू झाला, असे दुसरेही एक मत प्रचलित आहे. वराहमिहिर, कल्हण इत्यादी ग्रंथकारांनी या दुसऱ्या मतास दुजोरा दिला आहे.

## पृ. ३

**महानंद राजा सोमवंशी**—रजपुतांमध्ये चितोड घराणे हे सूर्यवंशी व ज्यांनी आपल्या वंशात संकर होऊ दिला नाही असे शुद्ध मानले जाते. वास्तविक कौरव, पांडव हे सारेच सोमवंशी. महानंदाने प्रथम असा संकर केला, आणि त्यामुळे त्यास 'सोमवंशी' गणून सोमवंशीय रजपूत राजे संकरज आहेत याची जाणीव दिली. पराशर, व्यास, मनु इत्यादिकांनी संकरज प्रजा निषिद्ध मानली आहे. ब्राह्मणांनी शूद्र वर्णाच्या स्त्रीशी संबध ठेवण्यावर त्यांचा विशेष कटाक्ष दिसतो. स्मृतिग्रंथांचा क्षत्रियांवर विशेष कटाक्ष नसल्यामुळे दंडसत्तेच्या जोरावर महापद्मानंदास, 'शूद्रवर्ण व वैश्य वर्णाच्या स्त्रिया करण्यास क्षत्रियास अधिकार आहे असा धर्म' स्थापण्यास अडचण पडली नसावी.

छत्रपती शिवाजी महाराज हे सिसोदिये म्हणजे सूर्यवंशी असल्याने त्यांचे 'कुल' निष्कलंक आहे. हेही यातून सुचविले गेले आहे.

## पृ. ४

**राजा विक्रम व त्याचा शक**— शक किंवा संवत् सुरू करणारा हा विक्रमादित्य कोण याबद्दल संशोधकांनी निरनिराळ्या प्रकारची मते व्यक्त केली आहेत. या शकाचा प्रारंभ इ. स. पूर्वी ५७ व्या वर्षापासून मानतात. विक्रमराजाने शकांचा पराभव करून हिंदुस्थानात साम्राज्य स्थापिले व तेव्हापासून आपल्या नावाने संवत् सुरू केला, अशी साधारणपणे समजूत आहे. समुद्रगुप्ताचा पुत्र सम्राट चंद्रगुप्त यानेच 'विक्रमादित्य' ही उपाधी धारण केली असे डॉ. भांडारकरांचे मत आहे, तर डॉ. कीलहार्न यांच्या मते, विक्रमकाल म्हणजे पराक्रमकाल एवढ्यावरूनच विक्रम संवत् सुरू झाला. डॉ. होर्नल यांच्या मते यशोधर्मा नावाच्या माळव्यातील एका मांडलिकाने हिंदुस्थानचे सार्वभौमत्व संपादन केले, व 'विक्रमादित्य' ही संज्ञा धारण केली व तोच मालवशक बदलून विक्रम संवत् चालू करणारा राजा होय. चिंतामणराव वैद्यांच्या मते, चंद्रगुप्ताच्या पूर्वी कोणीतरी विक्रमादित्य नावाचा सार्वभौम राजा होऊन गेला असून त्यानेच शकांच्या विध्वंस करून साम्राज्य स्थापिले असले पाहिजे.

**त्यांत हस्तिनापुरी राजे**—हे राजे शालिवाहन होत.

**क्षिप्रक**—शालिवाहन वंशाचा संस्थापक. याचे नाव 'सिमुक.' हा शूद्र किंवा कुंभार असावा. उत्तर हिंदुस्थानचे सार्वभौमत्व संपादून विक्रम दक्षिणेत आला तेव्हा सिमुकाने त्याचा पराभव केला. पुराणांनी या हकीकतीत बराच घोटाळा केला आहे.

**शालिवाहन राजा शककर्ता**— शालिवाहनशक इ. स. ७८ व्या वर्षी सुरू झाला. हा शालिवाहन अथवा सातवाहन कुलातील राजांनी सुरू केला. मात्र हा

शकराजांनी सुरू केला, असे डॉ. भांडारकरांदी संस्कृत पंडितांचे मत आहे.

## पृ. ५

**याजवरून उभयतांनीं तह केला**— शकाने [वर्षे मोजण्याचा प्रघात शालि-वाहनांचा नसल्यामुळे ही कथा राजवाड्यांना] भ्रामक व निराधार वाटते (ऐप्र. पृ. २२५).

**५१२ वर्षे शालिवाहन...हस्तनापुरीं**— दिल्ली किंवा हस्तनापूर येथे राज्य करणाऱ्या सार्वभौम राजांची नावेच देण्याची बखरकाराची भूमिका असल्यामुळे शालिवाहनानंतर झालेल्या दक्षिणी राज्यकर्त्यांची नावे तो देत नाही.

**सुलतान रुकद्दीनपाशी तिमिरलिंग**– पृथ्वीराज चव्हाणाचा पराभव शहाबुद्दीन घोरीने केला, हे मल्हार रामरावास ठाऊक नव्हते, असे दिसते. हिंदुस्थानावर यावनी सत्ता प्रथम मोगलांची स्थापन झाली अशी त्याची समजूत असावी. शिवदिग्विजयकारला मात्र ही माहिती बरोबर होती, असे दिसते. ( पृ. १४ पाहा. ) शहाबुद्दीन घोरीने पृथ्वीराजाचा पाडाव केला हे माहीत नसल्याने बखरकार तैमूर-लिंगाने हिंदुराज्य बळकावल्याची हकीकत देतो.

**तिमिरलिंग**—तैमूरलंग [ सन १३३५–१४०५ ] हा मूळचा जातीने तुर्क. चंगीजखानाचा मुलगा झगताईखान ( बखरकारांचा सुलतान 'रुकद्दीन' हाच असावा ! ) ह्याजपाशी मध्यआशियात तो वजीर होता. स्वतःच्या पराक्रमाने त्याने मोगलवंशाची समाप्ती केली. हा अत्यंत पराक्रमी असून त्याने एकूण ३५ स्वाऱ्या केल्या. १३९८ मध्ये त्याने हिंदुस्थानावर स्वारी करून दिल्लीचा सुलतान महमदशाहा याचा पाडाव केला व लूट घेऊन तो परत गेला. लढाईमध्ये त्याच्या हातापायास जखम होऊन लंगडा झाल्यामुळे 'लंग' किंवा 'लिंग' ही उपाधी त्याच्यामागे लागली. तैमूर परत गेल्यानंतर दिल्लीवर सय्यद ( सन १४१६–१४५० ) व लोदी ( सन १४५०–१५२६ ) या घराण्यांनी राज्य केले. सन १५२६ मध्ये बाबराने दिल्लीचे राज्य जिंकल्यानंतर मोगल वंशाचे आधिपत्य भारतावर सुरू झाले.

## पृ. ६

**राज्य गेलें...शक ५१२ साधारणनाम संवत्सर**—पिठोर राज्य म्हणजे पृथ्वीराज चव्हाणाचे राज्य शके ५१२ ( म्हणजे इ. स. ५९० ) मध्ये गेले, असे बखरकार सांगतो. सुलतान शहाबुद्दीन घोरी याने पृथ्वीराजाचा पुरा मोड इ. स. ११९३ साली केला, असे इतिहास सांगतो. तेव्हा बखरीतील या विसंगतीचा अर्थ कसा लावावयाचा असे कोडे पडते. थोड्याशा विचाराने ते सोडविता येते का ते पाहू :

राजवाड्यांच्या माहितीवरून ( ऐप्र पृ. २२७ ) बखरकाराने ५१२ हा

आकडा युगसंख्येच्या व हस्तिनापूरच्या राजांच्या यादीवरून उचलला आहे. यादीकारांनी हा आकडा रमलशास्त्रातून उचलला आहे. रमलशास्त्रामध्ये खालीलप्रमाणे वचन आहे:

अर्कबाणेच शाकेच शालिवाहनकः शकः ।
पैगंबरादि विख्यातो प्रारंभो यवनोदयः ॥

यातील अर्कबाण या शब्दाचा अर्थ ५१२ आहे. आणि पहिल्या वचनाचा अर्थ असा घ्ययला हवा की शकराजाने चालू केलेल्या शकाची ५१२ वर्षे उलटल्यानंतर शालिवाहन शकाला सुरुवात झाली. संस्कृत ग्रंथांतून शकनृपाल, शकाब्द अशा संज्ञा असताना फक्त महाराष्ट्रातच शालिवाहन शक ही संज्ञा आढळते. शकराजांनी सुरू केलेला शक व शालिवाहन शक एकच नव्हेत, हे यावरून लक्षात येईल.

बखरकारांनी अर्थातच याबाबतीत अनेक चुका केल्या आहेत, परंतु त्या चुकातूनही नकळत काही अर्थनिष्पत्ती होईल असे वाटते. उदा:– पृ. ५ वर '५१२ शालिवाहन शकात हिंदुराजे हस्तनापुरीं जाले' अशी माहिती दिल्यानंतर 'सुरसेना' पासून 'पिठोर राजा'पर्यंत ज्या वंशावळी बखरकार देतो, त्यांची वर्षेही ५१२ च भरतात हे पाहण्यासारखे आहे. म्हणजेच शालिवाहनापर्यंतची शकाब्द ५१२ म्हणजे ५९० वर्षे, नंतर शालिवाहनांची म्हणजे शातवाहनांची ५९० वर्षे व याठिकाणी शिवदिग्विजयकाराने ( पृ. १४ ) वापरलेल्या शालिवाहनार्क ( अर्क म्हणजे बारा ) या शब्दानुसार आणखी बारा धरून इ. स. ११९२ हे वर्ष येते. पृथ्वीराजाचा पराभव झाला ते संवत्सर साधारणनाम होते. त्यावरून बखरकाराने दिलेली माहिती अशा आडवळणाने बरोबर ठरते.

## पृ. ७

**मोठमोठे पराक्रमी पादशाह...** हे सर्व वर्णन मोगल बादशाहांचे आहे.

**सेवक...कन्या पादशाहास द्यावी** – उदेपूरच्या महाराण्यां शिवाय बाकीच्या रजपूत राजांनी मोगलांचे मांडलिकत्व स्वीकारले. उदेपूरच्या किंवा चितोडच्या राण्यांनी मुसलमानांस हार जावयाचे नाही व आपल्या स्त्रियांचे दर्शनही मुसलमानांस घडू द्यावयाचे नाही, या निर्धाराने प्रचंड संकटांचा परिहार करीत आपले स्वातंत्र्य टिकविले. जहांगीर, शहाजहान इ. पादशाह अशा हिंदू स्त्रियांच्या पोटी जन्मले आहेत

**बाराशें वर्षांत**– पैगंबरापासून बाराशे वर्षे असा अर्थ घ्यावयाचा.

**सन म्हणून मृगावर चालूं** –हा सन म्हणजे हिजरी सन. मुसलमानी धर्मसंस्थापक महंमद पैगंबर पूर्वधर्मियांच्या छळाला कंटाळून १५ जुलै ६२२ मध्ये मक्का सोडून मदिना शहरी पळाला. त्या दिवसापासून हा हिजरी (अ० हिजरा=पलायन)

मोजतात. हा हिजरी सन चांद्रमानाचा असल्यामुळे हिजरी ७४४ ( शके १२६५ ) पासून वर्षाचा आरंभ मृगनक्षत्रावर सुरू होणारा असा सौरमानाचा सन सुरू करण्यात आला. त्याला ' सुहूर ( अ. शहूर=मृग ) सन ' किंवा ' सुरू सन ' असे म्हणतात. हा अक्षरी लिहिण्याचा प्रघात आहे.

**इहिदे पासून** – इहिदे म्हणजे एक. ' सुरू सन ' इ. स. ५९९ ह्या वर्षापासून सुरू झाला, असेही एक मत आहे. त्यानुसार ' सुरू सन ' हिजरीपेक्षाही अगोदरचा होय, हेच बखरकाराने येथे सांगितले आहे.

**विद्यानगर**—इ. स. १३३४ साली सुलतान महमद तघलघ याने तुंगभद्रेच्या उत्तरतीरी एका मुसलमान सरदाराची स्थापना केली व त्याने पूर्वीच्या राजाचा प्रधान ' हरिहर ' याची त्या ठिकाणी स्थापना केली. हरिहरने तुंगभद्रेच्या दक्षिणतीरी विद्यारण्यस्वामींच्या आदेशानुसार हे राज्य वसविले ( इ. स. १३४४ ) म्हणून ते विद्यानगर. हरिहराचा प्रधान माधवाचार्य नावाचा प्रधान अतिशय विद्वान असून त्याने या ठिकाणी नगर वसविले म्हणून ते विद्यानगर, अशीही दुसरी उत्पती आहे.

**सहा सुभे दक्षणचे**—औरंगाबाद, वऱ्हाड, वेदर, विजापूर, हैदराबाद, खानदेश हे दक्षिणचे सहा सुभे असे ग्रांट डफ देतो.

**सुवर्णाची वृष्टि**—विद्यारण्याने आपल्या सामर्थ्याने एक प्रहरपर्यंत होनांचा पाऊस पाडिला अशी दंतकथा आहे.

**पंढरीहून पांडुरंग**—महिपतीच्या भक्तविजय अ. ४३ मध्ये ही हकीकत आहे. शेजारच्या विदरच्या मुसलमानी आक्रमणापासून बचाविण्यासाठी पंढरपूरच्या विठ्ठलाची मूर्ती काही काळ लपविण्यात आली व विजयनगरला नेण्यात आली. तेथून संथ एकनाथांचे पणजोबा भानुदास यांनी ती परत आणली अशी आख्यायिका आहे. अलीकडच्या नव्या संशोधनानुसार विठ्ठलाची मूर्ती पंढरपूरहून विजयनगरला नेली नव्हतीच असे सिद्ध झाले आहे ( पाहा Cult of Vithoba–by G. A. Deleury pp. 40 & 42 ).

**त्या समयांत ज्ञानेश्वर**—ज्ञानेश्वरांचा काळ इ. स. १२७१ ते १२९६ हा होय. भानुदासाचा जन्म इ. स. १५४२ आहे. त्यामुळे हा उल्लेख येथे गैरलागू होय.

**कानडा रामराजा...धरून कैद केलें**—रामराजा हा इ. स. १५४२ – १५६५ पर्यंत विजयनगरचा अधिपती होता. त्याचे वैभव धुळीस मिळविण्यासाठी दक्षिणेतील निजामशाहा, आदिलशाहा, कुतुबशाहा, बेरीदशाहा व इमादशाहा एकत्र झाले व त्यांनी रामराजावर स्वारी करून त्याचा पराभव केला. या युद्धास राक्षसतागडीची किंवा तालीकोटची लढाई म्हणतात. हे युद्ध माघ शु. ५ शके १४८६ रोजी झाले.

## पृ. ८

**सूर्यवंश कुलीच्या ठायीं सिसोदे राजपुत्र**—अयोध्येचा सूर्यवंशी राजा प्रभु रामचंद्र हा या घराण्याचा पूर्वज. ‘ घेलोट ’ हे त्यांचे मूळचे आडनाव. या वंशातील कनकसेन नावाचा राजा पंजाबातून सौराष्ट्रात राज्य करू लागला व इ. स. १४४२ च्या सुमारास त्याने वीसनगर शहर स्थापिले, तेच हे ‘ अशेर ’. कनकसेन हा रामचंद्रापासून ६३ वा पुरुष तर चितोड येथे राज्य स्थापन करणारा बाप्पारावळ हा ८० वा पुरुष होय.

**ते समयीं एक राजपत्नि व एक राजपुत्र**—ही बाप्पा रावळची कथा होय. राज्यातील भिल्ल लोकांनी घेलोट राजा ग्रहादित्य यास ठार मारिले. त्यामुळे त्याचा पुत्र बाप्पा यास अरण्यवास स्वीकारावा लागला. पुढे परमार राजाकडे चाकरीस राहून इ. स. ७२८ मध्ये त्याने चितोडचे राज्य बळकाविले.

**ऐसें वरप्रदान**—टॉड आपल्या राजस्थानच्या इतिहासात अपर्णादेवीने ( भवानीने ) प्रत्यक्ष दर्शन देऊन बाप्पास शस्त्रास्त्रे दिली, असा उल्लेख करतो.

**ब्राह्मणांसही द्रुष्टांत**—या पुरोहिताचे ‘ हारित ’ असे नाव होते. त्याचा वंश अद्यापही चितोडात आहे.

**पिठोर राजा याजपासून..,सुलतान रुकद्दीन याणें**—पिठोर राजा पृथ्वीराज चव्हाण याजपासून इंद्रप्रस्थाचे राज्य घेणारा सुलतान शहाबुद्दीन घोरी हा होय. इ. स. ११९३ मध्ये हिंदुस्थानवर पाचवी स्वारी करून त्याने पृथ्वीराजाला ठार मारिले आणि दिल्लीचे राज्य बळकाविले. ‘ रुकद्दीन ’ या नावाचा उलगडा होत नाही.

**वरकड जयपूर, जोतपूर वगैरे**—( १ ) ‘ जयपूरचे राजे सूर्यवंशी कच्छवाह आडनावाचे. इसवी सनाच्या आठव्या शतकात दिल्लीजवळ अंबरनजीक जयसिंह नावाच्या राजाने जे राज्य स्थापिले ते जयपूर होय. ‘ धवलराय ’, ‘ पंजून ’ आदी पराक्रमी राजे या घराण्यात झाले. बाबराच्या वेळी जयपूरच्या बिहारीमल्ल राजाने मोगलांचे मांडलिकत्व स्वीकारले. पुढे अकबरास बिहारीमल्लने आपली मुलगी दिली. बिहारीमल्लची नात अकबराचा मुलगा सलीम यास दिली होती. तिचाच पुत्र खुश्रू होय. जोधपूरचे राज्यकर्ते चंद्रवंशी राठोड जातीचे होत. या वंशातील जोधसिंह नावाच्या राजाने सन १४५९ मध्ये जोधपूर शहर वसविले व तेथे राजधानी केली. या वंशातील गंग व मालदेव या राजांनी जोधपूरचे स्वातंत्र्य टिकविण्याची पराकाष्ठा केली, परंतु अकबराने जोधपूरचा पराभव केला. शेवटी १५७३ नंतर उदयसिंह नावाच्या राजाने आपली बहीण जोधाबाई अकबरास देऊन सख्य केले. १५७२ नंतर चितोडच्या गादीवर महाराणा प्रतापसिंह बसला. त्याने मुसलमानांशी सोइरीक ठेवणाऱ्या राजपुतांस बहिष्कृत करण्याचा ठराव केला

व आपला वंश शुद्ध ठेवण्याची प्रतिज्ञा केली. जयपूर व जोधपूरच्या राजांना, त्यांनी वारंवार याचना करूनही, शुद्ध करून घेण्यास त्याने नकार दिला.

**एक याणें मात्र**—बाप्पारावळ. बाप्पा आठव्या शतकातला आणि जयपूर, जोधपूर वगैरे राजांनी सोळाव्या शतकात आपल्या मुली मोगलांना दिल्या. बखरकार सहजगत्या किती कालखंड ओलांडून उलटसुलट उड्या मारतो, हे यावरून लक्षात येईल.

**शके १०१२**—म्हणजे इ. स. १०९०. परंतु हे पद्मिनीप्रकरण इ. स. १२९०–१३०३ या कालखंडात घडले. अशा रीतीने सुमारे २०० वर्षांचा फरक येथे दिसून येतो.

**लक्ष्मणसिंग**—लक्ष्मणसिंगाचा मुलगा भीमसिंग याने सिंहलद्विपीहून म्हणजे सिलोनहून पद्मिनी स्त्री आणली. ती अतिशय सुंदर आहे, हे ऐकून लोभास्तव अल्लाउद्दीनाने चितोडवर स्वारी केली. फार दिवस वेढा देऊन किल्ला हस्तगत होईना. तेव्हा आरशातले प्रतिबिंब पाहण्याच्या अटीवर तह झाला. प्रतिबिंब पाहिल्यानंतर अल्लाउद्दीनाने कपटाने भीमसिंगास कैद केले. तेव्हा 'स्वेच्छेने भेटावयास येते' असे सांगून सातशे बुरखेधारी शिपायांच्या पालख्या अल्लाउद्दीनकडे पाठविल्या. त्यांतून शिपायांनी बाहेर येऊन कापाकापी केली. परंतु अल्लाउद्दीनाने सावध राहून त्यांस कापून काढविले. या भीमसिंगाचा बागसिंग नावाचा दासीपुत्र, रजपूत त्यास कढ्ढ समजू लागले म्हणून, खानदेशात आला. त्याचे पुत्र मालोजी व बंबोजी (बावाजी) होत अशीही एक निराळी माहिती मिळते. (बुंब पृ. १)

## पृ. १०

**केसरी पोशाख**—'मारू किंवा मरू' या निर्धाराने रजपूत लढाईसाठी बाहेर पडतो. त्यास 'केसरी करणे' म्हणतात. 'केसरी पोशाख' हीही सिसोदे वंशाची एक निशाणी होय.

**आरससिंह**—हा लक्ष्मणसिंहाचा मुलगा. लक्ष्मणसिंह व आरससिंह हे दोघेही अल्लाउद्दीनबरोबरच्या लढाईत पडले. लक्ष्मणसिंहाचे १० पुत्र यासमयी रणात पडले आणि राहिलेला पुत्र अजयसिंह आपल्या आईसह अरवली डोंगरात केळवाडा येथे निघून गेला. अल्लाउद्दीनाने इकडे चितोडचा संपूर्ण विध्वंस केला. केळवडास अजयसिंहाच्या पोटी सज्जनसिंह व अजिमसिंह असे दोन पुत्र झाले. यातील सज्जनसिंह हा दक्षिणेत गेला, तोच शिवाजी महाराजांचा पूर्वज असे रजपूत वंशावळींच्या आधारे कॅ. टॉड म्हणतो.

**राज्य सोडवून, चितोड घेऊन**—आरससिंहाचा पुत्र हंमीर याने पुढे पराक्रमाने चितोड सोडविले. बखरकाराला आरससिंह अगोदरच मारला गेला होता, हे ठाऊक नाही.

**चितोडचा दरवाजा**—इ. स. १५६७ मध्ये अकबर बादशहाने चितोडचा राजा उदयसिंह याजवर स्वारी करून चितोडचा विध्वंस केला; आणि चितोडची राजचिन्हे व तेथील सर्व मौलिक वस्तू आपल्या बरोबर नेल्या.

**आगरे अकबराबाद...आगरे वारणावत**—आगऱ्यास अकबराने आपले नाव दिल्यामुळे त्यास ' अकबराबाद ' हे नाव पडले. आगऱ्याचे प्राचीन नाव ' वारुणावत ' होय. वारणावत नगर गंगातीरी होते ( आदिपर्व अ० १४९ ) आणि आगरा तर यमुनेच्या तीरी आहे, तेव्हा आगऱ्यास वारणावत कसे म्हणावे, असा प्रश्न निर्माण होईल. इंद्रप्रस्थ व दिल्ली यांमध्येही असाच फरक आहे. इंद्रप्रस्थ गंगातीरी तर दिल्ली यमुनातीरी. भाऊसाहेबांच्या बखरीत ' दिल्लीपासून इंद्रप्रस्थ कच्चे चाळीस कोस ' आहे अशी माहिती असली तरीही दिल्लीइंद्रप्रस्थ असेच बखरकार लिहितात. त्याचा अर्थ दिल्ली म्हणजेच इंद्रप्रस्थ असा आहे. तसेच आगरा म्हणजेच वारणावत हाच अर्थ येथे बखरकारांना अभिप्रेत आहे.

**खाजासाहेब पीर......अजमेर**—प्रख्यात मुसलमान साधूच्या मृत्यूनंतर त्यांच्या थडग्यांना पीर ही संज्ञा मिळाली. अजमेर येथील पीर ' मैमुद्दीन चिस्ती ' नावाच्या साधुपुरुषाचा होता.

**प्रतिज्ञा केली कीं**—ही प्रतिज्ञा महाराणा प्रतापसिंहाने केली. अकबराच्या सैन्याकडून पराभूत झाल्यानंतर रानोमाळ हिंडत प्रतापसिंहाने चितोड जिंकण्यासाठी जिवाचे रान केले. सारा मेवाड हस्तगत केला, परंतु ' चितोड ' काबीज झाले नाही. प्रतापसिंहाने आपली प्रतिज्ञा पुरेपूर पाळली. उदेपूरचे राणे सांकेतिक रीतीने ( म्हणजे सोन्याच्या ताटाखाली पळसाचे पान. गादीखाली कडबा ठेवून इ. प्रकारे ) ही प्रतिज्ञा पुढेही पाळीत.

**सिंदीचे फड**—शिंदीच्या झाडाची झावळे. हे झाड अशुभ मानले जाते. त्यापासून ताडीमाडीसारखा अमली पदार्थ काढतात. शिंदी हे कलालांचे प्रतीक. मिरवणुकीत किंवा दरबारात चितोड प्राप्त होईपर्यंत चवऱ्या ढाळण्याऐवजी शिंदीच्या झावळ्या ढाळून प्रतापने आपल्या प्रतिज्ञेची तीव्रता व्यक्त केली.

**उदेपूर**—राणा प्रतापसिंहाचे वडील उदयसिंह अकबराकडून पराभूत होऊन आरवलीच्या डोंगरात पळाले, आणि तेथे त्यांनी एक खेडे वसविले तेच उदेपूर. पुढे त्याच्या वंशजांनी तेथे राजधानी केली. मेवाडच्या राण्यांना म्हणूनच उदेपूरचे राणे असेही म्हणतात.

**अलीकडे**—उदेपूरच्या अलीकडे सोंधवाडा आहे. इ. स. १३१० मध्ये सजनसिंह सोंदवाड्यास माळव्यात आले, असे टॉड म्हणतो.

**सजणसिंह......भोंसाजी**—अगदी याच प्रकारे टॉड आपल्या ग्रंथात वंशावळ देतो. फक्त तो दिलीपसिंह यांचा पुत्र ' शिवजी ' देतो. मल्हार रामराव ' सिंहजी ' देतो. कदाचित ही नकलकारांची दुरुस्ती असावी.

**भीमसिंहजी राज्य करीत आहेत**—हा भीमसिंह राणा हंमीर दुसरा याचा धाकटा भाऊ. १७७८ मध्ये तो मेवाडच्या गादीवर बसला. त्याने पन्नास वर्षे राज्य केले. मल्हार रामरावाच्या वेळीं तोच मेवाडच्या गादीवर होता. १८२९ मध्ये तो मरण पावला.

**सिसोदे**—मेवाड घराण्यातील इ. स. १२०१ मध्ये गादीवर आलेल्या रहूप या राजाने रावळ व घेलाट ही नावे टाकून राणा व सिसोदे ही नावे घेतली. त्यावेळेपासून या वंशास 'सिसोदे वंश' असे म्हणतात.

**वौंशधर जाले ते**—शिवाजी महाराजांच्या पूर्वजांविषयी आत्तापर्यंत प्रसिद्ध अशा चार वंशावळी मिळाल्या आहेत. त्यांतील सातान्यास प्रतापसिंहाने तयार केलेली व टॉड याने आपल्या राजस्तानच्या इतिहासात दिलेली वंशावळ एकच आहे. दुसरी तंजावरच्या शिलालेखातील वंशावळ अगदीच निरुपयोगी आहे. आणखी एक जिंतीकर भोंसले यांजकडून मिळालेली वंशावळ आहे, ती बरबटजी ऊर्फ खेलकर्ण दक्षिणेत आले, असे सांगून, बरबटजी >नागोजी >व्यंकोजी >बाबाजी-विठोजी >शहाजी असा क्रम देते. टॉडच्या ग्रंथातील क्रम असा आहे : लक्ष्मणसिंह, अभय इ. >सजनसिंह >दिलीपसिंह >शिवजी >भोसाजी >देवराजजी >उग्रसेन >माहुलजी >खेळोजी >जनकोजी >संभाजी >बाबाजी >मालोजी >शहाजी. या सर्वांपेक्षा चिटणीसाने दिलेली ही यादी मोठी आहे. देवराजजीनंतरच्या चारपाच पिढ्यांच्या नावांत बराच फेरबदल दिसतो. या वंशावळींवरून असे दिसून येईल की, भोसल्यांच्या बाबतीत बाबाजीपासूनच काय ती योग्य माहिती मिळते. बाबाजीच्या वडिलांचे नाव संभाजी, परसोजी, व्यंकोजी व मालजी असे निरनिराळ्या वंशावळींतून निरनिराळे दिसते यावरून ही गोष्ट स्पष्ट होईल.

**भोंसले उपनांव**—हीच उपपत्ती सर्वांत सयुक्तिक दिसते. भोंसली या गावावरून हे उपनाव पडले, असे कित्येकांचे म्हणणे आहे. राजवाडे (रामाविचं पृ. ३७–३८) भोज या नावाचा अपभ्रंश भोसले असे मानतात.

## पृ. १२

**साहा यवन**—एकत्र येऊन विजयनगरच्या रामराजाचा पराभव करणारे आदिलशाहा, निजामशहा वगैरे.

**विठोजी यांस आठ पुत्र**—शिवदिग्विजय पृ. ८ वर व राखं. ९ पृ. ५ वर ही नावे दिलेली आहेत.

**लुकजी**—सबंध नाव लुकजी कुकजी जाधवराव (राखं. १५ पृ. १३). मालोजी वयाच्या २७ व्या वर्षी (ग्रँट डफ वयाच्या २५ व्या वर्षी म्हणतो ते कदाचित शेडगावकर बखरीच्या आधारे असावे. शे. ब. मालोजीचा जन्मशक १४७४ देते) लुकजी जाधवरावाकडे दरमहा पान्च होनांची तैनात घेऊन चाकरीस

राहिला. पहिला मूर्तिजा निजामशहाच्या कारकीर्दीत आदिलशाहीबरोबरच्या चकमकीत मालोजीने पराक्रम केला म्हणून शके १५०१–२ च्या सुमारास त्यास निजामशाही मनसब मिळाली. मूर्तजानंतर ( शके १५०२ ) निजामशाहीत बेबंदशाही माजली व मालोजीस वणगोजीची चाकरी पत्करावी लागली ( शिनि पृ. ४–५–६ ).

**निंबाळकर**—परमारवंशीय निंबराज परमार याने इ. स. १२४४ च्या सुमारास धार येथून दक्षिणेस फलटणास येऊन वस्ती केली. त्याचे वंशज मालोजी व विठोजी. दोघेही विपत्काळीं पुढे फलटणचे वणगोजी ( वणंगपाळराव ) निंबाळकरकडे नोकरीस राहिले. ( इसं वर्ष ८ पृ. २८ ) या वणगोजीने आपली बहीण उमाबाई मालोजीस दिली. तिचे सासरचे नाव दीपाबाई असावे. ऐतिहासिक कागदपत्रांतून ( शिभा अ. २–४९, रामाचं पृ. २६७, राखं ८ ले. ७१ ) तिचे नाव उमाबाई असेच आढळते. ह्या वणगोजीने विजापुरकरांच्या मुलुखात इ. स. १६०१ च्या सुमारास धुंडावा आरंभिला (राखं १५ पृ. १४ ). मालोजी व विठोजी यांनी मशिदींतून डुकरे टाकून मुसलमानांच्या धर्मभावनेला आव्हान दिले असा उल्लेख ग्रँट डफ व ताकखाऊ (ताशि. पृ. १३ ) करतात, तो प्रसंग या काळचाच होय. निजामशाहीतील अंदाधुंदीमुळे मालोजीस वणगोजीची चाकरी पत्करावी लागली. म्हणूनच बखरकाराने, ‘ चाकरीमुळें वेरूळ–पाटिलकीचें गांव येथें राहिले.’ असे म्हटले आहे.

बृहदीश्वराच्या शिलालेखात या सर्व काळात मालोजीने आपल्या पराक्रमाने निजामशाहीची दौलत कशी सांभाळली याचे वर्णन आहे ( रामाविचं पृ. ४१ ).

**शके १५१६**—शहाजीचा जन्मशक निश्चित करण्यामध्ये अनेक अडचणी आहेत. शिवदिग्विजयकार शके १५१६ जयनाम संवत्सरीं चैत्र शुद्ध ५ इंदुवारी जन्म झाला ’ असे सांगतो ( पृ. ३७–३८ ). शिवदिग्विजय व चिटणीसी बखरीखेरीज शहाजीच्या जन्माचे इतके स्पष्ट उल्लेख नाहीत. शहाजी-मालोजीसंबंधीचे इतर पुरावे पडताळून द. वि. आपटे शहाजीचा जन्म श. १५२४ मानतात ( शिनि पृ. ९५ ).

**पीर शहाशरीफ**—शिवभारतकार शंकराच्या प्रसादाने शहाजी जन्मल्याचे सांगतो व शहाशरीफ ही नावे सिद्धांची असल्याचे सांगतो. शहाजी शरीफजी ही नावेच बखरीतील माहितीला पुष्टी देतात.

## पृ. १३

**पंचमीचा रंगसमारंभ**—शीर खवाजा या मोगल सरदाराचा पराभव निजामशाही सरदारांनी केला. त्याच्या आनंदाप्रीत्यर्थ हा समारंभ भरला ( रामाविचं पृ. ४१ ).

## पृ. १४

**देवीचा द्रुष्टांत**—येथील दृष्टांतशकाबद्दल रायरी बखरीतील माहिती जुळती आहे. शेडगांवकर बखर हा शक १५१६ देते तर शिवदिग्विजय ( पृ. ३३ ) ‘ शके १५१५ माघ शु. १५ भानुवासर ’ असा देते. राजवाड्यांना शिवदिग्विजयकाराचे म्हणजे सर्वांत ग्राह्य वाटतें. परंतु वासुदेवशास्त्री खऱ्यांच्या मताप्रमाणे ( माशि पृ. ४ ) सेवटी चिटणिसाचीच मिती ग्राह्य ठरते. बुद्धिवादी दृष्टिकोनातून या दृष्टांत प्रकरणाचा अर्थ ग्रँट डफ असा लावतो की, मालोजीने लुटारूपणाने हे द्रव्य मिळविले आणि बखरकारांनी त्याला दैवी चमत्काराचे रूप दिले !

## पृ. १६

**पादशहांनीं जाधवराव यास आज्ञा**—निजामशाहाचे दडपण आणून मालोजीने लग्न लावविले असे बुंदेल्याची बखरही ( पृ. १ ) सांगते.

**जागां जागां देवालयें**—मालोजी व विठोजी यांनी जी परोपकारी कृत्ये केली त्यांची वर्णने सभासद बखर, शिवभारत व राखं ८ ले ७१, रामदास व रामदासी अंक ५ ले. ६ मध्येही आढळतात.

**जाधवरावांहून भाग्यवान केलें.**—मालोजीवर निमाजशहाने ही जी कृपा केली, त्याचे कारण शेडगांवकर बखरीत पृ. ४–५ वर दिले आहे. कोल्हापुरास वणगोजीच्या सैन्यावर विजापूराच्या फौजेने अचानक हल्ला केल्यानंतर मालोजीने स्वपराक्रमाने तो मोडून काढला. त्यावेळच्या त्याच्या पराक्रमाची हकीकत ऐकून सल्लागारांच्या आग्रहास्तव निजामशहाने त्यास ही मनसब दिली. हा सरंजाम चै. व. ५ श. १५२५ ला देण्यात आला.

**दौलताबादेस लग्नसमारंभ**—शके १५२६—ही मिती शिवदिग्विजय ‘ श. १५२५ ’ व शेडगांवकर बखर ‘ मार्गशीर्ष शु. ५ शके १५२७ ’ देते. वासुदेवशास्त्री खरे यांच्या मते दौलताबादेस बादशहासमोर लग्न झाले, ही बखरकारांची माहिती बरोबर नाही. यावेळी निजामशाहीची राजधानी ‘ परांडे ’ येथे होती.

## पृ. १७

**चतुर साबाजी**—अकबराचा जसा तोडरमल, तसा निजामशाही राज्यातील हा श्रेष्ठ करणाधिप होता. मलिकंबरी जमीनमोजणी ती या चतुर साबाजीने केली. मुख्य वजीर म्हणून ती पाहणी व मोजणी मालिकंबराच्या नावावर मोडते इतकेच ( रामाविचं पृ. ६७ ).

**ऐसें पत्रीं लिहूं लागले**—‘ राजे ’ हा किताब भोसले कुळातील पुरुष मालोजीस जहागीर मिळण्यापूर्वीही लावीतच होते. शिवाजी महाराजांनी विजापूरचा

मुलूख व्यावयास सुरुवात केली तेव्हा शहाजीस अटक करण्यात आली व सुटकेनंतर त्यास शके १५७० मध्ये महमद आदिलशहाने 'महाराज' हा किताब दिला. शक १५७० पर्यंतच्या पत्रांतून ही पदवी आढळत नाही. (शिनि पृ. १२८). बखरकाराजवळ अर्थातच इतकी काटेकोर दृष्टी नसल्याने त्याने राजे, महाराज या पदव्या कशाही लाविल्या आहेत.

**शहाजीराजे यांस वजिरीचीं वस्त्रें**—बखरकाराचे यापुढचे शहाजी संबंधीचे वर्णन आणखीनच घोटाळ्यात पाडणारे आहे. १५४१ मध्ये मालिकंबर हाच वजीर होता. शहाजी मालोजीच्या मृत्यूनंतर निजामशाहीचा वजीर असा कधीच नव्हता (माश पृ. ८). शके १५४१ मध्ये मालोजी मरण पावला व शहाजीस मनसबदारीची वस्त्रे मिळाली (ऐ. प्र. पृ. २३५). पुढे मलिकंबरबरोबर १५४२ मध्ये शहाजीने मोठा पराक्रम केल्यानंतर शहाजी निजामशाही राज्याचा सरलष्कर म्हणजे सेनापती झाला असावा (इऐ. शिवकालीन घराणी—तळबीड मोहिते ले. ३७१ व राखं १५ ले. ३९८). शके १५४६ मध्ये भातवडीच्या लढाईत शहाजीने मोठा पराक्रम करून आदिलशाही व मोगली सैन्याचा पाडाव केला व त्यातून द्वेष निर्माण होऊन मालिकंबर व शहाजी यांमध्ये वैमनस्य आले. सासरे जाधवराव व इतर सरदार आधीच शहाजीला पाण्यात पाहात होते. त्यामुळे शहाजी विजापुरी गेला (रामाविचं पृ. ५३–५४). बखरकाराने दिलेली १५४८ ही मिती बरोबर आहे (सापया ४१०). शक १५४८ मध्ये मलिकंबर व मूर्तजा निजामशाहा यांचे निधन झाल्यानंतर शहाजीच्या हाती सत्ता आली असावी. मालिकंबरनंतर त्याचा मुलगा फत्तेखान वजीर होता. परंतु यावेळी निजामशहा वयाने लहान पोर होता याला आधार नाही. शके १५५३ नंतर मात्र अशी परिस्थिती होती.

**चांगसखान मलिकंबर**—निजामशहाचा वजीर चंगीजखान हा हबशी जातीचा होता. त्याच्या पदरी मलिकंबर गुलाम होता. मूर्तजाशहाने त्याला विष घालून ठार मारिले. चांगसखानाच्या तालिमीत तयार झालेला मालिकंबर पुढे वजीर झाला. त्याने आपल्या कर्तबगारीने राज्याची घडी बसविली व मूर्तजाशहाचे काही चालू दिले नाही. मूर्तजा मलिकंबराचा त्यामुळे मनातून द्वेष करी, असे तंजावरच्या शिलालेखावरून दिसते.

## पृ. १८

**संभाजी जन्म**— शके १५४५ मध्ये झाला. संभाजीपूर्वी जिजाऊस चार अपत्ये झाली. ती सारी अल्पायुषी ठरली. संभाजी हा शहाजीचा पाचवा पुत्र.

**अलमगीर पादशहा याची फौज**—चिटणिसाने पृ. २१ वर मलिकपराक्रमाचे जे वर्णन दिले आहे, ते शके १५४२ च्या बऱ्हाणपूरच्या लढाईचे होय. त्या लढाईने जाग येऊन जहांगीर बादशहाने आपला मुलगा शहाजहान यास

निजामशाहीवर पाठविले. यावेळीं विजापूरचा आदिलशहा व लुकजी जाधवराव मोगलांना मिळाले होते. शके १५४६ मध्ये अहमदनगरजवळच्या भातवडीच्या रानात ही लढाई झाली व याही लढाईत मलिकने मोठा पराक्रम करून शत्रूची चांगली खोडकी जिरवली. बखरकाराने हे सारे वर्णन किती विकृत केले आहे, हे लक्षात येईल. येथील मीरजुमल्याचा उल्लेख तर अगदी अप्रस्तुत आहे. तो गोवळकोंड्याचा सरदार असून त्याचा येथे काही संबंध नाही.

सुलतान सिकंदर—विजापुरास या वेळीं महमद आदिलशाहा हा बादशाहा होता. सिकंदर नव्हे.

## पृ. १९

माहुलीस चालून गेली — डिसेंबर १६३० (श. १५५२) मध्ये शहाजी मोगलास मिळतो व नंतर जून १६३२ मध्ये परत विजापुरकरांकडे येतो. ऑगष्ट १६३३ मध्ये दौलताबादच्या गादीवर लहान वयातील एका वंशजास बसवून निजामशाही सावरण्याचा प्रयत्न करतो. त्यावेळीं खानजमान नावाचा मोगली सेनापती शाहाजीचा माहुली येथे पराभव करतो, त्यामुळे बाल बादशहास मोगलाच्या स्वाधीन करुन तो परत विजापुरकरांकडे येतो. ही घटना ऑक्टोबर १६३६ (शके १५५८) मध्ये घडली.

## पृ. १९

जाधवराव पाठलाग — निजामशाही सोडून जाधवराव मोगलांना जाऊन मिळाले, आणि पुढे खुद्द शहाजहान बादशहा आपला बंडखोर सरदार खानजहान लोदी व शहाजीवर चालून आला त्यावेळी जाधवरावांनी शहाजीचा पाठलाग केला (माश पृ. ११). ही घटना शके १५४८ ची नसून शके १५५८ ची होय, असे इतिहासकारांचे मत आहे (शिचप्र पृ. २७८). ही घटना घडल्याचे डफ व सरकार यांना मान्य नाही.

## पृ. २०

जगपाळ — हाच वणगोजी. शहाजीचा मामा.

मुरारपंत — आदिलशाही वजीर खवासखान याचा कारभारी. हा नागरगावचा कुलकर्णी होता. यासच मुरार जगदेव म्हणत.

दादोजी कोंडदेव—तारीखे शिवाजी आणि मसाछोब मध्ये तो हिंगणे खुर्द देऊळगाव आणि धुळगावचा कुलकर्णी होता, असे म्हटले आहे.

## पृ. २०

**शिवजन्म**---या संबंधी फार मोठ्या प्रमाणात वाद आहेत. बहुतेक बखरींतून चिटणिसांप्रमाणेच शके १५४९ हीच तिथी दिलेली आहे. गणिताच्या कसोटीवर कोणत्याही बखरींतील मिती टिकत नाही, असे इतिहासकारांचे म्हणणे आहे. राजवाडे यांना तर ही तिथी बनावट वाटते ( ऐप्र. पृ. २३७ ). तंजावरचा शिलालेख, शिवभारत व जेधे शकावलीमध्ये ही तिथी ' १५५१ फाल्गुन कृ. ३ शुक्रवार ' अशी आहे, आणि बहुसंख्य इतिहाससंशोधकांचा या तिथीस पाठिंबा दिसतो.

**वैशाख शु॥ २, गुरुवारी**—वैशाख शुद्ध द्वितीयेस गुरुवार नसून शनिवार येतो. राजा म्हणजे त्याला जन्मस्थान बहुत ग्रह उच्चीचे असले पाहिजेत, ह्या समजुतीतून ' गुरुवार ' हीच तीथ बखरकारास पसंत करावी लागली, असे राजवाडे म्हणतात ( ऐप्र. २३७ ).

**सा ग्रह उच्चीचे**--- शिवभारत पाच ग्रह उच्चीचे असल्याचे सांगतो. श्री आबा चांदोरकर व सदाशिवराव दिवेकर ( भाईसं शके १८४३ ), ज. स करंदीकर ( भाईसं शके १८४५ ) व साने ( शशिछम पृ. ५१ ) यांनी कुंडल्या मांडल्या आहेत. त्यांवरून ४ ग्रह उच्चीचे व एक स्वगृहीचा असे पाचच ग्रह उच्चीचे आहेत, असे दिसते.

**शके १५५० दुसरें लग्न**—शहाजी शके १५४७।४८ मध्ये विजापूरकरांच्या नोकरीत शिरला, हे वासुदेवशास्त्री खरे यांस मान्य नसल्यामुळे शेडगावकर बखरीने दिलेला शके १५६० हा ते ग्राह्य धरतात. डफ शके १५५२ मध्ये हे लग्न झाल्याचे लिहितो, व ' त्यामुळे रागाऊन जिजाबाई नातेवाईकांकडे शके १५५५ पर्यंत जाऊन राहिल्याचे ' सांगतो. कीर्तने प्रतीमध्ये ( पाठभेद पाहा ) शके १५५२ हा शक दिला आहे. बायको बाळंत असता वर्षभरातच शाहाजीने दुसरे लग्न केले, असा निष्कर्ष काढण्यास शिवजन्माच्या वैशाख व फाल्गुन या दोन्ही मितयांच्या पुरस्कर्त्यांची ह्या पाठभेदामुळे सोय झाली आहे !

**चंजावरकर संस्थानी**--- शके १५८७ मध्ये व्यंकोजीने तंजावर जिंकून तेथे आपली राजधानी केली असा उल्लेख फ्रेंच कागदपत्रांत आढळतो ( सशि पृ. २८३ ). त्यापूर्वी शके १५८१ मध्ये अदिलशाही सरदार मुल्ला महंमद याजबरोबर जाऊन शाहाजीने तंजावर जिंकले होते. तंजावर नायकाच्या साहाय्याने शाहाजीने त्रिचनापल्लीकरावर स्वारी केली असा इतिहास आहे. त्यावेळी त्रिचनापल्लीकर चोकनाथ नाईक होता. त्याने शाहाजीचा पराभव केला.

## पृ. २१

**बऱ्हानपुरीं युद्ध**—हे युद्ध शके १५४३ मध्ये झाले. मीरजुमला हा यावेळी

गोवळकोंड्याच्या कुतुबशाहाचा वजीर होता. त्याचा व मोगलांचा या लढाईत काही संबंध नव्हता. मुत्सद्देगिरीबद्दल हा त्याकाळी सर्व हिंदुस्थानात प्रसिद्ध होता. शके १५७४ मध्ये त्याने दक्षिण कर्नाटकावर स्वारी केली. शाहाजीने त्याचा पराभव करून मोठी दुर्दशा उडविली, या स्वारीचे वर्णन हिंदी व मराठी अशा दोन्ही भाषेंत राधामाधवविलासचंपूकाराने केले आहे ( रामाविचं पृ. २८ ).

## पृ. २२

कनकगिरीची लढाई शके १५७५ मध्ये झाली. त्यामध्ये संभाजी मारला गेला की नाही, याबद्दल काही संशोधकांनी संशय व्यक्त केला आहे. अफजलवधानंतर चार-पाच वर्षांनी तो मारला गेला, असे सिद्ध करण्याचा प्रयत्न झाला आहे. परंतु तो मान्य होण्यासारखा नाही. अफजलाच्या वधानंतर असा शब्दप्रयोग करण्यापेक्षा वधापूर्वी असा शब्दप्रयोग योग्य होईल. अफजलखानामुळे संभाजीस मृत्यू आला, ही गोष्ट अनेक पुराव्यांवरुन सिद्ध होते.

**मलीक अमर्यादा करून** — ही हकीगत संपूर्ण काल्पनिक आहे. पुणे लुटले, जाळले ते मलिकने नसून मुरार जगदेवरावाने, तो प्रसंगही निराळा.

## पृ. २३

मुरारपंताच्या तुळेची तिथी बखरकाराने बरोबर दिली आहे. येथे यावेळी बरोबर शहाजी होता या वर्णनास राधामाधवविलासचंपूवरून पुष्टी मिळते (पृ.६६). हत्तीची तुला करण्याची युक्ती त्याने सुचविली वगैरे वर्णन काल्पनिक आहे ( शिनि पृ. ८०. ).

## प्रकरण द्वितीय

### पृ. २४

**जिजाबाई व पुत्र यांचे भेटीस**– शिवजन्मानंतर लागलीच शहाजीने शिवाजीची व जिजाबाईची भेट घेतली की नाही, याबद्दल निर्णायक पुरावा उपलब्ध नाही. सभासदाच्या वर्णनावरून कालांतराने दादोजीने जिजाबाई व शिवाजीराजे यांस शहाजीच्या भेटीस बंगरुळास नेले, असे दिसते. 'ते समयीं राजियास वर्षें बारा होतीं' असेही तो पुढे म्हणतो. डॉ. बाळकृष्ण व द. वि. आपटे यांनी दर्याखानावरची मोहीम संपवून शहाजीने बालशिवाजीचे मुखावलोकन केले, असे शिवभारताधारे म्हटले आहे ( अ. ६. ९४ ). जिजाबाईसाहेब व पुत्र यांचे भेटीस फार दिवस झाले या चिटणिसाच्या वाक्यरचनेवरून ही भेट येथे गृहीत धरिली आहे, असे दिसते.

**पुत्राचें सात वर्षांचें वय**—म्हणजे बखरकाराच्या म्हणण्याप्रमाणेच शके १५५६ हे साल. या साली शहाजी विजापूरकरांकडे नव्हता. नवीन स्थापिलेल्या निजामशाहीची व्यवस्था लावण्यात तो दंग होता. शिवजन्म १५५१ चा मान्य केल्यासच हे वर्णन काहीसे बरोबर ठरेल.

**सर्व विद्याभ्यास...लिहिणें**— 'Marathas seldom can write or read; they consider all such learning the business of a Carcoon, and if not degrading at least undignified. Sivajee could never write his name' असे उद्गार चिटणीस बखर हाती असताही ग्रँट डफने काढले ( पृ. १०१ ). यदुनाथ सरकार या मताशी सहमत आहेत. – 'Shivajee was unlettered like three other heroes of mediaeval India — Akbar, Haider Ali and Ranjit Singh'. परंतु हे दोन्ही आरोप हास्यास्पद व कुत्सित आहेत. शहाजी संस्कृत भाषेत समस्या घालीत होता, संभाजीने बुधभूषण हे काव्य लिहिले आहे. आणि शिवभारतातील वर्णनांवरून ( अ. ९. ७०–७४; अ. १०. ३४–४० ) शिवाजीच्या शिक्षणाची यथायोग्य कल्पना येते. इंग्रजी व फ्रेंच बखरवाल्यांनी महाराजांच्या हातची लेखी मखलाशी करारनाम्यावर व पत्रावर झाल्याचे लिहिले आहे ( बाशि १. पृ. १२. १३ ).

**श्रीचा द्रष्टांत...वरही श्रीचा**—हा पृ. २० वरचा

**वडिलांस द्रष्टांत**—पृ. १४ वरचा.

**पुणें, सुपें...बारा मावळें सरंजाम दिल्हा**—पादशाहनामावरून हा सरंजाम शाहाजीस २५ फेब्रु. १६३७ ( श. १५५९ ) मध्ये मिळाला. शिवाजी याच वर्षी

मातोश्रीसह पुण्यास राहावयास गेला ( सशि पृ. १९, २० ). ही जहागीर पूर्वीपासून शाहाजीकडे होतीच, परंतु निजामशाही सोडून आदिलशाहीकडे गेल्यानंतर त्याने त्यावर यावेळी पक्के शिक्कामोर्तब करून घेतले.

**बारा मावळें**— ( अ ) पुण्याखालील बारा मावळे— ( १ ) रोहिडखोरे ( २ ) वळवंड ( ३ ) मुसे ( ४ ) मुठे ( ५ ) शिवथर ( ६ ) पौड ( ७ ) गुंजाण ( ८ ) भोर ( ९ ) पावन ( १० ) अंदर ( ११ ) नाणे ( १२ ) घोटम ( राखं ४. ७८ ) शेवटच्या तीन नावांबद्दल ( १० ) जोर ( ११ ) कनाद ( १२ ) मुरुम ही निराळी नावे डॉ. बाळकृष्ण देतात. ( बाशि १. १९ ).

( ब ) जुन्नरखालील बारा मावळे— ( १ ) शिवनेर ( २ ) जुन्नर ( ३ ) मीनानेर ( ४ ) घोडनेर ( ५ ) भीमानेर ( ६ ) भामनेर ( ७ ) जामनेर ( ८ ) पिंपळनेर ( ९ ) पारनेर ( १० ) सिन्नर ( ११ ) संगमनेर ( १२ ) अकोळनेर ( राखं ४, ७८ ).

**शामलाचे उपद्रवेंकरून उजाडी**—शामल म्हणजे सिद्दी किंवा हबशी. या ठिकाणी हा उल्लेख मलिकंबरास उद्देशून वापरला आहे. मागे पृ. २२ वर, ‘ मलिकही बमैफौज चालून आले. मार्गी येतां पुढें लुटलें, जाळिलें ’ असे बखरकाराने म्हटले आहे. मलिक हा चांगसखानाचा गुलाम, आणि चांगसखान हबशी होता. पुण्याची लूट मलिकने केली, ही बखरकाराची समजूत चुकीची आहे, हे मागेच सांगितले आहे.

**कौल करार देऊन लावणी केली**—वास्तविक या पूर्वीपासूनच दादोजी कोंडदेव या कामाला लागला होता. मुरारबाजीने गाव लुटले व दादोजी कोंडदेवाने लावणी केली यासंबंधी उल्लेख : ‘ यावर दुकाळ पडला. इदिलशाही नामजादी पुणा येऊन बसली. पुणें लुटून जाळून तलक केलें. ’ ( शिपसासं खं. १. पृ.–४. जुलै १६३१ ). ६ डिसें. १६३३ च्या पत्रातील खालील मजकूर पाहा : ‘ ...यावरी रा. दादाजी कोंडदेऊ सुभेदार दिवाण झाले. यांणीं मुलुक लाविला. देशमुख व देशकुलकर्णी यांस ताकीद केली कीं, गांव लावणें. आपणांस कौल देऊन गाव लाविला : ’ ( शिपसासं खं. १. पृ. ८३ ).९१ कलमी बखर कलम क्र. २०, २१; बस पृ. २८७, यांमध्येही दादोजीच्या या कामगिरीचे वर्णन आहे.

## पृ. २७

**शिवाजी महाराज यांचें लग्न- शिर्के यांची कन्या**—शके १५५९—सईबाई शिर्क्यांची कन्या नव्हती. ती मुधोजी निंबाळकरांची होती. हे लग्न बंगरूळास झाले, असे शिवभारतावरून ठरते. राजवाड्यांच्या मते शहाजी कनकगिरीच्या मोहिमेत गुंतला असता शके १५६२ मध्ये वैशाख शु. पंचमीस दादोजीने हे लग्न शहाजीच्या गैरहजेरीत पुण्यास उरकून घेतले ( रामाविचं पृ. ८१ ).

**बराबर कारभारी पूर्वी शिवनेरींत होते ते**--पृ. १९ वर निर्देशिलेले बाळकृष्णपंत हणमंते, संक्रोजी नीळकंठ, सोनोजीपंत व रघुनाथ बल्लाळ कोरडे. बाळकृष्णपंत यांस मुजुमदार ( हिशेब तपासनीस ), सोनोपंत यांस डबीर ( परराष्ट्र मंत्री ), रघुनाथ बल्लाळ यास सबनीस ( पत्रव्यवहार करणारा ) व नीळकंठ यास पेशवा ( दिवाण ) हे हुद्दे दिले होते.

**आलमगीर**--येथें ' शहाजहान ' हा अर्थ

**शिवाय तीन पुत्र**--( १ ) दाराशुको ( २ ) सुजा ( ३ ) मुरारबक्ष

**औरंगजेब**--( १६१८-१७०७ ). औरंगजेब सुभेदार म्हणून १६३६-४४ या काळात दौलताबादेस होता. तेथून १६४५ साली त्याची गुजरातचा सुभेदार म्हणून रवानगी झाली.

**रंगमहाल** -- सन १६३६ मध्येच दादोजी कोंडदेवाने वाडा बांधला होता, आणि त्याचे नाव ' लालमहाल ' असे होते.

## पृ. २८

**जागां जागां प्रांतास उपद्रव देणार यांस नतीजा देऊन**-- दादोजी कोंडदेव यांनी बंगळूरहून परत येताच बारा मावळ्यांचा बंदोबस्त केला. ' येतांच बारा मावळें कावीज केलीं ' हे सभासदी बखरीतील वर्णन दादोजी कोंडदेवांबद्दलच आहे ( शिभा पृ. १२२ ). बारा मावळ्यांमध्ये कृष्णाजी नाईक बांदल देशमुख तर्फ हिरडस मावळ यांनी बंडाळी आरंभिली, तेव्हा सामोपचाराने त्याचा बंदोबस्त कोंडदेवांनी कसा केला, यासबंधी माहिती मिळते ( राखं १५ ले. ३०२ ).

## पृ. २९

**' वडिलीं मेळविलें...तें गमाविलें हें वाटचास न यावें** -- हे सारे वर्णन मोठे खुबीचे आहे. यातून दादोजी कोंडदेवाचा शिवाजीच्या कार्याला विरोध होता किंवा त्याला शिवाजीच्या हालचाली पसंत नव्हत्या असा अर्थ मुळीच नाही. काय करायला हवे, आणि काय अडचणी आहेत, याचे स्पष्ट दिग्दर्शन येथे आहे. ' तारिखे-शिवाजी ' मध्ये शिवाजी आपल्या तरुण सोबत्यांच्या साहाय्याने लुटालूट करीत असे, हे सहन न होऊन दादोजीने विष घेऊन आत्महत्त्या केली, असा कुत्सित मजकूर आहे. चिटणिसाने इतिहासाचे या ठिकाणी वस्तुनिष्ठ दर्शन घडविले आहे. पुढे पृ. ३० वरचा मजकूरही दादोजीच्या सावधगिरीचे दर्शन घडवितो.

**शके १५६३ यांत आरंभ करिते जाले...तों वय १४-१५**-मावळांत मोराजवळील रोहिडखोरे व वळवंडखोरे येथे शिवाजीने स्वतःभोवती काही तरुण जमवून वयाच्या १४-१५ वर्षांच्या सुमारास कार्याला सुरुवात केली. विजापूरच्या शहाने कान्होजी जेधे यास लिहिलेले फर्मान उपलब्ध झाले आहे ( ऐति. फारसी साहित्य

खं. १. पृ. ५० ). हे फर्मान १ ऑगस्ट १६४४ चे आहे. त्यामध्ये दुष्ट दादोजी आणि त्या हरामखोराचे साथीदार यांनी कोंडाण्यांचे बाजूस जी धामधूम चालविली आहे, त्याच्या बंदोबस्तास खंडोजी व बाजी घोरपडे यांस पाठविण्यात आल्याचे लिहिले आहे. या फर्मानावरून शिवाजीच्या कार्यात दादोजीचे अंग होते, आणि इ. स. १६४४ पूर्वीच शिवाजीने स्वराज्य स्थापनार्थ हालचालीस प्रारंभ केला होता, हें लक्षात येते. रोहिडेश्वराच्या डोंगरावर हजार–बाराशे मावळे जमवून शिवाजीने शके १५६७ च्या चैत्र मासात हिंदवी स्वराज्यस्थापनेची शपथ रोहिडेश्वरासमोर घेतली. त्यावेळी शिवाजीचा तरुण साथीदार दादाजी नरसप्रभु याच्या वडिलांस विजापूरच्या वजिराने संतापून लिहिलेले असेच आणखी एक पत्र उपलब्ध आहे. ( शिपसासं खं. १ पृ. १०८ ). आपला मुलगा शिवाजीच्या नादी लागून राजद्रोहाचे भयंकर कृत्य करतो आहे, या कल्पनेने घाबरलेल्या पित्याने अकांडतांडव केले, त्यावेळी दादाजीस पत्र लिहून शिवाजीने धीर दिला. ‘श्री रोहिडेश्वर तुमचे खोरियातील आदि कुलदेव. तुमचा डोंगरमाथां पठारावार शेयाद्रिलगत स्वयंभू आहे. त्याणीं आम्हांस यश दिलें व पुढें तो सर्व मनोरथ हिंदवी स्वराज्य करून पुरविणार आहे. हें राज्य व्हावें हें श्रीचे मनांत फार आहे. याप्रमाणें बाबाचे मनाची खात्री करून तुम्ही येणें’ ( शिपसासं खं. १ पृ. १०९ ). दादोजी कोंडदेवाला हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेबद्दल मोठे कुतूहल होते, आणि तो स्वतः दादाजी व नरसप्रभूस भेटून त्यांचे समाधान करायला गेला होता ( बाशि २३ ). त्यावरून शिवाजी व दादोजी हिंदवी स्वराज्याच्या एकाच भावनेने प्रेरित झाले होते, हे लक्षात येईल.

राजवाड्यांच्या पंधराव्या खंडाच्या प्रसिद्धीनंतर प्रा. लिमये यांनी फर्ग्युसन कॉलेज मॅगॅझिन फेब्रु. १९१९ मध्ये पत्र लिहून १५ व्या खंडातील पत्रावरून स्वराज्य प्रस्थापनेच्या कार्यात दादोजी व शाहाजी याचे अंतस्थ साहाय्य असल्याचे स्पष्ट होते, असे दाखविले आहे. ही पत्रे भाषेच्या दृष्टीने विश्वसनीय नसली तरी त्यातला मतलब खरा असेल, असे राजवाडे यांचे म्हणणे होते ( शिभा पृ. १३० ). ग्रँट डफने मात्र चिटणीसाचेच मत उचलून धरले आहे आणि यदुनाथ सरकारही चिटणीसाच्या मतालाच दुजोरा देतात ( सशि पृ. ३१ ).

**पासलकर, कंक, मालुसरे**—बाजी पासलकर, येसाजी कंक व तानाजी मालुसरे. यांतील बाजी पासलकर हा मुसे खोऱ्याचा देशमुख होता, असे डफ सांगतो. मालुसरे हा मराठा नसून राज किंवा महादेव कोळी जातीचा असावा. तो महाबळेश्वरजवळच्या गोडवली गावचा होता. रामोशी आणि कोळी यांच्यावरती देखरेख ठेवण्याचे त्याचे काम होते ( ग्रँड पृ. १०३ तळटीप ). सभासद त्याचे आडनाव ‘मालसुरा’ असे देतो. पण राखं २० पृ. ४२९ मध्ये तानाजी मालुश्रा हा गोडवलीचा पाटील असल्याचे लिहिले आहे.

**भेद करून किल्ला घेतला**—भेद करून किल्ला घेतला तो कोंढाण्याचा,

आणि तेही दादोजी कोडदेवाच्या मृत्यूनंतर ५–७ महिन्यांनी असे जेधे करिण्यावरून लक्षात येते ( शिचप्र पृ. २१ ). डफनेही असेच म्हटले आहे.

## पृ. ३०

**दुरजा देवींचा डोंगर**––रोहिड खोऱ्याच्या तोंडावर असलेला डोंगर.

**राजधानीस योग्य करून**––राजगड किल्ल्यावर इ. स. १६४५ मध्ये राजधानी स्थापिली. १६६९ पर्यंत राजधानी याच ठिकाणी होती. राजगड घेतल्यानंतर शिवाजी महाराजांनी तोरणा १६४६ मध्ये घेतला. ' प्रतिपच्चंद्ररेखेव ' या नावाचा शिक्का १६४५ मध्ये शिवाजीने केलेला आढळतो ( शिनि पृ. ११४–११५ ). तोरणा किल्ला घेतल्याचे सभासद सांगत नाही. फारशी बखरींवरून शिवाजीने चंदन किल्ला अगोदर हस्तगत केला ( सशि पृ. १०४ ).

**हें वर्त्तमान पादशहास कळलियावरि**––राजगड किल्ल्यासंबंधीची हकीकत शिरवळच्या ठाणेदाराने बादशाहास कळविली. पादशाहाने शहाजीस जाब विचारला, परंतु सामोपचाराने हे प्रकरण त्या वेळीं मिटविण्यात आले हे राखं १५ ले. २६६–६९ या पत्रांवरून लक्षात येते. खाफीखानाच्या आधारे दरबारातील सरदारांना लाच देऊन हे प्रकरण तात्पुरते मिटविण्यात आले, असे सरकार सांगतात ( सशि पृ. ३५ ).

**दादोजी मृत्यु**––७ मार्च १६४७ मध्ये.

## पृ. ३१

**फिरंगोजी नरसाळा वगैरे**–– मृत्यूनंतर पुणे महालाची ४० हजारांची शहाजीची जहागीर होती–त्या जहागीरीची व्यवस्था शहाजीने दादोजी कोंडदेव, शिवाजी, मंबाजी भोसले व संभाजी मोहिते यांजकडे सोपविली होती. राखं ले. २०९३ मध्ये असे सांगितले आहे की, पुणे परगावच्या ७ तर्फा करून त्यांपैकी शिवाजीकडे कर्यात मावळ ३६ गावे, मंबाजी राजे भोसले ( शहाजीचा चुलतभाऊ ) यांजकडे सांडस खुर्द २० गावे, आणि बाकीच्या २३२ गावांचा म्हणजे ५ तर्फांचा अधिकार दादोजी कोंडदेवकडे होता. शिवाय आदिलशाही बादशाहातर्फे तो कोंडाण्याचा सुभेदारही होता ( राखं १. ले ४३२, ४५७ ). शहाजीच्या सर्व परगाण्यांचा वरिष्ठ अधिकारीही तोच होता. त्याच्या मृत्यूनंतर म्हणूनच त्याचा ज्या ज्या मुलखावर अधिकार होता, तो तो मुलूख शिवाजीने हस्तगत करावयास सुरुवात केली. फिरंगोजी नरसाळ्यासारखा किल्लेदार आपण होऊन त्याच्याकडे आला, तर बाजी मोहिते सरळपणाने यावयास तयार झाला नाही, म्हणून त्यास धरून आणून त्याचा बंदोबस्त केला. शिद्दी बिलोल हा शहाजीच्या निजामशाही दरबारातील जुना पाग्या. सन १६२८ मध्ये शहाजीने त्यास लोहगडची हवालदारी सांगितली. त्याने

शिवाजीचा नोकर होण्याचे नाकारले, म्हणून त्याला शहाजीकडे पाठवून दिले.

**चाकण सुपे**—१६४९ मध्ये शिवाजीच्या ताब्यात आले ( शिपसासं क्र. ५५१ व ५५६ ).

**सामराजपंत रांझेकर**—याचे आडनाव रोझेकर असे समजून तो दौलताबादच्या रोझे गावच्या वेरूळकर भोसल्याच्या परिचयातला कुलकर्णी वगैरे माहिती दिली जाते ( शिसु पृ. २०० ). परंतु त्याचे आडनाव रांजेकर असून मावळातील खेडेबारे किंवा रांजे गावचा तो असावा. हा अगोदर सबनीस होता. नंतर स. १६४६ मध्ये पेशवा झाला. १६६२ मध्ये त्याच्या नाकर्तेपणामुळे व वतनलोभामुळे शिवाजीने याच्या जागी मोरोपंत पिंगळ्यांची योजना केली.

**वगैरे प्रभुलोक यांस**—कायस्थास उद्देशून प्रभु हा शब्द वापरतात. देशावर आणि कोकणावर ११ व्या शतकापासून प्रांतोप्रांतीचे देशमुख-देशपांडे म्हणून त्यांना वतने मिळालेली दिसतात. कारकुनी व हिशेबाची कामे ते वंशपरंपरागत करीत आले आहेत.

## पृ. ३२

**बांदल देशमुख...मारले**—ही घटना काहीशी पुढची आहे. याच लढाईत देशमुखाचा दिवाण बाजी प्रभु देशपांडे शिवाजीस मिळाला ( बाशि पृ. ३९ ).

**घाटगे निंबाळकर**—हे सर्व जातिवंत मराठे सरदार. स्वराज्यस्थापनेसाठी मावळे, प्रभु, ब्राह्मण व मराठे ह्या सर्वांना शिवाजीने जवळ केले.

## पृ. ३३

**विजापूरचे पादशाहींतून ७०० पठाण**—शिवदिग्विजयमध्ये, ' ते पठाण दौलताबादेकडील, दिल्लीहून, बेरोजगार, सर्व देश फिरून ' आश्रयास आल्याचे लिहिले आहे ( शिदि पृ. १२३–१२८ ).

**गोमाजी नाईक पानसंबळ**—एक्क्याणव कलमी बखर कलम नऊमध्येही जिजाबाईचे लग्नसमयी जाधवरावांनी पानसंबळ यास सेवेसाठी दिल्याचा उल्लेख आहे. शिवाजीचा तो विश्वासू अंगरक्षक व देवडीवरचा पाहारेकरी होता. पुरंदरे दप्तरावरून ( भा. ३ पृ. १४० ) व शिपसासंमधील उल्लेखावरून शिवाजीने या आपल्या खाजगी व विश्वासू सेवकास शिवापट्टणाखाली काही हक्क दिले होते असे दिसते.

**तळा घोसाळा**—वगैरे किल्ले १५५८ मध्ये घेतले. बिरवाडीचा किल्ला इ. स. १६४८ मध्ये बांधला असे शिसु पृ. ८१ वर लिहिले आहे, परंतु तो १६५८ मध्ये बांधला.

**भवानी तरवार**—या हकीकतीस आधार नाही. अफझलखानप्रसंगी खुद्द

*भवानी देवी शिवाजीच्या तरवारीत शिरली असा शिवभारतात उल्लेख आहे* ( अ. २०. २२।२३ ).

**बाळाजी प्रभु**— चिटणीस घराण्याच्या सनदापत्रेमध्ये यापेक्षा निराळी हकीकत आहे. बाळाजीप्रभूचे वडील व चुलते आवजीबाबा व खंडोबा यास कैद करून जंजिऱ्याच्या सिद्दीने दर्यात बुडविले व त्यांच्या बाळाजीची आई व दोघे बंधू यास गुलाम म्हणून विकण्यासाठी जहाजावर पाठविले. तेथे लिंगोजी शंकर या त्याच्या मामाने त्यास सोडविले. शिवाजी राजापुरी गेला असता बाळाजीचे मातुश्रीने शिवाजीकडे जाऊन ' सर्व हकीकत सांगोन तिघे चिरंजीव उभे केले आणि मोठ्या स्वरात रडू लागली. ' शिवाजीने तिघांनाही पदरी ठेविले. चिटणीसी वस्त्रे शके १५७१ मध्ये दिली. असा तेथे मजकूर आहे. ही सनदापत्रे ' अस्सल ' नव्हेत.

## पृ. ३४

**रायगडचे राजकारण**...शके १५६८. शिवाजीने प्रथम जंजिऱ्याचे सिद्दीपासून स. १६४६त रायगड घेतला असे शिस्. पृ. ८७ वर वर्णन आहे, ते या बखरीतील शकनिर्देशाधारेच असावे. या घटनेला ऐतिहासिक आधार नाही. मे १६५६ मध्ये रायगड शिवाजीच्या हाती आला ( शिचप्र पृ. ५५ ).

**कल्याणावर स्वारी**–२४ आक्टोबर १६५७ मुल्ला अहमद नायता हा यावेळी सुभेदार होता. मुल्ला यहिया हे त्याच्या भावाचे नाव. मुलाणा हयाती हे त्याचे बखरीमधले अपभ्रष्ट रूप ( सशि पृ. ५६ ).

**आबाजी सोनदेव**–सोनोपंत डबीर यांचे कनिष्ठ चिरंजीव. १६५७ मध्ये कल्याण जिंकले. त्याचवेळी सुभेदार म्हणून नेमणूक.

**मोरोपंत पिंगळे** – यांचे वडील शहाजीपाशी होते. तेथून १६५३ च्या सुमारास मोरोपंत शिवाजीस येऊन मिळाले. अफजलखान प्रकरणात मोरोपंतांनी सैन्य लुटण्याचें महत्त्वाचे काम केले. मुजुमदार म्हणून २ जानेवारी १६६० व पेशवे म्हणून ३ एप्रिल १६६२ रोजी नेमणूक. १६५९ साली सामराजपंत रांझेकरास जंजिऱ्याच्या सिद्दीवर पाठविले असता सिद्दी खैर्यत नावाच्या सरदाराने विश्वास दाखवून पंतांस किल्ल्यात बोलाविले व कैद केले. ' जंजिऱ्यावर आपण पुन्हा कधीही स्वारी करणार नाही. ' असे आश्वासन देऊन पंतानी स्वतःची सुटका करून घेतली. शिवाजीस ही गोष्ट आवडली नाही. म्हणून त्याने त्यांची पेशवाई काढून मोरोपंतांस दिली.

**निळो सोनदेव** - सोनोपंत डबीर यांचे ज्येष्ठ चिरंजीव. बाळकृष्णपंत हणमंते यांच्या मृत्यूमुळे यांस मजुमदारी शके १५८४ चैत्र व॥ १० गुरुवारी ( ३ एप्रिल १६६२ ) मिळाली ( जेश. शिचप्र पृ. २२ ).

**अंणाजी दत्तो** - २१ ऑ. १६६१ रोजी याला वाकनीस केले होते. सुरनिसी १६ ऑगस्ट १६६२ रोजी दिली.

**माणकोजी दाहातोंडे** - शहाजीने बंगलुराहून शिवाजीबरोबर यास पाठविले होते. शिवाजीने स्वराज्यस्थापनेच्या कार्यास सुरुवात केली, त्यावेळी यास पागेची सरनोवती दिली. दादोजीच्या मृत्यूनंतर सिद्दी बिलोलास लोहगडावरून दूर करून शिवाजीने माणकोजीची तेथे योजना केली.

**नेताजी पालकर** - अफजलवधाच्या वेळी मोरोपंत पिंगळयांच्या बरोबरच आदिलशाही सैन्याची लांडगेतोड करण्यात हा अग्रेसर होता. १६५९ मध्ये शिवाजीने याला सरनोबत केले.

**राघो बल्लाळ** - राघो बल्लाळ यास १६४९ मध्ये आपला पहिला चिटणीस नेमले, असा उल्लेख एक्याण्णव कलमी बखरीत ( क. ४७-४८ ) आहे. १६५९-६० मध्ये त्याने विजापूरकराकडून दाभोळ जिंकले व शिवाजीने त्यास तेथील सुभेदार नेमिले ( भाइसं इतिवृत्त १८३५ पृ. ३२३ ). त्याचे आडनाव अत्रे ( पुरंदरे दप्तर भाग ३. पृ. १३० ).

**अण्णाजी दत्तो व माल सावंत**--तळकोकणात कुडाळचे सावंत, शृंगारपूरचे सुर्वे इत्यादी पाळेगार पुंडपणा करून होते. त्यांच्या बंदोबस्तासाठी १६५८ मध्ये रणदुल्लाखानाचा मुलगा रुस्तुमजमा यास विजापूरकरांनी पाठविले. कुडाळच्या लखम सावंताचा बंदोबस्त करण्याच्या हेतूनेच तो आला होता. लखम सावंत व रुस्तुमजमा यांची लढाई होऊन रुस्तुमने सावंताकडून रांगणा किल्ला परत घेतला. यावेळी शिवाजी महाराज कोकणात आले होते. सावंताने विजापूरकरांची मदत घेऊन शिवाजीला कोकणातून हाकलून लावण्याची महत्त्वाकांक्षा बोलून दाखविली म्हणून विजापूरकरांनी खवासखान नामक सरदाराबरोबर १० हजार सैन्य सावंताच्या मदतीला पाठविले. महाराजांनी वाटेत गाठून त्याचा पराभव केला. सावंताने ५ मार्च १६५९ मध्ये तह करून आज्ञा होईल तेव्हा तीन हजार लोकांनिशी चाकरीस येण्याचे मान्य केले (सावंतवाडी संस्थानचा इतिहास पृ. ९). येथील माल सावंत हा लखम सावंत किंवा त्याचा कोणी नातेवाईक होय.

अफजलखानाच्या वधानंतर अगदी अल्पावधीतच शिवाजीने पन्हाळा घेतला असे शिवभारतात वर्णन आहे. अण्णाजी दत्तो व लखम सावंत यांनीच हा किल्ला जिंकला असावा. सभासद 'अण्णाजी दत्तो सुरनीस यांनीं माल सावंत, मावळे यांचा हजारी यास सांगून हल्ला करून पन्हाळा किल्ला आदिलशाही होता तो घेतला व सातारा, चंदन, वंदन, नांदगिरी, परळी असे किल्ले घेतले ' असे लिहितो. ही घटना तो १६६१-६२ च्या दरम्यान वर्णितो हे लक्षात घेण्यासारखे आहे. चिटणीसाला कालाचे कसलेच भान नाही.

**रावजी सोमनाथ**—कुडाळ व राजापूरच्या सुभ्याची व्यवस्था याजकडे सोपविण्यात आली.

## पृ. ३५

**शृंगारपुरचे सुरवे**—रुस्तुमजमा निष्प्रभ ठरलेला पाहून आदिलशहाने शिवाजीचा पाडाव करण्याची कामगिरी शृंगारपुरचे सुरवे याजवर सोपविली. गर्वाने फुगून जाऊन मध्यरात्रीच्या वेळीं संगमेश्वर येथील शिवाजीच्या तुकडीस त्याने वेढा दिला. तानाजी मालुसऱ्यांनी मोठा पराक्रम करून त्याचा मोडा केला. ही घटना १६६१ मध्ये घडली ( राखं २१ पृ. ५ व जेधे शकावली ). सभासदाने ही हकीकत जावळीच्या हकीकतीस जोडून लिहिल्यामुळे चिटणिसाने आणखी घोटाळा करून ठेविला आहे.

**पिलाजी व तानाजी शिर्के**—शृंगारपुरच्या सुर्व्यांचे कारभारी. संभाजीची पत्नी येसूबाई ही पिलाजी शिर्क्यांची कन्या.

## पृ. ३६

**बाजी सामराज**—इ. स. १६५१।५२ च्या सुमारास मोऱ्यांच्या मुलखात पारघाटी येथे दबा धरून शिवाजी कोकणातून परत येत असता, त्याजवर हल्ला करण्याचा प्रयत्न बाजी सामराजने केला, परंतु शिवाजीला या गोष्टीची अगोदरच कल्पना आल्यामुळे त्याने अचानक बाजीवर चढाई केली आणि त्याच्या सैन्याची भयंकर खराबी करून त्यास पळवून लाविले. ही हकीकत मराठी बखरींच्या आधारे डफही देतो ( पृ. ११४–११५ ).

**तुमचा बेटा आफरी होऊन बेकैदी करतो**—या प्रकरणाची बखरीतील हकीकत एकांगी आहे. शके १५६८ च्या सुमारास शहाजीवर देखरेख करण्यासाठी मुस्ताफाखान नावाच्या सरदाराची योजना विजापूरचा बादशाहा महमदशहाने केली होती. शहाजीचे कर्नाटकातील पुंड–पाळेगारांशी आतून संधान आहे, अशी शंका महमदशहास येत होती. विजयनगरचा श्रीरंगशायी व बेदनूरचा शिवापा नायक यांजवर मुस्ताफाखानाने स्वारी केली. येलूर येथे निकराचे युद्ध झाले. या लढाईत शहाजीने अंगचोरपणा केला म्हणून आपला पराभव झाला असे मुस्ताफाखानास वाटले. या लढाईमुळे शहाजी व मुस्ताफाखान यांमध्ये वैमनस्य आले. शहाजी मुस्ताफाखानास जुमानीसा झाला आणि इकडे शिवाजीनेही चाकणपासून शिरवळपर्यंतचा मुलूख काबीज केला, किल्लेकोट घेतले. बापलेकांनी संगनमत करून आदिलशाही दडपण झुगारून देण्याचा इरादा खास धरिला, असे महमदशहास वाटले ( रामविचं ६८ ) व त्यामुळे त्याने असे पत्र लिहिले. शिवभारत व फारशी बखरींवरून कर्नाटकातील गुंतागुंतीमुळे शहाजीस अटक झाली, त्यात

शिवाजीच्या मानगडींचा विशेष संबंध नव्हता, असे द. वि. आपटे यांस वाटते ( शिभा पृ. १३६ ).

## पृ. ३७

**दाखवावयाजोगीं पत्रें तींच पाठवून**---या मजकुरावरून बापलेकाचे आंतून सख्य होते, असेच बखरकाराला निश्चितपणे सांगावयाचे आहे.

**भोजनास बोलावून**---तंजावरचा शिलालेख, शिवभारत व इतर मुसलमान इतिहासकारांच्या वर्णनावरून पुढील सालच्या मोहिमेची चर्चा करण्यासाठी मुस्ताफाने शहाजीस बोलविले, आणि शहाजी आला असता रात्री त्याच्या तंबूस वेढा दिला. जागा होऊन शहाजी घोड्यावर बसून पळणार तो बाजी घोरपड्याने त्याचे पाय धरून गिरफदार केले ( शिभा १३६, रामाविचं ८६-८७ ). शके १५७० च्या श्रावण वद्य प्रतिपदेस शहाजीस कैद केले.

**औरंगजेब यांस त्यांची बहीण**---इ. स. १६५७ मध्ये औरंगजेब विजापूरकरावर स्वारी करण्यात गुंतला असता औरंगजेबाची बहीण रोशनआरा बेगम हिने शहानजहान आजारी असल्याचे कळविले. शहानजहानजवळ आगऱ्यास त्याचा मोठा मुलगा दारा शुको होता. दारा शुको शहाजहाननंतर बादशाहा व्हावा, म्हणून जहानआरा बेगम ही त्याची बहीण प्रयत्न करीत होती, त्यावेळीं मत्सराने दुसरी बहीण रोशनआरा हिने औरंगजेबास पत्र पाठविले. सुजा यावेळीं बंगालचा सुभेदार होता तर मुराद गुजरातेत होता. तोही दिल्लीकडे निघाला. औरंगजेबाने मुरादबक्षला गादीवर बसविण्याचे आश्वासन देऊन दोघांनी मिळून दाराचा पराभव केला. औरंगजेबाने शहाजहानला व मुरादला तुरुंगात टाकले, दाराला ठार मारले. ही बातमी ऐकून शुजा आराकानला पळून गेला. तेथे त्याचा खून झाला. औरंगजेब इ. स. १६५८ मध्ये बादशाहा झाला.

## पृ. ३८

**हें एक जालेवांचून येणें घडत नाहीं**---औरंगजेब दिल्लीस १६५७ साली गेला आणि शहाजीस १६४८ मध्ये कैद करण्यात आले होते, त्यावरून या हकीकतीतील विसंगती लक्षात येईल.

**चार...औरंगजेब याचे भाऊ**---तीनच होते. ‘ चार अमीर औरंगजेब यांसह भाऊ होते ’ असा पाठ हवा.

**त्याची स्त्री**---रायबागीण ही उदाराम माहूरकराची सून होती.

## पृ. ३९

**अशी फारच रदबदली करून वाचविले** --- या हकीकतीतील शहाजीस भिंतीत चिणल्याची हकीकत काल्पनिक आहे. अहमदखान नावाच्या एका

सरदाराच्या घरी त्यास साध्या कैदेत ( जिंदाने इब्रत ) ठेवण्यात आले होते, व अहमदखानातर्फे शहाजीने संभाजी व शिवाजी यांचा बंदोबस्त करावा असे बोलणे लावले होते, असे अहमदनाम्यात वर्णन आहे. शहाजीस अटक केल्यावर विजापूरच्या बादशाहाने बंगळुरास शहाजीचा मोठा मुलगा संभाजीवर फरादखान व इकडे शिवाजीवर फत्तेखान नावाच्या सरदारास पाठविले. शिवाजी व संभाजी या दोघांनीही पराक्रमाने या दोन्ही सरदारांचा पराभव केला. शिवाजीने यावेळी मोगलांचा सुभेदार शाहाजादा मुरादबक्ष यांजकडे संधान बांधून शहाजीची सुटका करण्याचा प्रयत्न झाल्याची हकीकतही उपलब्ध आहे ( राखं ८·२·३; सशि पृ. ३७ ). ' पुत्र स्वाधीन नाही... पाहिजे तसे करावे ' ही बखरीतील माहिती बरोबर आहे, कारण बादशाहाने ज्या तीन अटी शहाजीला घातल्या त्यांतील शिवाजी-बद्दलची दुसरी अट त्याने मान्य केली नाही. ' शिवाजी माझ्या कह्यात नाही व तो माझे ऐकेल न ऐकेल याची खात्री देता येत नाही. ' असेच शहाजीने सांगितले. ( रामविचं पृ. ८९ ). शेवटी पुत्रजन्माच्या आनंदाप्रीत्यर्थ कोंडाणा किल्ला व बंगरूळ शहर बादशाहास देण्याच्या अटीवर शके १५६१ च्या ज्येष्ठी पौर्णिमेस शहाजीची सुटका झाली व मोठ्या सन्मानपूर्वक बादशाहाने त्याची कर्नाटकात रवानगी केली. बखरीतील मुरारपंताचा उल्लेख अगदीच चुकीचा आहे, कारण यापूर्वीच चार वर्षे अगोदर मुरारपंत मारला गेला होता. रणदुल्लाखान शहाजीचा मित्र होता, तेव्हा त्याचा उल्लेख ठीक आहे.

**सुलतान शिकंदर पादशाहा**—हा उल्लेख महमदशाहाबद्दल आहे. महमद-शाहा सन १६४६ मध्ये अतिशय आजारी पडला, आणि तो १६५६ मध्ये वारला. यावेळी त्याचा मुलगा ८ वर्षांचा असल्याने त्याची आई बेगम बडीसाहेबीण हिने राज्यकारभार पाहावयास सुरुवात केली. मात्र मुरारपंतास कैद करून त्याला मारण्याशी तिचा अगदी काही संबंध नाही. रणदुल्लाखानाच्या साहाय्याने महमदशाहाने इ. स. १६३५ मध्येच मुरारपंतांस ठार मारले होते.

**स्त्रीनायकी बाळनायकी**-*अबला यत्र प्रबला बालो राजा निरक्षरो मंत्री ।*
*न ही न हीं तत्र धनाशा जीवित आशापि*
*दुर्लभा भवति ॥*

या संस्कृत श्लोकातील आशय बखरकाराने फार थोडक्या शब्दांत व्यक्त केला आहे.

## पृ. ४०

**तानाजी मालुसरे... सिंहगड**—ही लढाई तर ४ फेब्रु. १६७० ची. बखर-काराच्या वर्णनात तानाजीच्या मृत्यूचा उल्लेख नाही.

**नगर... पुरा मारिला**—जून १६५७.

**नीळकंठ हैबतराव सरनाईक**—याचे नाव महादाजी नीळकंठराव. 'नीळकंठ राव' व 'हैबतराव' या दोन्ही पदव्या व सरनाईक हा त्याचा हुद्दा. १६५४च्या मे महिन्यात त्याला मृत्यू आला ( शिचसा १·८८; ३·३९९ ). निळाजी, पिलाजी व संक्राजी या त्याच्या तीन मुलांमधील भांडणांचा शिवाजीने फायदा घेऊन किल्ला काबीज केल्याचे सभासदही सांगतो.

**नारायणाचे देवालय**—पुरंदराच्या पायथ्याशीच आहे.

## पृ, ४१

**कल्याणच्या सुभेदाराची सून**—शिवदिग्विजय व एक्या. कलमी बखरींतही ही हकीकत आहे. खाफीखानासारखा सनातनी इतिहासकारही ही घटना सांगून शिवाजीच्या नीतिमत्तेची तारीफ करतो ( सशि पृ. ५६ ). जेधे शकावली, शिवभारत किंवा अस्सल ऐतिहासिक कागदपत्रांतून या रम्याद्‌भुत घटनेचा निर्देश नाही, त्यामुळे ही हकीकत काल्पनिक ठरते. तत्कालीन परकीय इतिहासकारांनी ही घटना शाइस्तेखानाच्या मुलीच्या बाबतीत घडली, असे म्हटले आहे ( वाशि पृ. ४१ ). शिवाजीने तिचे लग्न करून दिले असा उल्लेख शिवदिग्विजयात आहे. शेडगावकर बखरीत वाईजवळच्या गोळेवाडीच्या गोळे यांची सून शिवाजीला सापडल्याचे लिहिले आहे ( पृ. २२-२३ ).

## पृ. ४२

**मोरो त्रिमळ...नासिक प्रांतीं**— २ नोव्हे. १६७० ला मोरोपंतांनी त्र्यंबकगड घेतला व पुन्हा १६७२ मध्ये नासिक जिल्हा लुटून ताब्यात आणला.

**शरीरसमंध जाधवराव मोहिते व गायकवाड** —- जाधवरावांची काशीबाई हिच्याशी ८ एप्रिल १६५७ रोजी; मोहित्यांची पुतळाबाई हिच्याशी १६५३ मध्ये; गायकवाडांची सकवारबाई हिच्याशी १६५७ मध्ये. यांतील पहिल्या व तिसऱ्या विवाहांची मिती जेधे शकावलीत मिळते, ती विश्वसनीय आहे. दुसऱ्या विवाहाची मिती शेडगावकर बखरीतील असल्यामुळे चिंत्य आहे.

**जावळी प्रकरण** —-यासंबंधाने परस्पर विरुद्ध अशा अनेक प्रकारच्या हकिकती उपलब्ध आहेत. मोऱ्यांचा कपटाने वध केला, ही हकीकत प्रथम सभासदाने दिली आणि मग चित्रगुप्त, चिटणीस व शिवदिग्विजयकाराने स्वतःच्या मगदुराप्रमाणे अधिकाधिक मीठमसाला लावून ही हकीकत वेडीवाकडी करून टाकली. त्यामुळे डफ व सरकारसारख्या इतिहासकारांना शिवाजीच्या राजनीतीबद्दल तारे तोडण्यास संधी मिळाली. मोरे यांची बखर, शिवभारत, जेधे करिणा व शकावली व शिवापूर यादी इ. ऐतिहासिक साधनांवरून ही हकीकत थोडक्यात अशी: जावळीचा प्रमुख दौलतराव मोरे हा निपुत्रिक मरण पावला. त्याच्या पत्नीने शिवाजीच्या मदतीने

'यशवंतराव' नावाचा नात्यातील मुलगा ( बहुधा तो तिच्या दिराच्याच मुलगा असावा ) दत्तक घेतला. या यशवंतरावाची 'चंद्रराव' ही पदवी होती असे मानावे लागते. त्याचा कारभारी त्याचा भाऊ हणमंतराव हा होता. अफजलखान वाईचा सुभेदार असताना त्याने जावळी जिंकण्याचा प्रयत्न केला, परंतु शिवाजीने चंद्ररावास मदत केल्यामुळे अफजलखानाचा नाइलाज झाला. खान १६५४ मध्ये बदली झाल्याने निघून गेला. त्यामुळे चंद्ररावाने पुंडाई करण्यास प्रारंभ केला. त्यामुळे शिवाजीने रघुनाथ बल्लाळास त्याच्यावर पाठविले. त्याने जोर येथे हणमंतरावाचा पाडाव केला. शिवाजीने मागून चंद्ररावावर स्वारी केली, तेव्हा तो रायरी किल्ल्यावर गेला. तेथून सामोपचाराचे बोलणे लावून शिवाजीने मुलासह त्याला ताब्यात घेतला व त्याच्या हातून अक्षम्य गुन्हा घडल्यामुळे मुलांसह त्यास ठार मारिले. 'शके १५७७ मध्ये जावळी फत्ते केली' ही हकीकत शकावलीवरून बरोबर ठरते. चंद्ररावाचा वध मात्र शके १५७८ मध्ये झाला.

## पृ. ४३

**वासोटा**—६ जून १६६० रोजी घेतला. **प्रतापगड**—१६५६ मध्ये जावळी हस्तगत केल्यानंतर तिच्या पश्चिमेस २ मैलांवर हा किल्ला बांधला. **जुनर मारून अंमल**—मे १६५७ मध्ये. **चाकणचा किल्ला**—फिरंगोजी नरसाळ्याच्या ताब्यात असल्याचे मागेच लिहिले आहे. या ठिकाणी त्याचा उल्लेख नको होता. शाइस्तेखानाने १६६० मध्ये हा किल्ला हस्तगत केला. तो पुढे १६७० ला शिवाजीने हस्तगत केला.

**संभाजी लग्न**—मिती बरोबर आहे. 'गुरुवारी घटिका दाहा' एवढी माहिती शकावलीत अधिक आहे. संभाजी हे सईबाईचे चौथे अपत्य. यापूर्वी सकवारबाई, राणुबाई, अम्माणिका किंवा अंबिकाबाई अशा तीन मुली. संभाजी-जन्मानंतर दोन वर्षांनी ५ सप्टें. १६५९ रोजी सईबाईला मृत्यू आला.

**पृथ्वीचे ठायी धर्माची ग्लानी**—हा व यापुढचा मजकूर विष्णुपुराण व महिपतीच्या भक्तिविजय व भीमस्वामींच्या भक्तलीलामृतातून दिलेला आहे.

**त्यांस बुद्धि म्लेंछाचा उच्छेद आणि धर्म स्थापावा**—दादाजी नरसी प्रभूस लिहिलेल्या पत्रात हा स्पष्ट उल्लेख आला आहे, हे मागे दाखविलेच आहे. शिवाजी महाराजांची वृत्ती धार्मिक होती, हे दाखविणारी चाकणच्या सिद्धेश्वरभट ब्रह्मे यास दिलेली सनद प्रसिद्ध आहे ( सनदापत्रे पृ. ११३ ).

## पृ. ४४

**सज्जनसेवन**— येथील संतांची नावे बखरकाराने महिपतीच्या भक्तिविजय ( इ. स. १७६२ ) मधून घेतल्या आहेत. 'आधील मागील कोणते संत । हें तरी

मी नेणेंचि सत्य ’ अशी महिपती स्वतः कबुली देतो. बखरकाराने ह्या सर्व संतांचा शिवचरित्राशी संबंध आहे की नाही याचा विचार न करता आपल्या चरित्रात महिपतीइतक्याच भाबडेपणाने अंतर्भूत केल्या आहेत. **चिंचवडचे ठायी मोरया देव** - यांची हकीकत भक्तिविजय अ. ५० मध्ये आहे. हे पुरंदर तालुक्यातील मोंगवलीचे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, आडनाव शालिग्राम. मोरगावी तप केल्यामुळे गणपती प्रसन्न होऊन त्यांच्या शरीरी प्रविष्ट झाला. त्यामुळें त्याना प्रत्यक्ष गणपति म्हणजे ‘ देव ’ अशी संज्ञा प्राप्त झाली. ते पुढे चिंचवडास राहू लागले.

**निगडी येथें रंगनाथस्वामी** – ( शके १५३४–१६०६ ) हे रामदास-पंचकातील म्हणजे रामदासांच्या समकालीन असे प्रसिद्ध साधू होते. रंगनाथस्वामी एखाद्या सरदारासारखा ऐटबाज पोषाख करून रंगेलपणाने राहात. त्यामुळे त्यांच्या साधुत्वाबद्दल शिवाजी महाराजांना संशय आला म्हणून स्वामींनी रेडा मारून शिजवला व त्यास पुन्हा जिवंत करून महाराजांचा संशय दूर केला, अशी कथा हनुमंतस्वामींच्या रामदासचरित्रातही आहे. दोघेही आनंद म्हणजे दत्तात्रय सांप्रदायी होते.

**औरंगाबादेस वामन**—हा उल्लेख वामनपंडिताचा आहे. कीर्तनेप्रतीमधील ‘ वारणातीरी शिंगाटाचे जोशवामन जाले ’ हा पाठ येथे बरोबर होय. वामन-पंडिताच्या पादुका वारणातीरी शीगाव–कोरेगाव येथे आढळतात.

**निबाजीबुबा**––हे पैठणचे निंबराज किंवा लोलिंबराज होत ( भ. वि. अ. ५१ ). **बोधलेबाबा**–( भ.वि. अ. ५३ ) बालेघाटी धामणगाव येथील पाटील होते. **जयराम**– ( इ. स. १५९९–१६७२ ) जयरामस्वामी वडगावकर. हनुमंत स्वामींच्या रामदासचरित्रात ते रामदासांच्या सांनिध्यात वारंवार असत असा उल्लेख आहे.

**केशवस्वामी भागानगरकर**––( भ. वि. अ. ५४ ) यांचा संबंध दक्षिण-दिग्विजयाच्या वेळी आला. येथे त्यांचा उल्लेख नको.

**परमानंदबाबा पोलादपुरी** ––प्रतापगडावर भवानी देवीची प्रतिष्ठापना केल्या नंतर शिवाजीने यांचेकडे देवीची पूजा सोपविली. शिवभारतकार कवींद्र परमानंद व हे एकाच असावेत असे वाटते.

**पाटस येथे मौनीबाबा**––कर्नाटकच्या स्वारीस जाण्यापूर्वी पाटगावच्या मौनी-बुवांची भेट घेतल्याची हकीकत एक्या. कलमी बखरीत आहे. शिचसा खं. ४ मध्ये मौनीबुवांसंबंधाची काही पत्रे आहेत.

**तुकाराम** ––( शके १५३०–१५७१ ). या संबंधीचा तुकारामगाथेत पृ. ५९४ अभंग उपलब्ध आहे. या ठिकाणी ‘ सिंहगड ’ हे नाव नको. ते १६७० साली तानाजीच्या मृत्यूनंतर पडले. शिवाजी-तुकाराम यांची भेट केव्हा झाली असावी यासंबंधाने मतभेद आहेत. शिवकालीन पत्रव्यवहार क्र. ५५१ वरून ही भेट

१५७१ मध्ये झाली असावी. भेटीच्या वेळी तुकाराम महाराज वृद्ध होते.

‘ घेऊनियां भेटी कोण हा संतोष । आयुष्याचे दिस गेले गेले ।
रोडके हातपाय दिसे अवकळा । काय तो सोहळा दर्शनाचा ॥ ’

हे वर्णन तेच सांगते.

## पृ. ४५–४६

**मारुतीचा अवतार रामउपासक**—हनुमंतस्वामींच्या समर्थचरित्राधारे ही हकीकत सजविली आहे.

**ध्रुवाख्यान**—रामदासस्वामींचे चरित्र अ. ८ मध्ये उल्लेख आहे. मूळ कथा येथे बखरकाराने वाढवून दिली आहे.

## पृ. ४७

**आम्ही तेच...ते भेद नाहीं**—हे पत्र रामदासी पत्रातील बाड क्र. १२४४ मध्ये आहे. ( श्री रामदासी संशोधन खं. २ पृ. ३१८ ), शिवदिग्विजय पृ. ३८२ वर हीच हकीकत थोड्याफार फरकाने लिहिली आहे.

## पृ. ४८

**रामदास स्वामींचे ठायीं निश्चय धरावा** — चिंचवडच्या देवांनी असा आदेश दिला. हीही हकीकत हनुमंतस्वामींच्या चरित्रातीलच आहे. रामदासस्वामींचे महत्त्व वाढविण्यासाठी या चरित्रात अशी हकीकत दिली आहे.

**यांचा वेध पाहून स्वामींनीं पत्र पाठविलें**—समर्थ रामदासस्वामी व शिवाजी महाराजांची भेट केव्हां झाली, याबद्दल संशोधकांत मोठ्या प्रमाणात मतभेद आहेत. ( १ ) ‘समर्थ हे शिवाजीमहाराजांच्या स्वराज्यकल्पनेचे स्फूर्तिदाते व राजकीय गुरू होते. समर्थांचा अनुग्रह महाराजांना शके १५७१ साली झाला.’ समर्थ वाकेनिशीतील १८ व्या टिपणावरून व हनुमंतस्वामींच्या बखरीवरून हे मत रूढ झाले. ( २ ) ‘प्रथम भेट शके १५९४ साली, त्यामुळे समर्थ हे शिवाजीचे मोक्षगुरू होते.’ कै. चांदोरकर यांनी मालेगाव येथील दिवाकरभटांच्या वंशजांचे कागदपत्र प्रसिद्ध केले, त्यावरून हे मत रूढ झाले. बहुतेक सारे इतिहाससंशोधक हे मत उचलून धरताना दिसतात. हे मत फार ताणण्यात अर्थ नाही. कारण शिवाजीने चाफळच्या रामाच्या उत्सवास प्रतिवर्षी दोनशे होन देण्याबद्दलचे अस्सल पत्र शके १६८० चे ( पसासं. ले १०४० ) उपलब्ध आहे. ( ३ ) ‘ही भेट अफजलखानाच्या मृत्यूनंतर लगेच म्हणजे १५८१ साली झाली.’ हे मत चिंतामणराव वैद्य व रे. डेमिंग यांनी समर्थ वाङ्मयातील अंतर्गत पुराव्यावरून तर्काने बनविले आहे. ( ४ ) या मतानुसार ‘शिवाजीमहाराजांना समर्थागमनापूर्वीच स्वराज्यप्राप्तीची

प्रेरणा झाली होती. पुढे लवकरच समर्थांच्या भेटीने ती दृढ झाली. ' या मतानुसारही प्रथम भेट शके १५७१चीच.

चिटणीस बखरीतील समर्थ-तुकारामविषयक वर्णने ही सांप्रदायिकमतानुयायी आहेत, हे सांगावयास नकोच. हनुमंतस्वामी यांच्या नावावर मोडणारी श्रीसमर्थांची बखर हनुमंतस्वामींच्या आज्ञेवरून सांप्रदायिक ग्रंथाधारे मल्हार रामराव चिटणीस यांनीच वाढवून तयार केली आहे. चाफळ संस्थानचे सारे कागदपत्र मल्हाररावांना पाहावयास मिळाले होते. समर्थवाकेनिशी टिपणात, ' वरकड शिवछत्रपतिप्रकरण आलाहिदा लिहिले आहे ' असा उल्लेख आहे. ते प्रकरण अद्याप सापडले नाही. मल्हार रामरावांच्या वर्णनाचा आधार म्हणजेच हे वाकेनिसी प्रकरण असावे.

नरपति हयपति...जळपति---' जळपति हे विशेषण समुद्रकाठी किल्ले बांधून आरमार तयार केल्याने वापरल्यासच अन्वर्थक ठरेल '; म्हणून हे पत्र शके १५७१ चे नाही, असा आक्षेप घेण्यात आला आहे.

## पृ. ५१

प्रधान अष्टका---१५७१ साली ' छत्रपति व अष्टप्रधान ' हे शब्द प्रचलित असणे संभवनीय नाही, असा एक आक्षेप डॉ. बाळकृष्ण यांनी घेतला होता. रामाविचं व राखं १५ यावरून हे शब्द यावेळीही प्रचलित होते, असे राजवाडे यांनी सिद्ध केले आहे. चक्रवर्ती राजांची चिन्हे धारण करणे, स्वतःला छत्रपति म्हणवणे, व सुवर्णसिंहासनावर बसणे या गोष्टी अफजलवधापूर्वीही शिवाजी करीत असे असे शिवभारतातही वर्णन आहे (अ. १८·४५–५७). परंतु प्रतिनिधी, भूषण-पंडित इत्यादी इतर उल्लेखांवरून हा अभंग तुकाराम महाराजांच्या अभंगगाथेत नंतर लिहून घुसडलेला आहे हे स्पष्ट होते.

# प्रकरण तृतीय

## पृ. ५३

अफजलप्रतिज्ञा...अफजल अहंकार—१६५९ च्या सुमारास अफजलखान हा विजापूरच्या दरबारातील अव्वल दर्जाचा मुत्सद्दी गणला जात होता. त्याने कर्नाटकातील अनेक मोहिमांत भाग घेतला होता. १६४९ सालापासून वाई व शिरवळ परगण्याचा सुभेदार या नात्याने शिवाजीच्या हालचालींची त्याला चांगली कल्पना होती. १६५६ मध्ये महमदशहा मरण पावल्यानंतर अली आदिलशहा बादशाहा झाला तरी कारभार त्याच्या आईकडे म्हणजे बुसाहेबीण किंवा बडेसाहेबिणीकडे होता. तिने आततायीपणाने खान महमद, फत्तेखान व बहलोलखान पहिला यांचा दोन वर्षांत वध करविला होता. त्यामुळे दरबारात अफजलखान हाच काय तो प्रबळ सरदार होता. त्याने अहंकाराने ( १ ) शिवाजीचा सहज पाडाव करून ( २ ) हिंदूंची देवस्थाने भ्रष्टवून ( ३ ) जावळी हस्तगत करावी या उद्देशाने ही मोहीम हाती घेतली.

मावळे लोक त्या प्रांतातील माहीतगार—अफजलखानबरोबर घोरपडे, पांढरे, खराटे, कल्याण यादव, मंबाजी भोसले ( शिवाजीचा चुलत चुलता ), अंबाजीराव घाटगे व काटे हे शिवाजीच्या मुलुखाची माहिती असणारे सरदार अफजलखानाबरोबर दिले होते ( भाशिप्र. ९५ ). तसेच कान्हीजी, हैबतराव प्रभृती मावळातील सरदारांना अफजलखानास मिळण्याविषयी आदिलशहाने फर्माने पाठविली होती ( शिपसासं १. पृ. १७१ ).

तुळजापुरीं...पंढरपुरीं...उपद्रव— या वर्णनातील बखरकाराचा इतका सौम्य उल्लेख व संयम पाहून आश्चर्य वाटते. सभासद बखरीत, ‘ श्री भवानी कुलदेवता महाराजांची, तीस फोडून जातियात घालून भरडून पीठ केले. भवानीस फोडताच आकाशवाणी झाली की, अरे अफजलखाना नीचा, आजपासून एकविसावे दिवशी तुझे शीर कापून तुझे लष्कर अवघे संहार करून नवकोटी चामुंडास संतृप्त करते. ’ असा मोठा नाट्यमय प्रसंग पुढे असताही चिटणीसाने या ठिकाणी मोह आवरून अतिशय वास्तव वर्णन केले आहे. शिभा अ. १८.१९; शिपसासं खं. १ पृ. २५७ व ३३२ व राखं २० ले. २१७ वरून चिटणिसाचेच वर्णन विश्वसनीय ठरते.

## पृ. ५४

कळेल तसे रीतीने पादशाही चाकरी...कापटच विचार —‘ या शिवाजीला शस्त्राच्या जोरावर नाहीसा तरी करा किंवा गोड शब्द व सलोख्याची भाषा वापरून तरी

त्याचा जीव घ्या ' असा स्पष्ट हुकूम बादशाहाचा होता. त्यामुळे शिवाजीस भेटीस आणून मारावा, हाच अफजलखानाचा कापट्यविचार ( शिपसासं १. पृ. १८५ ).

**कृष्णाजी भास्कर**—हा वाईचा कुलकर्णी. अफजलखान प्रकरणापूर्वी तो शिवाजीच्या बारा मावळांचा देशाधिकारी होता असा एक उल्लेख आढळतो ( शिपसासं ७५३ ). अफजलखानाकडून आलेला कृष्णाजी भास्कर हा दुसरा कोणी असावा, अशी शेजवलकरांना शंका वाटते. खरे म्हणजे हा रोहिडा किल्ल्यावरील पूर्वीचा हवालदार होता, व शिवाजीने रोहिडा जिंकल्यानंतर वाईस खानाकडे गेला असावा, हेच सयुक्तिक दिसते.

**देवी...आंगीं आयुर्भाव**—सभासद, शिवभारत व अफजलखानवध पोवाडा ( ऐ. पोवाडे पृ. ७ ) यांमध्येही देवीचा अंगी आविर्भाव झाल्याचे वर्णन आहे.

## पृ. ५५

**खानाचें सांगणें**—कृष्णाजीपंताच्या या हकीकतीस शिवभारततही आधार आहे. शिवाजी व महाराज एकमेकाबद्दल साशंक होते आणि म्हणून खानाने अशी गोडीगुलाब्याची भाषा चालविली होती.

## पृ. ५६

**महाराजहीं अवतारी पुरुष...सर्व जाणते**—कपट करून पकडण्यासाठी ज्या अर्थी खान आला आहे, त्या अर्थी नुसत्या तहादिकांच्या बोलण्यापेक्षा शिवाजी आपणास भेटण्यास तयार आहे, ही कल्पनाच खानास अतिशय प्रिय, हे शिवाजीने लगेच जाणले आणि त्यासाठी खानानेच जावळीत यावे, असा जणू काही बालहट्टच त्यांनी धरला, असे शिवभारततही लिहिले आहे.

**धर्मोवर्धति प्रमाण**—शिवभारत अ. १८.२८–३६मध्ये पृथ्वीवर यवनरूपी अधर्म माजला आहे, म्हणून विष्णूने शिवरूप धारण करून धर्माची वाढ करण्याचे ठरविले आहे, असे वर्णन सापडते. चिटणीस आणि शिवभारत यांतील अशा प्रकारची सूक्ष्म साम्यस्थळे पाहून चिटणिसाने शिवभारत पाहिले असावे, असे दिसते.

## पृ. ५७

**पंताजीपंत बोकील**—हा सासवडजवळील हिवरे गावचा कुलकर्णी. अफजलखानवधापूर्वी तो शिवाजीचा चिटणीस होता ( शिपसासं १. पृ. १५७ व सनदापत्रे पृ. ११४ ). १६४७ च्या सुमारास तो पुणे प्रांताचा मुजुमदार होता. पंताजीबरोबर जिजाबाई सोंगट्या खेळत. त्यांना सर्वजण ' काका ' म्हणत व मोठा मान देत. गोड बोलून नोकराचाकरांचे हात ओले करून शत्रुसैन्यात वेदिली करण्यात तो

अतिशय पटाईत होता. म्हणूनच शिवाजीने अफजलखानास जावळीस आणण्यासाठी या वयस्क व जाणत्या वकिलाची योजना केली.

## पृ. ५८

**सदर फार आरास करून**—शिवाजीने एकीकडे अफजलखानाच्या सैनिकांसाठी सर्व तऱ्हेच्या सुखसोयी कशा केल्या व आतून गुप्तपणे सगळीकडे आपले सैनिक कसे पेरिले, याची येथे दिलेली हकीकत बारकाईने युक्त आहे. शिवभारत, अफजलवध पोवाड्यात त्यासंबंधी वर्णने आहेत. डचांनी लिहिलेले यासंबंधीचे पत्रही उपलब्ध आहे ( शिपसासं १. पृ. १८६ ).

**वाईनजीक घाट**—हा पसरणीचा घाट. **रडतोंडीचा**—पसरणीचा घाट चढून पुढे महाबळेश्वरास जाताना जो घाट लागतो, तो चढताना माणसे रडकुंडीला येत, म्हणून तो रडकुंडीचा घाट. तो आक्रमून जावळीच्या मुलुखात उतरले की काय अवस्था होई, याचे शाहीर अज्ञानदासाने आपल्या पोवाड्यात मोठे मार्मिक वर्णन केले आहे. तो म्हणतो : जाऊं जाणें येऊं नेणें। ही गत झाली अब्दुल्याला।
जावळींत उतरुनि। अब्दुल दिशीभुला जाहला॥

**तो सूड याचा घेईन**—शिवाजीचा मोठा भाऊ संभाजी याचा वध अफजलखानाच्या अंतस्थ दुष्टाव्यामुळे कनकगिरीच्या लढाईत शके १६५५ मध्ये झाला. त्याचा सूड घेण्याची मनीषा येथे दिसते.

## पृ. ५९

**रघुनाथ बल्लाळ सबनीस**—हा अत्रे. माहिती मागे आली आहे.

**नेताजी पालकर**—पुरंदर काबीज केल्यावर नेताजीस शिवाजीने तेथला हवालदार केले. १६५९ मध्ये तो सरनोबत झाला. अफजलखानाच्या स्वारीच्या वेळी त्यास मुद्दाम घाटमाथ्यावरून कोकणात बोलाविले. मोरोपंत पिंगळे व नेताजी यांस संकेतानुसार विजापुरी सैन्यावर तुटून पडण्याचा आदेश होता. **रघुनाथ बल्लाळ कोरडे** – हा हेजीब होता ( शिचसा खंड ८ ). **कृष्णाजी, सुभानजी, गोमाजी**—शिवाजीचे खाजगीतील देवडीवरील विश्वासू नोकर. **त्रिंबक भास्कर**– हा ब्राह्मण होता. तो मोरोपंतांच्या हाताखाली सरदार होता. पुढे सिद्दी जोहारने पन्हाळ्यास १६६० साली वेढा दिला, त्यावेळी किल्ला याच्या स्वाधीन करून महाराज रांगण्याकडे निसटले.

## पृ. ६०

**याजवरून खाली सर्व ठेऊन**—शिवाजी महाराजांनी स्वतःला फार भीती वाटते म्हणून वगैरे अनेक सबबी सांगून दोघांनी अगदी निवडक सैनिकांनिशी

एकमेकांना भेटावे, असा करार ठरला. ( शिभा २१. ३-८; ऐतिहासिक पोवाडे पृ. १६, खाफीखान शिचत्रसं ३. पृ. ६४, ६५ ).

## पृ. ६१

**मातुश्रीस व देवास नमस्कार**--जिजाबाई यावेळी राजगडावर असल्याचे सभासद व शिवभारतकार सांगतात. पोवाडा व एक्या. कलमी बखरीत ती प्रतापगडी असल्याचे वर्णन आहे.

**खानानीं वकिलास पुसिले**--अशा प्रकारची प्रश्नोत्तराची हकीकत मीर आलमच्या ग्रंथातही आहे ( सशि पृ. ६३ ).

**खानानींच अगोदर दगा पुरुषार्थ केला**--यच्चयावत साऱ्या मराठी बखरींतून खानानेच अगोदर विश्वासघात केला, असे म्हटले आहे. शिवभारतकारही तेच म्हणतो. असे असता खाफीखान, अलमगीरनाम्याचा लेखक कासीम वगैरे फारसी वाङ्मयाच्या आधारे डफ मात्र उलटे लिहितो. स्कॉट व डॉ. फ्रायर हेही शिवाजीनेच अगोदर वार केल्याचे सांगतात. रेविंग्टनसारखे पाश्चात्य व मीर आलमसारखे मुसलमान इतिहासकार अफझलखानाने अगोदर वार केल्याचे नमूद करतात आणि जदुनाथ सरकारसारखा इतिहासकारही सर्व पुराव्याद्वारे शेवटी बखरकारांचे म्हणणे उचलून धरतो ( सशि पृ. ७२-७४ ).

## पृ. ६२

**सैदबंडा...येसजी कंक**—शिवभारतकार शिवाजीने सैद्बंडा खपविला असे म्हणतो.

**जिवबा महाला**—याचे आडनाव सकपाळ. हा जावळी प्रांतात मोजे कोंडवली येथे राहाणारा. याने यावेळी केलेल्या कामगिरीवरून ' होता जीवा म्हणून वाचला शिवा ' अशी म्हण पडली. हा जातीने न्हावी होता.

## पृ. ६३

**खंडोजी खोपडे...याचा शिरच्छेद**—खंडोजी हा तर्फ उत्रोलीचा देशमुख. जेधे आणि खोपडे घराण्यांमध्ये वैमनस्य होते. खोपडे अफजलखानास मिळाला आणि त्याच्या मदतीमुळे अफजलपुत्र फत्तेखान निसटला. पुढे तो पाडाव सापडल्यानंतर त्यास मारू नये म्हणून जेध्यांनी रदबदली केली. त्यामुळे त्याचे वतन शिवाजीने कायम केले. पण बेइमानीचे प्रायश्चित्त म्हणून त्याचा उजवा हात व डावा पाय कापविला ( शिचप्र पृ. ४५ ).

## पृ. ६४

**प्रतापगडीं देवी**—सभासदानेही राजांच्या स्वप्नात येऊन प्रतापगडावर देवीची स्थापना करण्यास आदेश दिल्याचा उल्लेख केला आहे. समर्थांनी प्रतापगड भवानी स्तोत्रात,

*तुळजापूर ठाकेना । चालली पश्चिमेकडे*
*पारघाटीं जगन्माता । सद्य येऊन राहिली ॥...*
*प्रतापगिरीचे ठायीं । आदि शक्ति विराजते ।*
*कामना पुरती तेथें । प्रचीति रोकडयी जनीं ॥*

असे उद्गार काढले आहेत. पूजेसाठी देवीच्या दोन मूर्ती केल्या. एक प्रतापगडावर स्थापिली व दुसरी पूजेसाठी स्वतःजवळ ठेविली. देवीचे पुजारीपण महाराजांनी स्वतःकडे घेतले ( पोतदार गौरव ग्रंथ–पृ. ३० ).

## पृ. ६५

**बापाचें उसनें घ्यावें**—खानाच्या वधानंतर शिवाजी महाराजांनी पन्हाळा, चंदनवंदन इ. किल्ले मोठ्या तडफेने घेतले व कोल्हापूरपर्यंतचा मुलूख २८ नोव्हेंबर-पर्यंत काबीज केला, इ. माहिती बखरकाराने सांगितली नाही. बापाचा सूड घेण्यासाठी फाजलखान रुस्तुमजमा बरोबर मोठ्या तयारीने आला आणि ४ फेब्रु. १६६० च्या सुमारास रायबागेजवळ प्रचंड युद्ध होऊन शिवाजीने रुस्तुमजमा व फाजलखानाचा पराभव केला. रुस्तुमजमा व फाजलखान सैन्यासह पळून गेला. ही महत्त्वाची हकीकत बखरकार देत नाही. मार्च महिन्यात पुन्हा सिद्दी जोहार नावाच्या कर्नूलच्या सरदाराबरोबर बाजी घोरपडे, रुस्तुमजमा व फाजीलखान असे मोठ्या सैन्यानिशी पन्हाळ्यास वेढा घालून बसले. मार्चपर्यंत सिद्दीने पन्हाळ्याला असा जबरदस्त वेढा दिला की, शिवाजीने तहाच्या वाटाघाटी लाविल्या आणि इकडे तो निवडक लोकांनिशी खेळण्यास ( विशाळगड ) निघून गेला. बखरकाराने व डफने शिवाजी रांगण्यास निघून गेल्याचे म्हटले आहे. तर शिवभारत, एक्याण्णव कलमी बखर व डचांच्या पत्रात विशाळगडचा उल्लेख आहे. लष्करीदृष्ट्या या प्रदेशाची पाहणी करून कॅ. मोडकांनी ' रांगणा ' हेच नाव बरोबर असल्याचा निर्वाळा दिला आहे ( शिनि पृ. २१६ ).

## पृ. ६६

**फाजीलखान यानें पुढें चालऊन घेतले**—फाजलखानाऐवजी ' मसूदखान ' पाहिजे. पन्हाळ्याच्या युद्धाचे नेतृत्व सिद्दी जोहारकडे होते. फाजलखानाकडे नव्हे.

**मर्दुमीची शर्त**—बाजीप्रभूच्या या प्रसंगीच्या पराक्रमाची तुलना ग्रीसमधील

थर्मापिली या प्रसंगाशी केली जाते. बाजीचा मृत्यू शके १५८२ आषाढ वद्य १ ( जेधे करिणा, शिचप्र. पृ. ४६ ). बाजीप्रभूचा प्रसंग शिवभारतात नाही. जेधे शकावलीत अगदी जुजबी हकीकत आहे. तोफांचा आवाज वगैरे बखरीतील हकीकत काल्पनिक आहे.

**खैरतखान व याकूदखान**—हे जंजिऱ्याचे सिद्दी किंवा हबशी सरदार.

**त्यास राघो बल्लाळ अत्रे सुभा**—पन्हाळ्याची व्यवस्था राघो बल्लाळकडे नसून त्रिंबक भास्कराकडे सोपविली होती. सप्टेंबरमध्ये शाइस्तेखान दक्षिणेत आल्याची वार्ता समजल्यानंतर पन्हाळा सिद्दी जोहाराच्या हवाली करण्याची आज्ञा दिली, त्याप्रमाणे किल्ला त्रिंबक भास्कराने २२ सप्टें. १६६० ला जोहाराच्या स्वाधीन केला. सिद्दी जोहारला या मोहिमेत विशेष यश न मिळाल्यामुळे तो रागावून निघून गेला. पुढे रुस्तुमखानाने शिवाजीशी तह केला ( शिपसासं. १.१९५ ). त्यामुळे विजापूरकरांच्या हालचाली थांबल्या. बखरकाराची माहिती अगदी किरकोळ स्वरूपाची आहे.

## पृ. ६७

**जंजिरेकर याजवरि दशहत**—हा सर्व मजकूर अतिशय घोटाळ्याचा आहे. बाजीराव पासलकर, जंजिरेकडील काय सावंत, सावंत व पासलकर या दोघांचा मृत्यू इ. हकीकतीसंबंधाने साधार माहिती मिळत नाही. सभासदाने ही हकीकत दिली आहे व चिटणीस व डफ यांनी त्याची चिकित्सा न करता उचलली आहे. लखमसावंत व खेम सावंत यांखेरीज हा तिसरा 'काय सावंत' कोण? खेम याचे 'काय' असे विपर्यस्त रूप असावे का? बाजी पासलकर हा पुढे कित्येक वर्षे जिवंत असल्याचे उल्लेख सापडतात. जंजिऱ्याच्या हबशावर रघुनाथ बल्लाळ व व्यंकोजी दत्तो यास पाठविल्याची हकीकतही सभासद बखरीमधूनच चिटणिसाने घेतली आहे. या प्रसंगाची सुरुवात सभासदाने कशी मार्मिक केली आहे पाहा: 'पुढे राजियास राजपुरीचे शिद्दी, घरात जैसा उंदीर तैसा शत्रु. यास कैसे जेर करावे म्हणून तजवीज पडली.' सभासदाचे हे अल्पाक्षररमणीयत्व चिटणिसात नाही.

## पृ. ६८

**दर्यासागर**—हा मुसलमान होता असे डफ म्हणतो. 'दर्यासारंग मायनाक भंडारी' असा पाठ असता तर बरे असे संशोधकांना वाटते. परंतु सभासदामध्येही 'दर्यासागर' असाच पाठ आहे.

## पृ. ६९

**बाजी घोरपड्याचें पारिपत्य**—इ. स. १६६४ मध्ये शिवाजीच्या आरमारी

हालचाली जोरात सुरू झाल्या. त्याचे पारिपत्य करण्यासाठी वाडीच्या लखम सावंताने विजापूरकराची मदत मागितली. विजापुरी सरदार खवासखान सैन्य घेऊन तळ-कोकणात उतरला. त्याच्या सैन्यास रसद पोचविण्यासाठी ८ लाख होन घेऊन बाजी घोरपडे निघाला आहे, ही बातमी काढून अचानक शिवाजीने मुधोळवर चढाई केली व बाजीस भयंकर जखमी करून ठार मारिले व वडिलांच्या अपमानाचा सूड घेतला ( शिपसासं १०४१, डच पत्र बाशि पृ. ५३३ ). शेडगावकर बखरीत बाजी घोरपडे शिवाजीच्या स्वारांनी ठार मारिला, शिवाजीने नव्हे असे वर्णन आहे ( पृ. ७२ ).

**फोंडा...सुरंग...फत्ते**—१७ एप्रिल १६७५ मध्ये ( Source Book of Maratha History. 1.38 शका. शिचप्र. पृ. २७ ).

**इभ्रामखान**--मुसलमान धारकरी. लष्करचा हजारी. फोंड्याचा किल्ला हस्तगत करण्यामध्ये याने फार मदत केली. शेडगावकर बखरीत बसनूर लुटण्याची कामगिरीही त्यानेच केली, असे वर्णन आहे ( पृ. ७३ ).

## पृ ७०

**सिंधुदुर्ग** — ताम्राजी, मानाजी, गंगाजी व शिवाजी कोळी यांनी आरमारी किल्ल्यास योग्य जागा शोधली. २५ नोव्हेंबर १६६४ रोजी मुहूर्त करून भूमीत चिरा बसविला. १९ मार्च १६६७ रोजी तो पुरा झाला. सुरवातीला या किल्ल्याचे नाव शिवलंका असे ठेविले होते. या किल्ल्यात शिवाजीची मूर्ती व देऊळ आहे ( Hutchi.ons Memoirs बाशि १. ११८, शिसू पृ. ९२ ).

**सातशें वर्षांचा मुहूर्त**---दिलेल्या मुहूर्तावर खडकात पहिली पहार गाडली तो रक्त वरती आले. त्यावरून शेषाच्या मस्तकापर्यंत पहार गेली म्हणून रक्त आले, असे जोशी म्हणाला आणि ७०० वर्षे शत्रूचा या किल्ल्यात प्रवेश होणार नाही, असे त्याने उद्‌गार काढले, ही दंतकथा वरील वर्णनाच्या मुळाशी आहे.

**बसनूर**--मोडी वाचनामुळे हे चुकीचे नाव रूढ झाले, खरे नाव बसरूर ( शेशि पृ. ११६ ) चिटणिसाने बसनूरचे वर्णन सभासदावरूनच घेतले आहे. सभासद दोन कोटी होनांची मत्ता आणली असे म्हणतो तर चिटणिसाने तो आकडा फुगवून तीन करोड केला आहे. तो अगदीच अवास्तव आहे. शेजवलकरांच्या मते या सर्वांची किंमत ५ लाख होनांहून जास्त होणे शक्य नाही. बसरूर लुटीची तारीख १३ किंवा १४ फेब्रु. १६६५ ही होय. या लुटीने महाराजांस समाधान झाले नाही. ज्या हेराने बसरूर येथील प्रचंड संपत्तीची बातमी दिली होती, त्याने योग्य माहिती न आणल्यामुळे शिवाजीने त्यास ठार मारिले ( बाशि पृ. ५४४ ).

**शिवाप्पा नाईक**--( १६४५–६० ) या स्वारीच्या वेळी शिवाप्पा गादीवर नव्हता. त्याचा वंशज सोमशेखर हा होता.

## पृ. ७१

**राजाराम जन्म**— राजारामासंबंधीची अशा रीतीची हकीकत सभासद बखरीत व शिवदिग्विजयातही आहे. मात्र सभासदाने जन्मतिथी दिली नाही. चिटणीस व शिवदिग्विजय या दोन्ही ठिकाणच्या मित्या चुकल्या आहेत. जेधे शकावलीत, 'शक १५९१ सौम्य संवत्सर फाल्गुन शु॥ १५' असे लिहिले आहे.

## पृ. ७२

**दौलताबादच्या पादशाहातीस वेध**—शहाजहानने दौलताबादची निजामशाही इ. स. १६३६ सालीच खालसा केली असल्यामुळे यावेळी दौलताबादच्या पादशाहानीस वेध लावण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. मोरोपंतांनी इ. स. १६७० च्या शेवटी खानदेश व बागलाण घेतले. जुलै १६७२ मध्ये रामनगर सर केले. मोरोपंत, अण्णाजी दत्तो व दत्ताजीपंतांकडे जी व्यवस्था सोपविल्याचा उल्लेख बखरकार करतो, ती राज्याभिषेकाच्या सुमाराची म्हणजे इ. स. १६७४ ची होय.

## पृ. ७३

**नेताजी पालकर...सरनोबती दूर**—बखरकाराचे वर्णन अगदी संदिग्ध आहे. त्यावरून नेताजीला दूर करण्यामागची भूमिका लक्षात येत नाही. शिवदिग्विजयकाराने चिटणीसाचाच अनुवाद केला आहे. सभासद व एक्या कलमी बखरीत ही घटना शिद्दी जोहारच्या पन्हाळ्याच्या वेढ्यासमयीं घडली असे वर्णन केले आहे. नेताजीस शिवाजी महाराजांनी इ. स. १६६६ मध्ये दूर केले. एकंदर पुराव्यावरून असे दिसते की, जयसिंग–शिवाजी तह झाल्यावर शिवाजीने काही कारणास्तव पन्हाळ्यावर अचानक हल्ला केला, व त्यामध्ये नेताजीमुळे त्याला अपयश आले. आलमगीरनाम्यातील वर्णनावरून शिवाजीने तात्काळ येण्यास आज्ञा केली असता मोगली मुलखात लुटालूट करीत नेताजी राहिला त्यामुळे शिवाजीने त्याला दूर केले ( शेशि पृ. ३७७ ).

**प्रतापराव गुजर**— यास सेनापती केव्हा केले, यासंबंधीची मिती उपलब्ध नाही. नेताजीस दूर केल्यानंतर म्हणजे १६६६ मध्ये हा सेनापती झाला असावा.

**बहिरजी नाईक**— हा शिवाजीच्या हेरखात्याचा प्रमुख होता. आडनाव जाधव. तो रामोशी जातीचा होता, असे डफ सांगतो

**सुरत शहर मालबर**— शिवाजीने सुरत दोनदा लुटले. पहिली लूट १६६४ च्या च्या जानेवारीत. पहिल्या लुटीत इंग्रजाकडे खंडणीची मागणी केली, परंतु त्यांनी नकार दिला म्हणून अँटनी स्मिथ यास पकडून आणले नंतर त्याची सुटका केली. शिवाजीला यावेळी एक कोट रुपयांची लूट मिळाली, असे इंग्रजांनी लिहिले आहे.

( शिपसासं १. पृ. २४१ ते २७४ ). चिटणिसाने वर्णिलेली हकीकत ही सुरतेच्या दुसऱ्या लुटीसंबंधाची होय ( ४ ऑक्टो. १६७० ). सभासदाने लुटीचा आकडा पाच कोटीचा दिला आहे तर चिटणीस ' कोट्यावधि ' असा मोघम उल्लेख करतात. या लुटीत सुमारे ६६ लाखांचा माल सापडला ( सशि पृ. १७४ ).

## पृ. ७४

**रायबागीण उमरखिडींतून जाऊं न द्यावी** - या युद्धाचा सुरतेच्या लुटीशी काही संबंध नाही. सुरतेच्या लुटी १६६४ व ७० मधल्या तर उंबरखिंडीचे युद्ध ३ फेब्रु. १६६१ चे. शिवाजीने घेतलेल्या कोकणातील मुलुखातून त्यास हुसकून लावून सह्याद्रीच्या दुर्गमप्रदेशात त्यास थारा मिळू नये, अशा मोठ्या दूरदर्शीपणाने शाइस्तेखानाने कारतलबखान नावाच्या सरदाराबरोबर कोकणचा प्रदेश हस्तगत करण्यासाठी मोठे सैन्य पाठविले. शिवाजीने याहीवेळीं मोठ्या दक्षतेने सारी व्यवस्था करून खानास खिंडीत कसे गाठले याचे वर्णन शिवभारतात आहे. खिंडीत कोंडल्यावर रायबागीणीच्या सूचनेनुसार खानाने तह केला.

**प्रबळगडावरि किल्लेदार केसरसिंग** - ही हकीकत १६५८ मधली. कल्याण, भिवंडी, माहुली, चौल वगैरे कोकणातील स्वारीच्या वेळींच शिवाजीने प्रबळगड जिंकला. या केसरीसिंगावर शिवाजीने जे उपकार केले ते स्मरून शिवाजी जालना लूट घेऊन येत असता ( १६७९ ) रणमस्तखानाच्या कचाट्यात सापडला. त्यावेळीं आपला धर्मबंधू म्हणून शिवाजीला केसरसिंगाने पळून जाण्याची वेळींच सूचना दिली, असे दिसते.

## पृ. ७५

**नगरानजीक गांठ पडली** - हे सारे वर्णन १७ ऑक्टो. १६७० मध्ये झालेल्या वणीदिंडोरीच्या युद्धाचे दिसते. कारण यातील इखलासखान म्हणजे अब्दुल कादीर ऊर्फ दुसऱ्या बहलोलचा मुलगा. हा या युद्धात जखमी झाला.

# प्रकरण चतुर्थ

## पृ. ७७

**पेशवाई साहा वर्षें शामराजपंतांनीं**—बखरकाराने मोठ्या ऐटीत केलेला हा उल्लेख मोठा विपर्यस्त आहे. मोरोपंत पिंगळे हा ३ एप्रिल १६६२ साली पेशवा झाला, ही वस्तुस्थिती आहे. मग बखरकाराच्या या विधानाचा अर्थ काय? बखरकाराचे मागचे उल्लेख पाहिल्यावर तर या विधानात काहीच अर्थ नाही हे लक्षात आहे. मागे पृ. १९ वर 'गुरूदर जिजाबाईस' शिवनेरीवर ठेवताना जे कारभारी बरोबर ठेविले असे बखरकार सांगतो त्यामध्ये शामराजपंतांचा उल्लेख नाही. पुढे पृ. २७ वर शिवाजी व जिजाबाई यांस पुण्यास रवाना केले, त्यावेळची मिती 'शके १५५९' अशी बखरकार देतो आणि 'बराबर कारभारी पूर्वीं शिवनेरींत होते ते दिले' असे सांगतो. पृ. २९ वरही शामरापंतांचा उल्लेख नाही. शामराजपंतास पेशवे म्हणून बंगळूराहून शहाजीने बरोबर पाठविले होते. त्याला सहा वर्षांनी पेशवा म्हणून काढून टाकले असे मानले तर शके १५६५ हे वर्ष येते. बखरीतील पृ. ३१ वरचा उल्लेख लक्षात घेऊनही यावेळी मोरोपंत 'पेशवे' झाले असे कोणत्याही आधारावर म्हणता येत नाही.

**याप्रमाणें अष्टप्रधान असावे**—राज्याभिषेकापूर्वीपासूनच शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यात अष्टप्रधानपद्धती सुरू केली होती. बखरकाराचे या ठिकाणचे वर्णन एका दृष्टीने महत्त्वाचे आहे. हे वर्णन राज्याभिषेकापूर्वीचे आहे. त्यामुळे अष्टप्रधानपद्धती जरी यावेळी सुरू केली तरी धर्माध्यक्ष व न्यायाधीश ही पदे सोडली तर बाकीची नावे फारशी आहेत, हे लक्षात ठेविण्यासारखे आहे. बखरकार मल्हार रामराव चिटणिसांनी 'राजनीति' या नावाचा प्रसिद्ध ग्रंथ लिहिला आहे. राजनीति या विषयातील ते अधिकारी लेखक असल्याने या बखरीत राजनीतिविषयक व राज्यकारभारपद्धतिविषयक त्यांनी केलेले उल्लेख अतिशय मौलिक आहेत.

शिवाजीची अष्टप्रधानपद्धती ही यावनी राजपद्धतीचे अनुकरण नसून मनुस्मृति, कामंदकीय नीतिसार व शुक्रनीतिसार इ. प्राचीन धर्मग्रंथांच्या अवलोकनातूनच साकार झाली आहे, हे आता स्पष्ट झाले आहे. विशेषतः शुक्रनीतिसार या ग्रंथातील राज्यकारविषयक विवेचनाचे प्रतिबिंब शिवाजीच्या एकंदर राजकारभारावर विशेष दिसते. राजनीतिविषयक मराठीत जे ग्रंथ लिहिले गेले आहेत, त्या सर्वांवर शुक्रनीतिसार या ग्रंथाचा प्रभाव दिसतो. चिटणिसांचा राजनीति हा ग्रंथ तर शुक्रनीतिसाराचाच अनुवाद आहे. 'भोसल्यांचे कुलाचार' या नावाचा सातारच्या

छत्रपतींचा खाजगीकडील जाबता अथवा खाजगी खात्याचे नियम असलेला ग्रंथ इतिहास–संग्रहातून प्रसिद्ध झाला आहे ( १९१९ ). त्याही नियमांचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता शुक्रनीतिसार या राजनीतिविषयक संस्कृत ग्रंथातील विचारसरणीचे छत्रपतींच्या राज्यपद्धतीवर पडलेले प्रतिबिंब स्पष्ट दिसते.

शुक्रनीतिसाराचे आंधळे अनुकरण मात्र महाराजांनी केले नाही. देशकाल-परिस्थितिनुसार त्यामध्ये योग्य ते बदल केलेले दिसतात. उदा:—

' सुमंत्रः पंडितो मंत्री प्रधान सचिवस्तथा ।

अमात्यः प्राड्विवाकश्च तथा प्रतिनिधिः स्मृतः ॥ ' असा श्लोक शुक्रनीतिसारात आहे. यावरून प्राचीन काळच्या हिंदुराज्यपद्धतीमध्ये ' प्रतिनिधी ' हे एक अष्ट-प्रधानातले महत्त्वाचे पद होते. महाराजांनी त्याबद्दल सेनापतीस अष्टप्रधानामध्ये जागा दिली. ' प्राड्विवाक ' या जडजंबाल शब्दाबद्दल न्यायाधीश या सुटसुटीत शब्दाची योजना केली. अमात्य म्हणजे मजमुदार किंवा मुजुमदार. शुक्रनीतीमध्ये तो जमिनीचा प्रधान आहे आणि बखरकाराने येथे सांगितल्याप्रमाणे, ' त्यांनीं दोनतीनशें कारकून दप्तरचे ठेऊन एकवेरजी सालाचे सालास पाहून करीत असावे ' अशी कामगिरी त्याच्याकडे सोपविली म्हणजे त्याला जमाखर्चाचा अधिकारी केले. राज्यव्यवस्थेच्या दृष्टीने हा फरक फार महत्त्वाचा आहे, यात शंका नाही.

राज्याभिषेकापूर्वी अष्टप्रधानांची व्यवस्था आपल्या प्राचीन पद्धतीस अनुसरून करीत असता सुरवातीला सुटसुटीत अशी फारशी नावे वापरणे सोईचे पडले म्हणून ती वापरली आहेत, परंतु त्याहीमध्ये अधिकाराच्या दृष्टीने स्वतंत्र दृष्टी ठेविली आहे ' पेशवा ' म्हणजे वास्तविक ' दुय्यम प्रतिनिधी ' परंतु शिवाजीच्या राज्यात तो सर्वश्रेष्ठ अधिकारी झाला.

**पारसनिविशी** – इकडून पाठवावयाच्या पत्रांचा फारशी तर्जुमा करणारा व आलेली फारशी पत्रे वाचून त्यांचा मराठीत अनुवाद करणारा.

**शेषावा नाईक पुंडे** – यास शिवाजीने पोतदारी दिली, त्याअर्थी मागे मालोजीसंबंधी सांगितलेल्या हकीकतीत ( पृ. १५ ) काही तरी तथ्य असावे, असे दिसते.

## पृ. ७९

**रघुनाथ बल्लाळ कोरडे सबनीस** – या ठिकाणी ' कोरडे ' शब्द नको. रघुनाथ बल्लाळ सबनीस, राघो बल्लाळ अत्रे व रघुनाथ बल्लाळ कोरडे या तीनही निरनिराळ्या व्यक्ती होत्या. राघो बल्लाळ दाभोळचा सुभेदार होता, कोरडे हेजीब होता, आणि हा सबनीस दादोजी कोंडदेवांबरोबर शहाजीने पाठविलेल्या मुलकी अधिकाऱ्यां-पैकी होता. याचे आडनाव दीक्षित. सभासद बखरीत स्पष्ट उल्लेख आहे; ' शाहाजीराजे कर्नाटक बंगरूळ येथें होते. त्यांपाशीं कारभारी राजश्री नारोपंत दीक्षित होते.

त्यांच्या पोटीं रघुनाथपंत व जनार्दनपंत हे दोघे पुत्र बहुत शाहाणे जाले...व रघुनाथ बल्लाळ सबनीस ऐसे देऊन दादाजीपंतास व राजे यांसि पुण्यास रवाना केले.' मल्हार रामरावाची 'कोरडे' हा सबनीस होता, अशी चुकीची समजूत दिसते. पृ. १९ वरचा उल्लेखही असाच चुकीचा आहे.

**रायगडावरील बंदोबस्त**—रायगड मे १६५६ मध्ये शिवाजीच्या ताब्यात आला. या सुमारास कल्याणचा सुभेदार मुल्ला अहमद खजिना घेऊन विजापुरास निघाला असल्याची बातमी लागली. शिवाजीने छापा घालून तो खजिना लुटला व त्या पैशाचा उपयोग रायगडची पुनर्रचना करण्याच्या कामी केला. रायगडचे सर्व मार्ग बंद करून फक्त मुख्य मार्ग काय तो मोकळा ठेवला व दुसऱ्या कोणत्याही बाजूने किल्ला चढून दाखविणाऱ्यास शिवाजीने बक्षीस लावले. एका बहाद्दराने हे बक्षीस मिळविले. मग तोही मार्ग बंद करून किल्ला बेलाग केला (राजी पृ. २०).

## पृ. ८०

**कारभारी यांणीं ज्याजकडे जो कारभार नेमला**—शुक्रनीतिसारामध्ये प्रधानांची जी कर्तव्ये अध्याय २. ८९–९६ मध्ये सांगितलेली आहेत तिच्याशी हा मजकूर जुळता आहे. रामचंद्रपंत अमात्यांनी स्वानुभवाधारे 'आज्ञापत्र' नावाचा जो ग्रंथ लिहिला, त्यातील मजकुराशीही कित्येक ठिकाणचा मजकूर ताडून पाहण्यासारखा आहे.

**सरकारकून**—अष्टप्रधान किंवा प्रधान या अर्थाने हा शब्द वापरला जातो. कारकून म्हणजे नुसते लेखनकर्म करणारा सामान्य लेखनिक असा अर्थ शिवकाळात नव्हता. कारकून हा निरनिराळ्या कारखान्यांवरच्या (Departments) हुद्देदार, वरिष्ठ अधिकारी असे. मोठा अंमलदार, हुद्देदार, असा या ठिकाणचा अर्थ आहे. आजच्या अर्थाने सामान्य लिखापडी करणारी व्यक्ती हवी होती तेव्हा, 'महाराजांनी लिहिण्यासी लिहिणार पाहिजे म्हणून तिमाजी नारायण दरमहा ३ होन वेतन ठरवून पाठविला' असा उल्लेख आहे. कारकून हा शब्द अशा ठिकाणी येणार नाही (मराअ पृ. २७).

**किल्लेकोट ठाणीं घेतलीं**—चिटणिसांनी या ठिकाणी दिलेला तपशील अतिशय महत्त्वाचा आहे. शिवाजीच्या राज्यकारभाराचे यथार्थ चित्र त्यामुळे डोळ्यांपुढे उभे राहाते. आदिलशाही व निजामशाही अमदानीतील किल्ल्यावरील बंदोबस्ताचे अनुकरण केले तरी स्वानुभवाधारे शिवाजीने ह्या व्यवस्थेतील तपशील स्वतः आखून दिला. किल्ल्यावरच्या निरनिराळ्या अधिकाऱ्यांच्या विशिष्ट जाती ठरवून दिल्या, यामध्ये त्याचे निराळे वैशिष्ट्य दिसून येते. अशा प्रकारच्या जातवारी व्यवस्थेमुळे फितुरीस आळा बसण्यास मदत झाली (MSM P. 98). अशा प्रकारचा बंदोबस्त करूनही फंदफितुरीची उदाहरणे घडत आणि हाती घेतलेली मोहीम

बंद ठेवून शिवाजी त्यात तात्काळ लक्ष घाली ( राखं ८. पृ. ११ ). ह्या निरनिराळ्या प्रकारच्या जाती या पद्धतीमुळे गुण्यागोविंदाने एकत्रित राहू लागल्या, हीही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. परवारी, रामोशी, भिल्ल, इत्यादी जातींना मेटकरी, चौकीदार केल्याने त्यांच्या सूक्ष्म ज्ञानाचा जसा उपयोग झाला, तसेच सामाजिक दृष्ट्या त्यांची प्रतिष्ठा वाढण्यासही मदत झाली. शिवाजीच्या मृत्यूनंतर ही व्यवस्था ढासळली आणि त्याची परिणती गोंधळात झाली.

## पृ. ८२

**अमके किल्ल्यावर अमकें सामान याप्रमाणें धारे बांधून दिले**—शत्रूने खूप दिवस किल्ल्यास वेढा घातला असता आतील बंदोबस्त पक्का नसेल तर उपासमार होते, हे पन्हाळ्यास सिद्दी जोहारने वेढा दिला, त्यावेळीं लक्षात आले होते. आपल्या ताब्यात असलेल्या किल्ल्यावरील बंदोबस्तासाठी राखीव निधी म्हणून शिवाजीने एक लाख पंचवीस हजार होन काढून ठेविले, त्याच वेळीं किल्ल्यांच्या डागडुजीसाठी आणखी एक लाख पंच्याहत्तर हजार होन निराळे ठेविले ( राखं ८ पृ. १६–१९ ). शिवाजी गडाप्रीत्यर्थ अवाढव्य खर्च करीत असे, त्याबद्दल पदरच्या मुत्सद्दयांनी नापसंती दाखविली, त्यावेळीं शिवाजीने दिलेले मार्मिक उत्तर शिवदिग्विजयात ( पृ. १९० ) पाहावयास सापडते. किल्ल्यांची अभेद्य रचना करण्यासाठी मुंबईतील इंग्रजांच्या पदरी असलेले कामगार अधिक पगार देऊन आपणाकडे शिवाजी ओढीत असे. ( Factory Records Surat Vol. 106. 73–74 ).

**किल्लेकोट हे आपल्या राज्याचा जीव की प्राण**—किल्लेकोटांचे महत्त्व मनुस्मृति, शुक्रनीतिसार इ. ग्रंथात अतिशय चांगल्या रीतीने प्रतिपादले आहे. दुर्गाच्या आश्रयाने एक सहस्र मनुष्य शंभरांशी लढू शकतो, शंभर माणसे दहा हजारांशी लढू शकतात, त्यास्तव राजाने दुर्गाचा आश्रय करावा, असे शुक्रनीतिसार अ. ४. श्लो. १० मध्ये सांगून राज्याच्या सप्तांगांमध्ये दुर्गाचे महत्त्व प्रतिपादिले आहे. मनूने सर्व दुर्गांत गिरिदुर्ग महत्त्वाचे आहेत, म्हणून राजाने त्यांचा आश्रय करावा असे सांगितले आहे ( मनुस्मृति अ. ७. ७१ ). शिवाजीच्या राजनीतीवर मनूच्या या वचनाचा किती मोठा प्रभाव पडला होता, ते लक्षात येईल. शिवाजीने किल्लेकोटांकडे अतिशय कटाक्षाने लक्ष दिले हे अमात्यांच्या आज्ञापत्रातील 'संपूर्ण राज्याचें सार ते दुर्ग. दुर्ग नसता मोकळा देश परचक्र येतांच निराश्रय, प्रजा भग्न होऊन देश उद्वस होतो...हे राज्य तर तीर्थरूप थोरले कैलासवासी स्वामींनी ( शिवाजी महाराज ) गडांवरूनच निर्माण केले...गडकोट हेच राज्य, गडकोट हेंच राज्याचे मूळ, गडकोट म्हणजे खजिना, सैन्याचें बल, राज्यलक्ष्मी, सुखनिद्रागार, किंबहुना गडकोट म्हणजे आपले प्राणसंरक्षण असें पूर्ण चित्तांत आणून...' इ. विवेचनावरून लक्षात येईल.

आपल्या वडिलांच्या सुटकेसाठी कोंडाणा किल्ला आदिलशहाला द्यावा लागला त्याचे शिवाजीला किती दुःख झाले हे परमानंदाने शिवभारताच्या १६ व्या अध्यायात वर्णिले आहे. ते मुळातून पाहाण्यासारखे आहे.

## पृ. ८३

**पागा...पद्धति केल्या**—पागेचे आणि घोडदळाचे महत्त्व शिवाजीने चांगल्या रीतीने ओळखिले होते, हे इंग्रजांनी त्याच्या हालचालीसंबंधाने जो पत्रव्यवहार केला आहे, त्यावरून लक्षात येते. शिवाजीच्या कोकणातील हालचाली, सुरत वगैरे लुटी आणि गोव्यातील फोंड्यावरची चढाई इत्यादी ठिकाणी शिवाजीला जे यश मिळाले, ते त्याच्या अत्यंत चपळ अशा शिलेदारांमुळे. शिवाजीने लष्करात पायदळाइतकेच घोडदळास महत्त्व दिलेले दिसते ( MSM पृ. ७६–७७ ). ऑक्सिंडेन, दा गार्दा, ॲबे कॅरे इत्यादि समकालीन पाश्चात्यांनी शिवाजीच्या हालचाली पाहून, ( १ ) तो पंखधारी किंवा अशरीरी असावा,– that rpeort hath made him an airy body and added wings; or else it were impossible he could be at so many places as he is said to be at, all at one time. Sometimes he is certainly believed to be in one, and in a day or two in another place and so in half a dozen remote one from another—Oxinden; ( २ ) तो जादूगार असावा—he was a magician or devil acted in his place- दा गार्दा; ( ३ ) त्याच्या हालचाली पाहिल्या म्हणजे मोठा चमत्कार वाटतो – ॲबे कॅरे, आणि ( ४ ) रात्रंदिवस त्याच्या शिलेदारांनी केलेल्या घोडदौडी पाहून आपण अद्भुत युगात वावरतो आहोत असे वाटते.– सुलिवन. अशा प्रकारचे उद्गार काढले आहेत.

**एक हजारी...पंच हजारी**—मूळ सभासदाच्या बखरीतील ही माहिती वाढविण्याच्या भरात लांबलचक वाक्ये वापरल्यामुळे येथे अर्थाच्या दृष्टीने थोडासा घोटाळा झाला आहे. सभासदाचे मूळ वर्णन किती थोडक्यात व व्यवस्थित आहे पाहा : ‘ पागेमध्ये दर घोड्यासि बारगीर एक. पंचवीस बारगिरांस मराठा धारकरी हवालदार एक केला. पाच हवालाचा एक जुमला,–असे दहा जुमले म्हणजे एक हजारी–ऐशा पांचा हजारिया मिळोन पांच हजारी...’

म्हणजे २५ बारगीर = १ हवालदार आणि ५ हवालदार म्हणजे १ जुमला = ( १२५ बारगीर ). असे १० जुमले = १ हजारी ( १२५० बारगीर ).

चिटणीसांनाही हेच सांगावयाचे आहे. परंतु लांबलचक वाक्यरचना केल्यामुळे घोटाळा झाला आहे. चिटणीस पाच जुमलेदारांचा अधिकारी म्हणून एक सुभेदार सांगतो आणि असे दाहा सुभेदार म्हणजे पंचहजारी. ज्याला सभासद फक्त हजारी म्हणतो, तो दोन सुभेदारांचा असतो, हे चिटणीसांच्या वर्णना-

वरून दिसून होते. म्हणजे या ठिकाणी हजारी हा सुभेदारांवरचा अधिकारी असे सिद्ध होते. शिवाजीने आपल्या पाग्याची नवीन व्यवस्था अफजलखानाच्या वधानंतर केली. त्यापूर्वी त्याने पायदळावर व किल्ल्यांवर अधिक लक्ष केंद्रित केले होते. कारण सरकारी पाग्यासाठी खर्चाची तरतूद मोठ्या प्रमाणात करावी लागते. त्यावेळी छोट्या छोट्या सुभ्यावरचे अधिकारी म्हणजे सुभेदार हे साधारणतः ५००।६०० स्वारांचे असत. अफजलखानवधानंतर शिवाजीने पाग्याची व्यवस्था केली, त्यावेळचा विचार करता चिटणीसाचे वर्णन योग्य दिसते. पुढे राज्याभिषेकानंतरच्या व्यवस्थेत 'सुभेदार' हा पंचहजारी होता, असे दिसते. अधिक माहितीसाठी 'शिवचरित्र साहित्य–७ व्या खंडा' ची प्रस्तावना पाहावी.

शिवाजी आपल्या पागेसंबंधाने किती जागरूक असे याचे प्रत्यंतर राखं. ८. ले. २८ वरून चांगल्या रीतीने प्रत्ययास येते. मोगल व विजापूरकर यांजकडे असलेले घोडदळ तुलनेते शिवाजीपेक्षा कितीतरी पटीने अधिक असले तरी शिवाजीची शिस्त त्यामध्ये नसल्याने त्यांच्या संख्येने प्रचंड असलेल्या घोडेस्वारांना शिवाजीचे पारिपत्य करता आले नाही. व्हिन्सेंट स्मिथने तर स्पष्टच म्हटले आहे की, शिवाजीचे घोडदळ छोटेसेच का होईना परंतु इतके शिस्तबद्ध होते की, औरंगजेबाला त्यामुळे शिवाजीचा पाडाव करणे मोठे जड गेले. जरी यावेळी खुद्द अकबर असता तरी शिवाजीच्या शिस्तबद्ध सैन्याशी सामना देणे त्याला जड गेले असते (Akbar The Great Mogul p. 368 ).

## पृ. ८४–८९

**लूट काडीमात्र तैनातीचा हिशेब इ.**——याही बाबतीत कसल्याही रीतीची शिथिलता शिवाजीला खपत नसे. सैन्याधिकाऱ्यांना लिहिलेल्या महाराजांच्या पत्रांत जरब व दहशत अतिशय असे. मुसलमान इतिहासकारांनीही स्त्रिया, देव, ब्राह्मण इत्यादिकांबद्दलच्या महाराजांच्या दृष्टिकोनाची मुक्त कंठाने स्तुती केली आहे. शिवाजीचा समकालीन आदिलशाही इतिहासकार खाफीखान याने आपल्या 'मुन्तखुल्लुबाब–इ-मुहंमदशाही 'मध्ये लिहिले आहे, 'त्याचा सक्त नियम होता की, लूट करताना कोणीही मशिदी, कुराण व बायका यांवर हात टाकता कामा नये. जेव्हा केव्हा एखादी कुराणाची प्रत त्याच्या हाती लागे तेव्हा तो तिचा मान राखी व ती आपल्या मुसलमान अनुयायांस देई... त्याचा असा नियम होता की, एखादे ठिकाण लुटले असता त्यात मिळणारा गरीबांचा कपडा, ताम्रद्रव्य आणि तांब्यापितळेची भांडी ही ज्यांस सापडत त्यांची होत; पण इतर वस्तू, साधे किंवा शिक्क्याचे सोनेरुपे, रत्ने, किमती पदार्थ, हिरे या सर्व वस्तू काही एक चोरून न ठेविता अधिकाऱ्यांच्या हवाली कराव्या लागत व त्यांनी त्या सरकारात भरावयाच्या असत.' ( शिचसं ३. फार्सी विभाग पृ. ६६ ).

देवब्राह्मणांना त्यांनी दिलेली दानपत्रे उपलब्ध आहेत ( सनदापत्रे– पृ. ११२–१४,४२,४७,५९,६० ). सैनिकांनी एखाद्या गावाजवळून जाताना मठ–मंदिरे व शेतीवाडी यांना तोशीस लागू नये याची तो किती दक्षता घेई हे राखं ८ ले. २८ व ३१ शिचसा ५ ले. ७९५ या त्याच्या पत्रांवरून लक्षात येते. व्यसनाधीनतेबद्दलचा शिवाजीचा तिरस्कार शिवभारतात ( अ. १६ ) वर्णिलेला आहे. इंग्रज इतिहासकार मॉटगोमेरी मार्टिनने शिवाजीचे निर्मळ चारित्र्य व निर्व्यसनीपणा यांचा केलेला गौरव मुळातूनच पाहाण्यासारखा आहे. ( The Indian Empire. Vol. I p. 149 ). चिटणिसांनी नित्याविधी संबंधाची येथे दिलेली माहिती भोसल्यांचे कुळाचार मध्येही सापडते.

## पृ. ९०

**कवि भूखन**—भूषण कवी. व्रजभाषेत भूषण नावाच्या कवीने गायिलेले ‘ शिवराजभूषण ’ नावाचे शिवाजी महाराजांचे कविताबद्ध चरित्र उपलब्ध आहे. १०५ अलंकारांनी आपण शिवरायाचे वर्णन केले आहे, असे कवी म्हणतो. भूषणास शिवचरित्र निवळ अलंकारांच्या उदाहरणांकरता अभिप्रेत होते, असे एक मत आहे, ते बरोबर नाही. भूषणाची कित्येक प्रसंगवर्णने ऐतिहासिकदृष्ट्या फार महत्त्वाची आहेत. आपल्या काव्याच्या आरंभीच कवीने चार दोह्यांतून ( २५–२८ ) जी, माहिती सांगितली आहे, त्यावरून भूषण हा कनोजी ब्राह्मण, काश्यपगोत्री यमुनेच्या काठी असलेल्या त्रिविक्रमपूरचे राहणारा. वडिलांचे नाव रत्नाकर. भूषण पहिल्याने चित्रकूट संस्थानाधिपती सुलंकी वंशस्थ रुद्र यांच्या पदरी होता. तेथेच ‘ कविभूषण ’ ही पदवी त्यास मिळाली. ‘ शिवराज-भूषण ’ हे काव्य राज्याभिषेक समयी लिहिले गेले आहे. हा कवी १०२ वर्षे जगला, असे दिसते.

**चिंतामण कवि**—हा त्याचा भाऊ. तो औरंगजेबाच्या पदरी होता की नाही याबद्दल शंका व्यक्त करण्यात आली आहे. भूषणबद्दल अनेक दंतकथा उपलब्ध आहेत. चिटणिसांनी दिलेली त्यांपैकी सर्वांत मनोरंजक ठरावी.

**संस्थान** - मूळ शब्द ‘ संश्रय ’ असावा असे वाटते. राजनीतीमध्ये चिटणीस संश्रय हा शब्द वापरतात.

**दैधो भाव**—याचे अधिक स्पष्टीकरण चिटणिसांनी राजनीतीत केले आहे. दोन शत्रू प्राप्त असता उभयतांशी संधाने राखून एकास एक कळू न देता दोघेही भांडून खराब झाले म्हणजे सबळाच्या साहाय्याने दुर्बळास जिंकावे, हा स्वतंत्र द्वैधीभाव, तर दोघांकडून द्रव्य घेऊन दोघांस राखणे हा परतंत्र द्वैधीभाव

## पृ. ९३

**शत्रुमित्रविचार**—शुक्रनीतिसार अ. ४. ९·२६ मध्ये चिटणिसांच्या या विवेचनाचे मूळ सापडते.

## पृ. ९४

सप्तदुर्व्यसनांसंबंधी शुक्रनीती अ. ३.५६, ३०३–९, व राजनीती पृ. २०–२२ येथे विस्तृत वर्णन पाहावयास सापडते. याठिकाणी त्याचेच थोडक्यात साररूप असे विवेचन केले आहे.

## पृ. ९५. ९६

**शहा-शिवाजी भेट**—ही भेट झाली यासंबंधाने ऐतिहासिक पुरावे उपलब्ध नाहीत. राजवाडे यांनी ही भेट झाली असे गृहीत धरले ते चिटणीस बखर व शिवदिग्विजय यांच्या आधारे ( रामाविचं पृ. ९८–९९ ). त्यांनाही ऐतिहासिक कागदपत्रांचे आधार देता आले नाहीत. शिवाजीला बाराव्या वर्षी बंगळूरहून एकदा पाठविल्यानंतर पितापुत्रांची कधी पुढे भेट झालीच नाही, असे इतिहास सांगतो ( शेशि पृ. ८१ ). सरदेसायांनी राजा–शिवाजीमध्ये ही भेट १६५३ मध्ये कल्पिली आहे. तिलाही काही आधार नाही. महमदशहाने सन १६४९ मध्ये शहाजीची सुटका करताना सिंहगडास शहाजीस आणले व त्यावेळी पितापुत्रांची भेट झाली होती असाही एक तर्क ( रामाविचं पृ. ५३ ) राजवाड्यांनी केला आहे. तोही निराधार आहे.

८१९२८
१२८१
नाशि.वा
१५।३।६


## प्रकरण पंचम

पृ. ९८

**मातुल शाइस्ताखान यांस सुभा**—शाइस्तेखानाचे मूळचे नाव अबू तालिब किंवा मिर्झा मुराद असे होते. जहांगीर आणि शहाजहान यांच्या कारकीर्दीत त्याचे वडील आसफखान हे वजीर होते. आसफखान हा शहाजहान बादशाहाचा मामा. शाइस्तेखानास त्यामुळे औरंगजेबाचा मातुल असे म्हटले आहे. आसफखानाच्या मृत्यूनंतर १६४१ मध्ये शहाजहानने शाइस्तेखानास आपला वजीर नेमले होते. जून १६५९ मध्ये औरंगजेबाने शिवाजीच्या हालचाली वाढत चालल्या हे लक्षात घेऊन शाहाजादा मुअज्जमच्या जागी दक्षिणचा सुभेदार म्हणून शाइस्तेखानास औरंगाबादेस पाठविले. १६६० च्या सुरवातीस तो मोठ्या तयारीने शिवाजीच्या मुलखात आला. सभासदाने शाइस्तेखानाबद्दल मोठे मार्मिक वर्णन केले आहे. 'स्वारी म्हणजे कलयुगींचा रावण ! जैशी रावणाची संपत्ति गणना न करवे, तैसाच बरोबरी खजिना...असे बत्तीस कोटी द्रव्य घेऊन दिल्लीहून निघाला. नबाब शास्ताखान म्हणजे पातशाहाची प्रतिमाच दुसरी. ऐसा सेनासमुद्र सर्व संपत्तिनिशीं दक्षणेस राजियावर चाल करून आला. लष्कर मुकाम करीत तेव्हा दोन गांवें लांब व गांव दीड गांव रुंद लष्कर राहात असे. (पृ. २९ ). कास्म द गार्डनेही शाइस्तेखानाच्या सैन्याचे असेच मोठे उद्बोधक वर्णन दिले आहे ( बाशि ७६–७७ ). सुमारे ६० सरदारांच्या हाताखाली, ७७ हजार घोडेस्वार, अनेक हत्ती व बक्सर जातीचे मोठे पायदळ खानाने बरोबर आणल्याचे शिवभारतकार सांगतो (२५–२६–५९ ).

खान २५ फेब्रु. १६६० मध्ये पुणे प्रांतात आला, त्यावेळीं महाराज पन्हाळयास होते. पन्हाळ्याचा वेढा, सुटका, बाजीप्रभू देशपांड्याचे वीरमरण, उंबरखिंडीचे युद्ध, राजापूरच्या इंग्रज वखारीची लूट, शृंगारपूरच्या सूर्यरावाचे व पल्लीच्या दळवीचे पारिपत्य, इ. तळकोकणातील शिवाजीच्या हालचाली शाइस्तेखान इकडे पुण्याच्या मुलुखात ठाण देऊन बसला त्या दरम्यान घडलेल्या आहेत. बखरकाराने अगोदरच त्यांचा कुठेही कशाही रीतीने निर्देश केला आहे, हे यापूर्वीच्या टीपांवरून लक्षात आले असेलच.

शाइस्तेखान येऊन पुणे प्रांतात त्याने गलबला केला, इत्यादी किरकोळ उल्लेख ऐतिहासिक कागदपत्रांतून सापडतात ( शिपसासं ले. ८७९-८०, शिचसाखं. ४ पृ. १९ ). परंतु त्याच्या हालचालीचे विस्तृत वर्णन आलमगीरनामा सारख्या मुसलमानी तवारिखातून चांगल्या रीतीने आले आहे. त्याच आधारावर यदुना-

थांनी या हालचालींच्या संगतवार तारखा दिल्या आहेत ( सशि पृ ७५–८० ).

## पृ. ९९

**ऐसें कित्येक प्रकारें कावेसीनेच घाबरा करावा**— बखरकाराने मराठ्यांच्या या वेळच्या धोरणाचे हे नेमके आणि थोडक्यात वर्णन केले आहे. कास्म द गार्डने मराठ्यांनी गनिमी काव्याने खानाच्या सैन्यास कसे सतावले याचे विस्तृत वर्णन केले आहे ( बाशि ७७.७८ ). अशा प्रकारच्या अनेक चढाया करून नेताजी पालकराने मोगली सैन्यास हैराण केले. नेताजीला सरनोबत पदावरून दूर केल्याची अगोदरच हकीकत सांगितल्यामुळे बखरकाराने येथे त्याचा उल्लेखही केला नाही.

**संभाजी कावजी**——हा प्रथम शिवाजीचा भालदार होता. सभासदाने हणमंतराव मोरे यांस त्याच्या मुलीबद्दल सोइरिकीचे नाते लावून त्यास संभाजी कावजी महालदार याने ठार केले, असे वर्णन केले आहे. अफजलवधाच्या वेळच्या शिवाजीच्या दहा रक्षकांत संभाजी होता आणि अफजलाचे प्रेत पालखीत घालून पळणाऱ्या भोयांचे पाय त्यानेच कापल्याचा उल्लेख आहे. या कामगिरीबद्दल त्याची सर्फराजी करून त्यास चाकण येथे पागेवरचा अधिकारी नेमले होते. चाकण सर केल्यानंतर खानाने यास तेथला हवालदार नेमले. शिवाजीने १६६९ मध्ये चाकण सर करून यास ठार मारले

**बावाजीराम होनप**—कर्यात मावळातील ३६ गावांचा देशकुलकर्णी मोरो ज्ञानदेव याचा हा मुलगा. शिवाजी पुण्यास येण्यापूर्वी मोरो ज्ञानदेवाने चाकणचा किल्ला बळकाविला होता. मुरार जगदेवाने याचा बंदोबस्त केला. दादोजी कोंडदेवाच्या कारकीर्दीत हा पाळेगारी करू लागला, तेव्हा शिवाजीने याचा बंदोबस्त केला. पुढे चाकणचा किल्ला फिरंगोजी नरसाळ्याकडे राहिल्याने बावाजीराम डूख धरून खानास मिळाला. पुढे दिलेरखानास देखील हा मिळाला होता. शिवाजीने त्याला मुद्दाम बोलावणे पाठवून त्यास १६७८ मध्ये देशपांडेपणाचे वतन परत दिले व आपल्या बाजूस ओढले.

## पृ. १००

**फिरंगोजी नरसाळा**——याचा उल्लेख सभासदाने केला नाही व त्याचे नाव शिवकालीन अस्सल कागदपत्रांत आढळत नाही ( शिनि पृ. २१० ); परंतु आलमगीरनामा व खाफीखानाच्या इतिहासात चाकणच्या लढ्याचे मोठे परिणामकारक चित्र रेखाटले आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत या किल्ल्यातून नरसाळ्याने दोन महिने शाइस्तेखानाला थोपवून धरले व शेवटी नाइलाजाने किल्ला स्वाधीन केला ( ४ ऑगस्ट १६६० ). ‘ तुम्ही खरे मर्द आम्हापाशी राहावे ! ’ इत्यादी मजकूर मुसलमानी तवारिखात नाही. ‘ मनसब देत होते. कबूल केली नाहीं ’ या ९१ कलमी

बखरीतील वाक्याच्या आधारें वरील मजकूर चिटणिसांनी सजविला आहे.

**प्रतापराव गुजर सरनोबत** - या वेळी नेताजी पालकर हाच सरनोबत होता. नेताजी व मोरोपंत पिंगळे यांजबरोबर प्रत्येकी हजार स्वारांचे पथक देऊन शिवाजीने त्यांना जय्यत तयारीनिशी पुण्याबाहेर ठेविले होते ( सशि पृ. ८८ ).

**काळोख भाद्रपद मासाचा** - जेधे शकावली चैत्र शु. ८ ही मिती देते. आलमगीरनाम्यावरूनही हीच मिती (५ एप्रिल १६६३) बरोबर ठरते. चिटणीसाने भाद्रपद व पावसाळा इ. माहिती ९१ कलमी बखरीवरून उचलली आहे. बखरकाराचे यापुढचे खोज्या, चुडेदान इ. सारेच वर्णन बरेचसे काल्पनिक आहे. जेधे शकावली-वरून खान या वेळी लालमहालात मुक्काम करून होता, हे लक्षात घेण्यासारखे आहे. मूळ सभासदाचे वर्णन त्रोटक आहे. खाफीखानाने जी विस्तृत हकीकत दिली आहे, ( शिवृसं ३. पृ. ६८. ६९ ) तिच्यातील तपशील निराळा आहे. मात्र खानाचा आंगठा तुटल्याचे खाफीखानानेही सांगितले आहे. खुद्द शिवाजीने या प्रसंगाचे वृत्त कुडाळ प्रांतातील आपला सुभेदार रावजी पंडित यास कळविले व त्या पत्रातील रावजीने सांगितलेल्या हकीकतीवरून राजापूरचा इंग्रज अधिकारी गिफर्ड याने सुरतेस पाठविलेले पत्र उपलब्ध आहे ( शिपसासं खं. १ पृ. २८८ ). याच गिफर्डने या संबंधाने पुढे लिहिलेले आणखी एक पत्र उपलब्ध आहे ( कित्ता पृ. २२८ ) त्यावरून शिवाजीच्या धाडसी कृत्याने अपेक्षाभंग झालेले इंग्रज किती कुत्सित झाले होते, याचे प्रत्यंतर येते.

## पृ. १०२

**निशाणाचे हत्तीस गोळा**—ही माहिती काल्पनिक आहे. तिचे मूळ ९१ कलमी बखरीतील ४७ वे कलम होय.

**फौजेंत फितवा असेल**—ह्या माहितीला खाफीखानाच्या वर्णनावरून दुजोरा मिळतो. शाइस्तेखानाच्या हाताखालचा सरदार महाराजा जसवंतसिंग हा शिवाजीला फितुर होता, असा गर्भित आरोप खानाने त्याच्यावर केला. गिफर्डच्या पत्रावरूनही हा आरोप सिद्ध होतो ( शिपसासं १. पृ. २२८ ).

**शास्ताखान यास शास्त करून**—ही कोटी मूळ सभासदाची आहे.

## पृ. १०३

**बोदेकोर**—धारवाड जिल्ह्यातील मौजे होद्दिगेरे तालुका चित्रदुर्ग या ठिकाणी शहाजी महाराजांना मृत्यू आला. तेथे महाराजांची छत्री आहे. होद्दिगेरे हा 'हुलीगेरे, ( वाघांचे वास्तव असलेले जंगल ) या कानडी शब्दाचा अपभ्रंश दिसतो. बखरीतील मृत्युशक चुकला आहे. जेधे शकावली शके १५८५ माघ शु. ५ देते ( शिचप्र पृ. ५१ ). गवचीत किंवा गवेचीत याचा अर्थ भेगेत किंवा भगदाडात

असा दिला जातो, तो संशयास्पद आहे. 'गवेचिते' असा मूळ शब्द आहे. त्याचा अर्थ चित्याची शिकार करीत असता रानडुकराच्या (गवा) मुसंडीत सापडले, असा अर्थ घेतला तर ह्या महापुरुषाचा मृत्यू खबदाडीत पडून झाला, असा नामुष्कीचा अर्थ दूर होऊ शकेल.

**सांपराईक**––या शब्दाबद्दल साने व कीर्तने यांनी सांप्रदायिक हा शब्द देऊन अर्थाच्या दृष्टीने घोटाळा केला आहे. सांपरायिक म्हणजे विपत्तीचा, अनिष्टरूप, आपत्तिकारक, असा अर्थ माधव चंद्रोबा डुकले यांच्या संस्कृतप्राकृत शब्दकोशात दिला आहे. 'या दुःखद घटनेनंतर' असा अर्थ येथे घेतला पाहिजे.

## पृ. १०३–८

**जयसिंगाची योजना** - मूळ सभासद-बखरीतील मजकूर चिटणिसांनी आपल्या पद्धतीने दिला आहे. जयसिंग आणि दिलेरखान यांचे महत्त्व, त्यांचे सैन्य याबद्दलचे सभासदाचे वर्णन मोठे परिणामकारक आहे. चिटणीसांनी जयसिंगाची योजना आणि त्याचे आगमन यांचे अगदी सामान्य वर्णन केले आहे. भवानी देवीचा आविर्भाव सभासदातून चिटणिसांनी बराचसा शब्दशः उचलला आहे व त्यामध्ये 'तीर्थयात्रा बहुत घडतील' एवढा मजकूर वाढविला आहे. घुसलखान्यात औरंगजेबाने स्वारीविषयी जयसिंगाशी चर्चा केली व नंतर दिलेलखानास वेगळे वाटेने अंतस्थी बोलावून आणले व शेवटी रजपूत-हिंदू एक होऊन काही फितवा करील म्हणून औरंगजेबाने दिलेलसिंगाची योजना केल्याचे सभासद सांगतो. त्या माहितीच्या जोरावर जयसिंग आल्यानंतर 'आम्ही-तुम्ही हिंदू' या भूमिकेवरून बोलाविणे लावतो, अशा प्रकारचा बराच मजकूर चिटणिसांनी रंगविला आहे.

औरंगजेबाने जयसिंगास सुभेदार म्हणून नेमिल्याचे स्वतःच्या वाढदिवसानिमत्त भरलेल्या दरबारात ३० सप्टेंबर १६६४ ला जाहीर केले (औरंगजेबनामा भा. १ पृ. ६१); तो १३ फेब्रुवारी १६६५ मध्ये औरंगाबादेस येऊन पोचला व पावसाळ्याच्या आत शिवाजीवरील मोहिमेचा निकाल लावावा या हेतूने ३ मार्च रोजी पुण्यास येऊन पोचला ( रारे पत्र क्र. १ ). ३० मार्च रोजी पुरंदरच्या चढाईस प्रारंभ केला ( पत्र क्र. ३ ) व १४ एप्रिल रोजी पुरंदरशेजारचा रुद्रमाळ किंवा वज्रगड हा किल्ला सर केला ( पत्र क्र. ४ ).

मोगलांनी वेढा उठवावा म्हणून शिवाजीने नानाविध क्लृप्त्या योजिल्या. अचानक हल्ले करून शत्रूची दाणादाण उडविणे, काळोख्या रात्रीं छापे घालणे, जंगले जाळणे या उपायाने मोगली सैन्यास मराठ्यांनी हैराण केल्याचे खाफीखान सांगतो. वज्रगड जिंकल्यानंतरही महिनाभर पुरंदर किल्ला मराठ्यांनी मोठ्या शर्तीने लढविला; आणि मेच्या मध्यास मोठा पराक्रम करून मुरारबाजी आपल्या ३०० मावळ्यांसह रणात कामास आला. त्यामुळे शिवरायांनी रघुनाथपंत यास २० मे रोजी

तहाची बोलणी करण्यास पाठविले. शिवाजीने निःशस्त्र होऊन झालेल्या अपराधाबद्दल क्षमा मागण्याच्या भूमिकेतून भेटीस यावे, असे जयसिंगाने सांगितले. ' आपल्या-ऐवजी आपला मुलगा संभाजी या रीतीने भेटायला येईल ' हा शिवाजीचा निरोप घेऊन रघुनाथपंत ९ जूनला परत जयसिंहाकडे आला. जयसिंग कबूल झाला नाही, म्हणून अचानक ११ जूनला निःशस्त्र होऊन शिवाजी सहा ब्राह्मणांसह पालखीत बसून भेटीस आल्याचे जयसिंहाने बादशाहास लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे ( रारे पृ. ६ ).

ह्या मोहिमेसंबंधीची आणि नंतरच्या आग्रा भेटीसंबंधीची यदुनाथ सरकार यांनी खुद्द जयसिंगाची पत्रे—हफ्त अंजुमन, पॅरिस आणि बनारस संग्रहांतून मिळालेली—औरंगजेबाची पॅरिस संग्रहातून हस्तगत केलेली पत्रे, आणि राजस्तान दरबारची अत्यंत महत्त्वाची अशी डिंगल किंवा राजस्तानी भाषेतील पत्रे–ह्या अस्सल साधनसामग्रीच्या साहाय्याने या सर्व प्रकरणावर फार मोठा प्रकाश टाकला आहे. त्यावरून आपल्या बखरीतील वर्णने सत्याभास निर्माण करणारी, भाबड्या स्वरूपाची व बरीच चुकीची भूमिका प्रसृत करणारी आहेत हे स्पष्ट होते.

जयसिंगाने साऱ्या सैन्याचे आधिपत्य व सारे अधिकार स्वतःकडे आग्रहाने मागून घेतले होते ( शिपसासं खं. १ पृ. २८६ ). दूरदर्शित्वाने त्याने नाकेबंदी कशी केली, पुरंदर व कोंडाणा या दोन्ही किल्ल्यांच्या मध्ये सासवडजवळ तळ ठोकण्यात त्याने कोणती मुत्सद्देगिरी दाखविली, शिवाजीच्या मुलुखा भोवतालच्या साऱ्या राजे-रजवाड्यांना, सरदारांना त्याने कसे फितवले आणि शिवाजीने ज्यांना ज्यांना दुखविले होते त्या सर्वांना आपल्या बाजूस ओढून ( शिपसासं १. पृ. २०६ ) त्याने पुरंदर व त्याच्या लगतचा रुद्रमाळ यांवर चढाई कशी सुरू केली, ही सारी अत्यंत महत्त्वाची माहिती बखरकारांना मुळीच नाही. जयसिंगाच्या चौफेर बंदोबस्तामुळे, प्रचंड सेनेच्या दक्ष उद्योगामुळे शिवाजीने आपण होऊन तहाचे बोलणे करण्यासाठी करमाजी ( गिरमाजी ) नावाचा इसम पाठविला, त्याची जयसिंगाने कशी बोळवण केली यासंबंधीचे हफ्त अंजुमानमधले त्याचे पत्र मुळातून पाहाण्यासारखे आहे ( रारे पृ. ३ ). दिलेलखानाचा तह करण्यास विरोध वगैरे बखरीतील हकीकत काल्पनिक आहे. ' जयसिंग आतून अनुकूल होता परंतु त्याने बाहेर दिसू न देण्याची खबरदारी घेतली, ' सभासदाने असे वर्णन केले आहे. जयसिंगाची पत्रे आणि त्याची औरंगजेबाच्या ठायी असलेली निष्ठा वगैरे बाबी बखरकारांना ठाऊक नव्हत्या. ' शिवाजी हलक्या कुळातला असून त्यास कपटाने मारण्यासाठी जमल्यास त्याची मुलगी आपल्या मुलास करून घेण्याचे प्रलोभन दाखविण्यास आपण कमी करणार नाही, ' असे त्याने एका पत्रात म्हटले आहे. यावरून त्याचा खरा अंतस्थ हेतू लक्षात येईल.

## पृ. १०६

**असा आग्रह त्याचा पडला**-- अस्सल कागदपत्रांचे साहाय्य नसल्यामुळे ऐकीव हकीकतींचा उपयोग करून बखरकार लिहितात. ११ जून रोजी वाटाघाट करावयास शिवाजी महाराज जयसिंगाकडे गेले त्यावेळी पुरंदरावर चाललेली लढाई पाहून अधिक मनुष्यहानी होऊ नये म्हणून महाराजांनी किल्ला ताब्यात देऊन तह करण्याचे कबूल केले. आपण इतक्या पराक्रमाने इतके दिवस लढून किल्ला जिंकत आणला, आणि शेवटच्या क्षणी तह करावयाचा प्रसंग आला, म्हणून दिलेलखान नाराज झाला, आणि त्याने बखरीत वर्णिल्याप्रमाणे पवित्रा घेतला. जयसिंगाने त्याची समजूत घालून तहास मान्यता दिली. त्यामुळे यापुढचा खान शर्मिंदा होण्याचा, निवडक लोकांनिशी किल्ल्यावर जाऊन येण्याचा आणि पृ. १०८ वरील महाराजांनी भेटीसाठी अट लादल्याने, ' रुद्रमाळ परत दिली. फौज उठविली ' इ. सारेच वर्णन हास्यास्पद आहे.

## पृ. १०९

**सरदार कोण व राजा कोण हा संदेह**---सरदार, सरकारकून, फौज पागा पंचवीसतीस हजार लोक इ. मोठ्या इतमामाने शिवाजी जयसिंगाच्या भेटीस गेला, हा साराच कल्पनेचा खेळ आहे. महाराज साध्या पोषाखात भेटावयास गेले होते, जवाहीर देखील अंगावर विशेष घातले नाही, एवढीच माहिती बरोबर आहे.

## पृ. ११०

**दिलेलखान यांचे डेरियास जावे**---तहाच्या अटी मान्य करण्यापूर्वी दिलेलखानास मोठेपणा देण्याच्या दृष्टीने महाराजांनी आपण होऊन त्याच्या भेटीस जाण्याबद्दल जयसिंगाने सुचविले व ही भेट १२ जून रोजी झाली.

**तहनामा...पूर्वी कलमें लिहिलीं** --- बखरकाराने तह काय ठरला हे मुळी सांगितलेच नाही. तहाची कलमे जयसिंहाने पत्र लिहून बादशाहास कळविली ती खालील प्रमाणे :

( १ ) बादशाही कृपेचे द्योतक म्हणून मी त्याला दिलेले बारा लहान मोठे किल्ले [ राजगड, तोरणा, लिंगमगड, भोरप, अलवारी, महाडगड, तळेगड, घोसाळा, पाल, उधेगड, रायरी, कुवारी ( शिपसासं १. पृ. २९७, राखं ८ पत्र १४ ) ] आणि एक लाख होन ( पाच लाख रुपये ) उत्पन्नाचा मुलूख एवढ्यावर शिवाजीने संतुष्ट राहून बादशाहाची अवज्ञा वा बादशाही मुलुखाची लूट करू नये. ( २ ) दख्खनच्या सुभ्याच्या अमलात हुकूम होईल तेव्हा कामगिरीवर हजर व्हावे. ( ३ ) पाच हजार स्वारांची मनसब घेऊन संभाजी-आणि दुसरा शिवाजी म्हणून प्रख्यात असलेला नेताजी

-या उभयतांनी दखनच्या सुभेदाराबरोबर असावें. ( ४ ) तळकोंकणातील चार लाख होन उत्पन्नाचा व विजापुरी बालघाटातील पाच लाखांचा मुलूख जर बादशाहाने शिवाजीला दिला आणि विजापूरकरांचा मुलूख जिंकल्यावर ह्या मुलुखाचा ताबा बादशाही फर्मानाने शिवाजीकडे कायम करून दिला तर मग दरसाल तीन लाखांच्या हप्त्याने शिवाजीने बादशाहाला चाळीस लाखांची खंडणी द्यावी ( ५ ) शिवाजीचे २३ किल्ले [ ( १ ) रुद्रमाळ किंवा वज्रगड ( २ ) पुरंधर ( ३ ) कोंढाणा ( ४ ) रोहिडा ( ५ ) लोहगड ( ६ ) इसागड ( ७ ) टंकी ( ८ ) खडकाळ ( कोंढाण्याजवळ ) ( ९ ) तिकोना ( १० ) माहुली ( ११ ) मुरंजन ( १२ ) खेडदुर्ग ( १३ ) भंडारदुर्ग ( १४ ) तुळशीखोल ( १५ ) नळदुर्ग ( १६ ) खैगड ( अंकोला ) ( १७ ) मार्गगड ( अत्रा ) ( १८ ) कोहज ( १९ ) वसंतगड ( २० ) नंगगड ( २१ ) करमाळा ( २२ ) सोनगड ( २३ ) मानगड ] व बालाघाट व निजामशाही तळकोकण मिळून चार लाख होनांचा मुलूख शिवाजीकडून घेऊन मोगल साम्राज्याला जोडण्यात यावा ( शिपसासं १. पृ. २९५; हफ्त अंजुमान रारे पृ. १३. १४ ).

( बखरकाराने पृ. ११३ वर २७ किल्ले सोडल्याचे लिहिले आहे, ते अर्थातच चुकीचे होय. ) 'जंजिरा आम्हांकडे देववावा' या मागणीस पादशाहाने मान्यता दिली नाही, ह्या बखरीतील हकीकतीस यदुनाथ सरकार दुजोरा देतात ( सशि १३५ ) परंतु आधार देत नाहीत.

## पृ. १११

**पादशाहाची उत्तरें...उभयतां निभावणीस बाहादारीस**—हा सर्व मजकूर एकजात चुकीचा आहे. बादशहाला जयसिंगाने लिहिलेले तहांच्या अटीविषयींचे पत्र वर दिले आहे. त्यामध्ये दिल्लीस जाण्यासंबंधीचा उल्लेख नाही. औरंगजेबाने पाठविलेल्या उत्तरात, 'शिवाजीचे गुन्हे माफीजोग्या नाहीत, परंतु राजा जैसिंगाच्या लिहिल्यावरून आपण १२ किल्ले देण्याची मेहेरबानी करीत आहोत' असे म्हटले आहे व विजापूर मुलुखाबद्दलच्या शिवाजीच्या मागणीस, 'विजापूर आमचे हाती येईल त्याआधी तुम्ही त्याजकडून घेतल्यास व चांगले फौजेसुद्धा राजे जैसिंग यांस मिळून बादशाही कामात त्यांच्या मर्जीप्रमाणे कोशीस केल्यास, विजापूर फत्ते झाल्यानंतर तुम्ही पेशकसीचे ऐवजाचा भरणा केल्यास तुम्हांकडे बहाल ठेवू' ( शिपसासं १. २९७, राखं ८. १४ ) असे सांगून तोंडास पाने पुसली आहेत. यामध्ये जंजिरा वगैरे प्रकरणाचा नामोल्लेखही नाही.

**किल्लेकऱ्याची परीक्षा**—पुरंदरच्या तहामुळे शिवाजीची मोठी मानहानी झाली, इतक्या वर्षांच्या परिश्रमावर पाणी पडले व हाती राहिलेले किल्ले व मुलूख म्हणजे एखाद्या मांडलिकाची अवस्था झाली, इत्यादी प्रकारामुळे त्या मानी पुरुषास काय यातना झाल्या असतील याची बखरकाराच्या वर्णनावरून यत्किंचितही

कल्पना येत नाही. उलट पन्हाळ्याच्या किल्लेकऱ्याची परीक्षा घेतल्याची ही भलतीच हकीकत बखरकार देतो. खरे म्हणजे तहान्वये शिवाजी जयसिंग, दिलेरखान यांजबरोबर डिसेंबर १६६५ मध्ये विजापुरावर चाल करून जातो. तेथून आपण विजापूरकरांच्या मुलखातील पन्हाळा सहज जिंकून देऊ असें सांगून सटकतो व पन्हाळ्यावर चढाई करतो. या लढाईत पन्हाळा जिंकण्यात शिवाजीस अपयश येते. या वेळी 'आदिलशाहा स्वतः येत आहे, दरवाजा उघडा' असा निरोप गडकऱ्यास पाठविल्यानंतर विजापूरकरांचा दक्ष गडकरी या काव्यास बधत नाही, असा इतिहास आहे. पुढे पन्हाळ्याचा वेढा उठवून शिवाजी गोव्यामध्ये फोंड्यावर चढाई करतो, तेथे सिद्दी जोहरचा मुलगा व रुस्तुमजमा त्याजवर चालून येतात, तेव्हा तेथील वेढा टाकून त्याला परत यावे लागते. अशा रीतीने १६६५ चे सारे वर्ष शिवाजीच्या दृष्टीने मोठे प्रतिकूल ठरते. बखरकाराला शिवचरित्रातील या इतक्या महत्त्वाच्या घडामोडींची काहीच माहिती नसावी याचे आश्चर्य वाटते.

## पृ. ११३

**देशी राजाराम यांस ठेविलें**—राजारामाचा जन्म २४ फेब्रु. १६७० रोजी झाला ( शका. शिचप्र पृ. २४ ). या ठिकाणी त्याचा उल्लेख अप्रस्तुत होय.

**दिल्लीस जाण्याचा विचार**—शिवाजीची व औरंगजेबाची भेट दिल्लीस न होता आग्र्यास झाली. औरंगजेबाच्या कैदेत असलेला शहाजहान २२ जानेवारी १६६६ रोजी निवर्तला. औरंगजेबाने त्यामुळे आपला वाढदिवस १२ मे १६६६ रोजी आग्र्याच्या नव्या राजधानीत करावयाचे ठरविले. आपले वैभव दाखवावे या हेतूने व शिवाजीच्या पराक्रमाच्या हकीकती ऐकून असा पराक्रमी शूर व धाडसी योद्धा एकदा प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहावा या हेतूने ( FBS p. 115-127 ) बादशाहाने जयसिंगाकरवी खूप आग्रह केला म्हणून शिवाजी आग्र्यास जावयास निघाला. दुसरे एक मत असे आहे की मार्चे विजापूरकरास कुतुबशहा सामील झाल्याने विजापूर शहर १६६६ पर्यंत हरप्रयत्ने करूनही जयसिंगास जिंकता आले नाही, अशा अवस्थेत शिवाजीही विजापूरकरास सामील होईल या भीतीने जयसिंगाने हजारो युक्त्या करून शिवाजीचे मन भेटीसाठी तयार केले ( शिपसासं १·३०७ ). पुरंदरच्या तहाच्या वेळी 'स्वतःस बादशाहाची प्रत्यक्ष सेवा करण्याचा आग्रह करू नये,' अशी अट घालूनही शेवटी शिवाजीला जावे लागले ते जयसिंग व औरंगजेब या दोघांच्या मसलतीमुळेच असे म्हणावे लागते. औरंगजेबाच्या भेटीमुळे शिवाजीस दख्खनची सुभेदारी मिळेल, असे आमीष जयसिंगाने दाखविले होते आणि ती शक्यता लक्षात घेऊन व जयसिंगाकडून आपल्या सुरक्षिततेची शपथ घेऊन ( शिपसासं १·३३७ ) शिवाजी आग्र्यास जावयास निघाला.

**बरोबर बाळाजी आवजी**— बाळाजी आवजी, प्रतापराव गुजर, कंक,

मालुसरे, देशपांडे ही नावे सभासद देत नाही. चिटणीस व शिवदिग्विजयकारच फक्त बाळाजी आवजी बरोबर असल्याचे सांगतात. प्रतापराव गुजराचे नाव ९१ कलमी बखरीतून ( कलम ५२ ) चिटणिसांनी घेतले आहे.

## पृ. ११४

**पांच चार हजार पागा व फौज पांच हजार**—सभासद ' मावळे लोक एक हजार, लष्कर तीन हजार ' हा आकडा देतो. चिटणिसाने वरील आकडा ९१ कलमी बखरीतून घेतला आहे. राजस्तानी पत्रे शिवाजीबरोबर २०० ते २५० लोक असून त्यांतील १०० शिलेदार व बाकीचे बारगीर असल्याचे सांगतात. ( पत्र क्र. २१ ). डच कागदपत्रे ' ७०० स्वार ' असल्याचे सांगतात.

**रामसिंग...बराबर दिल्हे**—रामसिंग दिल्लीसच होता. जयसिंगाने गाजीबेग नावाचा सरदार बरोबर दिला होता.

**मथुरा...चोबा ब्राह्मण**—शिवाजी दिल्लीस न जाता आग्र्यास गेला, त्यामुळे ही कथा संभवत नाही.

## पृ. ११४-१५

**दिल्लीस आगमन... दरबार इ.**—राजस्तानी पत्र क्रमांक १६ मध्ये या प्रकरणाची विस्तृत हकीकत दिली आहे. शिवाजीने ११मेस आग्र्यास यावे असे पत्र औरंगजेबाने अगोदरच पाठविले होते ( रारे क्र. १४ ) म्हणून वेळेवर पोचण्याच्या उमेदीने शिवाजी आग्र्याकडे चाल करू लागला. परंतु आग्र्यास पोचण्यास त्याला एक दिवस उशीर झाला, म्हणजे तो बारा मेस पोचला. त्याच्या सत्काराची नीट व्यवस्था झाली नाही. शिवाजी आपल्या पुत्रासह दरबारात पोचला त्यावेळी मुख्य दरबार संपवून बादशाहा घुसलखान्यात ( दिवाण–इ–आम ) मध्ये बसला होता. शिवाजीने त्याची भेट घेऊन त्याला नजराणा दिला तेव्हा बादशाहाने त्याच्याकडे नीट पाहिलेही नाही. ' त्याला दरबारात पंचहजारी मनसबदाराखाली उभे राहण्याची आज्ञा केली. शिवाजी त्या संतापाने बेभान झाला इ. ' बखरीतील हकीकत बरोबर आहे.

## पृ. ११५-१६

बखरीतील हकीकत स्थूलमानाने बरोबर आहे. राजस्तानी पत्र क्र. १७ वरून लक्षात येते की, दरबारात झालेल्या अपमानानंतर अनेक प्रकारे समजूत घालूनही शिवाजीने पुन्हा दरबारात पाऊल टाकण्यास नकार दिला. त्यामुळे औरंगजेबाची बहीण जहानआरा, व जसवंतसिंगादी सरदारांनी शिवाजीचे वागणे राजद्रोहाचे असून त्याला त्याबद्दल शिक्षा करणे योग्य होय, अशी मागणी

करावयास सुरुवात केली. त्यामुळे बादशाहाने त्याला ठार मारण्याचा निर्णय घेतला. तेव्हा रामसिंगाने आपल्या वडिलातर्फे त्याच्या सुरक्षिततेचा शब्द गेला असल्याचे सांगितले. मग बादशहाने रामसिंगकडून शिवाजीबद्दल लेखी हमी लिहून घेतली व दोघांची काबूलच्या सुभ्यावर नेमणूक केली. शिवाजीने या गोष्टीस नकार दिला. शिवाजीने भर दरबारात दाखविलेले धैर्य आणि त्यानंतर बादशाहाने वारंवार बोलावूनही त्याची आज्ञा धुडकावून लावण्याचा त्याचा करारी बाणा पाहून साऱ्या आग्र्यात त्याच्याबद्दल लोक मोठ्या कौतुकाने बोलू लागले.

## पृ. ११६-१७

**निरोप देणें ठीक नाहीं इ.**—शिवाजीने रामसिंग व इतर सरदारांकरवी आपणांस मनसब देऊन दक्षिणेत पाठवावे, यासंबंधी खटपट चालविल्याचे बखरीतील वर्णन ऐतिहासिक पुराव्याधारे रास्त ठरते. जाफरखानास शिवाजीने पैसे चारून आपली बाजू मांडण्यास प्रवृत्त केल्याची हकीकतही खरी आहे (पत्र क्र. २१). 'आपली बादशाहाच्या चरणी अतिशय निष्ठा असून आपले सर्व किल्ले आपल्या स्वाधीन करण्याचा करार करून बादशहाने आपणास सोडावे. त्यासाठी आपण दोन कोटी रुपये द्यावयास तयार आहोत. बादशाहा सांगेल तेथे मोहीम करू' असे बोलणे शिवाजीने निरनिराळ्या सरदारांकरवी बादशहाकडे लावले. तेव्हा 'शिवाजीचे डोके फिरले आहे, त्याला इथून जाण्याची परवानगी मिळणार नाही असे त्याला निक्षून सांगा व यापुढे त्याने कोणाची भेट घेता कामा नये' अशी औरंगजेबाने आज्ञा केली व त्याच्या भोवती चौक्या पहारे बसविले. चौक्या बसविल्यानंतर शिवाजीने राहिलेले सारे किल्ले हवाली करण्याचे कबूल करावे, असे बादशाहाने बोलणे लावले, परंतु शिवाजीने त्याला नकार दिला (पत्र क्र. २३).

**फौज पागा लोक...त्यांस जावयास सांगितले**—पत्र क्र. २३ व २४ वरून ही माहिती अगदी बरोबर ठरते. पत्र. क्र. २५ मध्ये शिवाजीने आपणाला संन्यास घ्यावयाचा आहे, म्हणून काशीला जाण्याची परवानगी मागितली. बादशहाने त्याला प्रयागच्या किल्ल्यात बंदोबस्ताने पाठविण्याची तयारी दर्शविली, तेव्हा शिवाजीला गप्प राहावे लागले. शिवाजीने जुलैच्या पहिल्या आठवड्यात पहारेकऱ्याचे हात ओले करणे, अधिकाऱ्यांना मेवामिठाई वाटणे इत्यादिकांसाठी रामसिंगाकडून ६६ हजार रुपये घेतले आणि तितक्या रकमेची त्याला हुंडी देऊन महाराष्ट्रातून पैसे घेण्यास सांगितले.

**निघून गेले, नाहींत**—१८ ऑगस्ट १६६६ (पत्र क्र. २९). तत्कालीन युरोपीय प्रवासी ॲबे कॅरे याने बखरीतल्याप्रमाणेच मिठाईच्या टोपल्यांची हकीकत दिली आहे. मात्र शिवाजी एकटाच पेटाऱ्यात बसून निसटला व संभाजी अटकेत नसल्याने ठराविक ठिकाणी जाऊन त्यास मिळाला असे त्याने वर्णन केले आहे.

**रामसिंगवर संशय...तालुकेदारास पत्रें**—पत्र क्र. ३३–३७ वरून औरंगजेबाने रामसिंगवर संशय घेऊन त्याची मनसब जप्त केल्याचे आणि बादशाहाने सगळीकडे पत्रे पाठवून शिवाजीस रोखून धरण्याचे फर्मान काढल्याचे कळून येते.

**मथुरेस जाऊन पोंचले**—खाफीखानाने शिवाजी दोन प्रहरी मथुरेत पोचला व दाढीमिशा काढून राख फासून तो पुढे गेला व संभाजी थकल्यामुळे अलाहाबादेत त्याला कबकलश नावाच्या ब्राह्मणाकडे ठेविले, असे लिहिले आहे.

**वीस बेवीस महिन्यांत** - शिवाजी महाराज तीर्थयात्रा करीत बसले अशा भाबड्या समजुतीने बखरकार वीस बावीस महिन्यांचा काळ देतो. शिवाजीमहाराज फक्त २५ दिवसांत (१२ सप्टेंबरच्या सुमारास) राजगडावर पोचले (पत्र क्र. ५७). झालेल्या दगदगीमुळे ते काही दिवस आजारी होते. इतक्या कडक बंदोबस्तातून ते २५ दिवसांत सुरक्षित येऊन पोचले, परंतु ते निश्चितपणे कोणत्या मार्गाने, कशा रीतीने आले, यासंबंधाने विश्वसनीय माहिती उपलब्ध नाही.

## पृ. १२२

**गरीब कुळवाडी, त्याची वृद्ध आई**—९१ कलमी बखरीतील ५६ व्या कलमावरून चिटणिसाने हे वर्णन सजविले आहे.

**मार्गशीर्ष वद्य दशमी**—जेधे शकावली मार्ग. शु. ५ (२० नोव्हें. १६६६) ही मिती देते. दोन्हीही चुकीच्या आहेत.

## पृ. १२३

**जयसिंग याचा सुभा तगीर**—रामसिंगाला दरबार बंद करून त्याची मनसब दूर केली, महाराज राजगडी पोचल्याचे ऐकून जयसिंग संतापला आणि आपल्या निष्ठेची ग्वाही देण्यासाठी जाफरखानाला लिहिलेल्या पत्रात शिवाजीची मुलगी आपल्या मुलास करून घेण्याचे बोलणे लावून शिवाजीचा काटा काढण्याची मनीषा त्याने बोलून दाखविली (सशि पृ. १५६). बादशाहाच्या आज्ञेनुसार नेताजी पालकरास त्याच्या मुलाबाळासुद्धा अटक करून त्याला मुस्लीम धर्माची दीक्षा देववून अफगाणिस्तानामध्ये १० वर्षे नोकरी करण्यासाठी जयसिंगाने पिटाळले. इराणची स्वारी आल्याने बादशाहाने जयसिंगास दक्षिणेतून परत बोलाविले. परंतु दुःखातिरेकाने तो वाटेतच २८ ऑगष्ट १६६७ ला मरण पावला.

**विश्वासराव ऐसा किताब**—ही हकीकत एकंदरीत दंतकथेसारखी वाटते. परंतु त्यांना दिलेले बक्षीसपत्र उपलब्ध आहे (शिपसासं २. ४१३).

## पृ. १२४

**बाळाजी आवजी...चिटणीस योग्य**— शिवदिग्विजयामध्येही असाच गम-

तीचा किस्सा आढळतो. आपल्या खापरपणजोबाचे कौतुक करण्याची लहर, याखेरीज ऐतिहासिकदृष्ट्या या चुटक्याला महत्त्व नाही.

**संभाजी विवाह**—निश्चित मिती उपलब्ध नाही. १६६१ ते ६५ च्या दरम्यान झाला ( बेंसं पृ. ६४० ).

## पृ. १२५

**सत्तावीस किल्ले ठाणीं व बागलाण घेतले** — सभासदाच्या बखरीतील माहिती आणखी विपर्यस्त रीतीने चिटणीस कशी देतात, याचा हा उत्तम नमुना होय. राजांनी अगोदर कोंडाणा घेण्याची कामगिरी तानाजीकडे सोपविली व तेथे त्यास मृत्यू आला व गड फत्ते जाला अशी हकीकत देऊन सभासदाने ' पुढे मोरोपंत पेशवे याणी व निळोपंती व अंणाजीपंतीं व मावळे यांणीं सवीस गड ऐसेच ख्यात करून चौ महिन्यांनी घेतले ' अशी माहिती दिली आहे. सभासद व चिटणीस यांची ही सारी माहिती चुकीची आहे. सभासदाने तर हे सारे किल्ले काबीज केल्यानंतर संभाजी मथुरेहून आला असे सांगितले आहे. सभासद व बुंदेल्यांची बखर यांच्या अनुकरणातून चिटणिसांनी अशी सरधोपट वर्णने केली आहेत. ऐतिहासिकदृष्ट्या असे दिसते की, संभाजी एप्रिल १६६७ मध्ये परत आला. शिवाजी महाराजांनी २२ एप्रिल रोजी औरंगजेबास पत्र लिहून बादशाहाचा आपण बंदा सेवक असल्याची वतावणी केली व संभाजीची मनसब चालू ठेवण्यास विनंती केली ( शिपसासं १. पृ. ३२३ ). मे महिन्यामध्ये विजापूरकरातर्फे बहलोलखान व व्यंकोजी रांगण्यावर चालून आले. महाराजांनी त्या दोघांचा मोड करून उखळून लावले व कोकणात उतरून लखम सावंतावर चढाई केली. त्याच्या मदतीस एखलासखान आल्यामुळे नाममात्र पराभव स्वीकारून कुडाळजवळच्या बारदेशवर स्वारी करून पोर्तुगीजांच्या धार्मिक अत्याचाराला आळा घालण्याच्या दृष्टीने पोर्तुगीज पाद्र्यांचा शिरच्छेद केला. इकडे त्याच सुमारास शाहाजादा मुअज्झम उर्फ शहाआलम याची दक्षिणचा सुभेदार म्हणून रवानगी झाली. औरंगजेबाने ६ मे रोजी फर्मान पाठवून शिवाजीराजांचे सर्व गुन्हे माफ केल्याचे व संभाजीस मनसबदार नेमल्याचे जाहीर केले ( रारे पृ. ६५ ). या फर्मानाद्वारे शिवाजीस विजापुरी मुलुखावर हवे तसे हल्ले करून तो मुलूख जिंकण्यास परवानगी मिळाली आणि त्याचा फायदा घेऊन १६६८ ते १६७० या दोन वर्षांत दक्षिण व उत्तर कोकण जिंकून भराभर आपली ठाणी बसवावयास शिवाजीराजांनी प्रारंभ केला. बादशाहाने पुढे जिंकलेल्या मुलुखातील देशमुखी वसूल करण्यास त्यांस परवानगी दिली ( रारे पृ. ६६ ) व लवकरच त्यांस ' राजे ' हा किताब बहाल केला ( राखं ८ ले. १७, शिपसासं क्र. १२०० ).

## पृ. १२५–२७

**पुत्र शाहाजाहा यास सुभेदारी...तह**—वर दिलेल्या हकीकतीवरून शाहाजादा मुअझ्झम येण्याअगोदर महाराजांनी आपण होऊन सलोख्याचे बोलणे लावले होते, हे लक्षात येईल. शाहाजादाबरोबर राजा जसवंतसिंग याची रवानगी करण्यात आली होती, त्याला उद्देशून 'भावसिंग' असे बखरीत म्हटले आहे. 'द्रव्याचे लालची, पेंडींचे ढोर' हे शब्दप्रयोग सभासदाने बहादूरशहास उद्देशून वापरले आहेत. चिटणीस बिनदिक्कतपणे ते शाहाजाद्यास लावून मोकळा होतो. शाहाजादा येण्याअगोदर दिलेरखान, बहलोलखान, बहादर खान व एखलासखान या सर्वांनी मिळून इंद्रायणीनजीक युद्ध केल्याचे बखरीतील वर्णन सालेरीच्या युद्धाचे म्हणजे १६७० मधील आहे. करंजे शहर मारले, बऱ्हाणपूरचे पुरे लुटले इ. (पृ. १२५) वर्णन चे १६७० मधले आहे. घटना हव्या तशा मागे पुढे करण्यात चिटणिसांनी हद्द केली आहे. भावसिंग व बाळाजी आवजी यांच्या भेटीची वर्णने मुद्दाम बाळाजी आवजीचे मोठेपण वर्णन करण्यासाठी दिलेली आहेत. महाराज आग्र्याहून सुटले तेव्हा त्रिंबकपंत डबीर व रघुनाथ बल्लाळ कोरडे यास औरंगजेबाने अटकेत ठेविले होते. पुढे त्यांना सोडून देण्यात आले. रघुनाथ बल्लाळ कोरड्यांकडे ही वकिली सोपविली होती. रघुनाथ बल्लाळ हे नाव रघुनाथ बाळाजी असे लिहिले जाते त्यावरून बखरकारास आपल्या पूर्वजांचे मोठेपण वर्णिण्याचे सुचले असावे ! जसवंतसिंगाचा भावसिंग, रघुनाथ बल्लाळचा बाळाजी आवजी असा फेरबदल लेखणीच्या एका फटकाऱ्यासरशी चिटणीस करून टाकतात झाले !!

## पृ. १२७

**सत्तावीस किल्ले बांधारी...याप्रो तहनामा**—तहनाम्यातील मजकूर सभासदावरून दिला असला तरी आपल्या पद्धतीप्रमाणे बखरकाराने त्यातही घालमेल केली आहे. 'संभाजीस हप्तहजारी करण्याचे व त्याबद्दल वऱ्हाड व खानदेश या पंधरा लाख होनाच्या मुलुखाचा मोकासा द्यावयाचे व त्याजबरोबर एक सरदार व फौज व एक मातबर ब्राह्मण शिवाजीने पाठवावयाचा' असे (पृ. १२८) या तहान्वये ठरले (शिपसासं क्र. ११५८).

**फौज सरनोबत घालवून द्यावे**—शिवाजी व शाहाजादा एक होतील अशी शंका आल्यामुळे औरंगजेबाने तह मोडण्याची आज्ञा केली ही हकीकत व शाहाजाद्याने मराठ्यांस अगोदर कळवून सावध केले, इ. हकीकत मूळ सभासदाने दिली आहे. शाहाजादा मुअझ्झम व शिवाजी यांचे आतून संगनमत आहे, अशी तक्रार दिलेलखानाने औरंगजेबाकडे केली असल्याचे व शिवाजीच्या प्रोत्साहनाने औरंगजेबाविरुद्ध

शाहाजादा बंड करण्यास प्रवृत्त झाल्याची पत्रे सुरतेच्या इंग्रजांनी व वेंगुर्ल्याच्या डचांनी लिहिली आहेत, ( शिपसासं १. पृ. ३६१–६२, २. ३७४ ) त्यावरून या वर्णनास दुजोरा मिळतो.

**त्यांशीं युद्ध करून... दबाऊन सारले**—हे वणी-दिंडोरीचे युद्ध होय ( १७ ऑक्टो. १७६० ). या युद्धात खुद्द महाराज हजर होते. सभासदाने या युद्धाचे मोठे परिणामकारक वर्णन केले आहे. चिटणिसांनी या महत्त्वाच्या प्रसंगाचे इतके रंगहीन वर्णन केले आहे की, त्या वर्णनावरून हे वर्णन कोणत्या प्रसंगाचे हे कळण्याची देखील पंचाईत व्हावी. या युद्धामध्ये दिलेलखान नव्हता. दिलेलखान व शाहाजादा यांमध्ये वितुष्ट येऊन ऑगष्ट १६७० मध्ये दिलेलखानास वठणीवर आणण्यासाठी शाहाजादाने त्याच्यावर स्वारी केली. औरंगजेबाने मध्यस्थी करून हे प्रकरण सप्टेंबरमध्ये मिटविले होते. या वितुष्टामुळे वणी–दिंडोरीच्या लढाईत दिलेलखान-ऐवजी दाऊदखान क्युरेशी हा होता.

**कोणारगड येथें रुमाजी नळगे**—सालेरीचा किल्ला जिंकल्याचे न सांगताच बखरकाराने या कोणारगडच्या युद्धाचे वरच्यासारखेच अगदी सामान्य पद्धतीने वर्णन केले आहे. दाऊदखानास शिवाजीचा बंदोबस्त करता आला नाही म्हणून औरंगजेबाने त्यास परत बोलाविले व शिवाजीचा बंदोबस्त करण्यासाठी महाबतखान, बहादूरखान व दिलेरखान यांची रवानगी केली. या कोणारगडच्या लढाईत मोठ्या पराक्रमाने लढून धारातीर्थी पडलेल्याचे नाव रामाजी पांगेरा म्हणून सभासदाने दिले आहे. शिवभारतामध्ये ( अ. २२-३ ) अफजलखानाच्या सैन्यावर आपल्या हजार पायदळानिशी तुटून पडणारा वीर म्हणून 'रामः पांगरिकः' याचे वर्णन केले आहे. तोच हा पांगेरा. चिटणिसाने रुमाजी नळगे हे नाव का व कुठून दिले आहे, हे कळत नाही.

## पृ. १२९

**नंतर सालेरीस खान जाऊन**—सभासदाच्या वर्णनावरून हे युद्ध मागील दोन युद्धांपेक्षा मोठे घनघोर स्वरूपाचे झालेले दिसते. या लढाईत भाग घेतलेल्या मराठी सरदारांची इतकी मोठी यादी सभासदाने दिली आहे व चिटणीसांनी ती जशीच्या तशी उचलली आहे. ही लढाई १६७२ मध्ये फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात झाली ( शक। शिचप्र. पृ. २५, शिपसासं २ पृ. ४०९ ). सभासद व चिटणीस यांनी 'बहिलोलखान पाडाव आला,' असे म्हटले आहे. सुरतेहून पाठविलेल्या मॅथ्यू ग्रेच्या पत्रात दुसऱ्या एका लढाईत शिवाजीने बहलोलखानाला ठार मारल्याचा उल्लेख आहे, त्याअर्थी मोगलाकडेही एक बहलोलखान होता असे दिसते.

**गांठ उंबरटीं तालुकियांत**— जत तालुक्यातील उमराणी या गावी १५ एप्रिल १६७३ रोजी ही लढाई झाली. या वेळीं बेहेलोलखान हाती सापडला असताही त्याला सोडून दिले, म्हणून शिवाजीचा प्रतापरावावर रोष झाल्याचे बखरी सांगतात. सालेरीच्या युद्धात बेहेलोलखान पाडाव आला असता त्याला महाराजांनीच सोडले असे बखरकारांनी अगोदरच वर्णन केले असता तीच गोष्ट प्रतापरावाने केल्यानंतर महाराजांनी का रागवावे, असा प्रश्न पडतो. बखरकारांनी या लढाईपूर्वी अण्णाजी दत्तो यांनी पन्हाळा किल्ला जिंकल्याची हकीकत गाळली आहे. त्या लढाईच्या निमित्ताने जयराम नावाच्या कवीने 'पर्णालपर्वतग्रहणाख्यान' नावाचे संस्कृत काव्य लिहिले आहे. त्यामध्ये उमराणीच्या लढाईत बहलोलखानास पळून जाण्याचा मार्ग प्रतापरावानेच दाखविला, आणि त्यामुळे तो पळून गेल्याचा उल्लेख आहे ( पृ. ४९ अ. ५ श्लो. १०५ ). बहादूरखान वगैरे मोगली सरदारांचे हात दाबून त्यांना निष्क्रिय करण्यात यावेळीं महाराजांनी मोठे यश मिळविले होते. तोच प्रयोग प्रतापरावावर झाला असण्याची शंका महाराजांना आली असणार !

## पृ. १३०

**प्रतापराव रणीं ठार पडिले**—हे युद्ध निवस्याजवळ २४ फेब्रु. १६७४ रोजी झाले ( शका. शिचप्र पृ. २६ ). फक्त ६ घोडेस्वारांनिशी लढताना बाकीच्या सैन्याच्या अभावी तो मारला गेला ( शिपसासं क्र. १६२५ ).

**हंबीरराव सरनोबत**—८ एप्रिल १६७४ (राखं ८ पृ. २३, शका. शिचप्र पृ. २७ ).

## प्रकरण षष्ठ

### पृ. १३२

**पंडितांचा सहवास**—युवराजशिक्षणासाठी कोणकोणत्या पंडितांची व वृद्ध सेवकांची योजना केली होती, यासंबंधाची निश्चित माहिती उपलब्ध नाही. संभाजी राजांनी आपल्या वयाच्या १६–१७ व्या वर्षी 'बुधभूषण' नावाचे संस्कृतकाव्य केशवभट्टांच्या साहाय्याने लिहिले आहे. या ग्रंथाच्या प्रास्ताविकात संभाजीराजे, 'आपण काव्यालंकार, शास्त्रे, पुराणे, संगीत आणि धनुर्विद्या यांचा सखोल अभ्यास केला असल्याचे व आपल्या पुस्तकातील साधनसामग्री पुरातन लेखकाच्या ग्रंथाचा सूक्ष्म अभ्यास करून घेतला असल्याचे' सांगतात. संभाजीचे गुरू केशवपंडित यांचे 'दण्डनीतिप्रकरणम्' प्रसिद्ध झाले आहे, त्याअर्थी संभाजीचे राजनीतिविषयक अध्ययन या केशवपंडितांपाशी झाले होते, असे दिसते.

चिटणिसांनी युवराजास शिक्षण देण्यासंबंधीची राजांची जबाबदारी व युवराजधर्म यासंबंधी आपल्या 'राजनीति' या ग्रंथात, चवथ्या प्रकरणात विस्तृत चर्चा केली आहे, त्याचाच सारांश येथे आढळतो.

संभाजी व राजाराम यांच्या विद्याभ्यासाची सोय एकत्रित करण्यात आली, असा बखरकाराचा रोख आहे. तो बरोबर नाही.

### पृ. १३३

**यदु आदिकरून**—हा संदर्भ महाभारताच्या आदिपर्वातील ( अ. ८२-८४ ) होय. ययाति नावाच्या राजास वृद्धपणी तारुण्य प्राप्त व्हावे, अशी इच्छा झाली. त्याच्या मुलांपैकी कोणी स्वेच्छेने आपले तारुण्य दिल्यास त्याची इच्छा पुरी होईल, असा त्यास वर मिळाला. यदु आदिकरून पहिल्या चार मुलांनी या गोष्टीस नकार दिला. ययातीने त्यांना म्हणून शाप देऊन राज्यभ्रष्ट केले. शेवटचा पुत्र जो पुरू तो या गोष्टीस तयार झाला व त्याला ययातीपासून राज्यप्राप्ती झाली.

**बंधुहेळणा करून...दुर्योधनादि**—कौरवांनी भावांचा तिरस्कार केल्यामुळे भारती युद्ध घडले, हा संदर्भ.

**दरबारांत बसावें, कारभारात माहीत होत जावें**— वयाच्या आठव्या वर्षीच संभाजीस मोगलांची पंचहजारी मनसबदारी मिळाली. राजा जयसिंगाच्या सान्निध्यात, आग्र्यास औरंगजेब याच्या दरबारात राजा रामसिंग याच्या बरोबरीने त्याला वावरण्यास लहानपणीच संधी मिळाली. आग्र्याहून परत आल्यावर शाहाजादा मुअझ्झमबरोबर औरंगाबादेस तो सप्तहजारी मनसबदार म्हणून वावरला.

लहानपणीच राजदरबार व राज्यकारभार यांचे त्याला अव्वल दर्जाचे स्वानुभवावरूनच शिक्षण मिळाले होते. बखरकार हे सर्व लक्षात घेत नाही.

**रामदासस्वामी यांचे दर्शन सहवास** — शिवदिग्विजयकाराने तर, ' ज्येष्ठ पुत्राची चाल चांगली नाहीं म्हणोन शिक्षागार ठेविले. राजपुत्र परम विनयतेनीं महाराजांनीं त्यांचे स्वाधीन केले, व श्री स्वामी समर्थांस विनंती केल्यावरून श्रीसमर्थांनी राजपुत्रास नीति सांगितली. ती दासबोधांतील एकादश दशक, पाचवा समास सांगितला. राजउपाध्ये यांणीही राजनीति विद्याभ्यास सांगितले ' असे वर्णन केले आहे. पृ. ४०४-४०२ वर ( शिवदिग्विजय ) समर्थांनी नानाप्रकारे संभाजीस शिकविले असता, राजांच्या मनात राहिना, म्हणून कंटाळून समर्थांनी त्याला महाराजांकडे परत पाठवून दिले, असे वर्णन आहे.

**निळो सोनदेव...वारले**—शके १५९५ माघ व॥ १४ शिवरात्रीस ( जेधे शकावली ).

## पृ. १३४

**नारोपंत नाकाबिल**—नारोपंत नाकाबिल असल्याची माहिती सभासदाने सांगितली. सभासदाने आपले चरित्र राजाराममहाराजांच्या कारकीर्दीत लिहिले असल्यामुळे व त्यावेळी अमात्य म्हणून रामचंद्रपंतांची उज्ज्वल कारकीर्द पुढे असल्याने सभासदाने नारोपंतांना नाकाबिल ठरवून रामचंद्रपंताचे मोठेपण वर्णिले असणे शक्य आहे. परंतु त्याच सभासदाने राज्याभिषेकाच्या वेळी निळो सोनदेवाचे मुलगे नारो निळकंठ व रामचंद्र नीळकंठ दोघेही मजमुदार म्हणून उभे असल्याचे वर्णन केले आहे.

## पृ. १३५

**रघुनाथ नारायण बहुत कर्ते व शाहाणे**—रघुनाथ नारायण हणमंते यांच्याबद्दलचे तीनचार पृष्ठांतून दिलेले सारे वर्णन अनैतिहासिक आहे. दक्षिण-दिग्विजयाची हकीकत राज्याभिषेकानंतर घडली असता चिटणीस हे सारे वर्णन राज्यभिषेकापूर्वी देतात, याचे कारण, ' राज्याभिषेक हा शेवटचा गोड घास म्हणून तो विषय शेवटी सप्तमप्रकरणात ठेविला असावा ' असे रा. ब. साने यांना वाटत असले तरी ( शशिछम पृ. २९५ ) तो केवळ तर्क होच. सभासदाने राज्याभिषेकानंतर दक्षिणदिग्विजय वर्णिले असताना चिटणीसांनी तो मुद्दाम अगोदर दिला आहे. आणि त्यासाठी हेतुपुरःसर मित्याही बदलल्या आहेत. चिटणीसांनी असा बदल करण्याचे कारण ' सभासदी बखर ' व ' ९१ कलमी बखर ' ह्या दोन्ही बखरींचा बारकाईने तुलनात्मक अभ्यास केला आणि या बखरींबरोबरच समर्थ रामदासांचे चरित्र व ' तंजावरचे राजघराणे ' या पुस्तकांत छापलेली शिवाजी

महाराजांची दोन पत्रे लक्षात घेतली की चिटणीसांचा सारा बनाव अगदी स्पष्ट होतो. कसा तो पाहा :—

( १ ) सभासदी बखरीत हंबीरराव सरनोबत झाले, ही हकीकत सांगितल्यानंतर पुढे लिहिले आहे, ' त्यानंतर शाहाजी राजे पडले. विजापुरचे पादशहांनी त्यांची दौलत, त्यांचे धाकटे पुत्र व्यंकोजी राजे होते त्यांस दिधली. नारो दीक्षित कुलकारभारी महाराजांचे होते, ते मृत्यु पावले. त्यांचे पोटी रघुनाथ नारायण व जनार्दन नारायण हे दोघे बंधु सर्व विद्येने निपुण व राजकारणी, बुद्धिवंत, चतुर, शाहाणे होते. त्यांचा व व्यंकाजी राजांचा बनाव बसेना. मग ते उभयता बंधु त्याजजवळून निघून राजियाकडे आले...राजे सामोरे जाऊन भेट घेतली. ' ( पृ. ७७ )

ह्या भेटीचे वर्णन दिल्यानंतर सभासदाने हंबीरराव व हुसेनखान मायणा यांच्या युद्धाचे वर्णन देऊन कोपल किल्ला व तुंगभद्रापावेतो देश हस्तगत झाल्याचे सांगितले आहे. या युद्धानंतर राज्याभिषेकाचे वर्णन आहे. कोपलचे युद्ध इ. स. १६७७ मधले, तर राज्याभिषेक १६७४ मधला. सभासदाच्या या वर्णनामुळे चिटणिसांना दक्षिणदिग्विजय राज्याभिषेकापूर्वीचे वाटले असणे शक्य आहे.

( २ ) तसे वाटण्यास ९१ कलमी बखरीचा आधारही होता. या बखरीत दक्षिणदिग्विजयातील सारी कलमे राज्याभिषेकापूर्वी वर्णिलेली आहेत.

( ३ ) पाचवे प्रकरण संपल्यानंतर चिटणिसांनी चरित्र पुढे लिहावयास घेतले, तेव्हा क्रम ९१ कलमी बखरीतला त्यांनी स्वीकारला. त्यापूर्वी संभाजीला उपदेश करण्यासाठी समर्थांची योजना केल्याचा समर्थ चरित्रातला प्रसंग कुठे तरी घालणे आवश्यक होते; आणि म्हणून सहाव्या प्रकरणाची सुरुवात युवराज शिक्षण विषयक मजकुराने झाली. त्यामध्येही ' राजनीति ' हा ग्रंथ लिहिण्यासाठी शुक्रनीतिसाराचे जे अवलोकन झाले होते, त्या आधारे काही विवेचन केल्यानंतर ९१ कलमी बखरीतली हकीकत लक्षात घेतली. ती बरीचशी गुंतागुंतीची होती. उदा०

' कलम ७३ : त्याउपर विजापुरचा पुरा हंबीरराव सेनापतीने मारिले. भोवताला आवर्त बहुत मांडला...

कलम ७४ : त्याउपर भागानगरचा मुलूख तोही जेर केला. तान्हाशा पातशाहा व माधणा दिवाण त्यांणीही वकील मदनापंत पाठवून तह केला. नवलाख होन वर्षास होनबंदी द्यावी. निराजी राहूजी हेजीब नेहमीं ठेविले. निराजीपंतास मृत्यु आला...'

वरील दोन्ही कलमे वाचल्यानंतर चिटणिसांनी क्रम हाच ठेविला, परंतु निराजी रावजीबद्दलचा सभासदाचा मजकूर स्वीकारला आहे हे लक्षात येईल.

( ४ ) शिवाजी महाराजांनी व्यंकोजीस लिहिलेली तीन पत्रे मल्हार रामरावांकडे होती. ही पत्रे त्यांचे वडील रामराव यांनी रघुनाथ नारायण हणमंते याच्या वंशजांकडून आणविली होती. ग्रँट डफने ही पत्रे पाहिली होती. ती बाळाजी

आवजीच्या हस्ताक्षरातीलच आहेत अशी त्याने ग्वाही दिली आहे. ( ग्रँड पृ. २२० )

त्यांपैकी दोन पत्रे द. ब. पारसनीस यांनी नकलून 'तंजावरचे राजघराणे' या पुस्तकात अनुक्रमे पृ. ३६ व ४२ वर छापली आहेत. ती मुद्दाम खाली देत आहे. त्यावरून चिटणिसांनी त्या दोन्ही पत्रांचा कसा उपयोग केला आहे, हे लक्षात येईल. यांतील पहिले पत्र मार्च १६७८ मध्ये लिहिले असावे व दुसरे जाने. १६८० मध्ये लिहिले असावे, असा संशोधकांचा तर्क आहे. दुसऱ्या पत्राबद्दल डफ म्हणतो, 'This letter was amongst the last that Sivajee ever dictated ग्रँड पृ. २२६ )

: १ :

### श्री महादेव श्री कुलस्वामिनी.

श्री सहस्रायु चिरंजीव अखंडित लक्ष्मी अलंकृत राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री येकोजी राजे प्रति राजश्री शिवाजी राजे, आशीर्वाद.

येथील क्षेम जाणोन स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे. उपरी. कैलासवासी साहेबीं कैलासवास केला, त्यास आजी तेरा वर्षें जालीं. महाराजांचे पैके व जडाव व हत्ती व घोडे व मुलूख अवघेही राजश्री रघुनाथपंतीं तुम्हांला राज्यावर बैसवून संपूर्ण राज्य तुमचें हातीं दिलें. ऐशियास आमचा अर्धा वांटा तेरा वर्षें तुम्हींच खादला, आम्हीं जरी तुम्हांजवळी मागावें, तर बहुत दूर होतों. बऱ्या बोलें तुम्हीं देणार नव्हां, म्हणून तेरा वर्षें सबुरी केली. मनामध्यें ऐसा विचार केला कीं बरें, महाराजांचे पुत्र तेही आहेत, खाती तोंवरी खात. मालाचे धनीच आहेत. जे समयीं आम्हांस फावेल, ते समयीं आम्ही वेव्हार सांगोन घेऊं असें मनीं धरोन होतों.

ऐशियास, राजकारणप्रसंगें आम्ही कुत्बशहाचे भेटीस भागानगरास गेलों. तेथून कर्नाटकांत गेलों. चंजीस आलों. चंजी घेतली, व येलूरतर्फेचा मुलूख घेतला, व शेरखानास झगडयांत मोडून गर्देस मेळविलें. शेरखानाचे हातीं मुलूख होता तेवढाही घेतला. त्यावरी मजल दर मजल कावेरी तीरास गेलों. तेथून तुम्हांस पत्रें लिहिलीं कीं राजश्री गोविंदभट गोसावी व राजश्री काकाजीपंत व राजश्री निळोबा नाईक व राजश्री रंगोबा नाईक व तिमाजी यख्तियारराऊ असे भले लोक आम्हांपासीं पाठविणें म्हणून तुम्हांला बहुतां रीतीं लेहून पाठविलें. त्यावरून तुम्हीं सदरहू भले लोक

आम्हांपाशीं पाठवून दिले. त्या भल्या लोकांशीं बहुता रीतीं घरोबियाचा व्यवहार सांगून आमचा अर्धा वांटा आम्हांस बऱ्या बोलें द्या, म्हणून सांगून पाठविलें; व त्याबराबरी राजश्री बाळंभट गोसावी, राजश्री कृष्ण जोतिषी व कृष्णाजी सखाजी असे आपले तर्फेनें भले लोक दिल्हे. हे भले लोक तुम्हांजवळी जाऊन बहुता रीतीं बोलिले, कीं गृहकलह करूं नये, आपला अर्धा वांटा मागतात तों द्यावा. असें बोलले.

परंतु कपटबुद्धि तुम्ही ऐसी मनीं धरिली, कीं या समयांत आम्ही थोर राजे झालों आहों. आम्हांसी आपण खासा भेटीस येऊन हलमस्त नरमी बहुत दाखवावी, आणि आमचा वांटा बुडवावा. तेरा वर्षें सारें राज्य आपणच खादलें, पुढेंही आपणच सारें राज्य खावें. अशी बुद्धि मनीं धरून वांटियांच्या निवाड्याचा तह न करितां आपण खासाच आमचे भेटीस आले. यास आमची व तुमची भेट जाली. त्या उपरी आम्ही बहुता रीतीं तुम्हांसी बोलिलों, कीं आमचा अर्धा वांटा द्या. परंतु तुम्ही वांटा द्यावा हा विचार मनीं धराचना. मग जरूर जाहलें, कीं तुम्ही धाकटे भाऊ; आपण होऊन आमचे भेटीस आले, यास तुम्हांला धरावें आणि वांटा मागावा ही गोष्ट थोरपणाचे इजतीमध्यें लायक नव्हे. या निमित्त तुम्हांला चंजावरास जावयाचा निरोप दिला. तुम्ही चंजाउरास गेलेती. त्याउपरी गृहकलह वाढवूं नये, वाढविल्यानें पहिले युगीं पांडव कौरव बहुत बहुत कष्टी झाले, ते सारी भारताची कथा मनांत आणून गृहकलह वाढविलियां उभयपक्षीं कष्टी होईजे. ऐसें जाणून राजश्री शामजी नाईक व कोन्हेरीपंत व शिवाजी शंकर या हातीं मागतें बहुतां रीतीं सांगून पाठविलें, कीं तुम्हीं व आम्हीं वांटे करून घेऊं; परस्परें समाधानें राहूं. परंतु तुम्हीं दुर्योधनासारखी दुष्ट बुद्धि करून संधि न करावा, यद्ध करावें ऐसेंच मनीं धरिलें. ऐशियास आम्हांला रायगड प्रांतें बहुत कांहीं कार्य होतें. या निमित्तें चिरंजीव संताजी भोसले व राजश्री रघुनाथपंत व राजश्री हंबीरराव असे ते प्रांतीं ठेवून आम्ही स्वार होऊन तोरगळ प्रांतास आलों. तेथें अशी खबर ऐकली, कीं तुम्हीं तुरुक लोकांच्या बुद्धीस लागून, आमचे लोकांशीं झगडा करावा ऐसें मनीं धरून आपली सारी जमेत एकवट करून आमचे लोकांवर पाठवून दिलेती. ते वालगोंडपुरास आले. तुमचे लोक चालून आल्यावर तुमचे आमचे लोकांत थोर झगडा झाला. तुमचे लोक पराजय पावले. प्रतापजी राजे व भिवजीराजे व शिवाजी डबीर असे तिघे धरिले, व किती एक लोक मारिले. किती एक लोक पळून दाणादाण होऊन गेले. ऐसा समाचार ऐकिला. हें ऐकून बहुत नवल असें वाटलें, कीं

कैलासवासी महाराज, त्यांचे तुम्ही पुत्र, बहुत थोर लोक, ऐसें असून कांहीं विचार करीत नाहीं, व धर्माधर्म विचारीत नाहीं. असें असतां कष्टी व्हाल याचें नवल काय ?

तुम्हीं म्हणाल कीं कैसा विचार करावा ? तरी ऐसा विचार करावा होता कीं अधर्मेकरून तेरा वर्षें आपण सारें राज्य खादलें तें खादलें; आतां अर्धा वांटा मागतात तो त्यांचा त्यांस द्यावा आणि आपण सुखी राहावें, ऐसा विचार करावा होता. दुसरा विचार करावा होता कीं, श्री देवाची व श्रीची कृपा त्यांवरी पूर्ण झाली आहे, दुष्ट तुरुकांला ते मारितात. आपल्या सैन्यांत तुरुक लोकच असतां जय कैसा होतो, आणि तुरुक लोक कैसे वांचू पहातात हा विचार करावा होता; आणि युद्धाचा प्रसंग पाडावा नव्हता. परंतु दुर्योधनासारखी बुद्धि करून युद्ध केलें आणि लोक मागविले. जें जाहलें तें जाहलें. पुढें तरी हट्ट न करणें. तेरा वर्षें तुम्हीं सारें राज्य खादलें तें खादलें. या उपरी कितेक आमचे आम्हीं घेतले असे. अरणी, बंगरूल, कोलार, होसकोट, शिराळकोट व किरकोळ जागे व चंजाऊर असे जे जागे तुमचे हातीं उरले आहेती, ते आमचे लोकांचे हातीं देणें; आणि नगद पैके व जडाव व हत्ती व घोडे यांचा अर्धा वांटा देणें. ऐसा विचार करून आम्हांसीं संधि करणें. तुम्हीं ऐसा संधि निर्मलपणें केलिया आम्हीं आपणापासून तुम्हांला तुंगभद्रे अल्याड पन्हाळे प्रांतें तीन लक्ष होनांची दौलत देऊन. अथवा आम्हांजवळील दौलत तुम्हांला मानेना, तरीं कुतबशहास अर्ज करून त्यापासून तुम्हांस तीन लक्षांची दौलत देऊन. असे दोनही विचार तुम्हांस लिहिले आहेत. या दोनही मधील एक मनीं धरून मान्य करणें, हट्टाचे हातीं न देणें. आपल्यांत आपण गृहकलह करावा आणि कष्टी व्हावें याचें कांहीं प्रयोजन नाहीं. या उपरी तरी आमचा आपला संधि व्हावा असे बुद्धि मनीं धरून निकालांत काढणें. वांटियाचा व्यवहार निर्गमून टाकणें आणि सुखें असणें. गृहकलह बरा नव्हे. आम्ही रीतीनें वडीलपणें आजवरी तुम्हांला सांगितलें. आतांही सांगतों. ऐकाल तरी बरें, तुम्ही सुख पावाल, न ऐकाल तरी तुम्हीच कष्टी व्हाल. आमचें काय चालतें ?

बहुत काय लिहिणें. मोर्तब मर्यादेयं विराजते.

**: २ :**

श्रियासह चिरंजीव अखंडित लक्ष्मीअलंकृत राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री महाराज एकोजी राजे प्रती राजश्री शिवाजी राजे आशीर्वाद

येथील क्षेम जाणोन स्वकीय कुशल लेखन करणें. विशेष, कित्येक दिवस झाले, तुमचें पत्र येत नाहीं. याकरितां समाधान वाटत नाहीं. सांप्रत राजश्री रघुनाथपंतीं लिहिलें कीं, तुम्हीं आपले ठायीं उदासवृत्ति धरून पहिलेसारखें आपलें शरीरसंरक्षण करीत नाहीं. सणवार उत्सवादि हेहीं कांहीं करीत नाहीं. सेना बहुत आहे, परंतु उद्योग करून कार्य प्रयोजन करवावें, हेंहीं कांहीं करीत नाहीं. वैराग्य धरिलें आहे. एखादे तीर्थीचे जागीं बसून कालक्रमण करूं ऐशा गोष्टी सांगतां, म्हणोन विस्तारें लिहिलें होतें.

तरी या गोष्टी आम्हांस बहुत अपूर्व वाटल्या-कीं, कैलासवासी स्वामींनीं कसे कसे प्रसंग पडले ते निर्वाह करून यवनांच्या सेवा करून, आपल्या पुरुषार्थें बाजी संवारून, उत्कर्ष करून घेतला. शेवट बरा निर्वाह केला. तें सर्व तुम्ही जाणतां. त्यांच्या साह्यतेस त्यांच्या बुद्धियुक्ति सर्वही तुम्हांस उपतिष्ठोन त्यांपासून शहाणे जाले आहां. त्याउपरी आम्हीही जे जे प्रसंग पडले ते निर्वाह करून कोणे तऱ्हेनें राज्य मिळविलें हें जाणतां व देखत आहां.

असें असोन तुम्हांला ऐसा कोणता प्रसंग पडला जे इतक्याच मध्यें आपल्या संसाराची कृतकृत्यता मानून, नसतें वैराग्य मनावरी आणून, कार्य प्रयोजनाचा उद्योग सोडोन, लोकांहातीं रिकामेपणीं द्रव्य खाऊन नाश करवणें, व आपल्या शरीराची उपेक्षा करणें हें कोण शहाणपण व कोणती नीति ?

आम्ही तुम्हांस वडील मस्तकीं असतां चिंता कोणे गोष्टीची आहे ? याउपरी सहसा वैराग्य न धरितां मनांतून विषण्णता काढून कालक्रमणा करीत जाणें. सणवार उत्साह पूर्ववत् करीत जाऊन तुम्हीं आपलें शरीरसंरक्षण बरें करीत जाणें. जमेती सेवक लोकांना रिकामें न ठेवून, कार्य प्रयोजनाचा उद्योग करून त्यांपासून सेवा करून पुरुषार्थ व कीर्ति अर्जणें. तुम्ही त्या प्रांतें पुरुषार्थ करून संतोषरूप असलिया, आम्हांस समाधान व श्लाघ्य आहे की कनिष्ठ बंधु असे पुरुषार्थी आहेती. रा. रघुनाथ पंडित त्या प्रांतें आहेती. ते कांहीं इतर नव्हेती, आपले पुरातन, तुम्हांसी रीतीनें वर्तावें हें निपुण जाणितात. आम्हांस मानितात तसें तुम्हांस मानितात. आम्हीं त्यांचे ठायीं विश्वास ठेविला आहे, तैसा विश्वास तुम्हींही ठेवून काय प्रयोजनास परस्परें अनुकूल व साह्य होऊन वर्तत जाणें. पुरुषार्थ व कीर्ति अर्जणें. रिकामें बैसोन, लोकांहातीं नाचीज खाववून, काल व्यर्थ न गमावणें. कार्यप्रयोजनाचे दिवस हे

आहेती. वैराग्य उत्तरवयीं कराल तें थोडें. आज उद्योग करून आम्हांसही तमासे दाखविणें.

बहुत काय लिहिणें, तुम्ही सुज्ञ असा. मोर्तब

वरील सर्व मजकुराचा थोडक्यात इत्यर्थ हा की, ( १ ) चिटणिसांना राज्याभिषेकापूर्वी महाराजांना दक्षिणदिग्विजय केला, असे वाटत होते. सभासदांनी जिंजीसारख्या ठिकाणी राहून राजारामाच्या कारकीर्दीत आपली बखर लिहिल्यामुळे जिंजीचे कारभारी हणमंते यांच्याबद्दल जी गौरवाची भाषा वापरली होती, तिची छाननी करण्याची कुवत नसल्यामुळे हणमंत्यांच्या नातेवाईकाकडून शिवाजी महाराजांची म्हणून जी पत्रे मिळाली त्यांच्या भांडवलावर हा सारा डोलारा उभा केला आहे. दक्षिणदिग्विजयाचे राजकारण शिजवण्यात मुख्यत्वेकरून रघुनाथ नारायणांचा हात होता, असा उल्लेख सभासदाने केला नाही, ९१ कलमी बखरीनेही केला नाही. परंतु आपल्या जवळच्या पत्रांमुळे चिटणिसांना या दोन्ही बखरीत तो भाव दिसला आणि त्यांनी त्याला मोठे नाट्यमय स्वरूप दिले आहे. इतिहास असे सांगतो की, हे राजकारण निराजी रावजी, प्रल्हाद निराजी व शामजी नाईक पुंडे यांनी सिद्ध केले ( शिनि पृ. ३६८ ).

**ते समयीं नारो त्रिमल**—१६७५ पर्यंत तंजावरप्रांत मदुरेचा नायक बळकावून बसला होता. त्याला तेथून हाकलून तंजावरचा विजयराघव याच्या नातवास गादीवर बसविण्याची कामगिरी व्यंकोजीवर आली. ती संधी साधून त्याने नायकाचा पाडाव करून स्वतःच तंजावर बळकाविलें. शहाजी महाराजांच्या मृत्यूनंतर नारो त्रिमल यांच्या कर्तबगारीमुळे व्यंकोजीस कर्नाटकातील जाहागीर मिळाली. रघुनाथ नारोमुळे नव्हे. वर दिलेल्या दोन पत्रांपैकी पहिल्या पत्रामध्ये, ‘ रघुनाथपंतीं तुम्हांला राज्यावर बसवून ’ याऐवजी मूळ पत्रात ‘ नारोपंतीं तुम्हांला राज्यावर बसवून ’ असा मजकूर असावा, हे लक्षात येते. पारसनिसांनी नक्कल करताना चूक केली आहे.

इ. स. १६७५ मध्ये रघुनाथ नारायण पुण्यास होते, हे त्या वर्षी लिहिलेल्या पाली येथील महजरावर त्यांची निशाणी आहे यावरून लक्षात येते.

## पृ. १३६

**आकण्णा मादण्णापंत**—हे दोघे सख्खे भाऊ असून त्यांची नावे अकरस भानजी व माधो भानजी अशी होती. आडनाव पिंगळी राजकीय मुत्सद्देगिरी व विद्वत्ता यांमुळे त्यांना गोवळकोंड्याच्या तानाशाहाने आपले मुख्य कारभारी नेमिले. हिंदूंस एवढा मोठा अधिकार प्राप्त झाल्यामुळे औरंगजेब जळफळत असे. भागानगरमधील मुसलमान सरदार व खुद्द तानाशहाच्या बायका त्यांच्या विरुद्ध होत्या. १६८६ मध्ये त्यांचा नायनाट करण्यासाठी औरंगजेबाने आपला पुत्र शहाआलम

यास त्यांजवर पाठवले. या दोघांमुळे पादशाहीवर संकट येत आहे हे पाहून तेथल्या मुसलमानांनी १६८६ च्या मार्च महिन्यात मारेकरी घालून त्यांना ठार मारले.

## पृ. १३७

**आपण धर्मशील व राजे धर्मस्थापना करावी हा अभिमान धरतात**—अफजलखान, जयसिंग व रामसिंग प्रकरणी बखरकाराने जी भूमिका घेतली, त्याच्याशी हे वर्णन सुसंगतच आहे. शिवाजी महाराज दक्षिणदिग्विजयार्थ का सिद्ध झाले, या संबंधीची बखरकाराची भूमिका ही सांप्रदायिक आहे. इतिहासकारांनी या बाबतीत निरनिराळी मते मांडली आहेत. ( १ ) जदुनाथ सरकारांच्या मते राज्याभिषेक-समारंभामुळे पैसा कमी पडला व निव्वळ पैशासाठी ही मोहीम हाती घेतली. सभासदानेही हेच कारण दिले आहे. ( २ ) शिवाजी महाराजांनी मालोजी घोरपडे यांस १६७७ च्या मार्चमध्ये पत्र लिहिले आहे त्यावरून व शिवाजी महाराजांनी व्यंकोजीस लिहिलेल्या आणखी एका पत्राची नक्कल आवळसकरांना मिळाली ( पुण्य श्लोक छत्र. शिवाजी भाग ३, पृ. ३७०–७९ ) त्यावरून शेजवलकर म्हणतात : शिवाजीचा हेतू स्वतःस राज्याभिषेक करून घेतल्यापासून असा होता की पूर्वीच्या नष्ट झालेल्या विजयनगर साम्राज्याचे पुनरुज्जीवन आपण केले आहे असा भास दक्षिणेतील सर्व हिंदूंत निर्माण करावा म्हणजे त्याचा उपयोग आपणांस उत्तरेकडून येणाऱ्या मोगलांशी लढताना अवश्य होईल. ( पृ. १६७ ). ( ३ ) महाराजांचा मुख्य हेतू विजापूरचे तामीळनाडमधले राज्य जिंकून घेणे हा होता. ( सेतुमाधवराव पगडी–नवभारत मार्च १९६६, पृ. २० ).

त्यावेळचा मोगलांचा दक्षिणचा सुभेदार बहादूरखान याचा अधिकारी भीमसेन सक्सेना याच्या आत्मचरित्राधारे श्री पगडी यांनी मांडलेले विधान ऐतिहासिकदृष्ट्या योग्य वाटते.

## पृ. १३८

**मजमूचा धंदा परंपरागत**—जेधे शकावलीवरून सप्टें. १६७७ मध्ये रघुनाथ नारायणास दिल्याचा उल्लेख आहे. ही मजमू कर्नाटकातील नवीन जिंकलेल्या प्रदेशाची असावी.

**शास्त्रमत उद्‌घाटन**—राजनीति बलप्रकरण पृ. ६३–६५वर दैव-पुरुष-वादाची चिकित्सा केली आहे.

**पादशहानें दर्शन**—४ मार्च १६७७ ( शका शिचप्र पृ. २८, शिपसासं ले. १९०१ )

## पृ. १४०

ऐसा भाईचारा करार उभयपक्षींचा जाला--उभयपक्षी तह काय झाला या संबंधी सभासद व चिटणीस यांनी काहीच स्पष्ट उल्लेख केला नाही. कर्नाटकातील जिंकलेला प्रदेश गोवळकोंडेकरांना द्यावयाचा करार झाला, आणि शिवाजीने त्याबाबतीत त्यांची फसवणूक केली, असा आरोप जदुनाथ सरकार यांनी केला आहे. भीमसेन पंडिताच्या आत्मचरित्रावरून फक्त भाईचाराचाच करार ठरला व उभयतांनी एक एक होऊन मोगलांशी युद्ध करून देश जिंकून घ्यावा, असे ठरले.

## पृ. १४१

**वकीलीस प्रल्हादपंत**--हा निराजी रावजीचा मुलगा. कर्नाटक स्वारीस निघण्यापूर्वीच यास भागानगरकडे पाठविले होते. मोठ्या कौशल्याने त्याने तानाशहाचे मत भेटीसाठी अनुकूल केले.

**रघुनाथपंत व निराजीपंत व दत्ताजीपंत वाक्नीस व बाळाजी चिटणीस**—यांपैकी रघुनाथपंत हणमंते उशीरा येऊन दाखल झाले ( ERS VOl. II P. 131). त्यामुळे भागानगरभेटीतील व श्रीशैलभेटीतील त्यांचा उल्लेख चुकीचा होय. निराजीपंतास पेडगावी बहादूरखानाच्या भेटीस पाठविले होते, असा सभासदाने स्पष्ट उल्लेख केला आहे. दत्ताजीपंत व बाळाजी आवजीही बरोबर नव्हते. पृ. १४४ वरती महाराजांचे अंगी देवीचा अविर्भाव झाला, असे सांगावयाचे आहे; आणि देवीचा आविर्भाव झाला की ते वाक्य चिटणीस व वाकेनीस यांनी लिहून ठेविले, असे लिहावयाचे हे चिटणिसांनी ठरवून टाकलेले आहे. त्यामुळे त्यांची नावे चिटणिसांनी वाढविलेली आहेत.

**निवृत्तिसंगम**—कर्नूलच्या इशान्येस २४ मैलावर येथे भवनाशी व कृष्णा या नद्यांचा संगम होतो. **श्रीशैल**—बारा ज्योतिर्लिंगांपैकी अत्यंत महत्त्वाचे असे कर्नूल येथील स्वयंभू ज्योतिर्लिंग. **अंतरपुरी**—आत्मकूर नावाचे कर्नूलपासून ४० मैलांवरचे ठिकाण. श्रीशैलास गंगास्नान ७ एप्रिल १६७७ रोजी केले ( शेशि पृ. १७६ ). श्रीशैलाहून नंद्याळ, कडप्पा या रस्त्याने तिरुपतीस पोचले, व मग ते शेरखानावर चालून गेले. बखरकाराने हा क्रम बरोबर पाळला नाही.

**येल्लूर ठाण्यास वेढा**—हा कोट अतिशय मजबूत असल्याने चैत्र शके १५९९ तो श्रावण शके १६०० पर्यंत चौदा महिने वेढा पडला होता. या किल्ल्याचे सभासदाने केलेले वर्णन किती परिणामकारक आहे पाहा :—

'तो कोट म्हणजे पृथ्वीवर दुसरा गड असा नाहीं. कोटांत जींत पाणियाचा खंदक. पाणियास अंत नाहीं असे. उदकांत दहा हजार सुसरी. कोटाचे फांजियावरून

दोन गाडिया जोडून जावें ऐशी मजबुती. पडकोट चार चार फेरियावरि फेरे. ये जातीचा कोट.' ( पृ. ९० ). सभासदाच्या या वर्णनामुळे हा किल्ला जिंकण्याचे महत्त्व कळून येते. चिटणिसांनी पृ. १४४ वर सभासदाचेच वर्णन अगदी सामान्य रीतीने दिले आहे.

## पृ. १४२

**शीरखान मोडून उधळला**—२७ जून १६७७ ( शिपसासं क्र. १९४८, ५३ ).

**आयास न करितां किल्ला बोलों लागला**—विशेष प्रयत्न न करताच किल्ल्यातील लोक शरण आले. १३ मे १६७७ ( मद्रास फॅक्टरी रेकॉर्डस )

## पृ. १४३

**व्यंकोजीराजे...चंजाउरास पोंचवून आले**—सभासद व जेधे शकावलीवरून व्यंकोजीराजे रात्रीच्या वेळी ( श्रावण शके १५९९ ) पळून गेले. मद्रासचे इंग्रजही व्यंकोजी पळून गेल्याचेच सांगतात ( शिपसासं क्र. १९५७ ).

## पृ. १४४

**शालिवाहन शके १५९५**—ही तर धडधडीत बनावट मिती आहे. मागे पृष्ठ १०३ वर शहाजी महाराजांचा मृत्यू शके '१५८३ प्लवनाम संवत्सरे' असा दिला होता. शिवाजी महाराजांच्या पत्रातील, 'महाराजांनी कैलासवास केला, यास तेरा वर्षें जालीं' या उल्लेखावरून चिटणिसांनी ही मिती तयार केली आहे. बनावट मितीही आपल्या पूर्वीच्या वर्णनाशी सुसंगत ठरेल अशी तयार करण्याची दक्षता चिटणीस घेत नाहीत !

## पृ. १४५

**चंदी वगैरे राज्य सोडविलें..मलव्वाई देसाईण धरली**—अनेक घटना बऱ्याच विस्कळित रीतीने या व यापुढील परिच्छेदांत वर्णिलेल्या आहेत. मद्रासकर इंग्रजांनी या साऱ्या हालचालींच्या तारीखवार नोंदी केल्या आहेत. त्यावरून १२ जुलैला मराठ्यांचे सैन्य तिरुमलवाडीस आले. पावसाळ्यामुळे तेथेच सैन्याचा तळ पडला. सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात पाऊस हटल्यानंतर दक्षिण अर्काट जिल्हा व नोव्हेंबरमध्ये शहाजीच्या जहागिरीतील कोलार, बंगळूर, होसकोट, बाळापूर, शिरे वगैरे मुलूख शिवाजीने घेतला. मग तो डिसेंबरात म्हैसूरला आला. जानेवारीत म्हैसूर सोडले व वाटेत कोपळ, गदग, ही ठाणी काबीज करून परत येताना बेळगावच्या आग्नेयीस ३० मैलांवर बेलवाडी येथील मलवा देसायणीने अडथळा केला व आपला किल्ला मोठ्या शर्तीने २७ दिवस लढविला. तिच्या या पराक्रमाचे

पोवाडे व त्यावर आधारित नाटके-कादंबऱ्या अद्यापही कर्नाटकात लिहिल्या जातात.

केवळ सहा महिन्यांत आपल्या मुत्सद्देगिरीने शिवाजी महाराजांनी सारा कर्नाटक आपल्या आधिपत्याखाली आणला व त्याची ताबडतोब योग्य ती व्यवस्थाही लावून टाकली. त्यामुळे अत्यंत चिकित्सक व महाराजांच्या यशामुळे मत्सरग्रस्त होऊन त्यांची निंदा करण्यास सदैव टपलेल्या इंग्रजांनी देखील हा दक्षिणदिग्विजय म्हणजे 'तो आला, त्याने पाहिले. व बघता बघता जिंकले देखील' अशा कोटीतला होता याची कबुली दिली आहे व त्याची तुलना अलेक्झांडर, हानिबाल व सर्टोरियस यांच्याशी केली आहे.

**पादशाह...दक्षण-प्रांतीं निघाले**—हीही माहिती बरोबर नाही. दक्षिणेतील राजकारण आपल्याला दिवसेंदिवस अधिकाधिक प्रतिकूल बनत आहे, कारण बहादुरखान व शिवाजी यांचे सख्य आहे, अशा तक्रारी औरंगजेबाकडे आल्या म्हणून औरंगजेबाने बहादुरखानाची सप्टेंबर १६७७ मध्ये बदली केली व त्याच्या जागी दक्षिणचा सुभेदार म्हणून दिलेरखान याची योजना केली. दिलेरखानाने त्वरित हालचालीस सुरुवात केली म्हणून महाराज परतले.

## पृ. १४६

**पराभव पावोन...व्यंकोजी पळोन गेले**—हे युद्ध नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात १६७७ मध्ये झाले. सुरतकर इंग्रजांनी पाठविलेल्या वृत्तावरून (शिपसासं क्र. १९९५) बखरीतील माहितीस दुजोरा मिळतो.

**बंधूस कानपिचक्या**—शिवाजी महाराजांची जी दोन पत्रे दिली आहेत त्यापैकी दुसऱ्या पत्राचा मजकूर या प्रकरणाच्या सुरुवातीस व एकदा इथे याप्रमाणे बखरकाराने विभागून दिला आहे, हे लक्षात येईल.

## पृ. ४७-४८

**शब्द खरा करुन दाखविला**—ही संपूर्ण हकीकत काल्पनिक आहे.

**निराजीपंत तेथें ठेविले होते**—प्रल्हादपंत असा उल्लेख हवा.

## पृ. १४९

**हुसेनखान माईणा व लोदीखान**—कोप्पळच्या लढाईचे वर्णन मागेच आले आहे. ते हुसेनखानाशी झाले होते. लोदीखान म्हणजे शेरखान त्याचाही उल्लेख मागे आला आहे. हंबीररावास परत येताना त्यांनी अडविले, ही माहिती विनाकारणच येथे दिली आहे.

## प्रकरण सप्तम

### पृ. १५०

घासदाणा, साहोत्रा—चौथाई व सरदेशमुखीऐवजी राजारामाच्या वेळीं या गोष्टींना सुरवात केली. या ठिकाणचा त्यांचा उल्लेख कालविपर्यासाचा होय.

### पृ. १५१

किल्ला रणथंबोहर...इलाचीबेग—रणथंबोहर ( रतनभोर ) हा किल्ला चितोडनजीक मेवाडात आहे. औरंगजेब खुद्द बाहेर पडला, हे वर्णन करण्यामागे इलाचीबेगबद्दल एक नाट्यमय अशी, कुठल्यातरी फारसी बखरीतून कर्णोपकर्णी झालेली, दंतकथा सांगण्याची बखरकाराची वृत्ती आहे. प्रत्येक प्रकरणाची सुरवात करताना बखरकाराची चांगलीच कुचंबणा होते. सुरुवातीला मागच्या हकीकतीचा थोडा सारांश आणि निवेदनाच्या ओघात जी माहिती सांगण्यासारखी नसते, ती अशी अगोदर सांगून मग चरित्रनायकाशी बखरकार संबंध जोडतो.

### पृ. १५२-५९

ऐशांचा संग्रह जाला तो किती...बि॥.—संभाजी मोगलाकडून पश्चात्तापदग्ध होऊन पन्हाळ्यास परत आला ( जाने. १६८० ) त्यावेळीं पितापुत्रांनी मिळून पाहाणी केली, असे सांगून सभासद अशा प्रकारचा तपशील महाराजांच्या मृत्यूपूर्वी देतो. चिटणीसांनी याद्या तयार करताना सभासदाची शब्दशः नक्कल केली नाही. त्यांनी बरीच नावे वाढविली आहेत. सभासदाची मांडणीही निराळ्या पद्धतीची आहे. अठरा कारखाने, बारा महाल, निरनिराळ्या जातींच्या होनांची संख्या, इ. दृष्टीने सभासदांची माहिती फारच उपयुक्त आहे. चिटणीसांनी फक्त सरकारकून, सरदार व प्रांतोप्रांतीच्या किल्लेकोटांची तेवढीच माहिती दिली आहे. सभासदांची वर्गवारीही नमुनेदार आहे. चिटणीसांनी बाजी पासलकर, तानाजी मालुसरे इ. मृत सरदारांची व उंदेरी, रेवदंडा, अर्नाळा इत्यादी शिवाजीच्या ताब्यात नसलेल्या किल्ल्यांचीही नावे दिलेली आहेत.

### पृ. १६१

गागाभट्ट—काशी क्षेत्रातील विद्वान ब्राह्मण. त्यांच्या वंशाची माहिती ‘ गाधिवंशानुचरित ’ या संस्कृत ग्रंथात मिळते. अधिक माहितीसाठी शिवाजी

निबंधावली भाग. १ मधील डॉ. पां. वा. काणे यांचा लेख ( पृ. १-२४ ) पाहा.

**बाळाजी आवजी...विनंति केली जे**—सभासद व समर्थचरित्रातील माहिती दूर ठेवून बाळाजी आवजीचे महत्त्व वाढविण्यासाठी ह्या बनावाचे हे स्वकल्पित वर्णन चिटणिसांनी केले आहे. सभासदांचे वर्णन पाहा; ‘ पुढें वेदमूर्ति राजेश्री गागाभट म्हणून वाराणशीहून राजियाची कीर्ति ऐकून दर्शनास आले. भट गोसावी, थोर पंडित. चार वेद-साहा शास्त्रें-योगाभ्याससंपन्न, ज्योतिषी, मांत्रिक, सर्व विद्येनें निपुण, कलयुगीचा ब्रह्मदेव असा पंडित, त्यास राजे व सरकारकून भेट घेऊन सन्मानें आणिलें ...भट गोसावी यांचे मतें, मुसलमान बादशाहा तक्तीं बसून, छत्र धरून, पातशाही करितात, आणि शिवाजीराजे यांणींही चार पादशाही दबाविल्या. आणि पाऊणलाख घोडा लष्कर गडकोट असें असतां त्यांस तक्त नाहीं. याकरितां मऱ्हाठा राजा छत्रपति व्हावा ऐसें चित्तांत आणलें. आणि राजियांसही मानिलें. अवघे मातबर लोक बोलावून आणून विचार करितां सर्वांचे मनास आलें, तेव्हां भट गोसावी म्हणूं लागले कीं, तक्तीं बसावें ’ ( पृ. ८० ) समर्थचरित्रात व त्या आधारे लिहिलेल्या भट्टवंश या संस्कृत काव्यात स्वामी रामदासांच्या आज्ञेने शिवरायांनी गागाभट्टांना आणविले असे वर्णन आहे ( सर्ग ५ श्लो. ७–८ ). गागाभट्टांचे मूळचे घराणे दक्षिणेतील असून पैठणचे अनंतदेव भट्ट हे त्यांचे गुरुबंधू होते, त्यांना भेटण्यासाठी गागाभट्ट वारंवार दक्षिणेत येत. इ. स. १६६३ च्या सुमारास कोकणातील ग्रामस्थ–प्रकरणासंबंधाने शिवरायांच्या आज्ञेने ते कोकणात आले होते व त्यावेळी त्या दोघांची भेट झाली होती ( बेंशि पृ. १२ ).

**अश्वमेध यज्ञ**— हा कालविपर्यास होय. सवाई जयसिंगाने पुढे कित्येक वर्षांनी हा यज्ञ केला.

**सर्व पंडितजण ब्राह्मण यांचे संमत जाले**—शिवाजी महाराजांचा राज्याभिषेकविधी हा अत्यंत धार्मिक स्वरूपाचा होता. सुदैवाने त्यासंबंधीची सर्व हकीकत गागाभट्टांनीच ‘ श्रीशिवराजाभिषेकप्रयोगः ’ या ग्रंथात लिहून ठेविल्यामुळे व राज्याभिषेकसमयी हजर राहून इंग्रजांचा वकील हेन्री ऑक्झिंडेन याने त्याबद्दलचे वर्णन ताबडतोब लिहून ठेवलेले उपलब्ध असल्यामुळे बखरकारांची वर्णने काल्पनिक आहेत, हे सिद्ध होते. सभासद निदान समकालीन तरी होता. त्याने राज्याभिषेक समारंभ पाहिला होता की नाही याबद्दल शंका आहे. जिंजीसारख्या दूरच्या ठिकाणी त्याला अतिशय तुटपुंज्या साधनांद्वारे आपले चरित्र सजवावे लागले, त्यामुळे दानधर्मा संबंधीचे त्याने बरेच अतिरंजितपणे लिहिले आहे.

उदाः– ‘ पन्नास सहस्र ब्राह्मण वैदिक मिळाले. या वेगळें तपोनिधि व सत्पुरुष, संन्यासी, अतिथी, मानभाव, जटाधारी जोगी, जंगम नाना जाती मिळाले.

तितक्यांस चार मास मिष्टान्न उलफे चालविले. संपूर्ण खर्चाची संख्या एक क्रोड बेताळीस लक्ष होन जाले. अष्टप्रधानास लक्ष लक्ष होन दर असामीस, त्याखेरीज... (पृ. ८२. ). सभासदाचे हे मूळचे वर्णन चिटणिसांनी आणखी फुगविले आहे.

छत्रपती शाहू दुसरे यांच्या निधनानंतर छत्रपती प्रतापसिंहराजे हे गादीवर आले. त्यांचा जो राज्याभिषेक झाला, त्या समयी चिटणीस म्हणून मल्हार रामरावांना तो समारंभ अगदी जवळून पाहावयास मिळाला. छत्रपती प्रतापसिंहाच्या राज्याभिषेकानंतर ' सिद्धांतविजय ' नावाचा ग्रंथ इ. स. १८३७ मध्ये लिहिण्यात आलेला आहे. मल्हार रामरावांनी आपल्या बखरीत विस्ताराने वर्णिलेला शिवराज्याभिषेकविधी गागाभट्टांनी वर्णिलेल्या ग्रंथातील मजकुरास जुळत नसून तो ' सिद्धांतविजय ' व त्यातील परिशिष्टात दिलेल्या राज्याभिषेकविधीस धरून आहे ( बेंशि पृ. ६ ).

बाळाजी आवजी चिटणिसांनी पुढाकार घेऊन गागाभट्टांस व पैठणचे पंडित यांस आणण्याची सूचना केली व स्वतः पुढाकार घेऊन राजांच्या आज्ञेवरून त्यांस आणण्याची व्यवस्था केली, या बखरकाराच्या वर्णनामागे बाळाजी आवजींचे मोठेपण वर्णिणे हा जसा एक प्रमुख हेतू आहे तसाच अनेक अज्ञान घटनांची गोळाबेरीज करून सत्याभास निर्माण करण्याची अजब अशी किमयाही त्यांनी साधली आहे. उत्तरकालीन बखरकारांनी शिवराज्याभिषेकासंबंधी जे एक चित्र रेखाटले आहे, ते बरेचसे भ्रामक व फसवे आहे. या संबंधीचे उपलब्ध साहित्य वाचल्यानंतर दोन गोष्टी प्रामुख्याने लक्षात येतात.

( १ ) या राज्याभिषेक प्रकरणी बाळाजी आवजी चिटणिसांचा फारच दुरान्वयाने संबंध येतो, इतका की जवळ जवळ त्यांचा या घटनेशी मुळींच संबंध नाही, असे म्हणता येते.

( २ ) महाराष्ट्रातील तत्कालीन ब्रह्मवृंदांचा, विशेषतः अष्टप्रधानातील ब्राह्मणमंत्री व सरकारकून यांचा शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला कसलाही विरोध नव्हता. तत्कालीन ग्रामण्य प्रकरणातील वादंगाचे व तंत्रपद्धतीनुसार झालेल्या दुसऱ्या राज्याभिषेकाबद्दलचे यथार्थ ज्ञान नसल्यामुळे उत्तरकालीन बखरकारांनी त्यातूनच शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला तत्कालीन महाराष्ट्रांत विरोध होता, असे वातावरण निर्माण केले. मराठ्यांची वैगुण्ये पाहावयास टपलेल्या तत्कालीन इंग्रजांनी व डचांनी गैरसमजाने व कुत्सितपणाने लिहिलेला मजकूर काही इतिहासकारांनी तारतम्याने न घेतल्याने त्यांनीही बखरकारांच्या सुरात सूर मिसळला आहे.

बाळाजी आवजी चिटणिसांच्या भावाच्या मुंजीच्या निमित्ताने व तत्सम इतर धार्मिक कार्यांच्या निमित्ताने कायस्थांच्या वेदोक्त–संस्काराधिकारांविषयी वाद निर्माण झाला, आणि त्यासाठी बाळाजी आवजींनी गागाभट्ट व अनंतभट्ट यांजकडे आपल्या

उपाध्यायांना पाठवून त्यासंबंधी योग्य तो निर्णय करविला व तो तत्कालीन ब्रह्मवृंदांनी मानलाही. बाळाजी आवजींचा व गागाभट्टांचा संबंध काय तो एवढाच. राज्याभिषेक-प्रकरणी त्यांचा उल्लेख सभासदासारख्या समकालीन बखरकारांनी केला नाही, हे लक्षात घेण्यासारखे आहे. गागाभट्टांनी अत्यंत प्रगमनशील दृष्टी स्वीकारून कायस्थांना न्याय दिला व शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत तात्कालीन ब्राह्मणांनी गागाभट्टांचे निर्णय मान्य केले तरी हे प्रकरण तेथेच कायमचे मिटले नाही. पुढे पेशव्यांच्या हाती सत्ता आल्यावर या ग्रामण्य–प्रकरणांनी पुनःपुन्हा डोके वर काढले व त्याची झळ कायस्थांना मोठ्या प्रमाणात लागली. त्यांना फार मोठा मनःस्तापही सहन करावा लागला. हा वाद वारंवार उकरून काढण्यात तत्कालीन ब्राह्मणांनी फार मोठी चूक केली. उत्तरकालीन शिवचरित्रात्मक बखरी लिहिणाऱ्या कायस्थांची मनोवस्था लक्षात घेतली तर, ‘ शिवराज्याभिषेकसमयी बाळाजी आवजींनी महाराज हे शिसोदे वंशाचे आहेत, हे गागाभट्टांस पटवून दिले व तत्कालीन सरकारकुनांचा त्यास विरोध होता, ’ अशी भूमिका त्यांनी का रंगविली हे कळण्यास अडचण पडू नये.

भोसले कुळाचा उदेपूरच्या शिसोदे घराण्याशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी राज्याभिषेक समयी अशा तऱ्हेची वंशावळ मिळविण्यात आली का, या प्रश्नाचे उत्तर ‘ नाही ’ असेच द्यावे लागेल. तसे असते तर—अ ) समकालीन बखरी, जेधे, शकावली व करिणा, गागाभट्ट व अनंतदेव भट्ट यांचे राज्याभिषेकविषयक ग्रंथ यांपैकी एखाद्या तरी ठिकाणी ही वंशावळ देण्यात आली असती. ज्याअर्थी या सर्व ठिकाणी तिचा अभाव आहे, त्या अर्थी अशा तऱ्हेची वंशावळ आणण्यात आली नाही, आणण्याची गरजच पडली नाही, असेच म्हणावे लागते. ब ) साताऱ्च्या प्रतापसिंह छत्रपतींना आपल्या राज्याभिषेकसमयी ही वंशावळ राजस्तानातून आणवावी लागली, त्यामुळेच टॉडच्या ग्रंथातील व चिटणिसांच्या बखरीतील वंशावळ ही सारखीच आहे. ही वंशावळ आणविण्याच्या निमित्ताने चिटणीस म्हणून मल्हाररावांना काही हालचाल करावी लागली असेल आणि त्याची खूण म्हणून पृष्ठ १० वरील ‘ त्यांचा वौंश हल्लीं भीमसिंहजी महाराणा राज्य करीत आहेत. ’ या वाक्याकडे बोट दाखविता येईल. वंशावळीचे विवेचन करीत असता उदेपूरला भीमसिंहजी राज्य करीत आहेत, ही माहिती निवेदनाच्या ओघात बखरकाराने सहजगत्या सांगून टाकली आहे, त्याअर्थी ही वंशावळ मिळविण्याच्या निमित्ताने मल्हाररावांचा किंवा प्रतापसिंहाचा त्यावेळी उदेपूरचे व नेपाळचे राजे यांच्याशी संबंध आला होता, हे लक्षात येते.

राज्याभिषेकसमयी अशा तऱ्हेची वंशावळ सिद्ध करण्याची गरज न पडल्यामुळे समकालीन लेखकांना भोसले कुळातील बाबाजीपर्यंत निश्चित माहिती

होती हे लक्षांत येते. त्याच्या मागे जाण्याचा प्रयत्न ज्यांनी केला आहे अशांच्या वर्णनात एकवाक्यता आढळून येत नाही.

## पृ. १६२

**अभिषेकाचे पूर्वांगीं व्रतबंध करावा**—शिवाजी महाराजांचा व्रतबंध झाला नव्हता, हा व्रतबंधसंस्कार वयाच्या २२ वर्षांच्या आतच करावयास हवा, असा दंडक असल्याने व महाराजांचे वय यावेळीं अधिक असल्याने लोपलेले संस्कार पुनश्च चालू करण्यासाठी प्रायश्चित्तपूर्वक मौंजीबंधन करावयाचा निर्णय गागाभट्ट व अनंतभट्ट यांनी घेतला. ‘ महाराजांचे मौंजीबंधन न झाल्याने ते शूद्र आहेत म्हणून राज्यभिषेकास अधिकारी नाहीत, ’ असा आक्षेप सरकारकुनांनी घेतला, असे १८१७ साली लिहिलेल्या ‘ मराठी साम्राज्याची छोटी बखर ’ यातील वर्णनाधारे कोणी अलीकडील संशोधक म्हणतात, तेव्हा खरोखरच मोठे आश्चर्य वाटते !

## पृ. १६२–६४

**रायगड योजिली...तिळमात्र गरगशा नाहीं**—मूळ सभासदाचे वर्णन या ठिकाणी चांगल्या रीतीने खुलवून लिहिले आहे. जे सभासदाला ठाऊक नाही, ते अर्थातच चिटणिसांना माहीत असणे शक्य नव्हते. त्यामुळे राज्यभिषेकापूर्वी प्रतापगडच्या भवानीचे दर्शन घेऊन तीन मण सोन्याचे छत्र देवीला अर्पण केल्याचा व इतरही बराच तपशील त्यांना अज्ञात आहे. इंग्रजांनी मात्र त्यांच्या नोंदी चांगल्या रीतीने केल्या आहेत.

## पृ. १६४

**चतुर्थीस...प्रारंभ...पंचमीपर्यंत चाललें**—गागाभट्टाच्या वर्णनावरूनही व्रतबंध दोन दिवस चालला, या वर्णनास पुष्टी मिळते. ह्या व्रतबंधाच्या दिवशी प्रायश्चित्त-विधी म्हणून महाराजांनी ‘ तुलादान ’, ‘ तुलापुरुषदान ’ इत्यादी धार्मिक विधी केले. इंग्रज वकील ऑक्सिडेन महाराजांच्या सुवर्णतुलेस १६००० पगोडे सुवर्णद्रव्य लागले, असे लिहितो, तर वेंगुर्ल्याचा डच वखारवाला १७००० पगोडे लागल्याचे लिहितो. त्यावरून महाराजांचे वजन १४० ते १६० पौंडांच्या दरम्यान असल्याचे कळून येते ( बाशि २·१४ ).

**ऋत्विजवर्णन**—ऋत्विजवरण असा शब्द हवा. यज्ञकार्यासाठी होता, उद्गाता, अध्वर्यू आणि ब्रह्मा आदिकरून यज्ञकर्मे असे ब्राह्मण ४ किंवा ८ असे निवडले.

**त्यानंतर षष्ठीस पटबंधनविधि**—गागाभट्टांच्या वर्णनानुसार द्वादशीपर्यंत कसकसे निरनिराळे मंगलविधी पार पाडण्यात आले, या संबंधीचे वर्णन वैद्रे-संपादित ग्रंथात पृ. २६–२७ वर पाहा. चिटणिसांनी एखादा राज्याभिषेकविषयक ग्रंथ पाहूनच राज्याभिषेकविधींचे वर्णन केल्यामुळे ते अगदीच काल्पनिक नाही.

## पृ. १६७--६८

**गागा भटजीस लक्ष रुपये दक्षणा इ.**—दक्षिणेचे, दानधर्माचे आकडे व मिरवणुकीचा तपशील यामध्ये मोठीच अतिशयोक्ती आहे. राज्याभिषेकासंबंधीची सर्व व्यवस्था पूर्ण तपशिलांसह परिपूर्ण होती. परंतु एकंदर समारंभाबद्दल बरीचशी गुप्तता पाळण्यात आली होती. राज्याभिषेकविधी व वेदघोष इ. प्रसंगी फक्त ब्राह्मणांनाच प्रवेश होता. त्यामुळे गडावर जमलेल्यांची संख्या मर्यादितच होती. मिरवणुकीचा थाट बखरकार वर्णितो, तसा असणे शक्यच नव्हते कारण इतक्या मोठ्या प्रमाणात हत्ती, घोडे, रथ इ. रायगडासारख्या गडावर नेणे अशक्य होते. ऑक्झिंडेनने आपल्या वर्णनात दोन लहान हत्ती वरती आणलेले पाहून गडाचा मार्ग इतका बिकट असताना हे हत्ती कशा रीतीने वर आणले, याचे आश्चर्य वाटल्याचे नमूद केले आहे. ह्या राज्याभिषेकास ऑक्झिंडेन हा इंग्रज वकील आला होता व अमात्य-सचिवादिकांनी व इतरांनी महाराजांस नजराणे दिले. इ. तपशील त्याच्या वर्णनावरून चांगल्या रीतीने समजतो. ह्या राज्याभिषेकाच्या खर्चा-पोटी महाराजांकडून महालोमहालांच्या वतनदारांवर ‘ सिंहासन पट्टी ’ बसविण्यात आली होती,( राखं १६ पृ. १२ ) हे लक्षात घेण्यासारखे आहे.

## पृ. १७०

**यावनी नांवें मोडून गजशाला...ऐशीं नांवें**— राज्याभिषेकानंतर मुसलमानी पत्रलेखनपद्धतीचे स्तोम कमी करण्यासाठी व भाषाशुद्धीसाठी ‘ लेखनप्रशस्ती ’ व ‘ राज्यव्यवहारकोश ’ ही दोन साधने निर्माण केली. पत्रलेखनपद्धतीला शुद्ध मराठी वळण देण्यासाठी बाळाजी आवजी व इतर मुत्सद्द्यांच्या विचाराने ‘ लेखनप्रशस्ति ’ रचली गेली व फारसी शब्दांना पर्याय म्हणून कटाक्षाने संस्कृत परिभाषा वापरण्याचा निर्णय घेऊन रघुनाथपंडितांकरवी ‘ राज्यव्यवहारकोश ’ तयार करविला. धुंडिराज लक्ष्मण व्यास व इतर अनेक पंडित यांच्या साहाय्याने रघुनाथपंडितांनी हा कोश तयार केला ( भाइसं १८३२ पृ. ६०-६१ ).

**अष्टप्रधानांची कार्यें, कर्तव्यें**—या संबंधीचे अस्सल कानूजाबते काव्ये-तिहासंग्रह पत्रे यादी वगैरे यांत पृ. २ वर व व सनदापत्रें पृ. १२२ पासून पुढे छापलेले आहेत. चिटणिसांनी थोडा फार फरक थोडीशी वाढ सगळीकडे केले आहेत

## पृ. १७३

**बाळाजी आवजी यांस...अष्टप्रधानांतील पद**—सेनापतिखेरीज बाकी सर्व पदे ब्राह्मणांस देण्यात आली, बाळाजी आवजीस अष्टप्रधानातील पद देण्यासंबंधीची ही हकीकत चिटणीस घराण्यातील सनदापत्रांतूनही देण्यात आली आहे. ( काप्रसा पृ. १३ ). चिटणिसांस वंशपरंपरेने कारखानिशी व जमेनिशी दिली या घटनेला अस्सल कागदपत्रांचा आधार नाही. चिटणिसांना शाहू महाराजांच्या कारकीर्दीत बरीचशी वतने 'लोकांनी तसेच होते म्हणून सांगितले' अशा सांगोवांगीवरून दिली आहेत. शेजवलकरांनी चिटणिसांच्या या सनदा अतिशयोक्त व रचित व भाकडकथांच्या स्वरूपाच्या आहेत असे म्हटले आहे ( शेशि पृ. ३८६-८७ ).

**ऐशा मर्यादा करून दिल्ह्या** —राज्याभिषेकसमयी करून दिलेल्या ह्या नियमांचे पालन अतिशय दक्षतेने करण्यात येत असे, याचे प्रत्यंतर डच माणसाने केलेल्या वर्णनातून येते. कर्नाटकातील गोवळकोंड्याच्या भेटीसमयी, तानाशाह व शिवाजी यांच्या मसलती चालल्या असता, शिवाजीचे सहा हजारांचे पायदळ अवती-भोवती पसरलेले असे पण त्यामध्ये इतकी शिस्त होती की, एखाद्या माशीचे गुण-गुणणे देखील ऐकू यावे ( बाशि ४. ६५ ).

## पृ. १७४

**भागानगरकर, विजापूरकर, औरंगजेब**—या सर्वांच्या प्रतिक्रियेचे वर्णन काल्पनिक आहे. दक्षिणदिग्विजय अगोदर वर्णिल्यामुळे भागानगरकर मैत्रीचे. औरंगजेब मक्केला निघाला, ही सुखद वाटावी अशी कल्पना.

**रुकद्दीन याचे कुलांत**—हिंदुस्थानात मोगलांचा वंश स्थापन करणारा बाबर हा बापाकडून तैमूरलंगाचा व आईकडून चंगीजखानाचा वंशज होता. म्हणून मोगली घराण्यास चकत्याची पादशाही असेही म्हणतात. रुकद्दीन सुलतान म्हणजे चंगीज-खानाचा मुलगा झगताईखान असावा हे आता अधिक स्पष्ट होते.

**जिजाबाईस मृत्यू.. पुन्हां राज्यारोहण सभा**—बखरकाराने दिलेल्या दोन्ही मित्या बरोबर आहेत. गागाभट्टांनी वैदिक पद्धतीने राज्याभिषेक केला व तांत्रिक किंवा शाक्तसांप्रदायी ब्राह्मणांना वगळले. गागाभट्टांनी रायगड पर्वतास बलिदान देवविले नाही, शिर्काईची पूजा केली नाही, देशस्वामी भार्गवाचे अर्चन करविले नाही. वेताळ, भुतेखेते, हनुमान यांची पूजा नाही, त्यांना द्वारपालाकरवी बली दिला नाही, इतकेच नव्हे तर राज्याभिषेकही, 'कुयोगे कुमुहूर्तेंच कुऋक्षे घातवासरे' करण्यात आला, त्यामुळे राज्याभिषेकापूर्वीच कित्येक अनर्थ झाले व राज्याभिषेका-नंतर राजमातेचे ११ दिवसांत निधन झाले; इ. अनर्थपरंपरा सुरू झाली. तिचा

प्रतिकार व्हावा व त्या अनर्थांचे निरसन व्हावे म्हणून निश्चलपुरी नामक तांत्रिक पुरोहिताने २४ सप्टें. १६७४ रोजी दुसरा राज्याभिषेकविधी केला. ह्या द्वितीय राज्यभिषेकाचे तपशीलवार वर्णन गोविंद नारायण भट्ट बरवे यांनी 'शिवराज राज्याभिषेक कल्पतरु' या संस्कृत ग्रंथात केले आहे. ( भाइसंमंत्रै वर्ष १० अं. १, वैंशि पृ. ३४, ४१, नवभारत ऑ. १९६५ मधील व. दि. राव यांचा लेख पृ. १–११ ).

## पृ १७५

**चाफळचे श्रीरामजीचे उत्साहाचा बंदोबस्त**––३ सप्टें. १६७७ मध्ये हे इनामपत्र देण्यात आले ( शिपसासं ले. १९७१, राखं ८ ले. १३, मराअ पु. ७९-८० ). समर्थ शिवतरखोऱ्यातून गडावर राहावयास येतील तेव्हा बंदोबस्ताविषयी महाराजांनी पाठविलेले पत्र उपलब्ध आहे ( शिपसासं ले. १८६४.६५ ).

**संभाजीराजे...व्रतबंध**—४ फेब्रु. १६७५ ( शका शिच प्र पृ. २७ ). संभाजीराजांचा व्रतबंध राज्याभिषेक समयीच झाल्याचा सापडतो ( शिचसा १० ले. ४१ ). तो चुकीचा आहे.

**बलात्कारी, अविचारी, उग्र प्रकृति संभाजी**—संभाजीच्या वाह्यातपणाबद्दल बखरकाराने केलेले वर्णन तत्कालीन अनेक प्रकारच्या कागदपत्रांवरून सिद्ध होते. विशेषत: जानेवारीच्या १६७६ मध्ये इंग्रजांना शिवाजी महाराजांच्या मृत्यूची बातमी समजली. त्यासंबंधीचे पत्र पाहा; 'शिवाजीचा मृत्यू व और्ध्वदेहिक विधी ह्याजबद्दल गेले कित्येक दिवस बातमी ऐकू येते. शिवाजीच्या एक मुख्य ब्राह्मणाच्या मुलीशी संभाजीने व्यभिचार केला. तिला भेटण्यासाठी रात्री गडाखाली जाण्याचे त्याने न सोडल्यास त्याचा कडेलोट करण्याचा हुकूम शिवाजीने दिल्याचे ऐकून संभाजीने त्याला विषप्रयोग केला असे बोलतात...' ( शिपसासं क्र. १८११ ).

शितळागौरीच्या हळदीकुंकू समारंभास आलेली रूपवान स्त्री अण्णाजी दत्तोची मुलगीच होय, असे इटालियन प्रवासी निकोलाय मनुची याच्या प्रवासवर्णनावरून लक्षात येते.

संभाजीच्या या दुर्वर्तनामुळे प्रधानमंडळाचे त्याच्याबद्दलचे मत चांगले राहिले नाही. दक्षिणदिग्विजयास निघताना म्हणूनच महाराजांनी त्यास प्रभावळीचा सुभेदार म्हणून दूर ठेविले. तेथेही तो तांत्रिकांच्या मागे लागला व प्रधानमंडळींच्या कार्यात हस्तक्षेप करू लागला. त्याच्या एकंदर हालचालींमुळे शिवाजी महाराजांचे मत त्याच्याबद्दल प्रतिकूल झालेले पाहून १३ डिसेंबर १६७८ मध्ये पळून दिलेरखानाकडे गेला. त्याने त्याला हसहजारी मनसब दिली ( शका. शिचप्र पृ. २९ ).

**भूपाळगड**—दिलेरखानाने १७ एप्रिल १६७९ रोजी घेतला. बखरीतील

हकीकत काल्पनिक असली तरी या स्वारीत संभाजी दिलेरखानाबरोबर होता व खानाने लोकांवर अनन्वित अत्याचार केले. लवकरच दोघांनी मिळून अथणीची बाजारपेठ लुटली. पुत्राने असमंजपणाने असा दावा मांडावा हा दैवदुर्विलासच होय !

## पृ. १७७

**महाराजांचें दर्शन पनाळप्रांतीं**—संभाजीराजे २१ डिसें. १६७९ रोजी पन्हाळ्यास परत आले ( शका. शिचप्र पृ. ३० ), अथणीची पेठ लुटून तेथल्या हिंदु रहिवाशांना गुलाम म्हणून विकण्याचे दिलेरखानाने ठरविले तेव्हा संभाजीला आपण काय करीत आहोत, याची जाणीव झाली ( सशि पृ. ३२६ ). शिवाजी महाराजांनीही वारंवार माणसे पाठवून त्याचे मन वळविण्याचा प्रयत्न चालविला होता. मोगलांच्या नोकरीत असलेला शिवाजीचा जावई महादजी निंबाळकर यानेही संभाजीची कानउघाडणी केल्यामुळे संभाजी २० नोव्हेंबर रोजी येसूबाईसह प्रथम विजापूरकडे पळाला आणि स्वराज्यातील सैनिकांच्या मदतीने पन्हाळ्यास परत आला ( बस ५०१ ). शिवाजी महाराजांनी १३ जानेवारी १६८० मध्ये त्याची भेट घेऊन त्याची समजूत घातली.

## पृ. १७७-१८१

**ऐसें घरोबियाचे रीतीनें ... गनीम जेरजूर करून खट्टा करून उखळिला**—मागे शिवाजीमहाराजांनी व्यंकोजीराजांना लिहिलेली दोन पत्रे मुद्दाम सादर केली. ग्रँट डफने तीन पत्रे असल्याचे नमूद केले आहे. त्यापैकी राहिलेले तिसरे पत्र त्यातील घटनांचा क्रम बदलून बखरकाराने संपूर्णपणे वापरलेले आहे. इतिहाससंग्रहात प्रसिद्ध झालेले हे तिसरे पत्रही मुद्दाम खाली उद्धृत करीत आहे. त्यायोगे वाचकांना बखरकाराच्या लेखनप्रवृत्तीचा चांगला परिचय होईल.

: ३ :

श्रियासह चिरंजीव अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री महाराज व्यंकोजी राजे यासी प्रती शिवाजीराजे आशीर्वाद.

येथील कुशल जाणून स्वकुशल लेखन करणें. उपरी तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. तुमचें कुशल कळोन संतोष वाटला. तसेंच क्षणक्षण आपलें कुशल लेखन करून पाठवीत जाणें. विशेष ए प्रांतीचें वर्तमान; दिलेलखान विजापूरची पातशाही कमकुवत देखोन जोरावरी धरून विजापूर घ्यावें या मतलबें विजापूरावर चाल केली. भीमा नदी उतरून शहरानजीक येऊन भिडला. हें वर्तमान खान अलीशान मसऊदखान यांनी आम्हांस

लिहिलें कीं, गनीमें जोरावरी बहुत धरली आहे. एऊन मदत केली पाहिजे. त्यावरून आम्हीं तेच क्षणी स्वार होऊन मजली दरमजली पनाळियास आलों. सारी कूळ जमेती जमा करून खासा लष्करानिशीं विजापुरा सन्निध गेलों. विचारें पाहतां गनीम कट्टा, त्याहीमध्यें पठाण जाती, हट्टी, याशीं हुन्नरेंच करून खजील होऊन नामोहरम होय तोच हुन्नर करावा. म्हणून ऐशी तजवीज केली कीं, त्याचे मुलकांत फौजाचा पैसावा करून ओढा लावावा. त्यावरून दिलेलखानास ती गावाचे अंतरे सोडून भीमानदी उतरून तहद जालनापूर पावेतों मुलुख तख्ततराज करीत चाललों. जालनापुरास जाऊन चार दिवस मुक्काम करून पेठ मारली. बहुत मालमत्ता लागली. जालनापुरास म्हणजे औरंगाबादेहून चार गांवे ते जागा शहाजादा असतां त्याचा हिसाब न धरितां पेठ लुटली. सोनें, रुपें, हत्ती यांखेरीज मत्ता बहुत सांपडली ती घेऊन पठा–गड तरकसि स्वार होऊन कूच करून एता, मध्यें रणमस्तान व आसफखान व असेच आणीक पांचसात उमराऊ आठदहा हजार स्वारांनिशीं आले. त्यांस शाहबाजीच्या हुन्नरें ऐशी तंबी करून ये तैशी तंबी करून घोडे व हत्ती पाडाव करून पटियास आलों. मागती लष्कर मुलकांत धुंदी करावयास पाठविलें व राजश्री मोरोपंत प्रधान यास बागलाण व खानदेश प्रांतीं सत्तावीस किल्ले मोगलांचे आहेत ते व मुलूख कबज करावयास पाठविले आणि आम्ही पटियास मुक्काम केला. तों खान अलिशानची किताबती आली कीं, तुम्हीं गनिमाचे मुलकांत स्वारी करून खराब केला, ओढा लाविला परंतु या जागाहून गनीम उखळत नाहीं. बहुतच बळ धरून कोटानजीक भिडला आहे, ए समयीं एऊन मदत करून पातशाही राखली पाहिजे. त्यावरून मागती स्वार होऊन मजली दर मजली पनाळियास आलों. कितेक द्रव्यानें व सेनेनें पहिलें साहाय केलें व मागतीही द्रव्य मबलग पाविलें व सेना गनीमाचे मुलकांत पैसली होती ते बोलावून आणून दिलेलखानावरी पाठविली. त्यांनीं जाऊन कहीकबाड मारून कुल सामान दाब धरून आरोखून धरिला. त्याचे मदतीस औरंगाबादेहून रणमस्तखान व बाजे उमराऊ अलीखान घेऊन सात आठ हजार स्वारांनिशीं येत होते त्यांसही मारीत गर्देस मेळवीत पिटीत औरंगाबाद पावेतों गेले. कितेक शहरें लुटीत देश खराब करीत परतोन येऊन गनीमास घेरोन बैसले. हे वर्तमान व राजश्री मोरोपंत त्या प्रांतीं पाठविले होते त्यांणीं अहिवंत किल्ला घेतला. अहिवंत म्हणजे जैसा कांहीं पनाळा, त्याचे बरोबरी समतुल्य आहे. दुसरा नाहवागड, बागलाणच्या दरम्यान मुलकांत आहे; तो कठीण तोही घेतला. हे दोनी किल्ले नामोशाचे

पुरातन जागे, कबज केले. त्या किल्ल्यावरही बहुत मालमत्ता सांपडला व त्याचबरोबर जमेत होती ते मुलकांत पाठऊन धामधूम केली. कितेक मुलूक कबज केला. हे वर्तमान व पहिले आम्ही स्वारी केली, जालनापूर मारिलें, रणमस्तखान नामोहम केला हें वर्तमान वरचेवर पादशाहास बाकीबाहाल जाला. पातशा बहुत खजिल होऊन आहादीवर आहादी दिलेलखानास आले. ये जातीनें मुलूक खराब करून गड कोट व देश कबज करून वोढा लाविला. आणि लवाजमा धरून वरच्यावरी कहीकवाड मारून गनीम जेर केला. दिलेलखानासही ऐसें कळोन आले की, येथें राहिल्यानें आपली शाही कुल बुडवितील हें पूर्ते जाणोन विजापूर सोडून दिवसास कोस दोन कोस मजली करून चालिला. ऐसा गनीम जेर जेर करून खट्टा करून उखळिला. व खान अलिशानेंही बहुतच शर्त केली. जैसा कोट राखावयासी शर्थ करून ये तैसी करून कोट राखिला. आम्हीं याप्रकारें विजापुरीचे साहाय द्रव्यानें व सेनेनें करून ज्या उपायें गनीम उखळूं ये त्या उपायें उखळून विजापुरीचें आरिष्ट दूर करून विजापूर रक्षिलें. ते प्रसंगीं खान आलीशाहाचा सुलूख जाला. त्या करारबावेमधें होसकट व बंगळूर व अरणी व चंदावर अदिकरून तुमचे निसबती आम्हीं आपणांशींच लावून घेतली. पेशकशी तोफा तुम्हीं निराळ्या घ्याव्या सतत निसबती तुम्हांसी लागावी ऐसें केलें नाहीं. आवघे आम्हीच मान्य केलें. तोफा आम्हींच तुम्हांदेखील घ्याव्या ऐसा तह ते प्रसंगीं करून करारबाब करून सला केला. या उपरि दिलेलखान आदवानी कारबळ (कोपळ) प्रांताकडे गेला होता. आमचीही सेना पाठीवरी गेली व आम्ही विजापुरास जातों. कारबळ प्रांताकडे राजश्री जनार्दनपंत ठेविले. त्यांणीं तिकडे कितेक पुंड पाळेगारांनीं फिसाहती केली होती त्यांस मारून काढले व त्याचा कबिला व हुसेनखान दोन-तीन हजार स्वारांनिशीं आला होता, त्यास व त्याचा कबिला व हुसेनखानाचे दोघे लेंक ऐसे दस्त केले व हत्ती पांच व घोडे पांचसे पाडाव केले याखेरीज पुंड पाळेगाराचा मुलूक व गड व कोट काबीज करून ठाणीं बैसविलीं फते केली. याउपर दिलेल खान सर्जाखान व हुसेनखान येतो हें कळोन हेही पांच सहा स्वारांनिशीं गनिमावर गेले. मधे गनीम घालून जिकडे गनीम जाय तिकडे घालून जागां जागां गनीमास गोषमाला देऊन तिकडूनही मारून काढिला. सांप्रत भीमानदी उतरून पेडगांवास आपले मुलकांत गेला. गनिमास ऐसें केलें जे मागती विजापूरची वाट न धरावी ऐसा खट्टा केला; व चिरंजीव राजश्री संभाजीराजे मोगलाइत गेले होते त्यास आणावयाचा उपाय बहुत प्रकारें केला; त्यासही कळों आलें कीं, ये पादशाहींत अगर विजापूरचे अगर

भागानगरचे पादशाहींत आपले मनोगतानुरूप चालणार नाहीं. ऐसें जाणोन त्यांणीं आमचे लिहिण्यावरून स्वार होऊन आले. त्यांची आमची भेट जाली. घरोब्याचे रीतीनें जैसें समाधान करूं ये तैसें केलें. हें सविस्तर वर्तमान तुम्हांस कळावें म्हणोन लिहिलें असें—कळलें असावें. 'मोर्तबसुद'

राज्याभिषेकानंतरच्या बखरकाराच्या वर्णनाचा आधार म्हणजे हे एकुलते एक पत्र. दक्षिणदिग्विजय तर त्याने अगोदरच वर्णिलेले. राज्यभिषेकानंतरचा, दक्षिण-दिग्विजयापूर्वीच्या आणि दक्षिणदिग्विजयानंतरच्या महत्त्वाच्या घटना बखरकाराला माहीत नाहीत.

राज्याभिषेकसमयी विजापुरास खवासखान हा वजीर होता. १६७६ च्या जानेवारीमध्ये अब्दुलकरीम बहलोलखान नावाच्या पठाण सरदाराने त्यास ठार मारून वजिरी बळकाविली. त्याने दिलेरखानाशी संगनमत करून औरंगजेबाचा दक्षिणचा सुभेदार बहादूरखान याजविरुद्ध तक्रार करून त्याची उचलबांगडी करायला लावली. विजापूर दरबारामध्ये मोगलांशी हातमिळवणी करणारा बहलोलखानाचा पक्ष आणि शिवाजी व गोवळकोंडेकर यांच्याशी संगनत करून पठाणी पक्षाचा वरचष्मा कमी करू पाहणारा सिद्दीमसाउद व सर्जाखान यांचा पक्ष असे दोन पक्ष निर्माण झाले. शिवाजी महाराजांनी त्याच्या फ़ायदा घेऊन गोवळकोंडा विजापूर व महाराष्ट्र यांचा 'दक्षिणी पक्ष' स्थापन केला. लवकरच आजारपणामुळे बहलोलखान मरण पावला व सिद्दी मसाउद हा २१ फेब्रु. १६७८ ला विजापूरचा वजीर झाला. शिवाजी महाराजांनी १६७८ च्या डिसेंबरमध्ये हुबळी वगैरे कर्नाटकाच्या बाजूने स्वाऱ्या केल्या. त्याच वेळीं संभाजी दिलेरखानास मिळाला होता. विजापूरकरांचा सर्जाखान हाही दिलेरखानास मिळाला व भूपाळगड व अथणी लुटणे वगैरे प्रकार त्यावेळीं घडले. संभाजी दिलेरखानास मिळाल्यानंतर भूपाळगडावर हल्ला करण्यापूर्वी दिलेरखानाने विजापूरवर स्वारी करण्याची तयारी केली होती, त्यावेळीं एकदा मसाऊदखानाने शिवाजीस मदतीस बोलाविले. यावेळीं या मदतीचा विशेष उपयोग झाला नाही; शिवाजीचा विश्वास न वाटून मसाऊदने दिलेरखानाशी तह केला. पुढे १६७९ च्या आक्टोबरमध्ये दिलेरखानाने विजापूरवर पुन्हा स्वारी केली आणि यावेळीं परत मसाऊदखानाने मदत मागितली. ह्या दुसऱ्या वेळी मराठ्यांच्या उपद्रवामुळे दिलेर-खानाला विजापूर जिंकता आले नाही; मराठे व आदिलशहा यांचा तह झाल्यामुळे व मराठ्यांच्या मदतीमुळे दिलेरखानास वेढा उठवून परत जावे लागले (शका शिचप्र. पृ. ३०).

## पृ. १८३

राजारामविवाह—शके १६०१ फाल्गुन व॥ १० (१५ मार्च १६८०)

## पृ. १८४

**आत्मानात्मविचार**—परमेश्वर व विश्व यासंबंधीचा वेदांतविचार.

**महावाक्य**—'अहं ब्रह्मास्मि' (या ब्रह्मांडामध्ये भरून राहिलेला परमेश्वर मीच आहे) किंवा 'तत्त्वमसि' (ते तूच आहेस) हे सर्वोच्च ज्ञान.

**षड्वर्ग**—काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे मनुष्याचे षड्रिपू.

**नवविधा भक्ति**— श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पाद सेवनम् ।
अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदम् ॥
(भागवत स्कंध ७. ५. २३)

## पृ, १८५

**हें राज्य देवाचें देणें नाश होईल इ.**—सभासदाच्या बखरीचे हे अनुकरण आहे. संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर सभासद बखर लिहीत होता, तेव्हा त्याने डोळ्यासमोर घडलेल्या घटना महाराजांच्या तोंडी भविष्यवाणीदाखल घातल्या. चिटणिसांनी डोळे झाकून त्याचे अनुकरण केले.

## पृ. १८६

**मृत्यू**—त्या दिवशी शनिवार येतो. रविवार नव्हे. (३ एप्रि. १६८०).

**पुतळाबाई सहगमन**—२७ जून १६८० मध्ये सती गेली (शिचप्र पृ. ५३, भाइसंमं इतिवृत्त १८३६ पृ. २४).

**साबाजी भोंसले**—९१ कलमी बखरींत, 'कान्होजी भांडवलकर हवालदार सरकारकून यांनी श्री महादेवाच्या देवळापुढे महाराजांच्या कलेवरास अग्नि दिला,' असे म्हटले आहे.

**दुश्चिन्हें वगैरे**—हेही वर्णन मूळचे सभासदाचे. महाराज गुडघी रोगाने मेल्याचे सभासद सांगतो. चिटणिसांनी रोगाचा उल्लेख केला नाही. मुंबईकर इंग्रजांनी रक्तातिसाराने महाराज मरण पावले. तत्पूर्वी ते १२ दिवस आजारी असल्याचे म्हटले आहे (शिपसासं क्र. २२५३). राजारामाला गादीवर बसविण्यासाठी सोयराबाईने विषप्रयोग केल्यामुळे मृत्यू आल्याचेही उल्लेख आहेत. (कित्ता २२८६, कुलाबा गॅझेटियर पृ. ३७३, शिवदिग्विजय पृ. ४६२).

## बखर

मल्हार रामराव चिटणिसांचे हे चरित्र ' चिटणीस–बखर ' या नावाने ओळखिले जाते. या ठिकाणी बखर या शब्दाचा अर्थ इतिहास असा आहे. मध्ययुगीन कालात प्रसिद्ध ऐतिहासिक स्त्रीपुरुषांची चरित्रे, आत्मचरित्रे, त्यांच्याबद्दलच्या हकीकती, युद्धांची, ऐतिहासिक घराण्यांची वर्णने इत्यादिकांना 'बखर' ही संज्ञा लावण्यात येते. ऐतिहासिक बखरींप्रमाणेच पौराणिक बखरीही उपलब्ध आहेत. अर्ज, हकीकत, बातमी, जबानी, आठवण, तोंडी अथवा लेखी पुरावे, कैफियती इ. अर्थानेही मध्ययुगीन कालात बखर हा शब्द सर्रास वापरण्यात येतो. बखर हा शब्द खबर या अरबी शब्दापासून वर्णविपर्यय ( ख ब यांमध्ये वर्णांची उलटापालट ) होऊन तयार झाला, ही कल्पना ग्राह्य, परंतु त्यासंबंधाने निरनिराळ्या व्युत्पत्त्या सुचविण्यात आलेल्या आहेत. प्रसिद्ध इतिहाससंशोधक राजवाडे यांनी बक = बकणे, बोलणे ह्या धातूपासून बखर शब्द मराठीत निपजला असल्याचे सांगून फार पुरातन काळी बखरी तोंडाने बोलत असत, हाताने लिहीत नसत, असे अनुमान काढले आहे. महाराष्ट्र शब्दकोशात बखैर शब्दाचा सकुशल, स्वास्थ्यासह असा अर्थ दिला आहे व या शब्दास विशेषणात गणिले आहे. त्यावरून प्रा. पां. ना. कुलकर्णी यांनी बखैर > बखेर > बखर ही एक नवी व्युत्पत्ती सुचविली आहे ( नवभारत फेब्रु. १९६६ पृ. ५७ ). बखैर आणि बखर या शब्दांत काही फरक आहे, अशी समजूत या व्युत्पत्तीच्या मुळाशी दिसते. मोडी लेखनपद्धतीचा विचार केला तर बखर शब्दच वरती लपेट देऊन बखैर सारखा असंख्य ठिकाणी लिहिला जातो असे दिसेल. मोडी कागदपत्रांत पत्रलेखकाच्या हातून एकाच अर्थाने बखैर, बखेर, बखर असे सर्रास लिहिलेले आढळते आणि इतकेही करून बखैर या शब्दाची व्युत्पत्ती काय हा प्रश्न राहातोच. त्यामुळे खबर > बखर हीच व्युत्पत्ती योग्य होय.

## शिवचरित्रपर बखरी

शिवाजी महाराजांचे चरित्र ज्यांमध्ये वर्णिले आहे अशा एकंदर आठ बखरी आतापर्यंत उपलब्ध झालेल्या आहेत. ( १ ) कृष्णाजी अनंत सभासद यांनी छत्रपती राजाराम यांच्या आज्ञेने लिहिलेली – ही सभासद–बखर ( इ. १६९७ ) ( २ ) दत्ताजी त्रिमळ वाकेनिविस याने लिहिलेली ९१ कलमी बखर. हिचा लेखनकाल इ.स १७६० पासून १७९० पर्यंतच असावा, असे मानले जाते, व ते योग्य आहे. वाकसकर ह्या बखरीचा काल इ. स. १७०३ समजतात. फारसीमध्ये ' तारीखे शिवाजी '

नावाची जी बखर उपलब्ध आहे, ती ९१ कलमीचे भाषांतर होय. ९१ कलमीची भाषाशैली पाहिली तर मूळ फारसीचे हे वेडेवाकडे रूपांतर असावे की काय अशीही शंका येते. ( ३ ) रघुनाथ यादव चित्रे यांनी लिहिलेली– ही चित्रगुप्त बखर ( १७५९ ), ( ४ ) मल्हार रामरावांची सप्तप्रकरणात्मक चिटणीस – बखर– ( १८१० ) ( ५ ) गणपतराव गोविंद बर्वे यांनी इ. स. १८१७ मध्ये लिहिलेली–' मराठी साम्राज्याची छोटी बखर ' ( ६ ) शिवदिग्विजय–इ. स. १८१८. ही मल्हार रामरावांचे चुलत बंधू रघुनाथ लक्ष्मण चिटणीस यांनी लिहिली असावी, असे मी अनेक पुराव्यांवरून अन्यत्र दाखविले आहे. ही बखर सर्व बखरींहून मोठी आहे. शके १८१७ मध्ये बडोदेकर मंडळींनी ही बखर प्रसिद्ध करताना मूळ बखरीमध्ये बरीच घालमेल केलेली आहे. हे स्पष्ट दिसते. ( ७ ) शिवप्रताप ( १८२९ ) व ( ८ ) शेडगावकर बखर ( १८५४ ).

ह्या सर्व बखरींमध्ये ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने सभासदाची बखरच काय ती बरीच विश्वसनीय ठरते. ९१ कलमी बखरीमध्ये बरीच गडबड आहे. चित्रगुप्ताची बखर म्हणजे सभासद बखरीचे पल्लेदार व आलंकारिक भाषेत केलेले विस्तृतीकरण होय. राहिलेल्या बाकीच्या सर्व बखरी अगदी उत्तरकालीन असल्यामुळे ऐतिहासिक दृष्ट्या अगदीच सामान्य आहेत. चिटणीसबखरीच्या अभ्यासाने त्याची कल्पना येईलच.

## काव्येतिहाससंग्रह आणि चिटणीसबखर

रा. ब. का. ना. साने यांनी काव्येतिहाससंग्रहामध्ये ' चिटणीसबखर ' छापलेली नाही. प्रस्तावरूप निवेदनात त्यांनी तसा स्पष्ट उल्लेख आपल्या १९२४ सालच्या संपादित आवृत्तीत केला आहे. परंतु डॉ. ग्रामोपाध्ये संपादित ' मराठी बखर गद्य ' या पुस्तकात (पहिली आवृत्ती-१९५२ पृ. ११० ) सप्तप्रकरणात्मक चरित्रातील जो उतारा दिलेला आहे, तो काव्येतिहाससंग्रह प्रत १८८२ मधून दिल्याचा उल्लेख आहे. तसेच श्री. वा. सी. बेंद्रे यांनी आपल्या संभाजीचरित्राच्या संदर्भग्रंथयादीत पृ. ६८० वर : ' मल्हार रामराम चिटणीसविरचित शिवछत्रपति महाराज यांचे सप्तप्रकरणात्मक चरित्र ( मराठी ), संपा. काशिनाथ नारायण साने, काव्येतिहास-संग्रह, पुणे, १८८९ इ., ( प्रका ) ' असा उल्लेख केला आहे.

वरील दोन्ही उल्लेख चुकीचे आहेत.

□ □ □

# शब्दकोश

( संक्षेपचिन्हे - अ. = अरबी, का. = कानडी तु. = तुर्की, फा. फारसी, सं. संस्कृत )

## अ

**अंकित** – स्वाधीन, सेवकपणा पत्करून राहणे.

**अगम्याअगमन** – दुराचार

**अगोठी** – ( सं. अग्रवर्षा ) पावसाळ्याची सुरुवात

**अग्रहार** – ब्राह्मणांना दान म्हणून इनामगाव व जमीन देणे.

**अचाट** – ( सं. अचेष्ट ) मोठमोठी, कमालीची, नितांत.

**अटकळला** – अडखळला.

**अटीनें** – निश्चयाने

**अडिस्री, अडिशेरी** – नोकरांना निर्वाहार्थ दरमहा देण्याचे अडीच शेर धान्य

**अंत्यज** – अस्पृश्य

**अदब** – आदर, सन्मान

**अदालत** – न्यायसभा

**अनमान** – संशय, शंका

**अनर्गल** ( सं. ) अप्रतिबंध, मनस्वी

**अनर्थ** – उच्छेद, विपरित

**अनागोंदी** ( का. आनी = हत्ती, गुंडी—गोल दगड ) हत्ती बांधण्याजोगे प्रचंड असे गोलाकार दगड ज्या गावात पडले होते ते ठिकाण

**अपार** – असंख्य, पुष्कळ

**अपरमित** – अमर्यादित, अगणित

**अंबर** – कोठार

**अंबारी** – हत्तीच्या पाठीवरचा आच्छादिलेला शोभिवंत हौदा

**अर्ज** – विनंती **अर्जदस्त** – विनंतिपत्र

**अर्जणें** – मिळविणे, संपादिणे.

**अर्थ** – संपत्ति, पैसा, रहस्य.

**अरेतुरेचे झुंज** – हमरीतुमरीवर येऊन, एकेरीवर येऊन केलेले युद्ध

**अलबत** – अवश्य.

**अलमगीर** – ( फा. ) शहाजहान.

**अल्पबुद्धि** – अप्रौढ, बालिश, वक्र, मंद.

**अवकाल** – अपघात, अकाल

**अवधि** – समाप्तिवेळ

**अवलाद** – ( अ. ) वंश, संतती

**अवलिया** ( अ. ) साधू

**अश्वशाला** – तबेला, पागा

**असामी** ( अ. ) मनुष्य

**अस्तनी** ( फा. ) वाही

**अहदतहद** – येथून तेथून, तेथपर्यंत

**आक्रम** – आक्रमण

**आंगीजणी, आंगेजणी** – स्वतःचे शौर्य

**आंगें** – एकट्याच्या हिंमतीवर

**आजानुबाहू** ( सं ) उभा राहिला असता गुडघ्यास पोचतील अशा लांब हातांचा.

**आरोप** – अडथळा, हरकत, व्यत्यय.

**आड घालणें** – अट, शर्त घालणे.

**आडहत्यारी** – बंदुका, तरवारीखेरीज करून इतर हाती येईल त्या हत्यारांनिशी लढणारा

**आडून** – मोठ्या अटीतटीनें

**आंतले हाते** – गुप्त रीतीने, अंतस्थ रीतीने.
**आप्तपणा** – जवळीक
**आप्तविषयीं** – आप्तसंबंधाने, नात्यागोत्यातील, जवळचे
**आबदागिर** – ( फा. ) डोक्यावरचे छत्र
**आबादानी** ( फा. ) संपन्नता, भरभराट
**आंबे वोहोळ** – पुण्याजवळ पर्वतीच्या पायथ्याशी वाहणारा आंबील ओढा.
**आमीष** – मांस, लाच
**आयास** – श्रम
**आयुर्भाव** – आविर्भाव, अंगी येणे, अंगी संचारणे.
**आर्ष** – बुद्धीने कमी, वेडसर
**आश्रा** – आश्रय
**आलमगीर** – शहाजहान
**आसन** – स्वस्थ वसून योग्य काळाची वाट पाहणे.
**आहादीवर आहादी** – पत्रावर पत्र, डाकेवर डाक

## इ

**इजत** – अब्रू, इभ्रत, मान
**इजाफा** – ( अ. ) अधिक, वाढ, तनखा, नेमणूक
**इजारा** ( फा. ) खंड, मक्ता
**इटेकरी** – इटा नावाच्या शस्त्राने लढणारे.
**इतबार** –( अ. ) विश्वास
**इतबारी** ( अ. ) विश्वासपात्र.
**इतलाखी** – ( अ .) नक्त पगार देऊन ठेवलेला सैनिक किंवा शिलेदार.
**इतला** – ( अ. ) अनुमती, आदेश, सल्ला
**इभ्रत** – धाक, दरारा, पत
**इलाखा** – ( अ. ) संबंध
**इशारत** – खूण

**ईतिभय** – (सं.) शलभ (टोळ), शुक (कीर), मूषक, अतिवृष्टी, अनावृष्टी, स्वचक्र, परचक्र अशी सात संकटे, त्यांनाच सप्तईति म्हणतात.

## उ

**उखळून काढणें** – उखडून काढणे, धुव्वा उडविणे.
**उगेच** – मोकळया हाताने
**उत्संगळ शब्द** – अपशब्द
**उत्साह** – उत्सव
**उदंड** – अतिशय, पुष्कळ, फार
**उदवक** – उझबेग लोक
**उपराळा** – नंतर, मागाहून
**उपरांत** – मदत
**उपाधीक** – उपाध्यिक–उपाध्येपण
**उपेबन** ( सं. उपबर्हण ) लोड, तक्क्या
**उफानखोरी** – उधळपट्टी, फाजील खर्च
**उलफा** – शिधा, कोरडे धान्य

## ए

**एकासनीं** – सारख्याच योग्यतेचे निदर्शक म्हणून एकाच आसनावर बसणे.
**एहसान** ( अ. ) कृपा, उपकार
**ऐंद्री** – (सं.) इंद्र, पूर्वदिशा व पर्वत ( ऐंद्री व पौरंदरी या शब्दांचा अर्थ एकच होय. )

## क

**कची** ( कच्ची ) अडचणीची अवस्था.
**कजाकीन, कजाखी** – (तु.)लढाऊ, चिवट, दणकट
**कज्जा** – ( अ. ) भांडण
**कटा** ( अ. कत्अ ) कत्तल
**कबिले** ( अ. ) कुटुंब, स्त्रिया

**कमाविसदार** – जमीन महसूल गोळा करणारा सरकारी अधिकारी

**करवल, करोल** – बंदुकीने लढणारा

**करारनामा** – ठरावपत्र

**कलाल** – गुत्तेवाला, दारू विकणारा

**कवित्त, कवित्ते** – कविता

**कह्या** – आज्ञा, हुकूम

**कळवांतीण** – दासी, नाटकशाळा, रखेली

**कानडा** – कानडी मुलुखातला.

**कानुजाबता** – नियम-पत्र (कानू अ. कानून = कायदा जाबता अ. झाबिता = नियम बंधन, यादी ).

**काबिल** – ( फा. ) लायक, कर्तृत्ववान, शाहाणा.

**कामावर पडणें** – उपयोगी पडणे, मदतीस येणे.

**कारकून** – निरनिराळ्या खात्यावरचे अधिकारी, officer.

**कारगर, काराग़र** – परिणामकारक

**कालाचे कालीं** – योग्य वेळी, वेळोवेळी.

**काल् सनया** – चौघड्याच्या सनया.

**कावा** – कारस्थान, कपट डाव.

**कावेसींत** – कवेत, कब्ज्यात

**काशीद** – ( अ. ) जासूद, दूत.

**किनखाप** – ( फा.) सोन्यारुप्याच्या धाग्यांनी नक्षी केलेले रेशमी कापड

**किन्नरखंड** ( सं. ) तिबेट.

**किलाफ** – ( अ. ) वैषम्य, संशय.

**कुच्या करणें** – पाय तोडणे.

**कुरनिशात** – ( तु. ) नम्रतापूर्वक वंदन, अभिवादन.

**कुलकारभारी** – सर्वाधिकारी.

**कुलूब** – खंबीर, धाडसी, धैर्यशाली, निधडा.

**केंवि** – कोणत्या प्रकारें ?

**कोतवाल घोडा** – स्वारीच्या घोड्याखेरीज जादा बरोबर बाळगिलेला घोडा.

**कोशिश** – प्रयत्न.

**कौल** – आश्वासन, अभय.

**क्रिया** – कृति, शपथ, आणाभाका.

**क्रोड** – कोटी

## ख

**खजाना** ( अ. खझीना ) कोश, खजिना, द्रव्यभांडार

**खटाई** – विवाड.

**खंडणी** – जबरदस्तीने वसूल केलेला पैसा.

**खड्गचर्म** – तरवारढाल.

**खंदा** – ज्ञानी, शहाणा, शूर.

**खपा** – नाराज, रुष्ट.

**खंबीर** – दृढनिश्चय.

**खराबा** – दुर्दशा, विपन्नावस्था.

**खवासीत** – खाशांच्या मागे हत्तीवर बसण्याची जागा.

**खातरजमा** ( अ. ) खात्री, समाधान, निराकरण.

**खातरेत न आणतां** – दुर्लक्ष करून, तुच्छ मानून.

**खिलावणें** – खेळणे.

**खुदस्ते बुनियाद** – दौलताबादची पादशाही.

**खोजा** – ( फा. ) खच्ची केलेला, षंढ, हिजडा पुरुष.

**खोरें** ( सं. कुहर ) दोन डोंगरांतील लहान भाग. मावळात अशी ७ खोरी आहेत.

## ग

**गंगातीर** – गोदातीर.

**गट बांधणें** – टोळ्या करणे.

**गडसंधी – गडसंदी** – अडचण, धोक्याची जागा.
**गयावर्जन** – ( सं. ) गयाक्षेत्रीचे धार्मिक विधी.
**गरगशा** ( फा. ) गडबड, गोंधळ.
**गरीबनवाज** ( फा. ) गरिबांचे धनी, आधारस्तंभ.
**गर्दी** ( फा. ) नाश, विध्वंस.
**गलवल** – ( अ. ) गलका, गडबड.
**गाठ तोडणें** – भेट घाईने मध्येच संपविणे.
**गारद करणें** – ठार मारणे.
**गावगन्ना** – गावोगाव, दर गावास.
**गाहा** – जमाव, एकीकरण.
**गिर्दनवाई** – किल्ल्याच्या तटाचे संरक्षण.
**गुजरी** – पायातील दागिना.
**गुमान** – पर्वा, हिशेब.
**गुरूदर** ( गुरु + उदर ) गर्भवती, गरोदर.
**गैर राबता** – माणसे भेटीस येण्यास प्रतिबंध.
**गोट** – सैन्यशिबिर.
**गोषमाल** – ( फा. ) कानउघाडणी.
**गोसावी** – ( सं. गोस्वामी ) धनी, मालक, विद्वान.

## घ

**घरळून** – घसरून.
**घुसलखाना** ( फा. ) खलबतखाना.
**घेरा** – परीघ.

## च

**चमत्कारिक** – सिद्ध, दैवी, असामान्य.
**चरिदा** – चाऱ्याचा खर्च.
**चावर** ( चाहूर ) १२० बिघे.
**चिंध्याबिंदी** – चिंध्याबिंध्या, चिरगुटे.
**चिरेबंदी जोती** – ( जोते = चौथरा ) पुरुष-भर उंच असे चौथरे. घोडेस्वारांना घोड्यावर बसूनच जिन्नस विकत घेता यावे यासाठी केलेली व्यवस्था.
**चोळणा** – गुढघ्यांपर्यंतची तंग विजार.
**चौत्रा** – चबुत्रा, उंचवटा.
**चौथाई** – उत्पन्नाचा चौथा भाग, तो घेण्याचा हक्क.

## छ

**छंदोगामात्य** – धर्माधिकारी.

## ज

**जकीरा** – ( अ. ) कोठार, साठा.
**जंजिरा** – जलदुर्ग, समुद्रातील किल्ला.
**जड** – वजन, प्रभाव, दाब, जमाव, संख्या.
**जडभारी** – संकट, जोखीम.
**जडाव** – जोडणी.
**जडित** – रत्नजडित, रत्नखचित.
**जन्मांतर योग** – दैवयोग, पूर्वपुण्यानुसार जमून आलेला योग.
**जबाब धरून** – ( डाक ) मध्येच पकडून.
**जबून** – ( फा. ) मोडकळीस आलेली, गरीब, दरिद्री.
**जमियेत** – जमाव, जमात.
**जमेदार** – ( फा. झमीदार ) जमीनदार, वतनदार.
**जमिनिस** – जमाबंदी खात्याकडील लेखनिक.
**जवांमर्दी** – शौर्य, धैर्य, अतुल पराक्रम.
**जाचणी** – छळ, जाचणूक.
**जाजती** – आधिक्य, वढती, जुलूम, जय, सरसी.
**जातीनें** – स्वतः, खुद्द.
**जायां** ( अ. ) नष्ट, जखमी, खराब.
**जारी** – चालू, सुरू.

**जासूद** (अ.) निरोप्या, हर्कारा.
**जाहंबाज** (फा.) पक्का, वस्ताद, हुशार.
**जिमा** (अ.) जबाबदारी.
**जिरे** – (फा. झिरिह्) साखळीचे चिलखत.
**जिलिबी** (फा. जिलबी) मिरवणूक, लवाजिमा
**जिवाभ्य, जिवादारभ्य** – प्राणापलिकडे, जिवापाड मेहनत.
**जेर, जेरदस्त** (फा.) हस्तगत, जित, पराभूत.
**जेरजूर** – त्रस्त, हैराण.
**जेहघा** – (फा. जीगा.) शिरोभूषण.
**जोरावर** – समर्थ, शक्तिमान, जोरदार.
**जोहार** – सलाम, मुजरा.

## झ

**झड** – एकसारखा पाठलाग.
**झाडा** – जमीन मोजणीतील एकीकरणाचे एक प्रमाण.

## ट

**टाळा दिला** – चालढकलपणा केला. टाळ टाळ केली.
**टेकावर** – टेकडीवर, टेपावर.

## ड

**डबीर** – (फा. दबीर.) परराष्ट्रमंत्री.
**डाक** – टपाल.
**डेरा** – तंबू.
**डोला** – मुसलमानी ताबूत, ताजिया.

## त

**तक्त, तख्त** – (फा.) सिंहासन.
**तगीरी** – (फा.) काढून टाकणे.
**तजविज** – (अ.) विचार.
**तटले** – खोळंबले, थांबले.
**तटीं न लावता** – भांडण विकोपास न नेता
**तडातोड** – भेद, ताटातूट.
**तपीळ** – तापट, क्रूर, तामसी.
**तवलदार** – (फा.) लष्करातील लाकूडफोड्या.
**तंबी** – (अ.) धमकावणी, शिक्षा.
**तमाम** – (अ.) चोहोंकडून, सर्वत्र.
**तरतूद** – (अ.) उपाय, बंदोबस्त.
**तर्फ** – (अ.) पेटा, तालुक्यापेक्षा लहान ग्रामसमूह.
**तलफ** – (अ) नाश, उध्वस्त. ताराज हा फारसी शब्द. त्याचाही अर्थ तोच. तलफ-ताराज हा जोड शब्द.
**तसलीम** (अ.) सलाम, मुजरा.
**तहद गंगातीर** – गोदाथडीपर्यंत.
**ताजीमतवाजू** – बहुमान, आदर सत्कार व वस्त्रे वगैरे अर्पण करणे.
**ताडोचे** – रुप्याचे.
**ताबित** – (अ.) अंकित, स्वाधीन.
**तारीफ** – (अ.) गुणगौरव, वर्णन, स्तुती.
**ताले** – (अ.) दैव, नशीब, ग्रह.
**तुरुख. तुरुकडे** – तुर्क.
**तुळणा केंवी** – तुलना कुठली ?
**तुळा** – वजन.
**तैनात** – (अ) पगार, नेमणूक.
**तैनाळ** – (फा.) म्यान.
**तोमर** – (सं.) घुसळण्याच्या रवीसारखे लोखंडी शस्त्र.
**त्रास** – (सं.) तिटकारा, किळस.

## थ

**थटी** – गोशाळा.
**थार** – आधार.

## द

**दरुणी** – अन्तःपुर, पत्निमहाल.
**दरख** (अ.) विचार.
**दराज** – (फा.) उंच, बळकट बांध्याचा.
**दरोगा** (फा.) पोलिस अधिकारी, मुकादम.
**दर्यासागर** – दर्यासारंग, आरमारी अधिकारी
**दस्त करणें** – (फा.) कैद करणे, धरणें.
**दळ** – सैन्य.
**दाद** – (फा.) न्याय.
**दादफिर्याद** (फा.) वरील अर्थाचा जोडशब्द.
**दाली** – तलवार अडकविण्याचा कमरपट्टा.
**दाहिजा** – दहा शिपायांची छोटी तुकडी.
**दिक्क** – (अ.) क्षीण, त्रस्त, पर्वा, भीड, अडथळा.
**दुमदारी** (फा.) पिछाडी, पिछाडीची फौज.
**दुरासद** – (सं.) दुःसाध्य, अत्यंत कठीण, दुःसह.
**दुलंग** – दोन्ही डगरीवर विसंबलेले, स्वार्थी, आपमतलबी.
**देशक** – देशमुख, देशपांडे, देसाई वगैरे देशावरचे अधिकारी.
**देहअवसान** – (सं.) मृत्यू.
**द्वैधीभाव** – टीप पाहा.
**दौलतबंक** – (फा.) मुख्य दरवाजावरील पहारेकरी.
**दौलतीचे खावंद** – राज्याचे धनी, मालक.
**द्यानतदारी** – (अ. दियानत् = धर्म) सचोटीनें, विश्वासानें, प्रामाणिकपणाने (फा. द्यानत = विश्वास).

## ध

**धर्मतः** – (सं.) धर्मप्रमाणे.
**धर्मरक्षी ऐसा नाहीं** – धर्मरक्षक असा दुसरा कोणी नाहीच.
**धाडी** – मुसलमान भाट, स्तुतिपाठक.
**धारकरी** – तलवारबहाद्दर, योद्धा.
**धारेकरी** – धाऱ्याने जमीन घेणारा, कूळ.
**धुरंग** – जमीन मोजणीचे परिणाम.

## न

**नख्ती, नगदी** – (अ.) रोख.
**नतीजा** (अ. = परिणाम) शिक्षा, फळ.
**नवाजणी** (फा.) परामर्ष.
**नवाजणें** (फा.) वाढविणे, परामर्ष घेणे, बक्षीस देणें.
**नवाजून** (फा.) नावाजून, प्रशंसा करून.
**नहर** (अ.) कालवा.
**नहो केविलवाणे** – अगतिक, बापुडवाणे नव्हेत.
**नाकर्ते** – अयोग्य, नालायक.
**नाकारेपण** – नाकर्तेपण, नालायकी.
**नाजूक जागा** – अवघड जागा.
**नामजाद** (फा.) नेमलेले.
**नालकी** – एक विशेष प्रकारची पालखी. पालखीहून नालकीचा मान मोठा.
**नावाजिशी, नावाजीस** (फा.) स्तुती, तारीफ.
**निखालस** – (अ.) शुद्ध, अगदी, निष्ठावंत, स्पष्ट.
**निखालसता** – शुद्ध भाव, संशयनिवारण.
**निजध्यास** – निदिध्यास.
**निमकहराम** – (फा.) निमक = मीठ अ. हराम = धर्मविरूद्ध, निषिद्ध) कृतघ्न, खाल्ल्यावरचे वासे मोजणारा.
**निमजगा** – नमाज पढण्याची जागा.
**निमताना** – (फा.) पीक किती येईल याचा अंदाज.

**निरख** – ( फा. )किंमत, भाव.
**निर्मित** – परमेश्वराने ठरविलेले, पूर्वनियोजित.
**निशस्त व बरखास्त** – ( फा. ) दरबारातील उठबस.
**निसबत** – ( अ. ) ताबा.
**नेदा** – देऊ नका.
**नेमस्त** – योजना.
**नैमित्तिक** – ( सं. ) काही विशेष कारण घडल्यामुळे करावे लागणारे कृत्य.

### प

**पइसलें** – पसरले.
**पटबंधन** – पट्टराणीच्या पदरास मुख्य पटाची ग्रंथी बांधणे.
**पटेकरी** – पट्टा खेळणारा.
**पड्यानी** – गुप्तरूपे, चोरून.
**पडला होता** – उजाड, पडित झाला होता.
**पद्महस्ती** – यशस्वी, भाग्यवान.
**परकरी** – महार लोक.
**परामर्श** – समाचार, व्यवस्था.
**परावृत्ती** – ( सं. ) मागे फिरणे.
**पाईक** – पायदळातील सैनिक.
**पाडाव करणें** – जिवंत धरणे.
**पायदामे** – ससाणा.
**पायलोक** – जोडशब्द, पायदळाचे लोक.
**पायवाके** – पक्षीबाज ( ससाणा ).
**पारपत्यगार** – व्यवस्थापक, अधिकारी.
**पाल** – लढाऊ गलबत.
**पालाण** – खोगीर.
**पाळेगार** – भोवतालचा मुलूख मारून स्वतंत्र रीत्या पुंडपणा करून आपल्या मुलखाच अधिराज्य गाजविणारा। बंडखोर.
**पाळकलेंक** – लेकावळा, अनौरस संतती.
**पिठोर** – पृथ्वीराज चव्हाण.
**पील** – हत्ती.
**पुरा** – पेठ, स्वतंत्र वस्ती.
**पुरातन** – जाणते, जुने, वंशपरंपरागत.
**पुरे करणें** – कत्तल करणे.
**पेशकशी** – ( फा. ) सरंजामाबद्दल घ्यावयाची खंडणी.
**पेशवाई** – ( फा. ) पन्तप्रधानकी.
**पैठणी** – रेशमी लुगडे.
**पोख्त सामान** – ( फा. ) उत्तम प्रकारचे, सर्वसज्ज असे सामान, शस्त्रास्त्रे, युद्धसामुग्री.
**पोते** – खजिना, द्रव्यसाठा.
**पोतेदार, पोतदार** – ( फा. ) द्रव्यपरीक्षक, नाणेपारखी.
**पोतेदारी** – पोतदाराचे काम, खजिनदार.
**पोवळी** – देवळाच्या आवराभोवतालची भिंत.
**पौरंदरी** – ऐंद्री पाहा.
**प्रतिनिधी** – ( सं. ) मुखत्यार, राजारामाच्या कारकीर्दीत प्रधान मंडळीत आलेला आणखी एक प्रधान.
**प्रमाण** – ( सं. ) खरे, खात्रीचे, निश्चित.
**प्रादुर्भाव** – ( सं. ) दिसणे, वर्चस्व, जोर, आरंभ
**प्राणापरतें** – प्राणापेक्षाही अधिक, प्राणापलीकडे.
**प्रावर्ण** – ( सं. प्रावरण ) पांघरूण.

### फ

**फकीर** – भिक्षेवर जगणारा, विरक्त साधू.
**फते पावणे** – ( अ. ) यशस्वी होणे.
**फंद** – ( फा. ) फसवणूक.
**फरमान** – ( फा. ) सनद ( फर्मानं राजपत्रकम् । )
**फरा** – ( सं. ) मांडीचे किंवा खांद्याचे हाड.
**फानस** – ( अ. ) कंदील.
**फौज** – ( अ. ) सेना. ( घोडदळ )

## ब

**बडवे** – पंढरपूरच्या विठ्ठलाचे पुजारी.

**बडे साहेबीण** – बू साहेबीण, बादशहाची आई.

**बदनजर** – ( फा. बद = अ. नझर् ) वाईट दृष्टी.

**बद राहा** – ( फा. ) गैरचालीचा, कुमार्गी.

**बपोशाक** – पोषाख केलेले.

**बमैफौज** – ( फा. बा. = अ. मय ) फौजेसुद्धा, सेनेसह.

**बरकत** – ( अ. ) लाभ.

**बरहक** – ( फा. ) न्यायाने, नीतीने.

**बरकंदाज** – ( अ. बर्क् = वीज, अग्नि फा. अन्दाख्तन् = फेकणे ) बंदूक चालविणारे, बंदुखी.

**बराबर** – ( फा. ) बरोबर, संगतीस, सोबतीने, इ.

**बहाणा** – ( फा. ) निमित्त, ढोंग.

**बहुल** – ( सं. ) कृष्णपक्ष, वद्यपक्ष.

**बळावणें** – प्रबळ होणे.

**बहंगी** – कावड, टोपली.

**बांग** – ( फा. ) प्रार्थनेला बोलाविण्यासाठी मुलाण्याने मशिदीतून केलेला पुकारा.

**बांके** – शिंग.

**बाज** – ( फा. ) ससाणा.

**बाजे** – इतर.

**बाजदबरसाद** – पावसाळ्यानंतर.

**बाणदार** – बाणाईत.

**बांधारा** – कडे ( सह्याद्रीचे )

**बारगीर** – मालकाने दिलेला घोडा घेऊन नोकरी करणारा शिपाई.

**बारचिन्हे** – ‘ बार, वार, ’ अशा कागदपत्रावरच्या नोंदी.

**बारा महाल** – राजाची खाजगी खाती : पोते, कोठी, पागा, दरजी, टंकसाळ, सौदागिरी, इमारत, हवेली, पालखी, थटी, चोबिना आणि शरी.

**बालपरवेशी** – लढाईत पडलेल्या कुटुंबास दिलेले वर्षासन, इनाम.

**बाहादारी** – जामीनकी, मध्यस्थी.

**बाहाली** – दूर करणे.

**बिदी** – ( सं. विधि ) रस्ता.

**बुडविणें** – नाश करणे.

**बुनगे** – ( फा. ) बिनलढाऊ नोकर लोक.

**बूसाहेब** – बडेसाहेबीण पाहा.

**बेकिलाफपणें** – मित्रभावाने.

**बेकैद** – बेशिस्त, नियमबाह्य.

**बेगम** – ( फा. ) अविवाहित स्त्री.

**बेजमी** – ( फा. ) साठा, संग्रह.

**बेजाबता** – ( फा. ) अन्याय.

**बेज्याहा** – ( फा. ) अनाठायी, फाजील, अनुचित.

**बेफाम** – ( फा. ) अनियंत्रित, गैरसावध

**बेमर्जी** – ( फा. बे, अ. मर्जी ) अवकृपा.

**बेलाग** – दुःसाध्य.

**बेहडा** – सरंजामाच्या नेमणुकीची सनद.

**बेहोष** – ( फा. ) धुंद, बेशुद्ध, मूर्ख.

**बोथाटी** – काठीच्या दोन्ही टोकास चिंध्यांचे गोळे बांधून ते पेटवून काठी फिरविण्याचा खेळ.

**बोभाट** – कागाळी, गावगुंडकी.

**बोलाखला** – आर्जवे.

**भाईचारा** – भ्रातृभाव, सख्यभाव.

**भींड** – श्रद्धा, आदर, पूज्यबुद्धी.

**भोपे** – देवीचा पुजारी.

**भृगुवासर** – ( सं. ) शुक्रवार.

**भ्रतार** – नवरा.

## म

**मंगलालंभन** – (सं.) वृषभादि मंगल वस्तूंचा स्पर्श.
**मजमदार** – (अ. मज्मू फा. दार) वसुलीकडील कारभारी.
**मंदवासर** (सं.) शनिवार.
**मनसबदार** – (फा.) अधिकारी, हुद्देदार.
**मनसबादार** – (अ. मन्सूबा = युक्ती फा. दार) कारस्थानी, हिक्मती.
**मनसबा** – (अ. मन्सूबा) विचार, ठराव.
**मरफे** – टिमकी.
**मर्यादा** – नियम, धारे.
**मसलत** – (अ.) मोहीम, सल्ला, योग्य विचार.
**मागती** – पुन्हा.
**माची** – पर्वताचा पायथा व शिखर यांच्यामधील सपाट जमीन.
**मातबर** – (अ. मुआतबर) थोर, प्रतिष्ठित
**मालमवेश** (अ.) मालमत्ता, चीजवस्त.
**माहीमरातब** (फा. माही = मासा, मरातिब सन्मानानें मिरविण्याचे चिन्ह. सुवर्णमत्स्य व दोन गोल सोन्याचे मिळून होणारे हत्तीवरून मिरविण्याचें बहुमानाचे चिन्ह. मोगल बादशहाकडून अशा तऱ्हेची सन्मानचिन्हे मांडलिक राजांस व सरदारांस मिळत.
**माळ** – किल्ल्यावर चढण्यासाठी शिडीसारखा उपयोगात येणारा दोरखंड.
**मुजाका** – (अ.) पर्वा, हिशेब, कदर
**मुतालिक** (फा.) दुय्यम अधिकारी.
**मुदारत** (अ.) सन्मानानें, आदरपूर्वक वागणूक, आर्जवें.
**मुर्दाईने** – मुर्दाडपणाने, पुंडाव्याने.
**मुरतेद** – तयार.
**मुलाणा** (अ. मौलाना) धर्मगुरु.
**मेट** – चौकी, पहारा, गस्त.
**मेढा** – लाकडें, वासे, बांधून केलेलें आवार.
**मोइन, मोईन्न** – (अ) नेमणूक, तैनात.
**मोकासा** – (अ.) इनाम म्हणून दिलेली जमीन किंवा गावखोती.
**मोगल** – मुसल्मान.
**मोगलाई राज्य** – मुसलमानांचे, म्लेंछांचे राज्य.
**मोहनमाळ** – (सं.) गळ्यात घातली असता बेंबीपर्यंत येणारी सोन्याची माळ.
**मोहरा** – उत्कृष्ट मनुष्य, सैन्याची आघाडी.
**मोहसबा** – (अ.) हिशेब.

## य

**यख्तियार** (अ. इख्तियार) सर्वाधिकार.
**या नशीब या ताले** (फा.) – 'अरे नशीबा' या अर्थाचे वचन.
**यागी** – खिन्न, दुःखी.
**यान** – (सं.) वाहन.
**येहसान** – एहसान पाहा.

## र

**रसद** – (फा.) सैन्यासाठी दाणा, गल्ला वगैरे, गावच्या वसुलाचा सरकारात भरणा.
**रसानगी** – (फा.) जासुदाच्या दाती तोंडी किंवा साध्या चिठ्ठीने दिलेली परवानगी.
**राजकारण** – संधान, भेद.
**राजश्येन** – (सं.) पांढरा ससाणा पक्षी.
**राजाज्ञा** – अष्टप्रधानांपैकी एक अमात्य.
**रूबरू** – (फा.) समक्ष, समोर.
**रोख** – (अ. रूख) बाजू, रस्ता, दिशा.
**रोखापत्र** – जोड शब्द (अ. रोखा = पत्र), आज्ञापत्र.

## ल

**लगड** – जोडी.
**लंगर** – ( फा. ) दोरखंड, होडीचा नांगर.
**लगी** – निशाणे लावलेल्या काठ्या.
**लघुमनुष्य** – नीच, हलकट, सामान्य माणसे.
**लदाऊ** – ओझे लादण्याचे.
**लहंबा गुरु** – लामा.
**लोक** – पायदळ.

## व

**वतन** – ( अ. ) वंशपरंपरागत नेमणूक, काम.
**वर्त्तमान** – समाचार, बातमी, हकीकत, खबर.
**वरकड** – बाकी, एरव्ही, इतर.
**वरदवंत** – वर देणारा.
**वाका** – ( अ. ) वर्तमान, हकीकत, मृत्यू.
**वाकेनीस** – ( फा ) खाजगीकडील लेखक. ( वाकानवीसो वृत्तांतलेखकः परिकिर्तितः )
**वाघरा** – जाळी.
**विग्रह** – ( सं. ) भांडण, युद्ध.
**विचित्र** – विशेष.
**विरंची** – ( सं. ) ब्रह्मदेव.
**विवंचोनी** – मंथन करून, पुनः पुन्हा विचार करून.
**वेत्रधारी** – चोपदार.
**वोढा** – आकर्षण, तसदी.
**वृत्तिवंत** – वतनदार.
**वृध्धाप्य** – म्हातारपण.
**व्यग्र** – प्रक्षुब्ध.

## श

**शरीरपाटव्य** – शरीरसौष्ठव, बांधेसूदपणा.
**शरीरसमंध** – ( सं. शरीरसंबंध ) विवाहसंबंध.
**शाहीन** – राजकीय, तोफेचा एक प्रकार.
**शामल** – जंजिऱ्याचे हबशी, सिद्दी.
**शिकस्त** – पराकाष्ठा.
**शिक्का** – ( फा. ) मुद्रा, छाप, ठसा.
**शिखर महादेव** – तालुका माण ( जि. सातारा ) येथील शिखरशिंगणापूरचा शंभुमहादेव.
**शिखात्याग** – शेंडी काढून संन्यास घेणे.
**शिलेदार** – ( फा. ) स्वतःचा घोडा घेऊन सरकारची नोकरी करणारा राऊत.

## स

**सखलाद** – ( तु. ) बनातीचे कापड.
**संचणी** – जमाव
**सडा** – एकटा, निःसंग.
**सतका** – दहीभात ओवाळून टाकणे.
**संधान** – डोंगर पठार, सपाट जागा.
**संधि** – ( सं. ) मिलाफ, समेट, अनुकूल काळ.
**सबनीस** – ( फा. ) सैन्यातील जमाखर्ची अधिकारी ( सबनीस्तथा सेनालेखकः )
**समेत** – युक्त, सह.
**समक्षता** – समोरासमोर भेट.
**सरकारकून** – ( फा. ) सर्वश्रेष्ठ अधिकारी.
**सरनोबत** – ( फा. ) सेनापती.
**सरपोष** – ( फा. ) अब्रू, प्रतिष्ठा, दरारा.
**सरंजाम** – ( फा. ) साधनसामुग्री, मन्सबदारास दिलेली जहागीर.
**सर्फराजी** – पोषाख, सन्मान, वढती.
**सर्वगुणसंपन्न** – राजा, प्रधान, राष्ट्र, कोश, बल, सुहृद, मित्र ही राज्याची ७ अंगे, त्यांनी युक्त.
**सर्वाभ्य** – सर्वाधिकारी.
**सलाबत** – धाक, दरारा.

सल्लाह – योग्य हितवाद, उपदेश.
सल्तनत – सुलतानी, राज्य, फौज.
सवाई – वरचष्मा.
सांग – भाल्यासारखे परंतु दोरीनें लांब फेकून मारण्याचे हत्यार.
साडे – ऐरणीपूजनाच्या वेळी वधूस वस्त्रे देण्याचा समारंभ.
साफदील – स्वच्छ अंतःकरणानें.
सावोत्रा – साहसी हल्ला.
साहेबजादा – खुद्द राजपुत्र (औरंगजेब).
साहेब–नौबत – (अ.) प्रचंड असा हत्तीवर घालून सरदारांपुढे वाजवीत चालवावयाचा नगारा.
सुतरनाळ – उंटावरची तोफ.
सुभेदार – (अ. सूबा = प्रांत, फा. दार = धारण करणारा) प्रांताधिकारी.
सुमारी – (फा. शुमार्) मोजदाद, गणना, संख्या.
सुरनीस – (फा.) सरकारी काबदपत्रांवर शिक्कामोर्तब करणारा अधिकारी.
सुलतानढवा – साहसी हल्ला.
सेकार – शाकारणीचे गवत.
हक्करुसूम – रयतेकडून नाना प्रकारचे जिन्नस घेण्याचे हक्क.
हजरतीस – धन्यास, स्वामीस.
हप्त – सात.
हंबीरी – मोठा पराक्रम.
हरिफाई – (अ.) वस्तादगिरी, शेरास सव्वाशेरी, धाडस, नाकावर टिच्चून.
हलखूद, हालखूद – जसे आवश्यक, योग्य तसें.
हलके करणें – कमी करणे.
हलगी – खंजीरी, डफडी.
हशम – पायदळातील शिपाई.
हात पोंचणें – संधी सापडणे.
हुनर – युक्ति, हिक्मत, कौशल्य.
हेजीब – वकील.
हेळणा – (सं.) अपमान, तिरस्कार.
होणारानुरूप – विधिलिखितानुरूप, परमेश्वरी योजनेप्रमाणे.
होत येतात – होत आले आहेत.
हौदा – (फा.) हत्तीवर बसण्याची उघडी अंबारी.

## क्ष

क्षीरवृक्ष – उंबराचे झाड.

२११२८
१२८०१
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१६०३६

REFBK-0016036